

# समर्थ रामदास
## जीवन व तत्त्वज्ञान

# श्री समर्थ रामदास
# जीवन व तत्त्वज्ञान

❋

प्रकाशक : अकॅडेमी ऑफ कंपेरेटिव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन ;
बेळगांव.

© प्रकाशक

□

किंमत : ३० रुपये

□

प्रकाशक :

ज. वा. परुळेकर

अकॅडेमी ऑफ कंपेरेटिव्ह
फिलॉसॉफी अँड रिलिजन :
बेळगांव.

□

मुद्रक :

एस. जे. हुंद्रे

रवि मुद्रणालय,
कडोलकर गल्ली, बेळगांव.
फोन :२३०७९

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रकाशकाचे दोन शब्द | | V |
| २ | प्रास्ताविक भाषण | – ज. वा. परुळेकर, कार्यदर्शी | VII |
| ३ | सदर | – डॉ. अ. ग. जावडेकर, अध्यक्ष | |


## भाग १ : निबंध


| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्रीसमर्थ जीवनपट | श्री. मुकुंदस्वामी रामदासी | १ |
| ५ | समर्थ रामदास : त्यांचे तत्त्वज्ञान व परमार्थ | डॉ. (सौ.) ललित चारुदत्त दाभोळकर | १९ |
| ६ | श्री समर्थांचा काल व कार्य : राजकीय व सामाजिक | डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख | ३० |
| ७ | महाराष्ट्राच्या रंगभूमीवरील शिव–समर्थ योग | सुनिल चिंचोळकर | ४७ |
| ८ | दासबोध : समर्थांची मुख्य शिकवण | श्री. व. ना. वैद्य | ६६ |
| ९ | रामदासांचे समर्थ मानसशास्त्र | प्रा. भालचंद्र र. मोडक | १०२ |
| १० | दासबोध आणि त्यातील नेमकी रामदासांची शिकवण | प्रा. सु. गु. देशपांडे | ११३ |
| ११ | समर्थ रामदास : आदर्श पुरुष. त्यांच्या तत्त्वज्ञानाची आजच्या काळांत आवश्यकता | डॉ. (सौ.) मंगला वैष्णव | १२६ |
| १२ | समर्थ रामदासांचा समाजवाद | श्री. पुरुषोत्तम पां. गोखले | १४० |
| १३ | श्रीसमर्थ रामदास सार्वकालीन आदर्श पुरुष | सौ. शालिनी अनंत जावडेकर | १७८ |
| १४ | श्रीसमर्थ रामदास स्वामींची तत्त्वसृष्टि | डॉ. रं. स. गोडबोले | २०३ |
| १५ | मनाचे श्लोक – त्यातील भक्तिरस व अध्यात्म | प्रा. प्र. म. उपाध्ये | २३२ |
| १६ | अध्यक्षांचा समारोप | डॉ. अनंत गणेश जावडेकर | २३८ |

## भाग २ : चर्चा


| | | |
|---|---|---|
| १७ | श्री मुकुंदस्वामी यांचे निबंधावर | २४९ |
| १८ | सौ. ललित दाभोळकर यांचे निबंधावर | २४९ |
| १९ | डॉ. एस्. डी. देशमुख यांचे निबंधावर | २५० |
| २० | श्री. सुनील चिचोळकर यांचे निबंधावर | २५४ |
| २१ | डॉ. वसंतराव वैद्य यांचे निबंधावर | २५७ |
| २२ | डॉ. बी. आर. मोडक यांचे निबंधावर | २६६ |
| २३ | प्रा. एस्. जी. देशपांडे यांचे निबंधावर | २७५ |
| २४ | डॉ. (सौ.) मंगला वैष्णव यांचे निबंधावर | २७८ |
| २५ | पद्मश्री श्री. बाबुराव गोखले यांचे निबंधावर | २९३ |
| २६ | सौ. शालिनीताई जावडेकर यांचे निबंधावर | ३०५ |
| २७ | डॉ. रं. स. गोडबोले यांचे निबंधावर | ३१४ |


## भाग ३ : निबंध लेखकांचा परिचय


| | | |
|---|---|---|
| २८ | श्री. मुकुंदस्वामी रामदासी | ३२५ |
| २९ | डॉ. (सौ.) ललित चारुदत्त दाभोळकर | ३२५ |
| ३० | डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख | ३२५ |
| ३१ | श्री. सुनील चिचोळकर | ३२६ |
| ३२ | श्री. वसंत ना. वैद्य | ३२६ |
| ३३ | प्रा. भालचंद्र र. मोडक | ३२७ |
| ३४ | प्रा. सु. गु. देशपांडे | ३२७ |
| ३५ | डॉ. (सौ.) मंगला वैष्णव | ३२८ |
| ३६ | पद्मश्री पुरुषोत्तम पांडुरंग गोखले | ३२८ |
| ३७ | सौ. शालिनी अनंत जावडेकर | ३२९ |
| ३८ | डॉ. रंगनाथ स. गोडबोले | ३३० |
| ३९ | प्रा. प्र. म. उपाध्ये | ३३० |
| ४० | डॉ. अनंत गणेश जावडेकर | ३३१ |
| | शुद्धिपत्र | ३३३ |

## प्रकाशकाचें निवेदन :

समर्थ रामदास स्वामींच्या तीनशेव्या पुण्यतिथीनिमित्त आमच्या संस्थेतर्फे दि. १२ ते १४ डिसेंबर १९८१ असे तीन दिवस एक चर्चासत्र आयोजिले होते. श्री रामदासांचे जीवन, कार्य व तत्त्वज्ञान याचा निष्ठापूर्वक व चिकित्सक व्यासंग करणाऱ्या सांप्रदायिक तसेच असांप्रदायिक अधिकारी विद्वानांचे श्री समर्थ रामदासाविषयीं निरनिराळ्या पैलूवर प्रकाश टाकणारे निबंध चर्चासत्रासाठी मुद्दाम मागविण्यांत आले होते. चर्चासत्रप्रसंगी उपस्थित राहून त्या त्या विद्वानानी आपापले निबंध श्रोत्यासमोर वाचले. या चर्चासत्राचे अध्यक्ष डॉ. अनंत गणेश जावडेकर, एम. ए. पीएच. डी. डी. लिट. हे होते.

सुरुवात सौ. वसुधा मोडक, एम्. ए. यांचे इशस्तवनानें झाली. त्यानंतर संस्थेचे कार्यदर्शी श्री. ज. वा. परुळेकर यांचे प्रास्ताविक भाषण झाले. संस्थेचे अध्यक्ष श्री. बाबासाहेब संगोराम यांनी श्री. जावडेकराना हार अर्पण करुन; अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारण्याची त्यांना विनंती केली, आणि श्री गुरुदेवानीच ही योजना आखली असे समजावे असे त्यांनी सूचित केले. नंतर डॉ. जावडेकर यांचे प्रास्ताविक भाषण झाले. त्यानंतर निबंधवाचनास सुरवात झाली, प्रत्येक निबंध वाचल्यानंतर चर्चा होई, आणि अध्यक्ष समारोप करीत.

प्रस्तुत ग्रंथ म्हणजे या चर्चासत्राचे संकलन होय. अध्यक्षांचे प्रास्ताविक व सत्रसमाप्तीचे वेळी केलेले समारोपाचे भाषण आणि श्री. परुळेकर यांचे सत्राचे आरंभी झालेले भाषण यांचाही या संकलनांत समावेश आहे. प्रा. उपाध्ये यांचा निबंध आमच्याकडे आला, पण ते स्वत: चर्चासत्रात भाग घेण्यास उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्याहि निबंधाचा समावेश या ग्रंथात करण्यात आला. आहे.

समर्थ रामदास स्वामींचे जीवन, त्यांचे कार्य व त्यांची शिकवण यांचे निरनिराळ्या दृष्टिकोनातून केलेले सांगोपांग विवेचन हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य होय. समर्थांचेविषयी वस्तुनिष्ठ ज्ञान करून देण्यास या ग्रंथाची बहुमोल मदत होईल असा विश्वास वाटतो.

तारीख १२-१२-१९८१ रोजी
हजर असलेले व चर्चा सत्रामधे भाग घेणारे.



बसलेले :- १) संगोराम २) डॉ. जावडेकर ३) मुकुंदस्वामी रामदासी
४) सौ. शालिनीबाई जावडेकर ५) सौ. मंगला वैष्णव
६) सौ. ललित दाभोलकर.

उभे असलेले :- १) कुलकर्णी २) मोडक ३) वैद्य ४) चिंचोळकर
५) देशमुख ६) परूळेकर ७) तंगोड.

# श्री. ज. वा. परुळेकर ( कार्यदर्शी ) यांचे प्रास्ताविक भाषण

" श्री समर्थ रामदास : त्यांचे जीवन व तत्त्वज्ञान " या विषयावर आजपासून येथे परिसंवाद सुरू होत आहे. त्याचा कार्यक्रम आपणास माहित आहेच.

ही संस्था— अकॅडेमी ऑफ कंपेरेटिव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन, बेळगांव, या नावाचा विश्वस्त निधी असून थोर साक्षात्कारी संत श्री गुरुदेव रानडे यांनी ही स्थापना केली. गुरुदेव रानडे यांचे सांप्रदायांत रोज त्रिकाळ दासबोधाचे वाचन व मनाचे श्लोक वाचले जातात. या सांप्रदायातील संत पुरुष— श्री निंबरगी महाराज अगर भाऊसाहेब महाराज अगर अंबूराव महाराज हे फक्त कन्नड भाषाच शिकलेले व मातृभाषा कानडी असलेले, अशी माणसेसुद्धा दासबोध वाचून त्यावर उत्तम रीतीने प्रवचने करीत असत. श्री समर्थांचे कार्य किती मोठे होते, त्याचे वर्णन श्री गुरुदेव रानडे यांनी आपले Mysticism in Marathi Literature या इंग्रजी ग्रंथात उत्तम रीतीने केले आहे. इंग्रजी जाणणाऱ्यांनी तो ग्रंथ अवश्य वाचावा.

या परिसंवादात भाग घेणेकरता अधिकारी व्यक्ती निवडणे जरूर होते. कशी निवड करावी : कोणास बोलवावे, याबद्दल पत्रव्यवहार सुरू केला. एका पत्रातून उत्तर आले :—

' केवळ जाण्यायेण्याचे खर्चावरती लोक व्याख्यानासाठी येऊ शकणार नाहीत. तरी आपण मानधन काय देणार ते कळवावे. तसेच प्रवासखर्च याचा अर्थ आपल्या घरून निघाल्यापासून घरी परत येईपर्यंत रेल्वे, एस्. टी. तिकीट, रिझर्वेशन, हमाली, चहापाणी, टांगा, रिक्षा या सर्वांचा खर्च असा होतो. तसेच त्यांची निवास-भोजनाची व्यवस्था आपण आपले खर्चाने बेळगावी करावयास हवी. हे सर्व आपणास मान्य आहे काय ?'

सुदैवाने अशी कोणतीही मागणी न करणारी, सर्वोत्कृष्ट अशी मंडळी या परिसंवादांत भाग घेणेकरता येथे आली आहेत. समर्थांचे जीवनाचा, तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेली अशीच ही सर्व थोर मंडळी आहेत. विवेक आणि वैराग्य येथे थोडे फार वास करीत आहेत आणि म्हणूनच या सर्वांनी विनाअट या परिसंवादामध्ये भाग घेणेचे कबूल केले.

तीनशे वर्षांपूर्वी समर्थांचे वेळचा काळ कसा होता, किती बिकट व तापदायक होता, त्याचे वर्णन दासबोधामध्ये समर्थांनीच केलेले आहे.

लेकुरें उदंड जाली । तों लक्ष्मी निघोन गेली ।
बापुडी भिकेसी लागली । खावया अन्न मिळेना ।।
स्त्री सापडली सुंदर । गुणवंत आणि चतुर ।
ऐसा आनंद मानिला । दुःख सर्वही विसरला ।

तंव तो गलबला जाला । परचक्र आलें ॥
अकस्मात धाडी आली । कांता बंदी धरून नेली ।

पुढे पहा :

ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरासीच भजती ।
कित्येक तुरूक होती । आपले इच्छेनें ॥
आत्तांचे ब्राह्मणी काय केले । अन्न मिळेनासे जाले ।

अशा या परिस्थितींत समर्थांनी आपलें कार्यास प्रारंभ केला आणि देशामध्ये सुखसमृद्धि आणून दाखविली. छत्रपती शिवाजी महाराजासारखी माणसे पुढे आली आणि त्यांनी आपले देशाचे रक्षण केले : धर्माचे रक्षण केले : स्वातंत्र्य मिळविले. आज आपले देशात जवळ जवळ तशीच परिस्थिती आहे. भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झाला आहे. लांचलुचपतीचे प्रकार उघड उघड घडत आहेत. स्त्रियांवर बलात्कार झाल्याच्या बातम्या रोज येत आहेत. केव्हा केव्हा पोलीस चौकीत : केव्हा रेल्वे गाडीत : केव्हा भर रस्त्यावर. हरिजन 'तुरूक' होत आहेत. गरीबीचे चटके बसत आहेत आणि उपासमार भोगणाऱ्यांची संख्या वाढतच आहे.

अशा प्रकारे सामाजिक स्वास्थ्य पूर्ण बिघडून गेले आहे. या परिस्थितीत श्री समर्थांचे कार्याची आठवण येते. तशाप्रकारे पुन्हा कार्य सुरू झालेशिवाय तरणोपाय दिसत नाही. समर्थांनी काय कार्य केले, कसे केले; संघटना कशी घडवून आणली; महंतांची–पुढाऱ्यांची निवड कशी केली हे सर्व पाहून तशाच मार्गाने जावून "पापाची खंडना" करावी लागेल आणि मगच आनंदवनभुवनामध्ये समर्थांनी वर्णन केल्याप्रमाणे भारत देशामध्ये सदाचार आणि समृद्धि नांदू लागेल. या परिसंवादामध्ये जे निबंध वाचले जातील. जी चर्चा होईल, त्यामुळे थोडेफार मार्गदर्शन होईल अशी आशा करूया.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून श्री. अनंतराव जावडेकर यांचेसारखे विद्वान व विचारवंत दुसरे गृहस्थ मिळणे कठीणच. सुदैवाने ते आज आपलेमध्ये आले आहेत. बडोदे युनिव्हर्सिटीत तत्त्वज्ञान विभागाचे मुख्य प्राध्यापक व प्रमुख म्हणून कित्येक वर्षे काम करून ते नुकतेच निवृत्त झाले आहेत. अखिल भारतीय स्वरूपाच्या इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेसचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी कित्येक वर्षे काम केले आहे. त्या संस्थेचे यंदा जनरल प्रेसिडेंट म्हणून ते निवडले गेले आहेत व त्याकरता त्याना भुवनेश्वर येथे या महिनाअखेर जावे लागणार आहे. आपला एम्. ए. चा अभ्यास करणेकरता श्री गुरुदेव रानडे यांचे घरी अलाहाबाद येथें ते दोन–एक वर्षे होते आणि म्हणून त्या थोर संतांचाही व यांचा संबंध आला आहे. असे थोर व विद्वान गृहस्थ आजचे अध्यक्षस्थान स्वीकारणेकरता आम्हास मिळाले आहेत हे आमचे भाग्यच. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी मी त्यांना विनंती करून हे भाषण संपवितो.

# डॉ. अनंत गणेश जावडेकर, (अध्यक्ष) यांचे प्रास्ताविक भाषण

सौ. शालिनीताई जावडेकरांच्या सोबत मी येथे आलो. त्यांना या चर्चासत्रासाठी आमंत्रण आले; ते त्यांनी स्वीकारले. मी श्रोता म्हणून येथे उपस्थित राहण्यासाठी आलो. परंतु अनाहुतपणे मला हे अध्यक्षस्थान देण्यात आले आहे. गुरुदेवांची इच्छा आज्ञारूप समजून मी हे पद काही सेवा घडावी म्हणून स्विकारत आहे.

मी प्रो. सोनोपंत ऊर्फ मामा दांडेकर यांचा बी. ए. च्या अभ्यासक्रमासाठी पुण्याच्या सर परशुरामभाऊ कॉलेजचा विद्यार्थी. त्यांनी मला त्यांचे फर्ग्युसन कॉलेजमधील गुरु प्रो. रामभाऊ रानडे यांच्याकडे एम्. ए. साठी जाण्यास प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणे गुरुदेवांनीही माझी परीक्षा घेऊन त्यांचेकडे अलाहाबादला त्यांच्या कुटुंबात राहून एम्. ए. चा अभ्यास करण्यासाठी निवडले. दुसरेही असेच विद्यार्थी– कर्नाटक आणि महाराष्ट्रांतील– त्यांचेकडे याचप्रमाणें राहात असत. त्यांचेकडे राहणे ही एक तपस्या होती. रात्री अपरात्री ते त्यांच्याजवळ वाचन करण्यासाठी उठवीत असत. पण तो एक लाभ असे. जे युनिव्हर्सिटीच्या वर्गात शिकायला मिळत नसे ते त्यांच्या उत्स्फूर्त चर्चेमध्ये घरी शिकायला मिळत असे. सध्या माझे जे कांही तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत स्थान आहे ते गुरुवर्य दांडेकर आणि गुरुवर्य रानडे यांच्या हाताखाली शिकल्यामुळे आहे. गुरुवर्य प्रा. न. ग. दामले यांच्या हाताखाली मी डॉक्टरेट मिळविली. त्या तिघांचे माझ्यावर असे उपकार आणि संस्कार झाले आहेत. असो.

श्री समर्थांच्या ३०० व्या पुण्यतिथी वर्षानिमित्त गुरुदेव मंदिराच्या विश्वस्तांनी हा चर्चासत्राचा अभिनंदनीय उपक्रम केला आहे. गुरुदेवांच्या सम्प्रदायांत दासबोधाचे पारायण करतात. नित्य भजनांत दासबोधांतील समास वाचण्याचा परिपाठ आहे. अलाहाबादला असतांना आम्ही विद्यार्थी रोज सायंकाळी सांप्रदायिक भजन व दासबोधांतील काही समास वाचत असू. तेव्हांपासून दासबोधाचा माझा परिचय. तथापि मी काही स्वतःस तज्ज्ञ समजत नाही. सामान्य जाणकाराप्रमाणेंच माझा संतवाङ्मयाचा व रामदासांचा परिचय.

या चर्चासत्रानिमित्त जे पत्रक काढण्यांत आले आहे त्यांत शेवटी असे म्हटले आहे की, "सात्त्विक विद्वानांनी, समर्थभक्तांनी हे निबंध लिहिलें आहेत, आणि श्री समर्थांचे यथार्थ दर्शन घडण्याकरता हा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे." त्यासंबंधी थोडे बोलले पाहिजे.

'सात्त्विक विद्वान' असा शब्दप्रयोग केला आहे. पर्यायाने असे सूचित करावयाचे आहे कीं, विद्वानांत सर्वच सात्त्विक असतात असे नाहीं. तामसी विद्वान, रजोगुणी विद्वानही असु शकतात. भगवद् गीतेमध्ये १७ व्या व १८ व्या अध्यायांत

श्रद्धात्रयविभाग करून निरनिराळ्या गोष्टींचे– ज्ञान, कर्म, कर्ता इत्यादिकांचे– असे त्रिविध वर्गीकरण केलेले आढळते. तेथे विद्वानांचे अशा तऱ्हेचे वर्गीकरण केलेले नाही. तथापि तसे वर्गीकरण करता येणे शक्य आहे. काही विद्वानांनी रामदासांच्यावर काही आक्षेप घेतलेले आहेत. चिखलफेंक केलेली आहे. ते विद्वान् खरे पण त्यांना सात्त्विक म्हणता येणार नाही. कारण स्वतःच्या पूर्वकल्पना, पूर्वग्रह यांना अनुसरून त्या विद्वानांनी रामदास आणि त्यांच्या वाङ्मयाकडे पाहिले आहे. प्रा. गं. बा. सरदार * आणि सर्वसाधारण जडवादी, समाजवादी, साम्यवादी यांनी आधुनिक विचारप्रणालींच्या निकषावर रामदासांना प्रतिगामी, मागासलेले ठरविले आहे. ते ब्राह्मण्याचे व उच्चवर्णीयांचे प्रतिनिधी असल्याने त्यांनी गतानुगतिक पूर्वपरंपरेला धरूनच समाजांतील वर्णव्यवस्था व धर्मसंस्थेकडे पाहिलेले आहे. अर्थात् या बाबतींतील १७ व्या शतकातील श्री शिवाजीमहाराज यांची विचारसरणीही रामदासकालीनच होती. त्यामुळे शिवाजी रामदासाइतकाच प्रतिगामी ठरतो. याचा अर्थ असा कीं, या उभयतांनी तत्कालीन विपरीत परिस्थितींत बड्या मुसलमानी सत्तेविरुद्ध प्राणपणाने झगडून स्वराज्याची स्थापना केली. या त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीचे गुणवर्णन करणे बाजूला राहिले व आधुनिक कालबाह्य संदर्भाला अनुसरून पाहिल्यामुळे त्यावेळच्या त्यांच्या अद्वितीय कामगिरीला अगदीच गौणरूप दिले गेले.

त्याचप्रमाणें प्रा. न. र. फाटका*सारख्या विद्वानांनी रामदासांनी विधवापुनर्वसनाच्या बाबतीत त्या काळांत धारिष्टानें केलेल्या त्यांच्या कार्याबाबत चारित्र्यहनन करणारे उद्गार काढले आहेत. पुरावा नसतांना असे करणे संशोधकास न शोभणारे आहे. खरे तर रामदासांचा स्त्रियांबद्दलचा दृष्टिकोण काहीसा पुरोगामी आणि समतोल असा असून त्यांचे या बाबतीतील कार्य पुढच्या पिढ्यांना प्रेरणादायक होण्याजोगे म्हटले पाहिजे.

न. र. फाटकांच्या मते रामदासांनी खऱ्या अर्थाने राजकारण केलेच नाही. हाही आक्षेप राजकारणाकडें संकुचितपणाने पाहण्यांतून उद्भवलेला आहे.

असे काही आक्षेप उकरून काढल्याने खरे म्हणजे उदात्त कार्यभाग तर साधत नाहींच, परंतु माकडाच्या हाती कोलीत दिल्याप्रमाणें त्याचा विपरीत अर्थ मतलबी लोक काढतात. हिंदवी राज्य स्थापनेच्या शिवाजी महाराजांच्या कार्यांत– त्यांच्या राजकारणात– रामदासांचे सहाय्य होणे तर दूरच राहिले, पण एका तथाकथित विद्वानाने तर रामदासांना सरळ औरंगजेबाचे हेर म्हणूनच संबोधले आहे. अर्थात् जातीय वैमनस्यानें ग्रस्त झाल्यानें विचारांवर विकारांचा पडदा पडतो आणि अशा तामस बुद्धीतून रामदासांवर असह्य अन्याय केला जातो हे उघडच आहे. तेव्हा विद्वत्तेला सात्त्विक बुद्धिची जोड पाहिजे हे उघडच आहे.

---

* प्रा. सरदार आणि प्रा. फाटक यांचे नंतर काहीसे मतपरिवर्तन झाले आहे.

येथे निबंध वाचणारे सात्विक विद्वान् आहेत हे योग्यच आहे. परंतु पत्रकांत पुढे म्हटले आहे की, ते समर्थभक्तही आहेत. या चर्चासत्राचा उद्देश समर्थांचे यथार्थदर्शन घडविण्याचा आहे. त्या दृष्टीनें पाहाता समर्थभक्त असणे हा गुणही होऊ शकेल पण तो दोषही होऊ शकणार नाहीं असें नाही.

एखाद्या संप्रदायाचा अभ्यास आणि त्याचे मर्म समजण्यास जसा त्या संप्रदायांतील जाणकाराला अधिकार अनायासे प्राप्त असतो तसा असांप्रदायिकांना असण्याची शक्यता कमी असते. त्यादृष्टीनें समर्थांना समजण्यास समर्थभक्तीची आस्था ही त्यांची गुणवत्ताच ठरते. परंतु एकाद्या संप्रदायाचे वा कोणत्याही वस्तुस्थितीचे यथार्थदर्शन घडण्याचे दृष्टीनें आस्था आड येण्याचीही शक्यता असते. एखाद्या वस्तूसंबंधी जितकी आस्था अधिक तितका त्या वस्तूसंबंधी वस्तुनिष्ठ दृष्टिकोन ठेवणेही अधिक अवघड होऊन बसते. आपल्याला प्रिय वाटणाऱ्या व्यक्तिचे गुण वाजवीपेक्षा अधिक दिसतात व दोषांकडे डोळेझांक आपोआप होऊन जाते. त्यामुळे यथार्थदर्शन घडेल याची काय शाश्वती असणार ? अभ्यास विषयाबद्दल आस्थाही असावयास पाहिजे. व अनासक्त समतोल वृत्तीही असावयास पाहिजे. त्याशिवाय वस्तुनिष्ठ यथार्थदर्शन होत नाहीं. अर्थात् समर्थभक्त असूनही वस्तुतंत्र, वस्तुनिष्ठ परिशीलन करण्याची कुवत असणे अशक्य असू नये.

आपल्या येथे निबंधवाचकाकडून व त्यानंतरच्या चर्चेतून समर्थाविषयीं यथार्थ चित्र उभे राहील व त्यातून आपणास मार्गदर्शन लाभेल अशी अपेक्षा आपण करूया. कारण ते सर्व अधिकारी स्त्री पुरुष आहेत.

भाग पहिला

# निबंध आणि अध्यक्षांचा समारोप

*

**विशेष सूचना**

डॉ. जावडेकर यांचे "अध्यक्षांचा समारोप" हे २३८ ते २४६ पृष्ठांचे भाषण "भाग दुसरा : चर्चा" याचेनंतर सर्वांत शेवटी वाचावे, ही विनंति.

# श्रीसमर्थ जीवनपट

—मुकुंदस्वामी रामदासी

श्रीमदाद्यशंकराचार्य, राष्ट्रगुरु समर्थ रामदास आणि स्वामी विवेकानंद या तीन साधुपुरुषांच्या कर्तृत्वाचा प्रभाव भारतीय इतिहासावर प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे चांगलाच उमटला आहे. बौद्धमताच्या प्रभावाखाली गेलेल्या आत्मविस्मृत वैदिक धर्मानुयायांना आचार्य शंकरानी ताळ्यावर आणलं. मुसलमानांच्या राक्षसी अत्याचारांनी भयविव्हल झालेल्या हिंदूंना धीर देऊन स्वधर्मरक्षणासाठी समर्थांनी प्रेरित केले. वैज्ञानिक व रासायनिक संशोधनांच्या डोळे दीपविणाऱ्या परिणामांनी भ्रांत झालेल्या हिंदुस्थानवासी जनांची अस्मिता स्वामी विवेकानंदांनी प्रदीप्त केली. बौद्ध, मुसलमान आणि ख्रिश्चन या तिन्हीही आक्रमक धर्मांच्या उद्दंडतेला आळा घालू पाहणारे हे तिघे धर्मवीर हिंदुस्थानातच जन्मले–हिंदूधर्मातच वाढले– मानवतेच्या उत्कर्षासाठी लढतांलढतां चिरंजीव झाले. त्यांच्या जीवनांचे अवलोकन सिंहपराक्रमाला उत्तेजन देईल, भूतदयाभावाला चेतवेल. कराव्या लागणाऱ्या अतीव परिश्रमांचा परिणाम असूं शकेल. श्रीशंकराचार्य व स्वामी विवेकानंद दोघेही, अल्पायुषी ठरले. त्या दोघांचे मानानें श्रीसमर्थ दीर्घायुषीच म्हणावे लागतील. त्यांच्या दीर्घायुष्याचें रहस्य पूर्वतयारीसाठीं त्यांनी दिलेल्या सवडीतच सापडेल.

'या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।। " अशी खात्री तर तिघांचीही पटली होती. त्यामुळेच हाडांची काडे करुन त्यांनी आपापल्या परंपरा निर्माण केल्या. कमी अधिक काळ लोटला तरी आचार्यांची धर्मपीठे व मठ—मठांच्या आज्ञेत वागणारे साधुसंन्यासीवैराग्यांचे आखाडे, श्रीसमर्थांचे निष्ठावान सांप्रदायीक अन् अनुयायी, आणि स्वामीजींनी नांवारुपास आणलेली रामकृष्ण आश्रम ही संस्था आजही कार्यरत आहेत. श्रीसमर्थांचे कार्यक्षेत्र भौगोलिक व सामाजिक दृष्टया इतर दोघांच्या मानानें लहान दिसलें, त्यांच्या संप्रदायाची आज वरीचशी वाताहत झाल्या-सारखेंही भासलें तरी त्यांचे तत्वज्ञानाचा व कार्याचा प्रभाव आणि त्यांना मिळालेली श्रीशिवछत्रपतींसारख्या राजपुरुषाची जोड यायोगें त्यांचे जीवन अधिकच चित्तवेधक झाले आहे. शके १५३० च्या चैत्र शुद्ध नवमीपासून शके १६०३ च्या दासनवमी-पर्यंत ७३ वर्षे साडेदहा महिन्यांची ही जीवनगाथा अविच्छिन्न अभंगपणानें शोधू गेल्यास अखंड महाभारताचें रामायण दृग्गोचर होईल. 'मयि नीती बलं भीमे 'च्या अनुसंधानानें ' त्वयि युक्ति: शिवे शक्ति: ' अशा शब्दांत श्रीसमर्थचरणांशी निवेदन होऊं शकेल. श्रीसमर्थांच्या जीवनपटातून अभिव्यक्त होणाऱ्या अंतरात्म्याचें समर्थत्व हा एक सुसंबद्ध व पूर्णनिबद्ध तत्वनिर्देश ठरेल.

कोणत्याही समाजात चांगली-वाईट माणसे असतात. त्यांतील चांगल्यांच्या चांगुलपणाची परीक्षा करुन त्यांना अधिक चांगले होण्याची प्रेरणा व दीक्षा देत इतरांनाही त्यांचे अनुकरण करण्यासाठीं प्रवृत्त करीत पुढे नेईल तें खरे नेतृत्व. वावरतील तर सावरत, बिचकतील तर चुचकारत, हेंकाडांच्या जाड प्रयत्नांचा पाठपुरावा करीत आणि उद्दंडांना दंड देत महत्कार्याचा जगन्नाथ पुढे सरकतो. एक प्रचंड रथ शेवटास नेल्याचें सौख्य साऱ्या श्रमांचा विसर पाडण्यास पुरेसें ठरतें. त्या सौख्याचें स्मरण असाच रथोत्सव प्रतिवर्षी करण्याची स्फूर्ती वाढवितें. श्रीसमर्थां-सारख्यांचें कार्य तशाच कार्यांची प्रेरणाशक्ती असल्यानें देशकालपरिस्थितीच्या सापेक्षतेनें त्याचें गुणग्रहण पुन:पुन्हा होणें अपरिहार्य. "शाश्वताचें अधिष्ठान । कोठेंही न दिसे ॥" अशी खंत करणाऱ्या कर्मदरिद्री कपाळकरंटयांना ' आत्मा माया विकार कारी । आळ घाली ब्रह्मावरी ।।' असें बजावून ' अशाश्वताचा मस्तक मणी।तयाची येवढी करणी ।। दिसेना तरी काय झाले । धणी । तयासीच म्हणावे ।।' अशी पक्की कानपिचकी देणाऱ्या समर्थ सद्गुरुनी व्याप आटोप करीत— धकेचपेटे सोसीत ' नभामाजि तारांगणें' अशा तेजस्वी नररत्नांची जी वैभवसंपन्न खाण उघडी करुन दाखविली ती पाहिल्यावर " गुरुदेवा ! पैलपारु पाववी मज ! " अशीच प्रार्थना कोणत्याही प्रवृत्तीचा साधक केल्याशिवाय राहणार नाही. " यमैवेष वृणुते स तेन लभ्य: " या नियमान्वयें समर्थ जेवढी कृपा करतील तेवढा त्यांचा साक्षात्कार आपणास लाभावयाचा. त्यांच्या पदचिन्हांचा मागोवा घेण्यास प्रथम जांबेच्या परिसरात पोंचले पाहिजे.

श्रीसमर्थांचे पूर्वज (मूळपुरुष) कृष्णाजीपंत वेदर प्रांतातून गोदातीरीं आले. एकटे नाही आले. चार मित्र कुटुंबांसह आले. आपले उपाध्याय चाभाडे यांनाही संगतीस घेऊन आले. ' स्वदेशी भोगी विरत्ती ' अशी मूर्खता मुळातच ठोसरांचे कुळात नाहीं. आणि तें कूल सश्रद्धांचे आहे हा इतिहासाचा प्रथमाधार. झाबऱ्या महार चोढालेकर यास बरोबर घेऊन, गोदावरी ओलांडून, दशरथपंत ऊर्फ दादोपंत कसबे वडगांवच्या पडपांढरोपर्यंत पोचले. स्वाभिमानी होते. ' वडिली जें जें मेळविले । त्यासाठी भांडत वैसले ॥' ही अपकिर्ती त्यांना नको होती. ' भेटो कोणी येक नर । धेड माहार चांभार ॥ त्याचे राखावें अंतर । या नाव भजन ॥ ' हें त्यांना समजत होतें. लखमाजी गवळयाला पाटीलकीचा मोठेपणा देऊन बारा गांवांच्या पांडेपणाची व जोसकीची वृत्ती त्यांनी संपादन केली. यातून त्यांचे कर्तृत्व डोळयात भरते. श्रीरामकुलाची प्रीती राघव, आत्माराम, राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, हनुमंत या नावातून जाणवते. वासुदेवपंत ऊर्फ व्यासोपंत यांचे व्याकरण- वेदांतावरील प्रभुत्व, नीराजी ऊर्फ निरंजनपंत यांची ब्रह्मवेत्ता म्हणून ख्याती, आत्मारामांची कर्तबगारी, आत्माराम धोंडदेव यांची दानशूरता या सर्व गोष्टींचा उत्कर्ष समर्थांचे व्यक्तित्वात परिपूर्ण झालेला दिसतो. खटकते ती एकच गोष्ट. समर्थांचे आजोबा त्रिंबक ऊर्फ बाहणाजीपंत वारले तेंव्हा समर्थांचे वडील सूर्याजीपंत होते दहा वर्षांचे, सूर्याजीपंत वारलें तेवेळीं समर्थांचे वय होते सात वर्षांचे व त्यांच्या थोरल्या बंधुचे- श्रेष्ठ गंगाधर स्वामींचे दहाच वर्षांचे. श्रेष्ठांनी देह ठेवला तेव्हां त्यांची मुले रामजी-शामजी ही अल्पवयीच होती. या पार्श्वभूमीवर श्रेष्ठ समर्थांना लाभलेले दीर्घायुष्य आश्चर्यकारक आहे. या दीर्घायुष्याचे योगानें कर्तृत्वास वाव व पुण्यफलाचा योग त्यांच्या भाग्यशाली जीवनात अवतरला.

श्रीसमर्थांचे बालपण इतिहासास फारसें ज्ञात नाहीं. तारुणीच उठाउठी भजन करणारी, तांतडीची विवेकशक्ती कळणें अवघडच आहे. प्रौढ वयातील कांही थोडे मुख्यत: चमत्कारांच्या आख्यायिका बनून समोर येते. ' हे कैसे कैसे केले त्याचा तोचि जाणे' म्हणून स्वस्थ बसण्यावांचून मार्ग नाही.

श्रेष्ठ व समर्थ दोघांच्याही मुंजी त्यांच्या त्यांच्या वयाच्या पाचव्या वर्षीच सूर्याजीपंतांनी केल्या होत्या. श्रेष्ठांचा विवाहही दहाव्या वर्षी सामवेदी अंबडकर देशमुखांची कन्या पार्वतीबाई इचेशीं त्यांनी केला. शास्त्रावरील निष्ठा आणि निरर्थक रूढी डावलण्याची हिंमत या दोन्ही गोष्टी समर्थांना पूर्वजांकडून लाभल्या आहेत. सूर्याजीपंतांचा मृत्यू हा बालवयातच समर्थांच्या निरागस वृत्तीवर घडलेला प्रमुख आघात दिसतो. यानंतर मृत्यूची विविध रूपे- अगदी स्वैर तांडवसुद्धा त्यांना पहावयास मिळाले असेल. पण तपस्वी-साक्षात्कारी कृतार्थ पित्याचा वियोग हा नको तो प्रसंग अवघ्या सातव्या वर्षीच त्यांचेवर

ओढवला. म्हाथोर ते मृत्यपंथेचि गेले । कितीयेक ते जन्मले आणि मेले ।। मरे येक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढे जात आहे ।। मना पाहतां सत्य हे मृत्यभूमी । जिता बोलती सर्वही जीव मी मी ।। चिरंजीव हे सर्वही मानिताती । अकस्मात सांडूनिया सर्व जाती ।। इ. मनोबोधातील श्लोक, श्रीदासबोधाचे तिसऱ्या दशकातील मृत्युनिरूपण नांवाचा नववा समास, देहांतनिरूपण या एकाच नांवाचे सातव्या दशकातील दहावा व नवव्यातील आठवा असे दोन समास, 'आपणास आहे मरण । म्हणौनि राखावें बरेंपण ।। मरणाचें स्मरण असावें । हरिभक्तीस सादर व्हावे ।। आपण आवचिते मरोन जावे । मग देवास कोणें भजावें ।। याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ।।' इत्यादि चढतेवाढते विचार पाहिल्यावर 'मृत्युदुःख सगट जना । कासावीस करी ।' हें तर पटतेच, पण बालवयातील नारायणाच्या मनःस्थितीचें अनुमान करण्यास व त्याचें अंतःकरणावर झालेला सखोल परिणाम जाणण्यास या सर्व साहित्याचा उपयोग होतो. सुदैव इतकेंच कीं, नारायण वैफल्यग्रस्त बनला नाहीं तर विरक्त झाला. 'लोक मरमरों जाती । वडिले गेली हे प्रत्नीती । जाणतजाणत निश्चिती । काय मानिले ? आग्न गृहासी लागला । आणि सावकास निजेला । तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ?' असे प्रश्न जनमनाला विचारून 'याचि जन्में येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें । मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ।। ये गोष्टीस करील अनुमान । तो सिद्धचि पावेल पतन । मिथ्या वदे त्यास आण । उपासनेची ।' असें स्पष्ट दिग्दर्शन करण्याची कुवत त्यांनी आंगीं बाणवली हें आपलें महद्भाग्य.

बाल नारायणाच्या जीवनातील हूडपणा, दंगामस्ती, शरीरबलाच्या व बुद्धिबलाच्या गोष्टी आज करमणुकीस ठीक आहेत. त्यांतील 'लाथ मारेन तेथें पाणी काढेन' आणि 'हात लावेन त्याचें सोनेच करेन' ही हिंमत व आत्मविश्वास मुख्यतः लक्षणीय आहेत. कर्तव्यासंबंधीचा त्यांचा वज्रनिर्धार आवाळू या नांवानें त्यांच्या भव्य ललाटाच्या उजव्या बाजूस आमरणान्त दृग्गोचर राहिला. 'आई चिंता करितो विश्वाची' हें प्रांजल आत्मनिवेदन करणाऱ्या या बालकास केवळ रामउपासनेसाठीं स्वतःचा लग्नसमारंभ उधळून जाण्याचे किमपि कारण नव्हतें. जपतपअनुष्ठान ही तर पैतृक संपत्तीच होती त्याच्या वांट्यास आलेली. श्रेष्ठांनी उपदेश देण्याचें टाळल्यानंतर 'सुखें देवालयीं निद्रा' करणारा हा वटु श्रीरामकृपेनें राष्ट्रगुरू या पदास पोंचला. त्याच्या बाल्यातील हूडपणाबरोबर त्याच्या जिज्ञासू व अभ्यासू प्रवृत्ती पूर्वचरित्रकारांनी नोंदल्या असत्या तर हव्या होत्या.

'द्विज सावधान ऐसें सर्वत्र विवाहमंगलीं म्हणती । तें एक रामदासें

आयकिलें त्या सदा असो प्रणती ।।' असें कविवर्य मोरोपंत म्हणतात. श्रीसमर्थांनी 'सावधान' हा शब्द ऐकला; एवढेंच नव्हे, तर आज्ञा म्हणून पाळला. आणि इतरांनाही त्याच शब्दानें पुन:पुन्हा इशारे दिले. १) याकारणें सावधान। एकाग्र असावें मन । तरी मग जेवितां भोजन । गोड लागे ।। २) अंतरीं नाहीं सावधता । येत्न ठाकेना पुरता । सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंचो ।। ३) सावधान सावधान । वाचे बोला नारायण ।। ४) ऐक शिष्या सावधान । आतां भविष्य मी सांगेन । जया पुरुषास जें ध्यान । तयास तेंचि प्राप्त ।। ५) म्लेंछ दुर्जन उदंड । बहुतां दिसांचे माजले बंड । याकारणें अखंड । सावधान असावें ।। ६) अखंड सावधान असावें । दुश्चीत कदापि नसावें ।। तजवीजा करीत बसावें । येकांतस्थळीं ।। ७) देशकाळवर्तमान । सर्वही अवेवधान । कोणते विधीविधान । सावधान सावधान ।। ८) अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्न मान रे । प्रसंग हा तुफान रे । नकोचि वेवधान रे ।। अशी अनेकानेक वचने या विधानाच्या पुष्टचर्थ समोर ठेवता येतात.

"जनस्थान गोदातटीं । परमपावन पंचवटी ।। जेथें पडिली कृपादृष्टी । रघुत्तमारायाची । तेथील रामउपासक । त्यांच्या सेवकांचा सेवक ।" होऊन द्वादश वर्षांचे तप आचरणारे 'रामदास' तेंव्हाच काय आजही कुतूहलाचा विषय व्हावेत. ज्या गोदावरी--नंदिनीच्या संगमावर त्यांनी कंबरभर पाण्यात उभे राहून पुरश्चरण केले त्या नद्यांना कधीं पूर येत नव्हते? त्यांच्या गाळाला काटेकुटे वर्ज्य होते? जीव-जिवाणूंचे दंश नारायणाच्या कोंवळचा शरीरास झालेच नसतील? स्वधर्मी आणि विधर्मी लोकांनी त्यांची टिंगल, टवाळी, कुचेष्टा, तिरस्कार, द्वेष, छळ कांहीच केले नसेल ? चिरंजीवपद पावावयास निघालेल्या या मोक्षसाधकाच्या वाटेत आपल्या भावडचा श्रद्धांचे मोहजाल पसरलेच नसेल? 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलं' असा घनतमांध:कार कधीं मिळायला उठलाच नसेल ? हें सारे झाले आणि हे सारे सोसतां सोसतांच दासाचे स्वामी अन् महाराजांचे समर्थ असें रूपांतर जगाने पाहिले. एका बाजूला प्रेतोद्धारासिद्धी आणि दुसऱ्या बाजूला पालथी मांडी घालून वाटोळचा--सरळ--मोकळचा अक्षरात श्रीवाल्मिकी रामायणाची प्रत सिद्ध करण्याचा उद्योग असा हा बालभक्त ज्यांनी पाहिला ते आगर टाकळी गांवाचे लोक खरोखरच धन्य! समोरचा मनुष्य निश्चयाचा महामेरू आहे कीं उताणा पडून नाना कल्पना करणारा करंटा आहे याची परीक्षा समर्थ एव्हांच करावयास शिकले. वेद वेदांत, गीताभागवत यांचे श्रवण कांही जांवेत झाले असेल पण नासिकसारख्या पुरातन तीर्थक्षेत्रात शिकून घेण्यासारखे खूप होते आणि 'घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहून जाड ।' हा रामदासांचा हव्यास होता. अपार पाठांतरानें पुनीत होणारा प्रात:काळ श्रीरामचिंतनाच्या प्रभातकाळात एकरूप झाला. कोणालाच ठाऊक

होणार नाही इतक्या दूर वहिर्दिशेस जावे आणि येताना मोकळ्या हातानें येऊं नये, कांही ना कांही घेऊनच यावे, अशी सामाजिक व आर्थिक जाणीव याच समर्थीं विकसित झाली. ' कांही मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी । शरीर कारणीं लावी । कांही तरी ।। ' हा तिचाच व्यापक आविष्कार. या बारा वर्षांचे काळात निदान श्रीसमर्थ एका स्थानावर स्थिर राहिले, पण पुढची चाळीस पन्नास वर्षे? ' ......... याकारणें विश्रांतीतें । घेतां नये ।। ओळखी कराव्या दाटा । एके ठायीं स्थिरो नये ।। नित्यनूतन हिंडावे । घुंडावे भक्त प्रेमळ ।। ' असाच कष्टाचा मार्ग त्यांनी अवलंबिला. ' बहु हिंडतां सौख्य होणार नाही । सिणावें परी नातुडे हीत कांही ।। ' हें कळत असतां, ' देहेदुःख तें सूख मानीत जावे. ' अशा निश्चयानें, 'ब्राह्मणू हिंडता बरा ' या धारणेनें. ' निर्वाहिंवीण धरूं नये । ग्रंथ हाती ' ही बुद्धी असलेले, ' अल्पास न घडे सत्योत्तर । वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ।' असा आग्रह धरणारे रामदास पुराण सांगण्यास बसल्याची, शंकांचे निश्चयात्मक अन् समूळ निर्शन त्यांनी केल्याची नोंद याच काळातली आहे. शककर्ता होणार आहे त्यास साह्यभूत झाले पाहिजे, यथार्थ धर्मस्थापनेतूनच जगदोद्धार होऊ शकतो आणि तो आपणच करावयास हवा या स्फूर्तीचे तरंग अंतरात खळबळ माजवू लागले ते याच कालखंडात. ज्याला कुमारवय (teenage)पौगंडावस्था म्हणतात, कुडी वासना ज्या टिपणात वाढीस लागते त्या आयुष्याच्या क्रांतिकारक काळात समर्थ ' जितो येनेन्द्रियग्रामः स शूरः कथ्यते बुधैः। ' या जाणिवेनें शांततपस्वाध्यायनिरत राहिले. ' यान्ति न्यायप्रवृत्तस्य तिर्यञ्चोऽपि सहायताम् । अपन्थानं तु गच्छन्तं सोदरोऽपि विमुच्यति ।।' हें रामायणकथेचें तात्पर्य गिरवत त्यांनी आपल्या जीवनाची वाटचाल कोणत्या दिशेनें व्हावी याचा निश्चय केला होता. श्रीसमर्थांच्या या तपश्चर्येच्या कालखंडात योगसाधनेत त्यांनी कसकशी प्रगती केली, महावाक्याचा अर्थ घेण्यासाठी कोणाकोणाजवळ श्रवण केलें, सगुणाचा आधार त्यांना कोठेकोठें घ्यावासा वाटला, निर्गुणाच्या प्राप्तीसाठीं त्यांनी केलेल्या वज्रनिर्धाराची स्थितिगती याचाही हवा तेवढा तपशील मिळत नाही. आणि तेही योग्यच. समर्थांचे ऐकून–पाहून स्वतःच्या देहमनावर असह्य अत्याचार करून नष्टप्राय झालेल्या तथाकथित साधकांची संख्याच त्या प्रकटीकरणानें वाढली असती. ' हें उघड बोलतां नये । मोडो पाहतो उपाये ।' हें सार्वकालिक सत्य उमजण्यासाठीं ' गुप्त तें जाणावें सार । आणि प्रगट तें जाणावें असार ।।' असा उपदेश गुरुमुखानेंच लाभला पाहिजे.

' पंचविंशतिपर्यंतं ब्रह्मचर्यं समातिष्ठेत्' या शास्त्राज्ञेचें परिपालन झाले आणि ' बहता पानी रमता जोगी कभी न मैला होय' या धोरणानें नैष्ठिक ब्रह्मचर्याचें व्रत घेतलेला हा साधक तीर्थयात्रेस निघाला. श्रीसमर्थांची सोडमुंज

झाली होती. परेच्छेनें व्रतस्नातक झाले होते म्हणून काय झाले ? विद्यास्नातक तर व्हायचे होते. ' अध्यात्मविद्या विद्यानाम्' हें जाणून, आत्मविद्येचा उदंड जिव्हाळा असलेला हा अंतर्मुख महात्मा जगदांतरीच्या जगदीशाचा पृथगाकारें आलेला विभाग पाहून ' अहंतेचे काविरे' किंचितही बाधूं नये यासाठीं देशाटण करतो आहे. श्रीसमर्थ एक साधु आहेत हे येथपासून लक्षातच ठेवले पाहिजे. केवळ कौपीन धारण करणारे, जटाजूट-दाढीमिशा यांना तेलाचा संस्कार नाही, भस्मोद्धूलनही करत असतील, ललाटीं ऊर्ध्वत्रिपुंड्र धारण केला आहे, कडू भोपळयाचा तुंबा आणि योगाभ्यासात सहाय्य करणारी-' वाकडी परी आवडी' वाढविणारी-कुबडी हातात, क्वचित् गुरुत्वसूचक ' काष्ठाच्या खडावा' पायात, असा केतकी वर्णाचा पोपटी नाकाचा हा अवतारी पुरुष ' बहूतांपरी आदरे वेषधारी' असला तरी ' एक वेष धरूं नये । एक साज करूं नये ।। पुसतांही देऊं नये । ओळखी आपुली ।।, वाट पुसल्याविण जाऊ नये ।' इत्यादि शहाणपणाचे पाठ, निस्पृहाची रीत यथास्थित शिकला असेल तर तो याच काळात. तीर्थयात्रेतील रौद्रबीभत्स दर्शनांनी रामदास लौकिक कार्याकडे वळले हें खरें आहे, पण शांत-निवांत निसर्गाच्या सतेज आविष्कारांनी त्यांचे अंतःकरण भव्योदात्त झाले, जीवनगंगेची नाना रूपे त्यांनी चित्तात साठविली व उगमापलीकडे मात्र कांहीच नसतें याचीही निश्चिती बुद्धीस करून दिली, ' तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलो' असें पुनःपुन्हा म्हणत त्यांनी अहंतेची राखरांगोळी केली, मन तर कधीचेच उन्मन झाले होते. आणि म्हणूनच ' शब्द कुंठीत राहे ' अशा मौन्यमुद्रेचा हा परमविरक्त कोठेंही न गुंतता आणि किंचितही न कुंथता आसेतुहिमाचल परिभ्रमणात आयुष्याची ऐन उमेदीची बारा वर्षे व्यतीत करतो. चार हजाराहून अधिक दिवसांची ही भ्रमंती कां नाही नोंदली गेली ? ' नाना लीळा नाना लाघवे । ते काय जाणिजे बापुड्या जीवें ।।' असें आमच्या तोंडून वदवून घेण्यासाठीं. समर्थदर्शन-स्पर्शनाचें पुण्य किती भारतवासियांनी जोडले, समर्थांच्या भाषणांनी किती हिंदुधर्मियांचे संदेह मोडले हा संशोधनाचा विषय व्हावा. ' यः सेवते मामगुणं गुणात्परम् हृदा कदा वा यदि वा गुणात्मकम् । सोऽहं स्वपदाञ्चितरेणुभिः स्पृशन् पुनाति लोकत्रितयं यथा रविः।।' असा राममुखींचा श्लोक अध्यात्मरामायणीच्या रामगीतेशेवटीं आहे. त्रैलोक्याला पावन करणारी पावले या धरित्रीवर संचरली अनेकानेक रूपांनी. त्यात श्रीरामदासांची चरणे उठवून गेली सिंदूरचर्चित भीमरूपी महारुद्राचें रूप-कुग्रामांच्या व नगरांच्या-पांढरीमध्यें. समर्थांच्या निवासगुंफेजवळची सोन्याची भुवई असलेली मूर्ती हा समर्थहातींचा पहिला मारुती असावा. या मूर्तिकारानें सिद्ध केलेला अखेरचा मारुती कोणता याची मात्र कागदोपत्रीं नोंद नाहीं. अखेरचा प्रतापगडावरील मारुती शेवटचा असें कोणीकोणी म्हणतात.

उद्धवांच्या व्यथित विलापातून स्वतःच्या समाधीवर निश्चित स्वरूपाचा मारुती असावा ही समर्थांची एक इच्छा आजही अपूर्ण राहिली आहे, हे मात्र प्रखरपणें लक्षात येते. अकरा ज्योतिर्लिंगे ( त्र्यंबक सोडून ) आणि सप्तपुऱ्यांचे क्षेत्रात समर्थांचे जे शिष्य स्थिरावले होते– ते मूळचे कोण, कुठले, हें तर कळत नाहीच पण त्यांना अनुग्रह कधीं दिले व त्यांची महंत म्हणून केंव्हा योजना केली हेंही कळावयास मार्ग नाही. त्यामुळें या तीर्थयात्रेच्या काळातच त्यांच्या योजना झाल्या असाव्यात असें अनुमान करावे लागते. तीर्थयात्रेतील प्रवासासाठी समर्थांनी सिद्धीचा उपयोग केला होता कां ? असा प्रश्न कोणीतरी करून जातो. तसा उपयोग केला असल्याचा उल्लेख कोठेंही नाहीं, पण कोणत्याही आधाराशिवाय ' समर्थांच्या मागोमाग हात जोडून धांवणाऱ्या सिद्धींनी समर्थासंबंधीचें आकर्षण अनेक जडमूढ जीवाचे ठायीं उत्पन्न केले ' हें निश्चितीनें प्रतिपादन करणेत संकोच कसचा ? ' लोकांस होतो चमत्कार । लोक मानितो साचार ॥ भिक्षा आणी चमत्कार । च्चात्काटती लाहान थोर ॥ तो तरी स्वतां नाही गेला । लोकीं प्रत्यक्ष देखिला ॥' ही वचने अशा रागरंगाची साक्षीदार आहेत. श्रीसमर्थांना दिसलेली देशस्थिती आणि जनसामान्यांची हीनदीन अवस्था यांचा उहापोह अनेकांनी केला आहे. तथापि, त्यानंतरही

' नाना देहीं एकविराजे । नाना नाटक लीळा सुंदर रुप साजे '
नाना तीर्थीक्षेत्रीं अभिनव गति माजे । अगाध महिमा पिंड
ब्रह्मांडी गाजे ॥ बहुरुपी बहुगूणी बहुतों काळांचा । हरिहर ब्रह्मादिक
देव सकळांचा । युगानुयुगी आत्माराम आमुचा । दास म्हणे
महिमा न बोलवे वाचा ॥' .... अशी शुद्ध धारणा निगमागम

शोधतांही ज्याच्या गुणांच्या सीमा कळत नाहीत अशा आत्मारामाविषयीं समर्थांनी राखली होती आणि ' जयदेव जयदेव ' म्हणून ते त्यासच आळवत होते. श्री गणपतीच्या आरतीतील ' संकष्टी पावावे निर्वाणी रक्षावे ' हा टाहो, श्रीविष्णूंच्या आरतीतील ' अरिदंडण भवखंडण मंडण वेदांचे । हरी दूरित परिपूरित निजहित सकळांचे ॥' विठ्ठलाच्या आरतीतील ' निरसी मम संगा निस्संगा भवभंगा । ' आणि ' कंटकभंजन रंजन साधू विश्रामा ' या शब्दरचना, श्रीपरशुरामाना त्यांचे सामर्थ्यासंबधी ' युगासारिखें काय नेणो विझाले ' अशी केलेली पृच्छा समर्थांची जनहितवांछिती तळमळ आणि ईश्वरावरील अविच्छिन्न निष्ठा दृक्प्रत्ययास आणतात. काल्पनिक विशालता आणि प्रत्यक्ष व्यापकता यांतला फरक सहेतुक –पाचच नव्हे असल्यास सहावेही ज्ञानेंद्रिय वापरुन केलेल्या– प्रवासामुळें उमगतो. त्यातही पूज्य भावनेची ओतप्रोतता संगतीस असल्यास 'जेथें तेथे धोंडापाणी । उगेच

वणवण हिंडोनी काय होते?' असें मामदे घालण्याची पाळी येत नाही. 'देश नासला नासला उठे तोचि कुटी ।' 'पदार्थ मात्र तितुका गेला नुस्ता देशचि राहिला ।।' 'या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाही ।।' या गोष्टी जाणवत असतांही तीर्था-तीर्थातील निर्मल ब्रह्मवृंदासोबत झालेल्या तत्वचितानुवादातून होणाऱ्या बोधचंद्राची ध्वजशिखा समर्थांनी हस्तगत केली आणि ते उतरले कृष्णातीरी. चंद्रगिरीच्या घळीचें वर्णनातून एक गोष्ट जाणवते कीं, उचावरुन पाहिल्यास खूप मोठा भूप्रदेश नजरेत राहतो हें सत्य समर्थांनी नीट लक्षात ठेवले होतें. डोळ्यांना नाही दिसलें तरी दृष्टीला दिसतें. तिचा उपयोग केल्यास साक्षात्कारही लाभतो. तो साक्षात्कार म्हणजे भूतचेष्टा नव्हे. 'बारा वर्षे झाली. आतां नारायणाचें श्राद्ध करायला पाहिजे !' हा विचार श्रेष्ठांच्या किंवा राणूबाईच्या चित्ताला स्पर्शलाही नव्हता. आहे ती रामपरब्रह्माची कृपा–सद्गुरुकृपा–कळिकाळाची नियंती–भावार्थबळाची संपत्ती–नामामृताची दौलत–संघशक्ती. ही ठोसरांची जाणीवकळा समर्थरूपें महाबळेश्वरास भेटावयास निघाली.

भंवती ब्रह्मारण्य वरती महाबळेश्वर, त्याखालीं तीच ती मराठ्यांची वाई, हरिहरओघ सुंदर ऐक्यासी आले ते माहुलीक्षेत्र, वादात अडकलेले मसूर आणि शेवटीं मिरजेच्या मीरासाहेबाचा दर्गा. 'पाणी पाणवाटें जैसे आपणचि धांवे।' तसा हा अधोगतीचा आलेख समर्थांनी पाहून घेतला. अगापूरच्या डोहातून श्रीरामरायाची मूर्ती त्यांनी बाहेर काढली आणि साफल्याच्या पीठावर तिची केली प्रतिष्ठा. चपावतीच्या या रामराजधानीत एकाही मत्त भ्रमराचें काज नव्हते होते 'ऊर्ध्वमूलमध:शाखमश्वत्थं छेदितुं क्षम:' असें कल्याण, 'नौमीचा उत्साह होऊ द्या बरवा। मग देह राघवा जावो राहो।।' प्रार्थिती भक्तिवेणी, 'भरल्या घरात रामनाम घेऊं नको' असें निर्भीडपणें बजावणारी गतानुगतिकेची घमेंडखोर पण कालांतरानें हृदयपरिवर्तन झालेली सतीबाई, समर्थांचा आत्मा ज्यांच्या मुखानें बोलत असे असे उद्धव, राजदरबारीं पाठविण्याच्या योग्यतेचे सभ्य व बुद्धिवंत दिवाकर, समर्थांच्या रामोपासनेचे चैतन्य नामदेवांच्या बाल–सुलभ हट्टाच्या विठ्ठलप्रेमापेक्षां कितीतरी पुढचे आहे हे सिद्ध करणारे व वेड घेऊन पेडगांवला चालल्याचा आभास उत्पन्न करणारे अज्ञान– भोळाराम. व समर्थशिष्यांचा हा मेळा गांवोगांवच्या जत्रांना एकवटून चाफळच्या यात्रेत आणत होता.

ही संघटनशक्ती थोड्याच दिवसांत भोसले कुलोत्पन्न शिवाजी राजे यानाही आकर्षिण्यापुरेशी सक्षम झालेली पाहून समर्थ भिडले माहूरगड–इंदूरबोधनपर्यंत. अकरा मारुतींच्या स्थापना झाल्या. अकराशे मठ कार्यास लागले. तिकडे एक औरंगजेब कुराण नकलतो आहे तर इकडे 'लेहोन देतां परोपकारें सीमा सांडावी'

हा समर्थसंदेश कानामनात येऊन घुसला. समुदायाचा हव्यास असलेल्या उदास ज्ञान्यांना अखंड सावकाश येकांत सेवण्याचा व तेथें तजवीजा कळतील, चाळणा निघतील याकडे लक्ष देण्याचा आदेश मिळाला. नेटक्या प्रपंचासाठीं जाणत्या स्त्री-पुरुष महंतांच्या बळकट तणावा निर्मून मोठ्या समुदायाच्या पाहणीची योजना झाली. राजांची, क्षत्रियांची, सेवकांचीं, ब्राह्मणांची, पारपत्याधिकाऱ्यांची, विरक्तांची, निस्पृहांची अगदी स्वयंपाकिणींची सुद्धां कर्तव्ये रोखठोकपणें सांगितली. सगुणाच्या भजनपूजनाचा आग्रह, अनर्घ्य वस्तू व सुवर्णादींचा संग्रह देहेंद्रियमन-बुद्धीचा अन् कुटिल कुटाळांचा निग्रह, अपरिग्रह वृत्तीच्या भिक्षेकरी रामदासांनी करावा यातील नवल महाराष्ट्र मंडळाच्या पचनीं सहजासहजीं पडले नसले तरी ही मंडळी पराकाष्ठेच्या निष्ठेची व सत्याचा साभिमान प्रामाणिकपणें धरणारी आहेत हें सर्वांनाच मानवले होते.

संघटनेचें जाळे पसरत नेण्यासाठीं भौगोलिक मर्यादा लक्षात घेऊन समर्थ मठ उभे करीत- मठापाठोपाठ मारुती मंदिर आलेच. हे मठ शत्रुमित्रांच्या महत्त्वाच्या ठाण्यांचे आसपास, डोळ्यात तर भरणार नाहीत अन् नजर तर ठेवू शकतील अशा स्वरुपाचे असत. वेळ पडल्यास मूर्ती सुरक्षित राखून मंदिराचें रूपांतर तात्पुरत्या मशिदीत करतां यावे अशा दक्षतेनें बांधकाम केल्याचें कांही ठिकाणीं जाणवतें. तोलामोलाची माणंसे मोक्याच्या ठिकाणीं ठेवण्याची दक्षता अनेक ठिकाणी आढळेल. तथापि, अशा अनेक लहानसहान गोष्टी व्यवस्थितपणें करण्यातून येणारा मोठेपणा पचवण्यापुरता परमार्थ समर्थांच्या ठायीं मुख्यत्वें विलसत होता हें जाणून घेतलेच पाहिजे. १) 'करी वृत्ति जो संत तो संत जाणा २) जो जाणेल भगवंत। तया नांव बोलिजे संत। जो शाश्वत आणि अशाश्वत। निवाडा करी ।। ३) निर्विकल्पीं कल्पनातीत। तो चि वोळखावा संत।।' अशा एकापेक्षां एक सरस व्याख्या समर्थवाङ्मयात आढळतात. समर्थ बाह्यतः साधु होते. १) जो जनामध्यें वागे। जनावेगळी गोष्टी सांगे। ज्याचें अंतरीं जागे। तोचि साधु।। २) बाह्य भलतैसे असावे। परी अंतर स्वरुपीं लागावे।। लक्षणे दिसती स्वभावें। साधुआंगी।। इत्यादि साधुजीवनाची लक्षणे त्यांनी निर्देशिली आहेत. 'ठाईं ठाईं भजन लावी। आपण तेथून चुकावी।। मत्सरमतांची गोवी। लागोंच नेदी।।' 'त्यागी वोळखींचे जन। सर्वकाळ नित्य नूतन।।' अशी पथ्ये पाळून कार्य केले तरी लोकांचे तर्क कुतर्क चालूच राहतात आणि त्यातून कांहीच निष्पन्न होत नाहीं हें एकदां ठरले म्हणजे तो साधू मान्य होतो, असा समर्थांचा अनुभव. पण साधुसंतांनी- पंडितामहंतांनी-साधक सिद्धांनी संतकुळीचा राजा म्हणून ज्यांच्या चरणावर मस्तके टेकवावीत असा हा श्रेष्ठ सद्गुरु 'समर्थ' म्हणून कसा लोकमान्य-राजमान्य झाला त्याचें उत्तर त्यांच्याच शब्दात मिळवावेसें वाटलें तर अनेक अवतरणे समोर येतात.

१) समर्थ आणि करंटा होतो । व्यापासारिखा ।।
२) व्यापआटोप करिती । धके चपटे सोसिती ।। तेचि प्राणी सदेव होती । देखत देखतां ।।
३) रात्रदिस पहावा अर्थ । अर्थ पाहे तो समर्थ ।।
४) बहुत जनांस चालवी । नाना मंडळे हालवी ।। ऐसो हे समर्थ पदवी । विवेकें होते ।।
५) प्रपंची तें भाग्य परमार्थी वैराग्य । दोहीकडे सांग तरी तो समर्थ ।।
६) कुबेरापासून अर्थ । वेदांपासून परमार्थ । लक्ष्मीपासून समर्थ । भाग्यासि आले ।।
७) जे मूर्ख अवलक्षण । जे कां हीणाहूनि हीण ।। तेचि होती दक्ष प्रविण । सर्व विषई ।। ऐसा जो परम समर्थ । पूर्ण करी मनोरथ ।।

पण या अवतरणानी समर्थकर्तृत्वाचें रहस्य अवगत होणार आहे कां ?

आयुष्याचे दोन सरळसरळ विभाग. छत्तीस वर्षांचा पूर्वार्ध, किंचित् मोठा उत्तरार्ध. प्रत्येकाचें पुनश्च तीन विभाग. पूर्वार्धात जांबेतील पहिली तपश्चर्येची टाकळीतील, तीर्थयात्रेची अशी प्रत्येकी बारा वर्षे उत्तरार्धात चाफळ राममंदिराची उभारणी व त्यास स्थैर्य लाभेपर्यंतची आठदहा वर्षे. (अकरा मारुतीच्या स्थापना शके १५६६ ते १५७६ पर्यंत झाल्या.) कार्याच्या विस्ताराच्या वीस वर्षांचा कालखंड' सज्जनगडावरील वास्तव्याची शेवटची कांही वर्षे. त्रिगुणांच्या शुद्ध-शबल भेदानुरुप झालेली ही विभागणी अंतर्बाह्य संतुलन सिद्ध करते.

समर्थांच्या मित्रमंडळीत ब्रह्मनाळच्या रघुनाथस्वामींचे शिष्य आनंदमूर्ती, वडगांवच्या कृष्णाप्पांचे शिष्य जयरामस्वामी, निगडीकर राजयोगी रंगनाथस्वामी, भागानगरचे केशवस्वामी, पाटगांवचे मौनीबावा, चिंचवडकर देव, देहूचे तुकारामबुवा इत्यादी नामवंत. समर्थांनी नमवलेल्या पंडितात वासुदेवशास्त्री येवलेकर, वामन पंडित आणि गागाभट्टांचे तिर्थरुप असे दिग्गज. समर्थांच्या शिष्यमंडळात विरक्त आणि प्रापंचिकांचा– विशेषत: कुलकर्णी-देशपांडे अशा देशाधिकारी वतनदारांच्या तरुण मुलांचा भरणा. कऱ्हाडचे निरंजन देव, देवराष्ट्रे येथील यादवेंद्र अशा अन्य प्रवृत्तीच्या उपासकांनाही प्रोत्साहन देण्याची पद्धती. छत्रपती शिवरायांपासून रामचंद्रपंत अमात्यांपर्यंत अनेक राजनीतिज्ञ वीर पुरुषांना समयोचित मार्गदर्शन व साह्य करण्याची सिद्धता. अक्षरश: 'वन्ही तो चेंतवावा रे । ' या एकाच हेतूनें सतत संचरणारी जितीजागती धर्मशिखा, अखंड श्रवणमननाची ज्ञानज्योत म्हणजे समर्थ!

कृतार्थतेसाठीं ब्रह्मज्ञान, सार्थकासाठीं आत्मज्ञान, हितासाठी धर्माचरण; सुखासाठी देवभक्ती, कर्तव्य म्हणून देशकालवर्तमानासंबंधीं सावधता अशा

पक्क्या धारणेनें 'आधी तें करावें कर्म । कर्ममार्गे उपासना । उपासकां सांपडे ज्ञान । ज्ञानें मोक्षचि पावणें।।' हें धोरण त्यांनी अवलंविले होते. ज्ञान व मोक्ष यांचेमध्यें वैराग्य व सामर्थ्य अशाही दोन महत्वाच्या खुणा त्यांनी दाखविल्या आहेत. ही गोष्ट 'जयासी वैराग्य बाणले । तयासीच पूर्ण ज्ञान झाले ।। नाना सामर्थ्ये वाढवावी । वैराग्यबळें ।। बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें । परी अंतरीं नाम विश्वास तेथें ।। चढे ज्ञानवैराग्य सामर्थ्य आंगी ।।' इत्यादि अवतरणे लक्षात आणून देतात.

निःसंदेह साधुत्वाचे असंख्य मानदंड समाजात उभे करणारे समर्थ भ्रष्टाचाराचें संदर्भात 'चोरटी होरटी तुंदे । नासके लांच इच्छिती ।। लौंडीचे दुरि घालावे । मारावे राजकारणें ।। अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संहार ।। वैरियाकडे मिळोन जाती । ते नीच काठीचे।।' इत्यादि तीव्र वचने उच्चारतात, याचें नवल वाटावयास नको. जनस्वभावगोसावी मधून प्रत्यक्षपणें आणि दासवोधातील गुरुलक्षण, उपदेशनाम, सुन्यत्वनिर्शन, कर्तानिरूपण या समासातून अप्रत्यक्षपणें 'नव्हे चेटकी चाळकू द्रव्यभोंदू । नव्हे निंदकू मछरू भक्तिमंदू ।। नव्हें उन्मतू वेसनी संगबाधू । जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू ।।' हा मनोबोधच समर्थ समाजावर ठसवितात. या भ्रष्टाचाराचें पितृकुळ दुश्चितपणा, आळस व भ्रम यांचे असल्यानें त्या दोषांवर समर्थांनी पुनःपुन्हा हल्ले चढविले आहेत. मूर्खता, संदेहवृत्ती, निद्रा इत्यादि मातृकुलाचीही निर्भर्त्सना व विटंबना समर्थांच्या शब्दांनी केलीच आहे. आळशी असला तर निदान खादाड असूं नये, हीन देह असतां ताठा– बाष्कळांनी विवेक सांगणें– उपयोगाचें नाहीं, भेकडांनी उन्मत्तपणानें वागण्याचें– भ्याडांनीं पराक्रमाच्या गोष्टी बोलण्याचे कारण नाहीं असे निष्कर्ष त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणानें काढले. उलटपक्षीं 'परम सुंदर आणी चतुर । परम सबळ आणी धीर ।। परम संपन्न आणी उदार । आतिशयेंसी ।। परम ज्ञाता आणी भक्त । माहा पंडित आणि विरक्त । माहा तपस्वी आणि शांत । आतिशयेंसी ।। वक्ता आणी नैराशता । सर्वज्ञ आणी सादरता । श्रेष्ठ आणी नम्रता । सर्वत्रांसी ।। राजा आणी धार्मिक । शूर आणी विवेक । तारुण्य आणि नेमक । आतिशयेंसी' असें गुणमेलन भाग्यवंतांच्या जन्म पत्रिकेतच त्यांनाआढळतें, तशांची ते समुद्राऐसी साठवण करतात. 'जगीं धन्य तो मारुती ब्रह्मच्यारी' असल्याचें पाहून, 'जगीं होइजे धन्य या रामनामें' हा सन्मार्ग त्यांनी पत्करला आणि 'जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा' असें जगामुखीं वदविले. राम=सर्वोत्तम=देव हें त्यांचे समीकरण. 'नुपेक्षी कदा रामदासाभिमानी... देव भक्ताभिमानी' अशा विश्वासाने अजामेळ, कुंटिणी ध्रुव, प्रल्हाद, अंबरीश आणि स्वतः श्रीसदाशिवशंकरांपर्यंत अनेकांची उदाहरणे

आठवीत ' प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।' ' अती आदरें गद्य घोषें ।' या अंतरीं ' नाम अखंड स्मरावे ।' पण त्याबरोबरच ' रूप मनीं आठवावे।।' रूप ? हो, ' सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । सस्वरूप म्हणिजे आपले रूप । आपले रूप म्हणिजे अरूप । तत्वनिर्शनाउपरी ।।' ' नसे पीत ना श्वेत ना शाम कांही । नसे वेक्त ना नीळ नाहीं' असे. म्हणजे कसे ? ' नभासारिखें रूप या राघवाचें । मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचे।।' म्हणूनच आज्ञा म्हणा वा सूचना म्हणा, पण ती समर्थांची आहे– ' लपावे अती आदरें रामरूपीं । भयातीत निश्चित ये सस्वरूपीं ।। कदा तो जनीं पाहतांही दिसेना । सदा ऐक्य तो भिन्न भावें वसेना ।।'

तात्त्विक संघर्ष शांत करण्याचें सामर्थ्य सच्च्या साधूतच असते हें समर्थांनी कर्ममार्ग, योगमार्ग, भक्तिमार्ग, ज्ञानमार्ग इत्यादींचा समन्वय साधून सिद्ध केले आहे. मुख्यत्वें हरिकथानिरूपण व गौणत्वें राजकारण करणाऱ्यांनाही सर्वविषई सावधता धरतां येते– जर ते साक्षपी व क्षमाशील असतील तर– हें समर्थांकडे व त्यांच्या सच्छिष्यांकडे पाहूनच पटावे.

अनेक चांगल्या गोष्टी आपल्याला कळतात, पण कळतें तें वळत नाहीं, पटतें तें वठत नाहीं. अचूक यत्न करवत नाहीं म्हणून करूनही साधत नाहीं. आपण कपाळकरंटे ठरतो. यासाठीं, ' क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।। करी थोडे बोले फार । तो येक मूर्ख ।। क्रियेवीण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन ।' अशा स्पष्टोक्तींसह ' अद्वैत निरूपणीं अगाध वक्ता । परी विषई लोलंगता ।।' आणि त्या लोलंगतेपाई शिष्यांची भीड बाळगणारा ' अधमाहून अधम । चोरटा, मैंद' असा गुरू न करतां ' मुखें बोलिल्यासारिखें चालताहे ।।' अशा सद्‌गुरूस शरण जावे, त्याच्या वचनाचें स्मरण राखावें–प्रतिपाळण करावे मगच ' समजले आणि वर्तले ' असे भाग्यपुरुष प्रगटतात आणि ' मीपणेंविण साधन ।' करून समाधानी होतात असा परंपरेचा परमार्थ आहे.

एकवीस समासीच्या पंधराव्या समासात ' श्रीरामजयराम जयजयराम ' या त्रयोदशाक्षरी श्रीराम–तारक मंत्राचा उघडा उपदेश, ग्रंथराज श्रीदासबोधाच्या पाचव्या दशकाच्या सहाव्या समासात शुद्ध ब्रह्माचें निरुपण, सकटनिरतन भीमरुपी स्तोत्रात ' रामरुपी अंतरात्मा । दर्शनें दोष नासती ।' हाच सिद्धांत असें समर्थवाङमयाचें ऐश्वर्य आहे. अभंग ओव्यांची स्फुट प्रकरणे, पंचकें–अष्टकें–दशकें –शतकें अशा मांडणींचा सुश्लोक असा, वाल्मिकी रामायणाच्या श्लोकसंख्येपेक्षां किंचित् अधिक पद्यरचनेचा प्रपंच समर्थांनी केला. ' जेणें बहुतांस घडे भक्ती ।' अशी ' रोकडी प्रबोधशक्तीं ' लोकांचे मनोगत हातीं घेऊन त्यांना प्रगटविली. संतकवींच्या शेवटीं व पंतकवींच्या प्रारंभी कवीश्वर समर्थ रामदास उभे आहेत. या सत्यस्थितीची दखल मराठी साहित्याच्या समीक्षकांनी घ्यावयास हवी. नैमित्तिक

स्वरुपाची त्यांची पद्यरचना नित्य अभ्यसनीय ठरावी एवढी मौलिक आहे. मोजकेच पण मार्मिक दृष्टांत देत नाना बंधप्रबंधातून साकारलेली कविता सहेतुकपणें नाना युक्त्या योजीत श्रोत्यांच्या अंतःकरणास 'विमलब्रह्म' श्रीरामरूपाचा साक्षात्कार करून देते. समर्थ कवीही आहेत आणि मुनीही आहेत. आलेले अनुभव ते बोलतात अन् 'शब्दांनी सांगता येतो तो अनुभव नव्हे' या विवेकानें अधिक पुढचा, आणखी वरचा, उत्कटतर, दिव्यतम अनुभव घेण्याचा आग्रह धरतात. त्यांची लीनता त्यांच्या उपलब्ध एकमेवाद्वितीय पत्रातून दृग्गोचर होते. त्यांची आर्तता व श्रद्धा 'सुखकर्ता दुखहर्ता' 'लवथवती विक्राळा' 'सत्राणे उड्डाणे' इत्यादि आरत्यातून उज्ज्वल राहते. नम्र होतो मनुष्य त्यांच्या प्रतिभेचा महाप्रसाद पावून.

भौतिक शास्त्रांच्या क्षेत्रातील संशोधकांना आजच्या मानवांमधें मोठा मान आहे. त्यांचा शाब्दिक गौरव करून प्रसंगी त्यांची संशोधने नरनारींनाशक नागव्या तरवारीसारखी वापरण्याचा संकोच स्वार्थी सत्ताधाऱ्यांना किंचितही नाही. संशोधकांचा हा दिखाऊ सन्मान ज्या काळांत पाश्चात्य देशांचेही दृष्टीआड होता, त्या काळात जन्मलेले समर्थ संशोधक म्हणून प्रसिद्ध नाहीत. ते बहुविध भौतिक ज्ञानाचे संकलक मात्र निश्चितच आहेत. त्यांच्या या संकलनातून संशोधनाच्या सुमनवाटिका आणि इष्ट वित्ताची कार्यस्थाने उभी करण्यात समर्थांचे सांप्रदायिक कमी पडले हा दोष समर्थांचा नव्हे.

स्त्री-दाक्षिण्य नव्हे तर स्त्री-शक्तीचा राष्ट्रधर्मकार्यासाठीं, समाजप्रबोधनासाठी उपयोग हें समर्थांचे वैशिष्ट्य तर पापी औरंग्याच्या दक्षिणेवरील–महाराष्ट्रावरील स्वारीचें पायातच झाकले गेले. तरीही शिवरायांच्या धाकट्या स्नुषा ताराबाई समर्थांच्या कार्यक्षेत्रात लहानाच्या मोठ्या झाल्या आहेत, त्यांचा छत्रपती शाहूंशी संधीही समर्थस्नानाच्या तीर्थभूमीत उब्रजेतच झाला, जशा समर्थांच्या शिष्यिणी संस्मरणीय तशा राजघराण्यातील जिजामातोश्री–येसूबाई–ताराबाई–गोपिकाबाई–लक्ष्मीबाई इत्यादी स्त्रियाही वंद्य आहेत. अशांची खाण उघडी करणारा महाराष्ट्र स्वधर्माचरणाने वंद्य ठरावा.

'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा ॥' असें सांगणारे समर्थ संकुचित वृत्तींचे नाहीत. 'मराठा तितुका मेळवावा' याचा अर्थ मानवमात्र मेळवावा असाच आहे. 'ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या। भक्तमंडळ्या मानाव्या। संतमंडळ्या शोधाव्या।' असेही ते सांगतात. म्हणून काय झाले? 'अवघेचि सुखी असावे।' अशी चेतलेल्या अंतरात्म्याचीं वडिलकीची भावना पत्करुन 'सकळ जन सुखावे। तो कसा काळ पावे ॥' अशी प्रतिक्षा करणारा हा महापुरुष 'सकळ लोक एक करावे। एक विचारें भरावे ॥ कष्टे करुन घसरावे। म्लेंच्छावरी ॥' असें

म्हणाला तरी तें नाइलाजापायीं. तत्वतः ' हिंदु मुसलमाना दोऊ नही ' हे त्यांनी पूर्णपणें ओळखलेले आहे. ' अभेदामाजी वाढवी भेदा ।' त्या ह्या अहंतेच्या गुणांनी सारेच दुःख होतें, विवेकी मनुष्यही तिच्या संगतीनें नीतिभ्रष्ट होतो, फुकटच्या यातना पदरी घेतो, विकारी होऊन नाना वाद उत्पन्न करुन ठेवतो, ब्रह्मराक्षसा-सारख्या दुष्ट योनींत पोंचतो, कल्पना केली तरी प्रत्यक्ष ब्रह्म त्याला कळतच नाही. आणि म्हणून अहंतेचा—मीपणाचा त्याग करावा असा त्यांचा आग्रह आहे. देहाभिमान, कर्माभिमान, जात्याभिमान, कुळाभिमान, द्रव्याभिमान, ज्ञानाभिमान, मोक्षाभिमान असे नाना अभिमान सोडून संतचरणीं अनन्य व्हावे– अनन्य म्हणिजे नाही अन्य ' ही त्यांची शिकवण.

अहंताममतेचा प्रश्न समोर येणें म्हणजेच अंतर्मुखता उपजणें—अध्यात्मज्ञाना-कडे वृत्ती वळणें. आध्यात्मिकता हा तर समर्थजीवनाचा गाभाच आहे. या अध्यात्माच्या बैठकीवरच त्यांचे सारे कर्तृत्व विराजमान झालें आहे. समर्थांचे पारमार्थिक भावजीवनाकडे पाठ फिरविल्यावर त्यांचे लौकिक जीवनाचा अन्वयार्थ लागणें अशक्य आहे 'सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ॥ सारासार-विचारें। संतसंगें ॥ आमुचे कुळीं रघुनाथ। रघुनाथें आमुचा परमार्थ ॥ जो समर्थाचाही समर्थ । देवां सोडविता ।। त्याचे आम्ही सेवकजन । सेवेकरितां जालें ज्ञान । तेथें अभाव धरितां पतन। पाविजेल कीं ।। आमुचे कुळीं हनुमंत। हनुमंत आमुचें मुख्य दैवत। तयावीण आमुचा परमार्थ। सिद्धीतें न पवे सर्वथा ।। साह्य आम्हांसी हनुमंत। आराध्यदैवत श्रीरघुनाथ। श्रीगुरु श्रीराम समर्थ। काय उणें दासासी ।। दाता येक रघुनंदन। वरकडलंडी देईल कोण। तया सोडोनि आम्ही जन। कोणाप्रती मागावे ।। म्हणोनि आम्ही रामदास। श्रीरामचरणीं आमुचा विश्वास । कोसळोनि पडो रे आकाश । आणिकांची वास न पाहू ।।' अशी त्यांची प्रतिज्ञा आहे.

अभंगा—आरत्या—सवायांतून व अन्यत्र समर्थांनी इतर देवतांचे माहात्म्य-स्वरुप—ऐश्वर्य वर्णिले आहे. रामस्वरूप समजून प्रार्थनाही केल्या आहेत. मौज याची वाटते—' म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुतां दिसांचे माजले बंड ।।', ' लेंकुरे उदंड झाली ।' याबरोबरच ' देव जाले उदंड। देवांचे माजले बंड ।।' असेही ते सांगून जातात. ' येक सांगती रामराम ,' ' येक म्हणती श्रीराम कर्ता।' ' पंचवटिकेसी मृगाची पाठी घेतली रामें।' असें म्हणतांना त्यांना संकोच वाटत नाहीं. रामांचे श्रेष्ठत्व एक भक्त या नात्यानें ते जरूर प्रतिपादितात, पण, ' ब्रह्मव्यापक हें तों खरें। दृश्य आहे तो हे उत्तरे ।। व्यापेविण कोण्या प्रकारें। व्यापक म्हणावे ।। ब्रह्मासी शब्दचि लागेना। कल्पना कल्पूं शकेना ।।' हाच त्यांचा अंतिम निष्कर्ष अथवा सिद्धांत आहे.

पाहण्यासारखी गोष्ट आहे, गणेशाच्या सगुण स्वरूपापाठोपाठ शारदेच्या निर्गुण आणि गुणातीत स्वरूपाचे स्तवन श्रीदासबोधाच्या पहिल्या दशकात श्रीसमर्थांनी करावे. विशद भक्तिमार्ग सांगणाऱ्या श्रीदासबोधाचे प्रारंभी मूर्ख–पढतमूर्ख–परममुर्खामाजी मूर्ख आणि सद्विद्यासंपन्नाची लक्षणे व त्यांचे गुणावगुण त्यांनीं आठवावे. मोहग्रस्त वा आत्मवंचनेत रमणाऱ्या मरणोन्मुख संसारी जीवांच्या व त्यांना होणाऱ्या त्रिविध तापांचा समर्थांना विसर पडू नये. भक्तच नव्हे विरक्ताकडूनही समर्थांना केवढ्या मोठ्या कार्यांची अपेक्षा आहे ते सांगूनच मग त्यांनी नवविधा भक्ती, चतुर्विधा मुक्ती, गुरुशिष्य उपदेश, मनुष्यांच्या चार श्रेणी, सगुणनिर्गुण मायाब्रह्म, जडचंचळनिश्चळ, पंचीकरण, पंचप्रळयादि गोष्टींचा उहापोह करावा. ईश्वरही दाखवतो आणि इशारेही ऐकवतो असा हा मार्गदर्शक महाराष्ट्राला " पूर्वजांच्या पुण्यकोटी " संग्रही–गांठीला असल्याने भेटला.

' या परमार्थाकिरितां । ब्रह्मादिकांसी विश्रामता ।।' हे पाहून ' शिष्या येकांती बैसावे स्वरूपी विश्रांतीस जावे । तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ।' 'येकांती उगेच बैसावे । तेथें हें समजोन पाहावे । अखड घ्यावे सांडावे । प्रभंजनासी ।। येकांती मौन्य धरून बैसे । सावध पाहातां कैसे भासे । सोहंसोहं ऐसे । शव्द होती ।। ते शव्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला । योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ।।' असाही साधनमार्ग त्यानी शिकविला. ' जयास येकांत मानला । अवघ्या आधी कळे त्याला ।। त्या वेगळा वडिलपणाला । ठावचि नाही ।।' यास्तव ' अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।।' असें आग्रहाने सुचवीत असतां ' काळ सार्थक करावा । जनासहित ।।' असें ते लगेचच सांगतात. ' मिळता प्रत्ययाचे संत । येकांतापरीस येकांत । केली पाहिजे सावचीत । नाना चर्चा ।।' असेंही उपदेशितात. ' एकपणाचाही अंत ' हाच त्यांना समाधान देणारा एकांताचा अर्थ असला तरी ते एकलकोंडे नाहीत, येकदेसी होणें त्यांना पसंत नाही. ' समस्तीं बरें म्हणावे ।' अशी वासना प्रत्येकाचें ठायी आहे, ' लोकांवेगळे राहणें कोणासच परवडत नाहीं, या जाणिवेनें १) वेड्यास वेडे म्हणों नये । वर्म कदापि बोलो नये ।। २) न बोलावे दोषगुण । पुढिलांचे कदा । ३) रघूनायकावीण बोलो नको हो– अशी त्यांची निस्पृहांना, हरिदासांना, सामान्याना आणि असामान्याना शिकवण होती. ' जगामध्ये जगमित्र । जिव्हेपासी आहे सूत्र ।।' हेही ते आवर्जून लक्षात आणून देतात. कारण, सावधता आणि भित्रेपणा या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ' काळ देखोनि वर्तावे । सांडावे भय पोटीचे ।।' पानावरची आळी आधार आहे हे पाहिल्यानंतरच पुढे सरकते. तेव्हां नरशरीरात आल्यानंतर गोंधळून जाणे-फसणे–भरकटणे अनुचित होय. ब्रह्मातला हकार द्विवर्णांनी मागे सारला की भ्रम सिद्ध होतो. 'राज्य नेलें म्लेंछी क्षेत्री । गुरुत्व नेलें कुपात्री।' हा त्याचाच परिपाक !

अंतर्बाह्य शत्रूचा रोध करून इहपरलोकीचे संपादावे हा पुरुषार्थतच त्यातून सुटका करू शकेल.

'वोळखीनें वोळखी साधावी । वुद्धीनें वुद्धी धावी ।। नीतिन्यायें वाट रोधावी । पापांडाची ।' वर्तायाचा विवेक । राजो राखणें सकळ लोक । हळुहळु पुण्यश्लोक । करीत जावे ।।' यासाठींच 'मुलाचे चालीनें चालावे । मुलाच्या मनोगतें बोलावें । तैसे जनास सिकवावे । हळुहळु ।'. पुण्यशील नांवालाच उरलेले आणि पुण्यश्लोक नसल्यात जमा या पार्श्वभूमीवर जगदोद्धाराचा हा कायाकल्प यशस्वी करणारे सुखदाते वैद्य 'कोण्या दोषें कोण रोग । कोण्या रोगास कोण प्रयोग । कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ॥' याची विचिकित्सा करीत असतील यात नवल नाहीं. नवल आहे, असा धन्वंतरी समोर आला, त्यानें 'जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यात मिसळावा ।' असा विमुक्त व्यवहार मांडला, आणि आम्ही मात्र भीड धरून आपल्या पदरीं नाश घेतला याची.

कृतीचा परिणाम म्हणून लाभणारी कीर्ती समर्थांना मान्य आहे. स्तुतिनिंदेचे महत्व त्यांच्या लेखीं नाहीं. प्रत्यय पहावा, अर्थ घ्यावा हा त्यांचा आग्रह.

त्यांच्या अनुग्रहातही असाच आग्रह आहे. 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याचा 'स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म' असा अर्थ करून ते स्वत: अवधान देणाऱ्या अन् ऐक्य पावूं पाहणाऱ्या शिष्याला उपदेश देतात आणि पाठोपाठ 'येविषईं संदेह भ्रम । धरूंचि नको ।।' अशी आग्रहाची आज्ञा देतात. 'ऐक' या शब्दाची चालना वा उत्तेजना त्या शुद्धनिरूपणाचे समासात समर्थांनी किती वेळा दिली हें पाहण्यासारखेंच आहे. 'श्रीमुखांत देईन' 'मज सिंहाचे तूं पिलूं' या शब्दांतून त्यांच्या अद्वितीय कृपाळूपणाचा आनंद लुटीत पुढें गेलो म्हणजे 'नि:सदेह स्वरूपमिळणी ।। दोघे येकचि झाले ।।' अशी ते साक्ष देतील. १) येचि क्षणीं मरोनि जासी । तरी रघुनाथीं अतरलासी । माझें माझें म्हणतोसी । म्हणोनियां ।। २) गुरू सांगती सारासार । त्यास कैसें म्हणावे असार ।। तुज काय सांगणें विचार । शाहणे जाणती ३) तुवां आशंका नाहीं घेतली । परी मज तुझी चिंता लागली ।। म्हणोनि न पुसतां सांगणें । घडले शिष्या तुजकारणें. हे आहेत श्रीसमर्थांच्या शिष्यजनानुकंपेचे दाखले.

'जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञान अंधारे निरसी ।। जीवात्मया परमात्मयांसी । ऐक्यता करी ।। भवव्याघ्रं घालूनी उडी । गोवत्सास तडातोडी । केली देखोनि सीघ्र सोडी।तो सद्‌गुरु जाणावा ।। गर्भवास अतिसांकडी । इच्छाबंधनाची वेडी। ज्ञान देऊन सीघ्र सोडी । तो सद्‌गुरु स्वामी ।। जे वेदांचे अभ्यांतरी । तें काढून अपत्यापरी । शिष्यश्रवणी कवळ भरी । उद्‌गारवचनें ।। संदेह नि:शेष जाळी ।' ही वर्णने एका

व्यक्तीचा सद्‌गुरु या दृष्टीनें ठीक आहेत. पण, ' जो गुरु विश्वाचा । जेथें विकार नाही भेदाचा । ' अशासाठी कोणते शब्द योजावेत? निदान मराठी माणसांवर परमेश्वराची मोठीच कृपा झाली. श्रीमुकुंदराज, ज्ञानेश्वर, गोरोबा, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, निळोबाराय, दामाजीपंत, सेना, कान्होपात्रा, गजानन-महाराज, गुलाबराव महाराज, दासगणू, अशी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी मराठी मनाला भेटली– छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी, थोरले बाजीराव आणि थोरलेच माधवराव, टिळक, आगरकर, सावरकर, आंबेडकर अशा वीररत्नांनी इथल्या मातीला आकार दिला. या मनाचा अन् मातीचा मेळ घातला गेला समर्थांकरवी. ' भले कुळवंत म्हणावे । तेंही वेंगी हाजिर व्हावें ।। ' अशी हांक दिली त्यांनी आणि मग ' त्रैलोक्य चालिल्या फौजा । देववंदविमोचने ।। मोहीम मांडली मोठी । आनंदवन भूवनीं ।'. ' तीर्थक्षेत्रे ती मोडली । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली ।। सकळ पृथ्वी आंदोळली। धर्मं गेला ।।' अशी परिस्थिती होती. ' देवमात्र उछेदिला । जित्यापरिस मृत्यू भला । ' असें वाटण्याची वेळ जित्याजाणत्या माणसावर आलेली. समर्थ अवतरले आणि त्याच जागी ' उदंड जाहले पाणी । मोडली मांडली क्षेत्रे । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो झाला । ' असें परिवर्तन दिसले. अचूक आणि पुरेसा प्रयत्न हे यशाचें उपादान कारण. या जययज्ञाचे अध्वर्यू समर्थ रामदास आणि यजमान छत्रपती शिवराय. वैदिक परंपरेच्या विजिगीषु वीरवृत्तीवर बसली होती भ्रमाची राख. ती झाडतांच फुलला आंतला स्फुल्लिंग. ' वन्ही तो चेतवावा रे । चेतवीतांचि चेततो ।।' हा होता मंत्रघोष. विरक्तांच्या स्नेहानें भिजलेल्या वीरदेहांच्या समिधा पडत राहिल्या त्या समरयज्ञमंडपात. प्रगट झाली शिवशक्तीला अंकावर घेऊन उभी राहिलेली समर्थयुक्ती. तिने दिलेली प्रसादवचने कोण स्वीकारेल हा आहे पुढचा प्रश्न. कौटिल्याचे अर्थशास्त्र व समर्थांचा राष्ट्रधर्म पांढरपेशा प्रतिष्ठितांच्या सहनशील जीवनांसह संपून तर जाणार नाही ना? तत्त्वज्ञानाचे सार्थक तें व्यवहारात उतरले तरच होते ना? वांझोटया बुद्धिवादाचा वेडगळ विनोद आमच्या माणुसकीला हंसवत हंसवत संपवणार काय? तारुणीच उठाउठी भजन करणाऱ्यांच्या आड आमचे नवनवविवादसंपन्न गुरुत्व येऊं नयें. हवा आहे विवेकवैराग्याचा, ब्रह्मक्षत्रियतेजाचा, साधुसम्राटांचा मणिकांचनयोग. शिवसमर्थांचे व्यक्तित्त्वात तो एकवेळ दिसला. तसा योग ' महाराज, पुन्हा कधीं येणार ?' म्हणून विचारल्यास समर्थ शांतपणे उत्तर देतील–

' तुम्हांसी आम्हांसी झाली नाहीं तुटी । तुटीवीण भेटी काय सांगो ।।'

**जय जय रघुवीर समर्थ !**

# समर्थ रामदास : त्यांचे तत्त्वज्ञान व परमार्थ

– डॉ. (सौ.) ललित चारुदत्त दाभोलकर
एम. ए. पीएच. डी.
सातारा

महाराष्ट्रधर्माचे प्रणेते, ग्रंथराज 'दासबोधा'सारख्या स्वतंत्र व तात्त्विक ग्रंथाचे बहुश्रुत लेखक, 'आनंदवनभुवना' चे महास्वप्न पाहणारे महाकवी, 'वन्ही तो चेतवावा रे। चेतविताचि चेततो' अशा अनुभूतीतून प्रज्वलित झालेल्या सूत्राने जागृतीचा महामंत्र देणारे द्रष्टे या अशा विविध पैलूंनी संपन्न असलेलें रामदासस्वामींचे विभुतिमत्त्व महाराष्ट्राला परिचित आहे. त्यांचे 'मनाचे श्लोक' 'करुणाष्टके' 'आरत्या' आजही मराठी जनतेच्या ओठांवर खेळत आहेत. अंतरीच्या आर्ततेने आजही एखादा जीव 'अनुदिनी अनुतापे तापलो रामराया' म्हणत समर्थ वचनांनी देवाची आळवणी करतो. तर या जीवनपथावर त्रिविधतापाने पोळलेला एखादा जाव 'जगी सर्व सुखी असा कोण आहे। विचारे मना तूचि शोधुनि पाहे' अशा उद्गारानी आपल्या खिन्न व उदास मनाला आशावादी करतो. ज्या समर्थवाणीचा अर्थ व अनुभव हे जीवन जगताना आपल्याला घडीघडी येतो त्या श्रीसंत रामदासस्वामींच्या परमार्थ आणि तत्त्वज्ञानाचे त्यांच्या साहित्यातून मला घडलेले दर्शन मी आता सांगणार आहे.

**विश्वोद्धाराची तळमळ :–**

बालपणापासूनच समर्थांना स्वपेक्षा विश्वचिंता ग्रासीत असे. घरातील वडिलार्जित संस्कारही तपश्चर्येचे व श्रीरामोपासनेचे होते. साहजिकच 'राघवाचि पदे मानसी धरावी । विश्व उद्धारावे हेळामात्रे' असे विश्वकल्याणाचे विचार रामदासांच्या मनात दृढ होऊ लागले. १२ वर्षे नाशिक-जवळील टाकळी येथे खडतर उपासना व नंतरची १२ वर्षे तीर्थयात्रा करुन समर्थांनी पूर्ण ज्ञानी अवस्थेत विश्वोद्धारासाठी कृष्णातीरावर पाऊल टाकले. कृष्णातीरी आल्यावर समर्थांनी राममंदिराची उभारणी केली, महोच्छाव सुरु केले, मारुतींची स्थापना केली, एका नव्या संप्रदायाची सघटना केली, या संप्रदायाला निस्पृहता अंगी बाणण्यासाठी भिक्षेची दीक्षा दिली आणि भिक्षाटणाला बाहेर पडताना 'मनाचे श्लोक' म्हणावयाचा दंडक घातला. समर्थांच्या या मनोश्लोकाची सुरवातच–

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।।१।।
जनी निंद्य ते सर्व सोडूनि द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।।२।।

अशी सत्वर्तनाची व भक्तिमार्गाची दीक्षा देणारी असून त्यापुढील श्लोकात भक्ती कोणाची व कशाप्रकारे करावी याचे स्पष्टीकरण आहे. समर्थ म्हणतात :

'प्रभाते मनी राम चिंतीत जावा। पुढे वैखरी राम आधी वदावा' म्हणजे तुमच्या वैखरीतून– वाणीतून रामनामाचा उच्चार होण्याआधी ते रामनाम तुमच्या अंतरी दाटलेले हवे.

'विवेके देहबुद्धी सोडुनि द्यावी ।

विदेहीपणे मुक्ती भोगित जावी' ही समर्थांची मनोश्लोकातील शिकवण आहे. या मुक्तीसाठी या मनाने 'राघवाची भक्ती' करावी. केवळ ही भक्तीच भवचिंता दूर सारते. समर्थ मनोश्लोकात म्हणतात : अरे हा जीव कसा आहे तर खरे पाहिले तर तो कल्पवृक्षाखाली उभा आहे. पण मायेच्या लिफाळचाने, भ्रमाने तो हिंपुटी बनला आहे. या वेटचाच्या घरीच कामधेनू आहे पण तिची कल्पना नसल्यामुळे तो दुसरीकडे ताक मागतो! आता अशा या पामराला जीवनात खरा आनंद, सुख व समाधान कसे मिळणार? या मनाने आपली आसक्त व अहंकारीवृत्ती विवेकाने, ज्ञानाने, संतसांगातीने पालटावी आणि भवपाशातून मुक्त व्हावे हे मनोबोधाचे सार आहे.

रामदासानी आपल्या मनोश्लोकात मुक्तीचा, निवृत्तीचा, परमार्थाचा जयघोष केला आहे. समर्थ म्हणतात :

जीवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले ।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ।
देहेबुद्धिचे कर्म खोटे टळेना ।
जुने ठेवणे मीपणे आकळेना ।।१३७।।

आता हे ' जुने ठेवणे ' म्हणजे काय ? ' जुने ठेवणे ' म्हणजें जीवाचे मूळस्वरूप– ब्रह्मस्वरुप. जीवाने ' आपण कोण ' हे आपले मूळस्वरूप ओळखून ब्रह्मस्वरूप पावावे यासाठी रामदासांची लेखणी मनोश्लोकातून अखड तळमळत आहे. मनोश्लोकातील ' तुटे वाद संवाद तेथे करावा ' ' क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे.' ' विषयजनीत सुखे सुख होणार नाही.' ' जगी सर्व सुखी असा कोण आहे ' ' मरे एक त्याचा दुजा शोक वाहे.' ही साधो सरळ समर्थ वचने आज वेदवाक्ये झाली आहेत. कारण या वचनांचा अर्थ प्रत्येकाला या जीवनात अनुभवाला येतो हेच आहे.

मनाची शते ऐकता दोष जाती ।
मतीमंद ते साधना योग्य होती ।।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी ।
म्हणे दास विश्वासता मुक्ती भोगी ।।२०५।।

आणि म्हणूनच समर्थही मनोश्लोकात बद्धाला मुक्त करण्याचे सामर्थ्य आहे असे अगदी आत्मविश्वासाने बोलतात.

**समर्थांचा परमार्थमार्ग :–**

समर्थांचा परमार्थमार्ग व अध्यात्मनिरुपण हे बद्धाला मुक्त करणारे आहे. साहजिकच समर्थांनी आपल्या अध्यात्मनिरुपणातून बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध यांची लक्षणे, बद्धाने मुक्त होण्याचे मार्ग व साधना, रज–तम–सत्व गुण, द्वैत–अद्वैत, ब्रह्म–माया इत्यादीचे सखोल विवेचन केले आहे. आता समर्थांच्या निरुपणातून बद्धाचा मुक्त कसा होते ते पाहू.

आता प्रथम बद्ध कोण ते पाहू. समर्थांनी या बद्धजीवाचे दासबोधात अगदी नेटके वर्णन केले आहे.

परमार्थाविषयी अज्ञान । प्रपंचाचे उदंड ज्ञान ।
नेणें स्वयें समाधान । या नाव बद्ध ।।३६।।
परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ।
संसारभार जोजार । या नाव बद्ध ।।३७।।

(दा. ५–७)

हा बद्धजीव संपूर्णपणें प्रपंचात म्हणजे आपल्या पोटापाण्याच्या व्यवसायात आणि व्यवधानात पूर्णपणे गुरफटलेला असतो. ह्या व्यवधानाबाबत त्याला पुरेपूर ज्ञान असते. त्यादृष्टीनं त्याच्यात आणि पशुपक्षात काहीच फरक नसतो. पण दुर्लभ अशा मानवजन्माला येऊनही या जन्माचे सार्थक साधण्याचा जो मार्ग— ज्याला परमार्थ म्हणतात, त्याविषयी मात्र तो पूर्णपणे अज्ञानच असतो. आणि कुणी त्याला परमार्थाविषयी चार गोष्टी सांगितल्या तर तो त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतो. असा हा कुटुंबकाबाडी बद्धप्राणी संसार जोजारात पूर्णपणे गुरफटतो. आणि ज्यावेळी तो संसारात संकटाने गांजतो किंवा दुःखाने पोळतो तेव्हा त्याचे लक्ष परमार्थाकडे वळते. समर्थ दासबोधात अशा ह्या प्राण्याविषयी म्हणतात :

संसारदुःखे दुखवला । त्रिविधतापें पोळला ।
निरुपणे प्रस्तावला । अंतर्यामी ॥३॥

जाला प्रपंची उदास । मने घेतला विषयत्रास ।
म्हणे आतां पुरे सोस । संसारीचा ॥४॥

(दा. ५–८)

संसारात हा बद्धप्राणी जेव्हा त्रिविधतापाने पोळतो तेव्हा त्याच्या ठायी अनुताप निर्माण होतो. आणि आता आपण काही पुण्यमार्ग धरावा, संतसांगाती धरावी, परमार्थ साधावा अशी 'मुमुक्षु' अवस्था या त्रिविध तापाने पोळलेल्या बद्ध जीवाना प्राप्त होते. हीच मुमुक्षु अवस्था.

बद्धांना मुमुक्षु अवस्थेत नेणाऱ्या ह्या त्रिविधतापांचे तपशीलवार वर्णनही समर्थांनी दासबोधात केले आहे. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असे हे त्रिविधताप.

१) **आध्यात्मिक** : समर्थ म्हणतात आपल्या देहाला आणि इंद्रियांना ज्यामुळे शीण होतो तो आध्यात्मिक ताप. पोटदुखी, पंडुरोग, क्षयरोग हे सारे आध्यात्मिक ताप.

२) **आधिभौतिक** : सृष्टीतील भूतांमुळे जीवांना जो ताप होतो तो आधिभौतिक ताप. विविध श्वापदांचा दंश, कन्यापुत्र गहाळणे, जीवलगांचे मृत्यू हे सारे आधिभौतिक ताप.

३) **आधिदैविक** : जीवाने जी काही शुभ–अशुभ कर्मे, पापपुण्ये केली असतील त्याचे फळ जीवांना आधिदैविक तापात मिळते. गाठी पुण्य असेल तर स्वर्ग, पापसंचय असेल तर नरकभोग- ह्या ज्या देहांती यमयातना भोगाव्या लागतात तोच आधिदैविक ताप.

**मुमुक्षु :** त्रिविधतापाने पोळलेल्या बद्धजीवाला ' प्रपंच गेला हातचा । लेश नाही परमार्थाचा ' असा जर खेद वाटू लागला तर त्याचा बद्धपणा लोप पावून तो मुमुक्षु म्हणजे मोक्षमार्गाची– परमार्थाची इच्छा धरणारा जीव होतो आणि परमार्थाच्या मार्गदर्शनासाठी संतसज्जनांचा शोध घेऊ लागतो.

पण या मुमुक्षु अवस्थेत परमार्थमार्गावर येणारे एक धोक्याचे वळणही समर्थांनी आपल्या लघुकाव्यात दाखवून दिले आहे. हा मुमुक्षुजीव परमार्थासाठी जेव्हा संतसज्जनांचा शोध घेऊ लागतो तेव्हा त्याला भेटणाऱ्या बुवाबैराग्यांचे तपशीलवार वर्णनही समर्थांनी आपल्या 'बहुधा गोसावी' या काव्यात केले आहे. या काव्यातील ६७ ओव्यामधून समर्थांनी चमत्कार व करामती करुन मुमुक्षुना आपल्या सामर्थ्याचा झगमगाट दाखविणाऱ्या गोसाव्याचे वर्णन केले आहे.

उदा. मेले प्राणी उठविले । साखरेचे मीठ केले ।
गटगटा अग्नीसी गिळिले । काय सांगो ।।५०।।

परंतु समर्थांच्या मते हे गोसावी परमार्थमार्गावरील मार्गदर्शक होऊ शकत नाहीत. कारण–

ऐसे प्रकारचे जन । अंतरी अवघाचि अनुमान
प्रचितीविण वाष्कळज्ञान । उगेचि बोलती ।।१३।।
लक्षण नेणे अवलक्षण । भाग्य नेणे करंटपण ।
ज्ञान नेणे ज्ञानहीन । परम अन्याई ।।१४।।

म्हणजे या चमत्कार करणाऱ्या गोसाव्यांना स्वतःलाच आत्मज्ञान प्राप्त झालेले नसते. जे स्वतःच अज्ञानी ते मुमुक्षुना मार्गदर्शन कसे करणार ? त्यामुळे बद्धाला मुमुक्षु अवस्था प्राप्त होऊनही त्या मुमुक्षुना जर असे गोसावी भेटले तर त्यांचे काहीच कल्याण होत नाही आणि म्हणूनच समर्थांना हें असे चमत्कार करणारे बुवाबैरागी म्हणजे मोक्षमार्गातील अडथळा वाटतो. एवढेच नव्हेतर या अवस्थेत हे मुमुक्षु मल्लारी, भद्रकाळी, विघ्नहर म्हणजे गणपती, शंकर, व्यंकटेश इत्यादी दैवतांना भजू लागतात. नवस मागू लागतात.
समर्थ दासबोधात म्हणतात :

येक म्हणती विघ्नहर । येक म्हणती भोळाशंकर ।
येक म्हणती सत्वर । पावे भगवती ।। ३६ ।।

( दा. ८–१० )

पण त्यांची ही उपासनासुद्धा समर्थांना मोक्षमार्गावरील अडथळाच वाटतो. कारण समर्थ म्हणतात–

भूमंडळी देव नाना । त्यांची भीड उल्लंघेना ।
मुख्य देव तो कळेना । काही केल्या ॥ २३ ॥

(दा. १९-५)

प्राणी संसार टाकिती । देवास धुंडीत फिरती ।
नाना अनुमानी पडती । जेथे तेथे ॥ १७ ॥
ऐकती ब्रह्माविष्णु महेश । ऐकोन म्हणती हे विशेष ।
गुणातीत जो जगदीश । तो पाहिला पाहिजे ॥ २० ॥

(दा. १९-५)

समर्थांना अभिप्रेत असलेला हा 'मुख्यदेव' 'गुणातीत जगदीश' आहे तरी कोण ? समर्थ आपल्या एका कवितेत म्हणतात :

'वैकुंठीचा विष्णू कैलासी शंकर । मुख्य निराकार परब्रह्म'

(रा. क. २१२)

समर्थांच्या परमार्थमार्गाचे अंतीमध्येय हा जो 'मुख्य देव' म्हणजे निर्गुण निराकार ब्रह्म त्याच्याशी एकरुपता पावणे हे आहे. समर्थ दासबोधात म्हणतात :

जो जाणेल भगवंत । तया नाव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥

परमार्थमार्गाची आस धरणाऱ्या मुमुक्षुना जर अशा संतसज्जनांचा सहवास प्राप्त झाला तर तो सहजपणे साधकावस्थेत प्रवेश करतो, समर्थ म्हणतात :

अवगुणांचा करुनि त्याग । जेणे धरिला संतसंग ।
तयासी बोलिजे मग । साधक ऐसा ॥ २ ॥

(दा. ५-९)

पण जगामध्ये शाश्वत आणि अशाश्वताचा निवाडा करु शकणारे अधिकारी संतपुरुष साऱ्याच मुमुक्षुना भेटतात असे नाही. जर या मुमुक्षुना संतसांगातीचा लाभ झालाच नाही. त्यांना कोणी संतजन भेटलेच नाहीत तर हा मुमुक्षु साधक होऊच शकत नाही असे नव्हे. आपल्या 'अंतर्भाव' या काव्यात समर्थच सांगतात :

कर्म त्यजूनी बाधक । शुद्ध वर्ते तो साधक ।

म्हणजे परमार्थमार्गावर बंधनकारक ठरणारी पापकर्मे कटाक्षाने टाळून शुद्धाचरणानेही मुमुक्षुला साधकावस्था प्राप्त होऊ शकते.

असा हा साधक मग साधनेने व उपासनेने सिद्ध होतो. म्हणजे त्याला सिद्धी प्राप्त होतात. 'अंतर्भाव' या काव्यात समर्थांनी साधकाचा सिद्ध होण्याकरिता पुढील नित्यनेम सांगितला आहे.

मानसपूजा जपध्यान। एकाग्र करुनिया मन।
त्रिकाळ घ्यावे दर्शन। मारुतींसूर्याचे ॥ ११ ॥
हरिकथा निरुपण। प्रत्यई करावे श्रवण।
निरुपणी ऊण खूण। केली पाहिजे ॥ १२ ॥

म्हणजे हरिकथानिरुपण श्रवण करताना साधकाने नीरक्षिरविवेकाने खरे–खोटे ओळखले पाहिजे.

संकटी श्रवण न घडे। बलात्कारे अंतर पडे।
तरी अंतरस्थिती मोडे। ऐसे न कीजे ॥ १३ ॥
अंतरी पाच नामे। म्हणत जावी नेमे।
ऐसे वर्तता भ्रमे। बाधिजेना ॥ १४ ॥

पण कोणत्याही कारणाने जर साधकाला ही श्रवणभक्ती घडली नाही तरी त्याने आपली साधकावस्था न मोडता मनातल्या मनात नामजप चालू ठेवावा.

**सिद्धाने साधना सोडू नये :–**

अशी साधना करून साधकाचा सिद्ध झाला तरी त्याने आपली साधना सोडू नये. कारण ही सिद्धावस्था म्हणजे परमार्थमार्गावरील अंतीम पायरी नव्हे. या सिद्धाचाही बद्ध होण्याला वेळ लागत नाही. समर्थ 'अंतर्भाव' या काव्यात स्पष्टपणे म्हणतात :

सिद्ध होऊनि बैसला। दृष्टी नाणी साधनाला।
सादर अशनशयनाला। अत्यादरें करूनी ॥१॥
ऐसा जो विषयासक्त। अत्यंत विषई आसक्त।
सिद्धपणे आपुला घात। तेणे केला ॥२॥
जो सिद्धांचा मस्तकमणी। माहा तापसी शूळपाणी।
तो हि आसक्त श्रवणी। जपध्यानपूजेसी ॥३॥
अखंड वाचे रामनाम। अनुष्ठाता हि परम।
ज्ञानवैराग्यसंपन्न। सामर्थ्यसिंधू ॥४॥
तो हि म्हणे मी साधक। तेथे मानव बापुडे रंक।
सिद्धपणाचे कौतुक। केवी घडे ॥५॥
म्हणोनि साधनेसीं जो सिद्ध। तो चि ज्ञाता परमशुद्ध।
येर ते जाणावे अबद्ध। अप्रमाण ॥६॥
साधनेंवीण बाष्कळता। तेचि जाणावी बद्धता।
तेणें घडे स्वैराचार अनर्गळता। आसक्तो रुपे ॥७॥

सिद्धाने साधना सोडली याचाच अर्थ त्याचा देहभाव जागृत झाला असा

होतो. हा जागृत देहभाव त्याला स्वैराचाराकडेही खेचू शकतो. त्यामुळे सिद्धाचाही बद्ध होण्यास वेळ लागत नाही.

या उपासनामार्गावर वारंवार घसरण होण्याचा हा जो धोका आहे त्याला कारण हा कर्ममार्ग आहे. या मार्गावरील नित्यकर्म हे साधकाच्या वृत्ती काबूत ठेवण्यासाठी असते. पण त्या साधनानाच साध्य समजले जाऊन सर्व घोटाळा होतो.

समर्थ 'एकवीस समासी' या काव्यात म्हणतात :

लक्षें उदंड आहेती । साधकाच्या जिणावया वृत्ती ।
वृत्ती जिंतिलिया होती । साधक ते सिद्ध ।।१२।।
हे पिपलिकामार्गीचे अडथळे । विहंगमीं हे काहीच न आढळे ।
जैसे ते अकस्मात मिसळे । लवण जेथींचा तेथे ।।१३।।
लक्षे आणिक नाना साधने । हे करावी जयाकारणे ।
तयासी चुकोनी मूर्खपणे । लक्षासीच ब्रह्म म्हणावे ।।१४।।

साधनेने वृत्ती जिंकण्यासाठी सांगितलेला हा उपासना मार्ग पिपालिका मार्ग आहे. या मार्गाने मुंगीच्या गतीने परमार्थमार्गावर प्रगती होते. उलट लवण म्हणजे मीठ जसे पाण्याशी तत्काळ एकरूप होते त्याप्रपाणे ज्ञानमार्गाने मायेने बद्ध झालेला जीव तत्काळ ब्रह्मस्वरूप होतो. म्हणूनच या ज्ञानमार्गाला समर्थांनी विहंगमार्ग अशी सार्थ उपमा दिली आहे. हा ज्ञानमार्ग कसा असतो त्याचे वर्णन समर्थांनी 'पंचीकरणयोगात' पुढीलप्रमाणे केले आहे :

कर्माची निर्फळी विद्या । उपासनाची कामना ।
ज्ञानेंचि जाणणे सर्वे । कर्माकर्म विवंचना ।।११।।
ते ज्ञान कोणते कैसे । अभ्यासे पाविजे जनी ।
श्रवणभक्तीच्या योगे । मुक्ती सायुज्य पाविजें ।।१२।।
कर्म तो पिपालिका मार्ग । ज्ञानमार्ग । विहंगमु ।
तत्काळ पाविजे ज्ञानें । कर्माकर्मे हळुहळु ।।१३।।

फलासक्ती न धरता जर कर्म केले व कोणतीहीं कामना म्हणजे इच्छा मनात न धरता जर उपासना केली तरच कर्ममार्गात मुंगीच्या गतीने मोक्षाकडे प्रगती होते. परंतु कर्म कोणते आणि अकर्म कोणते याची विवंचना न करताही ज्ञानाच्या योगे म्हणजे बुद्धीने सर्व काही जाणून घेऊन अभ्यासाने सायुज्यमुक्ती प्राप्त होऊ शकते.

**समर्थांना अपेक्षित असलेली सायुज्यमुक्ती :-**

आता समर्थांना कोणती आणि कशी सायुज्यमुक्ती अपेक्षित आहे ते पाहू.

समर्थांनी दासबोधात मुक्तीचे चार प्रकार वर्णिले आहेत. सलोकता, समीपता, स्वरुपता व सायुज्यता.

आपल्या उपास्य दैवताच्या देवलोकी जाणे म्हणजे जसे शिवभक्तांनी कैलासला जाणे, विष्णुभक्तांनी वैकुंठाला जाणे म्हणजें सलोकता मुक्ती. त्या देवलोकात आपल्या उपास्य दैवताच्या समीप रहायला मिळणे ही समीपता मुक्ती. त्या उपास्य दैवताचे स्वरुप भक्ताला प्राप्त होणे ही स्वरुपता मुक्ती. परंतु ह्या तिन्हीं मुक्तीं जोपर्यंत पुण्यसंचय आहे तोपर्यंतच उपभोगता येतात. समर्थ दासबोधात म्हणतात :

सुकृत आहेतो भोगती । सुकृत संपता ढकलून देती ।
आपण दैवते असती । जैसे तैसे ।।२६।।
म्हणोनि तिन्ही मुक्ती नाशिवंत। सायुज्यमुक्ती ते शाश्वत ।
तेही निरोपिजेल सावचित । ऐक आता ।।२७।।
(दा. ४–१०)

ह्याप्रमाणे या तिन्ही मुक्ती नाशिवंत आहेत. ह्यापुढची पायरी म्हणजे सायुज्यमुक्ती. ह्या मुक्तीमध्ये भक्त हा त्याच्या उपास्यदैवतातच विलीन होतो. परंतु ही सायुज्यमुक्तीही शाश्वत नसते. कारण समर्थ म्हणतात :

ब्रह्मांड नासेल कल्पांती । पर्वतासहित जळेल क्षिती ।
तेव्हा अवघेच देव जाती । मां मुक्ती कैच्या तेथे ।।२८।।
(दा. ४–१०)

समर्थांना अशी ही अशाश्वत मुक्ती अभिप्रेत नाही. समर्थ म्हणतात :

तेव्हा निर्गुण परमात्मा निश्चळ। निर्गुण भक्ती ते ही अचळ
सायुज्यमुक्तीचे केवळ । जाणिजे ऐसी ।।२९।।
(दा. ४–१०)

म्हणजे कल्पांतीही नष्ट न होणारे निर्गुण–निश्चल परब्रह्म आणि त्याच्याशी एकरुप होणे ही जो सायुज्यमुक्तीं. तो समर्थांना अभिप्रेत आहे. आणि हे निर्गुण–निराकार–निश्चल परब्रह्म म्हणजे तरी काय ? समर्थ म्हणतात :

निर्गुणी अनन्य असता । तेणे होय सायुज्यता ।
सायुज्यता म्हणजे स्वरुपता । निर्गुण भक्ती ।।३०।।
(दा. ४–१०)

म्हणजे हे निर्गुण–निराकार परब्रह्म आहे तेच आपण स्वत: आहोत असा साक्षात्कार होणे हीच सायुज्यमुक्ती समर्थांना अभिप्रेत आहे. समर्थांनी सांगितलेला

परमार्थमार्ग हा असा आहे. समर्थांचा राम हा ' आत्माराम ' म्हणजेच सर्वव्यापी निर्गुण–निराकार ' अंतरात्मा ' आहे.

समर्थ म्हणतात : करी चापबाण । माहेश्वरी ठाण ।
रुप हे सगुण । राघवाचे ।।१।।
राघवाचे रुप । निर्गुण जाणावे ।
सगुण स्वभावे । नाशिवंत ।।२।।

(समर्थांचा गाथा पृ. १२१)

आणि अशा या अंतरात्म्याचा साक्षात्कार होणे हीच मुक्तावस्था. समर्थ म्हणतात :

साक्षात्कार होता सत्य निर्गुणाचा ।
मग या गुणांचा पांग नाही ।।३६।।
पांग नाही ऐसे नेमस्त जाणिजे ।
शिघ्रचि सुटीजे संवसारी ।।३७।।
संवसारी सुटीजे संसार करिता ।
सर्वही भोगिता भोगातीत ।।३८।।
भोगातीत जैसा श्रीकृष्ण दुर्वास ।
आत्मज्ञानी तैसा सर्वकाळ ।।३९।।
सर्वकाळ देही असता विदेही ।
रामदासी नाही जन्म मृत्यू ।।४०।।

(रा. क. पृ. २०७)

अशी ही मुक्तावस्था.

प्राप्त झालेला जीव संसार करत असला तरीही कमलपत्राप्रमाणे मुक्तच असतो. समर्थांनी म्हटल्याप्रमाणे तो ' देही असूनही विदेहीपणे ' मुक्ती भोगीत असतो.

समर्थांनी निरुपण केलेला परमार्थमार्ग हा असा आहे. आणि आपले परमार्थिक तत्वज्ञान हे वैदिक तत्वज्ञान आहे असे समर्थांनीच सांगितले आहे. समर्थ म्हणतात :

कल्पनेचे देव कल्पांती नासती । ऐसे वेदश्रुती बोल तसे ।।१५।।
बोलतसे श्रुती दृश्य नासिवंत । जाणिजे शाश्वत परब्रह्म ।।१६।।
आपणासी पाहे जो कोणी शोधुनि । तो जन्मापासुनि मुक्तजाला ।।२०।।

(रा. क. १९६)

'तत्वमसि' म्हणजे ' ब्रह्म तूच आहेस,' आत्मा आणि ब्रह्म यात अद्वैत आहे. हे अद्वैती वैदिक तत्वज्ञानच समर्थांनी सुगम भाषेत सर्व प्रकारच्या श्रोत्यांना

समजेल असे पुन:पुन्हा सांगितले आहे. आपल्या 'आत्माराम' या काव्यात समर्थ म्हणतात :

प्राप्त झाले अद्वैतज्ञान ।
अभिन्नपणे जे विज्ञान ।
तेचि जाण आत्मनिवेदन ।
जेथे मी-तू नाही ।।३२।।

समर्थांचे तत्वज्ञान हे असे अद्वैती वैदिक तत्वज्ञान असून त्यांचा परमार्थमार्ग हा बद्धाना मुक्त करणारा आहे. मी स्वत: एक संसारी बद्ध जीवच आहे. माझ्या पीएच. डी. च्या प्रबंधासाठी केलेल्या समर्थ साहित्याच्या अभ्यासातूनच मला समजलेला समर्थांचा परमार्थमार्ग आणि तत्वज्ञान मी आपणासमोर येथे मांडले आहे.

## जय जय रघुवीर समर्थ !

# श्री समर्थांचा काल व कार्य : राजकीय व सामाजिक

—डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख
मुरगुड ( जि. कोल्हापूर )

" कृतघ्नतेला यमदेवाजवळसुद्धा पुरेशी शिक्षा नाही."

" आपल्या जन्मापूर्वीचा इतिहास न जाणणे म्हणजे पुढील आयुष्य त्या जन्माच्या क्षणातच काढणे होय "

" इतिहासाचा भूतकाल भविष्याविषयी जागरूक ठेवितो "

राजकारण व समाजकारण ही दोन्ही कार्यक्षेत्रे संतांच्या कक्षेत येत नाहीत व येऊ नयेत अशी आज आमची सर्वसाधारण कल्पना आहे. वैराग्य, जगन्मिथ्यात्व, अुपासना, आश्रम, ब्रह्म, माया इत्यादि शब्दांना धरूनच संतांचे जीवन असावे. इतर वाटेला त्यांनी जाऊच नये अशी अपेक्षा असते ! म्हणजे आमच्या संतविषयक कल्पनेमध्ये जे बसतात तेच संत. समर्थ रामदास स्वामींचे विषयी जे कांही पूर्वग्रह आज आहेत ते त्यातूनच निर्माण झाले आहेत, किंवा केले गेले आहेत. येथे अविचाराचाच भाग फार मोठा आहे. चौफेर विचार करण्याची असमर्थता, त्यांच्या काळाच्या परिस्थितीचे पूर्ण अज्ञान, समोर असलेल्या इति-

हासाचे गांभीर्य लक्षांत न येण्यासारखे असंवेदनाक्षम मन व आजच्या संदर्भातच सर्व विचार करण्याच्या सवयींमुळे असे होते.

रस्तेसफाई, अस्वच्छ वस्तीत जाऊन स्वच्छता करणे, समारंभ, वर्गणी गोळा करणे, संस्था चालवणे, प्रौढशिक्षण, अस्पृश्यता निवारण, हुंडाबंदी इ. कार्य करणारा सामाजिक कार्यकर्ता होतो; तर सहकारी संस्था निर्माण करणे, निवडणुका लढविणे, सत्तेच्या वर्तुळात वावरणे, आपल्या कक्षेतील लोकांची आपले वजन वापरून लहानमोठी कामे करणे, शह व काटशहाच्या चक्रव्यूहाच्यात जीवन घालविणे इ. बाबी राजकीय कार्यांत मोडतात. ही दोन्ही क्षेत्रे प्रसगी आपल्या हितावर नजर ठेवून अेकमेकात बेमालूम मिसळून जातात ! आजची परिस्थिती व समस्यांचा विचार केला असता हे सर्व बरोबर आहे. परतु हे असेच तीनशे वर्षापूर्वी असले पाहिजे असे समजणे मात्र चुकीचे आहे. ह्या चुकीमुळेच समर्थ हे 'राजकारणी संत' होते किंवा 'संत राजकारणी' होते असे म्हटल्याबरोबर त्यांच्या संतपणाबद्दलच शंका येऊ लागते. विशेषत: हल्लीच्या राजकारणाची पातळी विचारात घेतली असता तर ती शंका अधिकच बळावते !

समर्थांच्या व्यक्तिजीवनाचे तीन भाग पाहिले असता टाकळी येथील तपश्चरणपूर्तीचा पहिला, भारतभ्रमणाचा दुसरा व भ्रमणोत्तर कार्याचा तिसरा असे विभाग स्पष्ट दिसून येणारे आहेत. त्यातील पहिला आत्मकल्याणाचा, दुसरा लोकनिरीक्षणाचा व तिसरा लोककल्याणाचा आहे. देशाच्या दृष्टिनेही समर्थांच्या आयुष्याचे तीन कालखंड दिसतात. क्रूर, धर्मपिसाट अशा परकी सत्तेच्या कळसाचा अेक, स्वातंत्र्यासाठी प्रतिकाराचा दुसरा व स्वातंत्र्यप्राप्तीचा तिसरा. त्यांच्या दीर्घ आयुष्यात अेवढ्या घडामोडी झाल्या ! "मिळमिळीत अवघेचि टाकावे" असे म्हणणाऱ्या रामदासांना परमेश्वरानेसुद्धा मिळमिळित असे कांहीच वाट्याला येऊ दिले नाही !!

## परकीय सत्तेचा कळस

बापाला कैद करुन व भावाचे डोळे काढून सत्तेवर आलेला औरंगजेब हा मोंगली सत्तेच्या वृत्तीचा व प्रसाराचा कळस होता. सर्व भारतवर्षाचा अधिपती बनून 'हिंदुस्थान'चा सम्राट बनण्याची त्याची जबरदस्त महत्वाकांक्षा होती. दक्षिणेतील मुसलमानी व बिगरमुसलमानी राज्ये त्याच्या डोळ्यात सलत होती. धर्म बदलल्यानंतर व्यक्तीला किंवा गावाला मुसलमानी नांव दिले जाई. पण हिंदुस्थान हे देशाचे नांव मात्र त्यानें बदलले नाही. हिंदूंच्या प्रदेशाचा सम्राट बनल्याचा धर्मराक्षसी आनंद त्याला तसाच ठेवावयाचा होता. ह्याच धर्मराक्षसाचा भीषण व क्रूर वरवंटा अत्यंत निर्दयपणे व बेलगामपणे भारतवर्षावर फिरविला जात

होता. भारताच्या पाटघावर हिंदुधर्मीयांची होईल तेवढी विटंबना करणे हेच त्या वरवंटघाचे कार्य !

मोंगली जुलूमशाहीचे पहिले लक्ष्य स्त्रीयांचे असे. फूलसुद्धां अधिक आदराने वागविले जाईल इतकी विटंबना हिंदु कुलस्त्रीयांची केली जाई. लष्करी चढाई किंवा सामान्य पुंडाईमध्ये देखील स्त्रीयांचे अपहरण करुन त्याना जनानखान्याच्या नर्कवासामध्ये लोटून देण्यावर मोंगलांचा कटाक्ष असे. अुर्दू भाषा जेवढी मोहक व आदबशीर, तेवढेच ती भाषा वापरणारे मोंगल क्रूर व झोटिंग असत. त्यांच्यातील सुसंस्कृत मंडळी दरबारामध्ये सजावटी व देखावा करुन जगाच्या डोळयात धूळ फेकण्यापुरतीच होती. ज्या समाजातील स्त्रीयांचे अपहरण करुन त्याना भ्रष्ट करण्यात येते तो समाज एक तर संतापाने बेभान होऊन जिवाच्या करारानें अन्यायावर तुटून पडतो किंवा हतप्रभ होऊन पराभूत मनोवृत्तीने दीन व आर्त बनतो. आमच्या दुर्दैवाने आम्ही दुसरा पर्याय स्वीकारला. अगदी माजघर स्वयंपाक घरात घुसलेल्या ह्या भयानक अत्याचारांनी सुद्धां आमच्यात अेकजूट निर्माण होऊ शकली नाही. जहागिरीचा तुकडा, भ्रामक अहंगड, लाचारी, अखंड दुही व स्वकीयांचा घात करण्याच्या आमच्या प्रवृत्तीने अगदी वर्मावर पडलेले घावही आम्ही बेशरमपणे सोसले.

" किती गुज्रिणी ब्राह्मणी भ्रष्टवीलया ।
किती शांमुखी जाहजीं फांकवीलया ।।
किती अेक देशांतरी त्या विकीलया ।
किती सुंदरा हाल होऊनि मेल्या ।।" समर्थ ।।

मोंगलाईचा दुसरा रोख धर्ममंदिरे, मूर्ती व मंदिरातील द्रव्याकडे असे. अेकेश्वरवादाचा संहारक अर्थ करून त्या 'अेका' ईश्वराचीच अन्य मंदिरे व मूर्ती फोडणे म्हणजेच 'आपल्या' अेका ईश्वराच्या धर्माचा प्रसार करणे असा अत्यंत विपरीत व परिणामी आत्मघातकी मार्ग त्यांनी पत्करला. अुपजत क्रौर्य व व लांडगेशाही सर्वांच्याच रक्तांत भिनल्याने योग्य मार्गदर्शनही त्यांना कोणीच करू शकले नाही. राजकीय व लष्करी सत्ताच औरंगजेबाच्या काळी धार्मिक सत्ता बनल्याने तत्वापेक्षा तलवारीवरच तिचा भर का होता हे सहज कळणारे आहे. त्या तलवारीच्या ढळढळीत खुणा आजही सर्वत्र दिसत आहेत. खुद्द काशीविश्वेश्वराच्या मंदिराला आज पाठीमागच्या बाजूला मशिदीचे स्वरुप दिसत आहे. शंकराच्या पिंडी अुलटया करुन त्यांच्या सपाट भागाच्या फरशा केल्या आहेत. मथुरेचे फार मोठे डेहरा केसुराय मंदीर जमीनदोस्त करुन त्यावर मशीद बांधली आहे. अयोध्येला दशरथराजाच्या राजवाडयाचे जागी असेच एक थडगे अुभे आहे. पौराणिक कथांशी अत्यंत निगडीत व अुपासनेची मुख्य दैवते

जेथे जेथे होती ती तीर्थे निधडून तेथील मंदीरांचा नाश करण्यात आला !

" अेक देव दुराचारीं । फोडिला वळे ।
येक देव देव जापाणिला । येक देव अुदकी टाकिला ।
येक देव नेऊन घातला । पायातली ।।" समर्थ।।

हिंदूंच्या देवळांचा नाश करण्यात, परधर्माच्या दैवतांचा व क्षेत्रांचा नाश करण्याचे राक्षसी व दैत्याना शोभणारे समाधान तर होतेच पण त्याचबरोबर जुलमाच्या धर्मपरिवर्तनाचा तो पायाही होता. हिंदूंचा धर्म व परमार्थ मूर्तीच्या आश्रयाने सुरु होतो हे खरे असले तरी मूर्ती म्हणजेच धर्म व परमार्थ असे जाणते हिंदू कध'च मानीत नाहीत. हे वर्म मोंगलांच्या कधीच लक्षात आले नाही. तत्वविचार करण्याचे सौजन्य, समज व गरज त्याना नव्हतीच. जो इस्लाम धर्म मानीत नाही तो ' काफर.' अशा काफरांचे व त्यांच्या धर्मपालनाच्या साधनांचे केवळ अस्तित्व म्हणजे इस्लामला ' खतरा' आणि अशा काफरांचे निवारण म्हणजे विटंबना व नाश करून जो इस्लामचे ' संरक्षण' करतो तो ' गाझी' !

" कित्येक म्लेंच्छ होऊन गेले ।
कित्येक फिरंगणांत आटले ।।" समर्थ ।।

मोंगलांच्या व पोर्तुगीजांच्या क्रौर्याने भारतीयांची अस्मिता जागी होण्याचे अैवजी ते खचून व भिवून हतवीर्य झाल्याचेच चित्र मोठ्या प्रमाणावर दिसत होते. जेथे अस्मिता व स्वाभिमान जागा झाला तेथे बळ व अेकोपा अगदीच तोटका पडला. त्यामुळे समाज अधिकच हताश व भयग्रस्त झाला. हवेच्या खालोखाल समाजामध्यें ' भीतो' हाच भाव भरून राहिला होता, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये ! समूहाची सार्वजनिक कत्तल अनेकवेळा अनेक ठिकाणी करण्यात येऊन मुंडकी वेशीवर, झाडावर व इमारतीवर टांगून त्यांचे दिमाखाने प्रदर्शन मांडण्यात येई !

" तुंड हेकांड कठोरवचनी । अैसे लौंद बेइमानी ।
पापी अपस्मार जनीं । राक्षेस जाणावे ।।" समर्थ ।।

ज्या धर्म, न्याय व नीतीच्या आधाराने समाज सुखी व समाधानी होऊन प्रगत होतो तेच पूर्णपणे पायदळी तुडविले जात होते. धर्म–नीतीचा प्रभाव संपून न्यायावरील विश्वास अुडाला की प्रजेचा प्रत्येक घटक केवळ स्वत:चे अस्तित्व टिकविण्याचाच विचार करतो. केवळ स्वत:पुरते पहात असताना धर्म–नीती पूर्ण गुंडाळून ठेविली जाऊन अन्याय, अनीती व अधर्माने न्याय विकत घेतला जाऊ लागतो ! सामाजिक अधोगतीचा व विच्छेदनाचा हा कळस होय. समाजावर अन्यायाचेच नेतृत्व अुदयाला येते !

" राज्यांची अनेक बंडे झाली । गोब्राह्मणाची पालाणे पडिली ।
पृथ्वी हलकल्लोळ झाली । कोणी नव्हे कोणाचे ।।" समर्थ ।।

"कोणी नव्हे कोण्हाचे" ह्यात समर्थांना खूपच सांगावयाचे आहे. समाजाला नेता व त्राता तर नव्हताच पण एकमेकाना मदत करण्याची साधी माणुसकीही, लाचारी व स्वार्थापोटी नाहीशी झाली होती. ज्यांना परंपरेने व धर्माने आपले म्हणावे तेच अुपऱ्यांना मिळून स्वकीयाना बरबाद करण्यात धन्यता मानीत होते. स्वतंत्रत्व, हिंदुत्व, महाराष्ट्रीयत्व व भारतीयत्व ह्या कल्पनाच नष्टप्राय होऊन 'दास्यत्व' ही एकच कल्पना रूजली होती ! सर थॉमस रोच्या शब्दात "The country is all Slavish" (सर्व देशच दास्यवृत्तीचा आहे.)

राजकीय व धार्मिक आक्रमणासाठीं मोंगलाना प्रचंड फौजफाटा बाळगावा लागे. त्याच्या बळावरच अन्याय, दडपशाही, अनाचार, व्यभिचार व लुटालूट करून 'राज्यकारभार' चालवावयाचा असे ! फौजेचा प्रचंड खर्च दिल्लीहून न चालतां आसपासच्या मुलखातूनच तो वसूल केला जाई. ह्या वसुलीला कोणताच नियम नसे. फौजेच्या गरजाही अफाट असत. अत्यंत विलासी जीवन हे मोंगली फौजेचे वैशिष्ट्यच असे. ते भोगविलास, मिजास, भपका व अैश्वर्य सांभाळण्यासाठी जनतेला अक्षरशः पिळून संपत्ती गोळा केली जाई. केव्हाही धाडी घालून कोठूनही पैसे गोळा करणे हाच करवसुलीचा नियम होता ! ह्याच सरकारी लुटीला 'राज्यकारभार' असे नांव होते. आपला व्यापार, जमीनजुमला, घर, संपत्ती ह्यांची कोणालाच शाश्वती नव्हती. अशा अस्वस्थ अस्थिर समाजात नेताच नसल्याने कोणताही सर्वंकष विचार व नियोजन करुन कांहीं अुपाय करणे अशक्यच झाले होते. अतिप्राचीन भारतीय समाज आपल्या संस्कृतीसह नष्ट होतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली.

भारत देशाचे वर्णन करताना ऋषी म्हणतात–

" अत्रापि भारतं श्रेष्ठं जंबुद्वीपे महामुने । यतोहि कर्मभूरेषा
ह्यतोन्या भोग भूमयः ।
अत्रजन्मसहस्त्राणां सहस्त्रैरपिसत्तम । कदाचिल्लभते जन्तुर्मानुषं
पुण्यसञ्पयात् ।।
गायन्ति देवा:किल गीतकानि । धन्यास्तु ते भारतभूमिभागे ।
स्वर्गापवर्गास्पदमार्गभूते । भवन्ति भूयः पुरुषाः सुरत्वात् ।।
कर्मण्यसङकल्पिततत्फलानि । संन्यस्थ विष्णौ परमात्मभूते ।

( विष्णु पुराण )

" हे मैत्रेय महामुने । जंबुद्वीपात भारत देश सर्वश्रेष्ठ आहे. ती कर्मभूमी असून इतर भाग भोगमय आहे. जीवाला फार मोठ्या पुण्यसंचयाने हजारो

जन्म हजारोवेळा झाल्यानंतर भारतामध्ये जन्म मिळणे कदाचित् शक्य असते. देव अशी गाणी गातात की हा भारतभूमीचा भाग धन्य असून स्वर्ग व मोक्षाचा मार्ग तोच आहे. परमात्मस्वरूप विष्णूला आपल्या कर्माचे फळ अर्पण केल्याने तेथील पुरुष देवाहून श्रेष्ठ आहेत " अशा ह्या भारताची महानता ज्या धर्म-परमार्थामुळे आहे तेच नष्ट होण्याची वेळ येऊन ठेपली होती.

## प्रतिकार व क्रांती

श्री सन्त रामदास स्वामी हे स्वभावाने पूर्ण विरक्त व संतच होते. हनुमन्त जेवढा विरक्त तेवढेच रामदास विरक्त. पण हनुमानाने जेवढे प्रचंड कार्य केले तेवढेच समर्थानीही केले. विरक्ती व कार्य ह्यांचो कधी गाठच पडू नये अशी विचित्र धारणा आमच्या समाजात केव्हा व कशी भिनली कोण जाणे! ज्या संत तुकाराम महाराजानी ' ढेकणाचे बाजे सुखाची कल्पना ' वगैरे प्रकाराने प्रपंचाची अतिशय निर्भत्सना केली ती अधर्माच्या अज्ञानी प्रपंचाची होती. ' जोडोनीया धन उत्तम वेव्हारे। उदास विचारे वेंच करी।' हीच शिकवण बहुतेक सर्वांच्यासाठी होती. विरक्तीचा कळस असलेले श्री ज्ञानोबाराय ' म्हणोनि आइके पार्था। जया नैष्यकर्म्यपदी आस्था। तया उचित कर्म सर्वथा। त्याज्य। नोहे ॥ ' असे निश्चयाने सांगतात. नैष्कर्म्य सिद्धीचे पारमार्थिक टोंक गांठताना उचित कर्म म्हणजे स्वधर्माचरण मुळीच सोडता कामा नये हा त्यांचा आदेशच आहे. भगवान आद्य शंकराचार्यांच्या विरक्तीने त्याना भारताच्या चारी दिशाना भ्रमण करुन चार अद्वैत संप्रदायाची पीठे स्थापन करण्यास भाग पाडले! वादासाठी मृत राजाच्या शरीरात प्रवेश करुन राजभोग भोगावयास लावले!! अगदी ह्याच प्रमाणे समर्थांच्या वैराग्याला उपदेशरुपाने रंजलेल्या—गांजलेल्यांच्या बुद्धीत शिरुन त्याना 'आपले' म्हणून दुर्दैवाच्या फेऱ्यातून त्यांची सुटका करण्याचे 'साधुत्व' करणे भाग पडले. ऐहिक व पारमार्थिक दृष्टया बुडणारे जन त्यांच्या उघडया डोळयाना पहाणेच शक्य नव्हते. त्याना तारण्याच्या कारणासाठीच वैकुंठवासी असलेले श्री समर्थ महाराष्ट्रात आले.

परदुःख शीतल असते असे म्हणतात. आपले पूर्वज आपलेच असले तरी काळाने त्याना जणू परकेच केलेले असते की काय न कळे! त्यामुळे त्या आपल्याच पूर्वजांच्या वाटयाला आलेले हाल, कष्ट, विटंबना, अपमान, अन्याय वगैरे दुःखांची आम्हाला जाणीव नाही. एवढेच नव्हे तर त्याविषयी आम्ही बेफिकिर झालेलो आहोत. ह्यावर कळस म्हणजे ' झाले गेले कशाला उगाळत बसायचे ' असा आम्ही समजुतदारपणाचा आव आणतो. ह्यावर ताण म्हणजे हल्लीच्या राजकारणाला प्रतिकूल होते म्हणून झालेले सर्व पुसून टाकण्याचा प्रयत्न करेपर्यंत आमची मजल गेलेली आहे! आपला व स्वकीयांचा अवसान-

घात व तेजोभंग करणे हेच आमच्या रक्तात भिनले आहे की काय न नळे!! त्यामुळेंच आम्ही त्या काळी असलेल्या परिस्थितीची कल्पनाही करू शकत नाही. व म्हणूनच समर्थांनी केलेल्या अफाट व अलौकिक कार्याची जाणीव आम्हाला नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्या कार्याचे विकृत मूल्यमापन करून त्यांचे संतपण हिरावून घेण्याचा नतद्रष्टपणा चालला आहे. हा कृतघ्नपणाच नव्हे काय ?

देशातील मोंगली सत्तेचा कळस झालेला स्वत: समर्थ पहात होते, अैकत होते व स्वकीयांच्या कळवळचाने स्वत: अनुभवत होते! आत्मकल्याणाच्या कालखंडानंतर ( १५४१–५३ ) त्यांच्या जीवनातील लोकनिरीक्षणाच्या म्हणजे भारतभ्रमणाच्या कालखंडात ( १५५४–१५६६ ) त्यांचे विरक्त आत्मकेंद्रित मन कर्तव्यतत्पर होऊन सामान्यांच्या दु:खांवर केंद्रित झाले व त्यांच्या उद्धारासाठी पेटून उठले. पण हे पेटून अुठलेले अंत:करण अेका विवेकी, विरक्त महापुरुषाचे होते. अंत:करणात 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्' अशा श्री रामाने वास्तव्य केलेल्या सत्पुरुषाचे होते. परिपूर्ण विवेक व त्याचा परिणाम म्हणून भगवंताचे अधिष्ठान लाभलेल्या समर्थांच्या चळवळीचा स्फुल्लिंग क्षणभर चमकून विझला नाही. अनेक पेटलेले वीर विवेक म्हणजे परिपूर्ण विचार, सावधगिरी, परिस्थितीचे आकलन, धीर, अुत्कृष्ट नियोजन व योग्य सामुग्रीचे पाठबळ नसल्याने पतंगाप्रमाणे मोंगली सत्तेवर झडपा घालून विझले. पण त्याने ती सत्ता हादरली तर नाहीच उलट असे तुटपुंजे प्रयत्न अपयशी झाल्याने समाजाचा धीर मात्र खचला. नैराश्याचा पगडा बसून अगतिकता व दैन्य निर्माण झाले. समर्थांचे सामर्थ्य येथेच अुठून दिसते. अुत्कृष्ट पूर्वनियोजन, इतिहास–भूगोलाची जाण, कठोर शिस्तप्रियता, अखंड प्रयत्न, विरक्तीचे तेज, सत्याची जरब, व अत्यंत पद्धतशीरपणे समाजाच्या तळापासून चळवळ सतत जारी ठेवल्यानेच समर्थांना शिवछत्रपतींच्या महान कार्याला मदत करता आली. समर्थ व शिवछत्रपती म्हणजे आत्मसूर्याचा प्रकाश व तेज! सूर्यापासून व परस्परापासून अतूट व मूलत: अेकरूप!! येथे अेकाने अेकाला साह्य केले असे म्हणण्यापेक्षा अेकच तेज दोन ठिकाणी होऊन त्याने आपापले कार्य करून देश मुक्त केला असेच म्हणावे लागेल.

समर्थांचे सामाजिक कार्य व राजकीय कार्य असा कांटेकोर फरक करणे अशक्य आहे. समाजातील व्यक्तींच्या व्यक्तीगत व सामूहिक अुत्थानाशिवाय त्या काळाला आवश्यक होते तसे राजकारण करणेंच शक्य नव्हते. कळसाला पोहोचलेली मोंगली सत्ता खाली खेचण्यासाठी खोलवर पतन झालेला समाज वर आणणे आवश्यक होते. ही दोन्ही कामे एकमेकावर अवलंबून होती. आत्मजागृतीच्या आमच्या कल्पनांच्या पूर्तीसाठी स्वराज्याची जरूर होती. तर स्वराज्यासाठी लोक–जागृतीची जरूर होती. पहिले काम शिवछत्रपतींनी केले

तर दुसरे समर्थांनी पार पाडले. समर्थांनी स्वराज्याच्या चळवळीत प्रत्यक्ष राजकारणाच्या माध्यमातून भाग घेतला असता तर स्वराज्याच्या चळवळीचे नुकसानच झाले असते. राजकारणातील अनिवार्य विरोध त्यांच्याही वाटयाला आला असता. चंद्रराव मोरे व व्यंकोजींचा शिवरायाना जसा विरोध सहन करावा लागला व त्यांचे पारिपत्य करावे लागले तसा प्रत्यक्ष विरोध समर्थानाही होता. "सत्तेसाठी हपापलेला गोसावी" अशी संभावना होऊन त्यांचा लोकसंग्रह विसकटून गेला असता. पण हे दोन्ही महापुरूष आपापल्या क्षेत्रात पूर्ण विरक्त, तेजस्वी, कर्तव्यकठोर व द्रष्टे असल्याने त्यांच्या त्यांच्या कार्यात कोठेही संघर्ष न येता पूर्ण सुसूत्रता राहिली. "श्रींच्या इच्छेसाठी त्यांच्याच आज्ञेने स्वराज्यासाठी राजकारणात उडी घेतलेले शिवाजीमहाराज व आनंदवनभुवनाच्या रामराज्यासाठी समाजात वुडी मारणारे समर्थ रामदास ह्या दोघांच्या कार्यात 'श्री' स्वरुप श्रीराम हा एक सामान्य दुवा असल्यानेच तो सुसूत्रता अभंग राहिली हे कधीच विसरता येणार नाही.

अनादिकालापासून अगदी आजपर्यंत भारतीय स्त्रीनेच समाजाचे स्वास्थ्य आपल्या समर्पित वर्तनाने टिकवून ठेविले आहे. आजही भारतीय नारी सामान्यत: संयमशील, सोशिक, त्यागी व कुटुंबवत्सल आहे. केवळ आपल्या चारपांचजणांच्या मर्यादित कुटुंबाचाच विचार प्रामुख्याने करण्याचा काहीसा संकुचितपणा त्यांचे ठिकाणी असला तरी तेवढयाने समाजपुरुषाचे स्वास्थ्य फारसे विघडत नाही. स्त्रीचे हे महात्म्य आमच्या पुरातन वाङमयात अमूप गायले असले तरी पुरुषप्रधान समाजरचनेमध्ये आत्मकेंद्रित पुरुष स्त्रीचे अवमूल्यन करीत असल्याचे दृष्यच प्रामुख्याने दिसत आले आहे. समर्थांनी ही स्थिती पूर्ण लक्षात घेऊन समाजाच्या बांधणीमध्ये स्त्रीचे असलेले योग्य ते स्थान तिला आवर्जून दिले आहे. वेणाबाईसारख्या कमंठ घरातील बालविधवेला आपल्या शिष्यवर्गात दाखल करून घेऊन त्याकाळी त्यांनी मोठीच क्रांती केली. संशयाने भर-लेले लक्षावधी डोळे समर्थ स्वत: नि:शंक असल्याने त्यांच्या दृष्टिने जणू निष्प्राण होते ! परमार्थमार्गात स्त्रीची निंदा केली जाते असा समज आहे. ज्या कारणाने मानवी देहाची निंदा केली जाते त्याच कारणाने स्त्रीची निंदा केली आहे हे लक्षात घेतले म्हणजे असा दोष येत नाही. परमार्थ मार्गावरील स्त्रीसाधकांचे दृष्टिने पुरुषांचीही निंदा त्या स्त्रीनिंदेत अभिप्रेत आहेच !

" स्त्रीयांचा संग धरी । स्त्रीयासी निरुपण करी ।
तो अेक पढतमूर्ख ।।"
" अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाची पुतळा ।"
" बाळकास वाढवी जननी । हे तो नव्हे पुरुषाचेनी ।"

" वीट नाही कंटाळा नाही । आलस्य नाही त्रास नाही ।
इतुकी माया कोठेचि नाही । मातेवेगळी ।।"

येथे स्त्रीयांची निंदा व स्तुती दोन्ही आहे. अस्सल तीव्र मुमुक्षूचे दृष्टीने स्त्रीचे ठिकाणी आसक्ती राहू नये म्हणून तिची निंदा केली आहे. पण जग-रहाटीचे संदर्भात तिची स्तुतीही केली आहे. हे वर्म लक्षात न घेता शास्त्राने केलेली स्त्रीनिंदा म्हणजे तिला दडपण्याचे आणखी एक हत्यार म्हणूनच उपयोग केला जातो. समाजाच्या कार्यक्षम व संयमी असलेल्या अर्ध्या भागाची अुपेक्षा व हेळसांड करून समाज कधीच प्रगत होणार नाही. समर्थांच्या समाजकार्याचा उद्देश राजकारणाभिमुख व प्रतिकारक्षम समाज निर्माण करण्याचा तर होताच पण त्याचबरोबर 'अवघे सुखी असावे । अैसी वासना ।' असा संतसहजही होता. स्वभावतः वाममार्गी असलेली भारतीय नारी अपवादात्मक म्हटली पाहिजे. पुरुषच परिस्थितीच्या चक्रव्यूहात व मोहात अडकवून तिला वाममार्गाकडे नेतो. हे टाळण्यासाठी स्त्रीविषयी आदराची भावना निर्माण व्हावी लागते व आदर तर उन्नत्तीशिवाय निर्माण होत नाही. स्त्रीयांना त्यांच्या निसर्गसहज गुणांना धरून प्रगतीची संधी मिळाल्याशिवाय समाजातील त्यांचे कर्तव्य त्या आवश्यक कार्यक्षमतेने करु शकणार नाहीत. तरल सवेदनाक्षम व द्रष्टया समर्थांनी हेच जाणून स्त्री–मुक्तीची चळवळ तेव्हाच सुरु केली !

समाज जेवढा अधिक गोंधळला, भयग्रस्त व दीन झाला असेल तेवढा तो प्रयत्नांची कांस सोडून दैवी उपायांच्या मागे लागतो, व असे दैवी उपाय सांगणाऱ्यांची चलती होते. खरे सन्त आपल्या योगबळाने अेकाद्या पीडिताचे समाधान करतात हे खरे. त्यांचा हेतू मात्र त्या आर्ताला जिज्ञासू बनवून मुमुक्षु करण्याचा असतो! 'सकट निवारणाचा कारखाना' असे त्याचे स्वरुप नसते ! बरेच जण संकटे नसली तरी अेखाद्या बुवा, बाबा, 'आई' किंवा महाराजांच्या सहवासात राहून जीवनातील कर्तव्यें व समस्यांकडे पाठ फिरविण्याचा पळपुटेपणाही करीत असतात. हे दोन्ही प्रकार समर्थांचे काळी फैलावले असल्याने अडाणी, भोळया व भयभीत जनतेला जागे करून धीर देण्याचे सामाजिक व पर्यायाने राजकीय कार्य रामदासाना करावे लागले. दांभिक, अर्धवट, लोकेषणार्थी कामुक व धंदेवाईक बुवाबाजीमुळे नैतिक व पारमार्थिक असे दुहेरी नुकसान होऊन खऱ्या संतांकडे सुद्धा सशयाने पाहिले जाते. मानवाला खऱ्या परमार्थापासून दूर ठेवण्याला कारण होण्याइतके मोठे पातक दुसरे नाही !

'परमेश्वरास ओळखिले। आपण कोणसे कळले।
आत्मनिवेदन जालें। म्हणजे बरे ।।'

हे परमार्थाचे वर्म। लटिके बोले जो अधम।
लटिके मानी जो अधमाधम। येथार्थ जाणावा।।'

परमार्थाचे खरे वर्म न जाणता भलतेच सांगत रहाणे म्हणजे नीचपणा असून भलतेच सांगितलेले खरे मानणे म्हणजे महानीचपणा आहे. समर्थांच्या स्पष्टवक्तेपणाला येथे विलक्षण धार चढली आहे.

ह्यावर मुख्य अुपाय म्हणून समर्थ अखंड सावधान, विवेकपूर्ण सतत प्रयत्नाचे म्हणजे साक्षेपाचे जीवन जगण्याचा फार मोठा आग्रह धरतात.

'अत्यंत साक्षपी व्हावे। न व्हावे आळसी कदा।
घ्यावा या देहाचा लाहो। जायाचे हे म्हणोनिया।।'
'साक्षेप करिता कष्टती। परंतु पुढे सुरवाडिती।
खाती जेवती सुखी होती। यत्ने करोनी।।'

सामान्य माणसांच्या सामान्य आकांक्षापासून ते असामान्यांच्या अफाट कार्यापर्यन्त हाच राजमार्ग नाही काय ?

'म्हणौन असावी दीर्घ सूचना। अखंड कराची चाळणा।
पुढील होणार अनुमाना। आणून सोडावे।।'

मागील अनुभव लक्षात घेऊन पुढील नियोजन, तज्ञांची रचनात्मक मसलत व संभाव्य परिस्थितीची अचूक जाणीव ह्या राजकारणाला अत्यावश्यक बाबी समर्थांनी कटाक्षाने सांभाळावयास सांगितले आहे. व्यक्तिगत, कौटुंबिक व राष्ट्रजीवनाला हे गुण अत्यावश्यक आहेत हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

'हा धकाधकीचा मामला। कैसा वळे अशक्ताला।।'

शरीराला दुर्बल ठेवणे म्हणजे त्या शरीराचा अपमानच होय ! आपल्या पूर्ण स्वाधीन केलेले व आपले कल्याण करणारे शरीर नीट न सांभाळणे म्हणजे बेफिकीरीची हद्द आहे. ' शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् ' अशा शरीराचे आरोग्य अुत्तम सांभाळून त्याला इह–पर हितासाठी भरपूर राबवून घ्यावे. शरीराला कपडे व साजशृंगाराने सजविणे म्हणजे त्याची काळजी घेणे नव्हे. बैलगाडी, ट्रक, सायकल, ट्रॅक्टर व मोटारीला ज्याप्रमाणे त्यांचे मालक प्रसंगी हारतुरे घालून सजवितात, तसा फार तर देह क्वचित सजवावा, नटवावा ! देहाचे खरे वैभव इंद्रिये व मनाच्या आरोग्यावर अवलंबून आहे व त्यावरच व्यक्तीचे, समाजाचे व राष्ट्राचे स्वास्थ्य निर्भर असते. कोणत्याही भारतीय सन्ताने सन्त रामदासांचे अेवढा देहाच्या तंदुरुस्तीवर भर दिलेला नाही. हनुमन्त हे रामायणातील तर भीम हे महाभारतातील शक्तिदैवत आहे. समर्थांनी श्रीरामाचा सखा असलेला व पूर्ण समर्पित जीवन जगलेला हनुमन्त आदर्श म्हणून समोर ठेवला. भीम धर्म-

राजाचा अंकित होता पण धर्मराजही पूर्ण नव्हता व भीमही प्रसंगी आत्मकेन्द्रीत होता. हनुमंत मात्र पूर्ण श्रीरामाचा अनुचर व उत्तम शिष्य असल्याने रामाचे मनोगत जाणून तडाखेबंद काम करणारा होता. राष्ट्राला त्या काळी हीच गरज होती. ती गरज जाणून सत्रक्षण व खलनिग्रहणासाठी (हे भारतीय पोलीस खात्याचे हल्लीचे ब्रीदवाक्य आहे) घणाघाती कार्य करण्याची त्या काळी तशीच गरज होती. हनुमान मंदिरे, आखाडे व सूर्यनमस्कार ही शक्तिदेवतेला प्रसन्न करण्याची विविध पूजा, समर्थांनी केली व करविली. 'आखाडा संप्रदाय' किंवा 'धारकरी' अशी किंचित् टवाळीची भाषा केव्हातरी समर्थ-सप्रदायाबद्दल वापरली जाते. ती कमी विचार करणाऱ्या व त्यांच्याच कार्यावर आज भारतीय म्हणून जगत असणाऱ्या चिपाडी व पोषाखी मंडळींची असते.

व्यक्ती सशक्त असली तरी समाजात एकोपा व सङ्घटना नसेल तर ते 'सशक्तांचे दौर्बल्यच' ठरते ! समर्थांच्या काळी अगदी असेच होते. एवढेच नव्हे तर विघटनेचा कळस झाला होता. विघटित समाजात समाजकारण व राजकारण ह्यात विसंगती निर्माण होऊन राष्ट्राची प्रगती होणे अशक्य असते. विघटनेमध्ये दुराभिमान, अविचार, अविश्वास, भीती, गटबाजी, द्वेष, आपसातील ईर्ष्या, कट, अन्याय व अत्याचाराचे थैमान चालते. आपल्या गटातील लोकांचे जे चुकत असेल त्याला चूक म्हणणे जड जाते. दुसऱ्या गटातील लोकांत जे चांगले असेल त्याला तसे म्हणता येत नाही ! परिणामी सद्गुणांचे संवर्धन व गुणग्रहण होतच नाही. सर्व समाजांत दुर्गुणांचाच फैलाव होऊन राष्ट्र म्हणून जगण्याची लायकीच अुरत नाही. केवळ प्रचंड शस्त्रसंभार व सैन्य असले म्हणजे राष्ट्र बनत नाही. गेल्या वर्षीच इराणच्या प्रक्षुब्ध संघटित जनतेने काय केले ? अत्यंत प्रबळ सैन्याच्या कित्येक सेनापतींना भर चौकात कंठस्नान घालण्यात आले. सैन्य नुसतेच पहात राहिले ! परंतु आता त्याच इराणी जनतेत भयानक विघटन झाल्याने 'नुसता देशची उरला' अशा स्मशानी परिस्थितीकडे तो देश वेगाने वाटचाल करीत आहे. एकधर्मी राजवट असली म्हणजे सर्वत्र अलबेल असते, असा भ्रम इतिहासाच्या अभ्यासकाला तरी होऊ नये.

मुलतानी जुलूमशाही विरूद्ध अुभे ठाकून आपले प्राचीन सांस्कृतिक व पारमार्थिक वैभव टिकविण्यासाठी समर्थांनी समाजाची बांधणी सुरू केली. ह्या बांधणीसाठी प्रथम नेतृत्व निर्माण करून सुसूत्रतेसाठी कार्यक्षम अुपकेंद्रे अुभारण्याची आवश्यकता होती. शिवछत्रपतींच्या राजकीय नेतृत्वास पूरक अशी धार्मिक केंद्रे उभारून तेथे हजारो महंतांची त्यांनी योजना केली. हे सांस्कृतिक, धार्मिक, नैतिक, पारमार्थिक नेतृत्व संपूर्ण समाजाभिमुख होते.

"जो जनामधे वागे । जनावेगळी गोष्टी सांगे ।
ज्ञान ज्याचे अंतरी जागे । तोचि साधू ।।"

जनांत मिसळणारे, जनाना ज्याचे अज्ञान आहे त्याचे निवारण करणारे व विरक्तीमुळे जेथे आत्मानुभूति स्थिर झाली आहे असे हजारो साधू समर्थांनी प्रथम घडवून त्याना प्रत्यक्ष कार्याला प्रवृत्त केले. डोळसपणाने अवधानपूर्वक युक्तीने व निस्पृहपणे कसे कार्य करावे हे समर्थांनी अुत्कृष्टपणे सांगितले आहे.

"लोक हे वर्तता राजी। सर्व राजच होतसे ।।" हे त्या शिकवणीचे मुख्य सूत्र आहे.

" प्रसंगे वर्तता आले । येथातथ्यची सूचिले ।
हिंडता पारखी लोकां । कार्यकर्ता जीवी धरी ।
वोळखी कराव्या दाटा । येके ठायी स्थिरो नये ।
गलबला होचि नेदावा । गल्बला बुद्धि भ्रष्टवी ।"

ही नेतृत्वाची वर्मे आत्मसात केलेले नेते जिवापाड कष्ट करून समाजात वावरत, लोकाना धीर देत, त्यांचा स्वाभिमान जागा करीत, अंगात वीरश्री व उत्साह भरीत त्यांच्या बांधणीचे काम करीत होते. अत्यंत शिस्तप्रिय, नियमबद्ध व प्रसंगी कर्तव्य–कठोर वाटणाऱ्या समर्थांचा सर्वांचेवर वचक असे. प्रसंग पाहून अवघा हलकल्ळोल करून म्लेंच्छांचेवर घसरण्याचा आदेश दिला जाई. अन्योक्ति अलंकाराचा रामदासानी भरपूर वापर करून प्रत्यक्ष शत्रूचे नांव न घेता राक्षस, दैत्य, दानव वगैरे पौराणिक शब्द व कथांचा वापर करून त्यांचा नि:पात करण्यासाठी समाजात वीरश्री निर्माण केली.

'तुम्ही राक्षसे निर्बळे बुद्धिहीने । मती मंदली पातकांचेनि गुणे।' अनन्वित पापामुळे रावणाच्या राक्षसांची वुद्धी मंद व दुर्बळ झाली होती 'बहु माजले गर्व मोठ्या बळाचा। तया झोडीतो दास मी राघवाचा!' प्रचंड सैन्याची घमेंड निर्माण होऊन ते राक्षस माजले असले तरी राघवाचा दास असलेला मी त्याना झोडून काढीन. समर्थांचे काळी सज्जनांची जी दुरावस्था झाली होती तिचे रावणाचे बंदिखान्यात पडलेल्या देवांचे निमित्त करून वर्णन केले आहे.

'हिणासारिखे देव ते दीन झाले । नसे शक्ति ना युक्ति पोटी गळाले ।
भयाभीत ते कांपती दैन्यवाणे । बहु गांजिले दु:ख ते कोण जाणे ।

प्रसंगी लोकांची कठोर निर्भत्सना करून त्याना आवेश आणण्याचे काम समर्थांना करावे लागले.

'धाकेची चळचळा कांपे । भेणेची फळफळा मुते ।
बोवडी पडिली तोंडी । घाबरे चाचिरे पडे ।।'

केवळ बडबड करणाऱ्यांचे विरुद्ध समर्थांचा मोठा कटाक्ष असे. सांगणाऱ्याचा स्वत:च्या वर्तनाशी मेळ नसेल तर अैकणाऱ्याचा तत्वज्ञानावरील विश्वास उडतो.

कारण तत्वज्ञान आचरणात आणणे अशक्यप्राय असल्यासारखे वाटून तो नादच सोडलेला बरा अशी भूमिका निर्माण होते.

'सांगोचि जाणती सर्व । कर्ता कोणी दिसेचि ना ।
जाणते नेणते सांगो । स्वभावो लागला जनी ।।'

कळत असो नसो, अनुभव असो नसो– काहीतरी वाचलेले व ऐकलेले सांगत सुटण्याची लोकांना संवयच लागली आहे. प्रत्यक्ष करून अनुभव घेणारा व देणारा कोठेही नाही !

'परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।'

प्रत्येक कार्याच्या सुरवातीस, मध्ये व शेवटी 'ओम् तत् सत्' ह्या मंत्राचे रूपाने किंवा भगवंताच्या नामाच्या रूपाने त्याचे अधिष्ठान असले म्हणजे ते कार्य पूर्ण–अपूर्ण, असफल–सफल कसेही असले तरी निर्लेप होते. मोक्षाच्या दिशेने असणारा हा विचार तर समर्थांना सांगावयाचा आहेच पण त्याचबरोबर सर्व समाज ज्या अेकाच्या नांवाने अेकत्र बांधला जाईल असे अधिष्ठान त्याना हवे होते. समाजात सहज असणारे स्थूल–सूक्ष्म भेद जेथे नाहीसे होतात त्या परमेश्वराच्या आधाराने आरंभलेले कार्य सर्वमान्य होण्यासारखे असते. 'अवजानन्ति माम् मूढाः मानुषीं तनुमाश्रितम्' असे म्हणण्याची पाळी कित्येक अलौकिक लीला दाखविणाऱ्या प्रत्यक्ष श्रीकृष्णावर आली ! मग सामान्य पद्धतीने सामान्याप्रमाणे जन्माला येऊन मानवदेह धारण करणाऱ्या कोणालाही सर्व समाजाची मान्यता मिळणे अतिशय कठीण असते. खुद्द ज्ञानेश्वरमहाराजांना सुद्धा 'निवृत्ति म्हणे' अगर 'व्यासाचिया खुणे' असे म्हणून त्यांच्या आश्रयाने आपले म्हणणे सांगावे लागले. त्यांत 'जै जगा धाकुटे होइजे' हा भाग तर आहेच पण त्याचबरोबर समाजाचे हे मानसशास्त्रही लक्षात घेतले आहे. संत रामदासानी ह्याचसाठी प्रभु श्रीराम व मारुतीचे आश्रयाने आपले कार्य आरंभले. त्यांची 'उपासना पुढे करून' त्याना 'मस्तकी धरून' ( समर्थाना नव्हे ) मुलुख बडवून, गनीमांच्या फौजा पहाताच बाहूना स्फुरण येवून समाजाकडून धर्मरक्षण व देशरक्षण करविले.

**स्वराज्याचा सांभाळ**

'वित्तेन रक्ष्यते धर्मो विद्या योगेन रक्ष्यते ।
मृदुता रक्ष्यते भूपः सुस्त्रिया रक्ष्यते गृहम् ।'

धनाने धर्म, सतत अभ्यासाने विद्या, मार्दवाने राजा व स्त्रीकडून घराचे रक्षण होते. राष्ट्राच्या सांभाळाची ही व्यापक चतुःसूत्री आहे. समर्थांनी ह्याच चतुःसूत्रीचा परिपूर्ण पाठपुरावा केला आहे.

'प्रपची पाहिजे सुवर्ण,' 'ते उदंडची मिळवावे । मग सुखे भोगावे.' ह्या रामदासांच्या सांगण्याला विचाराची भक्कम बैठक आहे.

" कुबेरापासूनि अर्थ । वेदापासूनि परमार्थ ।
लक्ष्मीपासूनि समर्थ । भाग्यासी आले ।।"

कुबेर, अर्थ, लक्ष्मी, धनवन्त हे शब्द समर्थांना वर्ज्य नाहीत. त्यांचे त्यांना वावडे नाही ! राष्ट्राचा गाडा हांकण्यासाठी ह्या सर्वांची अतिशय गरज आहे. सर्व देश परमार्थमार्गावरील विरक्तांनी भरलेला आहे अगर असावा असे ते कधीच मानीत नाहीत. प्रत्येक व्यक्तीचे आश्रमधर्मानुसार ते ध्येय जरूर असावे पण ते स्वधर्माचे पालन करीत असताना असावे व ते तर व्यवहाराला धरूनच असले पाहिजे. जोपर्यंत सर्व समाज उन्नत होत नाही ( तसे होणे शक्य नाही) तो पर्यंत आदर्श जीवनाला मर्यादा पडणारच. व्यवहाराचे नियम न जाणण्याचा भोळेपणा हे भूषण नाही तर सर्वघाताचे ते लक्षण आहे.

" ज्या जयाचा जो व्यापार । तेथे असावे खबर्दार ।
दुश्चितपणे तरी पोर । वेढा लावी ।"
हिशेब झाडाचो पाहीना । दिवाळखोर ।।
" हिशेब वरा राखीत जावा । लिहीण्याचा आळस नसावा !"
मेळविती तितुके भक्षिती । ते कठिणकाळी मरोन जाती ।

आपला व्यवसाय डोळयात तेल घालून चोख व हिशेबीपणाने करावा. नाहीतर एखादा सामान्य माणूसही गोत्यात आणोल. मिळकतीचा कांहीं भाग शिल्लक टाकावा. अडचणोत तो उपयोगी पडेल.

अर्थार्जनाने धर्मरक्षणास मदत होते. धर्मशाळा, अन्नछत्रे, धार्मिक कृत्ये, उत्सव, धर्मसंस्थांचा सांभाळ व धर्मप्रसारकांचा चरितार्थ धनावाचून होत नाही. धर्म तर त्याचे रक्षण केले तरच आपले रक्षण करणारा आहे. धर्मानेच समाजात न्याय व नीती स्थिरावते. न्याय-नीतीने समाज सुखी, समाधानी व शांत रहातो. म्हणूनच ' धर्मरक्षणाचे नर । देणे ईश्वराचे ।' असे समर्थ म्हणतात. असे ईश्वराचे देणें असलेले श्रीशिवछत्रपती होते. म्हणूनच रामदासांचे त्यांच्यावर अलोट प्रेम होते. धर्मजागरण हे उपासनेचें अंगच आहे.

" वापी कूप सरोवरे । नाना देवालये सिखरे ।
राजांगणे मनोहरे । वृंदावने भुयरीं ।।
मठ मंडपा धर्म-शाळा । देवद्वारी पडशाळा ।
नाना अुपकर्णे नक्षत्रमाळा । नाना वस्त्रसामग्री ।।"

देवालयाच्या कार्यक्षेत्रात दान, परोपकार, समाजाच्या सोयी ह्या सर्वांना भरपूर वाव ठेवला आहे. देवालये हीच धर्ममंदिरे, समाजमंदिरे, करमणुकीची केंद्रे व शिक्षण मंदिरे व्हावीत अशी कल्पना ह्या मागे आहे.

अनेक विद्या व क्रीडा हे राष्ट्राचे भूषण होय. त्यांच्या अभिमानाच्या व स्पर्धेच्या निमित्ताने राष्ट्रीयत्व बाणते. आणि खऱ्या गुणी व्यक्तीच्या गुणोत्कर्षाला व त्यांच्या अभिव्यक्तीला वाव मिळून समाज गुन्हेगारी, लैंगिक अमर्यादा, रिकामटेकडेपणा ह्यापासून दूर रहातो.

" नाना विद्या ज्ञातृत्व कांहीं । कवेश्वरवीण तो नाही ।"
पंडित आणि पुराणिक । वैद्य आणि पंचाक्षरी ।
प्रपंची आणि परमार्थी । अशा सर्वांना समर्थ अभिवादन
करून मान देतात तो ह्याचसाठी.

रामदासस्वामींनी राजा व राज्यकारभार ह्यांचेसाठी अगदी ठोस सूचना देऊन ठेविल्या आहेत. ' मृदुता रक्ष्यते भूपः ।' ह्यातील मृदुता म्हणजे काय हे त्यांच्याच शब्दात पाहण्यासारखे आहे.

" मुख्य सूत्र हाती धरावे । करणे ते लोकांकरवी करावे ।
कित्येक खलक अुगवावे । राजकारणामध्ये ।।"

संपूर्ण राजकारणाचे मुख्य सूत्र राजाने स्वतःचे हाती ठेवून सर्व कामे प्रसंग व व्यक्ती पाहून योग्य त्या व्यक्तीकडून करून घ्यावी. अनेक धूर्त, चाणाक्ष, विद्यासंपन्न व अनेक स्वभावाचे लोक राजकारणासाठी जवळ करावे. कर्तव्यापायी कठोरपणे केलेल्या गोष्टींचा धागा आपल्यापर्यन्त पोहोचू देऊ नये. कठोर कर्मे करवूनही स्वतः मृदु रहावे !

' अैसा पाहिजे की राजा । कैपक्ष परमार्थी ।
तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचितीचे तडाखे ।
बंड पाषांडांचे वाखे । सहजची होती ।'

राजा परमार्थिकांचा कैवारी असावा व तो 'जाणता' असावा. सकळ करणे जगदीशाचे ही 'जाण' त्याचे ठिकाणी सतत असावी. त्याच्या अनुभवसिद्ध सत्प्रवृत्तीमुळे दुर्जनाला त्याच्या नावांचाही धाक वाटावा. तसा धाक वाटेल असा प्रत्यक्ष अनुभव त्याना आलेला असावा ! कारण –

दण्डःशास्ति प्रजाः सर्वा दण्ड अेवाभिरक्षति ।
दण्डःसुप्तेषु जार्गति दण्डं धर्मं विदु बुधाः ।।' मनुस्मृति ।।

दंडानेच प्रजेचे शासन होते, सर्वांचे संरक्षण होते दंडानेच मुर्दाड शुद्धीवर येतात. म्हणून दंड हाच धर्म आहे, असे जाणते म्हणतात ! ह्यामुळे अराजक, अत्याचार व अन्यायाचा मागमूसही रहात नाही.

राज्यकारभारातील दोषही समर्थांनी त्यांच्या खास शैलीने सांगितले आहेत.

" फितव्याने बुडती राज्ये । खबर्दारी असेचि ना ।
युक्ती ना शक्ती ना बेगी । लोक राजी असेचि ना ।।
बेदादी बेकैद सेना । कारभारीच चोरटे ।
धन्यासी राखावे राजी । कदा काळी घडेचि ना ।।
चोरटी होमटी तुंदे । नासके लांच इच्छिती ।
लौंढीचे दुरी घालावे । मारावे राजकारणे ।।"

गलथानपणा व बेसावधगिरीमुळे फितुरीला वाव मिळून राज्याची वर्मे शत्रूस माहीत होतात व अैन संग्रामाचे वेळी घरभेद्यांचा आपल्यालाच विरोध होतो. युक्ती, शक्ती व कर्तव्यनिष्ठा नसेल तर जनसमुदायाला सुखी ठेविता येत नाही. बेफिकिर व अनियंत्रीत सेना व आपलीच तुंबडी भरणारे प्रधान असतील तर जनताजनार्दनाला समाधान देणे शक्यच नाही. असंस्कृत, डल्ला मारणारे, अगचोर, आळशी व लांचखाऊ असे हलकट अधिकारी काढून टाकून त्याना शासन द्यावे. समर्थांची कर्तव्यकठोरता येथे सीमा गाठते.

'देशद्रोही तितुके कुत्रे। मारून घालावे परते।' देशद्रोह करणाऱ्याना कुत्र्याच्या मरणाने ठार मारावे. मोह, सत्ता, व्यक्तिगत वैर, धर्म किंवा अेखाद्या राजकीय तत्वाच्या निष्ठेपायी देशनिष्ठा पायदळी तुडवून देशाचा घात करावयास निघालेल्या आततायी हरामखोराना विचार न करिता ठार मारावे.

'आपआपणा जागे करुन जगदुद्धार करील।'
'राघवाचा दास मी झालो पावन। पतित कोण उरो शके।'

समाजाच्या प्रत्येक अंगाला आलेली सुस्ती नाहीशी करून त्याला जाग आणून हा जगाचा उद्धार करील हे समर्थांच्या जन्मावेळचे भाकीत अक्षरश: खरे ठरले. जीवनाच्या सर्व अंगअुपांगांचे सूक्ष्म निरीक्षण करून जनसामान्यांचे मानसशास्त्र लक्षात घेऊन परिस्थितीचे यथार्थ आकलन करण्याची अंतर्दृष्टी (Insight) असणाऱ्या समर्थांनी अतिशय थोडया काळात फार मोठी कामगिरी केली.

आत्मकल्याणाच्या पर्वानंतर लोकनिरीक्षण करून लोककल्याण करण्याची जणू आखीव रेखीव कर्तबगारी त्यानी दाखविली. परमेश्वराचा दास होऊन स्वत: पावन झालेला नारायण स्वामी व समर्थ पदवीला पोहोचला व सर्वांना त्या पदवीचे दार खुले केले. हेच संतांचे मुख्य लक्षण आहे. म्हणूनच समर्थ रामदास हे प्रथम, मध्ये व शेवटी संतच होते. बाकी होती दार अुघडण्याची क्रिया ! दार फार जुने व अतिशय घट्ट बसले असल्याने त्याला धक्के द्यावे लागले, घण घालावे लागले व मोडावे लागल्याने आवाजही फार मोठे झाले ! त्या कानठळया आजही सहन न होणाऱ्या नाजूक मंडळीना सांगावेसे वाटते की दार उघडल्यावर काय दिसते ते पहा !! दाराच्या मोडक्या फळया व घण पहात बसू नका !!!

" कां भ्रमर परागी वैसे । नाना सुमनां डसे ।
वाराही वाहे सोसे । स्वयंतुष्ट ।।१।।
परी भ्रमराचिया पाउला । आणि वारियाचिया डोला ।
बीजे, केसरे अंतराळा । पसरती की ।।२।।
वृक्ष वेली लता । होती बीजें पसरतां ।
अुपवने नाना निश्चिता । आपैसयाची ।।३।।
परी भ्रमरा आणि पवना । हे कांहीचि कळेना ।
ते कदा न ये अनुमाना । करोनिया हो ।।४।।
तैसे जना अेक अेका । समर्थ परिस लागता निका ।
देशा स्वतंत्रतेचा आवाका । कवळो आला ।।५।।

●●●

# महाराष्ट्राच्या रंगभूमीवरील शिव–समर्थयोग .....

– सुनील चिंचोलकर,
सहसंपादक, ‘सज्जनगड’ मासिक,
सज्जनगड (सातारा)

**श्री समर्थचरित्राची रुपरेषा**

समर्थ रामदासांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्यातील जांब नामक खेडेगावी सन १६०८ साली ठोसर कुटुंबात झाला. ते अभिजात वैराग्यशाली होते. ईश्वराची प्राप्ती करुन घ्यावयाची हे त्यांनी अगदी बालपणी ठरवले. आपण वैयक्तिक प्रपंच न करता राष्ट्राचा प्रपंच करावयाचा, व आपले जीवनपुष्प राष्ट्रदेवतेच्या चरणी समर्पित करायचे हा निर्धार त्यांनी सुकुमार अवस्थेतच केला. पण त्यांच्या मातेने त्यांच्या मनाविरुद्ध त्यांचे लग्न जमवले. तेव्हा वयाच्या १२ व्या वर्षी, म्हणजे सन १६२० साली त्यांनी लग्नमंडपातून पलायन केले. लग्नमंडपातून पलायन करणारा जगाच्या इतिहासातील हा पहिलाच अन् शेवटचा नवरदेव. सन १६२० साली घरातून पळालेले समर्थ नासिकला आले. तिथे त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या केली. १६३२ साली तपश्चर्या पूर्ण केल्यावर त्यांनी भारतप्रवासाचा संकल्प सोडला व देशस्थितीचे अवलोकन करण्यासाठी

सन १६३२ ते १६४४ ही बारा वर्षे हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पायी भारतप्रवास केला. सन १६४५ ते ४८ या काळात ते चाफळ खोऱ्यात आले व त्यांनी चाफळ परिसरात सुप्रसिद्ध अकरा मारुती मंदिरे स्थापन केली. १६४९ साली त्यांनी चाफळला मठ व श्रीराम मंदीर स्थापन केले. याच वर्षी त्यांची व छत्रपती शिवाजी राजेंची चाफळजवळ सिंघणवाडोला पहिली भेट झाली व त्यांनी शिवाजीस अनुग्रह देवून हिंदवी स्वराज्य निर्मितीच्या शिवाजी राजेंच्या कार्यास आशिर्वाद दिला. सन १६५२ ते १६६० या काळात समर्थांनी रायगड-जवळील शिवथरघळीत 'दासबोध' या सुप्रसिद्ध व सर्वसंग्राहक अशा धर्मग्रंथाचीच रचना केली. सन १६६० ते १६७५ या काळात ते प्रामुख्याने चाफळला असले तरी सर्वत्र सचार करून असत. सन १६७६ साली ते शिवाजी राजेंच्या विनंतीवरुन सज्जनगडावर कायम राहण्यासाठी म्हणून आले. येथेच आपल्या जीवनाची सायंकाळ त्यांनी शांतपणे घालवली. १६८० साली शिवाजी राजे गेल्यानंतर लगेचच २२ महिन्यांनी, म्हणजे १६८२ सालीं समर्थांनी सज्जनगडावरच देह ठेवला. शिवाजीचे सुपुत्र संभाजी राजे यांनी सज्जनगडावर समर्थांचे खूप मोठे समाधी मंदीर बांधले आहे.

**श्री शिवचरित्राची रुपरेषा**

छत्रपती शिवाजी राजेंचा जन्म सन १६३० साली शिवनेरी किल्ल्यावर जिजामातेच्या पोटी भोसले घराण्यात झाला. आपल्या पतीचे, शहाजी राजांचे, हिंदवी स्वराज्य निर्मितीचे भंगलेले स्वप्न आपल्या पुत्राकडून साकार करावयाचे असा चंग जिजाऊंनी बांधला होता. शिवाजी राजे ७ वर्षांचे असतानाच, म्हणजे १६३७ साली, त्यांना पुण्यात आणून सर्व पुण्याच्या जहागीरीचा कारभार त्यांच्या-वर सोपवण्यात आला. बालपणीं शिवाजी खेळ खेळत असें, त्यातही दुष्टांचा नाश करुन किल्ले जिंकून घेण्याचा अंतर्भाव असे. वयाच्या १५ व्या वर्षीच शिवाजीने आपल्या सवंगड्यांची मोठी संघटना उभी करुन शंकराच्या देवळात हिंदवी स्वराज्यनिर्मितीची शपथ घेतली. त्यानुसार १६४६ साली राजगड व तोरणा हे दोन सुलतानशाहीतील किल्ले जिंकून स्वराज्याचे तोरण शिवबाने बांधले. शिवाजीच्या हालचालींवर नियंत्रण ठेवावे म्हणून १६४८ साली आदिलशहाने शहाजी राजेंना अटक केली. पण महान धूर्त शिवाजीने दिल्लीच्या बादशहाचा धाक दाखवून मोठ्या युक्तीने शहाजी राजेंची म्हणजे पित्याची १६४९ साली सुटका करवली. या घटनेनंतर थोड्याच दिवसानी त्यांनी समर्थांची भेट घेऊन स्वराज्यनिर्मितीच्या कार्यात विघ्न येऊ नये म्हणून त्यांचेकडून ईश्वरकृपेच्या आशेने अनुग्रह घेतला. १६५४ साली शिवाजीराजेंनी जावळी जिंकून १६५६ साली जावळीतील दादा चंद्रराव मोरे यास द्रोह केला म्हणून ठार मारले. १६५७

साली प्रतापगड बांधून १६५९ साली प्रतापगडाच्या पायथ्याला अफझलखानाचा वध केला. त्यानंतर मात्र आदिलशहाच्या व बादशहाच्या दरबारात शिवाजीबद्दल भीती व धास्ती निर्माण झाली. याच काळात शिवाजीने वाई ते कोल्हापूरचा सर्व मुलुख जिंकला. १६६१ साली शाईस्तेखानाची बोटे कापली. १६६५ साली पुरंदर किल्ल्याच्या युद्धात माघार घ्यावी लागल्याने दिलेरखान व मिर्जा राजेंशी तह करुन ते दिल्लीला औरंगजेबला भेटायला गेले. १६६६ साली त्यांची औरंगजेबच्या आग्रा येथील बंदीवासातून युक्तीने सुटका झाली. १६७४ साली शिवाजींना राज्याभिषेक होऊन ते अभिषिक्त राजे झाले. सम्राट झाले. त्यानंतर त्यांनी दक्षिणदिग्विजय साकार केला. १६८० साली त्यांचे रायगडावर निधन झाले.

**शिवसमर्थ योग– परस्परपूरक :**

भूगोलाच्या नियमानुसार दोन सूर्य एकत्र कधीही येत नाहीत, भेटत नाहीत, पण महाराष्ट्राच्या इतिहासात मात्र दोन सूर्य सतराव्या शतकात एकत्र आले. अध्यात्मविद्येचा ब्राह्मतेजविभूषित तेजोभास्कर समर्थ रामदास आणि राजनीती-मधील क्षात्रतेजाचा चंडप्रतापी सूर्य छत्रपती शिवाजी राजे हे दोघे १६४९ साली वैशाख शुद्ध नवमीला गुरुवारी दि. १२ एप्रिल रोजी एकमेकास भेटले. वस्तुत: ही भेट त्यांच्या कार्याला धरून, स्वाभाविकच आहे. समर्थांना ' बहुतचि सुकुमारा स्वस्थ नाही शरीरा । निशिदिनी जनचिंता लागलीसे उदारा । सकळ जन सुखावे हा कसा काळ फावे । भजन जन उकाळे सर्व आनंद फावे ।।' ही विश्वाची चिंता अगदी बालवयातच लागली होती. १६३२ ते १६४४ या काळात भारतप्रवास करताना देशाचे दैवदुर्विलासी चित्र पाहून समर्थांचा उर फाटला. ते व्याकूळ झाले. लोक हे सारे अन्याय व अत्याचार निमूटपणे सहन करतात, कारण त्यांच्या पाठीशी कुणी नाही हे समर्थांच्या लक्षात आले. त्यासाठी धर्माचा कैपक्षी राजा निर्माण होणे अत्यावश्यक आहे या सत्याचा साक्षात्कार त्यांना भारतप्रवासात झाला होता. स्वधर्माच्या संरक्षणाची शक्यता स्वराज्य निर्मितीनंतरच संभवनीय आहे, हे स्वराज्य–स्वधर्मसमन्वयाचे सूत्र त्यांना १६४४ च्या सुमारासच गवसले होते. त्याआधी, म्हणजे १६३१ साली नासिकजवळ टाकळी येथे समर्थ तपश्चर्या करीत असताना त्यांची व शहाजीराजेंची भेट झाली होती. सन १६२८ ते १६३२ या काळात जुन्नर व संगमनेरपासून नासिक–त्र्यंबकेश्वरपर्यंतची जहागीर शहाजी राजेंकडे होती. या काळात समर्थांची कीर्ती त्यांच्या कानावर गेली. विशेषत: १६२३ साली समर्थांनी मंत्रसामर्थ्याने एक प्रेत जिवंत केल्याने सपूर्ण नाशिक शहरात त्यांची ख्याती पसरली. १६३१ साली शहाजी राजेंची छावणी तीन महिने नासिक येथे होती. त्यावेळी शहाजी राजेंनी समर्थांची टाकळी येथे भेट घेतली होती. या सुमारास बाल शिवाजी एक वर्षाचा होता. शिवाजीकडून आपण हिंदवी स्वराज्याची निर्मिती करून घेणार आहोत हा

आपला मानस शहाजी राजेनीं समर्थांजवळ बोलून दाखवला होता. शहाजी व समर्थांची ही भेट शिवसमर्थ भेटीच्या दृष्टीने फार फार महत्वाची आहे असे मला वाटते. कारण १६४५ साली भारतप्रवास संपल्यावर, आपल्या राजकीय, सामाजिक व अध्यात्मिक कार्याला समर्थांनी सुरवात केली ती कराड, मसूर, चाफळ, कोल्हापूर या परिसरात. त्या काळी हा सारा परिसर शहाजी राजेंच्या जहागीरीतच होता. समर्थांनी प्रथम ११ मारुती स्थापन केले तेही शहाजी महाराजांच्या जहागिरीतच. कारण त्यावेळी हा प्रदेश स्वराज्यात आलेला नव्हता. ' अक्रा अक्रा बहु अक्रा । काय अक्रा कळेचिना । गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवनभुवनी ।।' याचा अर्थ तरी काय ? तात्पर्य, १६४५ साली समर्थांचे चाफळ खोऱ्यात स्थिरावणे ही १६३१ सालच्या शहाजी भेटीची फलश्रुती होती. स्वधर्मासाठी स्वराज्यनिर्मिती ही झाली समर्थांची बाजू.

इकडे शिवाजी राजेनी समर्थांची भेट होण्यापूर्वीच ४ वर्षे म्हणजे १६४५ सालापासूनच स्वराज्यनिर्मितीस प्रारंभ केला होता. ' प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । शाहसूतोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।' ही शिवाजीची राजमुद्रा १६४६ सालापासूनच वापरात आली होती. पण स्वराज्याच्या निर्मितीसाठी साधूसंतांची कृपा असावी असे शिवाजीला लहानपणापासूनच वाटत होते. ' हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा ' हे त्यांचे वाक्य सुप्रसिद्धच आहे. संत तुकाराम महाराजांची कीर्तने ऐकून त्यांचा ओढा धर्माकडे लहानपणीच निर्माण झाला होता. स्वराज्यनिर्मितीसाठी स्वधर्मजागरण आवश्यक आहे या सत्याचा साक्षात्कार शिवाजी राजेंना १६४५ सालीच झाला होता. मुळात, आपण राजा व्हावे व राज्यसत्ता भोगावी ही अभिलाषा शिवाजीना नव्हतीच. देशाच्या दुर्दशेमुळे व स्वकीयावर होत असलेल्या अन्यायामुळे त्यांचेही चित्त व्याकुळ झाले होते. शिवाजीच्या पराक्रमाच्या वार्ता समर्थांपर्यंत पोहोचत असल्याने शिवाजीला भेटण्यास तेही उत्सुक झाले होते तर इकडे आपल्या सामर्थ्याच्या चळवळीला भगवंताचे अधिष्ठान असावे म्हणून शिवाजीराजे समर्थांच्या दर्शनास उत्सुक झाले होते. थोडक्यात, स्वधर्माचे रक्षण व्हावे म्हणून स्वराज्यनिर्मिती व्हावी अशी आशा बाळगणारा योद्धा संन्यासी समर्थ रामदास व स्वराज्याच्या निर्मितीसाठी स्वधर्माचे अधिष्ठान शोधणारा संन्यस्त योद्धा छत्रपती शिवाजी यांची भेट; हा शिवसमर्थयोग, परस्परपूरक व प्रेरक असाच होता. शिवाजी ही सामर्थ्याची प्रचंड चळवळ होती तर, समर्थ हे या चळवळीला असलेलें भगवंताचे मोठे अधिष्ठान होते. देशासाठी देवकारण करणारे समर्थ व देवासाठी देशकारण करणारे शिवाजी किंवा राष्ट्राचे अध्यात्मीकरण करणारे समर्थ व अध्यात्माचे राष्ट्रीकरण करणारे शिवाजी यांची भेट म्हणजे स्वराज्याच्या तीर्थक्षेत्री गंगा-यमुना यांचा

संगमच होता. दोघेही महापुरुष स्वयंभू होते, अभिजात थोर होते. दोघांच्या चिंतेचा विषय होता राष्ट्र ! दोघांच्या ध्येयाचा व ध्यासाचा ध्रुवतारा होता मानवसमाज. तेव्हा एकाच ध्येयाने, ध्यासाने, विचाराने भारलेली, भरलेली व भारावलेली ही दोन महान अंतःकरणे एकत्रित येणं हा आम्हा देशबांधवांचा मोठा सुयोग म्हणावा लागेल. किंबहुना नियतीनेच हे नाट्य रचले असावे. जणु महाराष्ट्राच्या रंगभूमीवर स्वराज्याचे नाटकच आरंभिले होते. अनेक अंक आणि अनेक अंग असलेले हे स्वराज्याचे नाटक नियतीने निर्मिले होते. शिवाजी राजे या नाटकाचे प्रमुख अभिनेते होते तर समर्थ दिग्दर्शक होते. स्वराज्यनिर्मितीची सारी भिस्त होती प्रमुख अभिनेत्यावरती– शिवाजीवरती. अन् शिवाजीराजेंना दिलासा, मोठा आधार होता– दिग्दर्शकाचा, समर्थांचा. शिवाजी राजेंच्या निर्याणापर्यंत, अगदी शेवटपर्यंत त्यांनी शिवाजीला साथ दिली. समर्थांची कुबडी आणि शिवाजीची तलवार हा १७ व्या शतकातील अपूर्व योग होता, महान चमत्कार होता.

### शिवसमर्थ भेटीचा वाद

आपण पाहिले की समर्थ रामदास व छत्रपती शिवाजी या दोघांचे ध्येय राष्ट्र-केन्द्रीत आणि समाजाभिमुख असल्यामुळे दोघांची भेट परस्परपूरक ठरणारी होती एवढेच नव्हे, तर ह्या दोघांनी एकत्र येऊन धर्मजागरण व स्वराज्यनिर्मितीचे जे कार्य केले ते देशाच्या इतिहासातील गौरवाचे व अभिमानाचे पर्व ठरावे. ब्राह्मतेज व क्षात्रतेज एकत्रित आल्यास कोणता चमत्कार घडू शकतो हे उभयतांनी सप्रयोग सिद्ध केले. यावरुन चारही वर्ण एकाच छत्राखाली संघटीत होऊन सहयोगबद्ध झाल्यास राष्ट्राचे किती कल्याण होऊ शकेल याचा प्रयोग करण्याची प्रेरणा खरं तर या भेटीपासून मिळावी. पण झाले भलतेच. शिवसमर्थ भेट हा एक वादाचा विषय होऊन बसला. १६४९ साली समर्थांनी सिंघणवाडीस शिवाजीस अनुग्रह दिला याबद्दल इतिहास–संशोधकांना शंका आहे. ही शंका घेणाऱ्या शंकासुरांचे दोन वर्ग आहेत. त्यापैकी श्री. चिंतामण वैद्य व रे. डेमिंग यांच्या मते शिवसमर्थांची पहिली भेट १६५९ नंतर, म्हणजे अफझलखानाच्या वधानंतर झाली असावी. तर कै. चांदोरकर, कै. न. र. फाटक, श्री. बाबासाहेब पुरंदरे, श्री सेतुमाधवराव पगडी यांच्या मते समर्थ व शिवाजी यांची पहिली भेट सन १६७२ साली झाली व त्याच वर्षी शिवाजीने समर्थांकडून अनुग्रह घेतला. मात्र स्वामी विवेकानंद, लो. टिळक, भगवान श्रीधरस्वामी, प्राचार्य शिवाजीराव भोसले, कै. शंकर श्रीकृष्ण देव, कै. स. खं. आळतेकर, कै. शं. दा. पेंडसे, कै. पांगारकर यांच्या मते १६४९ सालीच दोघांची भेट झाली व त्याच वर्षी शिवाजीस समर्थांनी अनुग्रह दिला. मतामतांच्या ह्या गलबल्यातून सत्याचा शोध

घेण्यापूर्वी हा वाद का व कसा निर्माण झाला याचा उहापोह प्रथम करु, म्हणजे या वादाचा निर्णय लावणे सोपे जाईल.

## हा वाद निर्माण होण्याची कारणे

शिवसमर्थांची पहिली भेट १६७२ साली झाली असे प्रतिपादन करणाऱ्या मंडळींनी आपल्या मताचे समर्थन करताना ज्या कागदपत्रांचा आधार घेतला आहे व ज्या महत्वाच्या पुराव्यांकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष केले आहे ते सारे पाहिले म्हणजे असे वाटू लागते की, हा वाद शिवसमर्थभेटीचा नाही तर हा वाद श्रेष्ठकनिष्ठतेचा आहे. प्रश्न शिवसमर्थ भेटीचा नसून शिवाजी श्रेष्ठ की समर्थ श्रेष्ठ हा आहे. प्रश्न शिवाजीपासून समर्थांनी राजकारणाची प्रेरणा घेतली की समर्थापासून शिवाजीने स्वराज्याची प्रेरणा घेतली हा आहे. त्यात शिवाजी आणि समर्थ, दोघे जर एकाच जातीचे असते तर हा वाद लवकर संपुष्टात आला असता. पण दोघांच्या जाती भिन्न असल्यामुळे व जातीयता हा आमच्या समाजमनाला वा समाजजीवनाला लागलेला कलंक असल्यामुळे मूळ प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनला. केवळ दोन राष्ट्रीय पुरुषांपैकी कोण थोर आहे हे त्या प्रश्नाचे स्वरुप न राहता दोन जातींपैकी कोणती जात जास्ती महत्वाची व श्रेष्ठ आहे हा प्रश्न उपस्थित झाला. शिवसमर्थ भेट तर नाकबूल करता येत नाही, मग १६७२ साली ही भेट झाली असे म्हटले म्हणजे सत्याला पार बगल दिली असेही व्हायला नको व १६७२ सालीं शिवाजी महाराज जवळ-जवळ राजेपदाला पोहोचलेच होते. १६७४ सालीं तर त्यांना राज्याभिषेकही झाला होता. म्हणजे शिवाजीच्या स्वराज्यनिर्मितीत समर्थांना काही एक श्रेय देण्याचे कारण उरत नाहीं. केवळ भेटीच्या भाकरीचा एक तुकडा त्यांच्या चरित्राच्या ताटात टाकला म्हणजे पुरे. मग समर्थांनी राजकारणासंबंधी जे काही लिहिले ती सारी प्रेरणा त्यांना शिवाजीच्या पराक्रमापासून मिळाली. माझ्या मते, शिवाजी श्रेष्ठ की समर्थ श्रेष्ठ, स्वराज्यनिर्मितीत मुख्य वाटा शिवाजीचा की समर्थांचा हा प्रश्नच उपस्थित होण्याचे कारण नाही. दोन श्रेष्ठपुरुषांची तुलनाच होऊ शकत नाही. दोघेही स्वयंभू होते, आपापल्या परीने श्रेष्ठ होते. शिवाजीला स्वराज्याची प्रेरणा त्यांच्या मातेपासूनच मिळाली होती व समर्थांची १६४९ ला भेट होण्यापूर्वीच अनेकविध किल्ले जिंकून, स्वतःची राजमुद्रा तयार करून, त्यांनीं हिंदवी स्वराज्यनिर्मितीस प्रारंभ केला होता. तसेच समर्थांनीही शिवाजीची भेट होण्यापूर्वीच ठिकठिकाणी मठ स्थापन करून लोकजागरणाच्या कार्यास आरंभ केलाच होता. विशेषत: उत्तरप्रदेशातील त्यांचे सारे मठ १६३२ ते ३८ च्या दरम्यानचे असून बरीच मारुती मंदीरे १६३२ ते १६४८ या काळातली आहेत. याचा अर्थ दोघांनी हृदयस्थ नारायणाच्या

प्रेरणेने कार्यारंभ केला होता. सुदैवाने दोघे एका प्रांतातील, दोन नजिकच्या जिल्ह्यातील ( पुणे जिल्हा व सातारा जिल्हा ) असल्यामुळे परस्परांची कीर्ती परस्परांचे कानावर जाऊन त्यांच्या भेटी झाल्या व दोघांनी मिळून राष्ट्रोभारणी केली. यात श्रेष्ठकनिष्ठतेचा प्रश्न किंवा जातीयतेचे विष का पेरले जावे याचे कारण समजत नाही. ज्याप्रमाणे एखाद्या हरिजन वस्तीत काही हरिजनांच्या झोपड्या जाळल्या जाव्यात, किंवा काही हरिजन स्त्रीयांवर अत्याचार व्हावेत, संसदेमध्ये हा प्रश्न निर्माण व्हावा व शेवटी "दोन राजकीय पक्षातील भांडण" असे या घटनेचे विडंबनात्मक स्वरुप व्हावे व हरिजनांचा प्रश्न आहे तसाच भिजत घोंगड्यासारखा निरुत्तरीत राहावा तसे या वादाच्या बाबतीत झाले आहे. हा आता काही तथाकथित बड्या मंडळींचा 'प्रेस्टीज ईशु' झाला आहे. त्यामुळे तडजोडीच्या व विचारविनिमयाच्या शक्यता जवळजवळ संपुष्टात आल्या आहेत.

**शिवाजी राजेंवर झालेला अन्याय**

या ठिकाणी एक गोष्ट प्रामाणिकपणे नमूद करावीशी वाटते की समर्थकालीन तसेच समर्थोत्तर ज्या सांप्रदायीक चरित्रकारांनी समर्थचरित्रे लिहिली. त्यातील काही प्रसंग वाचले म्हणजे त्यांनी शिवाजीवर नकळत अन्याय केला आहे असे वाटते. शिवाजीवर अन्याय करावा हा हेतू ग्रंथकर्त्यांच्या मनात नसेल. पण तत्कालीन प्रथेला व परंपरेला अनुसरुन लिहित असताना, विशेषत: शिवाजी राजे समर्थांना खूप मानीत हे सांगताना त्यानी एवढी अतिशयोक्ती केली आहे की त्यामुळे शिवाजीच्या थोरवीला थोडेसे न्यूनत्व येते. शिवाजीराजेंच्या मनात समर्थांबद्दल नितांत आदर होता ही गोष्ट नि:संशय. पण हा मुद्दा वर्णन करताना चरित्रकारांनी काही प्रसंग असे रचले आहेत, की ते वाचल्यानंतर शिवचरित्रकाराना असे वाटावे, की ही सांप्रदायीक मंडळी समर्थांचे स्तोम माजवीत आहेत. उदाहरणादाखल मला खटकणारे दोनतीन प्रसंगोल्लेख करतो. समर्थांच्या वंशातील पाचवे पुरुष श्री हनुमंत स्वामी यांनी आपल्या बखरीत म्हटले आहे, 'दर गुरुवारी समर्थांच्या दर्शनास शिवाजीराजे येत असत. आठवड्याचे वृत्त त्यांना निवेदन करीत. व पुढील आठवड्यात काय करावयाचे यासंबंधी आज्ञा घेत.' काही मोक्याच्या व महत्वाच्या मोहीमेच्या वेळी शिवाजीराजे समर्थांना भेटून त्यांचा आशिर्वाद, तसेच सल्ला निश्चित घेत असतील. पण म्हणून दर गुरुवारी समर्थांना भेटून ते त्यांचेकडून आज्ञा घेत असतील हीं अतिशयोक्ती वाटते. थोडक्यात, हे संभवनीय वाटत नाही. तसेच समर्थकालीन सांप्रदायिक सत्पुरुष श्री गिरिधर यांनी आपल्या 'समर्थ प्रताप' नामक ग्रथात म्हटले आहे–

'समर्थे अफझलखानास मारविले । मग चाफळ देशी वास्तव्य केले ॥'

माझ्या मते, अफझलखान–वधापूर्वी समर्थ–शिवाजी यांची भेट होऊन

विचारविनिमय नक्की झाला असेल. 'दासबोधा'तील दशक १८ समास ६ हे प्रकरण तर शिवाजीला उद्देशून लिहिले असून तो समास खानाच्या वधाला अनुलक्षूनच आहे. 'विजापूरचा सरदार निघाला आहे' हे समर्थांचे सांकेतिक पत्र आजही उपलब्ध आहे. पण या साऱ्याचा अर्थ 'समर्थ अफझलखानास मारविले' असा होऊ शकत नाही. अफझलखान-वधाचे सारे श्रेय केवळ शिवाजी राजे यांचेच आहे. एवढेच नव्हे, तर हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीमध्ये शिवाजी राजेंचा सिंहाचा वाटा आहे. मात्र ह्या कामात त्यांना समर्थांचा सल्ला, समर्थांचे मठ व त्याहीपेक्षा समर्थांचे आशीर्वाद बरेच उपयोगी ठरले, आधारभूत ठरले. दासविश्रामधामातील एक कथा मनाला खटकते. एकदा शिवाजी राजे एकटे समर्थदर्शनास निघाले असता त्यांना मुसलमानी सैन्यांनी वेढा घातला. तेव्हा श्री समर्थांनी चमत्कार करताच शत्रुला शिवाजीबरोबर हजारो सैन्य आहेत असा भास झाला व त्यांनी धूम ठोकली. अशा प्रकारे समर्थांनी शिवाजीचे प्राण वाचवले. ही कथा संपूर्ण खोटी आहे असे माझे प्रामाणिक मन आहे. संत तुकारामांनी शिवाजीचे प्राण वाचवल्याचीही एक कथा तुकाराम महाराजांच्या चरित्रात आहे. पण ती कथाही वरील प्रमाणेच चमत्काराची असल्याने खोटी आहे. शिवाजी महाराजांना समर्थ व संत तुकाराम यांचे बद्दल आदर वाटण्यासाठी शिवाजीचे प्राण त्यांनी वाचवले पाहिजेत, असा दुराग्रह चरित्रकारांनी सोडावा. शिवाजीच्या थोर, महान व्यक्तीमत्वास बाधा आणतील अशा सर्व कथा साफ नाकारल्या पाहिजेत. या कथांचे लेखक सांप्रदायिक असले, साधू पुरुष असले तरी शिवाजी व रामदास या दोघांपेक्षा हे लेखक सामान्य होते, लहान होते हे प्रांजळपणे मान्य केले पाहिजे. समर्थांना शिवाजीबद्दल नितांत प्रेम होते व शिवाजींना समर्थांबद्दल खूप आदर होता हे सार घेवून बाकीची असार व अवास्तव कथानकें आपण टाळणे उभयपक्षी हितकारक ठरेल व यातच शिवसमर्थ या दोघांबद्दल यथार्थ आदरभाव प्रकट होईल असे मला वाटते. एवढेच नव्हे, तर कित्येकदा मनात अशी शंका येते की समर्थ चरित्रकारांनी शिवाजीवर केलेल्या अन्यायाचा सूड म्हणून तर हे शिवचरित्रकार दोघांच्या भेटीचे सन लांबवीत नसतील ? तसेच जर असेल तर शिवाजीचे चरित्रकार समर्थचरित्रकारांच्या चुकीची शिक्षा समर्थांना देत आहेत असा त्याचा अर्थ होईल. एवढे मात्र खरे, की या कथानकांमुळे शिवभक्तांची मने दुखावली जाणे शक्य आहे व म्हणून त्यांची भेट लांबणीवर टाकण्यापेक्षा ही कथानके आपण टाळली पाहिजेत. तसेच ही कथानके शिवाजीला कमी लेखण्याच्या हेतूने गुंफली गेली नव्हती तर तत्कालीन समाजरचनेचा तो परिपाक होता हे समजावून घेतले पाहिजे.

## शिवसमर्थभेटीच्या आक्षेपांचे खंडन

येथपर्यंतच्या विवेचनावरुन शिवसमर्थभेटीचा वाद कशा प्रकारच्या दूषित अंत:करणातून व विकृत विचारधारेतून निर्माण झाला हे आपण पाहिले. आता ही पहिली भेट व अनुग्रह १६४९ सालीच झाला याचे समर्थन करणारे जे ऐतिहासिक पुरावे आहेत त्याचा, तसेच ही भेट १६७२ साली म्हणजे एवढ्या उशीरा होणे शक्य नाही याचे काही ऐतिहासिक पुरावे व १६७२ साली भेट झाली या मताचे खंडन प्रस्तुत प्रदीर्घ परिच्छेदात करावयाचे आहे. भावनिक स्तरावर सद्य:परिस्थितीच्या अनुषंगाने शिवसमर्थ भेटीचा वाद आपण मिटवला. आता बुद्धीच्या निकषाने, संशोधकाच्या भूमिकेतून ह्या भेटीच्या वादाचे खंडन करू या. ही भेट १६७२ साली होणे अशक्य याचे पुरावे असे –

१) अनंत गोपाळ कुडाळकर हे शिवाजीच्या दरबारी वाकेनीस म्हणजे लेखनिक म्हणून काम करीत होते. त्यांनी समर्थांच्या निर्याणानंतर चवथ्याच दिवशी वाकेनिसी टिपणें लिहिली. ही एकूण ३९ टिपणे असून दिवाकर गोसावी यांच्या मदतीने त्यांनी समर्थांचे जीवनातील महत्त्वाचे ३९ प्रसंग नोंदले आहेत. सन १६४९ साली वैशाख शुद्ध नवमीस समर्थांनी शिवाजी राजेंना अनुग्रह दिल्याची नोंद या वाकेनिसी टिपणात आहे. श्री कुडाळकर हे समर्थकालीन असल्याने व समर्थ रामदासांच्या निर्याणानंतर ही टिपणे लगेच लिहिली गेल्यामुळे हा सन प्रमाण मानला पाहिजे. एक गोष्ट विचारात घेण्यासारखी आहे की समर्थ व शिवाजी यांच्या भेटीचा वाद निर्माण होण्याच्या २५० वर्षे आधी ही टिपणे लिहिली गेली आहेत. या वाकेनिसी टीपणात काही चमत्कार दिलेत म्हणून प्रतिहाससंशोधक ती मानत नाहीत. पण चमत्कारांचा सनावल्या खोट्या असण्याशी काय संबंध आहे हे समजत नाही.

२) संतश्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणजे शिवसमर्थ भेटीचा मूर्तिमंत पुरावा आहे असे मला वाटते. संत तुकाराम महाराजांची कीर्तने शिवाजीने बालपणीच ऐकली होती. शिवाजी महाराजांचा पिंड अध्यात्मिक असल्याने या कीर्तनाचा त्यांच्या बालमनावर निश्चितच चांगला परिणाम झाला असणार. सन १६४८ साली चिंचवड येथे मोरया गोसावी यांच्या घरी समर्थ रामदास व संत तुकाराम यांची पहिली व शेवटची भेट झाली होती. या प्रसंगी देशस्थितीसंबंधी थोडेतरी बोलणे झाले असावे. कारण समर्थांप्रमाणेच तुकाराम महाराजांना 'बुडते हे जन। देखवेना डोळा ।।' ही विश्वाची चिंता लागलेली होती. शिवाजी राजेंच्या स्वराज्य-निर्मितीच्या हालचालींची कल्पना समर्थांना संत तुकाराम महाराजांकडून मिळाली असणार. या भेटीनंतरच संत तुकाराम महाराजांनी छत्रपती शिवाजीना

समर्थांकडून अनुग्रह घेण्याचा सल्ला दिला. त्यावेळी समर्थांचे वर्णन शिवाजीजवळ करताना आपल्या अभंगात संत तुकाराम म्हणतात–

हुर्मुजी रंगाचा उंच मोतीदाणा । रामदासी बाणा या रंगाचा ।।१।।
पीतवर्ण कांती तेज अघटित । अवाळू शोभत भृकुटीमाजी ।।२।।
रामनाममुद्रा द्वादश हे टीळे । पुच्छ ते वळवळे कटीमाजी ।।३।।
कौपिन परिधान मेखळा खांद्यावरी । तुंबा कुबडी करी समर्थांच्या ।।४।।
काष्ठांच्या खडावा स्वामींच्या पायात । स्मरणी हातात तुळसीची ।।५।।
कृष्णेच्या तटाकी जाहले दर्शन । वंदिले चरण तुका म्हणे ।।६।।

हा अभंग १६४८ नंतरचा आहे. यानंतर दोनच वर्षांनी, म्हणजे सन १६५० साली संत तुकाराम सदेह वैकुंठाला गेले. त्यापूर्वी एकदा शिवाजी राजेंनी त्यांना पुण्याला आपल्या राजवाड्यात येऊन राहण्याची विनंती केली होती. त्यावेळी शिवाजीच्या या विनंतीपत्रास त्यांनी खालील अभंगाने उत्तर दिले–

राया छत्रपती ऐकावे वचन । रामदासी मन लावी वेगी ।।१।।
रामदास स्वामी सोयरा सज्जन । त्याशी तनमन अर्पी बापा ।।२।।
मारुती अवतार स्वामी प्रगटला । उपदेश केला तुजलागी ।।३।।
रामनाम मंत्र तारक केवळ । झालासे सीतळ उमाकांत ।।४।।
उफराटे नाम जपता वाल्मिक । झाला पुण्यश्लोक तत्कालीक ।।५।।
तोचि बीजमंत्र वसिष्ठ उपदेश । याहुन विशेष काय आहे ।।६।।
आता धरु नको भलत्याचा संग । राम पांडुरंग कृपा करी ।।७।।
धरु नको आशा आमुची कृपाळा । रामदासी डोळा लावी आता ।।८।।

१५ कडव्यांच्या या अभंगात शेवटी तुकाराम महाराज म्हणतात–
तुका म्हणे राया तुज असो कल्याण । सद्गुरुशरण राहे बापा ।।१५।।

तुकाराम महाराजांनी हा अभंग वैकुंठ गमनापूर्वी म्हणजे १६५० च्या फाल्गुन वद्य २ पूर्वी लिहिला असणार. या अभंगात त्यांनी तिसऱ्या कडव्यात शिवाजींनी समर्थांकडून उपदेश म्हणजे अनुग्रह घेतल्याचा स्वच्छ उल्लेख केला असून एकदा त्यांना गुरु मानलेत, आता आमची आशा बाळगू नका असे सांगितले आहे. याचा अर्थ शिवसमर्थ भेट तथा शिवाजीस समर्थांकडून अनुग्रह रामदास व तुकाराम यांच्या भेटीनंतर म्हणजे १६४८ नंतर व तुकाराम महाराजांच्या वैकुंठगमनापूर्वी म्हणजे १६५० पूर्वी झाला असावा. याचा अर्थ १६४९ हे वाकेनिसी टिपणातील सन खरे असलेच पाहिजे.

इतिहाससंशोधक तुकाराम महाराजांचे हे दोन्ही अभंग प्रक्षिप्त मानतात. पण तुकाराम महाराजांच्या प्रकाशीत अभंगगाथांमध्ये या दोन्ही अभंगांचा समावेश आहे. एखादा पुरावा सादर केला की केवळ प्रक्षिप्त आहे असे सरसकट विधान करून तो नाकारणे किंवा चमत्कार आहेत म्हणून संपूर्ण वाकेनिसी टिपण नाकारणे याचा अर्थ पूर्वग्रहदूषित मनाने एखाद्या घटनेचा अन्वयार्थ लावणे होय. आपल्याला अनुकूल तेवढे ओढूनताढून घ्यायचे व प्रतिकूल संपूर्ण त्याज्यच ठरवायचे. जणू प्रतिकूल पुराव्यांमधे काही तथ्य असणेच शक्य नाही. ' खरे तेच माझे' ही भूमिका सोडून ' माझे तेच खरे' ही भूमिका स्वीकारणे याला इतिहास म्हणावयाचे की इतिहासाचा उपहास म्हणावयाचे ?

३) सन १६५७ साली शिवाजी महाराजांनी प्रतापगड किल्ल्याचे बांधकाम केले. त्यावेळी किल्ल्यात प्रवेश करावयाचा मोठा समारंभ आयोजित केला होता. या समारंभासाठी ज्यांना निमंत्रित केले गेले त्याची अस्सल यादी साताऱ्याचे इतिहाससंशोधक कै. पारसनीस यांना प्रतापगड येथील देवीच्या पुजाऱ्याच्या घरी मिळाली. त्या यादीत पहिले नाव समर्थ रामदासांचे आहे.

४) निळोपंत मुजूमदार व बाळाजी आवजी चिटणीस हे शिवाजीराजेंचे अत्यंत निकटचे सहकारी होते. निळोपंतांचे चिरंजीव पंत अमात्य रामचंद्र यानी बावडे संस्थानची स्थापना केली. १९१५ साली या बावडे संस्थानचे वंशवृत्त प्रसिद्ध करण्यात आले. तत्कालीन अस्सल व ऐतिहासिक कागदपत्रांच्या सहाय्याने बावडे संस्थानचा संपूर्ण इतिहास लिहून १९१५ साली प्रसिद्ध केला गेला. यामधे छत्रपती शिवाजी, निळोजी मुजूमदार व बाळाजी आवजी या तिघांना १६४९ साली वैशाख शु. ९ ला अनुग्रह दिल्याची नोंद आहे. ही नोंद शिव-समर्थ भेटीचा वाद निर्माण होण्यापूर्वीची आहे हा पहिला मुद्दा व पंत रामचंद्र अमात्य हे जरी अनुग्रहीत घराण्यापैकी असले तरी केवळ समर्थ सांप्रदायी नव्हते. उलट ते शिवाजीराजेंच्या दरबारातील अत्यंत विश्वासू व जबाबदार अधिकारी होते. तेव्हा शिवाजीराजेंना कमी लेखून समर्थांचे अकारण स्तोम माजवण्यासाठी पंत अमात्यांचे वंशजांना असे काही करायचे कारण नाही. त्यांना शिवाजी व रामदास दोघेही सारखेच जवळचे. १६४९ सालापासून या बावडे संस्थानात रामोपासना चालत आली आहे, ती आजतागायत आहे.

५) सन १६५२ ते सन १६६० या काळात समर्थ रामदास स्वामी शिवथर घळीत दासबोध या ग्रंथाचे लेखन करीत होते. शिवथरघळ जावळीच्या खोऱ्यात मोडते. हे जावळीचे खोरे चंद्रराव मोरे यांच्या अखत्यारीतील होते. पण चंद्रराव मोरे स्वराज्य मानीत नव्हते. ते शिवाजीला राजे मानायला तयार नव्हते. त्यांचा ओढा अफझलखानाकडे होता. म्हणून समर्थ शिवथरघळीत

आल्यावर दोनच वर्षांनी म्हणजे १६५४ साली शिवाजीने जावळी जिंकून स्वराज्यात अंतर्भूत केली. हे रणकंदन झाले त्या जागेपासून १/२ मैलाच्या अंतरावर समर्थ दासबोध लिहित आहेत व शिवाजीराजेंना याची काही कल्पना नाही ही गोष्ट बुद्धीला पटत नाही. चंद्रराव मोरेवर हल्ला करण्यापूर्वी शिवाजीच्या हेरांनी एक तर सर्व जावळी खोऱ्याची पाहणी केली असणार. त्याहीपेक्षा, समर्थांनीच जावळी खोऱ्यात आल्यावर चंद्रराव मोरेच्या मनाचा ठाव घेवून पाहिला असणार व तो स्वराज्य व शिवाजी यांना मानीत नाही म्हटल्यावर समशेरीचा मार्ग अवलंबून शिवाजीने त्याचा काटा काढला असणार हे जास्त संयुक्तीक वाटते. रायगड, राजगड व तोरणा हे शिवाजीचे महत्वाचे तीन किल्ले समर्थांच्या शिवथरघळीपासून केवळ १०–१५ मैलांच्या टापूत असताना व समर्थ घळीत १६५२ ते ६० ही आठ वर्षे तिथे रहात असताना शिवाजीने त्यांची भेट घेतली नसावी हे तर्कविसंगत वाटते. आज आमच्या निधर्मी राज्यातले निधर्मी पंतप्रधानसुद्धा कांची कामकोटी शकराचार्यांच्या दर्शनासाठी वारंवार सवड काढतात व त्यांचेकडून आशिर्वादाची याचना करतात. मग शिवाजीराजे तर धर्मसंरक्षक होते. धर्माचे कडवे अभिमानी होते. त्यांच्या जावळी खोऱ्यात राहणाऱ्या साधुपुरुषाचे बद्दल त्यांना माहिती नसणे व त्यांनीं त्यांची साधी भेट देखील न घेणे बुद्धीला पटत नाही. आणि त्याच्याही पुढे जाऊन मी असे म्हणीन की १६७२ सालापर्यंत शिवाजीराजेंना समर्थांविषयी काही माहिती नव्हती असे म्हणणे म्हणजे एका दृष्टीने शिवाजीला कमीपणा आणणारी गोष्ट आहे. कारण सन १६४५ ते १६७२ पर्यंत, म्हणजे २७ वर्षे समर्थांचा शहाजीराजे यांच्या जहागिरीच्या प्रदेशात व शिवाजीच्या स्वराज्यात अंतर्भूत असलेल्या परिसरात स्वधर्मनिर्मितीचा व संवर्धनाचा उद्योग चालू होता व या २७ वर्षात एकदाही शिवाजीना समर्थांना भेटावेसे वाटले नाही असे म्हणणे किंवा त्यांना समर्थांबद्दल काही माहिती नव्हती असे म्हणणे म्हणजे शिवाजीच्या धर्मनिष्ठेवर व चतुरस्र नीतीवर किंवा डोळसपणावर अविश्वास दाखविणे आहे. विजापूरच्या दरबारातील आदिलशहाशीं एकनिष्ठ असलेल्या दियानतराव, बाजी घोरपडे या सरदारांनीं १६५० सालापासूनच चाफळच्या राममंदिरास जमिनी करून दिल्या व आदिलशहाकडून काही कायमचे उत्पन्न या मंदिराकरिता मिळवून दिले. याचा अर्थ आदिलशहाच्या दरबारी चाकरी करणाऱ्यांपर्यंत समर्थांची कीर्ती गेली पण स्वराज्याची निर्मिती करणाऱ्या शिवाजीराजेंच्या कानावर समर्थांची कीर्ती गेली नव्हती. किंवा कीर्ती ऐकूनही त्यांना समर्थांची भेट घ्यावी असे वाटले नाही. याचा अर्थ शिवाजी-राजेंना एकतर आपल्या राज्यात काय चालले आहे हे समजत नव्हते किंवा ते पहिले निधर्मी राजे होते असे तर या शिवशाहीरांना म्हणावयाचे नाही ना ?

आणि तसें म्हणायचेंच असेल तर मग या शिवचरित्रकारांपासून परमेश्वर शिवाजीचें रक्षण करो. तात्पर्य, सन १६४५ साली समर्थांनी स्वधर्म संवर्धनाचें कार्य शहाजीच्या प्रदेशात सुरू केल्यावर, तसेच त्याच सालीं इकडे शिवाजीने भगवा झेंडा फडकविल्यावर दोघांची कीर्ती परस्परांच्या कानावर जाऊन १६४९ साली दोघांनी एकमेकांची भेट घेतली असेल. पण केवळ हिंदवी स्वराज्यनिर्मितीच्या शिवाजीच्या प्रयत्नात समर्थांना श्रेय देण्याचे टाळण्यासाठी त्यांची व शिवाजीची भेट लांबवण्यात काय स्वारस्य ?

६) श्री. चिंतामण वैद्य व रे. डेमिंग यांच्या मते ही भेट १६५९ सालानंतर झाली असावी. आपल्या मताचे समर्थन करताना डेमिंग व वैद्य एका पत्राचा आधार घेतात. हे पत्र भास्कर गोसावी यांनी दिवाकर गोसावी यांना सन १६५८ साली लिहिले आहे. १६५८ साली चाफळच्या रामनवमी उत्सवासाठी शिवाजी राजेंकडून २०० होन आणण्यासाठी गेले असता शिवाजी महाराजांनी त्यांना 'समर्थ रामदास कोण ? ते काय करतात ? ते कोठे राहतात ?' असे प्रश्न विचारले, असे या पत्रात भास्कर गोसावी यांनी दिवाकरला लिहिले आहे. ज्याअर्थी १६५८ साली समर्थांविषयी शिवाजीराजे चौकशीवजा पत्र लिहितात त्याअर्थी १६५८ सालापर्यंत त्यांची भेट झाली नसावी व या पत्रानंतर लगेचच १/२ वर्षात म्हणजे ५९ किंवा ६० साली त्यांनी समर्थांची भेट घेतली असावी असे डेमिंग यांचे मत. याठिकाणी या पत्राचे नीट वाचन केल्यास एक गोष्ट लक्षात येईल की शिवाजीने विचारलेले प्रश्न दिवाकराला कळवताना भास्कर गोसावीनी ते मिस्किलपणे कळवले असून दोनशे होन देण्यापूर्वी, मी निश्चितपणे समर्थशिष्य असून समर्थांचाच माणूस आहे याची खात्री करून घेण्याच्या हेतूने शिवाजीने हे प्रश्न विचारले असा भाव या पत्रामधे दिसून येतो. कुणीही समर्थांचे नाव सांगून पैसे मागावेत व शिवाजी महाराजांनी समर्थांचे नाव ऐकताच काहीएक चौकशी न करता एकदम पैसे देवून टाकावेत एवढे शिवाजीराजे अंधश्रद्ध वा अव्यवहारी मुळीच नव्हते. १९६९ साली बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर लगेच काही महिन्यानंतर पंतप्रधानांचे नांव सांगून एका जणाने ६० लाख रुपये नेले व बँक मॅनेजरनी ते दिले. चौकशी अंती तो माणूस पंतप्रधानांचा नव्हता असे आढळले. हा सावळा गोंधळ शिवाजी महाराजांच्या राजवटीत नव्हता. २०० होन नेण्यासाठी आलेला भास्कर गोसावी निश्चित समर्थांचा माणूस आहे याची खात्री करून घेण्याकरिता शिवाजीराजे धूर्तपणे जणु आपल्याला समर्थांबद्दल काहीच ठाऊक नाही असा बहाणा करून त्याचेकडून समर्थांबद्दलची माहिती काढून घेण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे तो नेमका कोण याचीही कल्पना येईल व मग २०० होन देता येतील. मगाशी शिवथरघळ येथील १६५४ सालच्या रणकंदनाचा मुद्दा

विचारात घेता ही भेट १६४९ सालीच झाली असून भास्कर गोसावीचे पत्र हे काही फार मोठे भांडवल होण्याचे कारण नाही हे उघड आहे.

७) शिवसमर्थांची पहिली भेट १६७२ साली झाली असा ज्यांचा दावा आहे त्यांचा आधार म्हणजे केशव गोसावी यांनी दिवाकर गोसावी यांना लिहिलेले पत्र. या पत्राच्या एकमेव खांबावरती या आक्षेपकांचा विचारप्रासाद आधारभूत आहे. हा प्रासाद कोसळला की संपले ! सन १६७२ साली चैत्र वद्य द्वितीयेला केशव गोसावी दिवाकर गोसावी यांना चाफळहून पारगावला लिहितात– ' आपण पत्र पाठविले ते मिळाले. मजकूर समजला. रा. शिवाजीराजे भोसले हे समर्थांचे भेटीस येणार म्हणून लिहिले हे समजले. मी येणार होतो. परंतु माझी प्रकृती फार बिघडली. येणे होत नाही. मी इकडून आकास येणेसाठी लिहिले. परंतु अकाचेही येणे व्हावयाचे नाही. गावी भानजी गोसावी असतील. राजे यांची पहिलीच भेट आहे. वाडीचे लोक खटपटेस आणावे. उपयोग होईल. झाडो वहुत आहेत.' वगैरे...! या १६७२ सालच्या पत्रातील राजे यांची पहिलीच भेट आहे या वाक्याचे भांडवल करून शिवसमर्थांची पहिली भेट १६७२ साली झाली असे ह्या मंडळींचे म्हणणे. पण येथे एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की पारगाव येथील ही पहिली भेट आहे. शिवाजी व समर्थ यांची ही पहिली भेट आहे असा निष्कर्ष खोडसाळपणे काढला जातो. वस्तुत: पारगाव येथील ही दोघांची पहिली भेट आहे किंवा शिवाजीराजेंची पारगावला प्रथमच भेट आहे असा या वाक्याचा अर्थ होतो. या संदर्भात अलिकडचे एक उदाहरण देतो. १९७९ साली शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. शरद पवार बारामतीचे. मुख्यमंत्री झाल्यावर आपली जन्मभूमी बारामती येथे ते गेले, तेव्हा वर्तमान पत्रात अगदी ठळक अक्षरात पहिल्या पानावर बातमी छापली होती– ' मुख्यमंत्री शरद पवार प्रथमच बारामतीत.' या वाक्याचा अर्थ मुख्यमंत्री झाल्यानंतर शरद पवार प्रथमच बारामतीत जात आहेत असा घ्यावयास हवा. नाहीतर अजून ३०० वर्षानंतर ' शरद पवार मूळचे बारामतीचे नव्हते, मुख्यमंत्री झाल्यावर ते पहिल्यांदा बारामतीस गेले.' असा निष्कर्ष काढणे कितपत संयुक्तीक होईल? या पत्राचे संदर्भात आणखी एक अत्यंत महत्वाचा मुद्दा असा की १६७२ साली शिवाजी हे लोकप्रियतेच्या व वैभवाच्या सर्वोच्च शिखरावर होते. विशेषत: अफझलखान वध, शायिस्तेखानाची फजिती, सूरतची लूट व आग्र्याहून सुटका या प्रसंगांमुळे शिवाजीराजे एवढे लोकप्रिय झाले होते की शिवाजी प्रथमच समर्थांना भेटायला येत आहेत असे गृहीत धरल्यास केशव गोसावी, अक्काबाई या समर्थांच्या निकटवर्तीयांनी या प्रसंगी केवळ प्रकृतीच्या कारणावरून अनुपस्थित रहावे, शिवाजीराजेंना, भारतमातेच्या त्या थोर सुपुत्राला अगदी जवळून डोळे भरून पाहण्याची संधी केशव गोसावी व अक्काबाई सोडतील व अशा मोक्याच्या प्रसंगी

आम्ही येऊ शकत नाही असे मोघम कळवतील असे वाटत नाही. हे बुद्धीला पटतच नाही. इदिरा गांधी किंवा अटलबिहारी वाजपेयी यांची पुण्यात सभा आहे म्हटलं की पुण्याच्या ५० मैल परिसरातून लोक त्यांचे भाषण ऐकण्यासाठी रजा काढून स्वखर्चाने येतात. मग एवढा मोठा लोकप्रिय, धाडसी, शूर, चारित्र्यसपन्न, विवेकी राजा पहिल्यांदाच मठात येतो आहे व केवळ प्रकृतीचे मोघम कारण सांगून केशवस्वामी येणार नाही म्हणून कळवतात, अक्काबाई का येणार नाहीत याचे कारणही कळवीत नाही व एवढ्या मोठ्याच्या प्रसंगी येऊ शकत नसल्याबद्दल थोडीही दिलगीरी सबंध पत्रात कुठेही व्यक्त करीत नाहीत, याचा अर्थ शिवसमर्थांचे सबंध खूप जुने असून अनेकवेळा केशवस्वामींनी व अक्कास्वामीनीं त्यांना समर्थांकडे आले असता पाहिले असावे. म्हणून शिवाजींची ही भेट त्यांनी विशेष मनावर घेतलेली नाही. तात्पर्य, शिवाजीची पहिली भेट पारगावला आहे. झाडी बहुत आहेत, वाडीचे लोक खटपटीस आणावेत हे वर्णन पारगावशी निगडीत असून शिवसमर्थांची पहिली भेट १६४९ सालीच चाफळ येथे झाली असली पाहिजे. याबाबत आणखी एक महत्वाचा मुद्दा असा की १६७१ साली कण्हेरी येथील वासुदेव गोसावी यांच्या मठास शिवाजीराजेंनी दिलेली सनद सर्व इतिहास-संशोधकांना मान्य आहे. १६७१ साली शिवाजी समर्थशिष्याच्या मठास सनद देतात व १६७२ सालापर्यंत त्यांची व समर्थांची भेट देखील होत नाही हा मुद्दा तर्कविसगत वाटतो. त्यांचे व समर्थांचे खूप जुने संबंध विचारात घेऊनच समर्थ-शिष्यास ही सनद शिवाजीने देऊ केली आहे.

८) १६७४ साली छत्रपती शिवाजींना राज्याभिषेक झाला. याप्रसंगी रायगडावर फार मोठा सोहळा झाला. या प्रसंगाला समर्थ हजर नव्हते, यावरुन त्यांचे संबंध जुने नव्हते व नुकतीच १६७२ साली त्यांची भेट झाली होती म्हणून समर्थ राज्याभिषेक समारंभास गेले नाहीत असा दावा काही मंडळी करतात. या बाबतीत समर्थांची दिनचर्या व पिंड विचारात घेणे अत्यावश्यक आहे. समर्थ कोणत्याही समारंभाला कधीही हजर रहात नसत. 'दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पाहतो' ही त्यांची धारणा होती. जो माणूस स्वतःच्या लग्नाला देखील हजर नव्हता, त्याने राज्याभिषेकाला हजर रहावेच असा हट्ट कशासाठी ? 'उदंड करी गुप्तरुपे' किंवा 'भूमंडळी सत्ता चाले। गुप्तरुपे' किंवा 'इतुके होते परी धनी कोठे दृष्टीस पडेना' ही समर्थांची भावना व धारणा असल्याने ते शेवटपर्यंत लोकांच्या नजरेआड राहून काम करीत. त्यांचे नाते कर्मयोगाशी जडले होते, मान मरातब वा मोठेपणा यांचेशीं त्यांचा सुतराम संबंध नव्हता. शिवाजीराजे सुद्धा परमवैराग्यशील होते. केवळ लोकमनातील राष्ट्रप्रेम व अस्मिता जागृत करण्यासाठी त्यांनी

राज्याभिषेक करवून घेतला. राजसत्तेच्या हव्यासानें नव्हे, तर जनता जनार्दनाच्या कल्याणार्थ ते राजे झाले होते हे लक्षात ठेवले पाहिजे.

९) शिवसमर्थ संबंधावर प्रकाशझोत टाकणारा आणखी एक महत्वाचा, नव्हे अत्यंत महत्वाचा पुरावा म्हणजे सन १६७८ साली शिवाजी राजेंनी आश्विन शु. १० ला म्हणजे दसऱ्याला समर्थांना दिलेली सनद होय. ही सनद खुद्द शिवाजीराजेंची असून त्यात शिवाजीने समर्थांचे व त्यांचे संबंध कसे जुने आहेत व स्वराज्यनिर्मितीच्या कार्याला सुरुवात केली तेंव्हापासून आतापर्यंत, म्हणजे १६५० ते ७८ पर्यंत, त्यांना वेळोवेळी समर्थांचे कृपाशिर्वाद कसे मिळत गेले याचे अत्यंत स्वच्छ आणि मनमोकळे वर्णन स्वत: शिवाजी महाराजांनी केले आहे. ह्या सनदेची अस्सल प्रत आजही उपलब्ध असून सारे इतिहाससंशोधक ही सनद खरी आहे हे मान्य करतात. फक्त निष्कर्ष काढताना शिवसमर्थ संबंध जुने व प्रेमाचे आहेत असा निष्कर्ष न काढता 'ही तर शिवाजी महाराजांची नम्रता आहे, शिवाजीराजेंच्या मनाचा हा मोठेपणा आहे' असा निष्कर्ष काढतात. ही सनद वाचली म्हणजे असा निष्कर्ष काढणारे मन किती कोते व हेकेखोर असेल याची कल्पना येते. 'तुम्ही आम्हाला समर्थांबद्दल काहीही सांगू नका, आम्ही त्यांचेबद्दल काहीही ऐकून घेणार नाही' असा जणू चंगच या मंडळीनी बांधला आहे. कारण खुद्द शिवाजी-राजेंची सनदही ते डोळसपणे वाचायला तयार नाहीत. खुद्द शिवाजीराजे या ऐतिहासिक सनदेत समर्थांना लिहितात—

'श्री सद्‌गुरूवर्य श्रीसकलतीर्थरूप श्री कैवल्यधाम श्री महाराज श्री स्वामी सेवेसी,

चरणरज शिवाजीराजे यानी चरणावरी मस्तक ठेवून विज्ञापना जे मजवर कृपा करून सनाथ केले, की तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्म-स्थापना, देवब्राह्मणाची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळण रक्षण करावे, हे व्रत संपादन करून त्यात परमार्थ करावा, तुम्ही जे मनी धराल ते श्री सिद्धीस पाववील, त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट दुराढे लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करून राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशी स्थळे दुर्घट करावी ऐसे जे जे मनी धरिले ते ते स्वामींनी आशिर्वादप्रतापे मनोरथ पूर्ण केले. याउपरी राज्य सर्व संपादीले ते चरणी अर्पण करुन सर्वकाळ सेवा घडावी ऐसा विचार मनी आणिला तेव्हा आज्ञा जाहाली की, तुम्हास पूर्वी धर्म सांगितले तेच करावेत. तीच सेवा होय ऐसे अज्ञापिले' ... वगैरे ... !

या सनदेमधे केवळ नम्रताच आहे का ? वस्तुस्थिती काहीच नाही का ? शिवाजीराजे वस्तुस्थितीला बगल देवून नम्रता पाळीत होते का ? कुणाला

किती महत्व द्यावे व कुणाचा किती मान राखावा हे शिवाजीराजेंना समजत नव्हते का ? हिंदवी स्वराज्याची शिवाजी महाराजांनी निर्मिती केली ती नम्रतेच्या अतिरेकाने की स्वाभिमानसंपन्न समशेरीने ? वाचकांनी ही मूळ सनद वाचावी व ह्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या अंतरात्म्यास विचारावी म्हणजे तुमचे मनच तुम्हाला वस्तुस्थितीची साक्ष देईल.

१०) शिवसमर्थसंबंधावर प्रकाशझोत टाकणारी शिवाजीची सनद व त्यात खुद्द शिवरायांनी त्यांचे समर्थांबद्दलचे मत प्रांजळपणे कसे व्यक्त केले ते आपण पाहिले. आता शिवाजीराजेंच्याबद्दल समर्थांच्या मनात किती प्रेम व आदर होता यावर प्रकाशझोत टाकणारी समर्थांची दोन पत्रे आपण पाहू. त्यातील पहिले पत्र समर्थांनी सन १६४९ साली वैशाख शु. ८ ला खुद्द शिवाजीराजेंना उद्देशून लिहिले असून शिवाजीचा गौरव करताना समर्थ म्हणतात —

निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥१॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्वासी । तुळणा कैंची ॥२॥
यशवंत कीर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥३॥
आचारशील विचारशील । दानशील धर्मशील ।
सर्वज्ञपणे सुशील । सकळा ठाई ॥४॥
धीर उदार गंभीर । शूर क्रीयेसी तत्पर ।
सावधपणे नृपवर । तुच्छ केले ॥५॥
तीर्थक्षेत्रे मोडिली । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥६॥
देवधर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥७॥
उदंड पंडीत पुराणीक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायेक । तुमचे ठायी ॥८॥
या भूमंडळाचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही ।
महाराष्ट्रधर्म राहिला काही । तुम्हा करिता ॥९॥
आणिकही धर्मकृत्ये चालती । आश्रित होऊन कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ती । विश्वी विस्तारली ॥१०॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकास धाक सुटले ।

कित्येकास आश्रय जाले । शिवकल्याण राजा ॥११॥
तुमचे देशी वास्तव्य केले । परंतु वर्तमान नाही घेतले ।
ऋणानुबंधे विस्मरण जाले । काय नेणू ॥१२॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणे काय तुम्हाप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ती । सांभाळली पाहिजे ॥१३॥
उदंड राजकारण तुटले । तेणे चित्त विभागले ।
प्रसंग नसता लिहिले । क्षमा केली पाहिजे ॥१४॥

छत्रपतींची सनद व समर्थांचे हे पत्र, या दोन गोष्टी म्हणजे शिवसमर्थ यांच्या राष्ट्रकल्याणकारी, जनहितकारी युतीची दोन महान प्रतीके होय. समर्थांचे दुसरे ऐतिहासिक पत्र १६८१ सालचे आहे. शिवाजीराजांचे १६८० साली महानिर्याण झाल्यावर संभाजी राजांच्या स्वराज्यावर गदा आणू शकतील अशा काही हालचालींच्या वार्ता समर्थांच्या कानावर गेल्या. तेव्हा संभाजीची कानउघडणी करणारे पत्र समर्थांनी त्याला लिहिले. या पत्रात शिवाजीची पुण्यस्मृती स्मरताना समर्थ लिहितात–

' शिवरायास आठवावे । जीवित्व तृणवत् मानावे ।
इहलोकी परलोकी उरावे । कीर्ती रुपे ॥१६॥
शिवरायाचे आठवावे स्वरूप । शिवरायाचा आठवावा साक्षेप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ॥१७॥
शिवरायाचे कैसे बोलणे । शिवरायाचे कैसे चालणे ।
शिवरायाची सलगी देणे । कैसे असे ॥१८॥
सकळ सुखांचा त्याग । करुनी साधीने तो योग ।
राज्यसाधनेची लगवग । कैसी असे ॥१९॥
त्याहून करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष ।
या उपरी आता विशेष । काय लिहावे ॥२०॥

या पत्रातही समर्थ संभाजीस शिवरायाच्या असामान्य व लोकोत्तर कर्तृत्वाचे स्मरण ठेवून कृतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करावयास सांगतात. या पत्रात ज्या प्रमाणे त्यांचा निर्भिडपणा व देशप्रेम दिसून येते, त्याचप्रमाणे त्यांचा शिवाजी राजेंबद्दलचा आदरभावही प्रतीत होतो.

**या वादाचा समारोप–**

बंधूंनो आणि भगिनींनो, शिवसमर्थसंबंधाबद्दल विविध विद्वान मंडळींचीं काय काय मते आहेत, ती आपण विसरुन जावू या. शिवाजीने समर्थांना लिहिलेले पत्र व समर्थांनी शिवाजीला लिहिलेले पत्र हे आपण आपल्या

अंतर्यामीं बिबू देवू व दोघांनी एकमेकाबद्दल व्यक्त केलेला लेखीं आदर हाच या वादाचा समारोप समजू या. आपणास १७ व्या शतकात नियतीने ब्राह्मतेज व क्षात्रतेज यांच्या सुमधुर समन्वयाचा महान् चमत्कार दाखवला. आपणास नियतीच्याही दोन पावले पुढे जायचे आहे व एकाच छत्राखालीं चारही वर्णांचे सुसंघटीत असे संघबद्ध साम्राज्य या देशात निर्माण करावयाचे आहे. आज आपणास शिवाजीची राजनीती हीच आपलीं राजनीती बनवायची आहे व समर्थांचे आनंदवनभुवन ही रामराज्याची वहिवाट दाखवणारी गीता बनवायची आहे. आपणास मिळालेले स्वातंत्र्य टिकवले पाहिजे. त्यासाठी स्वातंत्र्यसंरक्षक शिवाजी हा आपला मानदंड ठरावा. तसेच या स्वातंत्र्याचे रामराज्यात रूपांतर होण्यासाठी समर्थांसारखे संत व त्यांची अध्यात्मनीती याचे अधिष्ठान आवश्यक आहे. याच्या जोडीला वैश्यांची वाणिज्यनीतीं व शूद्रांचा सेवाभाव यांची नितांत आवश्यकता आहे. किंबहुना आपल्या समाजरथाचे हे चार अश्वच आहेत. या चार अश्वातील सुसंवादाने समाजाचा रथ आनंदवनभुवनाकडे नेण्यासाठी महाराष्ट्राच्या रंगभूमीवरील या शिवसमर्थयोगाचे त्रिशताब्दी निमित्त आपणास पुन्हा एकदा स्मरण करावयाचे आहे व यातच श्री समर्थांना खरोखुरी श्रद्धांजली आपण अर्पण करणार आहोत.

या तर मग, ही यथार्थ श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आपण एकत्रीत येऊ या.

## जय जय रघुवीर समर्थ !

# दासबोध–
# समर्थांची मुख्य शिकवण

**–व. ना. वैद्य**

## श्री दासबोध नमन

।। गणेश: शारदा चैव सद्‌गुरु: सज्जनस्तथा ।।
।। आराध्यदैवतं गुह्य सर्वंमे रघुनन्दन: ।।
।। गणेश शारदा सद्‌गुरू । संत सज्जन कुळेश्वरू ।।
।। सर्वही माझा रघुवीरू । सद्‌गुरू रूपे ।।
।। माझे आराध्य दैवत । परमगुह्य गुह्यांतीत ।।
।। गुह्यपणाची मात । नमले जेथे ।।
।। यो जातो मरुदंशज: क्षितितले संबोधयन् सज्जनान् ।।
।। ग्रंथं यो रचयत् सुपुण्यजनकम् श्री दासबोधाभिधम् ।।
।। य: कीर्त्यां पठनेत सर्व विदुषाम् स्वान्तापहारी सदा ।।
।। सोऽयं मुक्तिकर: क्षितौ विजयते श्री रामदासी गुरु: ।।
।। मला वाटते अंतरी त्वां वसावें । तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावे ।।
।। अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा । महाराजया सद्‌गुरू रामदासा ।।
।। ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम् ।।
।। द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादि लक्षम् ।।

।। एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतं ।।
।। भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरूं तं नमामि ।।
।। गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर: ॥
।। गुरु: साक्षात् परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नम: ।।
।। अनेन प्रोयतां देवो भगवान् जानकीपति: ।।
।। श्री रामचंद्र: पूर्वेषाम् अस्माकम् कुलदैवतम् ।।
।। श्रोता वक्ता श्री राम समर्थ ।।
।। जय जय रघुवीर समर्थ ।।

श्री समर्थ रामदास स्वामींचे नांव माहीत नसलेला सुशिक्षित महाराष्ट्रीय सहसा आढळणार नाहीं. त्यांच्या मनाच्या श्लोकांपैकी दोनचार श्लोक, दासबोधांतील दहापांच वचने सर्वतोमुखीं असलेली प्रत्यही प्रत्ययास येतात. त्यांची करूणाष्टके म्हणजे सर्व साधक भक्तांची भावगीते आहेत. ईश्वरभेटीसाठीं अत्यंत आतूर झालेल्या जीवाचे ते आक्रंदन आहे. याशिवाय आत्माराम, ओवीशते, रामायण, लघुकाव्ये, स्फूटकाव्य, स्फूटश्लोक, हिंदी कविता, आरत्या, पदपदांतरे इत्यादि त्यांचा काव्यसग्रह प्रकाशित झालेला आहे.

या सर्व रत्नभांडारांत आकारानें व गुणवत्तेनें अजोड असणारा ग्रंथराज दासबोध म्हणजे वैजयन्ती मालेमधील कौस्तुभ मण्याप्रमाणे शोभणारा आहे, हे सत्य सर्वमान्य आहे. समर्थांनी आपले सर्व हृद्‌गत या ग्रंथराजांत प्रगट केले आहे. समर्थांनी स्वत:ला समर्थ असे कधीच म्हणवून घेतले नाही. सर्व शक्तिमान व सर्वसमर्थ रघुवीराचे ते दास होते. त्यांची सेवा केल्याने त्यांच्या कृपेने मला ज्ञान झाले, माझे महत्त्व वाढले, असे ते म्हणतात. त्या पतीतपावन सर्वोत्तमाचा दास म्हणवून घेण्यांतच या रामदासानें भूषण मानले. या दासाने केलेला बोध म्हणून त्यांच्या ग्रंथाला दासबोध हे नामाभिधान प्राप्त झाले असे म्हटले जाते. दासबोध हा समास आणखी अनेक रीतीनी सोडवला जातो. दासांचा बोधरूप ठेवा म्हणजे हा दासबोध किंवा दासासाठी केलेला बोध म्हणजे दासबोध अथवा दास हाच बोध, तो दासबोध अशा अनेक तऱ्हानी या समासाचा विग्रह केला जातो व ते सर्वही विग्रह सत्य आहेत, असे म्हणण्यास कांही प्रयवाय नाही.

समर्थांचे सर्वत्र वाङ्मय प्रेरक, प्रत्ययकारी व प्रासादिक आहे. ज्ञानदेव म्हणतात– वाचे बरवे कवित्व । कवित्वी बरवे रसिकत्व । रसिकत्वी परतत्व । स्पर्शू जैसा । । हा परतत्वाचा परीसस्पर्श ज्ञानदेवांच्या जसा प्रत्येक ओवीत जाणवतो, तसाच समर्थांच्याही प्रत्येक ओवीत प्रत्ययाला येतो. समर्थांनी प्रासादिक काव्याची व्याख्या करताना म्हटले आहे– देवाचेन प्रसन्नपणे । जेजे घडे बोलणे । तेते अत्यंत श्लाघ्यवाणे । या नावे प्रासादिक । (१४ । ३ । ६) भगवत् भक्तांच्या

भक्तीचे कौतुक म्हणजे प्रासादिक काव्य. ते काव्य निर्मळ, सरळ आणि प्रांजळ असले पाहिजे. तसेच ते कीर्तिवाड, रम्य, गोड व प्रतापविषयी जाड असले पाहिजे, असा प्रासादिक काव्याचा महिमा समर्थांनी गायिला आहे. या व्याख्येशी समर्थांची ओवी इमान राखणारी आहे. तसेच, कवित्व अक्षरबंद, पदबंद, छदबंद, चरणबंद व प्रबंधयुक्त असावे असे समर्थांचे कथन आहे. या सर्वामुळे कवित्वाला गेयतेची प्रशंसनीय जोड लाभते. संगीत कलेचे मर्म जाणणाऱ्या समर्थांना गायनांत गोडी होती.– 'धन्य ते गायनी कला' असा या कलेचा गौरव त्यांनी केला आहे. त्याशिवाय त्यानी संगीत गायन दे रे राम । आलाप गोडी दे रे राम । नृत्यकला मज दे रे राम । दस्तक ढाळी दे रे राम । असे मागणे प्रभू श्रीरामाकडें मागितले आहे, त्याना राग, ताल, नृत्य व वाद्य या संगीत कलेच्या अविभाज्य घटकांची स्वानुभवपूर्ण जाण होती. तसेच, भिन्न वेळी व भिन्न भिन्न प्रसंगी कोणते राग आळवावेत, याचे त्याना ज्ञान होते.

गिरीच्या मस्तकावरून जोराने खाली झेप घेणारा जलप्रपात ज्याप्रमाण कोणत्याही अडथळचाला न जुमानतां वेगाने धावत सुटतो, त्याप्रमाणे गिरीगव्हरांतील एकान्तात निवास करणाऱ्या समर्थांचा काव्यनिर्झर छंदबंद, व्याकरण इत्यादि मर्यादांचे उल्लंघन करून वेगाने खळाळत वहात असतो. त्यासाठी समर्थ कधी नवनवीन शब्दांचे प्रयोग करतात, तर कधी जुन्या परिचीत शब्दाना नवे रूप देतात. धबाबा तोय आदळे । कटकटी खटखटी रागे । चटपटी वटवटी सदा । चुर्चुरी चुर्मुरी रागे । व्यर्थ संसार जातसे । वीरजोर शीरजोर धक्कधिंग मारुती । इत्यादि शब्दप्रयोग ते सहज योजून जातात. समर्थांचा काव्यसंग्रह अगाध व अमर्याद असला तरी. विवेक वैराग्ययुक्त प्रपंच, परमार्थ साधावा ही त्यांची प्रधान शिकवण होती व ही शिकवण प्रामुख्याने दासबोधद्वारा त्यानी सामान्य जनतेपर्यंत पोचविली. त्या दासबोधाचा विचारच या ठिकाणी आपणास करावयाचा आहे.

**दासबोधाचे स्वरूप :**

आज दासबोध आपणास ज्या स्वरूपात उपलब्ध आहे, त्यात वीस दशक व दोनशे समास आहेत. तथापि, प्रारंभापासून अखेरपर्यंत क्रमशः तो एकाचवेळी लिहून पूर्ण झाला असे दिसत नाही. समर्थांचा अभ्यास करणाऱ्या अनेक विद्वानांचे मतें प्रथम एकवीस समासी दासबोध तयार झाला. एक ते सातपर्यंतच्या या सात दशकांत सुसूत्रता व यथोचित अनुक्रम आढळतो. याचवेळीं अथवा या आधीच आठवा ज्ञान दशक पूर्ण झालेला असावा. कारण, या ज्ञान दशकाचे उल्लेख इतरत्र आढळतात. या ज्ञान दशकालाच दासबोध या नांवाने संबोधीत असावे, असे दिसते. कारण, हे दासबोधी बोलिले । ज्ञानदशकी प्रांजल केले । असे म्हटलेले आढळते. किंबहुना समर्थांच्या सर्वच साहित्याला दासबोध ही संज्ञा

दिली जात असावी असे म्हणता येते. यानंतर समर्थांनी वेळोवेळीं सांगितलेलें आणि कल्याणानी लिहून घेतलेले स्फूट समास जोडून एकत्र करण्याची प्रक्रीया सुरू झाली. शिष्योत्तम कल्याण दौत, शाई, लेखणी व कागद घेवून समर्थांबरोबर ते जिथे जातील तिथे सदैव लेखनासाठी सिद्ध असत. समर्थांचा संचार यावेळी शहापूर, मसूरजवळील घळ, चाफळजवळील रामघळ, तारळयाजवळची व चद्रगिरीवरील घळ, हेळवाकची घळ व शिवथरची घळ आणि सज्जनगडावरील घळ या घळीतून कार्याच्या अनुरोधाने इच्छेनुसार होत असे. ही प्रक्रिया सुमारे दहा वर्षे सुरु असावी. शिवथर घळीच्या अत्यंत एकान्तात दासबोधाचे लेखन पूर्ण करावे अशी समर्थांची मनोमन इच्छा होती. परंतु त्यांच्या कार्याचा व्याप तोपर्यंत इतका वाढलेला होता कीं, त्याना असा निवांतपणा मिळणे शक्य नव्हते. ज्ञानदेवानी, नाथ महाराजानी आपल्या ग्रंथ समाप्तीप्रसंगी लेखनाच्या स्थलकालाचा निर्देश केलेला नाहीं. तथापि, सहाव्या दशकाच्या चौथ्या समासाच्या प्रारंभी त्यानी कलियुगाची गणना दिली आहे. त्याप्रमाणे कलियुगाची त्यावर्षी ४७६० वर्षे झालेली होती, म्हणजे त्या वर्षी शालिवाहन शके १५८१ येतो. तथापि, त्यावरून संपूर्ण दासबोध त्या वर्षी लिहीला गेला असे म्हणता येत नाही. तो समास अथवा फारतर तो दशक त्यावर्षी लिहून पूर्ण झाला असावा असे अनुमान करता येते. मात्र हे लेखन शिवथरच्या घळीत झाले असावे, कारण शिवथरच्या घळीनजीक असलेल्या बलवान चंद्रराव मोऱ्यांचा वध याच सुमारास शिवाजी महाराजानी केला आणि प्रतापगडावर अफझलखानाचा वधही याच वर्षी शके १५८१ मध्यें छत्रपतीनी केला. समर्थांचे शिवथर घळीतील वास्तव्य व या दोन मातब्बर बलाढ्य सरदारांचा शिवाजी महाराजांनी केलेला वध, यांचा अन्योन्य संबंध असला पाहिजे असे सूक्ष्म विचारांती ध्यानी येईल. समर्थांचा प्रत्यक्ष सहवास लाभलेले गिरिधर गोसावी समर्थ प्रतापांत स्पष्ट म्हणतात– समर्थे अकारपूर्वक यवनासि मारविले । मग चाफळ क्षेत्र उभे केले । छत्रपतींच्या जीवनातील अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी समर्थांच्या हालचालीचे सूक्ष्म निरीक्षण केले तर हा संबंध अनुमानाने अंतःकरणाला पटल्याशिवाय राहात नाहीं. शहाजी राजांच्या अटकेच्या प्रसंगीं, चंद्रराव मोरे व अफझलखानांच्या वध प्रसंगीं, पन्हाळयाच्या वेढयातून व आग्र्याहून सुटकेच्े प्रसंगीं, तसेच संभाजी राजे मोंगलाकडून अपमानीत अवस्थेत परत आले, त्या प्रसंगी समर्थांच्या सक्रीय सहकार्याचा अनुमानजन्य पुरेसा पुरावा उपलब्ध आहे.

समर्थांच्या या सततच्या हालचालीमुळें त्याना दासबोधाचे लेखन एके ठिकाणी बसून पुरे करण्याइतका निवांतपणा मिळणे असंभवनीय होते. त्यानी सांगितलेले स्फूट समास कल्याणस्वामीनी लिहून घेतले होते व ते पुन्हा

स्वच्छपणे लिहून एकत्रित करण्याचे काम शिरगाव येथील कल्याणांचे बंधू दत्तत्रेय स्वामी यांच्या मठात व चाफळच्या मठात सुरू झाले, असे दासबोधाचे वीस दशकी स्वरूप शके १६०० मध्यें पूर्ण झाले असे बहुतेक विद्वानांचे मत आहे. अर्थात, समर्थांची साक्षेपी दृष्टी या संपूर्ण दासबोधावर फिरलेली होती व त्यांच्या अनुमतीनेच ही पूर्ण प्रत तयार झाली. त्यानंतर या ग्रंथाचा प्रभाव अनेक भाविकांवर पडल्याने थोड्याच दिवसांत त्याच्या अनेक प्रती तयार झाल्या. समर्थस्थापित प्रत्येक मठात या ग्रंथराजाची प्रत असावयाचीच व अनेक इतर सांप्रदायिकाकडेंही या ग्रंथराजाची प्रत सुरक्षीत ठेवलेली असावयाची. पुढे मराठी राज्याला उतरती कळा लागली त्याबरोबरच समर्थस्थापित मठानाही अवकळा आली. अनेक मठांची नावनिशाणी ही उरली नाही. समर्थकाली या मठांची संख्या हजार अकराशेहे पर्यंत होती असे म्हटले जाते. परंतु आज त्यातील फक्त १० ते १५ मठ कसेबसे जीव धरून राहिलेले आढळतात. त्यातील डोमगांव येथील कल्याण स्वामींच्या मठात त्यांच्या स्वतःच्या सुंदर व स्वच्छ हस्ताक्षरांत लिहीलेली प्रत सुरक्षित ठेवलेली आहे. त्यावरूनच धुळयाचे सुविख्यात समर्थभक्त कै. शंकर श्रीकृष्ण तथा नानासाहेब देव यानी आपली प्रत तयार करून ती छापून स्वतःच्या दीडशे पानी प्रदीर्घ प्रस्तावनेसह प्रकाशीत केली. या शतकाच्या प्रारंभापासून सुरू झालेल्या ब्रिटीशविरोधी लढयात भारतातील क्रांतीकारकाना, सत्याग्रहीना या प्रस्तावनेसह ग्रंथराज दासबोध अत्यंत प्रिय व प्रेरक होवून राहिला होता. दासबोधातील प्रखर तेजस्विता, प्रयत्नवाद व प्रबोध यानी त्या काळचा नवयुवक भारून गेला होता. देशासाठी हसतमुखाने फाशी गेलेल्या अनेक क्रांतिकारक युवकांच्या हातांत भगवत्‌गीता व कंठांत दासबोधाची वचने होती. या स्वातंत्र्य-युद्धाच्या काळांत दासबोधाच्या स्मरणाने अनेक जीवने उजळून निघाली. त्यामुळे दासबोधाच्या अभ्यासाला गति मिळाली व देवानी प्रकाशित केलेल्या दासबोधाच्या अनेक आवृत्त्या व असंख्य प्रती संपूर्ण महाराष्ट्रभर विखुरल्या. जुन्या लोकप्रिय संत ग्रथांत अनेक पाठभेद आढळतात, तसे दासबोधातही ते आहेत. शिरगाव मठातील व डोमगाव मठातील दासबोध प्रतीतही खूप फरक आढळतो. समर्थ वाङ्मयाच्या अभ्यासकाला स्वतःच्या अंतःकरण प्रवृत्ती प्रमाण मानूनच यातील योग्य पाठ निश्चित करण्यासबंधीचा निर्णय करावा लागतो. दासबोधाची पोथी आम्ही गुंडाळून बांधून ठेवली, त्यातील तेजस्वी विचारांचे आम्हाला विस्मरण झाले, त्यावेळी पारतंत्र्याच्या शृंखलात आम्ही जखडले गेलो. दासबोधाच्या परिशीलनाने आमच्यातील निर्भयता, निस्पृहता व तेजस्वितेचा स्फुल्लींग प्रज्ज्वलीत झाला व धर्मासाठी मरावे, देशासाठी सर्व समर्पण करावे ही प्रेरणा निर्माण झाली. आजही ही भावना सतत जागृत ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. यासाठी दासबोधाचा अभ्यास व्हावयास हवा. उच्च आध्यात्मिक विचाराबरोबरच शुद्ध

नैतिक आचाराचा वस्तुपाठ देणारा ग्रंथराज दासबोध हा जीवनग्रंथ आहे. जीवनातील क्षुद्रता, संकुचितता, स्वार्थ, आळस, करंटेपणा यावर जोरदार प्रहार करून भव्यतेची, उत्कटतेची, उदात्ततेची साधना करून त्यांचा साक्षात्कार घडविण्याची शिकवण दासबोध सतत देत राहिला आहे. दीपस्तंभाप्रमाणे अनेकांचे पथ प्रदर्शन तो करीत आहे.

**दासबोधाचे प्रास्ताविक :**

समर्थांनी स्वतःच आपल्या ग्रंथाला प्रस्तावना लिहिली आहे. ही प्रस्तावना अनेकदृष्टीनी अपूर्व, अत्यंत मार्मीक, वस्तुनिष्ठ व समर्पक अशी आहे पूर्वसूरीनी अशा रितीने आपल्या ग्रंथाचे प्रास्ताविक केलेले कुठेच आढळून येत नाही. हे या प्रास्ताविकाचे आगळे वैशिष्ठ्य म्हणावे लागेल. हा ग्रंथ म्हणजे गुरु–शिष्यामधील संवाद आहे, हेही समर्थांनी या प्रास्ताविकेंत सांगून ठेवले आहे. वास्तविक. समर्थांना स्फुरलेला व कल्याणानी अक्षरांकीत केलेला हा ग्रंथ आहे, हे आपण जाणतो. संवादस्वरूप साधून ग्रंथाची परिणामकारकता वाढविण्याची ही परंपरा भगवान व्यासापासून सुरू झाली असावी अथवा त्या आधीही वेद, उपनिषत्काला-पासून सुरू झाली असावी असे दिसते. कृष्णार्जुनांच्या संवादरूपाने भगवत्‌गीतेची परिणामकारकता वाढली असल्याचे प्रत्ययास येते. त्याप्रमाणे ज्ञानदेवानीही आपल्या अप्रतिम गीताभाष्याला संवादस्वरूप दिले आहे. त्याचप्रमाणे समर्थांनी दासबोध हा गुरुशिष्य संवाद आहे, असे म्हटले आहे. निर्भय श्रोत्यानी निस्पृह समर्थांना प्रथमदर्शनीच प्रश्न विचारून गांगरवून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. श्रोते विचारतात, आपल्या ग्रंथाचे नाव काय आणि या ग्रंथात आपण काय सांगणार आहांत ? याचा सरळ अर्थ असा कीं, अध्यात्मपर अनेक ग्रंथ विद्यमान असताना आपण या ग्रंथाचा प्रपंच कशासाठी मांडीत आहात ? आणि यापुढचा श्रोत्यांचा सवाल तर बिनतोड व शुद्ध व्यवहारी स्वरूपाचा आहे. ते सरळसरळ विचारतात, तुमचा हा ग्रंथ ऐकल्याने आम्हाला कोणता लाभ होणार आहे ? समर्थांनी या तीनही प्रश्नाना कसलीही बगल न देता अथवा काही लपवालपवी न करतां स्पष्ट व सडेतोड अशी उत्तरे दिली आहेत. त्यांनी सांगितले, या माझ्या ग्रंथाचे नांव दासबोध असे आहे. या ग्रंथांत मी भक्तीमार्ग विशद करून सांगितला आहे. या ठिकाणी मला नवविधा भक्ती, ज्ञान व या दोन्ही योग साधनेसाठी अत्यंत आवश्यक असणारे वैराग्य या बहुविध अध्यात्माचे निरूपण करावयाचे आहे. एवढा तपशील पुरेसा न वाटल्याने या संक्षेपाचा आणखी विस्तार करताना समर्थ सांगतात, ईश्वर लाभासाठी काही निश्चित स्वरूपाचा अनुभव माझ्या गांठी आहे, या निश्चयात्मक गोष्टींचे व्याख्यान मी आपणापुढे करावयाचे योजिले आहे. या निश्चित तत्वामध्यें मुख्य भक्ती, शुद्ध ज्ञान, आत्मस्थिती, शुद्ध उपदेश, सायोज्य

मुक्ती, मोक्षप्राप्ती, अलिप्तपणा, विदेह स्थिती, देवभक्ती, जीव शीव, ब्रह्ममाया, कर्ता कोण व आपण कोण या निश्चयाबरोबरच नाना उपासना, कवित्व व चातुर्य-लक्षण सांगून अनेक मतांचा विचार मांडून त्यांच्या आशंका व संशयाचे निराकरण करण्याचा या ग्रंथांत मी प्रयत्न केला आहे. या दासबोधांत समाविष्ट केलेल्या व समर्थांनी स्वमुखाने सांगितलेल्या विषयांची ही अनुक्रमणिका पाहिली तर कोणाही श्रोत्याच्या मनांत हा ग्रंथ परमार्थपर व भक्तीचे माहात्म्य प्रस्थापित करणारा आहे, याबद्दल संशय राहू नये. तथापि, संशयविषाचा एक थेंबही श्रोत्यांच्या चित्तात राहू नये यासाठी समर्थ स्पष्टपणाने पुन्हा एकवार सांगतात कीं, भक्तीचेनि योगे देव । निश्चये पावती मानव । ऐसा आहे अभिभाव । इये ग्रंथी । । दासबोध हा ठोंशास ठोसा देवून व आपल्या शत्रूचा गुप्तपणे काटा काढून सुखी प्रपंचाची तरफदारी करणारा ग्रंथ आहे, असा सार्वत्रिक भ्रम आहे. चांगले सुशिक्षितही या भ्रमाला बळी पडलेले दिसून येतात. त्यानी हे ग्रंथगर्भीचे प्रास्ताविक उघड्या डोळ्यांनी व खुल्या अंत:करणाने कसलाही पूर्वग्रह न बाळगतां ध्यानी घेतले तर दासबोधाचे खरे खरे मर्म त्यांचे हाती येईल. या अनुक्रमणिकेमध्ये दोनच विषय असे आहेत की, ज्याना प्रपंचाचा थोडाफार वास लागला आहे. ते विषय म्हणजे चातुर्य व कवित्वलक्षण हे होत. या दोन लक्षणांचा विचार करीत असतानाही ईश्वर लाभाचे ध्येय समर्थांच्या दृष्टी समोरून कधीच ढळले नव्हते, असे दिसून येईल. कवित्व लक्षणासंबंधी सांगावयाचे तर ज्या प्रासादिक कवित्वाला सर्वश्रेष्ठ स्थान देऊन समर्थांनी त्याचे माहात्म्य वर्णन केले आहे, ते प्रासादिक कवित्व भक्तीच्या व वैराग्याच्या सामर्थ्याने भगवंताची प्राप्ती करून देणारे असले पाहिजे, असे स्पष्टच म्हटले आहे. चातुर्य लक्षणासंबंधी चिंतन केले तर असे दिसून येईल कीं मानवातील उच्चयावत सद्गुणांचा समावेश समर्थांनी चातुर्य या एकाच शब्दांत केला आहे. एवढ्याशा बीजात जसा प्रचंड वृक्ष सामावलेला असावा, अदृश्य मनांत जसा साऱ्या ब्रम्हांडाचा पसारा समाविष्ट असावा तसा चातुर्य या शब्दांत सर्व सद्गुणांचा पसारा एकत्रित झाला आहे. चातुर्याच्या खुणा चतुर मानवच जाणू शकेल, असा निर्वाळा देवून १४–६ व १५–१ या दोन समासात समर्थांनी या खुणा प्रगट केल्या आहेत. त्यांत सर्व भार यावरच आहे कीं, दुसऱ्याचे अंत:करण जाणून त्याला सुखी करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करणे, हेच चातुर्य व या चातुर्यानेच आपले वित्त शृंगारले जाते, हा स्वानुभव त्यानी कथन केला आहे. ते सांगतात–

जीव जीवात घालावा । आत्मा आत्म्यात मिसळावा । राहराहों शोध घ्यावा । परांतराचान १५ । १–४६. भेटभेंटो उरी राखणे । हे चातुर्याची लक्षणे । मनुष्यमात्र उत्तमगुणें । समाधान पावे । १५–१–३५ । चातुर्य श्रृंगारे अंतर। वस्त्रे श्रृंगारे शरीर ।

दोहीमध्ये कोण थोर । बरे पाहा । १४-६-१८ । म्हणोन दुसऱ्यास सुखी करावे । तेणे आपण सुखी व्हावे । १४-६-२३. शहाणे करावे जन । पतित करावे पावन। सृष्टीमध्ये भगवत्‌भजन । वाढवावे । १४-६-३३ । जीवनपथ प्रदर्शक मैलाच्या दगडाप्रमाणें चातुर्याच्या खुणा समर्थांनी या रितीने ठायीठायी रोवून ठेवल्या आहेत. अध्यात्माबाहेरील चातुर्य व कवित्व या लक्षणानाही त्यानी परतत्वाचा परीसस्पर्श घडविला आहे. तरीही आम्ही समजतो की दासबोध ही यशस्वी संसाराची गुरुकिल्ली आहे व यशस्वी संसार हाच दासबोधाचा प्रतिपाद्य विषय आहे. चातुर्यामधेच अंतर्भूत असणाऱ्या राजकारण, कीर्तन, लेखन, प्रत्यय, प्रयत्न, विवेक इत्यादि लक्षणांचा विचार आपणास पुढें करावयाचाच आहे.

आतां श्रोत्यांचा तिसरा प्रश्न आहे, तुमचा दासबोध ग्रंथ श्रवण केल्याने आम्हाला कोणते फळ प्राप्त होईल ? गुरू सांगेल ते मुकाटपणाने ऐकून मान डोलावणारे व जे श्रवण करण्याचे भाग्य प्राप्त झाले, त्याबद्दल गुरूची मुक्तकंठाने प्रशसा करणारे असे गुरुनिष्ठेची झापड लावून अंध बनलेले हे शिष्य दिसत नाहीत, म्हणूनच त्यानी तुमचे ग्रंथाच्या श्रवणाने आमचा कोणता लाभ होईल ते प्रथम सांगा असा रोकडा सवाल समर्थांना केला आहे, व समर्थांनीही रोख शब्दात चोखपणे प्रत्युत्तर देवून श्रोत्याना निरुत्तर केले आहे. कारण परमार्थ हा विषयच असा आहे कीं, इथे उधारीचे कामच नाहीं. सारा रोकडा व्यवहार आहे, अशी समर्थांची परखड भावना आहे.

**दासबोधाची फलश्रुती :**

बहुतेक सर्व देवदेवतांच्या स्तुतीपर स्तोत्रांची, व्रत महिम्यांची, पौराणिक चरित्रांची सांगता श्रवणफल सांगून केली जाते व हे श्रवणफल एक साच्याचे भौतिक लाभ दर्शविणारे असेच असते.

पुत्रार्थी लभते पुत्रं, धनार्थी लभते धनम् । या स्वरूपाचे अथवा या सारखेच धनधान्य, पशुवृद्धी, पुत्रपौत्र समस्तही । पावती रूपविद्यादी स्तोत्र पाठे करूनिया । अशी श्रोत्यांची वा पाठकांची मनोकामना पूर्ण करणारी फलश्रुती सर्वत्र आढळून येते. समर्थांनी याही बाबतीत आपले वेगळे वैशिष्ठ्य राखले आहे. ते सांगतात, या ग्रथाच्या श्रवणाने मनातील संशयाचे निर्मूलन होवून आचारात परिवर्तन घडून येईल. कठोर साधना केल्यावाचून सुगम मार्गाने सायोज्यमुक्तीचे मर्म हस्तगत होईल. अज्ञान, दुःख व भ्रांती नाहींशी होवून ज्ञानप्राप्ती होईल. योग्यांचे परमभाग्य असे वैराग्य अंगी बाणेल व विवेकासह चातुर्य समजून येईल. भ्रांत, अवगुणी आणि अवलक्षणी असलेले या ग्रंथाच्या श्रवणाने सुलक्षणी, धूर्त व विचक्षण होवून प्रसंग जाणतील. आळशी, साक्षेपी होतील. पाप्याना पश्चाताप होवून व भक्तीमार्गाचे निंदक असलेले वंदन करू

लागतील. बद्ध, मुमुक्षू होतील, मूर्ख अतिदक्ष होतील व अभक्तही भक्तीमार्गाने मोक्ष प्राप्त करून घेतील. पतित तेच पावन होतील, श्रोत्यांचे दोष नाहीसे होवून त्याना उत्तम गती प्राप्त होईल. या ग्रंथाच्या ठिकाणी पूर्ण भाव असेल तर अधोगती टळून मनाला पूर्ण विश्रांती व समाधान प्राप्त होईल, अशी या ग्रंथाची फलश्रुती समर्थांनी स्वमुखाने वर्णिली आहे.

या फलश्रुतीमध्येही समर्थांचा भर भक्ती व मुक्ती यावरच अधिक आहे. तसा त्यानी या ठिकाणी आळस, मूर्खता, संदेह, भ्रम,. इ. अवगुणांचा निर्देश करून ते अवगुण या ग्रंथश्रवणाने नाहीसे होतील, असा विश्वास व्यक्त केला आहे. तथापि, ईश्वरलाभाच्या ध्येयावरून त्यांची दृष्टी किंचितमात्रही ढळलेली नाहीं, हे दासबोधात सर्वत्र प्रत्ययास येते. त्यांच्या दासबोधातील तीन महावाक्यांची निवड करावयाची झाली तर पुढील वचने शिरोधार्य मानावी लागतील असे मला वाटते.

१) स्वये तूंचि आहेसी ब्रह्म । २) पहावे आपणासी आपण । ३) स्वरुपी राहणे हा स्वधर्म ।

यातील पहिले वचन पाचव्या दशकातील शुद्ध ज्ञाननिरूपण नावाच्या सहाव्या समासातील आहे. या ठिकाणी म्लानवदन व अनन्यशरण, सत्‌शिष्याने सद्‌गुरुचरण दृढ धरल्यानंतर सद्‌गुरुनी या शुद्ध ज्ञानाचा उपदेश केला आहे. तो कृपाळूपणे व शिष्याचे जीवन कृतार्थ व्हावे, या शुद्ध हेतूने स्फुरलेला आहे, ती संपूर्ण ओवी अशी आहे.

ऐक शिष्या येथींचे कर्म । स्वये तूंचि आहेसी ब्रह्म । ये विषयी संदेह भ्रम । धरुंचि नको ॥ ५-६-४५ ।. दुसरे वचनही याच समासातील पहिल्या ओवीतील आहे. ती संपूर्ण ओवी अशी आहे.

ऐक ज्ञानाचे लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पहावे आपणासी आपण । या नाव ज्ञान ।। ५-६-१ ।. आत्मज्ञानाखेरीज बाकीच्या सर्व विद्या म्हणजे पोट भरण्याची साधने आहेत. ते सर्व अज्ञानच आहे, असा समर्थांचा स्पष्ट अभिप्राय आहे.

तिसरे वचन आठव्या ज्ञान दशकातील नवव्या सिद्ध लक्षणाच्या समासातील आहे. सकल धर्मांमध्ये धर्म । स्वरुपी राहणे हा स्वधर्म । हेचि जाणिजे मुख्य वर्म । साधु लक्षणाचे । ८-६-६४ ।. हा सर्व दशकच ज्ञानाचे निरूपण करणारा असल्याने समर्थांचे सारे हृद्‌गत त्यात प्रगट झाले आहे.

यावरून समजून येईल की इतर परमार्थपर ग्रंथाप्रमाणे दासबोधाची फलश्रुती ही शीघ्रचि येथे ज्ञानप्राप्ती । हीच आहे. ज्ञानदेवांनी भगवतगीते-

संबंधी असेच म्हटले आहे. येथ अविद्यानाश हे स्थळ । तेणे मोक्षोपादान फल । या दोहीं केवळ । साधन ज्ञान ।। १८-१२४३. हे इतुलेचि नानापरी । निरूपिले ग्रंथ विस्तारी । ते आता दोहीं अक्षरी । अनुवादावे ।। १२४४. याप्रमाणे गीतेचीही फलश्रुती अविद्येचा नाश होवून ज्ञानाची प्राप्ती व्हावी हीच आहे. तत्वज्ञान व तात्पर्य या बाबतीत गीता व दासबोध या ग्रंथाची एकवाक्यता आहे, असेच दिसून येते.

**दासबोधाचे संदर्भ अथवा आधार ग्रंथ :**

समर्थांच्या दासबोध प्रास्ताविकाचे आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे त्याला आधारभूत असलेल्या संदर्भग्रंथांची समर्थांनीं स्वतःच दिलेली यादी. समर्थांच्या पूर्वीच्या इतर संतांच्या परमार्थपर ग्रंथात अशा तऱ्हेचा निर्देश आढळून येत नाही. या यादीत समर्थांनी वेद, वेदान्त, उपनिषदे, भगवद्‌गीता व भागवत या प्रमाणभूत सुप्रसिद्ध ग्रंथांबरोबरच शिवगीता, रामगीता, गुरुगीता, गर्भगीता, उत्तरगीता, अवधूतगीता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, गणेशगीता व यमगीता इत्यादि गीतांचा उल्लेख केला आहे. हे सर्व ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत. पंचवटीतील तपश्चर्येच्या काळात समर्थांनी नाशीक येथील पंडितांच्याकडे या ग्रथांचे अध्ययन केले असले पाहिजे. वाचलेल्या ग्रंथातील मर्म ग्रहण करण्याची त्यांची ग्रहणशक्ती व स्मरणशक्तीही किती तीव्र होती, हे त्यांनी दासबोधांत या गीतांच्या केलेल्या मार्मीक उल्लेखावरुन स्पष्ट दिसून येते. या सर्व अकरा संदर्भ गीतांची सविस्तर माहिती समर्थांचे भाष्यकार डॉ. शं. दा. पेंडसे यानी आपल्या 'राजगुरु समर्थ रामदास' या सुप्रसिद्ध ग्रंथात दिली आहे. या गीता कुठेकुठे आढळतात ते सांगून त्यातील कोणत्या वैशिष्ठ्यासाठी समर्थांना त्या प्रिय असाव्यात याचे मार्मीक दिग्दर्शन त्यानी केले आहे. या अप्रसिद्ध संस्कृत गीतांचा संदर्भ समर्थांनी दिला आहे. त्याखेरीज रामायण व महाभारत हे सर्व भारतीयांच्या अंतःकरणाचा ठाव घेणारे व त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेले ग्रंथ समर्थांनाही मनापासून प्रिय होते. रामायण म्हणजे तर त्यांचा केवळ प्राणच होता. त्याची स्वहस्ते तयार केलेली एक प्रत त्यांच्याजवळ सतत असे व त्यावर – रामेण रामदासेन लिखितम् – अशी त्यानी स्वतःच्या हस्ताक्षरांत मुद्राही उठविली आहे, असा समर्थ भक्त कै. नानासाहेब देव यानी उल्लेख केला आहे. या सर्व संदर्भ ग्रंथापैकी भगवद्‌गीतेचे संदर्भच सर्वाधिक आहेत, हेही या संदर्भात अवश्य ध्यानात घेण्याजोगे आहे. या संदर्भ यादीत समर्थांनी कोणत्याही प्राकृत ग्रंथाचा निर्देश केला नाही. तथापि, ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी, नाथ महाराजांची भागवताच्या एकादश स्कंधावरील टीका, मराठीचे आद्य कवि मुकुंदराजांचा विवेकसिंधू, दासोपंताचा ग्रंथराज व त्र्यंबकरायांचा

बालबोध यांचा सूक्ष्म अभ्यास त्यानी केल्याच्या खुणा दासबोध अभ्यासकास आढळून येतात. या संतांचे इतर वाङमय व इतरही प्राकृत संतांचे साहित्य समर्थांच्या अभ्यासातून सुटले नसावे. या सर्व ग्रंथांच्या सम्मतिपूर्वी आत्मप्रचिती समर्थ प्रमाणभूत व प्रमुख मानीत असत, हे स्पष्ट आहे. अशी ही अपूर्व, वेगळी व वैशिष्ठ्यपूर्ण प्रस्तावना समर्थानी सादर केली आहे. ज्ञानदेवानी ज्याप्रमाणे ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी श्रीगणेशाचे अत्यंत सुंदर, रसपूर्ण व अभिनव पद्धतीनें स्तवन करून अभ्यासकांचे चित्त जिंकून घेतले आहे, त्याप्रमाणेच या अभिनव प्रतिभासंपन्न प्रास्ताविकाने समर्थांनी वाचकांना आकर्षून तर घेतले आहेच पण त्याबरोबरच दासबोधाचे सार त्यांच्या हातीं अलगदपणे देवून ठेवलेले आहे.

**दासबोधातील स्तवन :**

दासबोधाच्या प्रथम दशकातील सर्वोत्कृष्ट प्रास्ताविकाच्या प्रथम समासानंतर दुसऱ्या समासापासून क्रमाने श्रीगणेश, शारदा, सद्‌गुरु, संत, श्रोते, कवेश्वर, सभा, परमार्थ व नरदेह यांचे स्तवन करणारे नऊ समास आहेत. म्हणून या दशकाचे नाव स्तवन नाम असे ठेवले आहे. यातील काही स्तवनें अत्यंत रसपूर्ण व विनीत आणि प्रतिभायुक्त अशी आहेत. प्रथमच ज्या भीममूर्ति व महाप्रचंड, भव्य अशा श्रीगणेशमूर्तीचे स्तवन केले आहे. ती प्रसन्नवदन नृत्य करीत असलेली सुलक्षण, साजिरी गणेशमूर्ती शिवथरच्या घळीत समर्थांनी प्रतिष्ठापित केली होती. बराच काळ ती त्या ठिकाणी असावी. आज मात्र तिच्या अस्तित्वाच्या काही खुणा त्या ठिकाणी दिसत नाहीत. या चतुर्भूज मूर्तीच्या चार हातात परशु, अंकूश, कमळ व मोदक धारण केलेले आहेत. रत्नखचीत सुवर्णाचा मुकूट मस्तकावर असून कानात नीलमण्यांची कनककुंडले चमकत आहेत. कंबरेभोवती सजीव नाग टकमक सगळीकडे पहात वेटोळे घालून बसला आहे. शिवाय नुपुरांच्या घागऱ्यांचा मंदध्वनी नृत्य करताना तालबद्ध सुरांत ऐकू येत आहे, असे हे ध्यान आहे. वेदमाता व सर्व विश्वांची जननी जी शारदा तिचे स्तवन तिचाच अंश अशी जी माझी वाणी त्या वाणीने मी करतो असे तिसऱ्या समासांत समर्थांनी म्हटले आहे.

चौथ्या समासातील सदगुरुस्तवन हेही अत्यंत नम्र भावनेने केलेले त्यांच्या सदगुरु निष्ठेचे मूर्तिमंत प्रतिक आहे. सदगुरुचे वर्णनच होवू शकत नाहीं, हेच त्यांचे वर्णन असे त्यानी शेवटी म्हटले आहे.

म्हणौनि सदगुरु वर्णवेना । हेगे हेचि माझी वर्णना । अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती । १–४–३१ ।

कवेश्वरीचे स्तवनही असेच अत्यंत सरस व विलक्षण परिणामकारक आहे, त्याचा प्रारंभच असा बहारीचा आहे.

आता वंदू कवेश्वर। शब्दसृष्टीचे ईश्वर। नातरी हे परमेश्वर। वेदावतारी ।। १-५-१. सरस्वतीचे निजस्थान, कलांचे जीवन, पुरुषार्थाचे वैभव, शब्दरत्नाचे सागर, बोलके चिंतामणी, ज्ञानीयांचा परमार्थ, योगियांचा गुप्तपंथ, श्रुतीचा भावगर्भ, मुमुक्षाचे अंजन, लक्ष्मीचा शृंगार, देवांचे रूपकर्ते, अमृताचे मेघ, नवरसाचे ओघ असे हे कवेश्वर सृष्टीचा आधार आहेत. ते नसते तर जगोद्धारच झाला नसता, एवढ्या प्रभावी, गौरवपूर्ण शब्दांत कवींचे स्तवन पूर्वी कधी झाले नाही व पुढेही होणार नाहीं. संत, श्रोते व सभा स्तवनांत सर्व सज्जनाना समर्थांनी प्रेमभावाने वंदन केलेले आहे.

सर्व योगामध्यें अत्यंत समर्थ असा परमार्थ व अपूर्व आणि धन्यधन्य असा नरदेह यांचेही स्तवन समर्थांनी अत्यंत रेखीव व अलंकारयुक्त अशा शब्दानी केलेले आहे.

दासबोधाच्या प्रारंभीच केलेल्या या अपूर्व, अप्रतिम प्रास्ताविकानंतर आणि अत्यंत विनीत अशा स्तवनानंतर दासबोधाचा गाभा व प्रमुख शिकवण काय आहे, हे पहावयाचे आहे. हे पहात असताना आपणास हे प्रथम ध्यानात घ्यावयास हवे कीं, प्रत्येक वाङमयकृतीचे परिशीलन करताना ती कृती निर्माण करणाऱ्या ग्रंथकर्त्याच्या चरित्राचा व स्वभाववैशिष्ठ्यांचा मागोवा आपणास घ्यावयास हवा. संत वाङमयाबद्दल तर हे निखालस सत्य आहे. कारण ते त्यांच्या प्रत्यक्ष अनुभूतीतून व प्रत्ययातून अवतरलेले असते. ज्या अर्थाने ज्ञानदेवानी भगवद्‌गीतेस भगवान श्रीकृष्णाची वाङमयमूर्ती असे म्हटले आहे त्याच अर्थाने दासबोध ही समर्थांची वाङमयमूर्ती आहे. तथापि असे अनुमानानें बोलण्याचे कारणच नाहीं. समर्थांनी आपल्या जीवनाच्या अखेरच्या क्षणी आपल्या अनुयायाना स्पष्ट शब्दांत सांगून ठेवलेले आहे–

आत्माराम दासबोध। माझे स्वरूप स्वतः सिद्ध। असता न करावा हो खेद। भक्तजनी। म्हणून समर्थचरित्राचा अभ्यास करावयाचा असेल तर पुन्हां दासबोधाकडेच वळावे लागेल. दासबोधाइतका त्यासंबंधीचा विश्वसनीय पुरावा आणखी कोणताही असू शकणार नाहीं, असे सर्व समर्थ अभ्यासकानी निश्चित व एकमुखी प्रतिपादन केले आहे. याची दोन कारणे संभवतात. पहिले कारण असे कीं, निष्काम कर्मयोग्याच्या अलिप्ततेचा, अनासक्तीचा समर्थ हे मूर्तिमंत आदर्श असल्याने, मी संप्रदाय वाढवला, मी असंख्य मठ स्थापन केले, शिवरायाना अनुग्रह दिला इत्यादि गोष्टी ते स्वमुखाने सांगतील किंवा स्वशिष्यांच्या मुखाने वदवतील हे कदापि संभवनीय नाहीं. मोठेपणाचा किंवा प्रसिद्धीचा वासही स्वतःला लागू नये, यावर त्यांचा कटाक्ष होता. त्यासाठीच त्यानी सांगून ठेवले आहे–

उदंड करी परी गुप्तरुपे। भिकाऱ्या सारिखा स्वरुपें। तेथ यश कीर्ति प्रतापें। सीमा सांडिली। जातो स्थळ ते सांगेना। सांगितले तरी तेथे जायेना। आपुली स्थिती अनुमाना। येवोचि नेदी। अशारतेचे बोलो नये। बोलायाचे लिहो नये। लिहायाचे सांगो नये। जबाबीने।. अशा स्थितीत त्यांच्या हालचालींचा, कर्तृत्वाचा लेखी पुरावा काही सापडणे संभवनीय नाही. दुसरे कारण असे कीं, दासबोधामध्ये प्रत्ययावाचून एक अक्षरही लिहिलेले नाही, अशी ग्वाही त्यांनी अनेकवार दिली आहे. हे तो प्रचीतीचे बोलिले। आधी केलें मग सांगितले।। प्रचितीवीण जें बोलणे। ते अवघेचि कंटाळवाणे। तोंड पसरोनि जैसे सुणें। रडोन गेले। ९–५–१५. प्रत्ययावाचून सर्व अंधःकार, वक्ता प्रत्ययाचा पाहिजें इत्यादि त्यांची वचने दासबोधाच्या पानापानावर आढळून येतील. याच चष्म्यातून आपण पाहू लागलो म्हणजे समर्थचरित्राचा चित्रपट दासबोधाच्या निःस्पृह, महन्त, उत्तम पुरुष, चातुर्य इत्यादि लक्षणांच्या समासामधून आपल्या दृष्टीसमोर उलगडू लागतो व त्यातून प्रगट झालेले समर्थचरित्र अत्यंत विश्वसनीय असल्याची मनोमन साक्ष पटते.

समर्थांचे व्यक्तिमत्व वरवर विरोधी भासणाऱ्या अनेक आश्चर्यकारक सद्‌गुणांच्या मिश्रणाने बनलेले अद्‌भूत रसायन होते. ईश्वरी प्रतिभेने निर्माण केलेला मानवी देहाकारातील हा दिव्य चमत्कार होता. मानसशास्त्राच्या कोणत्याही ठोकळेबाज सिद्धांतांत न सामावणाऱ्या या विलक्षण व्यक्तिमत्वाची मूस विधात्याने लगेच मोडून टाकल्याने यासारखे व्यक्तिमत्व अद्यापतरी निर्माण झालेले दिसत नाहीं. तथापि, त्यामुळेच ते इतके वादग्रस्त बनले आहे व तेच तेच वाद पुन्हापुन्हां उकरून काढून चघळण्यात विद्वानांना कसलातरी विलक्षण आनंदाचा अनुभव येत असावा. गेल्या ५०–७५ वर्षात जातीयवादाचे विषारी गरळ या वादांत मिसळल्यामुळे हे व्यक्तिमत्व अधिकच विवाद्य बनले गेले आहे. वास्तविक छत्रपति शिवराय व समर्थ रामदास स्वामी यांच्यातील परस्पर प्रेमभाव व अकृत्रिम जिव्हाळा केवळ अवर्णनीय आहे. एकाच दिव्य तेजाचे हे दोन ईश्वरी अंश होते. त्यांच्या धवल कीर्तिध्वजाला जातीयतेचा रंग देऊ पहाणे म्हणजे चोख शंभर नंबरी सुवर्णाला चांदीचे पाणी देण्यासारखा मूर्खपणा आहे. सुदैवाने उभय जातीमधील थोर विचारवंतानी या प्रकारांचा निषेध केला आहे व त्यामुळे नवीन पिढीला या दोन युगपुरुषांची जीवनचरित्रे निर्विकारी व निःपक्षपाती खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक नजरेतून पहाण्यास सहाय्य होत आहे.

समर्थांच्या जीवनात प्रवृत्ती व निवृत्ती यांचा मणिकांचन संयोगाप्रमाणे मनोज्ञ संगम घडून आला आहे. हा आदर्श भारतीयाना तसा नवीन नाही.– तेन त्यक्तेन भूंजीथाः। या उपनिषदातील मंत्राने पुरस्कारलेला, भगवान श्रीकृष्णानी

योगस्थ: कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय । या वचनाने उपदेशिलेला निष्काम कर्मयोगी हा या आदर्शाशी एकरूपच आहे, असे आपणास दिसून येईल. समर्थांचे वैराग्य धगधगीत अग्नीप्रमाणे प्रखर होते. त्यांचा एकांतवास ध्यानयोगी साधकानेही हेवा करण्यासारखा होता. त्यांची अनासक्ती अथवा अलिप्तता (निर्लेपता) आकाशानेही अनुकरण करण्याजोगी होती. इतके असूनही त्यांच्या ठिकाणी प्रचंड प्रबोधशक्ती होती. उदंड संघटनासामर्थ्य होते. या सामर्थ्याच्या बलावर त्यानी मोठमोठी कार्ये अंगावर घेऊन ती सहज लीलेने पार पाडली. त्यांच्या साक्षात्काराचे त्यानी तेजस्वी शस्त्र बनवले व त्याला क्रियाशीलतेची तीक्ष्ण धार देवून ते शस्त्र त्यानी परजले. सबंध महाराष्ट्रभर या शस्त्राने विलक्षण प्रभुत्व व प्रभाव गाजवल्यामुळेच महाराष्ट्र धर्माच्या विजयदुदुभी सर्वत्र निनादत राहिल्या. गुरुदेव रानडे यानी समर्थांच्या साक्षात्कारवादाला क्रियाशील साक्षात्कारवाद अशी संज्ञा दिली आहे, ती अत्यंत उचित व यथार्थ आहे.

समर्थांच्या या प्रचंड कार्यशक्तीचे रहस्य त्यांच्या विविध सद्गुणात शोधावे लागेल. १) त्यांचा उपजत उद्यमशील स्वभाव, २) तीर्थाटनकाळांत अनुभवलेली समाजस्थिती व ३) त्यांची तीन दैवते.

उद्योगप्रियतेची दैवी देणगी समर्थांना उपजतच प्राप्त झालेली होती. आळस, दुश्चितपणा यांचा ते तीव्र तिरस्कार करीत. प्रारब्धावर विसंबून स्वस्थ राहाणे त्याना कदापि मान्य नव्हते. बालपणींच्या त्यांच्या गोष्टीत एका रात्रीत मित्रांच्या सहकार्याने सोपा बांधून तयार करणे, ताकाच्या मडक्यानी स्वैपाकघर भरून टाकणे, खळयावरून धान्याच्या गोणी घरी आणून टाकणे, इत्यादि गोष्टी त्यांच्या उद्यमप्रियतेची साक्ष देणाऱ्या आहेत.

**समाजस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण :**

दासबोधात ठिकठिकाणी त्यांच्या सूक्ष्म समाजनिरीक्षणाचा प्रत्यय येतोच. तथापि, त्या काळच्या समाजस्थितीवर विदारक प्रकाश टाकणारी दोन स्फूट प्रकरणे समर्थांनी लिहिली आहेत, ती म्हणजे १) अस्मानी सुलतानी व २) जनस्वभाव गोसावी. अस्मानी सुलतानीमध्येच परचक्र निरुपणाचा अंतर्भाव आहे. अस्मानी म्हणजे दुष्काळ, अवर्षण, टोळधाड इत्यादि दैवी आपत्ती आणि सुलतानी म्हणजे परकीय शिरजोर राज्यकर्त्यांनी केलेली लूटमार, स्त्रिया पळवणे, भ्रष्टवणे, मंदिर– मूर्तींचा विध्वंस, कडयावरून लोटून देणे, नाक कान कापणे, अपानी मेखा मारणे, तुरुंगांत डांबणे, पाण्यात बुडवणे इत्यादि अनेक प्रकारचे आघात. दासबोधाच्या तिसऱ्या दशकाच्या आदिभौतिक ताप लक्षणात या सर्वांचे वर्णन समर्थांनी केले आहे. या आपत्तीमुळे जीव नकोसा होवून लोक आत्मघाताला कसे प्रवृत्त होतात, त्याचे हृदयद्रावक वर्णन अस्मानी

मुलतानी प्रकरणात मुळातूनच वाचले पाहिजे. परचक्र निरुपणामध्येही पदार्थमात्र तितुका गेला । नुस्ता देशीच उरला. अंथरायला नाहीं, पांघरायला नाहीं, रहायला घर नाहीं, एक एक पैशासाठी लोक मारामारी करतात, वतनासाठी आपसात झगडून मोंगलांची गुलामी पत्करतात, सर्व समाज स्वाभिमानशून्य झाला आहे, असे त्या काळीचे वास्तव दर्शन समर्थांनी घडविले आहे. जनस्वभाव गोसावी– या प्रकरणात भोंदू गुरु व त्यांचे धूर्त व मतलबी शिष्य यांचे मर्मावर नेमके बोट ठेवून त्याना आपल्या भात्यातील भयंकर भेदक अशा वाग्बाणानी त्यानी रक्तबंबाळ करून सोडले आहे. हे शिष्य आपल्या गुरुंचा मोठेपणा सांगत असताना आमचे गुरु विष्ठा खातात, तिथेच लोळतात, ओकलेले खातात, चमत्कार दाखवतात, असल्या तऱ्हेचे लोकविलक्षण बोलतात. लोकविरुद्ध वागणारे व करामती करून दाखविणारे ते मोठे गुरु अशी त्याकाळी समजूत होती व आजही ती तशीच आहे. सर्व समाजाला विपरीत वळण लावणाऱ्या भोंदू गुरूवर समर्थांनी भुंकणारे गाढव, माजलेला बोका, रेडा, वसवसणारे श्वान अशा शेलक्या पुष्पांजलीचा वर्षाव केला आहे. त्या कालच्या बुद्धिमान ब्राह्मण वर्गानेही आचारविचार सोडला होता, याचेही तीव्र दुःख त्याना होते. क्षुद्र स्वार्थासाठी धर्मांतर करुन यवनांचे दास्य या वर्गाने स्विकारल्याची उदाहरणे पाहून समर्थांचे करूण हृदय द्रवून गेले व समाजातील अनीति, अन्याय, स्वार्थ, दंभ दूर करण्यासाठी चंदनाप्रमाणे झिजून जीवापाड कष्ट करण्याचे या विरक्त महात्म्याने ठरविले. त्यासाठी त्यानी जागोजागी बल व बुद्धिसंपन्न बलभीमाची मंदिरे स्थापन केली. त्यागी, निरपेक्ष, निस्पृह युवकांची प्रचंड संघटना उभारली. हजार अकराशे मठ निर्माण करून समर्थ संप्रदायाचा दिगन्त विस्तार केला. श्री रामरायाची चाफळ येथे प्रतिष्ठापना करून श्री रामजन्माचा महोत्सव सुरू केला. त्यांच्यातील प्रवृत्तीचा आविष्कार अशा अनंत रूपानी प्रगटला.

**समर्थांची तीन शक्तीसंपन्न दैवते :**

प्रभू श्रीराम हे समर्थांचे आराध्यदैवत होते. त्यांच्या मातापित्यानी घराण्यांत पूर्वीपासून चालत आलेली सूर्योपासना अत्यंत निष्ठेने चालविल्यामुळे सूर्यदेवता त्यांच्यावर प्रसन्न झाली व तिने दिलेल्या वरामुळेंच त्याना दोन पुत्र झाले. समर्थांचा जन्म तर प्रभू श्रीराम जन्मले त्या तिथीला व नेमका त्यावेळेलाच झाला, हे ध्यानात घेण्याजोगे आहे. जांबेस श्रीराम व हनुमान यांची मंदिरे आहेत. समर्थांच्या श्रीरामोपासनेचा श्रीगणेशा बालपणी या मंदिरातच झाला. प्रभू श्रीरामानी आपल्या चौदा वर्षांच्या वनवासापैकी बहुतेक काळ नाशीकजवळ पंचवटीत पर्णकुटीत घालविला, त्यामुळेंच समर्थांनी आपल्या तपश्चर्येसाठीं त्याच

स्थानाची निवड केली. तीर्थाटनाच्या बारा वर्षांच्या काळातही समर्थ श्रीरामाच्या अयोध्येत अधिक काळ राहिले. नंतरच्या काळात श्रीरामाचे एकमेव मंदिर त्यानी चाफळ येथे स्थापन केले व प्रतिवर्षी श्रीरामाचा जन्मोत्सव वाढत्या वैभवाने व उत्साहाने साजरा व्हावा व तो अखंड सुरू रहावा अशी दक्षता त्यानी घेतली. श्रीरामाच्या स्वरूप-साक्षात्कारासाठी त्यानी घरादाराचा, जन्मभूमीचा, स्वजनांचा, जन्मदात्या जननीचाही त्याग केला. त्यासाठी त्यानी प्राणार्पणाचीही सिद्धता ठेवली होती. रामाच्या वियोगाची कल्पनाही त्याना सहन होत नव्हती. रामावेगळे जिवलग कोणीही नव्हते. देव म्हणिजे आपुला प्राण। प्राणासी न करावे निर्वाण।। अशी त्यांची भावना होती. रामा तुझा वियोग। नको रे हा प्रसंग। तुजसाठी सर्वसंग। त्याग केला।। समर्थांची करूणाष्टके म्हणजे त्यांच्या आर्त जीवाची श्रीराम भेटीसाठी होणारी तडफड. पाण्यावाचून तडफडणाऱ्या माशाच्या जीवनाशीच त्याची तुलना होवू शकेल. या दैवतावर त्यांची नितांत श्रद्धा व दृढविश्वास. प्रभू श्रीरामाच्या केवळ नामस्मरणाने श्री शंकरांचा कंठ शीतल झाला. त्यांच्या पदरजाच्या स्पर्शाने अहिल्या उद्धारली, पाषाण तरले, अशा सर्वसमर्थ प्रभू श्रीरामाच्या सेवकाकडे वक्रदृष्टीने पाहणारा या त्रिभुवनात कोणीही नाही, अशी त्यांची स्वानुभवाची साक्ष आहे. सर्व देवाना रावणाच्या बंदीवासातून सोडविणारा हा देवाधिदेव सर्व देवाहून श्रेष्ठ आहे, अशी त्यांची पूर्ण श्रद्धा आहे. त्यांच्या वाङमयात पदोपदी श्री रामाचा गौरव व गुणगान आहे. श्रीराम व हनुमान यांच्या अलौकिक व अत्यद्भूत पराक्रमाचे व विजयश्रीचे वर्णन करणारी रामायणाची सुंदरकांड व युद्धकांड अशी दोनच कांडे समर्थांनी लिहिली. त्यातील प्रत्येक शब्द म्हणजे अग्निस्फुल्लींगाप्रमाणे श्रोत्यांची- वाचकांची अंतःकरणे चेतवणारा आहे. समर्थांचे सर्व जीवन राममय झाले होते. त्याना तेच रूप सर्वत्र दिसत होते. जेथे देखे तेथे राघवाचे ठाण। करीं चाप बाण शोभतसे ।। प्राचीन काळापासून आसेतुहिमाचल भारतीय जनतेला अत्यंत प्रिय असलेल्या वाल्मीकींच्या रामायणात नवा आशय व नवे चैतन्य भरून तत्कालीन समाजाला जागृत करण्याचे काम समर्थांनी केले. औरंगजेबाच्या ठिकाणी रावणाची, छत्रपति शिवरायांच्या ठिकाणी प्रभू श्रीराम व त्यांचे तानाजी, नेताजी, बाजी इत्यादि अनुयायांच्या ठिकाणी हनुमंत, सुग्रीव, अंगद इत्यादि वानरगणांची कल्पना समर्थांनी केली. हे प्रतिक त्यावेळच्या लोकाना इतके मनापासून आवडले कीं, त्यामुळेच अल्पावधीत समर्थ संप्रदायाचा, त्यांच्या उपासनेचा वृक्ष खूप जोमाने फोफावला. शिवरायाना राज्याभिषेक झाला. महाराष्ट्राचे आनंदवन मुक्त झाले, सर्वत्र रामराज्य झाले.

श्रीरामाची विजयध्वजा वीर हनुमन्ताच्या गगनभेदी ध्वजस्तंभामुळे या नील नभांत उंच फडकत राहिली आहे. हनुमंतावाचून श्रीरामाची कल्पनाच करतां

येणार नाहीं. असा हा हनुमंत समर्थांचे दुसरे अत्यंत प्रिय दैवत होय. त्यांच्या स्त्रोत्रामध्यें अधिकतर स्त्रोत्रे हनुमंताचे स्तवन करणारी आहेत. हनुमंताच्या कृपेवाचून श्रीरामाची भेट होऊच शकत नाहीं, असा समर्थांचा दृढ विश्वास आहे. समर्थांचे अंतरंग राममय होते, तर त्यांचे बहिरंग हनुमंताचे होते. या वीर देवतेचे नैतिक, नैष्ठिक ब्रह्मचर्य, रामाच्या ठिकाणी अपार निष्ठा, त्यांचे दास्य करण्याची तत्परता, त्याचे प्रचंड सामर्थ्य, कार्यकुशलता, प्रसिद्धी–विन्मुखता हे सारे सद्‌गुण समर्थांनी आत्मसात केले असल्याने समर्थांना सार्थपणे मारुतीचा अवतार म्हणण्यात येते. मारुतीची अनेक मंदिरे समर्थांनी स्थापित केली. त्यांतील अकरा मारुती प्रसिद्धच आहेत. समर्थस्थापित मारुती मूर्तींचें हे वैशिष्ठ्य आहे कीं, फक्त श्रीरामाच्या सन्मुख ही मूर्ती हात जोडून उभी असते. त्याना दास मारुती ही संज्ञा आहे. इतर सर्व मूर्ती आवेशपूर्ण माथ्यावर पुच्छ मुरडलेले व पायाखाली राक्षस रगडणारी अशा आहेत. समर्थांना उत्कटतेचा, भव्यतेचा हव्यास होता. मिळमिळीतपणा त्याना मुळीच मान्य नव्हता. समर्थांची विजनवासाची अतीव आवड, वनचरांची, वृक्षवल्लींची, फळांची निसर्गप्रीति व वस्त्रांची, भूषणांची नावड त्यांच्या हनुमंतावरील अत्युत्कट प्रेमातूनच निर्माण झाली असावी. यातूनच समर्थांना पुच्छ होते. ते उड्डाण करीत असत. अशा तऱ्हेच्या दंतकथा प्रसृत झाल्या असाव्यात. एवढे मात्र निश्चित खरे आहे की, आपल्या या दोन प्राणप्रिय दैवताशी अंतर्बाह्य एकरूप झालेला समर्थांसारखा एकनिष्ठ भक्त विरळाच सापडेल.

समर्थांचे तिसरे प्रिय दैवत म्हणजे त्यांची कुलदेवता रामवरदायिनी तुळजाभवानी होय. महिषासुरासारख्या प्रबळ असुरांचा संहार करणारी ही साक्षात शक्तीदेवता समर्थांच्याही मनोकामना पूर्ण करणारी होती. छत्रपति शिवरायांचीही ही आदिशक्ती, कुलदेवता होती. शिव–समर्थ संयोगातील हा एक समान दुवा दुर्लक्ष करण्याजोगा नाहीं, हेही या ठिकाणीं ध्यानांत घ्यावयास हवे. या देवतेच्या ठिकाणींही समर्थांची निष्ठा होती. श्रीरामरायाजवळ समर्थांनी बहुविध मागण्याची यादी सादर केली आहे, या यादीत कोमळवाचा दे रे राम, या मागणीपासून प्रारंभ करून आलापगोडी, संगीत – गायन, नृत्यकला, तालज्ञान, प्रबंध धान, कवित्व, सावधपण, अनन्यसेवा व ब्रह्म अनुभव यांपर्यंतचे सर्व मागणे समर्थांनी मागितले आहे. भवानी मातेजवळ एकच मागणे त्यानी मागितले आहे, ते अत्यंत अभिनव व शिवरायांविषयीच्या जिव्हाळयाने ओतप्रोत भरलेले आहे. तें म्हणतात –

एकची मागणे आता । द्यावे ते मज कारणे ।
तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हाचि देखता ।
दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकतो ।

परंतू रोकडे कांही । मूळ सामर्थ्य दाखवी ।
क्षमावे तुळजे माते । अिच्छा पूर्णचि ते करी ।।

भगवती भवानी माता व तिचे शिव–समर्थ हे दोन अनन्य भक्त यामधील एकात्मतेचे हे हृद्य दर्शन शिवसमर्थ भक्ताना सुखनिधान वाटत असल्यास नवल वाटण्याचे कारण नाहीं.

यातील दैवतांची उपासना म्हणजे शक्तीची, सामर्थ्यांची उपासना. समर्थांना बलसंपन्न युवक हवे होते. सर्वप्रथम शक्ती संपादन करून शरीर सुदृढ राखण्याचा त्यांचा उपदेश होता. शक्तीने पावती सुखे । शक्ती नसता विटंबना । शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने होतसे । शक्तीयुक्ती जसे ठायी । तेथे श्रीमंत धावती । । धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला । नाना युक्ती सशक्ताला । म्हणोन सांगाव्या । । असे शक्तीमाहात्म्य त्यानी सांगितलेले आहे.

समर्थ स्वतः बलसंपन्न होते. त्यांचे शरीर बळकट होते. वस्त्रें, अंथरुण; पांघरुण यांची फारशी उपाधी न बाळगतां ते डोंगरीतील घळीत कोणत्याही ऋतूत सुखाने संचार करीत असत. त्यांचा सर्व प्रवास पायीच होत असे. तरी त्यांचे शरीरस्वास्थ्य कधी बिघडल्याचे दिसत नाहीं. हेळवाकच्या अत्यंत थंड हवेत घळीत चातुर्मास राहिल्याने त्याना एकदां सर्दीचा कर्कश, शीतलाईचा– त्रास झाला होता, म्हणून घोडयावरुन त्यानां चाफळला येणे भाग पडल्याचा उल्लेख त्यांच्या एका पत्रांत आहे. याखेरीज कोणताही आजार त्याना झाल्याचे आढळत नाहीं. उत्तर आयुष्यांत त्याना कफाची व्यथा सुरू झाली होती व त्यासाठी त्यानी पानाचा विडा खायला सुरवात केली, असे म्हटले जाते. सज्जनगडावरील शेजघरांत त्यांचा सोटा, लोटा, काठी, कुबडी, पलंग, कलमदानाबरोबरच पानदान व पिकदाणीही सुरक्षीत ठेवलेली आढळते. तथापि, समर्थ एके ठिकाणी कधी बसून रहात नसत. या घळीतून त्या घळीत त्यांचा अखंड संचार असे. बसून राहिला कीं महंत बुडाला अशी त्यांची धारणा होती. त्यामुळें पानाचे साहित्य घेवून ते संचाराला निघत असतील हे संभवनीय दिसत नाहीं. समर्थांची निर्भयता, निःस्पृहता, अलिप्तता पराकोटीची होती. त्यांची बुद्धी सर्व विषयांत निरंकुशपणे वावरण्याइतकी तीक्ष्ण व कुशाग्र होती. त्यानी विवेक व वैराग्याची परिसीमा गांठलेली होती. त्यांचा लोकसंग्रह अफाट होता. त्यांच्याजवळ प्रतिभासंपन्न कवित्वशक्ती व कीर्तनशक्ती होती. अचूक यत्न करून प्रारब्धावर विजय मिळविण्याचा त्यांचा उपदेश होता. लोकांचे दुःख जाणून घेवून ते दूर करण्याचा प्रयत्न करणारे कनवाळू हृदय त्यांच्याजवळ होते. प्रतिस्पर्ध्यालाही मार्मिक भाषणाने वश करण्याचे वाक्चातुर्य व वक्तृत्व त्यांच्या ठिकाणी होते. शिष्यावर पित्याची छत्रछाया धरण्याचे वात्सल्य त्यांच्या ठिकाणी आढळते.

त्यांची मातृभक्ती अवर्णनीय होती. त्यांची निरीक्षणशक्ती सूक्ष्म व सर्वगामी होती. त्यांच्या ठिकाणी नम्रता, सहनशीलता होती, त्याबरोबरच त्यांची शिस्त कडक होती. या सर्वांहून श्रेष्ठ म्हणजे ज्ञानभक्तीच्या साधनाने आत्मलाभ झालेले ते महान संत होते.

समर्थांच्या अनाकलनीय व्यक्तिमत्वाचे हे दर्शन दासबोधाच्या परिशीलनाला पुरेसे असल्याने त्याचा आणखी विस्तार करण्याची आवश्यकताही नाहीं. दासबोधातील त्यांची मुख्य शिकवणूक याच तत्वांच्या पायावर आधारलेली आहे. समर्थांची प्रवृत्ती ही जीवनमुक्तीची प्रवृत्ती आहे. क्षण येक ब्रह्मचि व्हावे । क्षण येक दृश्य धांडोळावे । नाना दृष्टांती सपादाचे । वक्तृत्वासी ।। अथवा- मने अंतरिक्ष जावे। क्षण येक ब्रह्मचि व्हावे। पुन्हा तेथून कोसळावे। वृत्तीवरी मागुते ।। अशा वृत्तीतून समर्थांनी दिलेला दासबोधाचा संदेश आता आपणास पहावयाचा आहे.

**दासबोधातील ज्ञान :**

वेदांनी प्रतिपादन केलेले व उपनिषदांनी रेखीव स्वरुपात विशद केलेले अद्वैत तत्वज्ञान सर्व संताप्रमाणे समर्थांनीही स्विकारले आहे. या तत्वज्ञानाप्रमाणे अखिल विश्वांत केवळ ब्रह्म हीच एक सत्य वस्तू असून बाकीच्या सर्व वस्तू आभासरूप आहेत. देहामध्ये असलेला आत्मा त्या ब्रह्माचाच अंश आहे, याचा अनुभव घेणे याचे नाव ज्ञान. यालाच आत्मज्ञान अथवा ब्रह्मज्ञान म्हणतात. हीच सर्व विश्वामधील श्रेष्ठ अशी अध्यात्म विद्या होय. हिलाच समर्थांनी सद्विद्या असे म्हटले आहे. हे ज्ञान प्राप्त करून घेण्यातच नरदेहाची सार्थकता आहे, असा समर्थांचा दृढ विश्वास आहे. या ज्ञानाच्या प्राप्तीसाठी प्रथम शास्त्रप्रचिती नंतर गुरुप्रचिती व शेवटी आत्मप्रचिती असा क्रम त्यानी सांगितला आहे.

**शास्त्र-प्रचिती :**

परमार्थ मार्गाचे विवेचन करणाऱ्या अनेक ग्रंथांचे श्रवण करणे, वाचन करून त्यांचे मनन करणे, त्यातील सार जाणून त्याचा प्रत्यय पाहणे याचे नांव शास्त्र प्रचिती.

अखंड एकान्त सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा । प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनी ।। समर्थांनी या पद्धतीने अनेक ग्रंथांचे अध्ययन, मनन, चिंतन करून त्यांचे मर्म जाणून घेतले होते, हे दासबोधातील प्रारंभीच्या संदर्भ यादीवरून व दासबोधात आलेल्या अनेक अवतरणातून दिसून येते. समर्थ स्वत: अध्यात्म-विद्येचे मुक्त विद्यापीठच होते. त्यानी स्थापन केलेले मठ म्हणजे या विद्येचा प्रचार व प्रसार करणारी महाविद्यालये होती. अनेक सद्ग्रंथांचे पठण, श्रवण या मठातून चालत होते. अधिकारी महन्त अध्यात्मावर स्वतंत्रपणें ग्रंथलेखनही

करीत असत. हे अनेक मठातून सांपडलेल्या हस्तलिखित कागदपत्रावरून दिसून येते. लेखन कसे करावे, यावर अत्यंत सूक्ष्म व मार्मिक सूचना समर्थांनी एका स्वतंत्र समांसात देवून ठेवल्या आहेत. त्यात कागद कसा घ्यावा, बोरू कसे असावेत, शाई कशी तयार करावी, लिहीलेले खोडावयाचे असल्यास हिंगुळ संग्रही असावा. सुईदोरा, चाकू, कात्री इत्यादि साधने हाताशी असावीत. समास सोडून मध्ये चमचमीत लिहावे अर्कली, मात्रा, वेलांटया, खालच्या वरच्या ओळीला स्पर्श करू नयेत. मोत्यासारखे अक्षर काढून पहिल्यापासून अखेरपर्यंत एकसारखे असावे, इत्यादी सुंदर मर्मग्राही सूचना देवून ते म्हणतात– ऐसा ग्रंथ जपोन लिहावा । प्राणिमात्रास उपजे हेवा । इतकेच नव्हे तर असे हस्तलिखित ग्रंथ जपून ठेवण्यासाठी पेटया, कुलूपे यांची व्यवस्थाही चोख असावी, असा त्यांचा आदेश आहे. ग्रथांची व्याख्या सांगतानाही त्यानी म्हटले आहे, जो भक्ती वाढवितो, ईश्वरी अवताराचे वर्णन, स्तवन करतो, सद्‌गुणांची वाढ करतो, तोच ग्रंथ होय. जेणे परमार्थ वाढे । आंगी अनुताप चढे । भक्तीसाधन आवडे । त्या नाव ग्रथ ७–९–३०. ग्रंथ बहुत असती । नाना विधाने फलश्रुती । जेथे नुपने विरक्ती भक्ती । तो ग्रंथची नव्हे । ७–९–३५. बहुत प्रकारे पाहतां । ग्रंथ नाही अद्वैता परता । परमार्थीस तत्वता : तारुच की । । ७–९–२८

गुरु–प्रचिती :

सद्‌गुरुवाचून आत्मज्ञान नाहीं, हे सत्य सर्व संतांनी एकमुखाने सर्व काळ गर्जून सांगितलेले आहे. सद्‌गुरु म्हणजे परमेश्वर, सद्‌गुरु म्हणजे प्रत्यक्ष परब्रह्म स्वरूपच होय, असा समर्थांचा सिद्धांत आहे. सद्‌गुरुवचन हाच वेदांत, सिद्धांत व धादांत असे ते सांगतात. ज्याला स्वहित साधावयाचे त्याने सद्‌गुरुंचे चरण दृढ धरून त्याना अनन्य भावाने शरण जावयास पाहिजे असे त्यानी सांगितले आहे. असो जयासी मोक्ष व्हावा । तेणे सद्‌गुरु करावा । सद्‌गुरुविण मोक्ष पावावा । हे कल्पान्ती न घडे । १५–१–४५

समर्थाना प्रत्यक्ष गुरुंचा सहवास व त्यांची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली नव्हती. त्याना साक्षात श्रीरामाने बालपणीच अनुग्रह देवून कृतार्थ केले होते असे त्यांचे चरित्रकार गिरिधरस्वामी व दिनकरस्वामी सांगतात. समर्थानी आपली गुरुपरंपरा भगवान हंसस्वरुप श्री नारायण, ब्रह्मदेव, वसिष्ठमुनी, श्रीराम– हनुमान व रामदास अशीच सांगितली आहे. नमो आदिबोधात्म रुपा परेशा । नमो हंस नारायणा निर्जरेशा । नमो ब्रह्मदेवा वसिष्ठा श्रीरामा। नमो मारुते रामदासाभिरामा ।। त्याना स्वतःला सद्‌गुरुंचा सहवास जरी लाभला नसला, तरी त्याना अनेक सत्‌शिष्यांचे सद्‌गुरुपद लाभल्यामुळें त्यानी सद्‌गुरुंचा महिमा अत्यंत भाविक व हृदयंगम शब्दानी वर्णन केला आहे. त्यांत सद्‌गुरु कोमल व कृपाळू असला पाहिजे असे म्हटले आहे.

नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळूपण । हे सद्गुरुचे लक्षण । जाणीजे श्रोती । ५-२-७३ । । सद्गुरुहून देव मोठा असे जो मानील तो करंटा असे ते म्हणतात. सद्गुरु प्रयत्नाने शिष्याचे अवगुण घालवून त्याला आत्मज्ञानाचा लाभ घडवतो म्हणून चिंतामणी, कल्पतरु, परीस, क्षीरसागर, आकाश यापैकी कशाचीही उपमा त्याना साजत नाही, असा सद्गुरुमहिमा त्यानी गायीला आहे. सद्गुरुची महती वर्णिताना समर्थांची वाणी जितकी कोमल व कृपापूर्ण झाली आहे, तितकीच असद्गुरुचे वर्णन करताना ती अत्यंत कठोर व घणाघाती बनली आहे. करामती दाखविणाऱ्या व चेटके करणाऱ्या गुरुंचा निषेध त्यांनी बोका, माजलेला रेडा, वसवसणारा कुत्रा व अवेळी भुंकणाऱ्या गाढवाचे दृष्टांत देवून केला आहे, हे आपण पाहिले आहे. तसाच, निषेध त्यानी आपल्या सुप्रसिद्ध मनोबोधांतील दोन श्लोकांत केला आहे.

नव्हे चेटकी चाळकू द्रव्यभोंदू । नव्हे निंदकू मत्सरू भक्ति-मंदू ।
नव्हे उन्मत्तू वेसनी संगबाधू । जगीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू ।
नव्हे वाउगी चाहुटी काम पोटी । क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ।
मुखे बोलिल्यासारखे चालताहे । मना सद्गुरु तोचि शोधून पाहे ।
याहीपेक्षा शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रिया दमन ।
ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे । ५-२-२१ ।।

या ओवीत दिडकीचे तीन असे असद्गुरु मिळाले तर ते टाकून द्यावेत, असे सांगून त्यांच्या निषेधाची परिसीमा समर्थांनी दाखविलेली आहे. असद्गुरुंच्या निषेधाचे कारणही त्यानी मार्मिकपणे सांगून ठेवले आहे. एक असत्‌शिष्य निघाला तर तो स्वतःचे अनहित करुन घेईल, परंतु एक असद्गुरु अनेक शिष्याना वाम मार्गाला लावून साऱ्या समाजाचे प्रदूषण घडविण्यास कारण होईल, असे ते सांगतात. शिवाय, सद्गुरुवचनाने असत्‌शिष्य पालटू शकेल. परंतु शिष्य-वचनाने असद्गुरु पालटणार नाहीं, असा भेद त्यानी दाखवून दिला आहे. सद्गुरू लक्षणाच्या याच समासांत समर्थांनी मंत्रगुरू, तंत्रगुरू, कुळगुरू, दीक्षागुरू, मातागुरू, पितागुरु, यातीगुरु, कुविद्यागुरु इत्यादि सत्रा गुरू सांगितलेले आहेत. याशिवाय आणखीही उदंड गुरु आहेत. परंतु मोक्षदाता सद्गुरु एकच असतो. असा निर्णय त्यानी शेवटी दिला आहे.

आत्मज्ञान हेच खरे ज्ञान आहे. बाकीच्या विद्या म्हणजे पोट भरण्याची साधने आहेत, हेही त्यानी सांगितलेले आहे. रोग-परीक्षा, पशूंची परीक्षा, पक्षांची परीक्षा, अश्वांची, गजांची, शस्त्रांची, नाण्यांची, रसांची, फळांची, शब्दांची, भाषांची परीक्षा हे ज्ञान नव्हे, असे सांगून आत्मज्ञान, स्वरुपानुसंधान हेच खरे ज्ञान होय, असा निर्णय समर्थांनी देवून ठेवला आहे.

आत्म-प्रचिती :

सच्छास्त्राच्या अध्ययनाने कळूं लागलेले व सदगुरुवाक्य श्रवणाने दृढ झालेले आत्मज्ञान आत्मप्रचितीनेच पूर्णत्व पावते, हे सत्य श्रोत्यांच्या चित्तावर परोपरीने ठसवण्याचा प्रयत्न समर्थांनी दासबोधांत केला आहे. हे सांगण्याचा अधिकार समर्थांसारख्या आत्मानुभवी संतांनाच आहे, हे उघड आहे.

दासबोधाच्या प्रारंभीच त्यानी दासबोध म्हणजे माझे प्रचितीचे बोल आहेत, असे म्हटले आहे.

नाना ग्रंथांच्या संमती । उपनिषदे वेदांत श्रुती । आणि मुख्य आत्मप्रचिती । शास्त्रे सहित ।। १-१-१५ ।।

यापेक्षाही ग्रंथ समाप्तीच्या ज्या ओव्या दासबोध वाचल्यानंतर म्हणण्याचा संप्रदाय रूढ आहे, त्यांत समर्थांनी म्हटले आहे- या ग्रंथाच्या स्तवनाचे प्रयोजनच काय आहे. यातील शब्दांचा तुम्ही प्रत्यय पहा म्हणजे झाले. ग्रथांचे करावे स्तवन । स्तवनाचे काय प्रयोजन । येथ प्रत्ययासी कारण । प्रत्ययी पहावा ।। उसाचा रस सेवन करून चोयटचा ज्याप्रमाणे टाकून दिल्या जातात, फणसाचे गरे खावून आठोळी, साल यांचा त्याग केला जातो, नारळातील खोबरे घेवून करवटी टाकून देतात, त्याप्रमाणे या शब्दातील अर्थ घ्या. शब्द टाकून द्या. एखादे साधे औषध जसे अत्यंत गुणकारी असते, त्याप्रमाणे माझे साधे शब्द, परंतु ते प्रत्ययाचे आहेत. असे ते आत्मविश्वासाने सांगतात व वक्त्याला जर अनुभव नसेल तर त्याचे भाषण कंटाळवाणे होते, त्याच्या व्याख्यानाला श्रोते जमत नाहीत, त्याच्या शब्दाला वजन प्राप्त होत नाहीं. यासाठी समर्थ सांगतात- वक्ता पाहिजे साचार, अनुभवाचा ।। श्रीरामाची उपासना करून रामदास राममय झाले. देव भक्तांची अखंड भेट झाली. ब्रह्यामध्यें ते विरून गेले. हा अनुभव त्यानी अनेक ठिकाणी कथन केला आहे. त्यांचा आत्मविश्वास बळावला, त्यांच्या शब्दांत अपार सामर्थ्य असे. राघवाची पाऊले मनी धरुन सर्व विश्व क्षणांत उद्धारुन टाकीन, असे आत्मविश्वासाचे उद्‌गार त्यानी काढलेले आहेत. इतकेच नव्हे, तर पतिताना तात्काळ पावन करून मुक्त करीन, अशी त्यांची प्रतिज्ञा होती. येणेची काळे जरी मोक्ष देईना । तरी दास म्हणवीना राघवाचा । पतित पावनाचे दास। तेही पावन करिती जगास। असा त्यांचा विश्वास होता. रामासि इतके मागावे। जे आपण रामचि व्हावे । कां रामासि दास करावे । आपणा ऐसे ।

नामदेव, तुकाराम जसे देवाशी प्रेमकलह करतात, त्याप्रमाणे समर्थांनी या ठिकाणी रामाशी भांडण केले आहे. ते म्हणतात, रामा तूं पाषाण तारलेस तर आम्ही जड जीव उद्धरले. तू देवाना बंधनातून मुक्त केलेस तर आम्हीही

भाविकाना संसार-बंधनातून सोडविले. तूं जरामरणापासून मुक्त आहेस, तर आमच्या घरी ते मुळींच नाहीं. तूं अकरा हजार वर्षे राज्य केलेस, तर आम्ही असंख्य वर्षे. तूं फक्त अयोध्यापुरी वैकुंठास नेलेस तर आम्ही सर्व पृथ्वीवर वैकुंठाचा बाजार मांडला आहे. असा निःशंक निधडेपणा देवमय झाल्याखेरीज कसा येईल ? याच रितीने दासबोधातील प्रत्येक शब्दांत समर्थांच्या अनुभूतीचा रस भरुन राहिला आहे, म्हणून तो ग्रंथ चिरंजीव व नित्य नूतन आहे.

**आत्मज्ञानाची साक्ष :**

आत्मज्ञानासाठी अनेक साधनांचा समर्थांनी दासबोधांत उपदेश केला आहे. समर्थांची मुख्य शिकवण हीच आहे. तथापि दासबोधांत ती एकत्र एकसूत्रीपणाने सांपडत नाहीं. अनेक समासातून विखुरलेले हे ज्ञानकण वेचून या ठिकाणी मांडण्याचा यथामति प्रयत्न करावयाचा आहे. समर्थांच्या काळीं समाजाचीं स्थिती अत्यंत भीषण व भयानक झाली होती, असे सर्व चरित्रकारानी म्हटले आहे. तथापि, ते तितके सत्य नाहीं. यवनांची बेबंद लूटमार व पाशवी अत्याचार हे अधूनमधून घडणारे अमानुषतेचं प्रदर्शन वगळले तर समाजातील सज्जन व दुर्जन, सदाचारी – दुराचारी, धार्मिक – अधार्मिक, नीति–अनीतीमान, न्यायी–अन्यायी यांचे प्रमाण सर्वकाळी असते, तसेच होते. शिव-समर्थांच्या महानिर्याणानंतर छत्रपती संभाजी व राजाराम महाराज यांच्या काळी महाराष्ट्रावर केवढा भीषण प्रसंग गुदरला होता. मराठी राज्याची नावनिशाणीही उरु द्यायची नाही, अशा प्रतिज्ञेने महाबलाढ्य आलमगीर औरंगजेब आपल्या सर्व सामर्थ्यानिशी दक्षिणेत उतरला होता. तथापि, धन्य त्या महापराक्रमी राजे संभाजी व सत्वशील राजाराम महाराजांची, धन्य ते संताजी– धनाजी व खंडो बल्लाळ आणि त्यांचे ज्ञात अज्ञात असंख्य सहकारी. त्यांच्या महान कर्तृत्वाचे योग्य मूल्यमापन होत नाही. धर्मवीर संभाजीराजांचा अमानुष वध करुन औरंगजेबाने आपली कबर आपल्या हातानेच खोदून ठेवली व त्याची शवपेटीका छत्रपती संभाजी व छत्रपती राजाराम यानीच आपल्या स्कंधावर वाहिली असे म्हटले तर ते अनुचित व अनैतिहासिक ठरु नये. अर्थात, शिवसमर्थांच्या कर्तृत्वाला या ठिकाणी यत्किंचितही कमी लेखण्याची कल्पनाच नाहीं. शिवसमर्थांच्या प्रचंड तेजोगोलावर प्रज्ज्वलीत केलेल्याच या दीपशाखा होत्या. सांगण्याचा मुद्दा इतकाच की, सर्वकाळी समाजांत दुष्ट–दुष्ट घटकांचे प्रमाण व्यस्तच राहते. म्हणूनच सत्य, सदाचार, सद्धर्म यांचा प्रचार करणाऱ्या संतांची गरज समाजाला प्रतिक्षणीं भासत असते. सर्व संतांनी समाजाच्या करुणेने प्रेरित होवून अशा सदुपदेशाचा वर्षाव केला आहे. तथापि, समर्थ नुसता उपदेश करुन स्वस्थ राहणारे

संत नव्हते. स्वत: क्रिया करून इतरांकडून ती करवावी, या ब्रीदाचे ते महान उपासक होते. स्वत: भजन करून इतराना भजनी लावावे, स्वत: सन्मार्गाचे आचरण करून इतरांच्याकडूनही ते घडवावे, असा त्यांचा बाणा होता. समाजातील सर्वच लोक सर्वोच्च पारमार्थिक लाभ करून घेण्याच्या पात्रतेचे नसतात, हे समर्थांना माहीत होते. समाजातील अगदी तळाच्या माणसालासुद्धा आपल्या संप्रदायांत सहभागी करून घेवून त्याच्या योग्यतेचे काम त्याला वाटून द्यावे असा समर्थांचा मनोदय होता. त्यासाठी त्यानी व्यापक महाराष्ट्र धर्माची योजना समाजात रुजविली ज्या भागांत समर्थांना हे काम करावयाचे होते, तेथील राजसत्तेचे सहकार्य लाभल्यास हे काम सुलभ होईल, याची जाण त्याना होती. त्यांच्या व महाराष्ट्राच्याही सुदैवाने परमार्थाचा कैपक्षी शूर, उदार व धीर असा राजा शिव छत्रपती त्याना मिळाला. याचा अपार आनंद त्याना झाला. श्रीच्या इच्छेने हे सर्व घडून येत आहे, याची साक्ष त्याना मनोमन पटली व शिवाजी महाराजांचे स्वराज्य होण्यापूर्वी कितीतरी आधी समर्थांच्या दिव्य दृष्टीने ते साकार झाल्याचे पाहिले व त्यानी ते अक्षरांकित केले. त्या काव्याचे नांव– आनंदवन भुवनी– समर्थांच्या अंत:करणांतील आनंद रस यातील शब्दाशब्दातून ओसंडून वहात आहे. समर्थांच्या नंतर जवळजवळ २५ वर्षांनी औरंगजेब मरण पावला. तथापि, त्यानी औरंगजेबाचे मरण आधीच पाहिले होते.

बुडाला औरंग्या पापी । म्लेंछ संहार जाहला । मोडलीं मांडली क्षेत्रे । आनंदवन भूवनी । । उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया । जपतप अनुष्ठाने । आनंद वन भूवन । ।

सत्तेचे पाठबळ नसेल, तर कार्याला यश मिळण्यात अडचणी येतात. समर्थांची नाही पाठी । तयास भलताच कुटी । । असा त्यांचा अनुभव होता. यासाठी मुख्यमुख्य लोकाना हाताशी धरावे, म्हणजे असंख्य बाजारी लोक सहज वश होतात. त्यासाठी कित्येक वेळा जशास तसे, धटासी आणावा धट, या नीतीने वागावे लागते. यातूनही अत्यंत दुराचारी, क्रूर, नृशंस, कर्मे करणारे असतील त्यांचे निर्दालन करूनही कार्यभाग साधावा. असा विचारही समर्थांना सांगावा लागला. तथापि, हे सर्व करीत असता कार्यकर्त्याने आपल्या अलिप्ततेला, नि:स्पृहतेला व नि:स्वार्थीपणाला यत्किंचित धक्का लागू देवू नये असा त्यांचा उपदेश आहे. यालाच त्यानी चातुर्य, राजकारण, सावधपण, विवेक अशी नावे दिलेली आहेत. या गोष्टींचा योग्य उपयोग केला तर ती आत्मज्ञानाची साधने बनू शकण्याइतकी तेजस्वी व प्रभावी होतात. याचा मूर्तिमंत आदर्श दासबोधाने दाखवून दिला आहे. तथापि, यामुळे दासबोधाने आत्मज्ञानाची इतर साधने निर्दिष्ट व आदिष्ट केली आहेत. त्यांच्याकडे कदापि, दुर्लक्ष होता कामा नये.

ही साधने आहेत : १) भक्ती, २) कर्म, ३) ध्यान, ४) विवेक ५) वैराग्य, ६) प्रयत्न ७) प्रबोध. या सप्त साधनांचा आता क्रमवार विचार करु.

**भक्ती :**

आत्मज्ञानाच्या सर्व साधनांमध्यें प्रधान व सर्वश्रेष्ठ असे हे साधन आहे. किंवहुना या सर्व साधनाना भक्तीची जोड असल्यावाचून ही साधने सजीव व सचेतन होवू शकतच नाहीत. ही सर्व साधने परस्पर सहाय्यक व अन्योन्याश्रयी आहेत, हे म्हणणेच अधिक वास्तव होईल.

भक्तीच्या योगाने ईश्वरलाभ होतो, हे सांगून समर्थानी भक्तीचे महात्म्य दासबोधाच्या प्रारंभीच प्रगट केले आहे. नवविधा भक्तींच्या वर्णनासाठी एक संपूर्ण दशकच दासबोधात आहे. ही नवविधा भक्ती भागवतातूनच दासबोधामध्यें आली आहे. यांत अर्थातच अग्रक्रम श्रवणभक्तीला आहे. श्रवणाचा अधिकार प्राप्त झालेल्या साधकाने काय ऐकावे, कसे ऐकावे याचे मार्मीक वर्णन समर्थानी श्रवणभक्तीच्या समासात करून सद्ग्रथांचे एकाग्रतेने श्रवण करुन त्या सर्वांतोल सार शोधून घ्यावे अशी महत्वाचा सूचना शेवटी देवून ठेवली आहे. याखेरीज श्रवण, निरुपण नांवाचे दोन समास चतुर्दश ब्रह्म नावाच्या सातव्या दशकांत आले आहेत. त्यांत श्रवणाचा महिमा वर्णन करून श्रवणाचा महिमा व फल वर्णन केलेले आहे. श्रवणा ऐसे सार नाही ।। श्रवणे घडे सर्व कांहीं ।। हे सांगून बहुत साधने पाहाता । श्रवणासी न घडे साम्यता ।। असे त्याचे अद्वितीयत्व वर्णन केले आहे. याही पुढें समर्थांनी म्हटले आहे, कीं :– न देखतां दिनकर । पडे अवघा अंधःकार । श्रवणेवीण प्रकार । तैसा होये ।।

ग्रथांची व्याख्या या निरुपणात सांगून परमार्थपर ग्रंथच श्रवण केले पाहिजेत, असे आग्रहाने त्यानी प्रतिपादन केले आहे. शिवाय रोज ज्याप्रमाणे आपणास अन्न, जल सेवन करावे लागते, त्याप्रमाणे ऐकलेले सदग्रथ पुनःपुन्हां ऐकावेत, असा सदुपदेश केला आहे.

**कीर्तन भक्ती ।**

लोकजागृती करण्याची विलक्षण शक्ती कीर्तन भक्तीमध्यें आहे. परंतु त्यासाठी आवाजाची दैवी देणगी, राग, ताल, वाद्य व नृत्य यांचे स्वानुभवाचे ज्ञान, बहुश्रुतपणा, पाठांतरश–क्ती, समाजांत मिसळून त्याचे मन जाणण्याची कुशलता, या गोष्टींची नितांत आवश्यकता आहे. या सदगुणानी युक्त असलेला कीर्तनकार समाजात परिवर्तन घडवू शकतो. भागवत सांप्रदायाच्या ज्ञानदेव,

एकनाथ महाराज, तुकाराम महाराज आदि महान संतांनीं असे परिवर्तन कीर्तनद्वारा घडवून आणले असा इतिहास आहे. आजही कीर्तन हे समाज-जागृतीचे प्रभावी माध्यम आहे. कीर्तन म्हणजे नामसंकीर्तन असाही अर्थ अभिप्रेत आहे.

**नामस्मरण भक्ती ।**

आत्मप्रासादाच्या पहिल्या पायरीपासून कळसापर्यंत सहजतेने पोचविणारे नामस्मरणासारखे दुसरे सोपे व सुलभ साधन नाहीं, असा सर्व संतांचा एक-सुरातील उद्घोष आहे. एकाग्र चित्ताने केलेले नामस्मरण चित्तशुद्धी घडवून ईश्वर-दर्शन करून देते. वाल्मीक, ध्रुव, प्रल्हाद, अजामीळ, गणिका इत्यादि सर्व नामस्मरणाने उद्धरून गेलेत. असे सर्व संतानीं सांगितले आहे. नामाच्या योगाने पाषाण पाण्यावर तरले, अहिल्या उद्धरली असा हा नामाचा महिमा वर्णन करायला सहस्त्रमुखी शेष व वेद विरंचीही समर्थ नाहीत, असा संतांचा निर्णय आहे.

**पादसेवन, दास्य व सख्य भक्ती ।**

अहंभाव विसरून कसलाही कमीपणा न मानतां सद्‌गुरूंची सर्वभावे सेवा करणे, या तीनही भक्तीमध्ये अभिप्रेत आहे. भगवद् गीतेच्या तेराव्या अध्यायातील आचार्योपासनम् या ज्ञान लक्षणावर भाष्य करताना या तीनही भक्तींचे अत्यंत हृदयसंगम वर्णन केलेले आहे. जिवंत असताना सद्‌गुरूंची सर्व बारीकसारीक सेवा-आंथरूण घालणे, काढणे, स्नानाला पाणी देणे, उपकरणी घासणे, वस्त्रे धुणे, स्वयंपाक करणे, चवरी, मशाल धरणे, विडा देणे इत्यादी सर्व सेवा- करीन व देहपातानंतर या देहाची माती सद्‌गुरूंच्या पायाखाली पडावी असे शिष्य इच्छित असतो, असे सांगून गुरूसेवेची परमसीमा गांठली आहे. देव व सद्‌गुरू एकरूपच असल्याचे पादसेवन. दास्य, सख्य देवाचे करावे असे जरी असले तरी त्याचा संबंध सद्‌गुरूशीच जोडला आहे.

**अर्चन भक्ती ।**

उपास्यमूर्ती अथवा कुलदेवता यांचे आपल्याजवळ असलेल्या सर्वोत्तम वस्तूनी एकाग्रमनाने अर्चन करणे, याचे नाव अर्चन भक्ती.

**वंदन भक्ती ।**

हा भक्तीचा प्रकारही सोपा व सुलभ दिसला, तरी आचरणात आणण्यास अत्यंत अवघड व परिणामाच्या दृष्टीने क्रांतिकारी स्वरूपाचा आहे. वंदनाने अहंभाव मावळतो, लीनता व नम्रता येते, दुसऱ्याचे मन जिंकता येते. मतभेद नष्ट होतात, क्रोध पळून जातो, पश्चात्ताप होतो. चित्तशुद्धी होते असे कितीतरी

लाभ होतात. प्रत्येक भूतमात्र भगवंत समजून त्याला वंदन करणे ही वंदन भक्तीची परिसीमा होय. ज्ञानदेव म्हणतात । जे जें भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । हा भक्तीयोग निश्चित । जाण माझा । । आमचे प्राचीन ऋषीही सांगतात – कुलालेभ्योनमः, चर्मकारेभ्यो नमः, स्तेनानाम् पतये नमः, नमो महद्भ्यो, नमो अर्भकेभ्यो, नमो युवभ्यः । । कुंभकाराना प्रणाम, चर्मकाराना प्रणाम, चोरांच्या प्रमुखाला प्रणाम, मोठयाना, अर्भकाना, युवकानाही प्रणाम अशी आहे ही वंदन भक्ती.

आत्मनिवेदन भक्ती ।

क्रमाने सर्वात शेवटी असली तरी गुणाने सर्वप्रथम शोभणारी आत्मनिवेदन भक्ती सर्व भक्तींच्या शिरोभागी विराजमान होणारी आहे. ही भक्ती म्हणजे नवविधा भक्तीचे गूज व रहस्य आहे. देवभक्तातील भिन्नता दूर करून त्यांच्यात निरंतरचे ऐक्य प्रस्थापित करणारी ही भक्ती आहे. भक्ताची व्याख्या सांगताना समर्थांनी म्हटले आहे– विभक्त नव्हे तो भक्त । स्वतःला भक्त म्हणावयाचे व विभक्त असावयाचे हे विलक्षण आहे, असे ते सांगतात. मी भक्त ऐसे म्हणावे । आणि विभक्तपणेंचि भजावे । हे अवघेची जाणावे । विलक्षण ४–९–४. अशी ही नवविधा भक्तीमध्यें विशेष । भक्ती नवमी । । ४–९–२४. नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होताची न चुके जन्ममरण । हे वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे । ४–९–२५ । आता आत्मज्ञानाचे दुसरे साधन जे कर्म त्याचा विचार करावयाचा.

कर्म ।

ईश्वरार्पण बुद्धीने, अनासक्त वृत्तीने केलेले निर्हेतूक व फलाशारहित कर्म. हेच आत्मज्ञानाचे साधन आहे. यालाच कर्मयोग, असे भगवतानी संबोधले आहे, कर्म, उपासना व ज्ञान अशा तीन कांडांत वेदांचो विभागणी केली आहे. गीतेतही या तीन कांडांचाच विस्तार आहे, असे ज्ञानदेवानी मोठया मार्मीकपणे दाखवून दिलेले आहे.

कांडमय निरुपिणी । श्रुतीचि हे कोडिसवाणी । गीता पद्य रत्नांची लेणी । लेधिली आहे । । ज्ञानदेवानी दर्शवून दिले आहे कीं, गीतेचा तिसरा अध्याय कर्मकांडाचा आहे. चौथे अध्यायापासून बाराव्या अध्यायाअखेर उपासना कांड व तेरावा ते पंधरावा अध्यायअखेर ज्ञानकांड वर्णिलेले आहे. पहिला अध्याय शास्त्रप्रवृत्ति प्रस्ताव, दुसरा सांख्ययोगाचा, सोळावा व सतरावा परिशिष्ट रूप व अठरावा कळसाध्याय अशी या आत्मज्ञानरूप गीता–प्रासादाची विभागणी ज्ञानदेवानी केलेली आहे. समर्थांनीही कर्म, उपासना व ज्ञान या त्रयींचा एकत्रीत उल्लेख दासबोधात अनेकवार केला आहे, त्यात कर्मयोगाचे वर्णन अनेक ठिकाणी आढळते.

आधी ते करावे कर्म । कर्मामागे उपासना । उपासका सापडे ज्ञान । ज्ञाने मोक्षची पाविजे ।। आधी कर्माचा प्रसंग । कर्म केले पाहिजे सांग । कदाचित पडिले व्यंग । तरी प्रत्यव्याय घडे ।। ११-९-१ ।।

कर्मावाचून एक क्षणही रिकामा घालवू नये, असा समर्थांचा आदेश आहे. त्यानी राजधर्म, क्षात्रधर्म, सेवकधर्म सांगितलेले आहेत. ती सर्व कर्मयोगाचीच शिकवण आहे. निःस्पृहाला, विरक्ताला, महंताला त्यानी दिलेले वस्तुपाठ ही कर्मयोगाचीच शिकवण. समर्थ हे कर्मयोगी संत आहेत, असा जो ठसा सामान्य जनांच्या मानसांत उमटलेला आहे, त्याचे कारण त्यांची ही कर्मयोगाची शिकवण हेच आहे. कर्म नीटनेटके व विवेकी असले पाहिजे, हा समर्थांचा कटाक्ष होता. जानवे ढिलेपणाने हेवडकारे होते, असा दृष्टांत देवून ते म्हणतात, कोणतेही काम ढिलेपणाने कसेतरी करणे योग्य नाही. समर्थांचा राजकारणाचा सर्व विचार कर्मयोगामध्येच येतो. दुसऱ्याचे दुःख जाणून घेऊन ते कमी करण्याचा प्रयत्न कर्मयोग्याने करावयास हवा. पुष्कळांचे बरेवाईट सोसून समुदायाच्या हितासाठी सतत प्रयत्नशील असले पाहिजे हिरवटाला दूर ठेवावे, कचरटाशी भापण करू नये, लोक पारखून राजकारणाने त्यांचे अभिमान झाडून पुन्हा त्याना मिळवून घ्यावे. राजकारण बहुत करावे, समुदाय उदंड वाढवावा. परंतु हे कोण करतो, ते कोणाला कळू नये, परपीडेवर कधीही चित्त देवू नये. अंतःकरण कोमल व दयाळू असावे.

जीव जीवात घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा । राहराहो शोध घ्यावा । परांतराचा ।। १५-१-४ ।।

चरितार्थासाठी भिक्षा मागणे, कवित्व रचणे, कीर्तन करणे, हाही समर्थांच्या कर्मयोगाचा भाग आहे. भिक्षेच्या निमित्ताने विशाल भूप्रदेशात अखंड परिभ्रमण करून लोकांची परीक्षा करावी. आपल्याला अनुकूल असतील त्यांची ओळख वाढवावी, प्रतिकूल असतील त्यानाही आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न करावा. भिक्षा थोडी घ्यावी, भिक्षा सदा फळ देणारी अमरवल्ली अथवा कामधेनू आहे, असे समर्थानी म्हटले आहे. भिक्षेच्या झोळी व कुबडीला समर्थ सांप्रदायांत खास विशिष्ठ स्थान आहे.

समर्थानी केलेली प्रपंचाची प्रशस्ती हा त्यांच्या कर्मयोगाचाच भाग आहे. दासबोधातील हा भाग सर्वसामान्य प्रापंचिक माणसाला प्रिय असतो. त्याना वाटते, आपण करीत असलेल्या प्रपंचाला 'समर्थांचे शिफारसपत्र आहे. तथापि समर्थानी सांगितलेला प्रपंच हा निःस्पृहाचा, विरक्ताचा प्रपंच आहे, हे आपण सोयीस्करपणे विसरून जातो. प्रपंच सोडून परमार्थाकडे वळलो तर खायला अन्न मिळणार नाहीं व परमार्थ सोडून नुसता प्रपंच चालवाल तर अंती यमयातना

सोसाव्या लागतील. याकरितां प्रपंच व परमार्थ सावधपणाने चालवावा असा समर्थांचा उपदेश आहे. प्रपंचात खोटा तो परमार्थातही खोटाच राहणार. प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील. जाण प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा । । १५-१-९ । ।

लोकांचा कार्यभाग जिथे अडतो तो अडचण सोडवून कार्यभाग पुढे चालवतो. तो खरा कर्मयोगी. लोक त्याला मानतात. चंदनासारखे सतत झिजून कीर्तिसुगंध पसरवणे हा समर्थांचा कर्मयोग आहे. कीर्तिभूषण हेच खरे भूषण आहे. आधी कष्ट केल्यावाचून फळ मिळणार नाहीं. तसेच इतराशी आपण चांगले बोललो, तर आपल्यालाही चांगले शब्द मिळतील. समर्थांची मुख्य शिकवण कर्मयोगाचीच आहे. तथापि, गुप्ततेने स्वार्थासाठी हुषारीने केलेल्या सर्व क्रिया म्हणजे कर्मयोग, अशी विपरीत कल्पना जनमानसात घर करून बसली आहे. म्हणून हे वारवार सांगण्याची आवश्यकता वाटते, की समर्थांचा कर्मयोग हा अत्यंत चतुर व बलवान कार्यकर्त्याने अनासक्त व विरक्त वृत्तीने राहून निरपेक्षपणे केलेली समाजसेवा आहे.

३) **ध्यानयोग**

ध्यानयोगाचे खास वर्णन भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायात आहे. त्यावर भाष्य करताना ज्ञानदेवानी स्वानुभवपूर्ण कुंडलिनी जागृतीचे अप्रतिम दर्शन घडविले आहे. तसे वैशिष्ठ्यपूर्ण वर्णन दासबोधात जरी आढळत नसले, तरी ध्यानयोगासाठी नितांत आवश्यक असलेल्या एकांतवासाची समर्थांना निरतिशय आवड होती आणि भगवान पतंजलीनी योगसूत्रांत सांगितल्याप्रमाणे चित्तवृत्ती निरोध करून त्यानी सर्व इंद्रियावर विजय संपादन केला होता. वैराग्याचे तर ते मूर्तिमंत प्रतिक असल्याने ध्यानयोगासाठी आवश्यक ती सर्व साधनसंपत्ती समर्थांच्या ठिकाणी होती. ध्यानयोगाचा त्यानी अभ्यास केल्याच्या थोड्याच मार्मीक खुणा दासबोधांत सांपडतात. शिष्या एकांती वैसावे । स्वरूपी विश्रांतीसी जावे । ५-६-५८ । मने अंतरिक्ष जावे । क्षण येक ब्रह्मचि व्हावे । । ७-६-५ । । इत्यादि ध्यानयोगाच्या खुणा आहेतच. तथापि, अजपा निरूपणाचा संपूर्ण समास ध्यानयोग निरूपण करणाराच आहे. येकांती मौन धरून बसले असतां सोहं सोहं असा जो अनाहत नाद होतो, हे ध्यानयोगाच्या प्रगतीचे साक्षात प्रमाण आहे.

उच्चावीण जे शब्द । ते जाणावे सहज शब्द । प्रत्यया येती परंतू नाद । काहीच नाहीं १७-५-८ । । ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला । योगाभ्यासाचा गलबला । याकारणे । । १७-५-६ । ।

ध्यानयोग हा आकाशमार्गीचा अत्यंत गुप्तपंथ असल्याने व आचरण्यास अत्यंत अवघड असल्याने त्याच्या खुणा विरळाच आढळणार, हे साहजीकच आहे. या

मार्गाच्या कठिणपणाविषयी बोलताना ज्ञानदेव सांगतात, ताहाने ताहानचि पियावी। भूकेलिया भूकचि खावी । अहोरात्र वावी । मवावा वारा।। शीत वेढावे । उष्ण पांघुरावे। वृष्टीचीया असावे। घरा आतु।। किंबहुना पांडवा । हा अग्नी प्रवेशु नीच नवा । भातारेवीण करावा । तो हा योगु ।। पतिव्राचून सति जाण्यासारखे ध्यानयोगाचे दिव्य आचरणारे योगी गिरीकंद-रांत त्या निर्विकल्प समाधिसुखाचा लाभ घेत राहतात. समर्थ या समाधिसुखाचा लाभ घेत असूनही जनहितासाठी सतत कार्यमग्न असत.

## ४) विवेक

विवेक व वैराग्य हे समर्थांचे परवलीचे शब्द आहेत. त्यांचा वापर दासबोधांत मुक्त हस्ताने समर्थांनी केलेला आहे. बाराव्या दशकाला विवेक वैराग्यदर्शक हीच संज्ञा त्यानी दिली आहे. त्यांच्या इतर वाङ्मयातही या दोन शब्दांचा सर्रास वापर दिसून येतो. विवेक हे मानवाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. विचार करण्याची शक्ती ही मानवाला मिळालेली अद्‌भूत अशी दैवी देणगी आहे. विवेकाच्या बळावर साऱ्या जगाला स्तिमित करणारे शोध मानवाने लावले आहेत. समर्थांनी विवेक शब्दाचा उपयोग पारमार्थिक अर्थाने केला. या जगात सार काय आणि असार काय हे जाणून सार घ्यावे व असार सोडून द्यावे, याला विवेक असे म्हटलेले आहे. पानावरची लहानशी अळीसुद्धा पुढचा भाग टेकल्यानंतर मागीळ भाग उचलण्याचा विवेक दाखविते आणि मानवप्राणी अविवेकाने वागतो याळा काय म्हणावे; असा प्रश्न समर्थ विचारतात.

पर्णाळी पाहोन उचले। जीवसृष्टी विवेके चाले। आणि मनुष्य होऊनि भ्रमले। यासी काय म्हणावे।। १२–१–११।।

भगवंतानी गीतेत हाच विचार वारंवार सांगितलेला आहे, असे ते म्हणतात. विचार पाहेल तो पुरुष। विचार न पाहे तो पशु। ऐसी वचने सर्वेशु। ठायीठायी बोलिला। १०–९–२८। या जगांत सार केवळ आत्मा किंवा ब्रह्म हेच व बाकीचे सर्व असार आहे, हाच परमार्थ विवेक समर्थांना अभिप्रेत आहे. समर्थ पदवी विवेकानेच प्राप्त होते. बहुत जनास चालवी। नाना मंडळे हालवी। ऐसी हे समर्थ पदवी। विवेके होतो।। १८–१०–४६।। असे त्यांचे निश्चित मत आहे.

कर्तव्यासी वोळखावे। यास विवेक म्हणावे। विवेक सांडतां व्हावे। परमदुःखी।। १३–७–२९।। विवेकाचे फळ ते सुख। अविवेकाचे फळ ते दुःख। यात अति मानेल ते आवश्यक। केले पाहिजे।। १३–७–२८।। विवेकी साधकांनाच परमात्म्याचे दर्शन होते, हे विशद करताना ते म्हणतात–

विवेकाचा लाभ घडे। जेणे परमात्मा ठायीं पडे। विवेक पाहाता सांपडे।

विवेकी जनीं । १८-७-१२ । । विवेकानेच जन्माचे सार्थक होते, हे स्पष्ट करताना समर्थ म्हणतात-

तरीच जन्माचे सार्थक । भले पाहाती उभये लोक । कारण मुळींचा विवेक । पाहिला पाहिजे । । १२-८-२३ । । विवेकहीन जे जन । ते जाणावे पशुसमान । । ।१२-८-२४ । । विवेकाने सांपडत नाहीं, अशी कोणतीही गोष्ट नाहीं असे ठामपणे ते सांगतात-

विवेकामध्यें सापडेना । ऐसे तों काहींच असेना । एकान्ती विवेक अनुमाना । आणून देई । । १९-६-२८ । । येकांतो विवेक करावा । आत्माराम वोळखावा । येयून तेथवरी गोवावा । काहीच नाहीं ।। १९-६-३० । ।

**वैराग्य :**

समर्थांचे वैराग्य कडकडीत होते. याविषयी दुमत असण्याचे कारण नाहीं. त्यांच्या शिष्यवर्गामध्यें कांही तरुण विधवा स्त्रियाही होत्या. त्यांच्या संबधी कांहीं आक्षेप क्वचित घेतले गेलेले दिसतात. परतु, त्याना कुठेच सत्याचा आधार न मिळाल्यानें ते त्याचकाळी विरून गेले व पुन्हां तसे आक्षेप कधी उपस्थित केले गेले नाहीत. यावरून त्यांच्या स्तवनपर श्लोकांत- शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे । असे म्हटलेले गेले ते अगदी यथार्थ आहे. याच ठिकाणी समर्थांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन किती उदार आहे व पुरोगामी होता याचीही कल्पना येते. त्याकाळीं जातींची व रुढींची बंधने इतकी बळकट होती की, तरुण विधवा स्त्रियाना अंधारात तोंड लपवून सपूर्ण आयुष्य घालविणे अथवा वाम मार्गाला लागून आत्मघात करून घेणे, याखेरीज कोणताही पर्याय नव्हता. अशा काळी या स्त्रियांना शिष्यवर्गात सामील करून घेणे, त्यांच्याकडून कीर्तन करविणे, इतकेच नव्हे तर स्वतंत्र मठावर मठपती म्हणून त्यांची नियुक्ती करणे, ही युगप्रवर्तक क्रांतिकारी गोष्ट होती. या समर्थांच्या अलौकिक कामगिरीकडे त्यांच्या चरित्रकारांचे फारसे लक्ष गेलेले दिसत नाहीं, अथवा आजही अशा तरुण विधवांची स्थिती इतकी अनुकपनीय आहे कीं, हा क्रांतिकारी पुरोगामी विचार अनुल्लेखाने मारणे त्याना हितकर वाटत असावे. असो. प्रस्तुतचा मुद्दा आहे, दासबोधातील वैराग्याच्या शिकवणीसंबधीचा. समर्थांनी विरक्ताचे लक्षणासाठी दुसऱ्या दशकांतील नववा संपूर्ण समास खर्ची घातला आहे. याशिवाय तिसऱ्या दशकातील दहावा समास वैराग्य निरूपणाचा आहे. बाराव्या दशकाचे नांवच विवेक वैराग्य नाम असे आहे. या सर्व ठिकाणी वैराग्याचा अलौकिक महिमा वर्णन करुन वैराग्य अंगी बाणवण्याबद्दल समर्थांनी परोपरीने सांगितलेले आहे. विरक्ताची लक्षणे हृदयाशी बळकट धरल्यास भूमंडळात विख्यात होता येते असा त्यांचा विश्वास होता.

हे लक्षणे श्रवण की जे । आणि सदृढ जीवीं धरिजे । तरी मग विख्यात होईजे । भूमंडळी । । २–९–६ । । वैराग्य आणि विवेक हे शब्द दासबोधांत अनेक ठिकाणीं जोडीने येतात. वैराग्य विवेकयुक्त पाहिजे, असा समर्थांचा कटाक्ष आहे. नाहीं तर नुसते वैराग्य हे काडपिसे ठरते असे त्यांचे सांगणे.

विरक्ताजवळ नैराश्यता, निवृत्ती, नीति, भक्ती, शांती, क्षमा, उपासना, धर्मनिष्ठा असावी. हे योग्यच आहे. तथापि, त्याने जगन्मित्र असावे. त्याने अचाट पर्वे करावी, भक्तांची थाटे चालवावी, नाना वैभवे, कचाटे वाढवावी, हरिकीर्तने करावी, हे समर्थांच्या विरक्तांचे विरोधी असणारे वैशिष्टच आहे. त्याने ध्वनी, लक्ष, मुद्रा, आसने, मत्र, तंत्र, विधोविधाने जशी सांभाळावीत, तसाच समय प्रसंग ओळखण्याचे चातुर्य दाखवावे, असे समर्थांचे सांगणे आहे. असा हा समर्थांचा विरक्त सर्व सद्गुणानी युक्त असून उत्तम वक्ता व ध्येयवादी, डोळस प्रचारक आहे. ही विरक्त लक्षणे म्हणजे समर्थांच्या आंगचे गुणवर्णन करणारे संक्षिप्त आत्मवृत्तच आहे. ज्याला सुख हवे असेल, त्यानें स्वजनासह सर्व विषयांचा त्याग करून रघुनाथ भजनीं लागावे आणि ज्याला दुःख, शीण हवा असेल त्याने विषयसुखांत रमावे, असे समर्थांचे स्पष्ट सांगणे.

विषयजनित जे जे सुख । तेथेंचि होते परमदुःख । । ३–१०–६५ । । विषयजनित सुखे सौख्य होणार नाही । करूणाष्टकें । । असा समर्थांचा दृढ विश्वास आहे. म्हणौन विवेक आणि वैराग्य । ते तो जाणीजे महद्भाग्य । । रामदास म्हणे योग्य । साधु जाणती । । १२–४–२० ।।

वैराग्यावाचून ज्ञान म्हणजे अभिमान, लोभ व दंभ यांचा गोंधळ असे समर्थ सांगतात. वैराग्येवोण ज्ञान । तो व्यर्थचि साभिमान । । लोभदंभे घोळसून । कासावीस केला । । १२–४–९ । । विवेकयुक्त वैराग्य हेच मुक्तीचे साधन आहे, असे ठामपणे त्यांचे प्रतिपादन आहे. विवेके अंतरी सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला । । अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी । । १२–४–१२ । ।

६) **प्रयत्न**

यत्नाला देवपदाची प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे समर्थ हे वेगळे संत आहेत. त्यांचे वाङ्मय इतके प्रेरक, प्रोत्साहक व संजीवक आहे कीं, त्या वाङ्मयाचा उपासक स्वस्थ बसूच शकणार नाहीं. केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे । यत्न तो देव जाणावा । अंतरी धरिता बरे । । हा त्यांचा महामंत्र आहे.

वन्ही तो चेतवावा रे । चेतवताची चेततो । विवेक जाणिजे तैसा । वाढवी तोचि वाढतो । । ही त्यांची चेतवणी आहे.

देव मस्तकीं धरावा । । अवघा हलकल्लोळ करावा । मुलुख बुडवा कीं बडवावा । धर्म स्थापनेसाठी । । क्रांतीचे आवाहन करणारा सशस्त्र क्रांतिकारक नेतासुद्धां

वापरणार नाहीं, अशी ज्वलज्जहाल भाषा या विरक्त योगेश्वरानें वापरलेली पाहून आपण अचंब्यात पडतो.

देवद्रोही तितुके कुत्ते । मारुनी घालावे परते । देवदास पावती फत्ते । यदर्थी संदेह नाहीं । । अशा क्रांतीच्या ठिणग्या त्यांच्या शब्दाशब्दामधून पडत होत्या. म्हणून छत्रपतींचे स्वराज्य सिंहासन साकारले.–

घालून अकलेचा पवाड । व्हावे ब्रह्मांडाहून जाड । येथे कैंचे आणिले द्वाड । करंटेपणा । ।१२–९–२९ । । अशी प्रेरकता या भाषेमध्ये आहे. प्रारब्धाची व दैववादाची भाषा बोलणारे सारे आळशी, दुबळे, कर्तृत्वशून्य व मूर्ख असतात, असे त्यानी ठामपणे म्हटलेले आहे. अचूक यत्न न केल्यामुळें अपयश येते, हे विसरून प्रारब्धाची सबब सांगणे योग्य नव्हे. अचूक यत्न करवेना । । म्हणौनि केले ते सजेना । आपला अवगुण जाणवेना । कांही केल्या । । १२–४–६। समर्थांच्या विजयी भगव्या ध्वजावर विवेक, वैराग्य व प्रयत्न हे शब्दच निरंतर कोरलेंले आहेत . समर्थांच्या कोशांत प्रारब्ध हा शब्द नाहीं. बाराव्या दशकाचा नववा व एकोणिसाव्या दशकाचा सातवा समास यत्न निरूपणाचा आहे. त्यांत समर्थानी या यत्नदेवाचा महिमाच गायिला आहे. या ठिकाणी भोळा भावार्थ उपयोगी पडत नाहीं, असे ते म्हणतात.

हे धकाधकीची कामे । तीक्ष्ण बुद्धीची वर्मे । भोळया भावार्थे संभ्रमे । कैसे घडे । । १७–९–१९ । । यासाठी प्रथम प्रयत्नपूर्वक अभ्यास करून प्रगट व्हावे, प्रगट होवून अपयशी होणे योग्य नव्हे.

अभ्यासे प्रगट व्हावे । नाहीतरी झाकोनि असावे । प्रगट होऊनि नासावे । हे बरे नव्हे । । १९–७–१७ । । लहानथोर काम कांही । केल्यावीण होत नाहीं । करंटया सावध पाही । सदेव होसी । । १२–९–६ । ।

म्हणोन आळस सोडावा । यत्न साक्षेप जोडावा । दुश्चीतपणाचा मोडावा । धारा बळे । । १२–९–८ । ।

## ७) प्रबोध

समाजाचे प्रबोधन करण्याची आवश्यकता नेहमीच भासते. हे प्रबोधन करण्याचे सामर्थ्य थोडया कार्यकर्त्यांच्या ठिकाणी असते. समर्थांना असे कार्यकर्ते तयार करावयाचे होते. परिभ्रमणाच्या काळांत व नंतरही ते जेव्हां जेव्हां संचाराला निघत, त्यावेळी अशा होतकरू, हुशार व उत्साही युवकांचा शोध ते घेत व त्यांची साक्षेपाने निवड करून त्यांना आपल्या सहवासांत सुसंस्कारित करून त्यांच्याकडून समाजप्रबोधन घडवीत असत. महाबळेश्वरहून दिवाकर व त्यांचे बंधू अनंत, कोल्हापूरहून कल्याण (अंबादास) व त्यांचे बंधू दत्तात्रय

आणि अक्काबाई, मिरजेहून वेणाबाई असे उत्तमोत्तम शिष्य व शिष्यीणी समर्थांनी तयार करून त्यांच्यावर ही समाजप्रबोधनाची कामगिरी सोपविली होती व ती त्यांनी अत्यंत यशस्वीपणें पार पाडली असे इतिहास सांगतो. समर्थांचे मठ त्याकाळीं समाजप्रबोधन करणारी शक्तीशाली केंद्रे होती. मठ प्रमुखांना महंत अशी संज्ञा होती. समर्थांनी आपल्या सूक्ष्म व साक्षेपी दृष्टीने नियुक्त केलेले हे महंत म्हणजे समर्थांच्या छोटया प्रतिकृतीच होत्या. त्यामुळे समाजप्रबोधन होवून समर्थ सांप्रदायाचाही अल्पावधीत प्रचंड विस्तार झाला. छत्रपतींच्या स्वराज्य स्थापनेच्या महान कार्यांत या मठांचा सहभाग निश्चितच होता. इतिहासाला तो कांहीसा ज्ञात व पुष्कळसा अज्ञात आहे. तथापि, समर्थांची महताना शिकवण, प्रबोधनाची त्यांची तळमळ, छत्रपति शिवरायांचा त्यानी केलेला उत्स्फूर्त गौरव या सर्व गोष्टींचा निःपक्षपाती व पूर्वग्रहरहीत दृष्टीनें अभ्यास करणाऱ्याला हा सहभाग होता, हे सत्य कधीच नाकारता येण्यासारखे नाहीं. दासबोधातील निःस्पृह, महंत, विरक्त व विवेक लक्षणे समाजांत मिसळून त्यांचे दुःख कमी करण्यासाठी तळमळीनें कार्य करणाऱ्या समाज-कार्यकर्त्यांची लक्षणे आहेत. समाजांत स्वाभिमान जागवावा, नीति न्याय, सत्य, समता यांची वाढ व्हावी. परस्पर सामंजस्य व प्रेमभाव वाढावा, दुःख वाटून घ्यावे, कुणाचेही उणे पडू देवूं नये, ही सर्व महंताना समर्थांची शिकवण होती. हेच राजकारण त्यानी केले. महंताने असेच अनेक कार्यकर्ते तयार करून, त्याना ठिकठिकाणीं पाठवून समर्थ सांप्रदायाचा विस्तार करावा' ही समर्थांची अपेक्षा होती. महंते महंत करावे। युक्तीबुद्धीने भरावे। जाणते करोनी विखरावे। नाना देशी।। ११-१०-२५।। समर्थे समर्थ करावे। तरीच समर्थ म्हणवावे। त्रैलोक्यास पाडिले ठावे। सामर्थ्य ज्याचे।।

समाजाचे प्रबोधन करण्याचे अनेक मार्ग आहेत. तथापि, कोणत्याही मार्गाचा यशस्वीपणे उपयोग करावयाचा असेल, तर सर्वांचे अंतर जाणले पाहिजे, हे मर्म समर्थांनी नेमके हेरले आहे. ते म्हणतात-

प्रबोधशक्तीची अनंत द्वारे। जाणे सकळांची अंतरे। निरुपणे तदनंतरे। चटक लागे।। १५-२-१६।। याहीपेक्षां समुदाय वाढविण्यासाठी दोन अत्यत महत्वाची लक्षणे समर्थांनी सांगितलेली आहेत. ती म्हणजे- १) बहुतांचे मनोगत हाती घेणे, व २) बोलण्यासारखे चालणे, हीच रोकडी प्रबोधनशक्ती, असे त्यानी आपल्या परखड व निश्चयात्मक वाणीने गर्जून सांगितले आहे.

जेणे बहुतासी घडे भक्ती। ते हे रोकडी प्रबोधशक्ती। बहुतांचे मनोगत हाती। घेतले पाहिजे।। १२-१०-३७।। बोलण्यासारिखे चालणे। स्वये करून बोलणे। तयाची वचनेप्रमाणे। मानिती जनी।।३९।। अशा रितीने समाज-

प्रबोधनाची व ती प्रक्रिया अखंड सुरू राहण्यासाठी आपणासारखे अनेक कार्यकर्ते तयार करण्याची जबाबदारी महंतावर सोपवून समर्थांनी समाज सुधारणेचा अचूक मार्ग दाखवून दिला आहे, हेच त्यांचे द्रष्टेपण होय. या सप्त साधनांचा उपदेश हीच दासबोधाची प्रधान शिकवण आहे. प्रबोधन शक्तीचे दुसरे लक्षण जे सांगितले आहे, ते बोलण्यासारखे चालणे. हाच प्रत्यय होय. प्रत्ययावाचून एक शब्दही समर्थ सांगत नाहीत व आपल्या महंताना त्यानी तोच उपदेश केलेला आहे. त्यामुळे प्रत्यय हे वेगळे साधन सांगितले नाही. प्रबोध शक्तीमध्येंच त्याचा अंतर्भाव आहे.

उपसंहार :

समर्थांच्या महा निर्याणाला या वर्षी तीनशेहे वर्षे पूर्ण होत आहेत. या वर्षांत समर्थांची स्मृती जागवण्याचा विविध अंगांनीं प्रयत्न होत आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. वृत्तपत्रांनी व नियतकालिकांनी समर्थांचे विचार, समर्थ चित्रकथा, खास अंक इत्यादि प्रकाशित केले आहेत. व्याख्याने, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादि माध्यमातून समर्थांचे संस्मरण होत आहे. दासबोध पारायणे सुरु आहेत. रामदास प्रबोधन संस्था समर्थांचे वाङ्मय प्रकाशीत करीत आहे. सज्जनगड येथील समर्थ सेवा मंडळाने या कामी आपली सर्व शक्ती वेचलेली आहे. दासबोधाची सार्थ आवृत्ति त्यानी यावर्षी प्रकाशीत केली आहे. समर्थ वाङ्मयाच्या प्रचारासाठी पश्चिम महाराष्ट्र, कोंकण, मराठवाडा व गोवा इत्यादी ठिकाणी दौरा करून समर्थांचा जयघोष सर्वत्र घुमवला. आता उत्तर भारतात दिल्ली येथें त्यांचा दौरा सुरू आहे. तियून बडोदे, इंदोर, ग्वाल्हेर इत्यादि ठिकाणी जाऊन दास नवमीस सज्जन गडावर परत येतील व या त्रिशत–सांवत्सरिक महोत्सवाची सांगता वैभवपूर्ण व भव्य प्रमाणात, मोठ्या उत्साहाने साजरी केली जाईल. अशाच तऱ्हेचे अनेक सोहाळे अखिल भारतात साजरे होतील. महाराष्ट्रात तर अनेक ठिकाणी त्यांच्या जयजयकाराच्या नादाने आकाश भरून जाईल. तथापि ही जागृती तात्कालीक न राहता तिचा ठसा युवकांच्या व विद्यार्थ्यांच्या चित्तावर विशेषत्वाने उमटविण्यासाठी स्थायी स्वरूपाची काही योजना निश्चित करावयास हवी. समर्थांच्या उपदेशामध्यें जातीय स्वरूपाचे अथवा सर्व-धर्म-समभावाच्या भावनेला विरोधी असे कांहींहीं नाहीं, याची खूणगांठ प्रत्येक महाराष्ट्रीयाने आपल्या अंतकरणाशी बांधली पाहिजे. समर्थांच्या वाङ्मयाचा सखोल अभ्यास करणाऱ्या संशोधक विद्वानांनी या सत्याचा सर्वत्र प्रचार व प्रसार केला पाहिजे. महाराष्ट्र शासनाने व सर्व शिक्षण संस्थानी या कामी सक्रिय पुढाकार घेऊन दासबोध मनोबोधातील सुंदर सुंदर सुभाषिते विद्यार्थ्यांच्या दैनंदिन पाठासाठी ठेवण्याचा प्रयत्न करावयास हवा. समर्थांच्या स्मृतीनी, सहवासानी पावन झालेली क्षेत्रे महाराष्ट्रांत अनेक आहेत, त्यांत समर्थांची जन्मभूमी जांब (मराठवाडा),

त्यांची तपोभूमि नाशीक, पंचवटीजवळील टाकळी, त्यांची कर्मभूमी चाफळ व पुण्यभूमि सज्जनगड ही चार क्षेत्रे प्रमुख आहेत. या ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या सहली आयोजित कराव्यात. याशिवाय, दासबोधाचे जन्मस्थान शिवथरचो घळ (जिल्हा रायगड), समर्थांनी स्थापन केलेली अकरा मारुतींची सुप्रसिद्ध स्थाने, इत्यादि ठिकाणीं जाण्यासाठी चांगले पक्के रस्ते व वाहतुकीची सोय व्हावी. समर्थांचे कांहीं वाङमय अद्याप अप्रकाशीत आहे, ते प्रकाशीत व्हावे. दासबोधातील निवडक वेचें सर्वांच्या नित्य पाठासाठी कमीतकमी किंमतीत उपलब्ध व्हावेत. मनोबोधाचीही अशी आवृत्ती प्रकाशीत व्हावी, समर्थांचे फोटो, तैलचित्रे, पुतळे, सर्वांच्या दृष्टीसमोर नित्य राहतील अशी व्यवस्था व्हावी. समर्थांच्या नांवाने कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी एकत्र येवून समर्थांची स्मृति चिरंतन राहील अशा योजना तयार करून त्यांची कार्यवाही करावी. हा झाला सारा बाह्य विचार. अंतरंगही समर्थमय झाले पाहिजे. यासाठी त्यांच्या ग्रंथराजाचे चिंतन करून स्वतःच्या आचार विचारात परिवर्तन घडवून आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न व्हावयास हवा. कोणत्याही सांप्रदायाबद्दल वैरभाव अथवा मत्सर न बाळगतां सर्व सांप्रदाय त्या एकाच सर्वात्मक परमेश्वराचे पूजन करण्याचे विविध मार्ग आहेत, असे मानले पाहिजे. स्वामी विवेकानंदानी म्हटल्याप्रमाणे विविध वासांची व वर्णांची पुष्पे एका हारामध्ये गुंफून तो हार आपण श्री समर्थ चरणीं वाहू या. हीच पूजा समर्थांना अधिक आवडेल. समर्थांचा जयघोष सर्वत्र घुमूं दे. समर्थ कथा ब्रह्मांड भेदून पलीकडे जाऊं दे. सर्वजण एकसुरात गाऊ या–

## जय जय रघुवीर समर्थ

## श्री समर्थ सद्‌गुरु रामदास स्वामी महाराज की जय.

# रामदासांचे समर्थ मानसशास्त्र

— प्रा. भालचंद्र र. मोडक
M. A., Ph. D.

भारतीय तत्त्वज्ञानांत मनाला फार महत्त्व दिले आहे, कारण आध्यात्मिक प्रगति माणसाच्या मनावरच अवलंबून असते. ' दैवी शक्तीने भरलेले मन कुठून बरे उत्पन्न झाले ' असा प्रश्न वेदात एका ऋषीनी विचारला आहे—

दैवं मन: कुतो अधि प्रजातम् ।    ऋग्वेद १.१६४.१८

माणसाचे बंधन व मोक्ष त्याच्या मनावरच अवलंबून असतात असे सांगून उपनिषदात ' मन हेच ब्रह्म आहे ' अशी उपासना करण्यास सांगितले आहे—

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयो: ।
बंधाय विषयासक्तं मुक्त्यै निर्विषयं स्मृतम् ।।
ब्रह्मबिन्दु २, मैत्रायणी ४.४.११

मनो ब्रह्मेत्युपासीत इति अध्यात्मम् । छान्दोग्य ३.१८.१
मनो हि ब्रह्म, मन उपास्व ।    छान्दोग्य ७.३.१

इंद्रियापेक्षा मन श्रेष्ठ आहे असे भगवद्गीतेत सांगितले आहे—

इन्द्रियाणि पराण्याहु: इन्द्रियेभ्य: परं मन: । गीता ३.४२

समर्थ रामदासानी आपल्या ' मनाचे श्लोक ' या ग्रंथात मनाला समर्थ

करण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्गुणामुळे मन दुबळे होते व सद्‌गुणामुळे ते सशक्त होते. म्हणून रामदासानी मनाला दुर्गुणांचा त्याग करण्यास व सद्‌गुणांची वाढ करण्यास सांगितले आहे.

'दुष्ट वासना उपयोगाची नाही, पापबुद्धि मुळीच असू नये; धर्म, नीति सोडू नये, सारासार विचार करावा' असे त्यानीं सांगितले आहे–

मना वासना दुष्ट कामा नये रे ।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।
मना धर्मता नीति सोडू नको हो ।
मना अंतरी सार वीचार राहो ।।४।।

पापी विचार सोडून द्यावा, सत्य आचरणाचा संकल्प करावा, विषयांची कल्पनाःही करू नये, कारण विकारामुळे लोकात छीथू होते असे रामदासानी सांगितले आहे–

मना पापसंकल्प सोडूनि द्यावा ।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा ।
मना कल्पना ते नको वीषयांची ।
विकारे घडे हो जनीं सर्व ची ची ।।५।।

क्रोधामुळे खेद उत्पन्न होतो, कामनेतून अनेक विकार निर्माण होतात म्हणून त्यांचा त्याग करावा. त्याचप्रमाणे गर्व, मत्सर व दंभ सोडून द्यावा असेही त्यांनी सांगितले आहे–

नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नानाविकारी ।
नको रे मदा सर्वदा अंगिकारू ।
नको रे मना मच्छरू दंभभारू ।।६।।

इतरांच्या द्रव्याचा लोभ धरू नये, स्वार्थामुळे पापाचा संचय होतो, दुष्कर्म म्हणजे पाप, व पापाचे फळ दुःख होय असे रामदास सांगतात–

नको रे मना द्रव्य ते पूढिलांचे ।
अतां स्वार्थबुद्धी न रे पाप सांचे ।
घडे भोगणे पाप ते कर्म खोटे ।
न होता मनासारिखे दुःख मोठे ।।९।।

क्रोध, आसक्ति या दुर्गुणांचा त्याग करावा व सज्जनांची संगत धरून मोक्ष साधावा असे रामदासानी सांगितले आहे–

मना कोप आरोपणा ते नसावी ।
मना बुद्धि हे साधुसंगी वसावी ।

मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी ।
मना होई रे मोक्षभागीं विभागी ।।१०७।।

अहंकार फार वाईट, म्हणून रामदास सांगतात–

अहंतागुणे सर्वही दुःख होते ।
मुखे बोलले ज्ञान ते वेर्थ जाते ।
सुखी राहता सर्वही सुख आहे ।
अहंता तुझी तूचि शोधूनि पाहे ।।१६१।।

आसक्ति सोडल्यामुळे माणूस सुखी होतो. म्हणून रामदास सांगतात –

परी संग सोडूनि सूखे रहावे ।।१८७–१९०।।

त्याचप्रमाणे 'विवेके तजावा अनाचार हेवा' ।।६९।। मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा ।।७०।। असेही त्यानी सांगितले आहे.

आध्यात्मिक प्रगतीसाठी सद्‌गुणांची जोपासना करायला हवी. धैर्य, सहनशीलता, नम्रपणा व परोपकार हे सद्‌गुण वाढवावे :–

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे ।
मना बोलणे नीच सोशीत जावे ।
स्वयें सर्वदा नम्रवाचे वदावे ।
मना सर्व लोकांसि रे नीववावे ।।७।।

आपल्या बोलण्यांत व वागण्यांत खरेपणा असावा, खोटेपणा कधीही असू नये असा उपदेश रामदासानी केला आहे :–

मना सर्वथा सत्य सांडू नको रे ।
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे ।
मना सत्य ते सत्यवाचे वदावे ।
मना मिथ्य ते मिथ्य सोडूनि द्यावे ।।१९।।

ईश्वराच्या प्राप्तीसाठी भक्ती व सत्कार्य यांच्यावर रामदासानी जोर दिला आहे :–

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ।
जनीं निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।
जनी वंद्य ते सर्वभावें करावे ।।२।।

रामाची भक्ति करून मनातील दुःख काढून टाकावे असे रामदास सांगतात. देहदुःख तेच सुख मानावे असे सांगून सुख हे मानण्यावर आहे असे

त्यांनी सूचित केले आहे. विवेक करून आपण सदा निजरूपात (आत्मरूपात) असावे असेही त्यांनी सांगितले आहे :-

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी ।
दुखाची स्वयें सांडि जीवी करावी ।
देहेदु:ख ते सूख मानीत जावे ।
विवेके सदा सस्वरुपी भरावे ॥१०॥

सामान्यपणे माणूस " मी म्हणजे हा देह " असे समजतो. म्हणून विवेकाने ही देहबुद्धी सोडून द्यावी व आत्मबुद्धि मनांत भरावी असे रामदासांनी वारंवार सांगितले आहे :-

विवेके देहेबुद्धि सोडून द्यावी ।
विदेहीपणे मुक्ति भोगीत जावी ॥१२॥
विवेके कुडोकल्पना पालटीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥४०॥
देहेबुद्धिचा निश्चयो दृढ जाला ।
देह्यातीत ते हीत सांडीत गेला ।
देहेबुद्धि ते आत्मबुद्धी करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६३॥
देहेभान हें ज्ञानशस्त्रे खुडावे ।
विदेहीपणे भक्तिमार्गेचि जावे ॥१८८॥

देहबुद्धि आहे तोपर्यंत " अहं ब्रह्मास्मि" या महावाक्याचा अनुभव येणार नाही असे रामदास सांगतात :-

देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना ।
तया ज्ञान कल्पांतकाळी कळेना ।
परब्रह्म ते मीपणे आकळेना ।
मनीं शून्य अज्ञान ते मावळेना ॥१९१॥

रामाच्या दृढ चिंतनामुळें देहबुद्धी नाहीशी होते असे रामदासानी सांगितले आहे :-

जगीं धन्य तो रामसूखे निवाला ।
कथा ऐकता सर्व तल्लीन जाला ॥
देहेभावना रामबोधे उडाली ॥
मनोवासना रामरूपी बुडाली ॥१२७॥
नभासारिखे रूप या राघवाचे ।
मनीं चिंचिता मूळ तूटे भवाचे ।

तया पहाता देहबुद्धी उरेना ।
सदा सर्वदा आर्त पोटी पुरेना ।।१९७।।

देवाच्या प्राप्तिशिवाय अन्य कशाचीही, कीर्तीची सुद्धा, आशा करू नय असे रामदास सांगतात :–

मना राघवेवीण आशा नको रे ।
मना मानवाची नको कीर्ति तू रे ।।१८।।

रामदास मनाला विनवणी करतात :–

मना सज्जना हीत माझे करावे ।
रघूनायका दृढ चित्ती धरावे ।
महाराज तो स्वामि वायूसुताचा ।
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ।।२२।।

उपदेश सहसा कुणालाही फारसा आवडत नाही हे रामदासाना माहीत होते. म्हणून ते म्हणतात :–

मना वोट मानू नको बोलण्याचा ।
पुढे मागुता राम जोडेल कैंचा ।
सुखाची घडी लोटता सूख आहे ।
पुढे सर्व जाईल कांहीं न राहे ।।२५।।

साधकाच्या मनांत निर्भयपणा हवा. म्हणून रामदास सांगतात–

भवाच्या भये काय भीतोस लंडी ।
धरी रे मना धीर धाकासि सांडी ।
रघूनायकासारखा स्वामि शोरी ।
नृपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ।।२७।।

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ।
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३०।।

ईश्वर आपणास सहाय्य करतो, संकटात तो आपले रक्षण करतो अ विश्वास मनांत असल्यामुळे भक्तास निर्भयता प्राप्त होते. ईश्वर नेहमी आमच जवळच असतो असा दिलासा देऊन रामदास सांगतात की क्वचित् तो आप परीक्षा करतो–

सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।

सुखानंद आनंद कैवल्यदानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३६।।

रामदास मनाला प्रार्थना करतात की तू चंचलता सोडून दे व राघवातच स्थिर होऊन रहा–

जया वर्णिती वेदशास्त्रे पुराणे ।
जयाचेनि योगे समाधान बाणे ।
तयालागि हे सर्व चांचल्य दीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३९।।

मना सज्जना येक जीवी धरावे ।
जनीं आपुलें हीत तूंवां करावे ।
रघूनायकेवीण बोलो नको हो ।
सदा मानसीं तो निजध्यास राहो ।।४३।।

मनामध्ये नेहमी आत्म्याचा ध्यास असावा असेही रामदासानी सांगितले आहे. 'अती आदरे हा निजध्यास राहो' ।।८१।। कारण हा ध्यास नसेल तर मनांत शोक किंवा संताप निर्माण होतो, आनंद नाहीसा होतो व दुःखामुळे मनांतील निश्चय उडून जातो–

निजध्यास तो सर्व तूटोनि गेला ।
बळे अंतरी शोक संताप ठेला ।
सुखानंद आनंद भेदे बुडाला ।
मनीं निश्चयो सर्व खेदे उडाला ।।६२।।

मनांत विषयवासनारूपी वृत्ति असू नये, निष्काम बुद्धीने रामाचे चिंतन करावे व सर्व कल्पना सोडून द्याव्या असे रामदास सांगतात–

नको वासना वीषई वृत्तिरूपें ।
पदार्थीं जडे कामना पूर्वपापे ।
सदा राम निःकाम चिंतीत जावा ।
मना कल्पनालेश तो ही नसावा ।।५८।।

रामाची भक्ति कल्पवृक्षाप्रमाणे आहे. म्हणून रामाची भक्ति करणाऱ्या माणसाने नेहमी चांगले चिंतन करावे. वाईटाची कल्पनाही मनांत आणू देऊ नये, कारण कल्पवृक्षाखाली उभा राहून माणूस जो विचार करतो, तो खरा होतो–

उभा कल्पवृक्षातळी दुःख वाहे ।
तया अंतरीं सर्वदा तेचि आहे ।।६१।।

रामाची भक्ति कामधेनूप्रमाणे आहे. कामधेनूपुढे ताक मागणे जसे मूर्खपणाचे, तसेच देवाचे ज्ञान करून घेणे सोडून वादविवाद करणे मूर्खपणाचे होय–

घरी कामधेनू पुढे ताक मागे
हरीबोध सांडूनि वेवाद लागे ॥६३॥
' अतो काम त्या राम चित्ती वसेना ' ॥६४॥

म्हणून रामदास सांगतात–

धरी रे मना आदरे प्रीति रामी ।
नको वासना हेमधामी विरामी ॥६५॥

संसाराची चिंता करू नको, राघवाचे चिंतन कर असेही रामदासानी सांगितले आहे :–

मना पावना भावना राघवाचीं ।
धरी अंतरी सोडि चिंता भवाची ॥७९॥

देव हा अन्नदाता आहे. त्याला आमची काळजी असते. त्याचे नाम घेण्यास काहीच खर्च येत नाही. मग नामस्मरण का बरे करू नये असा प्रश्न रामदास मनाला विचारतात :–

जगीं पाहता देव हा अन्नदाता ।
तया लागली तत्वता सार चिंता ।
तयाचे मुखी नाम घेता फुकाचे ।
मना सांग पां रे तुझे काय वेचे ॥९३॥

आध्यात्मिक मार्गात सज्जनांच्या संगतीचे फार महत्व आहे. सत्संगामुळे माणसाच्या मनांत, बोलण्यात व वागण्यांत योग्य बदल होतो :–

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगे ।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।
क्रियेवीण वाचाळता ते निवारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१०८॥

सत्संगामुळे अन्य संग तुटतात, द्वैत नाहीसे होते व बंधनातून माणूस मुक्त होतो.

मना संग हा सर्व संगास तोडी ।
मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी ।
मना संग हा साधका शीघ्र सोडी ।
मना संग हा द्वैत निःशेष मोडी ॥२०४॥

केवळ शाब्दिक ज्ञान असलेले पंडित अहंकाराने वादविवाद करतात. त्यामुळे कुणाचेच हित होत नाही. म्हणून तू शाब्दिक ज्ञानाच्या पलीकडे जा असा उपदेश रामदासानी मनाला केला आहे :–

जनीं हीत पंडीत सांडीत गेले ।
अहंतागुणे ब्रह्मराक्षस झाले ।
तयाहूनि वित्पन्न तो कोण आहे ।
मना सर्व जाणीव सांडूनि राहे ।।११३।।

" श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्ना
नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम्"

असे एक सुभाषित आहे. म्हणून मतमतांतराच्या गलबल्यात पडू नको असे रामदास सांगतात :–

श्रुती न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें ।
स्मृती वेद वेदान्तवाक्यें विचित्रें ।
स्वयें शेष मौनावला स्थीर पाहे ।
मना सर्व जाणीव सांडूनि राहे ।।१५८।।

" म्हणोनी मनातीत होऊनि राहे ।।१२९।। असेही रामदासानी सांगितले आहे. या स्थितीस Supermental State ( मनातील अवस्था ) असे म्हणता येईल.

**Not failure but low aim is crime.**

म्हणून रामदास सांगतात :–

मना अल्प संकल्प तोहीं नसावा ।
मना सत्य संकल्प चित्ती वसावा ।
जनीं जल्प वीकल्प तोही तजावा ।
रमाकांत येकांतकाळी भजावा ।।१३०।।

"आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन ।" "द्वितीयाद् वै भयं भवति ।" असे उपनिषदात सांगितले आहे. रामदास म्हणतात :–

भयें व्यापले सर्व ब्रह्मांड आहे ।
भयातीत ते संत आनंत पाहे ।
जया पाहता द्वैत काही दिसेना ।
भय मानसी सर्वथा ही असेना ।।१३६।।

नित्या नित्यवस्तुविवेक करावा. जगातील सर्व वस्तु नश्वर आहेत हे पहावें. ईश्वर मात्र नित्य आहे. म्हणून " मना संत आनंत शोधूनि पाहे" ।।१४६-१५०।। असा उपदेश रामदासानी केला आहे.

ज्ञानातून वैराग्य निर्माण होते व मनांत अहंकार असेपर्यंत ज्ञानप्राप्ती होत नाही. हे रामदासानी आलकारिक पद्धतीने रूपकाच्या आधाराने असे सुरेख सांगितले आहे :–

जेणे मक्षिका भक्षिली जाणिवेची ।
तया भोजनाची रुची प्राप्त कैंची ।
अहंभाव ज्या मानसींचा विरेना ।
तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना ।।१५९।।

नारदाने भक्तिसूत्रामध्ये " वादो नावलम्ब्य: " असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे रामदास सांगतात :–

नको रे मना वाद हा खेदकारी
नको रे मना भेद नाना विकारी
नको रे मना सीकऊ पूढिलांसि ।
अहंभाव जो राहिला तूजपासी ।।१६०।।

रामदासानी हा जो सारा उपदेश केला आहे, तो ईश्वराच्या साक्षात्कारासाठी. म्हणून ते सांगतात की मनाला विषयांच्या कल्पनेतून सोडवावे व निर्गुण देव ओळखावा. ईश्वराचे ध्यान करताना अन्य कल्पना नाहीशा व्हाव्यात–

मनें कल्पिला वीषयो सोडवावा ।
मनें देव निर्गूण तो वोळखावा ।
मनें कल्पितां कल्पना ते सरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६४।।

देहबुद्धि सोडून विवेकाच्या सहाय्याने आत्म्याची भेट घ्यावी. मनाची वृत्ति आपोआप तदाकार होत नाही. म्हणून प्रयत्नपूर्वक आत्म्याचा शोध घ्यावा–

देहेबुद्धि हे ज्ञानबोधें तजावी ।
विवेके तयें वस्तुची भेटि घ्यावी ।
तदाकार हे वृत्ति नाही स्वभावे ।
म्हणोनी सदा तेंचि शोधीत जावे ।।१७०।।

मन विषयाकार होणे म्हणजे अविद्या आणि मन ब्रह्माकार होणे म्हणजे सुविद्या. आपण विषयांचे चिंतन करू शकतो, अथवा ब्रह्माचे चिंतन करू शकतो. म्हणून विवेकाने ब्रह्माचे चिंतन करून आपण ब्रह्माशी एकरूप व्हावे–

स्फुरे विषयीं कल्पना ते अविद्या ।
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।
मुळीं कल्पना दो रुपें तेचि जाली ।
विवेकें तरी सस्वरूपीं मिळाली ।।१७२।।

देव नेहमी आपल्या जवळच असतो. फक्त त्याला ओळखावे लागते व अखंडपणे त्याच्याशी एकरूप व्हावे लागते. हाच योग होय. असे न केल्यास अहंकारामुळे वियोग उत्पन्न होतो–

सदा सर्वदा राम सन्नीध आहे ।
मना सज्जना सत्य शोधून पाहे ।
अखंडीत भेटी रघूराज योगु ।
मना सांडि रें मीपणाचा वियोगु ।।१८६।।

ईश्वराचा साक्षात्कार झाला की ईश्वर सर्वत्र भरून राहिला आहे असा अनुभव येतो. मीपणाच नाहीसा झाल्यामुळे त्या अवस्थेत साक्षित्वही रहात नाही. तेव्हा शब्दांच्या पलीकडची उन्मनी अवस्था साधकास प्राप्त होते.

कळे आकळे रूप ते ज्ञान होता ।
तेथें आटली सर्वसाक्षी अवस्था ।
मना उन्मनी शब्द कुंठीत आहे ।
तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे ।।२००।।

गुह्य ज्ञान प्राप्त झाल्यावरही साधकाने साधना करावयास हवी. श्रवण, मनन केले पाहिजे. निदिध्यास व सत्संग यांचीही आवश्यकता आहेच असे रामदास सांगतात–

मना गूज रे तूज हे प्राप्त जाले ।
परी अंतरी पाहिजे यत्न केले ।
सदा श्रवणे पाविजे निश्चयासी ।
धरी सज्जनसंगती धन्य होसी ।।२०२।।

रामदासानी मनाला वारंवार ' सज्जना ' असे संबोधिले आहे. ' दुर्जना ' असे कधीही म्हटले नाही. त्यानी ज्या भुजंगप्रयात वृत्तामध्ये ' मनाचे श्लोक ' रचले, ते वृत्त विघडू न देता त्याना ' मना दुर्जना सत्य शोधूनि पाहे ' असे म्हणता आले असते. पण त्यानीं तसे केले नाही, कारण मनाच्या मूलभूत चांगुलपणावर त्यांची श्रद्धा होती. मन मूलत: चांगलेंच असते. विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट कारणामुळे जर मनांत काही दोष निर्माण झाले असतील तर तेवढे दोष काढले

पाहिजेत, म्हणजे मन शुद्ध व स्थिर होते आणि ईश्वराचा साक्षात्कार करून घेण्यास ते समर्थ बनते अशी रामदासांची दृढ धारणा होती.

याप्रमाणे सद्‌गुणांची जोपासना, दुर्गुणांचा त्याग, सत्कार्य, देहबुद्धि सोडून आत्मबुद्धि धारण करणे. निर्भयता, सत्संग, नित्यानित्यवस्तुविवेक, वैराग्य आणि अनन्य भक्ति यांच्या सहाय्याने मन सशक्त बनवावे म्हणजे त्याला ईश्वराचा साक्षात्कार करून घेण्याची योग्यता प्राप्त होते असा उपदेश रामदासानी केला आहे. समर्थ रामदासांचे समर्थ मानसशास्त्र असे आध्यात्मप्रवण आहे.

**जय जय रघुविर समर्थ !**

# दासबोध आणि त्यांतील नेमकी रामदासांची शिकवण

– सु. गु. देशपांडे

‘ दासबोध ’ हा रामदासांचा मानला गेलेला ग्रंथ सध्या उपलब्ध असलेल्या स्वरूपांत स्वत: रामदासांनीं रचला आहे असा परंपराभिमानी रामदासभक्तांचा विश्वास आहे. रामदासनिष्ठा आणि दासबोधनिष्ठा यांचे जे समीकरण रामदासांच्या भक्तमंडळीत आढळते ते असण्याची वस्तुत: कांहीच गरज नाही. ‘ दासबोध ’ म्हणजे खुद्द रामदासांचे शब्द नव्हेत असे मानल्यानें रामदासांविषयींच्या आदरास मुळींच धक्का लागत नाही. उलट, तसे मानल्यास ज्याचे कर्तृत्व रामदासांचे असल्याचे सिद्ध करता येत नाही असा, आणि रामदासांच्या शिकवणीसंबंधी गैरसमज निर्माण करणारा ‘ दासबोधा ’तील भाग बाजूला काढणे आणि त्यातील रामदासांची विश्वसनीय शिकवण कोणती हे ठरविणे शक्य होते. परंपराभिमानी ‘ दासबोध ’–भक्तीमुळे रामदासांचे श्रेष्ठत्व तर सिद्ध होत नाहीच, उलट नको ती मते रामदासांची असल्याचा गैरसमज उत्पन्न होऊन त्यांच्या श्रेष्ठत्वाला काळिमा लागतो. म्हणून ‘ दासबोधा ’ला बिनचूक वेदवाक्य न मानता त्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून त्यातील ‘ रामदासां ’ची नेमकी शिकवण कोणती व त्यांचा नसलेला भाग कोणता याचा शोध घेणे हे खऱ्या रामदास–भक्ताचे कर्तव्य आहे.

आज उपलब्ध असलेल्या दासबोधाचे एकूण स्वरूप पाहाता कांही प्रश्न उपस्थित होतात. 'दासबोध' म्हणजे खरोखरच रामदासांचे शब्द आहेत काय? कीं हा ग्रंथ– निदान त्याचा बहुतांश भाग एखाद्या शिष्यानें किंवा एकाहून अधिक शिष्यांनी रचलेला आहे? दासबोधांतील कांही भाग खुद्द रामदासांचा आणि उरलेला शिष्यांनी रचलेला अशी वस्तुस्थिति आहे काय? तो असल्यास दासबोधांतील नेमकी रामदासांची रचना कोणती? ती खुद्द रामदासांचीच आहे, याला पुरावा काय? अगदी तटस्थपणें या प्रश्नांचीं उत्तरें शोधली पाहिजेत.

'अबद्ध पोथी लेहों नये।' (१४.१.७८) असा स्वत: रामदासांचा दंडक दासबोधांतच नमूद करण्यांत आला आहे. आणि दासबोधाचा बराचसा भाग अबद्ध म्हणजे विस्कळीत आहे ही वस्तुस्थिति दासबोध सहज चाळणाऱ्याच्यासुद्धा लक्षांत आल्यावांचून राहात नाही. 'कवित्व नसावें पाल्हाळ', 'कवित्व असावें अल्परूपें' (१४. ३. १६, ३९) असा दासबोधांतच मांडलेला ग्रंथरचनेचा आदर्श आहे. परंतु खुद्द दासबोधात अनेक ठिकाणी अनावश्यक पाल्हाळ आढळतो. तेव्हा एकतर असे म्हटले पाहिजे कीं स्वत:चेच ग्रंथरचनेचे आदर्श रामदासांनी मोडले, किंवा असे म्हटले पाहिजे कीं दासबोधांतील विस्कळीत व पाल्हाळिक भागाचे कर्ते रामदास नव्हेत. यापैकी दुसरा पर्याय स्वीकारणे अधिक शहाणपणाचे नाही काय?

दासबोधात रामदासांची सर्वसाधारण शिकवण ढोबळमानाने उतरलेली आहे. परंतु त्यांतील प्रत्येक शब्द रामदासांचा आहे, या विश्वासाला आधार नाही. श्रोतृसमुदायापुढे केलेली प्रवचने, जिज्ञासूंनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे, निवडक शिष्यांना केलेले मार्गदर्शन इत्यादींमधून रामदासांची जो शिकवण कानावर आली ती त्या त्या प्रसंगी हजर असलेल्या शिष्यांनीं पुढे स्मरणानें लेखनबद्ध केली असण्याचा संभव आहे. आकलनशक्ति, स्मरणशक्ति, भाषेवरील प्रभुत्व इत्यादींच्या बाबतीत रामदासांचे सगळे शिष्य एकाच योग्यतेचे असतील असें नाही. स्वाभाविक-पणेंच त्या त्या शिष्याच्या वैशिष्ट्याची छाप त्यानें लिहून काढलेल्या समासावर पडली असली पाहिजे.

पाल्हाळ, विस्कळीतपणा आणि अशुद्ध शब्दयोजना हीं दासबोधांत वारंवार आढळणारीं लक्षणें आहेत. परंतु त्याचबरोबर कांही तुरळक समास इतके अपवादात्मक आहेत कीं त्यांमधील नेमकेपणा, शिस्तबद्धता आणि निरपवाद शुद्ध शब्दयोजना पाहून आश्चर्य वाटतें (या संदर्भांत पांचव्या दशकांतील समास ६, ७ व ८ पाहावे.) उदाहरणार्थ, 'कवीश्वर', 'ऋषीश्वर' हें दासबोधांत 'कवेश्वर' 'ऋषेश्वर' अशा अशुद्ध स्वरुपांत आढळणारे शब्द या अपवादात्मक समासांमध्यें मात्र निरपवादपणें त्यांच्या मूळ शुद्ध स्वरुपांत आढळतात. कांही मोजक्या

समासांचीच रचना अशी निर्दोष कां असावी ? हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा असून त्याचें अतिशय काळजीपूर्वक संशोधन व्हावयास पाहिजे. अशी शक्यता आहे कीं, हे समास रामदासांनी स्वत: तोंडानें सांगून एखाद्या चांगल्या शिष्याकडून आपल्या देखरेखीखालीं लिहून घेतले असतील. दुसरी शक्यता अशी कीं हे समास शब्दबद्ध करणारा शिष्य जाणता आणि अनन्यसाधारण स्मरणशक्तीचा असून रामदासांनी जे सांगितले तें त्याने मागाहून स्मरणानें नेटकें आणि नेमकें लिहून काढलें असेल. तिसरी शक्यता अशी कीं शिष्याने लिहिलेले समास निवांत वेळीं रामदासांनी स्वत: नजरेखालून घातले असतील आणि त्यांत आवश्यक त्या दुरुस्त्या करून त्यांचे योग्य संपादन केले असेल.

दासबोधाच्या ८ व्या दशकापासून पुढें कांही समासांमध्यें ‘ रामदास म्हणें,’ ‘ दास म्हणें रघुनाथाचा ’ अशा प्रकारें रामदासांनी स्वत:चा स्पष्ट उल्लेख केला असल्याचें आढळतें. (उदा. ८. ९. ६०, ११. ६. १९, १२. ४. २०, १५. २. ३०, १६. १. २१). शिवाय, या समासांचा विषय अतिशय सूक्ष्म आणि अवघड असूनसुद्धा त्याची मांडणी अतिशय सुरेख आहे. ही वस्तुस्थिति लक्षांत घेतां या समासांचे कर्ते स्वत: रामदास होत असें समजण्यास हरकत नाही.

दासबोधांतील कांही मोजक्या समासांचे कर्ते खुद्द रामदास होत असे मानण्यास जरी वर पाहिल्याप्रमाणे कांही हरकत नसली तरी, त्यातील बराचसा भाग रामदासांनी रचलेला नसून त्यांच्या शिकवणीचे इतरांनी केलेले तें संकलन होय, आणि हे सकलन रामदासांच्या उपस्थितींत करण्यात आलेले नसून मागाहून स्मरणाने केलेले आहे हे सिद्ध करण्यास पुरावे आहेत.

रामदासांचा श्रोत्यांशीं झालेला संवाद तिसऱ्याच व्यक्तीने नमूद केला असल्याच्या सूचक ओव्या दासबोधाच्या ६ व्या दशकातील १० व्या समासांत आढळतात.

> तंव शिष्यें विनविलें । जी हें आतां निरोपिलें । तें पाहिजे वोलिलें । मागुतें स्वामी ।। मज कळाया कारण । केलेंचि करावें निरूपण । येथील जे कां निजखूण । ते मज निरोपावी ।। अजन्मा तो सांग कवण । तेणें देखिला कैसा स्वप्न । तेथें कैसें निरूपण । वोलिलें आहे ।। जाणोनि शिष्याचा आदर । स्वामी देती प्रत्युत्तर । तेंचि आतां अतितत्पर । श्रोतीं येथें परिसावें ।। (६.१०.४६ ते ४९)

हा मजकूर जर रामदासांनी स्वत: शिष्याला लिहून घेण्यास सांगितला असता तर शिष्याच्या प्रश्नानंतर ‘स्वामींनी जे उत्तर दिले तें आतां श्रोत्यांनी काळजीपूर्वक ऐकावें ’ अशी तिऱ्हाइताची नोंद आली नसती. तसेंच ‘स्वामी देती

प्रत्युत्तर ' असा स्वतःचा तृतीय पुरुषी उल्लेख रामदासांनी केला नसता. तर शिष्याच्या प्रश्नानंतर लगेच ' ऐक शिष्या सावधान...' अशी ५० वी ओवी येऊन रामदासांचे उत्तर सुरु झाले असते. हे सर्व लक्षांत घेता या समासाचे लेखन संवादप्रसंगी झाले नसून मागाहून आठवणीने कुणा तरी शिष्याने हा समास लिहून काढला असला पाहिजे.

या संबंधात आणखी एक पुरावा म्हणजे ५ व्या दशकांतील ९ व्या व १० व्या समासांचे विस्कळीत स्वरूप. ९ व्या समासांतील ' साधकलक्षणनिरूपण ' हा विषय १० व्या समासाच्या ८ व्या ओवीपर्यंत चालू आहे. म्हणून खरे म्हणजे ९ वा समास या ओवीशीं संपावयास पाहिजे. आणि पुढच्या ओवीपासून १० वा समास सुरू व्हावयास पाहिजे. आधींच्या समासाचा भलत्याच ठिकाणी शेवट आणि पुढच्या समासाची भलत्याच ठिकाणी सुरुवात लक्षांत घेतां हे दोन्हीं समास रामदास विवेचन करीत असतां लिहिले गेले नसून मागाहून घाईनें व निष्काळजीपणें लिहिले गेले आहेत हें सिद्ध होतें. अर्थात् या समासांची अस्ताव्यस्तता हा ते शिष्यांनी स्मरणाच्या साह्यानें संकलित केले आहेत याचा सबळ पुरावा होय.

स्मरणावर आधारलेलें कोणतेंही संकलन स्वभावतःच अनेक दृष्टींनीं सदोष असतें. असें संकलन करीत असतां ऐकलेल्यापैकीं कांही आठवते तर कांही आठवत नाही; ऐकलेल्या विषय–विवेचनांत कळत–नकळत संकलनकर्त्याच्या पदरचें कांही मिसळले जातें; ऐकलेल्या गोष्टींतील मुख्य – गौणत्वाचे तारतम्य संकलनकर्त्यानें ध्यानांत न घेतल्यास मुख्य शिकवणीपेक्षां गौण गोष्टींवरच संकलनांत अधिक भर दिला जातो. हे सर्वच दोष दासबोधांत विखुरलेले आहेत. अशा प्रकारच्या ऐकलेल्या विवेचनाच्या स्मरणावर आधारलेल्या सदोष संकलनामधून नेमकी रामदासांची यथार्थ शिकवण शोधून काढतांना अतिशय सावधगिरी बाळगली पाहिजे.

दासबोधाच्या मूळ हस्तलिखितांत असणाऱ्या दोषांमध्ये आणखी एका कारणामुळें नव्या दोषांची भर पडली आहे. जुन्या हस्तलिखितावरुन नवी प्रत तयार करीत असतां आधींच्या प्रतींतील कांही शब्द किंवा कांही ओव्या नजरचुकीनें वगळल्या जाऊं शकतात. तसेंच जीर्ण झालेल्या जुन्या प्रतींत कांही शब्द किंवा अक्षरें अस्पष्ट असल्यास किंवा अजिबातच पुसून गेलेली असल्यास नवी प्रत तयार करणारा त्या शब्दांविषयी तर्क करून अंदाजानें त्याला योग्य वाटतील त्या अक्षरांनीं किंवा शब्दानीं त्या जागा भरून काढतो; परंतु हा अंदाज योग्यच असला पाहिजे असें नाही. एखादा शब्द, एखादी मात्रा वगळली गेल्यामुळें किंवा तर्कानें पुसलेल्या जागा भरून काढल्यामुळें दासबोधातील कांही ओव्या कशा निरर्थक झाल्या आहेत किंवा त्यांचा धरून बांधून कांही तरी अर्थ कसा लावावा लागतो हे सिद्ध करण्यासाठी पुढील उदाहरणें पाहा –

१) अश्व वृषभ गाई म्हैसी । नाना पशु स्त्रिया दासी ।
कृपाळूपणें सोडितां त्यांसी । कोणीतरी धरील ।।
तैसा नव्हे नरदेहो । इच्छा जावो अथवा राहो ।
परी यास कोणी पाहों । बंधन करूं सकेना ।।(१.१०.)

गाई–म्हशीसारखे पशु बंधनांत अडकविले जाऊं शकतात, पण नरदेह मात्र स्वाधीन आहे असा या ओव्यांचा अभिप्राय आहे. आतां अश्व, वृषभ, गाई, म्हैसी या नाना पशूंच्या मालिकेत स्त्रिया, दासी कशा बसतील ? स्त्रिया म्हणजे मनुष्यदेह नव्हेत काय ? स्त्रिया दासी हा शब्दप्रयोग येथें अगदींच अप्रस्तुत आणि निरर्थक आहे. मग हा शब्दप्रयोग आढळण्याचे कारण काय असावें ? अशी शक्यता आहे कीं एखाद्या जुन्या हस्तलिखितात 'नाना पशु' या शब्दांपुढील कांही अक्षरें अस्पष्ट किंवा दिसेनाशीं झालीं असतील, आणि 'नाना पशु दासी' एवढेंच वाचता येत असेल. नवी प्रत तयार करणाऱ्या व्यक्तीनें आपल्या बुद्धीप्रमाणें तर्क करून 'दासी' या अक्षरांमागे स्त्रियां हा शब्द असावा असा अंदाज करून तो आपल्या प्रतीत घातला. त्याऐवजी 'दासी' या अक्षरामागे 'श्वाप' हीं अक्षरें जोडलीं असतीं तर 'नाना पशु' या शब्दप्रयोगाच्या पुढें 'श्वापदांसीं' असा सयुक्तिक शब्दप्रयोग आला असता. सध्या आढळणाऱ्या ओवीत 'स्त्रिया दासी' ऐवजीं 'श्वापदांसी' असा बदल केल्यास–

अश्व वृषभ गाई म्हैसी । नाना पशु श्वापदांसीं ।
कृपाळूपणें सोडितां त्यांसीं । कोणी तरी धरील ।।

अशी ओवी होईल. असा बदल केल्यास कसा सयुक्तिक अर्थ लागतो हें समजावून सांगण्याची गरज नाही.

२) हस्त बांधीजे ऊर्णततें । लोभें मृत्य भ्रमरातें ।
ऐसा जो प्रपंचीं गुंतें । तो येक पढतमूर्ख ।। (२. १०. १५)

या ओवींत 'हस्त' म्हणजे हत्ती समजून 'हत्तीला कोळयाच्या जाळयाने बांधावें तसें' वगैरे पहिल्या खंडाचा अर्थ करून एकूण ओवींतून ओढून ताणून कांहीतरी आशय काढला जातो. वस्तुत: सयुक्तिकतेच्या दृष्टीनें विचार करतां 'हस्त' ऐवजीं 'हस्तें' हा शब्द असावयास पाहिजे. कदाचित् जुन्या प्रतींत 'स्त' वरील मात्रा पुसली गेली असेल किंवा त्या प्रतीची नक्कल करणाऱ्या व्यक्तीकडून ती द्यायची राहून गेली असेल. 'हस्त' ऐवजीं 'हस्तें' हा बदल करून ही ओवी वाचल्यास कसा सयुक्तिक अर्थ लागतो पाहा– 'आपल्याच हातांनी म्हणजे स्वत:च जाळें तयार करून त्या आपल्या जाळयाच्या मोहानें कोळी ज्याप्रमाणें त्यांतच गुरफटून अखेर मरतो, त्याचप्रमाणें (आपणच निर्माण केलेल्या) प्रपंचांत जो मनुष्य गुंतून पडतो तो एक पढतमूर्ख होय.'

३) वक्ता म्हणें सावधपणें । सांग ज्ञानाची लक्षणें । तुज कांहीं
लागें करणें । किंवा नाही ।। (६.७.१५)

सगुण सगळेंच नाशवंत असतांना सगुण–भजन कां करावें, या श्रोत्याच्या प्रश्नाचें उत्तर देत असतां ही ओवी आली आहे. ' सगुण सगळेंच नाशवंत आहे ' हें जर यथार्थपणें अनुभवास आलें असेल तर अर्थातच सगुण–भजनाची गरज नाही. पण अशा ज्ञानी व्यक्तीला भूक, तहान वगैरे शरीरधर्मांविषयीं देखील तसाच बोध असावयास पाहिजे. प्रश्नकर्ता या कोटींतील नसल्यामुळें त्याला व त्याच्या- सारख्या इतरांना सगुण–भजन आवश्यक आहे. मोहांध झालेल्या परंतु श्रीकृष्णाला शहाणपणाच्या गोष्टी सांगणाऱ्या गीतेंतील अर्जुनासारखी या प्रश्नकर्त्याची भूमिका आहे; आणि रामदासांनीं त्याला दिलेलें उत्तर श्रीकृष्णानें केलेल्या अर्जुनाच्या कानउघाडणीसारखें आहे. हा आशय ध्यानांत घेतल्यास या ओवींत ' सांग ' या शब्दाऐवजी ' सांगें ' हा शब्द असणे सयुक्तिक होईल. बहुधा मुळांत हाच शब्द तेथें असावा. पण यापूर्वी पाहिलेल्या उदाहरणामध्यें जें ' स्त ' वरील मात्रेच्या संदर्भात झालें असेल तेंच या ओवींत ' ग ' वरील मात्रेबाबत झाले असले पाहिजे. ' सांग ' ऐवजी ' सांगें ' हा शब्द या ओवींत घातल्यास कसा सयुक्तिक आशय व्यक्त होतो पाहा– ' तू मारे ज्ञानाचीं लक्षणें सांगतोस (जणुं कांही तुझा देहबोध लोपलेलाच आहे !); पण बाकीच्या गोष्टी (स्वतःच्या देहबोधामुळें) तुला कराव्या लागतात कीं नाही ? (आणि इतर सगळें जर चालूं आहेच तर मग सगुणभजनच कां सोडावें ? )'

मागें आपण पाहिलेल्या कारणांमुळे ज्या समासांचें कर्तृत्व खुद्द रामदासांवर सोंपविण्यास हरकत नाही, ते समास वगळल्यास उरलेल्या दासबोधांतील रामदासांची शिकवण कशी शोधतां येईल ? त्यासाठीं पुढील तीन निकषांचा आधार घेणें आवश्यक आहे. १) रामदासांची एकूण बुद्धिनिष्ठ विचारसरणी आणि त्यांचा निर्भय स्पष्टवक्तेपणा यांच्याशीं तो भाग सुसंगत आहे काय ? २) ग्रंथरचनेच्या पद्धतीविषयीं खुद्द ' दासबोधा 'तच आढळणाऱ्या रामदासांच्या मताशीं तो सुसंगत आहे काय ? आणि ३) एकाच विषयाच्या दासबोधांत अनेक ठिकाणीं आढळणाऱ्या विवेचनांमध्यें विसंगति असल्यास पहिल्या दोन निकषांच्या आधारें कोणतें विवेचन ग्राह्य वाटते ?

१) रामदासांचा बुद्धिनिष्ठ दृष्टिकोण व्यक्त करणारीं उदाहरणें दासबोधां बरींच आहेत. उदाहरणार्थ,

आतां जें जें देइजेतें । तें तें पुढें पाविजेतें । मेलें माणुस भोजनां
येतें । या नांव भ्रम ।। ये जन्मीचें पुढिलिये जन्मी । कांहीं

एक पावेन मी । प्राप्ती गुंतली मनुष्याचे नामीं । या नांव भ्रम ।। (१०.६.२४, २५)

पुढील जन्मात सुखें भोगता यावींत यासाठी दानधर्म, यज्ञयाग इत्यादि करणाऱ्या आणि करावयास उद्युक्त करणाऱ्या कर्मकांडी लोकांवर, तसेच मेलेला माणूस (श्राद्ध-पक्षादींच्या वेळी) जेवावयास येतो या व अशा प्रकारच्या अंध:श्रद्धांवर येथे रामदासांनी स्पष्ट प्रहार केला आहे.

देहाभिमान कर्माभिमान । जात्याभिमान कुळाभिमान ।
ज्ञानाभिमान । मोक्षाभिमान । या नांव भ्रम ।। (१०.६.२९)

या ओवीत जातिभेद व जन्मजात उच्च-नीचता यांचे नि:संदिग्ध खंडन आढळते.

तसेच,

वैधृति आणि वितिपात । नाना कुमुहूर्ते जात । अपशकुने करी घात । तो येक मूर्ख ।। (२.१.३६)

ही ओवी या संदर्भात अतिशय महत्त्वाची आहे. रामदासांच्या अभिप्रायाच्या नेमका विरूद्ध अर्थ या ओवीचा लावला जातो ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. 'वैधृति, वितिपात इत्यादि कुमुहूर्तावर जो बाहेर जातो आणि शकुन-अपशकुन न पाहिल्यामुळे स्वत:चा घात करून घेतो तो एक मूर्ख होय' असा या ओवीचा ठोकळेबाज अर्थ केला जातो. असा अर्थ करणे अर्थ करणाऱ्यावर असलेल्या अंध:श्रद्धांच्या पगड्याचे आणि रामदासांचा सार्वत्रिक बुद्धिनिष्ठ दृष्टिकोण न समजल्याचे द्योतक आहे. अशा प्रकारच्या ग्रंथातील प्रत्येक शब्दाचा अर्थ अतिशय सावधगिरीने करावयास पाहिजे. 'समूळ ग्रंथ पाहिल्याविण । उगाच ठेवी जो दूषण ।... तो एक पढतमूर्ख '[1] असे दासबोधातीलच वचन आहे. संपूर्ण ग्रंथाचे काळजीपूर्वक अध्ययन करून मागचे पुढचे संदर्भ पाहून मगच कोणत्याहि संदिग्ध ओवीचा अर्थ करण्याचे धाडस करावे. आणि 'शब्दार्थी जाऊंच नेदी'[2] या वचना-प्रमाणे प्रत्येक शब्दाचा काळजीपूर्वक सयुक्तिक अर्थ करण्याची दक्षता घ्यावी. अशा प्रकारची सावधगिरी बाळगून प्रस्तुत ओवीचा अर्थ केल्यास रामदासांचा अभिप्राय पुढीलप्रमाणें आहे असें ध्यानांत येईल : 'सुमुहूर्त, कुमुहूर्त, जातीभेद (आणि तत्संबद्ध जन्मजात उच्च-नीचता), शकुन अपशकुन इत्यादि अंध:श्रद्धांच्या नादी लागून जो मनुष्य घात करून घेतो तो मूर्ख होय.'[3] या ओवीची बांधणी (इतर अनेक ओव्यांसारखी) विस्कळीत आहे हें अर्थातच खरें; आणि तसें असल्यामुळेंच तिचा चुकीचा अर्थ केला जाण्याचीं शक्यता निर्माण होते.

---

१) दासबोध, २.१०.८, २) दास., २.९.२२ ३) दास., १०.६.२० पाहा.

परंतु अंध:श्रद्धांवर सडेतोड प्रहार करणाऱ्या प्रखर बुद्धिनिष्ठ रामदासांवर सुमुहूर्त–कुमुहूर्त, जातिभेद, शकुन अपशकुन यासारख्या अंध:श्रद्धा लादण्यापेक्षां रामदासांची शिकवण ओवीबद्ध करणाऱ्या त्यांच्या निष्काळजी शिष्यांवर अशा ओव्यांच्या विस्कळीतपणाची जबाबदारी टाकणें अधिक शहाणपणाचें आहे.

२) रामदासांची विषयप्रतिपादनाची एक विशिष्ट पद्धत आहे. प्रथमत:, विवेचनासाठी घेतलेल्या विषयासंबंधी असलेल्या अंध:श्रद्धा आणि गैरसमजुती मांडून रामदास त्यांचें खंडन करतात आणि त्यानंतर त्या विषयासंबंधींचा आपला यथार्थ सिद्धांत मांडतात. कोणत्याहि विषयाचे विवेचन करतांना अशी पूर्वपक्ष–उत्तरपक्ष पद्धति वापरणें आवश्यक असल्याचें (आणि अर्थात् त्यांनी स्वत: तिचा उपयोग केला असल्याचें) दासबोधांतच अनेक ठिकाणीं म्हटलेलें आहे. उदाहरणार्थ–

पदार्थेविण संकेत । द्वैतावेगळा दृष्टांत ।
पूर्वपक्षेंविण सिद्धांत । बोलतांचि न ये ।।
आधीं मिथ्या उभारावें । मग तें वोळखोन सांडावे ।
पुढें सत्य तें स्वभावें । अंतरी बाणें ।। (७.३.३,४)

याचा अर्थ पूर्वपक्षाच्या पार्श्वभूमीशिवाय सिद्धांत मांडतांच येत नसून आधीं चुकीचें मत मांडून तें खोडून काढल्यानंतर आपोआपच सत्याचें आकलन होतें असे रामदासांनीं स्पष्ट म्हटलें आहे.

सिद्धांत साधायाकारणें । पूर्वपक्ष लागे उडवणें । ... (१०.९.२९)

या ओवींतहि तोच अभिप्राय आहे. तसेंच –

नाना पूर्वपक्ष सिद्धांत । प्रत्ययो पाहावा नेमस्त ।
अनुमानाचें खस्तवेस्त । बोलोंचि नये ।। (१९.२.४)

येथें देखील पूर्वपक्ष – सिद्धान्त या पद्धतीनें शिस्तबद्ध विषयप्रतिपादन करण्याविषयींचा रामदासांचा कटाक्ष व्यक्त झालेला आहे.

या प्रकारच्या विषयप्रतिपादनांतून नेमका अभिप्राय शोधून काढतांना घ्यावयाच्या खबरदारीबद्दल दासबोधांतच पुढील ओवी आढळते –

पूर्वपक्ष कोठून कोठवरी । वाच्यांश लक्ष्यांशाची परी ।
सूक्ष्म नाना विचार करी । धन्य तो साधू ।।(१७.४.९)

पूर्वपक्ष कुठून कुठपर्यंत आहे आणि विवेचनकर्त्याचा सिद्धान्त कुठून कुठपर्यंत आहे याचा बारकाईनें विचार करण्याची आवश्यकता या ओवीत सांगितली आहे.

पूर्वपक्ष नेमका कोणता आणि उत्तरपक्ष किंवा सिद्धांत नेमका कोणता हें नीट न कळल्यास कशी गल्लत होते याविषयीं एक मार्मिक उदाहरण दासबोधांतच आहे. एक श्रोता रामदासांना विचारतो, " शुक आणि वामदेव हे दोघेच मुक्त असून बाकीचे सगळे बद्ध आहेत असें श्रुतिवचन आहे. त्यावर अविश्वास कसा करावा ? ... ... आपण वेद मिथ्या आहे असें म्हणतां काय ?" यावर रामदास उत्तर देतात, " वेदांनीं सांगितलेला तो पूर्वपक्ष आहे; परंतु मूर्ख त्यावरच लक्ष केन्द्रित करतात (म्हणजे त्यालाच सिद्धांत समजतात). मात्र साधु आणि ज्ञानी यांना तें पटत नाही (७.६.१९,२०,२६,२७.)

दासबोधांतील कांही समासांमध्यें श्रोत्याचा प्रश्न कुठून कुठंपर्यंत आहे· आणि रामदासांचा सिद्धांत नेमका कुठें सुरू होतो हें स्पष्टपणें दाखविणारे शब्दप्रयोग आहेत. उदाहरणार्थ, ८ व्या दशकांतील २ ऱ्या समासांत ' आशंका ।' या शब्दाचा वेगळा उपयोग करून ४ थ्या ओवीपासून २४ व्या ओवीपर्यंत श्रोत्याचा प्रश्न मांडला असून आतां येथून उत्तर सुरू होत आहे असें सुचविणाऱ्या ' श्रोतां व्हावें सावधान ' या २५ व्या ओवींतील शब्दप्रयोगापासून रामदासांचे उत्तर नमूद केलेलें आहे. उलट, कांही समासांमध्यें असे सूचक शब्दप्रयोग नसून त्या समासांची एकूण रचनाच अस्ताव्यस्त आहे. त्यामुळें रामदासांचें मत नेमकें कोणते हें शोधणें कठिण होतें. उदाहरणार्थ, ५ व्या दशकांतील १ ल्या समासांत श्रोत्याचें मत आणि रामदासांचे मत यांना पृथक् करणारी कोणतीहि शब्दयोजना नसल्यामुळें पूर्वपक्षालाच सिद्धांत समजण्याची चूक घडू शकते.

ज्या समासांमध्यें पूर्वपक्षाची सुरुवात व शेवट स्पष्ट करणारे शब्दप्रयोग नाहीत त्या विस्कळीत समासांच्या संदर्भांत पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष यांच्यांत गल्लत होऊं शकते. अशा तऱ्हेच्या समासांचे अतिशय विवेकानें व बारकाईनें विश्लेषण न केल्यास खोडून काढण्यासाठी म्हणून मांडलेल्या पूर्वपक्षालाच रामदासांचा सिद्धांत समजून भलत्याच मताचें खापर त्यांच्या डोक्यावर फोडण्याचा अक्षम्य प्रमाद घडेल.

पूर्वपक्ष व उत्तरपक्ष यांचें यथातथ्य विश्लेषण न केल्यास संतांच्या शिकवणीचा कसा विकृत अर्थ केला जाऊं शकतो हे दाखविण्यासाठीं दासबोधांतीलच एक उदाहरण घेऊं. १७ व्या दशकांतील ४ थ्या समासांत अशी एक ओवी आहे–

ज्यां इंद्रियांस जो भोग । तो तो करी यथासांग ।
ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ।। (१७.४.२८)

'इंद्रियांच्या नैसर्गिक प्रवृत्तीनुसार त्या त्या इंद्रियास त्याचा त्याचा भोग यथासांग दिला पाहिजे; कारण इंद्रियें, त्यांचे विषय आणि त्या त्या विषयांकडें

असलेली त्या त्या इंद्रियांची नैसर्गिक प्रवृत्ति याविषयींचे नियम ईश्वरानेंच निर्माण केलेले असल्यामुळें त्या नियमांचा भंग केल्यास ईश्वराची अवज्ञा होऊन जगरहाटीच बंद पडेल' असा या ओवीचा भावार्थ आहे. आतां, मुळांतच विषयासक्त असलेल्या माणसाला रामदासांसारख्या थोर संतानें ईश्वराच्या शिक्क्यामोर्तबानिशीं जर इंद्रियभोगाचा परवाना दिला तर मग तर विचारायलाच नको ! 'आधींच मर्कट, तयांतहि मद्य प्याला !' आपल्या नैसर्गिक भोगलोलुपतेचें समर्थन करणारी ही ओवी सोयीची असल्यामुळें रामदासांनींच इंद्रियभोगाची शिकवण दिली आहे असें म्हणायलाहि भोगासक्त लोक मागें पुढें पाहाणार नाहीत. परंतु त्यांचा भ्रमनिरास पुढच्याच ओवींत होतो. आधींच्या ओवींत मांडलेलें मत ज्यांचें आहे त्यांना उद्देशून रामदास लगेंच म्हणतात –

... वेड लागलें जें बटकीं । तें भलतेंचि बोलें ।। (१७.४.२९)

अर्थातच येथें हें अगदीं स्पष्ट आहे कीं इंद्रिय-भोगाचे समर्थन करणारी जो ओवी या समासांत आलेली आहे ती एका हानिकारक गैरसमजाचें निरसन करण्याच्या उद्देशानें पूर्वपक्षाच्या स्वरूपात आली असून पुढच्याच ओवींत या पूर्वपक्षाचें खंडन झालेलें आहे.

३) दासबोधांत एकाच विषयाचें विवेचन निरनिराळ्या ठिकाणी आलें आहे. आणि कांही विषयांच्या संदर्भांत एका ठिकाणचें विवेचन इतर ठिकाणी असलेल्या विवेचनांशी अगदीं विसंगत असल्याचें आढळतें. उदाहरणार्थ, ५ व्या दशकाच्या १ ल्या समासांतील ६ ते १८ या ओव्यांमध्यें आढळणारें ब्राह्मणाच्या जन्मजात श्रेष्ठत्वाचे वर्णन दासबोधांत इतरत्र आलेल्या विवेचनाशीं अगदींच विसंगत आहे. इतरत्र आढळणारीं दासबोधांतील अशीं कांही उदाहरणें पाहा –

करिती ब्रह्मनिरूपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
तेचि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद ।। (६.४.२४)

(जातीनें ब्राह्मण असणारे यथार्थ ब्राह्मण नसून) जे ब्रह्म जाणतात आणि ब्रह्मनिरूपणांत रत असतात तेंच खरे ब्राह्मण होत, असा या ओवीचा निःसंदिग्ध आशय आहे.

उंच नीच म्हणों नये । ... इ. (१९.२.१८)

या ओवींत देखील जातींचें उच्च-नीचत्व रामदासांना अमान्य असल्याचें स्पष्ट दिसतें.

१४ व्या दशकांतील ७ व्या समासांत तर उघड उघडच केवळ जातीनें ब्राह्मण असणारांची रामदासांनी निंदा केली आहे.

अशा परिस्थितींत सारासारविवेकानें रामदासांच्या एकूण बुद्धिनिष्ठ विचारसरणींत जें बसेल तेंच रामदासांचे मत मानलें पाहिजे.

दासबोधांतील नेमकी रामदासांची शिकवण शोधून काढण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या ज्या निकषांचे आतांपर्यंत विवेचन केलें आहे त्या निकषांचें उपयोजन करून दासबोधांतील एका अत्यंत विस्कळीत आणि गैरसमज निर्माण करणाऱ्या समासाचें विश्लेषण करूं. हा समास म्हणजे ५ व्या दशकातील १ ला समास होय.

जन्मजात ब्राह्मण म्हणजेच गुरु हा रूढीनें जनमानसांत दृढमूल झालेला गैरसमज दूर करून यथार्थ गुरुस्वरूपाचा निश्चय करणें हा या समासाचा उद्देश आहे. परंतु या समासाच्या सुरुवातीस बुद्धीला न पटणाऱ्या आणि रामदासांच्या बुद्धिनिष्ठ दृष्टिकोणाशीं विसगत असा आशय व्यक्त करणाऱ्या कांही ओव्या आहेत. उदाहरणार्थ,

गुरु तों सकळांसी ब्राह्मण । जरी तो जाला क्रियाहीन ।
तरी तयासींच शरण । अनन्यभावें असावें ।। (५.१.६)

जातीनें ब्राम्हण असलेला मनुष्य क्रियाहीन म्हणजे नीतिभ्रष्ट जरी असला तरी तोच सर्वांना गुरुस्थानीं असून त्यालाच अनन्यभावानें शरण जावयास पाहिजे असा या ओवीचा अर्थ आहे. पुढें—

असो ब्राह्मणां सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडे किती ।
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ।। (५.१.१५)

या ओवींत ' ब्राह्मण मूढमति म्हणजे मूर्ख असला तरी तो जगद्वंद्य होय ' असे म्हटलें आहे. या समासातील ६ व्या ओवीपासून १८ व्या ओवीपर्यंत ब्राह्मणाच्या जन्मजात श्रेष्ठत्वाचें वर्णन असून ' ब्राह्मण सर्वांना पूज्य अशी वेदाज्ञा आहे (५.१.१०)' आणि परंपरेनें चालत आलेल्या लोकाचाराविरुद्ध असलेले वेदांनी अव्हेरले असून त्याला पाषांडमत नांव ठेवलें आहे (५.१.१७), अर्थात वेदाज्ञेवर आधारित जन्मजात ब्राह्मणाला गुरु मानण्याचा लोकाचार न पाळणारा धर्मभ्रष्ट होय असा आशय या ओव्यामधून व्यक्त होतो. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या ओव्यामध्यें रामदासांचेच मत व्यक्त झाले आहे असें समजून विवेकशून्य रामदासभक्त या अनिष्ट मताचें समर्थन करतात.

ब्राह्मणाच्या जन्मजात श्रेष्ठत्वावरील विश्वास रामदासांच्या एकूण बुद्धिनिष्ठ विचारसरणींत बसत नाही आणि या विषयाच्या दासबोधांत इतरत्र आलेल्या विवेचनांशी तो विसंगत असून मागें स्पष्ट केलेल्या कारणांसाठी तें रामदासाचें मत नव्हे हें सिद्ध झालेलेंच आहे. परंतु रामदासांच्या मताविषयींचा या संदर्भातील गैरसमज कायमचा नष्ट करण्यासाठीं पूर्वपक्ष — उत्तरपक्ष पद्धतीविषयींच्या

निकषाचा आधार सर्वांत अधिक महत्त्वाचा असून त्याच्या साह्यानें या वादग्रस्त विषयाचा निश्चित निर्णय करता येतो.

इतर ठिकाणांसारखीच या समासांत देखील रामदासांनी पूर्वपक्ष–उत्तरपक्ष ही विवेचनपद्धति वापरली आहे हे कुणाही सुबुद्ध व्यक्तीच्या सहज लक्षात येईल. यथार्थ गुरु कोण, हे रामदासांना समजावून सांगावयाचे असल्यामुळे गुरूसंबंधींच्या ज्या भ्रामक व अनिष्ट गैरसमजुती जनमानसांत आहेत त्यांचे आधी त्यांनी वर्णन केलेले आहे. अर्थात या समासातील ६ व्या ओवीपासून १८ व्या ओवीपर्यंत आलेले ब्राह्मणाच्या जन्मजात श्रेष्ठत्वाचे वर्णन हा खोडून काढण्यासाठी रामदासांनी मांडलेला पूर्वपक्ष आहे. आणि–

ब्राह्मणें पाविजे देवाधिदेवा । तरी किमर्थ सद्‌गुरू करावा ।
ऐसें म्हणाल तरी निजठेवा । सद्‌गुरूवीण नाही ।। (५.१.१९)

या पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष यांच्या सीमारेषेवरील १९ व्या ओवीपासून रामदासांचा उत्तरपक्ष– त्यांचा यथार्थ गुरूविषयींचा सिद्धान्त– सुरू होत असल्याचे स्पष्ट दिसते (तसेच 'ब्राह्मण' आणि 'सद्‌गुरू' भिन्न असल्याचेहि ओघातच येथें सुचविले आहे.) २० व्या ओवीपासून पुढे पूर्वपक्षाचे (म्हणजे गुरूविषयींच्या चुकीच्या मताचे) खंडन करीत करीत यथार्थगुरूविषयींचा सिद्धान्त मांडण्याचा प्रयत्न केला आहे. २० व्या ओवीपासून सुरू होणाऱ्या या समासाच्या उत्तरार्धात वस्तुत: फक्त पूर्वपक्षाचे खंडनच आले असून रामदासांचा याविषयींचा सिद्धान्त (म्हणजे उत्तरपक्ष) पुढील म्हणजे २ ऱ्या समासांत समाविष्ट आहे.

ब्राह्मणाच्या जन्मजात श्रेष्ठत्वाचे वर्णन रामदासांनी पूर्वपक्षरूपात मांडले असून त्याचे खंडन करण्याचा त्यांचा अभिप्राय आहे हे सिद्ध करण्यासाठी काही उदाहरणे घेऊ–

स्वधर्मकर्मी पूज्य ब्राह्मण । परि ज्ञान नव्हे
सद्‌गुरूविण ।... (५.१.२०)

या ओवीत नानाप्रकारच्या धर्मकर्मासाठी ब्राह्मणाचा कितीहि उपयोग होत असला तरी (ज्यासाठी गुरू आवश्यक आहे ते) ज्ञान मात्र यथार्थ गुरूशिवाय होऊ शकत नाही असा आशय व्यक्त झाला आहे

नाना साधनें बापुडीं । सद्‌गुरूविण करिती वेडीं ।
गुरूकृपेविण कुडकुडीं । वेर्थचि होती ।। (५.१.२४)

यथार्थ गुरु नसतां ( कर्मकांडाचा उपदेश करणाऱ्या ब्राह्मणांच्या सल्ल्यानें ) जी नाना साधनें वेडे लोक करतात तीं व्यर्थ होत असें येथें नि:संदिग्धपणें म्हटले

आहे. २५ व्या ओवीपासून ३१ व्या ओवीपर्यंत अशा प्रकारच्या व्यर्थ व्रत – साधनांचें वर्णन आहे. आणि –

> यज्ञादिकें कर्मे केलीं । हृदयी फळाशा कल्पिलीं ।
> आपले इच्छेनें घेतली । सूति जन्माची ।। (५.१.३२)

या ओवीत (ब्राह्मणांनी उपदेशिलेलीं) सकाम कर्मे करणारे मनांत फळाशा बाळगत असल्यामुळें स्वतःच पुनर्जन्माला कारणीभूत ठरतात (अर्थात् ब्राह्मणांचा मोक्ष मिळविण्यासाठी तर उपयोग नाहीच, तर उलट अधिकाधिक बंधनात अडकविण्यास ते कारणीभूत ठरतात) असा आशय आहे. यथार्थ गुरूच्या अभावी ( आणि सकाम कर्मांचे अनुष्ठान करावयास सांगणाऱ्या ब्राह्मणाच्या नादीं लागल्यामुळें) ' ...भलतीचकडे वावडे । जैसें आंधळे चाचरोन पडे । गारीं आणी गडदरीं ।। (५.१.३७) अशी अवस्था होते असें पुढें म्हटले आहे.

या उदाहरणांवरून हें निःसंशय सिद्ध होतें कीं ब्राह्मणानें जन्मजात गुरुत्व तर रामदासांना मान्य नाहीच, उलट अशा अज्ञानी ब्राह्मणांच्या उपदेशानुसार कर्मे करणारा आपणच आपला घात करून घेतो असें त्यांचें निःसंदिग्ध मत आहे.

आतांपर्यंत ज्याचें विश्लेषण केलें त्या दासबोधांतील ५ व्या दशकांतील १ ल्या समासाची रचना अस्ताव्यस्त असल्यामुळें पूर्वपक्ष आणि सिद्धांत यांच्यांत गल्लत केली जाऊन जे मत खोडून काढण्यासाठीं रामदासांनीं मांडलें आहे त्यालाच त्यांचा स्वतःचा सिद्धांत समजला जाणें संभवतें आणि तसें समजणें ही एक अक्षम्य चूक होईल. या समासाच्या विस्कळीतपणाची जबाबदारी रामदासांवर नसून अशा विस्कळीतपणाचीं कारणें कोणती असावींत याचें तपशीलवार विवेचन आधीं केलेंच आहे.

' दासबोध ' म्हणजे साक्षात् रामदासांच्या मुखांतून निघालेले शब्द होत हा निराधार विश्वास बाजूला ठेवून रामदासांची प्रखर बुद्धिनिष्ठ विचारसरणी, पूर्वपक्ष–उत्तरपक्ष या स्वरूपाची त्यांची विषय– प्रतिपादन पद्धति, आणि दासबोधातील मागचे–पुढचे संदर्भ या गोष्टी ध्यानांत घेऊन सारासारविवेक केल्यासच दासबोधांतील नेमकी ' रामदासांची ' शिकवण कोणती याचा निर्णय करता येईल.

**जय जय रघुवीर समर्थ !**

# समर्थ रामदास : आदर्श पुरूष त्यांच्या तत्त्वज्ञानाची आजच्या काळात आवश्यकता

– डॉ. सौ. मंगला वैष्णव

निरनिराळ्या कालखंडात निरनिराळे संत भारतात होऊन गेल्याचे इतिहासावरून लक्षात येते. "यदा यदाही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत" हे श्रीकृष्ण-वचन सत्य असल्याची खात्री पटते. व्यास, वाल्मिकी, पाराशर, पुलस्त्य, भीष्माचार्य यांच्या भरत खंडात ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, कबीर, तुलसीदास, मीराबाई, इ. संत होऊन गेले. शंकराचार्य, मध्वाचार्य, चक्रधर, बसवेश्वर इ. संप्रदाय-प्रवर्तकही होऊन गेले. भारतीय मन हे मुमुक्षू मन आहे. पारमार्थिक जीवनाची त्याला उपजतच आवड आहे. जन्ममरणाच्या फेऱ्यातून स्वतःची सुटका करून घेण्याची त्याची धडपड आहे. साऱ्या संतांनी, संप्रदाय प्रवर्तकांनी, त्यांच्या त्यांच्या काळात मरगळलेल्या समाजमनाला चैतन्य दिले. समाजाला योग्य दिशा दाखविणे हेच जणू संतांच्या जीवनाचे ध्येय होते. या साऱ्या संतांमध्ये समर्थ रामदासांचे वेगळेपण एकमेवाद्वितीय आहे. आपले जीवनविषयक तत्त्वज्ञान समर्थांनी वेगळ्या ढंगाने लोकासमोर ठेवले. वेगळ्या तत्त्वज्ञानाच्या शिकवणुकीची ध्वजा आपल्या हातात घेऊन या दिंडीत सामील होण्याचे आवाहन समाजाला केले. प्रयत्नवादात

सामील करून घेतले. त्यांच्या या प्रयत्नांना योग्य अशी फळे आल्याचे त्यांनी पाहिले. उराशी बाळगलेले आनंदवनभुवनाचे, महाराष्ट्र धर्माचे स्वप्न त्यांच्यासमोरच सत्यरूपात प्रकटले.

प्रचलित जीवनाला वेगळेपणाची जाणीव देणारे तत्वज्ञान लोकांना सांगण्यासाठी समर्थ रामदास का उद्युक्त झाले असलें पाहिजेत ? त्यांच्या काळातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती या बदलासाठी कारणीभूत झाली असेल काय ?

**तत्कालीन परिस्थिती :**

महाराष्ट्रातच काय पण संपूर्ण भारतात यवनी राजसत्तेचा फार जोर होता. वेगळा धर्म आणि वेगळ्या जातीचा मोठेपणा मिरविणारी राजसत्ता आपली पाळेमुळे खोलवर रुजवून होती. उत्तरेत मोगल राजसत्ता, तर दक्षिणेत निझामशाही– आदिलशाही. एकूण काय ? भारतभर परकीय अंमल. राज्यकर्ते असलेले यवन भारतीय लोकांपासून आचार, विचार, ध्येय, नीती, संस्कृती साऱ्याच बाबतीत भिन्न होते.

राज्यकर्त्यांचा परिणाम समाजाच्या आचार, विचार, राहणीमान, संस्कृती. भाषा यावर होत होता. धर्मप्रसार करणे हे यवनांचे ध्येय होते. त्यासाठी ते साम, दाम, दंड, भेद इत्यादींचा उपयोग करीत. कधी सामोपचाराने तर कधी बळजोरीने हिंदूना बाटवून यवनी धर्माची दीक्षा दिली जाई. या अशांत परिस्थितीने समाज विस्कळीत झाला होता. ढोंगीपणा, भोंदूपणा, मानभावेपणा वाढला होता. कोणास कोणाविषयी प्रेम, माया, आपुलकी राहिली नव्हती. देश, देव, धर्म याविषयी सर्व माणसे उदासीन झाली होती. कायम गुलामगिरीत राहिल्याने माणसांची मने स्वाभिमानशून्य झाली होती. जीवनात औदासिन्याने घर केले होते. स्वधर्म, स्वभाषा लयास गेल्यासारख्या होत्या. नाना मते आणि नाना विचारांचे साम्राज्य निर्माण झाल्यामुळे कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही अशी स्थिती होती. भय, चिंता, अस्थिरता, दारिद्र्य, पारतंत्र्य, भ्रष्टाचार या साऱ्या गोष्टींनी समाज हीन–दीन बनला होता. समाजमनात स्थिरता, स्वस्थता, निश्चितता नव्हती. तीर्थक्षेत्रे भ्रष्ट करणे, बायका पोरे बाटविणे, स्त्रिया पळविणे, गुलाम बनविणे अशी कामें सर्रासपणे परधर्मीय राज्यकर्ते आणि त्यांचे पाईक करीत होतेच, शिवाय त्यांच्या पदरी असलेले हिंदू सरदारही स्वार्थासाठी लाचारीने त्यांच्या कृत्यास हातभार लावीत होते. सत्तेसाठी नीच स्पर्धा, पैशासाठी संघर्ष, स्वार्थासाठी भयंकर द्वेष, विषयभोगासाठी अनाचार यांचे थैमान चालू होते. जे राजदरबारात नव्हते असे व्यापारी आणि धनिक अत्यंत लाचारीने वागून स्वतःची तुंबडी भरीत होते.

'विश्वाची चिंता' करणाऱ्या नारायणाने ही परिस्थिती अवलोकिली होती. अंतर्मुख होऊन यातून मार्ग कसा काढावा याचा विचार त्यांच्या मनात सुरु होता. या परिस्थितीकडे केवळ औदासिन्याने न पाहता स्वधर्म आणि परमार्थ ज्या प्रवृत्तिधर्मावर अवलंबून आहे तो प्रवृत्तिधर्म आणि त्या प्रवृत्तिधर्माची एक प्रतिक्रियाशिल परिणती म्हणजे राजकारण याचा आश्रय करून सांगणारी एखादी प्रभावशाली विचार–परंपरा निर्माण केली पाहिजे या विचाराने त्यांना त्रस्त केले होते. केवळ परमार्थ आचरून स्वतःचाच फक्त उद्धार करून घेण्यापेक्षा या दिशाहीन झालेल्या समाजाला मार्ग दाखविणे आपले कर्तव्य आहे याची जाणीव समर्थ रामदासांना झाली. त्याप्रमाणे त्यानी आपला स्वतःचाच असलेला परमार्थ–मार्ग कांहीसा सोडून साऱ्या समाजाला परमार्थ, प्रपच, राजकारण, समाजकारण, व्यवहार इ. विषयक धडे देण्यासाठी वेगळे असे तत्वज्ञान सांगितले.

समर्थांच्या पूर्वीच्या संतांनी ज्ञान, भक्ती आणि कर्म यांना समन्वित करणारी परंपरा निर्माण केली होती. भक्तीच्या प्रांगणात समाजात स्थित असलेले भेदाभेदाचे, उच्चनीचतेचे, जातीयतेचे कवच गळून पडले होते. केवळ पारमार्थिक ज्ञान प्राप्त करून घेण्याचा त्या संतांचा तो प्रामाणिक प्रयत्न होता. परंतु फक्त एवढेच करून विस्कटलेल्या समाजाची घडी स्थिर होणार नाही याची समर्थ रामदासांना कल्पना आली. केवळ उद्धार करून भागणार नाही तर सर्वांगीण लोकोद्धार केला पाहिजे, या जाणिवेने त्यांनी नवीन विचार आपल्या कृती – उक्तीतून लोकांसमोर, समाजासमोर ठेवला. समाजाची केवळ पारमार्थिक काळजी समर्थांना वाहावयाची असती तर नवीन संप्रदाय निर्माण करण्याची आवश्यकता नव्हती. केवळ परमार्थापेक्षा वेगळे काही सांगावयाचे होते म्हणून त्यानी नवीन ईर्षा, नवीन विचारधारा, नवीन पुरूषार्थ सांगणारा, तरीही वैदिक परंपरेचा धागा न सुटू देणारा नवीन संप्रदाय सांगितला. यापूर्वीच्या संतांनी जसा केवळ निवृत्तीधर्माचा पुरस्कार केला होता तसाच कदाचित रामदासानीही केला असता. पण तीर्थयात्रेच्या निमित्ताने भारतभर भ्रमंती करीत असतांना वर सांगितल्याप्रमाणे समाजाची दुर्दशा पाहून त्यांचे संवेदनशील मन द्रवले व ते नवा विचार करण्यास आणि सांगण्यास प्रवृत्त झाले. आधीच्या बहुतांश संतांनी संसाराला, प्रपंचाला परमार्थाचा अडसर मानला. त्यामुळे त्यांची व त्या मार्गावरून जाऊ इच्छिणाऱ्या लोकांच्या मनातील विजीगिषा, पुरूषार्थ, पराक्रम आणि ऐहिक जीवनाविषयीची आत्मीयता क्षीण होत गेली. त्याचा परिणाम म्हणून राष्ट्रजीवन आणि स्वधर्म धोक्यात आला.

लोकसंस्थेच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी आवश्यक असलेला प्रयत्नवाद, पुरूषार्थ, सावधानता, विवेक, स्वसत्ता याची चाड लोकांना राहिली नाही.

वैयक्तिक पुण्यासाठी भक्ती आणि अखंड भक्ती करण्यात लोक स्वतःस धन्य मानू लागले. त्यामुळे 'टाळकुटे' हे विशेषण त्यांना लावले जाऊ लागले. भक्तिमार्गाची ही अवकळा समर्थांना मान्य नव्हती. हे सारे बदलले पाहिजे असे सतत जाणवत होते. मरगळलेल्या मनात संजीवन ओतायचे होते. डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या शब्दात सांगावयाचे तर "भागवत धर्मातील सन्यासिनी भक्तीला सुवासिनी करावयाचे होते." समाज बदलण्यासाठी आपली तत्वज्ञानाची चतुःसुत्री त्यांनी सांगितली. परंतु केवळ चारच सूत्रात समर्थांचे जीवनतत्वज्ञान पूर्ण होत नाही तर मानवीजीवन आणि समाजजीवन यांच्या प्रत्येक अंगाला आपल्या विचार परिसाचा स्पर्श करून ते सुवर्णमय बनविले. आध्यात्मिक, पारमार्थिक, प्रापंचिक, गोष्टीतील कोणतीही गोष्ट त्यांच्या विचारधारेतून बाजूला राहिली नाही. इतके सूक्ष्म अवलोकन आणि चिंतन समर्थांनी केले होते.

त्यांनी ज्ञानेश्वर नामदेवादि भागवत संतांच्या कार्याला कालमानानुसार परिस्थितीनुरूप नवी दिशा दिली. शब्दज्ञानाला आत्मज्ञानाची, चित्तशुद्धीला भक्तिभावाची, क्रियाशिलतेची आवश्यकता असते हे सांगितले. उत्तम पुरुष तर बनवायचा होताच पण विराट समाजपुरुषही पुरुषोत्तम बनविणे हे त्यांचे इप्सित होते. उत्तम पुरुषाची लक्षणे, प्रयत्नवाद, प्रपचनिष्ठा, नीतिधर्म, व्यवहारधर्म, समाजकारण, चातुर्य, ह्या साऱ्यांचा विचार समर्थांनी मांडिला. त्यासाठी आपली दैवते कोदंडधारी राम आणि पवनसुत हनुमान हे निवडले. राम हे प्रयत्नवादाचे प्रतीक. रामोपासनेबरोबर राजकारणाचा, परमार्थाबरोबर प्रपंचाचा, भक्तीबरोबर शक्तीच्या उपासनेचा दिव्य मंत्र दिला. राम हे आपल्या विचारांचे दैवत म्हणजे पुरुषार्थ, पराक्रम आणि राजनीति याचे प्रतीक होय. राजधर्म, क्षात्रधर्म, ब्राह्मणधर्म या साऱ्या कल्पनांना स्वधर्माच्या कल्पनेत एकत्र केले आणि स्वधर्म जागृतीसाठी आपले जीवन वेचले. स्वधर्म या शब्दाची व्याप्ती ही सनातन नाही. तर त्यात व्यक्तिधर्मही अनुस्यूत आहे.

आपले तत्त्वज्ञान चार सूत्रात त्यांनी सांगितले. हे तत्त्वज्ञान केवळ शिवरायासाठी नाही, केवळ महतासाठी नाही तर त्याच्या माध्यमातून साऱ्या माणसांना समर्थांनी सांगितले. मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण सर्व विषई । चौथा अत्यंत साक्षेप. (दा. ११.५.४)

या चार सूत्रात आदर्श समाजपुरुषाचे चित्रण त्यांनी गुंफले असले तरी त्यातून त्यांच्या सूक्ष्म छटांचा विचारही केला आहे.

**मुख्य हरिकथा निरूपण**

मानवी जीवनात अध्यात्माला, नामभक्तीला, हरिकथेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. रामदास धार्मिक प्रबोधनाच्या बाबतीत ज्ञानेश्वर नामदेवांचे वारसदार

आहेत. वारकरी आणि धारकरी (रामदासी) बाह्यत: भिन्न असले तरी तत्त्वज्ञानदृष्ट्या फारसा भेद नाही. भगवद् भक्ती ही त्यांची साधना. प्रत्येकाने-ईश्वराची डोळस भक्ती केली पाहिजे. रामदासांनी रामनिष्ठा जीवित साध्य मानली. रामभक्ती हे साध्य आणि तेच साधन. ' मुखी रामनाम चित्ती घनश्याम। होतसे विश्राम आठवीता ' (समर्थ गाथा ४७१) ही त्यांची श्रद्धा. ' अखंड येकांत सेवावा । ग्रंथनाम धांडोळावा ' (दा. १८.३.२०) या कृतीमुळे भक्तीला अधिष्ठान प्राप्त होते. केवळ अंधश्रद्धेने भक्ती करणे अयोग्य. मनाच्या उन्नतीसाठी अध्यात्मविद्या श्रेष्ठ आहे. विद्या कोणत्याही प्रकारची असो, ज्ञान कोणत्याही प्रकारचे असो, नृत्यज्ञान, तालज्ञान, रागज्ञान ते श्रेष्ठच असते; पण अध्यात्मज्ञान हे या साऱ्या ज्ञानाहून श्रेष्ठ आहे.

हरिकथा हा जीवनाचा आधार. ती कशी असावी, हरिकथा सांगणारा हरिदास कसा असावा, हे समर्थांनी सविस्तर सांगितले. ते सांगण्यांत त्यांच्या अनुभवांना धार होती. कृतिशीलतेचे तेज होते. ती कृतिशीलता निर्माण करण्याच्या मागे, मरगळलेल्या मनात चैतन्य निर्माण करावयाचे, त्यांची भ्रांती दूर करावयाची आणि चित्तात शुद्ध परमार्थभाव निर्माण करावयाचा ही जिद्द होती.

नवविधा भक्तिसाधनेपैकी कीर्तन आणि नामसंकीर्तन हे साधन साऱ्या संतानी अवलंबिले होते. त्यातून आपला ईश्वरविषयक भाव, सहजतया व्यक्त करता येतो अशी रामदासांसहित साऱ्या संतांची श्रद्धा होती. हे साधन सर्वसामान्यांनाही सहज साधण्यासारखे. कीर्तनातून हरिदासाचे, कीर्तनकाराचे व्यक्तिमन तर जागृत होतेच, शिवाय त्याबरोबर अनेक श्रोते असतात त्यांचेही समष्टिमन तयार होते. कीर्तन माध्यमातून सर्व पातळीतील आणि सर्व स्तरातील लोकांना भक्तीच्या प्रांगणात आणि भगवद् प्रेमाच्या पुण्यमय वातावरणात जाता येते. कीर्तनकार जर प्रभावी आणि श्रेष्ठ तर कीर्तनात अनुभवावर अधिष्ठित अशा कथा सांगून श्रोत्यांना मनोरजनातून ज्ञान देतो. तो स्वत:ही अंतर्मुख होतो, आणि श्रोत्यासही अंतर्मुख करतो. कीर्तनकार हा ज्ञानी आणि प्रेमळ भक्त असावा. तो विद्वान, चांगला गाणारा कलावंत, श्रेष्ठ साधक, धर्मावर प्रेम करणारा आणि श्रद्धा ठेवणारा, निर्मत्सरी असावा. कीर्तनकार आशाबद्ध नसावा. काय बिदागी मिळेल याची काळजी त्याने करू नये. ईश्वरावर विश्वास ठेवून निर्मळ मनाने कीर्तन करावे. त्याने ' लाज सांडूनी जनाची । आस्था सांडूनी धनाची नीत्य नवी कीर्तनाची । आवडी धरावी '– (दा. १४.५.१६) कीर्तनात स्वत: समरसावे व सर्वांस त्या हरिभक्तीत तद्रूप होण्यास शिकवावे. हरिकथा कशी असावी तर श्रोत्यांच्या मनांत ईश्वराच्या सगुण रूपाविषयी प्रेम, आदर, श्रद्धा निर्माण करणारी. वैराग्य आणि अनुताप याचा आदर्श श्रोत्यासमोर ठेवणारी ... कीर्तनातून साऱ्या रसांचा आविष्कार असावा. परंतु शृंगाररस मात्र संयत रूपात असावा. स्त्रियांच्या रूप

लावण्याचे भडक वर्णन टाळावे. स्त्री वर्णनात जो रंगतो आणि इतरांना रंगवितो तो परमार्थापासून दूर जातो. या साऱ्या गुणांनी युक्त असेल त्या हरिकथेची श्रेष्ठता काय वर्णावी ?

' सोने आणि परिमळे । युक्षदंडा लागती फळे '
गौल्य माधुर्य रसाळे । तरी ते अपूर्वता । (१४.५.३) या सारखे होईल.

मानवी देह हा काही सहज साध्य नाही. अनेक योनीतून परिभ्रमण करून आल्यानंतर मानवी देहाची प्राप्ती होत असते.

' हे जे देह धरूनी आले । ते ते काही करूनी गेले.
हरिभजनी पावन झाले । किती येक ।' (दा. १८.४.२६)

ज्यांना कर्म, उपासना, ज्ञान, वैराग्य, उपरती, त्याग नाही, परमेश्वराविषयी प्रीती नाही, भक्ती नाही, त्यांना सुख, शांती लाभत नाही. माणसाला जर जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका करून घेऊन मोक्षपदी जावयाचे असेल तर त्यांनी हरिकथा श्रवण करावी. जो नितांत श्रद्धेने ईश्वराची भक्ती करतो; कोणत्याच ऐहिक वस्तुविषयी मोह, अभिलाषा ठेवत नाही तो खरा भक्त असतो. असे भक्त आपल्या भक्तीने देवास ऋणी करतात.

' दिनाचा दयाळू । मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू । जनी दासपाळू ।
तया अतरी क्रोध सताप कैचा । जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा '

असा भक्त मनाने, डोळ्याने, इंद्रियाने ईश्वराला पाहतो आणि तेथेच एकाग्र होतो. आदर्श भक्ताचे हे चित्रण स्वत: समर्थांचे आहे असे म्हटल्यास वावगे न ठरावे. माणसाला स्वत:ची, समाजाची, देशाची प्रगती साधावयाची असेल तर, त्याने आधी स्वत:ची आत्मिक उन्नत्ती करून घ्यावी, म्हणजे पुढील दिशा गवसते. म्हणून समर्थांनी " हरिकथा निरूपण " हे सूत्र सांगितले. माणसाच्या मनातील श्रद्धा आणि सदेह, विचार आणि विकार यांच्या संघर्षातून सोडवणूक करून घेण्यासाठी हा मार्ग. " विरक्ते परमार्थ उजळावा । विरक्ते विचार शोधावा " ही त्यांची शिकवण हरिकथा निरूपणात अनुस्यूत आहे.

**दुसरे ते राजकारण :—**

समर्थ रामदासांच्या चतु:सूत्रातील दुसरे सूत्र राजकारण आहे. राजकारण या शब्दाचा आज रूढ असलेला आणि अपेक्षित अर्थ त्यांना अभिप्रेत नसावा. शाश्वत नीतितत्वांना बाध न येता प्रपंच भाग्यशाली आणि यशस्वी होण्यासाठी लागणारे चातुर्य ते राजकारण. शिवरायांना निमित्त करून क्षात्रधर्माविषयी, राजधर्माविषयी, ज्या सूचना समर्थांनी केल्या आहेत त्यातून सर्वांना सावधपणाच्या सूचना दिल्या आहेत. मठाच्या महंताच्या सूचनामधूनही सावधानतेचा इशारा

कळतो. केवळ शिवाजी महाराजांना उपदेश करावा किंवा महंतांना सूचना द्याव्या एवढी संकुचित व्याप्ती त्यांच्या वाङ्मयातून नव्हती; तर सर्व समाज सुधारावा, लोकांमध्ये आलेली मरगळ नाहीशी व्हावी, त्याची (समाजाची) अस्मिता जागृत व्हावी, ही समर्थांची इच्छा होती. राज्य सुदृढ व्हावयाचे असेल तर सारा समाज सुदृढ होणे आवश्यक आहे हे त्यांना वाटते. राजकारण म्हणजे ढिलेपणाचे काम नसून धूर्तपणाचे काम आहे. अति सर्वत्र वर्जावे, प्रसंग पाहून काम करावे. अशा सूचना राजकारण या शीर्षकाखाली समर्थ देतात. एका अर्थानी राजकारण म्हणजे समर्थांनी सांगितलेला कर्मयोग आहे. समाजातील भिन्न पातळीची भिन्न विचारसरणीची माणसे एकत्र करून त्यांच्याकडून योग्य असे काम करवून घेणे म्हणजे राजकारण होय. अशी राजकारणाविषयी समर्थांची समजूत होती. "शहाणे करावे जन। पतीत करावे पावन, सृष्टीमध्ये भगवद् भजन। वाढवावे, ही त्यांची मनीषा होती. जो माणूस जन्माला येतो त्याच्या हातून काही तरी कर्म होत असते. अतिशय जागरूकतेने कामाची विभागणी करावी. चोरास भांडारप्रमुख करावे. त्यावर विश्वास टाकावा. आळशी माणूस क्रियाशून्य असतो. त्याचा आळस जाईल असे करावे. दुसऱ्यांच्या पूर्णपणे आधीन राहू नये.

"जो दुसऱ्यांवरी अवलंबिला। त्याचा कार्यभाग बुडाला
जो आपणचि कष्टत गेला॥ तोचि भला॥ (दा. १९.९.१६)

गावगुंडांचा निःपात करावा. दुर्जन माणसे ओळखली तरी वाच्यता करू नये. सज्जनाप्रमाणेच त्यांना वागवावे. प्रसंगी जशास तसे वागावे.

"धटासी आणावा धट। उद्धटासी आणावा उद्धट
खटनटासी खटनट। अगत्य करी। (दा. १९.९.३०)

विवेक आणि संयमाची शिकवण सर्वांना द्यावी. जे जे आपल्याला येत असेल ते इतरांस शिकवावे, शहाणे करावे सर्वजन. अशा रीतीने वागावे आणि लोकसंग्रह करावा. सामान्यांना सांभाळावे, प्रसंग सावरावा, लोकांची पारख करावी. इतरांचा मान राखावा म्हणजे आपला मान राहतो. राजकारण हे करावयाचे असते, सांगावयाचे नसते. गुप्तता राखावी. परक्या सत्तेच्या राजकारणात स्वार्थामुळे बरेच लोक गुंगून गेले होते. त्यांना परमार्थाची किंवा राजकारणाची काळजी नव्हती. लाचखाऊ आणि फितूर लोकांचा शाप या भूमीला आहे याही काळात ते दिसत होते. त्यांना दूर करून, संघटना निर्माण करून आपले ध्येय राजकारणी पुरुषाने गाठावे लागते. संघटना एकदा बिघडली तर पुन्हा नीटनेटकी करावी. राजकारणात देशासाठी देह पडला तरी तमा बाळगू नये. देह तर नश्वर आहे. तो धर्मासाठी गेला तर काय? सर्व राजकारण शक्ति आणि युक्तीच्या युतीने करावे. या दोहोंचा मेळ जमला की राजवैभव नांदते. अशा प्रकारच्या सूचना समर्थांनी राजकारणास

अनुलक्षून केल्या आहेत. समर्थ रामदास राजकारणी होते. त्यांनी शिवरायास हाताशी धरून राजकारण केले. त्यामुळे त्यांना नामदेव तुकारामादि संतांच्या बरोबरीचे स्थान देता येत नाही, अशा प्रकारचे प्रवाद निर्माण झाले. पण हे प्रवाद गुरुदेव रानडे यांना मान्य नाहीत. कोणत्याही राष्ट्राची दुर्दशा त्याच्या नैतिक आणि धार्मिक अधःपतनाने होते. राष्ट्र सुधारण्यासाठी समाजाची नीतिमत्ता आणि धर्म सुधारला पाहिजे हे लक्षात घेऊन नामदेव तुकारामांनी मूळ कारणाला हात घातला. त्यावर समर्थ रामदासांनी आपल्या राजकारणाची इमारत उभविली. गुरुदेव रानडे यांचे विचार या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात,

It is indeed true as the late Mr. Justice Ranade said that even pacifist saints like Namdeo and Tukaram laid the moral foundations on which Ramdas later reared his politicol religious edifice... while the first (Namdeo and Tukaram) called back the attention of men from irreligion to religion the other (Ramdas) raised upon the foundation of religious faith an edifice of national greatness...

The controversy is a very old one, dating from the days of Bhagwat Geeta, as to the Value of Knowledge and works. Such conflicts can be resolved only when we cancel them in a higher synthesis. We want both knowledge and works as we want both religion and National greatness, and it is from this point of view that Tukaram and Namdeo were of as much use to the Maratha kingdom as Ramdas himself.

( 'Mysticism in Maharashtra' Page-422)

समर्थ रामदासांचे वैशिष्टय हे की पूर्वीच्या संत वाङमयात जे अप्रत्यक्ष रीतीने सांगितले होते ते क्रमाक्रमाने काल अनुकूल होत गेल्यामुळे त्यांनी राजकारण या शब्दात सांगितले.

**सावधपण आणि साक्षेप**

सावधान या शब्दाला समर्थ सावधपण हा शब्दप्रयोग करतात. सावधान शब्दाला समर्थ चरित्रात फार मोठा, गहन असा अर्थ आहे. ज्ञानेश्वरांनी 'परि अवधान एकले दीजे । मग सर्व सुखासी पात्र होईजे । हे प्रतिज्ञोत्तर माझे । उघड आईका ॥' या ओवीत अवधानाला म्हणजेच सावधानाला महत्त्व दिले आहे. त्यास समर्थांनी चतुःसूत्रीत गोवले आहे. सावधानता नाही, यत्न नाही तेथे सुख संतोष मिळणार नाही. प्रपंची सावधान असणारा माणूस परमार्थातही सावध असतो. आपल्या भोवतालच्या परिस्थितीवर विचार करून जागरूकतेने आपल्या जीविताचे

धोरण आखावे. जागरूकपणे कर्म करणारा सुखी होतो. प्रत्येक काम साक्षेपाने करावे. कळकळीने, लक्षपूर्वक, न कंटाळता केले की त्याचे फळ आपोआप प्राप्त होते.

" कष्टेवीण फळ नाही । कष्टेवीण राज्य नाही
केल्यावीण होत नाही । साध्य जनी (दा. १८.७.३)'

दैवात नसेल तर प्रयत्नाने होणार नाही असे म्हणणारे करंटे असतात. केल्याने होत आहे रे, हे सूत्र मनाशी धरलेच पाहिजे. जीवनात प्रयत्न हे पुण्य, आळस पाप. साधु देव, उन्मतु राक्षस समजावा. "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी" ही विचारसरणी सोडावी. जीवनाचा यज्ञ करणे ही आपली संस्कृती. ती समर्थांनी जतन करण्याचा प्रयत्न केला. आळस नसावा. दुश्चितपणा नसावा. सदैव सावध, साक्षेपी आणि दक्ष असावे. खबरदार असावे. आपापल्या कार्यात जागरूक असावे. सावध नसणारा माणूस सहज फसतो आणि चुकतो. वर्तमान काळातच केवळ सावधपणा करून उपयोगी नाही तरी भविष्यातही सावधपणाने राहावे. सावधानता आणि साक्षेपाने जीवनातील करंटेपण जाते. प्रयत्नवाद सुरू होतो. प्रयत्नांती सुख निश्चित असते.

**अर्थकारणी समर्थ :**

केवळ चार सूत्रांमध्ये आपले तत्वज्ञान समर्थांनी सांगितले असे नाही. तर डोळसपणे जग पाहिल्यानंतर डोळसपणानेच त्यावर विचार केला. जीवनातील सर्व अंगाचा विचार केला आणि आपली मते प्रदर्शित केली. मानवी जीवनाशी निगडीत असा एकही विषय त्यांनी सोडला नाही. 'रामदास केवळ व्यक्ती नाही तर ते विद्यापीठ होते" हे ग. शं. खोले यांचे विधान अतिशय बोलके आहे.

देश, समाज, कुटुंब, व्यक्ती, कारखाने, शेती, उद्योग, व्यापार, नफा तोटा इ. चा संबंध अर्थशास्त्राशी येतो. समर्थांनी तीर्थक्षेत्राच्या निमित्ताने देशातील दुष्काळ, परचक्राचे परिणाम, विगलीतत्व पाहिले. त्याचे कारण शोधून यातून देशाची सुटका करावयाची असेल तर केवळ पारमार्थिक तत्त्वज्ञान सांगून भागणार नाही हे त्यांनी पाहिले. अशांत समाज शांत करण्यासाठी समाजाच्या दैनंदिन गरजा पूर्ण होणे आवश्यक आहे. अध्यात्म, परमार्थासाठीसुद्धा शांति आवश्यक. त्या गरजा पूर्ण होण्यासाठी देशाची आर्थिक घडी व्यवस्थित असणें आवश्यक आहे. त्यांनी स्वतः भिक्षापात्र हातीं घेतले असले तरी इतरांना तसा उपदेश केला नाही. सारी माणसे भिक्षेकरी झाली तर समाज आणि देश उन्मळेल आणि भिक्षेकरी होईल म्हणून प्रयत्नवादाचीं शिकवण त्यांनी सांगितली. माणसाचे दारिद्र्य दूर झाले की समाज उन्नत आणि प्रगत होतो हा त्यांचा विश्वास होता. कष्ट आणि प्रयत्न करून धन मिळवावे म्हणजे तो भाग्यवान ठरतो. सतत कांही उद्योग

करावा. कांहीं मिळवावे तरच जेवावे. शरीर कारणी लावल्याशिवाय संपत्ती मिळत नाही. 'यत्न तो देव जाणावा,' यत्नाचा लोक भाग्याचा, यत्नेवीण दरिद्रता. केल्याने होत आहे, तर आधी करावे. धन मिळविण्यासाठी व्यापार करावा. व्यापारात हिशेबीपणा आवश्यक. फसवून अधिक पैसा कमवू नये. बेहिशेवी कारभारात व्यापाराचे दिवाळे वाजेल. 'ज्याचा जो व्यापार । तेथें असावे सवदार.' कारखाने काढावे. मजुराशी आपुलकीने वागावे. छोटया चुकीस शिक्षा करू नये. काम आणि मजुरी यांचा मेळ बसवावा. मजुरांना योग्य वेतन आणि प्रेम दिले तर अधिक उत्पादन होईल. समृद्धी येईल आणि राष्ट्रसुधारणा होईल.

राष्ट्राची आर्थिक दुर्दशा होण्यामागे निष्क्रियता आणि अधिक लोकसंख्या ही कारणे होत. त्याबाबत जागरूक राहण्यासाठी समर्थांनी तीनशे वर्षांपूर्वी सूचन केले होते. 'लेकुरे उदंड जालीं । तो ते लक्ष्मी निघोनी गेली । बापडी भिकेसी लागली । खावया कांही मिळेना ।' अशी अवस्था होते. हे सारे प्रश्न एकमेकाशी संलग्न आहेत. त्यामुळे दुष्टचक्र सुरू होते. त्यासाठी काम तसा विगार आणि कुटुंब नियोजन कसे आवश्यक आहे याविषयी लोकांना जागरूक करण्यात समर्थांचे द्रष्टेपण प्रत्ययास येते.

**तीर्थयात्रा करावी :–**

मानवी जीवनात प्रवास आवश्यक आहे. प्रवासाने माणसाच्या भौगोलिक ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक ज्ञानात भर पडते. डोळे आणि मन सजग होतात. व्यवहाराची दृष्टी येते म्हणून अवघी पृथ्वी धांडोळावी, तीर्थयात्रा कराव्या असे समर्थ सांगतात.

'तीर्थे एकाहुनी एक । महापवित्र पुण्यदायक । अगाध महिमा
शास्त्रकारक । सांगो पाहे"
" देवस्थाने उदंड होती । आज जाले म्लेंछ नृपती
ठाई ठाई उरूस भरंती रे । कीर्ती उदंड सांगती रे ।

स्वत: तीर्थयात्रा करीत असताना त्याना अशा प्रकारचे ज्ञान झाले. अध्यात्मिकतेच्या बरोबर जीवनाच्या विविध अंगाच्या विचारसरणीचा परामर्श घेतला व त्याची महती सामान्यासमोर सांगितली आणि समाज जागा केला.

**आधी प्रपंच करावा नेटका**

स्वत: प्रपंचात न जाताही लोकांना मात्र 'आधी प्रपंच करावा नेटका' असा संदेश समर्थांनी दिला. ठोसरांचा नारायण समर्थ आणि रामदास होण्यापूर्वी प्रपंचात राहून मोक्ष मिळणार नाही याच विचारसरणीचा होता. तीर्थयात्रेने या

विचारात पालट पडला. समाज त्रिशंकूसारखा झाल्याचे त्यांनी पाहिले. धड प्रपंच नाही आणि धड परमार्थ नाही अशा दोलायमान अवस्थेत असलेल्या समाजाला स्थिर करण्यासाठी समर्थांनी प्रपंच परमार्थाची सांगड घालून दिली. नेटका प्रपंच करणाराच नेटका परमार्थ करू शकेल असा दिलासा त्यानी दिला. 'स्वभावो दुरतिक्रम:' असे म्हटले जात असले तरी विशिष्ट मार्गाने स्वभाव बदलू शकतो, हे त्यांनी दाखविले.

त्यांनी गृहस्थधर्माचा गौरव केला. चार आश्रमांचे मूळ गृहस्थाश्रम आहे. संसार हा परमार्थ सोपान आहे. 'नाना वेश नाना आश्रम । सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम । (दा. बो. १४.७.१) गृहस्थाश्रमात ईश्वरासही शांती मिळते. देव, मुनी, ऋषी, योगी, वीतरागी, तापसी इ. सारी मंडळी गृहस्थाश्रमात निर्माण झाली. गृहस्थाश्रम हे या सर्वांचे आश्रयस्थान. संसार मात्र नेटकेपणाने केला पाहिजे. केवळ संसाराचा त्याग करून कोणी संन्यासी होत नाही. संसारात राहूनही मोह मायेत न अडकता कमलपत्रवत राहावे. आपापली विहीत कर्मे करावी. क्रोधास आवर घालावा. मन शांत ठेवावे. जोपर्यंत मानवी शरीर धड आहे तोपर्यंत मनात पारमार्थिक विचार बाणवून घ्यावे.

'भल्याने परमार्थी भरावे । शरीर सार्थकी लावावे
पूर्वजास उद्धारावे । हरिभक्ति करुनी ।

या नरदेहात आपण आपले इप्सित साध्य करून घ्यावे. मोक्षाप्रत जाण्याचा मार्ग धांडोळावा. घडीने घडी काळ जात असताना केव्हा साधना करणार ? परमार्थासाठी काही विशेष वय थोडेच आहे ? पुन्हा करू म्हणताना होत नाही. घडीने घडी काळ पुढे जात आहे. तोच काळ आपल्या कामास आणावा.

आपला व्यवसाय नेटकेपणाने चरितार्थासाठी करावा. अडचणीत आलेल्या लोकांना मदत करावी. आपले जीवन कारणी लावावे. केवळ परमार्थ किंवा केवळ प्रपंच कराल तर अडचणीत याल. फळाची अपेक्षा ठेवून कार्य केले तर अपेक्षाभंगच वाट्यास येतो. त्यासाठी प्रपंच परमार्थाची योग्य सांगड घालावी. अवगुणाचा त्याग करावा. बहुतांची अंतरे राखावी. सद्‌गुणांचा अभ्यास करावा. विवेक राखावा. आपल्या भूमिकेशी प्रामाणिक असावे. कोणाचे अनहित करू नये; तसे करणारास प्रतिकार करावा. यामुळे इप्सित साधते.

**समर्थांची समाजविषयक जाणीव :**

समर्थांच्या दोन जीवननिष्ठा. राजकारण आणि समाजकारण. वास्तविक या दोन्ही निष्ठा एकमेकांत मिसळलेल्या आहेत. दोन्हींना एकत्रित करण्यासाठी त्यांनी देवकारण सांगितले. देवकारणात म्हणजे परमार्थात भेदाभेद नाही.

समाज सुदृढ बलशाली बनवायचा असेल तर समाजाचा मूलभूत घटक असलेली व्यक्ती, तशी होणे आवश्यक. व्यक्तीचा विकास झाला की आपोआपच समाजाचा विकास होतो. समाज म्हणजे एक विराट पुरुष आहे. व्यक्तीचा कर्मयोग म्हणजे पर्यायाने समाजाचा कर्मयोग. समाजकारणातून समाजकल्याणाची बांधिलकी समर्थांना अभिप्रेत आहे. त्यांनी समाजाला प्रवृत्तिधर्माची आणि इहवादाची जोड दिली. व्यवहारवाद आणि विवेकाधिष्ठीत वैराग्य समजावले. ईश्वराने सृष्टी निर्माण केली पण त्यात तो अडकलेला नाही. सर्वात असून तो कशात नाही. तसे माणसाने स्वप्रपंचात राहून कमलपत्रवत असावे. समर्पणबुद्धीने कार्य केले पाहिजे समर्थांचे प्रपंचविज्ञान म्हणजे सामाजिक जीवनाला उत्कर्षशाली, वैभवशाली बनविणारी परमार्थावर अधिष्ठित असलेली जीवननिष्ठा. समाज गतिशील व्हावा म्हणून समर्थांनी देहात्मयोग सांगितला. देहाला पीडा तर आत्म्याला पीडा. देहाला सुख तर आत्म्याला सुख. हे दुःख किंवा सुख बाह्यरूपी नव्हे. ईश्वराला तुष्टवायचे तर देहाला म्हणजेच आत्म्याला संतोषवावे. देह परोपकारी लावावा.

" देहामध्ये आत्मा असतो । देह पूजिता आत्मा तोषतो
देह पीडिता आत्मा क्षोभतो । प्रत्यक्ष आता (दा. बो.१८.४.३४)

अशा देहाची वास्तव जाणीव देणारा समर्थ रामदास हा पहिला संत होय. समाजकारणात आज प्रकर्षाने सांगितली जाणारी स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव ही मूल्ये समर्थांनी तीनशे वर्षापूर्वी सांगितली.

स्वातंत्र्य म्हणजे आत्मस्वातंत्र्य. आत्मस्वातंत्र्याच्या अधिष्ठानावर भौतिक स्वातंत्र्याचा पुरस्कार. भौतिक स्वातंत्र्य प्राप्त झाले की स्वसत्ता, आणि स्वसत्ता आली म्हणजे स्वधर्म उजळेल ही त्यांची निष्ठा होती. असे स्वातंत्र्य असल्याखेरीज माणसाची प्रापंचिक किंवा पारमार्थीक उन्नती होणार नाही.

समर्थांची समता पारमार्थिकतेचे कवच ल्यालेली होती. भागवतधर्मीयांनी भक्तीच्या प्रांगणात समता प्रस्थापित केली होती. त्याच्याही पुढे जाऊन समर्थांनी समतेचा विचार मांडला. प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणातूनच ही विषमता, उच्चनीचता नष्ट झाली की आपोआपच समता प्रस्थापित होईल. हे करण्यासाठी ईश्वरास अनन्य भावाने शरण जाणे आवश्यक. आपले प्रेयस ईश्वर – परमात्मा आहे ही जाणीव लक्षात घेऊन ते प्राप्त करून घेण्यासाठी त्यास आर्ततेने आळविले की अंतःकरणात प्रभुप्रीतीची ज्योत प्रज्ज्वलित होते व समत्वदृष्टी प्राप्त होते. आध्यात्मिक समत्वदृष्टी प्राप्त झाली की आपोआपच सामाजिक समता प्रस्थापित होते.

समतेचा पुरस्कार करणाऱ्या रामदासांवर ते जातीयवादी होते, ब्राह्मणांचे कैवारी होते असे आरोप करण्यात येतात. त्यांच्या वाङ्मयाचा बाह्यांगाने किंवा

वरवर अभ्यास करणाऱ्यास ते खरेही वाटण्याची शक्यता आहे. परंतु तसे वाटणे गैरसमजाचे आहे.

' भेद ईश्वर करोनि गेला । त्याच्या वाचेन न वचे मोडिला ।
(दा. १७.४.२७.)

येथे असलेला 'भेद' हा शब्द जातिवाचक जातिभेद या अर्थाने नाही तर व्यक्तीचा वेगळेपणा या अर्थाचा आहे. त्याच्या पूर्वकर्माचे वेगळे दृष्टांत देऊन ते स्पष्ट केले आहे. ज्या इंद्रियाचे जे काम ते त्याचे त्यानेच करावे, इतराना ते होऊ शकणार नाही. माणसाचाही पूर्व संचितानुसार असणारा व्यक्तिभेद कोणी दूर करू शकणार नाही. भेद या शब्दाचा अर्थ त्यांना सज्जन – दुर्जन, विवेकी – अविवेकी, या अर्थी अपेक्षित असावा.

जना सज्जनाला एकत्र करता कामा नये. जनी जनार्दन परी तो सज्जनी वसतो दुर्जनी नाही, असे त्यांना वाटते. हा विचार मान पंचकात आला आहे.

' भेटो कोणी नर । धेड महार चांभार
राखावे तयाचे अंतर । या नाव भजन' (दा. बो.)

या ओवीतून आलेले धेड, महार, चांभार हे शब्द तत्कालीन विषमतेवर, चातुर्वण्यावर अधिष्ठित असलेल्या समाजातील जातिवाचक आले असतील तरी समर्थ सांगतात या साऱ्याचे मन राखणे, त्यांची मर्जी राखणे, त्यांना सांभाळणे यास भजन म्हणतात. अंतर या शब्दाचा अर्थ अंत:करण आहे, दूरत्व नाही. सर्वांच्या मनाचा हळुवारपणे विचार करणारे रामदास जातिवाचक ठरतात काय ?

' अंतर एक तो खरे । संगती घेऊ नये महारे ' यातील ' महारे ' हा शब्द, जातिवाचक नसून असंस्कृत, अविवेकी या अर्थाचा आहे. ' पृथ्वीमाजी जितुकी शरीरे । तितुकी भगवंताची लेकुरे ' हे वचन समर्थांच्या समत्ववादी भूमिकेचे दर्शन घडविणारे आहे. आणि समता अंगी बाणली की बंधुत्व दूर राहत नाही.

समर्थ समाजाच्या ऐहिक आणि पारमार्थिक सुखाची काळजी घेतात. त्यांचे सामाजिक जीवन सर्वंकष होते. ज्ञान, चातुर्य, व्यवहार, बुद्धिनिष्ठा, आत्मौपम्य वृत्ती, सेवाभावी वृत्ती, कर्तव्यतत्परता, त्याग, वैराग्य, वैभव, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व इ. जीवनमूल्याना समर्थातल्या आदर्श पुरुषाने स्पर्श केला होता. केवळ स्पर्श नव्हे तर सुवर्णस्पर्श. ही जीवनमूल्ये त्यांनी आपल्या जीवनात बाणवली व मगच इतराना उपदेश केला. ' प्रपंच नेटका करावा ' यावर कोणी आक्षेप घेईल की स्वतः तर प्रपंच केला नाही तर याना काय अधिकार? समर्थांनी सर्वसामान्या-सारखा बायकोमुलांचा प्रपंच केला नसला तरी समाजाचा, महाराष्ट्र धर्माचा प्रपंच साक्षेपाने केला. आपल्या विचाराभोवती तत्त्वज्ञानाला, उपासना मार्गाला,

आचार धर्माला, साधनेला, लोकसंग्रही विचारांना फिरत ठेवलें. यातून समर्थ रामदासांचे वेगळे आगळेपण लक्षात येते. आपणच मोक्षाला जावे एवढी संकुचित भूमिका कोणत्याच संताची नसते. विश्व मोहरे लावण्याची इच्छा त्यांच्यात असते. आपण तरावे आणि इतरांना तारावे ही तळमळ त्यांच्या ठिकाणी असते. इतरांच्या दुःखानी सत व्याकुळ होतात. ते दुःख कसे दूर करता येईल याचा प्रत्येक संत आपल्या परीने विचार करीत असतो संयत आणि नीतिमान असा समाज केव्हा आणि कधी बनेल हा प्रश्न त्यांच्या समोर असतो. समाजाचे प्रश्न सोडविणे ही आपली बांधिलकी असते याची जाणीव सतांना असते. त्या बांधिलकीतून आपण मुक्त व्हावे व लोकांना मार्गदर्शन करावे हे संताचे कार्य असते. समर्थ रामदासांनी आपल्या वेगळेपणातून समाजधुरीणाची भूमिका घेऊन ते कार्य केले. तत्कालीन परिस्थितीशी प्रामाणिक राहून त्यातून सुटण्याचा मार्ग शोधला, आणि बोध केला.

समाजसुधारणेचे कार्य सतत नदीच्या प्रवाहाप्रमाणे वाहत असते. सामाजिक परिवर्तने कायम होत असतात पण साऱ्या कालखंडात मार्गदर्शक ठरणारे विचार मात्र दीपस्तंभासारखे असतात. समर्थांचे विचार त्या काळाशी तर योग्य आणि समवायी होतेच, पण त्या विचारांची गरज आजच्या काळालाही आहे हे म्हणावेसे वाटते. आजच्या समाजालाही त्यातून दिशा मिळेल असा विश्वास, जीवनाच्या सर्व अंगाचा सर्वांग विचार करून मार्गदर्शन करणारे, प्रकाश आणि प्रेरणा देणारे समर्थ रामदास खऱ्या अर्थाने पुरूषोत्तम, आदर्श पुरूष नव्हते काय ?

## जय जय रघुवीर समर्थ !

# समर्थ रामदासांचा समाजवाद

– पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

सोडून द्वैताची उपाधी । अद्वैत वस्तुसाधने साधी ।
लावी एकतेची समाधि । या नाव साधक ।।१।।

सर्वत्र लोक शोधावे । बोधावे भक्तिच्या गुणे ।।२।।

सद्‌बुद्धी सांगणे लोका । जेणे ते सुख पावती ।।३।।

– श्री समर्थ रामदास

जांबचे रहिवासी नारायण सूर्याजी ठोसर हे इसवीच्या सतराव्या शतकातील 'समर्थ रामदास' म्हणून गाजलेले महाराष्ट्रीय संत. त्यानी आधुनिक अर्थाचा 'समाजवाद' हा शब्द आपल्याकाळी ऐकलाही नसेल. सेमेटिक संस्कृतीच्या इस्लामधर्मीयानी तलवारी चालवून समर्थांच्या काळात तख्ते प्रस्थापित केली होती आणि ख्रिस्ती उद्योमव्यापारी कंपन्यानी वखारी स्थापन केल्या होत्या, हे खरे; पण त्याचबरोबर त्यानी आपापल्या धर्माच्या प्रचारार्थ, भारताच्या वैदिक संस्कृतीत वाढलेल्या भारतीयापैकी कित्येकांचे प्रज्ञाहनन चालविले होते. त्यापायी जनतेच्या दारिद्र्याचा फायदा जसा त्यानी उठविला होता, तशीच कित्येकावर अरेरावी करूनही त्यानी आपले मतलब साधले होते. त्या तशा आक्रमणाविरुद्ध

भारतीयाना शुद्धीवर आणण्यासाठी समर्थ रामदासानी लोकजागरणाचे प्रयत्न-पुरुषार्थ उभारले होते, हे सर्व सुपरिचित आहे. पण 'समाजवाद' हा शब्ददेखील जेथे युरोपियनासही आधुनिक अर्थाने एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत परिचित नव्हता, तेथे समर्थ रामदासाना तो भावला कसा आणि ते समाजवादी झालेच कसे ? असा प्रश्न कित्येक चिकित्सकानाच नव्हे, तर अनेकानेक विवेकवन्तानाही पडणे अशक्य नाही.

युरोपात 'सोशल डेमोक्रॅट' म्हणजे समाजसत्तावादी राजकीय कार्यकर्ता हा शब्दच मुळी १८६९ पासून सर्वपरिचित झाला. पण समाजासंबंधीच्या सर्वांगीण अभ्यासाला समाजशास्त्र म्हणून यापूर्वी कित्येक वर्षे-शतके-अगदी ग्रीक संस्कृतीच्या प्रभव-कालापासून संबोधण्यात आलेच होते. समाजशास्त्रात इतिहास, अर्थशास्त्र, न्यायशास्त्र, राज्यशास्त्र, अशांची मिळून जी मानवी संस्कृती प्रतीत होते, तिच्या प्रगतीचा साधार आढावा अभिप्रेत असतो. हर्बर्ट स्पेन्सर (१८२०-१९०३) नंतर, व्यक्ति व समाज आणि त्या दोहोंचे परस्पर नि सहकार-समन्वयाने 'सरकारशी' नाते, यांचा उहापोह बेंजामिन किड (१८५८-१९१६) याने आपल्या 'सोशल इव्होल्यूशन' या ग्रंथात केला व समाजशास्त्राचा पाया बळकटीस आणला.

हा इतिहास लक्षात घेतला तरी सृष्टीत मानवी प्राण्याची उत्पत्ति झाल्यापासूनच संस्कृति, सभ्यता, समाजविकास यांचीही सुरवात झाली होती, हे विसरुन कसे चालेल ? त्याची जाण जगातील सर्वप्रथम वाङमय जे वेद, त्यानीच जगाला प्रथम करून दिली नाही काय ? समाज ही खरोखर अस्तित्वात असलेली गोष्ट असून मानवी जीवनक्रमात त्या संस्थेला फार महत्वाचे स्थान आहे. वेदानाच अनुसरुन बोलावयाचे तर परमेश्वरानेच समाजशास्त्र व त्याच्या अंगभूत असलेला समाजवाद यांची स्थापना आपल्या अखिल ब्रह्मांडातील जड व चैतन्य यांच्या संचालनात आविर्भूत केली असून पशु-पक्षी-कीटकांच्या जीवनक्रमांचे सूक्ष्म निरीक्षण करीत राहणाऱ्या अभ्यासकाला त्याचे दर्शन होतेच होते.

तथापि समाजशास्त्र हा शब्द मानवसमाजापुरताच वापरला जातो. तो मानव धर्माचा एक पर्यायवाचक शब्द आहे, हे मान्य करणेच जरुर आहे. विशाल ब्रह्मांडाचे संघटन हे एकजिनसी परिवारासारखे अगर जिव्हाळ्याच्या कौटुंबिक सहकारसमन्वयांच्या दृढभाजकाप्रमाणे आहे. हे वैदिक प्रमाण मान्य केले आणि ब्रह्मांडाचा एकच एक स्वामी, की ज्याला परमेश्वर म्हणतात, तोच आहे, हे सत्य असले, ( यस्य सूर्यश्च चंद्रमाश्च पुनर्णवः । अग्निं यश्चक्र आस्यं तस्मै ज्येष्टाय ब्रह्मणे नमः ॥- अथर्व १०।७।७३), तरी या सृष्टीच्या समाजवादातही सृष्टीतील निरनिराळे घटक आपापल्या पात्रतेप्रमाणे व आवाक्या-

प्रमाणे आपले स्वतंत्र अस्तित्व सांभाळूनच दुसऱ्याचे पूरक, सहाय्यक व समन्वयो होतात. तथापि सृष्टीच्या अन्य घटकात आणि मानवात फरक असा आहे की, अन्य घटक परमेश्वराने घालून दिलेले नियम आचरणशुद्ध राखण्याचा आटोकाट अट्टाहास करतात, तर मानव पमेश्वरानेच दिलेल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर आपल्या व्यवहाराच्या मर्यादा आपणच आखून घेऊन सर्व सृष्टी–व्यापारापासून आपले वेगळेपणाचे स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याच्या फंदात पडत असतो.

आणि तरीही अनुभव असाआहे की मनुष्य हा देखील सामाजिक प्राणी आहे. त्याच्या बहकणाऱ्या बुद्धीला ताळ्यावर आणण्यासाठी, समर्थांनी दासबोधात 'पर्णाली'चे उदाहरण देऊन, टाकलेले एक पाऊल ठाम झाल्यावरच दुसरें पाऊल उचलण्याचा व टाकण्याचा सल्ला दिला आहे, तो उगाच नव्हे. किड्यामुंगीपासूनही माणसाने बोध घेऊन, समाज व सामाजिकता यांच्याशिवाय आपल्या जीवनाचा निर्वाह नाही. आणि ? समाजातील ज्ञान–विज्ञान, कलाकौशल्य, तशीच सभ्यता संस्कृति यांची प्रगतोन्नति सामाजिकतेमुळेच होत असते, हे निर्विवाद आहे. म्हणून माणसामाणसाने मूळ माणुसकीचा धर्म दक्षतेने पाळणे जसे कर्तव्य ठरते, तसेच तो धर्म सदैव प्रगतोन्नत ठेवण्यासाठी 'व्यापकपण । सोडू नये काहीकेल्या ।।' हे व्रतही त्यास पाळावे लागते. कोणत्याही कार्यक्षेत्रात व कार्यक्षेत्राविषयी विचार, उच्चार, आचार व्यापकच व्यापक करावयाचा या समर्थांच्या म्हणण्याचा अर्थ वेकनच्या म्हणण्याप्रमाणे 'बहुतांचे बहुत कल्याण' हे केंद्र वेधक राखणे होय.

समाजसंस्थेचे स्थान मानवी जीवनक्रमात महत्वाचे आहे. ते वरीलप्रमाणे मनुष्यमात्राने प्रस्थापित केले पाहिजे. ते प्रत्यक्ष जड वस्तूंच्या स्वरूपांत लांबी, रूंदी, खोली, उंची, रंग, रूप, अवयवानी प्रगटपणे दाखविता येत नसले तरी त्याचा संबंध व जोम विलक्षणच असतो. गुरूत्वाकर्षण जसे दाखवता येत नाही, पण त्याशिवाय जड वस्तुमात्र नियमबद्ध होणेच शक्य नाही, तशीच मानवाच्या समाजशास्त्राची स्थिति आहे. समाजशास्त्र हे सर्व सामाजिक शास्त्रांच्या गुरुस्थानी आहे. सर्व जीवनाच्या अंगोपांगांच्या शास्त्रांच्या निष्कर्षाचे परस्पर संबंध समजण्यास समाजशास्त्राच्या सिद्धांताचे सहाय्य घ्यावे लागते.

एकत्र वास्तव्य करण्याची मानवी प्रवृत्ति व तिची प्रगति; एकच आवडी निवडी म्हणून आणि विशिष्ट फायद्यासाठी एकत्र येण्यात, एकदिल होण्यात अगर एकाच आपत्तीत खांद्याला खांदा लावून उभे राहण्यात, आढळणारी मानवी अंतःकरणांची उबळ, उचल, अगर उतावीळ; त्याचप्रमाणे सामुदायिक पद्धतीने एकमेकात चालणारी देवघेव व तीमधील मूलभूत तत्त्व; या सर्वांवर मानवी समाज उभा राहिलेला असतो. त्यातूनच तिसरा जो ' एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ।।' हा स्वभाव उमटतो तो शाश्वत आहे. त्याने व्यवहारात

'अर्थशास्त्र' असे रूप घेतलेले असते. समाज काय करतो, त्याच्या चालीरीति, धर्म, राहणी अशा सर्व जीवनाच्या अंगोपांगांचा विचार समाजशास्त्रात येतो. रूढ प्रथाप्रणालीत बदल साहजिक वा जाणूनबुजून अपरिहार्य का ? हाही इतिहास-नोंदीचा दाखला आपली दखल घ्यावयास लावल्याशिवाय समाजशास्त्र सोडीत नाही. जादू-टोणे, शकुनाशकुन, ढोंगस व अंध अनुकरणाची प्रवृत्ति, विशेषत: पुढाऱ्यांच्या रिवाजांची नक्कल अगर गुणकर्तृत्वाच्या आकर्षणाने त्यांची होणारी विभूतिपूजा, मतभेदाने होणाऱ्या तेढीच काय, पण यादवी युद्धे यांचाही उद्धार करून समाचार घेण्याचे कार्य समाजशास्त्र करीतच असते. ज्या नीतीने लोकांची शक्ति वाढेल, ज्ञान विकसेल आणि ऐश्वर्यही झळकेल (अग्ने पुरीष्यामि युम्नमभि सह आ यच्छस्व ।।- यजुर्वेद ३।४०) म्हणजे समर्थ रामदासांच्या शब्दात बोलावयाचे तर 'शक्तियुक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत धावती ।।' अशा समाज सामर्थ्याचा परामर्श समाजशास्त्राला घ्यावाच लागतो. सामाजिक स्वास्थ्यसंरक्षणाची हीच नीति होय. मानवाच्या विवक्षित समाजाच्या हालचालींचे वैशिष्ट्य व समाजरचनेचे बंदिस्त असलेले जीवन हीच मानवाची संस्कृति, हे पाश्चिमात्यांचे प्रतिपादन सर्वसाधारणपणे गृहीत धरले तरी, सेमेटिक संस्कृतीच्या इसाई व इस्लामी धर्मात जो बंधुभाव गौरविण्यात येतो, तो त्या त्या धर्मीयांच्या पुरताच व्यवहारमर्यादित राहतो. हे वास्तव लक्षात घेतले तर 'पितृत्व परमेश्वराचे आणि बंधुत्व मानवाचे' हे त्या त्या धर्माचे शिक्षण काय तोलामोलाचे ठरते ? 'हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची थोर । किंबहुना सचराचर । आपणचि जाहला ।।' असे जीवनाचे ध्येय सांगणाऱ्या अगर 'चिंता करतो विश्वाची ।।' असे सहजोद्गार आपल्या पाईकाच्या तोंडून निघावेत, अशी शिकवण देणाऱ्या वैदिक धर्माच्या अव्वल शिक्षणाच्या पासंगालाही सेमेटिक संस्कृतिशिक्षण पुरे पडू शकत नाही, हे उघड आहे. इसाई-इलाही धर्मांच्या संस्कार-संस्कृतींच्या मानाने चिनी व भारतीय वैदिक संस्कृति विकासतत्त्वावर आधारलेल्या असून रुचिवैचित्र्याने, प्राप्तकाळाची गरज म्हणून, शांति-पुष्टि-तुष्टीची समृद्धि करणारे नवीन नवीन साधनोपाय दिसू लागले म्हणून, समाजाच्या प्रथा-प्रणाली-रुढीमध्ये जरूर तो बदल होऊ देण्यास अगर करण्यास त्या दोन्ही संस्कृति धीमेपणाने तयारच असतात.

समाजसत्तावाद किंवा समाजवाद एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून सर्व जगभर प्रचलित होऊ लागला. त्याचे स्वागत ब्रिटिश रियासत संपल्यानतर स्वतंत्र भारतानेही केले आहे. याचे कारण भारताची संस्कृति विकासवादी हे तर खरेच; पण ती समाजात शाश्वतपणे चांगुलपणाच प्रभावी असावा या धारणेची आहे, हेही तितकेच खरे आहे. समाजवादाची मूलभूत कल्पना भारतीय संस्कृतीच्या अंगवळणापैकीच होती, आहे, हेही आणखी आहे. खासगी मालकी मिळकतीचे तत्त्व नष्ट करून मिळकत म्हणून असेल ती सामुदायिक मालकीची

करावयाची हे समाजवादाला अभिप्रेत आहे. व्यक्तिव्यक्तीला जीवनिकेच्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक ते सर्व मिळावयाचे; पण व्यक्तिश्रमातूनही मिळविलेल्या संपदेतून वैयक्तिक गरजा भागविल्यानंतरची ऊर, विशेषत: तीमधील उत्कट, भव्य, दिव्य असेल ते समाजकारणी वा राष्ट्रकारणी लागलेच पाहिजे, असाच समाजवादाचा कटाक्ष असतो ना ? तर मग वैदिक धर्माच्या अर्थ या पुरूषार्थाचा तो एक भाग असून समर्थांनी म्हटल्याप्रमाणे

'सकल जन सुखावे । तो कसा काळ फावे ।।'

या ध्येयाच्या पूर्ततेसाठी करावयाची ती एक साधना आहे.

'काही मेळवी मग जेवी ।।' आणि 'आपण यथेष्ट जेवणे ।
उरले ते दुसऱ्यास वाटणे । परंतु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ।।'

हे समर्थांनी जनसामान्यास सांगितले आहे. जरा उच्च स्तरावरील मंडळींना समर्थ सांगतात की

'गुंतल्या लोकास उगवी । शरीर कारणी लावी । काही तरी ।।'

अशी पात्रता सिद्धी वैयक्तिक आवश्यकता भागविण्यासाठीही माणसाने प्रस्थापित करून आपली जीवनिका सार्थकी लावावी व स्वार्जितातील तेजस्वी ऊर लोकाकारणी अर्पावी.

सेवासमर्पणबुद्धीने समाजवादाची साधना वैदिक संस्कृतीने 'सर्वं यज्ञे प्रतिष्ठितम् ।' असे प्रबोधन करून उज्ज्वल केली आहे. विशिष्ट तत्त्वानुसार कायद्याने आर्थिक व्यवहारव्यवस्था करणे व ती होण्यासाठी जरूर तर शासनाला राजकीय शह देणे हे समाजवादात युरोपीय विवेकवन्तांनी अभिजातच मानले आहे. पण सात्विक आणि विशाल दृष्टीच्या बंधुभावाने स्वत:च्या सुखसोयींचा जरूर तर सर्वस्वी होम करून समाजस्वास्थ्याची दीक्षा देणारा वैदिक धर्म व त्याचे समर्थ-सप्रदायासारखे अनुषंगिक संप्रदाय, समाजवादाला अभिप्रेत असलेली आर्थिक व्यवहारव्यवस्था, कायद्याच्या बडग्याशिवायच, मूर्त करण्याची प्रेरणा देतात व समाजाची प्रतिष्ठा व्यक्तिकडून आणि व्यक्तिचा गौरव समाजाकडून करवितात.

युरोपीय विद्वानांनी मानवी समाजाची आदर्श रचना कशी असावी हे वर्णन करणारी पुस्तके लिहिली आहेत. सर थॉमस मूर (१४७८ – १५३५) याने युटोपिया या नावाच्या आपल्या ग्रंथात समाजसत्ताक व समाजवादी पद्धतीच्या संस्थांचे वर्णन करून लोकमानस तयार करण्यासाठी प्रचाराचा प्रशस्त मार्ग आखला. फ्रेंच विद्वान एफ. सी. फोरीअर (१७७२ – १८३७) याने तर अशी सूचना केली, की एका समाजाच्या स्वयंपूर्ण अशा अनेक जमाती कराव्या।

आणि एकेक जमातीने एकेक महत्त्वाचा जीवनोद्योग पत्करावा. या सर्व जमातीनी परस्पराशी बरोबरीने सहकार्य करावे. वैदिक धर्माच्या चातुर्वर्ण्याप्रमाणेच फेरिअरची समाजरचना असून, रॉबर्ट ओवेन (१७७१-१८५८) या लानार्क येथील विणकर सम्राटाने आपली सर्व संपत्ति इग्लंडात आणि अमेरिकेत नमुनेदार समाजसत्ताक जमाती निर्माण करण्याच्या कामी खर्च केली. दुसऱ्याच्याकरिता त्याग करणारा "देव" होऊ लागला, या दृष्टीने पहाता, ओवेन अपयशी ठरला तरी इतिहासात आदराचा विषय झाला. त्यांपेक्षा

'विचारोनि बोले, विवचोनि चाले। तयाचेनि संतप्त तेही निवाले।।'

पाहिजेत यावर भर देऊन "उणे पडू देऊ नये। कोणी एकाचे।।" अशी समाजाला शिकवण देणारा समर्थसप्रदायच खरा समाजवादी नाही काय ?

आधुनिक समाजवादाला राजकारणी स्वरूप १८४८ साली आले. आणि ? कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंजल्स प्रभृतीनी त्याची महती वाढविली तो जगाच्या तीव्र मेंदूनी तिचा वेध घेईपर्यंत ! समाजाची विशिष्ट रचना आर्थिक व राजकीय विचारानी करून, समाजवाद औद्योगिक क्रांति करण्यावर भर देण्यात धन्यता मानतो. भारतातही विष्णुबुवा ब्रह्मचारी (१८२५-१८७१) यानी एक क्रांतिकारी समाजरचना कार्लमार्क्सच्या पुढे जाऊन सुचविली होती, 'सुखदायक राज्य प्रकरणी निबंध' लिहून विष्णुबुवानी सुचविलेली योजना पाश्चिमात्यांच्या समाजवादाला मागे सारणारी होती, तेजस्वी होती व तिला वैदिक धर्मातील अध्यात्माची पार्श्वभूमी होती. याचे कारण वैदिक धर्माचा समाजवाद मानवी जीवनातील केवळ 'अर्थ' – पुरुषार्थापुरता मर्यादित नसून मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगाना व्यापणारा आहे म्हणून तो प्रसंगोचितपणे

'अर्थमनर्थं भावय नित्यं, नास्ति ततः सुखलेशः सत्यम्।'

असे म्हणाला तरी मानवी जीवनाचे उदात्तीकरण करणाराच तो आहे.

'यस्यास्ति वित्तं स नरः कुलिनः। स पंडितः स श्रुतिमान गुणज्ञः।।
स एव वक्ता स च दर्शनीयः। सर्वेगुणाः कांचनमाश्रयन्ते।।'

अशी मानवी जीवनाची विकृति होऊन 'परमेश जगाचा पैका।' होऊ नये; पैका, धन, अर्थ हा जीवनाच्या अनेक आवश्यक साधनापैकी एक आहे, एवढी त्याची मर्यादा सांभाळली जावी, याचा विसर पडू नये. 'आधी संसार करावा नेटका।' म्हणणाऱ्या समर्थ रामदासानी वैदिक समाजवादच आचरिला व प्रचारिला होता.

समाजव्यवस्था मानवधर्माच्या विकासाचे प्रमुख अंग आहे. म्हणून माणसाने सर्वप्रथम मानव धर्माचे पालन आणि विकसन सदैव साधित रहाणे

कर्तव्यच मानणं जरूर आहे. माणूस जेवढा विकसित, उन्नत होत असतो, तेवढाच समाज विकसित, प्रगत, उन्नत होत राहतो. आपल्या सर्व घटकांच्या गुणावगुणांचा एकजिनसी दृढभाजक म्हणजेच वस्तुमात्रातील कुवत होय. वस्तुमात्रातील कुवतीमुळे घटकातील गुणावगुणांच्या परिणति व्हावयास चुकत नाहीत. व्यक्ती आणि समाज यांच्या अशा परस्परावलंबी पुष्टिसंभवामुळे मानवधर्म परमसमर्थ होणे शक्य होते. म्हणूनच वेदाने आपल्या समाजवादाचे

१) 'मनुर्भव। (ऋग्वेद १०-५३-६)'

असे पहिले सूत्र सांगितले आहे. 'माणसा, मनुष्यदेह प्राप्त झाल्यासारखा सर्वप्रथम तू माणूस हो; मननशील हो.' समर्थ रामदासानी आपल्या 'मनाच्या श्लोकात' मुख्यत: तोच उपदेश केला आहे. माणसाने मननशील होताना, बरे काय, वाईट काय, यांचा विवेक करूनच आपला शब्द ओठाबाहेर काढावा आणि आपल्या पाऊलटाकीचे नेमके परिणाम काय होतील, यांचा हिशोब करूनच आपले पाऊल उचलावे; तेही असे की त्यायोगे समाजातील जे रंजले गांजले असतील, रागावलेले-फुरंगटलेले असतील, त्यांच्या अंत:करणाला थोडे तरी समाधान मिळावे! समाजसन्मुख जीवनाचा हा पाठ अंगवळणी पडावयास, माणसाला त्याची सवय लहानपणापासूनच व्हावी लागते.

त्यासाठी समर्थांनी मुलाना उपदेश करताना प्रथमच सांगून टाकले आहे की- 'बरे सत्य बोला, यथातथ्य चाला। बहू मानिती लोक येणे तुम्हाला॥ धरा बुद्धि पोटी विवेके तुम्ही हो। बरा गूण हा अन्तरामाजि राहो॥' अशा तऱ्हेने समाजसन्मुखतेची जेवढी उदात्त भावना माणसामाणसात जागृत रहात जाईल, तेवढे उदात्त सामाजिक जीवन साकारेलच साकारेल. व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाचे सहकार-समन्वयी प्रवाहातूनच संस्कृति व सभ्यता यांचा विकास दृढावतो. वेदाने संस्कृतिच्या विकासाचा मूलमंत्र सांगितला आहे की विद्या, धन, ऐश्वर्य यांचे सदैव दुसऱ्यास दान करीत राहण्यात स्वारस्य आहे. त्या स्वारस्याचा उतारा व्यवहारशुद्ध होण्यासाठी समर्थ रामदास सांगतात की कोणाचे उणे पडो देऊ नये. या दक्षतेतूनच श्रेष्ठ भावना, परस्पर जिव्हाळा, जगण्यात काही अर्थ आहे अशी प्रतीति, 'आज कालच्या पुढे चलो' ची जिद्द, आणि जीवनातील गतिमानता अखंड राहतात. 'समाजाचा प्रवाहो चालला म्हणजे बरे तुंवता नये॥' हे साध्य होते. मनुष्यमात्रानी परस्परावर प्रीति ठेवून परस्पर-सहाय्यक व्हावयाचे व्रत सांभाळले तर पृथ्वीच स्वर्ग होईल.

२) वैदिक समाजवादाच्या द्वितीय सूत्राचा मंत्र मग असा दिसतो की-

'अच्छिन्नस्य ते देव सोम सुवीर्यस्य ददितार: स्याम। सा अथ
मा संस्कृतिर्विश्ववारा स प्रथमो मित्रो वरुणोऽग्नि:॥ (यजुर्वेद ७।१४)

अर्थात् 'हे सौम्यगुणयुक्त, हे सर्व ऐश्वर्याचे केंद्र असलेल्या परमेश्वरा, तू या सृष्टीमध्ये जे विविध प्रकारचे ऐश्वर्य खचून ठेवले आहेस व त्याचा उपयोग करण्याची अक्कल व सामर्थ्य आम्हाला दिले आहेस, त्यांच्याच जोरावर तुझे ते ऐश्वर्य, विद्या, धन म्हणजेच कल्याणाचा शाश्वत ओघ आम्हाला तुझ्याकडून मिळो ! आमच्यामध्ये ही स्वार्थवृत्ति जागृत ना होऊ दे की संसारातील ऐश्वर्य, विद्या, धन इत्यादींचा कल्याणकारी मार्ग केवळ आमच्याच करता आहे. उलट तो सगळ्यांच्याचसाठी उपयोगी आहे व सगळ्यांच्याच वाट्यास आला पाहिजे. सर्वच जण त्याचे अधिकारी असून तो अग्रहक्काने सर्वांना प्राप्त होण्याचे संस्करण हाच खरा व्यवहार, खरी नीति आहे.'

हृदयाचा असा उमाळा सर्वप्रथम सगळ्याच जणामध्ये जिव्हाळा निर्माण करील, सगळ्यानाच उदात्त करील, सगळ्यांचेच जीवन रसरशीतपणे गतिमान करील. समर्थ रामदासानी अशीच प्रार्थना केली आहे की–

'कल्याण करी देवराया । जनहित विवरी ।
हे जन हाति धरी ।।'

समाजसुधारणा व समाजस्वास्थ्य यांचा संबंध बाह्य वातावरणाशी आणि सामूहिक मनोवृत्तीच्या जडणघडणीशी नित्याचा असतो. म्हणून समाजाला 'त्यागार्थ मूर्खलक्षणे' समर्थांनी सांगून प्रत्येक जाणकाराला आदेश दिला आहे की–

'जे जे काही आपणासि ठावे । ते ते हळूहळू शिकवावे ।
शहाणे करून सोडावे । सकळजन ।।'

जीवनव्यवहारातूनच संस्कृतीचाही प्रवाह दृष्टीस पडत असतो. देशकाल-परिस्थिती आणि आवश्यकतेनुसार जलदी जलदी परिवर्तनही घडू शकते, माणसाच्या जीवनातील प्रत्येक अंगोपांगात काळ – काम – वेगाचे गणित अक्कलवतपणे चाललेच पाहिजे; चाललेलेच असते. त्यासाठीच

'घालोनी अकलेचा पवाड । ब्रह्मांडाहूनि व्हावे जाड ।
तेथे कोठोनि आणिले द्वाड । करंटपण ? ।।'

असा प्रश्न समर्थ टाकतात. त्यापायी

'असो कोणी एक नर । महार, धेड, चांभार ।
त्याचे राखावे अंतर । या नाव भजन ।।'

ते करून माणसाने प्रयत्नपुरूषार्थ उभारला पाहिजे.

'भाग्यासी काय उणे रे ? । यत्नावाचोनि राहिले ।।'

असा अनुभव आहे. तेव्हा 'यत्न तो देव जाणावा ।' हेच खरे. पण तो 'अचूक हवा.' तरच 'त्याची राज्ये (पात्रतासिद्धस्थाने, प्रतिष्ठा) समस्तही ।।.' जीवनात

मनुष्य दैवाच्या हातात नसून दैव मनुष्याच्या हातात आहे. 'यत्नाचा लोक भाग्याचा ।' हे खरे असले तरी ते भाग्य माणसाला त्याच्या मूलभूत स्वभावावर आणि तो ज्या समाजात जन्मला, वाढला, त्याच्या पूर्वपरंपरानी दिलेल्या संस्कारावर त्याला साध्य होत असल्याकारणाने, त्या भाग्यावर सुद्धा समाजाचा नैतिक अग्रहक्क राहतोच. माणसाचे जीवन नदीच्या जीवनासारखे उगमस्थानी बिन्दुमात्र असले तरी पुढे पुढे ते विशाल विशाल होत जाऊन लोकोपयोगास एवढे आले पाहिजे की 'माझ्याचसाठी जगतो न मी हे ।' अशी त्याची उत्स्फूर्ति असावी. आणि ती लोकप्रत्ययाची ठरावी. ओघवत्या मानवी जीवनाला व्यापकपणाबरोबर पावित्र्य यावे आणि सगळ्याच्या सुखात आपले सुख सामावल्याची जाण सातत्याने रहावी. हे वळण आपल्या अनुयायाना, सांप्रदायिकाना व समाजजीवनाला लागावे, म्हणून समर्थांच्या मठात, देवस्थानात, उत्सवादि कार्यक्रमात मनुष्ये पारखून त्यांच्या त्यांच्याकडे पात्रतानुरूप कामे सोपविलेली असत आणि त्यांच्या त्यांच्यात सहकारी एकसूत्रता रहावी म्हणून शिस्त लावून दिलेली असें. ती इतकी की

३) 'दास डोंगरी राहतो । यात्रा (समाज) देवाची पाहतो ॥'

हे समाधान सदैव असे. 'अवघेचि सुखी असावे ।' ही भावना जागरूक राहून 'प्रयत्नान्ती परमेश्वर असल्याकारणाने, माणसाने आपली कमाई हा परमेश्वराचा, जनता जनार्दनाचा, समाजातील सद्‌िच्छाशीर्वादांचा अनुकूलसवेदनासंपन्न प्रसाद आहे हे पक्केपणी समजावे आणि आपल्या भाग्याचे वाटेकरी शक्य तेवढ्या जास्तीत जास्त आप्तेष्ट– सहानुभूतिक– सहकाऱ्याना करून, वशिष्ठानी रामाला केलेला

'अंतस्त्यागी बहिर्योगी संसारे भव राघव ।'

हा उपदेश सार्थपणे साकार करण्यातच माणसाने धन्य व्हावे.

वैदिक समाजवादाच्या या सूत्राप्रमाणे अखिल ब्रह्मांडाचा एकच एक स्वामी 'करिता, करविता देव एक' आहे व ब्रह्मांडातील प्राणिमात्र त्या देवाचे पाल्य असून, आपलेच ते सहोदर आहेत अशी मनोवृत्ती विकसवित विकसवित माणसाने 'सचराचर आपणचि जाहला ।' ही मनोऽवस्था प्राप्त करून घ्यावी अशी दूरगामी अपेक्षा आहे. खरा मोक्ष तीमध्येच आहे.

वैदिक समाजवादाचे तिसरे सूत्र पुढे दृग्गोचर होते, त्याचा मंत्र.

'भूतस्य जातः पतिरेक आसीत् ॥ (यजुर्वेद १३।४५)

असा आहे. दृष्ट व अदृष्ट सृष्टीचा आणि त्यामधील चराचर वस्तु-व्यक्तिमात्रांचा एकमेव स्वामी 'स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरलेला' असून तो आहे–

'यः प्रणतो, निमिषतो महित्वैक इद्राजा जगतो बभूव ॥'

(यजुर्वेद २५।११)

तो परमेश्वर समर्थांनी म्हटल्याप्रमाणे " आहे तरी सर्वांठायी । पाहो जाता कोठेच नाही ॥' आणि तरीही ' जगी वावरे जो अणुरेणु काही । रिता ठाव या राघवावीण नाही ॥' असे प्रत्यंतर पदोपदी येतच असते. त्या जगच्चालक चैतन्याला ऊर्फ परमेश्वराला अनेकानी अनेक नावे दिली, तरी तो निर्विकार, निराकार, निर्गुण आणि म्हणूनच सर्वगुणसंपन्न व व्यापकच व्यापक आहे. समर्थ रामदासानी म्हटले आहे की–

' गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥'

तो परमेश्वर वेदात देखोल, इतर अनेकानेक ऋषीनी दिलेल्या इतर नावाबरोबरीने ' राम ' या एका नावाने ओळखला जातो. मन गुंगवून रममाण करणारी जो जगच्चैतन्यशक्ति ती ' राम.' ती शक्ति माणसाने विवेकाच्या, निरीक्षणाच्या आणि बौद्धिक चिकित्सेच्या साधनात्रयीने जाणून घ्यावयाची व तिचे अस्तित्व सर्वत्र पहावयास आणि ओळखून अनुभवावयास शिकावयाचे. एवढेच नव्हे तर तिची जाणही अखडपणे ठेवावयाची. ती मग माणसामाणसातही दिसू लागते. जनात दिसणाऱ्या त्या जगच्चैतन्याचे आविष्काराला ' जनार्दन ' हे एक नाव आहे. समर्थ सांगतात की–

' जनी जनार्दन असे । परी तो सज्जनी दिसे ॥'

म्हणजे जे चांगलेच करतील, वाईट काही करणारच नाहीत अशा लोकामध्ये अगर अशा लोकांच्या चरित्र–चारित्र्यादिकांच्या मार्गदर्शनानेच जनार्दनाचे दर्शन होते. सज्जनातील वा सज्जनामुळे दिसणारा तो जनार्दन, तो जगचैतन्यांश, तो राम माणसाला सुलभतेने ओळखता येण्यासाठीच, ज्या ऐतिहासिक कर्तृत्ववंताच्या चरित्रात तो प्रगट झाला, त्या रघुवंशीय दाशरथी रामाचा आदर्श जनसामान्यापुढे समर्थांनी ठेवला. शितावरून भाताची परीक्षा करता येते, तर दाशरथी रामाच्या ' अभयं सत्वसंशुद्धिज्ञानेयोग व्यवस्थितिः ।' असलेल्या कित्त्यावरून माणसाने जगच्चैतन्य रामाचे आकलन करावे. तो परमात्मा जेथे ब्रह्मांडाचा स्वामी आहे, तेथे, तो आपण ज्या ससारात आहोत व जो आपण आपल्या जीवनाने व जीवनात करतो आहोत, त्याचाही राजा, अधिपति, धनी तोच आहे, याची जाण मनोमानसी, मेंदूत व स्मृतीत माणसाने पक्की धरून ठेवावी. ती जाण तशी पक्की झाली की त्या जाणेच्या नसानसातून मुरलेल्या जोरावर, माणसाचे जीवितध्येय जे परमार्थ ऊर्फ परमेश्वराशी एकरूप होऊन जाणे ते मनुष्य साधू शकतो; निदान, ते माणसास साधू लागते. त्यायोगे माणसातील विघातक वा पाशवी वृत्ति क्षीण होता होता, क्षय व परिणामतः लय पावते. अशा अवस्थेत विश्वातील प्राणिमात्रासंबंधी माणसाला वाटणारा जिव्हाळा, सहानुभूति, आपुलकी,

स्नेह, यांच्यापेक्षाच काय ? पण मातृहृदयाच्या वात्सल्यापेक्षाही भूतमात्राशी 'हृदयांचे नाते' अतूट जमते. काशीहून आणलेल्या गंगेच्या कावडीची वाहतूक रामेश्वरापर्यंत करण्यापेक्षा, तहानेने व्याकूळलेल्या गाढवाच्या जीवास गंगा घालण्याचे सहजच हातून घडते. एवढी व्यापक दृष्टी, हृदयाची विशालता आणि बुद्धीची 'शिखरिणी' ही एक 'अनेकजन्मसंसिद्ध तपश्चर्या' असली तरी तिचा श्रीगणेश माणसाने स्वतःच्या कुटुंबियापासून घालावा आणि 'वाढता वाढता वाढे, भेदिलें सूर्यमंडळा ।।' अशी मारूतीसारखी ती तपश्चर्या प्रगतोन्नत ठेवावी, अशी समर्थांनीच रूळी घालून दिली आहे. या रुळीप्रमाणे माणसामाणसातील परस्पर-सहकार-समन्वयाने एकमेकांचे पालन, पोषण, रक्षण, सामर्थ्यसंवर्धन होऊ लागते आणि जिव्हाळ्याचे भावबंधन दृढावते. समाजात, राष्ट्रात व कधीकाळी जागतिक मानवसमाजात एकजिनसीपणा बहारण्याचा तो आराखडा निसर्गाने, परमेश्वरानेच आखून दिल्याचे भगवद्गीतेनेही सांगितले आहे. 'सहयज्ञः प्रजा सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः । अनेन प्रसविष्यध्वम्, एष वोऽस्त्विष्टकामधुक् ।' या गीतावचनास धरूनच समर्थांनी धारणा शिकविली की- 'सकळ लोक एक करावा । एक विचारे भरावा ।।' म्हणजे अभ्युदय लांब नाही; हाताशीच आहे. फार काय ? मेला तरच हटला असा 'मऱ्हाटा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।।' असा सल्ला सुखी, स्वावलंबी, स्वाभिमानी व सामर्थ्यशाली राष्ट्रप्रपंचासाठी समर्थांनी दिला आहे. देशाला 'शिवकल्याण राजाचे शासन' शाश्वतपणे मिळण्याची साधना तीच असल्याचेही समर्थांनी सुचविले आहे. फार काय ?

'मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते ।'

अशा सिद्धीचीही वरील साधनेने 'कृपा केलिया रघुनाथे । प्रचीत येते ।।'

प्राणिमात्रांचे शिवकल्याणभावदर्शन त्यांच्या त्यांच्या संस्कृतींच्या उच्च, उदात्त, दिव्य स्वरूपात त्रिनचूक होत असते. आतापर्यंतच्या सर्वच कालखंडातील जगभरीचा हा अनुभव लक्षात घेतला तर तीच भावना अखंडपणे समाजात उजळी व तेवती रहावी, म्हणून, वैदिक समाजवादाच्या चवथ्या सूत्राचा मंत्र आहे की-

४) 'शन्नो भव द्विपदे शं चतुष्पदे ।। (ऋग्वेद ७।५४।१३)'

वैदिक धर्म यज्ञप्रधान आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीत असलेल्या दैवी गुणाबद्दल आदर बाळगावा व त्या आदरापोटी त्या त्या व्यक्तिची इज्जत, प्रतिष्ठा, पात्रतासिद्धी माणसाने अचल सांभाळावी अगर गौरवावी ती वेळप्रसंगी स्वतः झीज सोसूनही. या कृतिपूजेला यज्ञ हे नांव आहे. यज्ञाच्या नावामध्ये 'अध्वर' हे नांव अहिंसा द्योतक आहे. वैदिक भारतातील सर्व देवता शस्त्रसंपन्न असल्या तरी आणि त्यांची आराधना म्हणजे त्यांचे उत्कृष्ट अनुकरण, 'देव

होवोनि देव भजावा ।' या न्यायाने असले तरी देवतांची व भक्तांची शस्त्रसंपन्नता 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ।।' असते. अपरिहार्यंच झाल्यास होणारी खलहिंसा निष्पाप, निरागस, सात्विक जनांच्या जीवनसुखरूपता-सदर्भात क्षम्य ठरते व अहिंसाच मानावी लागते. 'काटीने काटी झाडावो । परी कळोच नेदावी ।।' अगर तशीच समर्थांची दुसरी वचने वरील तत्त्वाची प्रकाशक होत. वैदिक देवतांची व भक्तांची शस्त्रसंपन्नता समाजस्वास्थ्यसंरक्षणाची साधना व हमी आहे. विनाकारण दुसऱ्यावर आक्रमण करून उपद्व्याप, उपद्रव, वा क्रूरता उभारण्याकरता नाही. वैदिक धर्माची स्पष्ट संवेदनाच आहे की–

'मित्रस्य मा चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षन्ताम् ।
मित्रस्याहं चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे ।
मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे ।। ( यजुर्वेद ) ।।'

साऱ्या प्राण्यानी माझ्याकडे स्नेहाच्या नजरेने पहावे; मी सुद्धा सर्व प्राण्याकड स्नेहार्द्र दृष्टीच लावावी; आम्हा सगळयांचीच नजर केवळ जिव्हाळयाची असावी. अशा तऱ्हेने सगळया विश्वाकडेच परमेश्वरांगभूत म्हणून पहाणाराकडून दुसऱ्यावर आक्रमण होईलच कसे ? वैदिक धर्माची प्रकृति, प्रवृत्ति, धारणा अहिंसाच आहे. मात्र दुसरा कोणी शत्रुभावाने, दुज्याभावाने, अन्यायाने आपल्यावरच आक्रमण करून आला, तर त्याच्या अरेरावीतील 'गुरूची विद्या गुरूसाच फळली करण्याकरता व मानवधर्माच्या प्रस्थापनेकरता भागच पडल्यावर सिंहनाद करून त्या आक्रमणाचा प्रतिकार कर्तव्यबुद्धीने तिखटच तिखट करावा लागल्यास त्यात अस्वाभाविक काही झाल्याचे मानण्यात काहीच अर्थ नाही.

'जैशास तैसा जेव्हा भेटे । तेव्हा मजालसी थाटे ।।'

हे खरे; पण बहुधा 'फड नासोचि नेदावा ।।' यावरच लक्ष्य असावे. त्यासाठीच समर्थांनी 'सावधान । सावधान ।' असा पुकारा सर्वत्र केला आणि स्वतःच्या जीवनात तो शेवटपर्यंत आचरणशुद्ध राखला.

माणसाचे जीवन म्हणजे तरी काय ? स्वतः माणसाने मन - मेंदू - मनगटानी बळकटच बनून संपूर्ण समाजाचा एक घटक या नात्याने, शरीरातील अवयवा-सारखेच समाजाच्या बळकटीसाठी उपयोगी यावयाचे. वेदात विश्व व सर्व हे परमेश्वरवाचक शब्द आहेत. तेव्हा 'हे विश्वचि माझे घर ।' अशी बुद्धी धरणारा अगर 'चिंता करतो विश्वाची ।।' म्हणून सांगणारा समजतो ते विश्व, तो आपल्या मन – मेंदू – मनगटांच्या बळकटीने सर्वांची म्हणजे परमेश्वराचीच सेवा करतो, हे स्पष्ट समजले पाहिजे.

वैदिक समाजवादाचे चतुर्थ सूत्र लोकसंग्रहापुढची मजल मारते. त्या सूत्रमंत्रातील प्रार्थनाच मुळी अशी आहे की – 'हे प्रभो, तू आमच्या मानव व

पशु आदिक परिवारासाठी नेहमीच कल्याण आणि सुख देत रहा.' प्राणिमात्रा-संबधी असा जिव्हाळयाचा दृष्टिकोन, लोकशिक्षणाच्या प्रारंभस्तरापासून आणि माणसाची 'कोमल तरु–तुल्य बुद्धि वाकेल।' अशा स्थितीत असल्यापासून साफ साफ दृढमूल झाला तर समाजात सर्वांच्याच कल्याणमयी भावनेच्या जागृतीने समाजाचे स्वरूप खरोखरच आदर्श ठरेल. प्राणीमात्रांच्या कल्याणकारी सदिच्छाप्रवर्तनातून वैदिक संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन सातत्याने चालू राहील आणि मानवजातीचे उत्थापन व प्रगतोन्नत संचलन हे केवळ स्वप्नरंजन न राहता, ते असे वास्तव बनेल की त्यापुढे कल्पनासृष्टीने सुद्धा थक्क व्हावे!

५) अशी भरारी मारता आली तर ठीकच ! पण तसे जमले नाही तरी वैदिक समाजवादाचे पांचवे सूत्र तरी खास आत्मसात् करता येईल. त्याचा मंत्र असा की–

'पुमान् पुमांसं परिपातु विश्वतः। ( यजुर्वेद २४। ५१ )

माणसाने माणसाची सर्वप्रकारे, सर्व बाजूनी, हाताशी असलेल्या व येऊ शकणाऱ्या सर्व साधनांनी, आपुलकीच्या प्रेमभराने उत्तमात उत्तम सुरक्षितता साधण्यासाठी जीवापाड झटले पाहिजे तसे करावयाचे तर, जे जे काही आपल्याजवळ साधनसंपदेचे भांडार असेल, ते ते माणसाने कारणी लावले पाहिजे. त्यासाठी आपल्या शारीरिक शक्ती, बौद्धिक कुवती, भावनिक उत्कटता, ऐहिक शस्त्रास्त्रे व ती वापरण्या–चालविण्यातील कुशलता आणि व्यवहार-विनिमयासाठी उपयोगी ठरते ते सोनेनाणे, हे आपल्या स्वतःच्या एकटयाच्या मालकीचे मानावयाचे सोडून देऊन, ते समाजातील, राष्ट्रातील वा जगातील सर्व मानवांच्या मालकीचे आहे आणि ? आणि त्यावर आपल्यापेक्षा त्या सर्वांचा अग्रहक्क आहे, अशी माणसाने आपल्या मनाची खातरजमाच केली पाहिजे. कर्तव्यच ते !! अनेक जातिवाद, वर्गवाद, राष्ट्रवाद सगळीकडे बुजबुजाट माजवून बसलेले आणि ते मानवाचे जीवनच वाद–जर्जर करीत असलेले दिसत असता, माणसाने आपले मन वरील तऱ्हेने 'निश्चयाचा महामेरू। सकल जीवासी आधारू।' करून सोडणे येरा गबाळाचे काम नोहे हे खास.

त्यातूनच आपला सामाजिक, वैयक्तिक, जातिवाचक, भौगोलिक, व्यापार-विषयक, आर्थिक, शैक्षणिक, राजनैतिक, वैचारिक, सांप्रदायिक, पारंपारिक-असा कोणता तरी, या दुहेरी, तिहेरी, अगर सर्वांगीण पगडा ठेवण्याची अहमहमिका भोवताली थैमान घालीत असता, जे जे काही आपल्या मालकी हक्काचे साधना–धन असेल, ते ते लोकांच्या अग्रहक्काचे आहे अशी मनोमन बळकटी राखावी, हे कल्पनेच्या पलिकडचे आहे, असेच कोणीही सीधा निरीक्षक हटकून म्हणेल ! तथापि तो ध्यासच घेतला तर ते अगदीच अशक्य आहे, असे मानण्याचे कारण

नाही. ' अहं ब्रह्मास्मि ।' म्हणजे मी ब्रम्ह आहे, मी आनंदमय आहे, मी निर्बल नाही, अशा धारणेचा ध्यास घेतला, तर आज ना उद्या, ती धारणा कायम होते व मनुष्य खरोखरच ती अवस्था प्राप्त करून घेतो असा वैदिकांचा अनुभव आहे. ' देव होवोनि देव पूजावा ।' यासाठी समर्थांनी आपल्या संप्रदायाचा ' चवथा अत्यंत साक्षेप ।' म्हणजे हाती घेतलेल्या कामात सर्वस्वी जीव फेकून देऊन प्रयत्नपुरुषार्थ असा एक बीजमंत्र दिला आहे. प्राप्त कर्तव्याच्या पूर्ततेशिवाय काहीच भान न राहण्याइतक्या निमग्नतेने माणूस मोहरून जावा म्हणजे ' यश–कीर्ति–प्रताप–महिमा । सीमा सांडोनि राहती ।।.' खरा जप तो हाच. ' काही एक उत्कटेवीण । कीर्ति कदापि नोहे जाण ।।'

जगच्छांतिकरता युद्धाची सिद्धता जय्यत ठेवणारी राष्ट्रे जगात दहशत निर्माण करतात. ती भयचकित शान्ति अगर स्मशानशांतता देखील ! पण मानवी जीवनाच्या स्वास्थ्यपोषणाला आवश्यक असलेली सात्विक शांतता ती राष्ट्रे स्वप्नातही देऊ शकणार नाहीत. म्हणून आपल्याला जे हवे असते, आपण जे ध्येय उराशी बाळगतो, अगर आपला जो आदर्श असतो, त्याच्या सर्वच बारकाव्याशी माणसाने समरस होऊन विनम्र होणे जरूर असते, त्यापेक्षाही ' विघ्नांच्या दाटल्या फौजा ।' अगर मोहव्यामोह आडवे आले, तर त्याना थप्पडले, लोळवले, मातीस मिळवले तरच शहामत ! वारा जसा निमूळत्या छिद्राचाहि वाव मिळ ला तर तो शोधून वहातच असतो अगदी आरपार, तसे माणसाने आपल्या परमार्थाकडील, ध्येयाकडील, वाटचालीचे सातत्य राखणे कर्तव्य होय. रामदासानी सकटमोचन मारुतीची उपासना समाजाला तेवढ्या-साठीच लावली. मारुती आपला ध्येयपुरुष प्रभुरामचंद्र याच्या पुढे ठाकला की हात जोडून ' दास मारुती ' दिसतो. पण अन्यत्र ?

" अधर धरुनि दाति मेरुशा मुद्रिकेने ।
निरख नजरपाती मृत्युते मृत्तिके ने ।।
कमर कसुनि छाती, पाय रोवोनि ठास ।
अरिवरि नित हाती घे गदा रामदास ।।"

असा तो प्रतापमारुति प्रगट होतो. माणसाने आपले जीवन अशाच जिद्दीने सार्थकी लावावे, लावले पाहिजे, अशी समर्थ रामदासांची चेतना होती. म्हणून " उदड खस्तिची कामे । मर्द मारूनि जातसे ।।" तसे समाजातील मनुष्यमात्र व्हावे आणि त्या सर्व मर्दांनी परस्परांची साथ खांद्याला खांदा लावून करावी यासाठी त्याच्या-मध्ये सहकार–समन्वयी जिव्हाळा उत्पन्न करण्यावर हरएक क्षणी भर देणे जरूर असते. तेवढ्यासाठीच समर्थ रामदासांचें आराखडे व रामरगाडे असत. त्यातून

"विसरा म्हणुनी कसे विसरते?— भावाचे नाते ।।" अशा सामाजिक एकजिनसीपणाचा अनुभव आल्याशिवाय रहातच नाही, तशा तालमीतूनच निर्माण होणारे सामाजिक संघटन प्रत्येकालाच निर्धास्त ठेवण्यास समर्थ होईल व एकंदर समाजकार्य व समाजसामर्थ्य प्रभावीच प्रभावी ठरल्याशिवाय राहीलच कसे? परस्परांचे पालन–पोषण–संरक्षण आणि संघटण यांची ती परिणती आणि सुखस्वास्थ्याची शाश्वती असते. ही परिणतावस्था विद्याविज्ञानांचा कोश ठरते; तीत कलाकौशल्यांचे संगोपन–संवर्धन होते. 'शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने कार्य होतसे । शक्तियुक्ति जये ठायी । तेथे भगवंत नांदती ।।" याचा प्रत्यय येतो. मात्र, लक्षात ठेवलेच पाहिजे की येथे केवळ सदिच्छांचे जाळे विणण्यानें भागणारे नाही, नसते. "केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।।" करण्यात पुरुषार्थ आहे. हा पुरुषार्थ सुसाध्य होण्यास, समाजातील प्रत्येकाचा "बरा गुण तो अंतरामाजि राहो ।।" असे माणसाने अभ्यासपूर्वक लक्ष ठेवावे लागते. त्यातूनच "लहान–थोर परीक्षून सोडावें ।।" हे वळण लागते. त्या परिक्षणातून "समय चुकी न देता" व प्रसंगी "समय साधून" प्रत्येकाच्या "बऱ्या गुणाचा" समाजाकारणे उपयोग अचूकपणे करून घेण्याची दक्षता घ्यावी लागते.

'समयासारखा समयो ये ना ।'

म्हणून त्या दक्षतेपायी माणसामाणसाला चिंतनशील राहिल्याशिवाय गत्यंतर नसते. अशा सगळ्या दक्ष प्रयत्नपुरूषार्थात

'सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे ।।'

असाच अनुभव येतो.

हे सर्व व्हावयास प्रत्येक कर्त्या माणसाचे मन 'सज्जन'च हवे. विचार, उच्चार, आचार केवढ्याही लहान मोठ्या विषयासंबंधी आणि कार्यक्षेत्रातील असो, जो करताना, भले, चांगले, चांगभलें असेल तेवढेच करीन अशा प्रतिज्ञेने मन बांधलेले पाहिजे.

'मना सज्जना, भक्तिपंथेचि जावे । तरी देव तो पाविजेतो स्वभावे।'

असा आश्वासनपूर्वक उपदेश समर्थांनी तेवढ्यासाठीच केला आहे. समाजातील मनामनाने सज्जन व्हावे, 'सदा बोलण्यासारखे चालावे ।' आणि सगळ्यांच्या एकजिनसी मिळणीने सगळ्यांची उन्नति, अभ्युदय, प्रगति होत रहावी, यासाठीच समाजशास्त्राची उभारणी असून, सामाजिक– सर्वहितकारीं नियमांचे पालन होण्या–करण्यानेच समाज कंबर कसून उभा राहील. तसा तो उभा राहील तर राष्ट्रीय जीवन सूर्यासारखे तळपत राहील. त्यासाठीच 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।' एवढेच नव्हे, तर 'चित्ते, वाचि, क्रियायां च सतानामेकरूपता ।।' असली

तरच जीवन तेजस्वी होते. हे जाणूनच 'आधी केले, मग सांगितले ।' अशा ब्रीदाने समर्थ स्वतः वागले.

'सकळ जन सुखावे । तो कसा काळ फावे ॥' हे पहाणाऱ्या माणसाला सत्याश्रयच असावे लागते. माणसानें आपण आहोत तसेच जगापुढे वावरावे, वावरले पाहिजे. अशा सत्याश्रयातूनच समाजवाद– पाचामुखीचा परमेश्वर– विकासतो आणि विक्रमी ठरतो. एरवी, देखावे दिशाभूल करतात. म्हणून कृत्रिमतेचे सारे मुखवटे ओळखून उघडे पाडावे लागतात, समाजातील सत्पुरुषार्थ जागविण्यासाठी ! आपण आहोत त्यापेक्षा अधिकच आहोत आणि भोवतालच्या जगापेक्षा काही आगळे वेगळे आहोत, हे दाखविण्यातच स्वतःचा मोठेपणा मिरविण्याची प्रवृत्ति माणसातील अहंकारादि विकारामुळे बळावते व तीमुळे समाजात ढोंगबाजी बोकाळते. या ढोंगबाजीला आपलाही हातभार लागत असल्याचे भान कित्येक वेळा कित्येकांना नसते. ते विचारच करतील तर त्याना आढळ होईल की अगदी हुबेहूबपणा प्रत्ययास आणणाऱ्या प्रत्येक व्यक्तीत वा वस्तुमात्रात कोठेतरी, काही तरी, लहानमोठा आगळेवेगळेपणा निसर्गाने राखलेलाच आहे. त्यात माणसाने गर्व वाहण्यासारखे काहीच नाही. कारण एकजिनसी सृष्टीत विविधता व वैचित्र्य, तसेच विविधतेत नि वैचित्र्यात एकसूत्रता नि एकजिनसीपणा ही निसर्गाची वा परमेश्वराची लीला आहे. पण सृष्टीतील हे राजगुह्य लक्षात न आल्यामुळेच, वाल्पोलप्रमाणेच आपल्या चितान्याला 'मी आहे तसाच मला चितार' अशी आज्ञा माणूस देतो. पण आपण कोण व कसे आहोत हे पक्केपणी जेथे माणसाचे माणसालाच कळलेले नसते, उमगलेले नसते, तेथे ते चितान्यास पक्केपणी कोठून कळणार ? कोठून उमगणार ? मग 'माणूस आहे तसाच चितारण्याचे' त्याला कसे साधणार ? परिणामतः दृष्टी तशीच सृष्टी आणखीनच निर्माण होते आणि विविधतेत वा वैचित्र्यात भर पडते. त्यामुळे 'पहावे आपणासी आपण' असे समर्थांनी उपदेशिले आहे. वैदिक धर्मसंस्कृतीनेही आत्मनिरीक्षणाचा व आत्मसंशोधनाचा मार्ग चोखाळावयास सांगितला आहे. संत–महंत–महर्षिनी तसाच उपदेश आग्रहपूर्वक केला आहे. हे अनुष्ठान पुष्कळाना जमत नाही. त्यामुळेच त्यातून 'जनस्वभाव गोसावी' निर्माण होतात व निरीक्षणपटु समाजहित चिंतकाना त्यांचे पितळ उघडे पाडावे लागते. समर्थांनी हे कटु कर्तव्य जन्मभर निर्भयपणे पार पाडले आणि 'ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी टाकावे ।' असे स्पष्ट स्पष्ट आदेशिले.

६) कारण वैदिक समाजवादाचे सहावे सूत्रच त्यांच्या डोळचापुढे होते, वैदिक समाजवादाच्या सहाव्या सूत्राचा मंत्र असा आहे की–

' दृष्ट्वा रूपे व्याकरोत् सत्यानृते प्रजापतिः ।
अश्रद्धामनृतेऽ दधाच्छ्रद्धां सत्ये प्रजापतिः ।।' (यजुर्वेद १९।७७)

या जगात प्रजापतीने असत्य आणि सत्य यांची विभागणी करून सत्यावर श्रद्धा ठेवण्यास आणि असत्यावर अश्रद्धा ठेवण्यास उपदेशिले आहे. समाजशास्त्राच्या व समाजवादाच्या या आधारभूत सिद्धांताचा अर्थच हा आहे की–

' सत्यमेव जयतु नानृतम् ।'

हा अर्थ लक्षात वागवूनच माणसाने सत्याचाच सदैव आदर करावा, त्याचा आश्रय घ्यावा आणि असत्याकडे पाठ फिरवूनच जगात वागावे, विहरावे, विकासावे आणि ' विष्णु ' व्हावे. विष्णु ही जगाची वैभवशाली संरक्षणशक्ति आहे. तिची पदवी प्राप्त व्हावयास ' सत्यापरता नाही धर्म । सत्य तेचि परब्रह्म ।।' मानून माणूस चालला म्हणजे समाजातील तेजस्वियांचे क्षेम राहते व समाजधारणाही तेजस्वी होते. परब्रह्म सत्याची भक्ति म्हणजे माणसाने आपले व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व प्रगट करताना आपल्या कुवती लक्षात घेऊनच झेप घेतली पाहिजे आणि मुरडावयाचे तेथे नेमकेपणानेच मुरडले पाहिजे. माणसामाणसांच्या अशा सत्याश्रयी सेवाभावानेच परस्परातील व परस्परावरील विश्वास, श्रद्धा, प्रेम, जिव्हाळा, व्यवहारशुद्धीनेच प्रत्ययास येत राहील. त्यायोगेच मानवमात्र सुखी होऊन दिलखुलास सहकार–समन्वयी होईल. तसे जमले वा झाले नाही, तर समाज एकदिल तर राहोच, पण एकसूत्रीही होणार नाही व टिकणार नाही.

७) त्यासाठीच वैदिक समाजवादाचे सातवे सूत्र अप्रतिहतपणे संचलित राहणेच आवश्यक असते. त्याचा मंत्र असा–

' सहृदयं सांमनस्यमविद्वेषं कृणोमि वः ।
अन्योन्यमभिहर्यत वत्सं जातमिवाघ्न्या ।।' (अथर्व ३।३०।१)

माणसाने स्वतःसंबंधी समाजात आपल्या बोलण्या–चालण्याने असा विश्वास निर्माण केला पाहिजे की त्याला समाजातील प्रत्येकाविषयी आपुलकी, निदान सहानुभूति तरी खास वाटते. ' आत्मवत् सर्व भूतानि यः पश्यति स पश्यति ।।' अशा भूमिकेवर माणसाने आपले अधिष्ठान ठेवले, तरच वरीलसारखा समाज-विश्वास त्याच्याबद्दल निर्माण होईल. वैर तर नव्हेच नव्हे, पण मतमतांतरोचा विरोध सुद्धा त्या त्या मतमतान्तरापुरताच मर्यादित ठेऊन, जेथे जेथे एकमेकाजवळ येणे शक्य असेल, तेथे तेथे जवळ येऊन माणसाने दुसऱ्या प्रत्येकाशी सहकार करणे हे आपले कर्तव्य मानणे आवश्यक आहे. भावभावनांच्या व सुखदुःखांच्या बाबतच समाजातील प्रत्येकाकडे आत्मवत् पाहून भागणारे समर्थांना पुरेसे नसून ' शहाणे करून सोडावे । सकळ जन ।।' अशी ही एक बौद्धिक पातळी माणसाने ' आत्मवत् सर्वभूतेषु' होण्यासाठी समर्थांनी सुचविली आहे.

समाजाला अज्ञानात ठेवून आपण आपल्या शहाणपणाची शेखी मिरवण्यापेक्षा शहाणा झालेला समाज आपल्याला मूर्ख समजला तरी चालेल, या बुद्धीच्या उदात्ततेनेच समर्थांनी सुचविलेल्या बौद्धिक पातळीवर माणूस रहाणार आहे. स्वत: समर्थांनी तो मार्ग आचरिला होता आणि व्यापक लोकशिक्षणासाठी आपल्या संप्रदायाच्या मठामठातून कथा – कीर्तने – प्रवचने – भजने यांच्या वेळा ठरवून संतमंडळीतील पूर्वसूरीप्रमाणे, योजना तर आखल्या होत्याच, पण वर, स्वत:च्याच मनाला जणु शिकवण देत जाणारा असा एक एक रामदासी 'भिक्षामिषे' समाजातील लहान थोर पारखण्यासाठी प्रत्येक उंबरठ्यापुढे एक 'मनाचा श्लोक' म्हणेल व तो त्यातील शिकवणीने 'जनाचा श्लोक' ठरेल अशी योजना होती. लोकसंपर्क साधून लोकजागर करण्यातील समर्थांची ही ज्ञानप्रसारक दृष्टी संघटनाकुशलतेच्या बाजूनेही कार्यक्षम ठरली. तशीच समाजातील प्रत्येकास आत्मवत् करण्याच्या बाजूनेही अपूर्वच म्हणावी लागते. या लोकशिक्षणात 'बहुत आणता घ्यावे। मुष्टी एक ॥' असा भिक्षास्वीकाराचा दण्डक असल्यामुळे, समाजाला तोशिस न लागता लोकसंपर्क व्यापक होई, होतो. 'अलौकिक असावे। परी अलौकिक होऊ नये। लोकाप्रति ॥' ही समर्थांची वृत्ति व अनुषंगिक शिकवण त्यांच्या राम – मारूतींच्या वार्षिक उत्सवात व छबिने – लळिते– रथयात्रातही सामूहिक संमेलनाबरोबर प्रगट होई व जीवन – शिक्षण – प्रकाशही देई.

प्रत्येक मनुष्य आपल्याला काही पात्रतासिद्ध स्थान समाजात असावे, आहे असे समजतो, मानतो, अपेक्षितो. आयुष्याच्या कोणत्या तरी कालखंडात आपल्याला आपल्या विद्येने, शक्तिसंपन्नतेने, धनीपणाने, परंपरेने, पराक्रमाने,कर्तृत्वाने माणसाला लहान मोठे स्थान मिळतच असते. त्यातील काही वेळा, काही 'चढत्या वाढत्या पदव्या' मनुष्याच्या वाट्यासही येतात. तथापि पदव्यांपैकी चढते-वाढते भाव काहीही असले तरी वडीलधाऱ्यांनी चिमुकल्या–चिमुरड्यांना आईच्या वत्सलतेने जवळ करावे आणि चिमुकल्या–चिमुरड्यांनी वडीलधाऱ्यांची आदब राखून लाडिकपणा करावा, असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी जाणकार संघटकांनी घेऊन पार पाडली, तर तशा पवित्र सलगी–सलोख्यातून माणसामाणसांची मने आणि एकंदर सामाजिक मन शिवसंकल्पानेच भरलेले व भारलेले आढळेल. 'परमार्थी तो राज्यधारी।' म्हणजे ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीत अग्रेसर होऊ इच्छिणारा, जन्माला आल्यासारखे सगळ्यापेक्षा आगळे वेगळे कर्तृत्व करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा, किंवा कल्पना करवेल इतके मोठे वैभव प्राप्त करू इच्छिणारा– असा कोणताही 'परमार्थी' आपल्या पात्रतासिद्ध प्रतिष्ठेनेच टिकेल. आणि? 'परमार्थ नव्हे तो भिकारी। या परमार्थाची सरी। कोणास द्यावी ?॥' या समर्थवचनाची साक्ष पटेल. समाजातील व्यक्तिव्यक्तींच्या मन:प्रवृत्तींचा जो दृढभाजक हाती लागतो, तोच समाजमनोवृत्तींचा उद्गम होतो, ठरतो व असतो.

म्हणून सामाजिक मनोवृत्तीने ' भला रे भला !' म्हणण्यासारखे कार्य करावे असे स्फुरण व्यक्तिमात्राला होत जाते. समान धारणेच्या व्यक्तिव्यक्तींच्या मनोविकासातून सामाजिक कार्ये रंगारुपाला येत असतात व सामाजिक नि सार्वजनिक कार्यकर्तृत्वातून समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रतिष्ठेला समुन्नति प्राप्त होते.

८) म्हणून वैदिक समाजवादाचे आठवे सूत्र दक्षतापूर्वक व्यक्तिने व समाजानेही आचरणशुद्ध ठेवावे लागते. त्याचा मंत्र असा की–

' मे मनः शिवसंकल्पमस्तु ।। (यजुर्वेद ३४।१)'

माझ्या मनात सात्विक, पवित्र, कल्याणकारी संकल्पच उठोत. शिवसकल्पांचा, ' सत्यसंकल्पाचा दाता भगवान । सर्व करी पूर्ण मनोरथ ।।.' समाजशास्त्राचे हे सिद्धांत प्रतिपादक सूत्र सर्वकालीन व संस्मरणीयच आहे. समाजाचे तसेच त्याच्या सर्वच व्यवहारांचे मानसिक पार्श्वसंगीत रमणीय करण्यासाठी हे उत्तमोत्तमच आहे. समाजमनाचे पावित्र्य निर्माण होण्यास जसे ते उपयुक्त ठरते, तसेच ते समाजाला अनेक दोषांच्या संसर्गापासून बचावते. व्यक्तिव्यक्तींच्या मनातील शिवसंकल्पामुळे, व्यक्तिव्यक्तींच्या ' अधिकारपरत्वे कार्य होते ।' तेव्हा, ' जाणोनि शोधावी चित्ते । नाना प्रकारे ।।' हे संघटक लोकनेत्याना समर्थांचे सांगणे आहे. नाना प्रकारे मनामनांचा ठाव लागला म्हणजे ' अधिकार पाहोन कार्य सांगणे । साक्षेप पाहोन विश्वास धरणे ।।' हे महंतादिकापासून सर्वांना जमू शकेल. त्याचबरोबर मग त्याला ' आपला मगज राखणे । काही तरीं ।।' हेही जमते; निदान अवघड तरी होत नाही.

रावणाच्या बंदीखान्यातून ' देवा सोडविता ' ऐतिहासिक दाशरथी राम अकराव्या शतकापासून ' मस्तकी धरावा ।' असे देवत्व पावल्याचे काही इतिहासकारांचे मत आहे. ते काहीही असले तरी ' रामकथा ब्रह्मांड भेदून पैल्याड नेणाऱ्या ' हनुमंताची भक्ति आणि प्रयत्नपुरूषार्थ आदर्श ठरले. याचे कारण हनुमान ' योजकस्तत्र दुर्लभः ।' होता. परिणामतः मारुति चिरंजीवच ठरला. इच्छा व वासना तशी फळे मिळतात. म्हणून समर्थांनी म्हटल्याप्रमाणे– ' मना, वासना दुष्ट कामा न ये रे । मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।।' एवढ्यानेच काय झाले ? सत्संकल्प व सत्य संकल्पही प्रगट करताना देखील 'वांगर्थाविव सपृक्तौ वागर्थप्रतियत्तये न जगतः पितरौ वंदे पार्वतीपरमेश्वरौ।।' असे कविकुलगुरु कालिदासाप्रमाणेच मनुष्याने केले पाहिजे. शब्द आणि अर्थ यांची जोडी अभेद्य, सनातन, शाश्वत असते. तेव्हा सत्यसंकल्पाचा शाब्दिक आविष्कार करतानाही आपला आशय अंतःकरणाच्या व मेंदूच्या प्रातिनिधिक शब्दानीच रेखीव, कातीव, राजीव अशा श्रीखंडाच्या वड्यासारखा लोकपरिचित झाला तरच तो समाजाचा वेध घेतो. याच प्रक्रियेला निरुक्तामध्ये यास्काचार्यांनी

'मंत्रो मननात्' म्हटले आहे. म्हणून 'मुखी राम त्या काम बाधू शकेना । गुणी इष्ट धारिष्ट त्याचे चुकेना ।।' असे आश्वासून समर्थांनीं जनसामान्याला रामनामाचा जप सांगितला आहे. कारण 'राम' म्हटल्याबरोबर त्याचे मर्यादा पुरुषोत्तमत्व मनापुढे उभे राहते आणि राम 'राजा प्रजानुरंजनात्' होऊन गेला असल्याकारणाने, 'राजा कालस्य कारणम् ।' ठरतानाहीं तो कर्तव्यकठोर आणि न्यायनिष्ठुर झाला तरी ते सर्व 'परित्राणाय साधूनां' व दीनजनोद्धारणार्थच होते, असा सर्व इतिहास मनात व डोळ्यापुढे उभा राहतो. त्याच्या चिंतनातून माणसाला जे कृतीचे स्फुरण होते, ते समाजसेवा समर्पणाचेच होते. नराचा नारायण, पुरुषाचा पुरुषोत्तम, प्रयत्नांती परमेश्वर होण्याचा राजरस्ता सत्य संकल्पापासून समाजसंजीवन होण्यापर्यंतचा, माणसाच्या हाती आहेच आहे.

९) 'मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।' हा जो समर्थांचा आर्जव आहे, तोच वैदिक समाजवादाच्या नवव्या सूत्राचा मंत्र जो

'दुर्मतिं जहि ।।' (यजुर्वेद ११ । ४७)

त्याचे मराठी प्रतिबिंब आहे. पापबुद्धी, दुष्टबुद्धी 'दुर्बुद्धी ते मना । कदा नुपजो नारायणा।।' असे संत तुकारामानीही परमेश्वराला कळवळून मागितले आहे. दुर्बुद्धी सगळ्या अनर्थांची जननी होऊन बसते. मग माणसाच्या दुःखाला काय पारावार ? 'परदुःख शीतल' मानण्यात दुर्बुद्धीच्या गुलामाना भूषण वाटत असते. त्यांच्याकडून 'परदुःखे दुखावला' अशा वृत्तीची अपेक्षा करण्यात तरी काय अर्थ ? 'परपीडेचे मानी सुख ।' अशा अधमाजवळ माणुसकीच जेथे शपथेपुरतीसुद्धा नसते, तेथे सामाजिक जबाबदारी असणारच कशीं? रोमन बादशहा क्लॉडियस याने नीरो ( ३७ ते ६८ ) ला सन |५३ साली जावई केला असता, एक वर्षातच गर्विष्ट, उद्दाम, क्रूर नीरोने क्लॉडियसला विषप्रयोग केला व स्वत: बादशहा झाला. रोमन बादशहा नीरोप्रमाणेच हिंदुस्तानातही राज्यलोभापायी औरंगजेबाने आपल्या बापाला कैदेत कोंडून, आपल्या दारासारख्या सात्विक वडील बंधूचा खून केला. असे कितीतरी अनुभव दुर्मतीने दिलेले इतिहासात नमूद आहेत. उभ्या राष्ट्राला आग लागली, तर आपली बिडी पेटविण्याची छान सोय झाली, असे मानणारा दुर्मतीचा दास आपल्या धर्माव्यतिरिक्तच्या धर्मानुयाला 'काफर' म्हणत सुटतो आणि त्याच्यावर झिजिया करच लादतो, हा तर सतराव्या शतकातील सार्वजनिक व सार्वत्रिक अनुभव होता. म्लेंछ-दैत्य मातला, त्याचे 'बहुता दिसांचे मातले बंड ।' ते मोडून काढण्यासाठी 'निर्वाणचिंता' समर्थांना जडली होती. म्हणून समाजातील प्राणिमात्राला दुःखमुक्त करण्यासाठी वैदिक

१०) समाजवादाचे दहावे सूत्र समर्थांना हाती घ्यावेच लागले. त्याचा मंत्र असा की –

'दुरितानि परासुव । (यजुर्वेद ३०।३)

सगळेच दुःख दूर करता येते असा आत्मविश्वास समाजमनात निर्माण करून त्यासाठी समर्थांना समाजाचा प्रयत्नपुरुषार्थ उभा करावा लागला. तो त्यांनी केला. ' दुरितांचे तिमिर जावो' म्हणून ' जय जय रघुवीर समर्थ !' अशी गर्जना स्वामींनी आपल्या सांप्रदायिकाकडून भिक्षाटनातही लोकाना शिकविली. लोकानी तिचे अनुष्ठान केले. अनुष्ठानानुरूप कार्य होताच, एक दिवस शिवराज्याभिषेकाचा उगवला व समर्थ समाधानाने उद्गारले की – म्लेंछसंहार जाहला। उदड जाहले पाणी। स्नानसंध्या करावया ॥' समाजाचा स्वातंत्र्योन्मुख मनःपिंड तयार करणारा स्वयंसेवक समाजाकडून ' हिंदुस्थान वळावले' हे पाहतो आणि समाजाच्या उन्नत सुखावस्थेचा उदय अनुभवतो, तेव्हा आपण तीन तपे केलेल्या समाजजागराच्या कष्टांचे चीज झाल्याचे समाधान तपश्चर्यांनुभव म्हणून त्याच्या वाट्यास येते. समर्थासारखे असे भाग्य फारच विरळा !

११) पण नुसती दुःखे दूर करून वैदिक समाजवादाचे समाधान नाही. सुखाचा सर्वत्र प्रसार व्हावा हे त्याचे अकरावे सूत्र असून त्याचा मंत्र आहे की–

' यत् भद्रं तद् न आसुव। (यजुर्वेद ३० । ३)

यच्चयावत् कल्याणप्रद आचारविचाराना सामाजिक मनात रूजवून, त्यातून समाजाचा स्वभावच कल्याणमय झाला पाहिजे, हा या मंत्राचा कटाक्ष आहे. त्यासाठी दुरित काय व भद्र म्हणजे कल्याणकारक काय, याची जाण समाजाच्या अंतर्मनात होणे जरूर असते. या जाणीवेतूनच वैयक्तिक काय, सामाजिक काय, किंवा राष्ट्रीय काय, जीवनास भद्रोन्मुख कल्याणोन्मुख करता येते.

' जे जे काहि उदात्त, उच्च उजळे, तो अंश माझा असे।' असे भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्णानीच सांगून टाकले आहे. म्हणून ' उत्कट भव्य तितुके घ्यावे। मिळमिळित अवघेचि टाकावे।' असे समर्थांनी उपदेशिले असून समाजातील भव्य, दिव्य, उदात्त, उच्च, निरामय, कल्याणकारक असेल त्याची प्रचीती घेऊन. त्या कल्याणकारकाचा प्रवाह समाजजीवनात अखंड चालावा म्हणजे समाज व परिणामतः राष्ट्रच काय, पण सर्व मानव्य आनंदमय, कल्याणमय, होऊन राहील- समाजातील सात्विकतेचे चिदानंदमय जीवन म्हणजेच ' दुरितांचे तिमिर जाऊन' पृथ्वीवर स्वर्ग उतरल्याचे साकारलेले स्वप्न. समर्थ सांगतात की –

' अंतरी कल्पना केली। एकांती बोललो बहु।
रक्षिता देव देवांचा। त्याचा उच्छाव मांडला ॥'

आणि ? आणि ' रामदास म्हणोनी नावाजलो.' बुद्धीवादाच्या कसोटीवर ऐहिक दृष्टया जीवनाचे आणखी काय सार्थक हवे ?

व्यक्तीच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या, मानव्याच्या दुःखसमाप्तीसाठी जसे कष्ट उपसावे लागतात, तसेच सुखप्राप्तीकरताही कष्टच उपसावे लागतात.

'कष्टेविण फळ नाही ।' म्हणून समाजवादी समाजरचना करताना, 'मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणे ते लोकाकरवी करवावे ।' म्हणजेच त्यातील समाजवाद व्यावहारिक स्तरावर तरतरून राहतो. 'दरीदर्कुटी वास त्या रामदासा' होता हे सुप्रसिद्धच आहे. समाजाच्या रसरशित जिवतपणासाठी त्याच्यात तेज, ओज सचरलेच पाहिजे. त्याविना गत्यंतरच नसते. त्यासाठी व्यक्तिच्या हातून आणि समाजाकडूनही 'अनंत शर्थिची कामे मर्द मारून जातसे ।' असा प्रत्यय यावा लागतो. म्हणून समाजातील व्यक्तिव्यक्तीत जीवननिष्ठा, ध्येयध्यास, प्रयत्न-पुरूषार्थाची आकांक्षा मुरवावी लागते. तरच सामाजिक वा राष्ट्रीय वृत्तीप्रवृत्तीतून

धर्मासाठी मरावे । मरोनि अवघ्यासि मारावे ।
मारता मारता घ्यावे । राज्य आपुले ।।'

ही जिद्द सचारलेली आढळते. तेवढ्यासाठीच एकवचनी, एकबाणी, एकपत्नी अशा व्रतधारी प्रभुरामासारखे आराध्यदैवत समर्थानी लोकाना दिले. 'देवा सोडवित्या प्रभु रामानी रावणासारख्या असुरेश्वराचा निःपात 'वा — नरांच्या' सैन्याचे जोरावर केला, हा रामांच्या 'धर्मस्थापनेचे नर' होण्यातील समाजवाद कसा आदर्श होता, याचाही कित्ता समर्थांना स्वदेशबाधवापुढें ठेवावयाचा होता की काय, न कळे ! ! ज्या समाजात व्यक्तिव्यक्ति कल्याणकरी गुणकौशल्याचा स्वीकार करतात आणि 'निश्चयाचा महामेरू' होऊन त्यांचे ठाण मांडतात, त्यांची आध्यात्मिक उची तर वाढतेच, पण समाज व राष्ट्रही प्रगतोन्नतीची उच उंच शिखरे लीलेने चढत राहतात.

स्वार्थसाधन हे सामाजिक वा राष्ट्रीय जीवनात महारोग ठरते. राष्ट्र स्वस्थ, प्रगत, उन्नत, उत्कर्षोन्मुख, विक्रमी करावयास राष्ट्रातील व्यक्तिमात्राने आपल्या सर्वस्वसमर्पणाच्या तयारीने सेवाव्रती राहण्यात स्वारस्य असते. त्याने मनुष्यही अमरकीर्त होतो. 'कीर्ति करून नाही गेले । ते उगाच जन्मले आणि मेले ।।' असे समर्थानी स्वच्छ सांगून टाकले आहे. समाजासमाजातील तेजस्वियांची सर्वांगीण उन्नती, पशुधनाची पुष्टी, ब्रह्मतेजाचा विकास, अन्नसमृद्धी, समाधानसंपन्नता, या व अशाच राष्ट्रीय सपदा शुद्धपणे चकचकित रहावयास, माणूस आहे त्याला पात्रतानुरूप काम, कामाचा बाजारदराने भरपूर दाम, दामातून दैनंदिन स्वास्थ्याच्या गरजा निर्धास्तपणे भागविण्याचा आराम आणि त्या आरामातून नव्या उत्साह-उमेदीचा, नव्या आशा-आकांक्षांचा, चैतन्यस्वरूप राम राष्ट्रात निर्माण होत राहिला पाहिजे. एरवी आळसोबाचा वा साधनसंपत्तीचा उधळपट्टी आराम हा हरामच होय. एवढ्यासाठीच समर्थानी आदेशिले आहे की शरीर-धारणेसाठी लागणारे अन्नसुद्धा परब्रह्म असून ते आपण आपल्या अक्कलहुशारीने, परिश्रमांच्या निढळच्या घामाने, लोकांच्या अडी-अडचणी, अडणुकी-अडवणुकी, आडमुठी-आडदांडे दूर करण्यानेच, खात आहोत, असा आत्मविश्वासी अभिमान

सांभाळूनच माणसाने धट्टेकट्टे रहावे. ' यावत् भ्रियेत जठरं तावत् स्वत्वं हि देहिनाम् । अधिकं योऽभिमन्येत स स्तेनो दण्डमर्हति ।।' माणसाचा अधिकार ' मागणे लइ नाही, बा ! लयो नाही ।। पोटापुरते देई ।।' अधिकाराची ही मर्यादा ओलांडून अपेक्षा म्हणजे चोरीच ! (इति भागवत). आधुनिक समाजवादी सांगतात की ' व्यक्तीला जरुरीपुरते । राष्ट्रा उत्तम, भव्य ते ।।' समाजातील सर्वच घटकात समाधान, संयमशीलता आणि समानता सहज नांदावी म्हणून समर्थ सांगतात की निदान ' शरीर कारणी लावी । काही तरी ।।' तशाने किंवा कोणाचे जेवढे उणे आपणास भरून काढता येईल, तेवढे काढून ' जो परोपकार करितांचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।।' असा होतो आणि समाजही कोठे कमकुवत राहण्याचा संभव नसतो. अशा तऱ्हेने राष्ट्रस्वरूप महादेवाची सभावना-पूजा होत राहण्यात, ' सर्वेऽपि सुखिन: सतु । सर्वे संतु निरामया: । सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ।।' ही सदिच्छा साकारण्याची शक्यताही निर्माण होते. एवढेच नव्हे, तर जगेन तर राष्ट्राकरता, करीन ते राष्ट्राकरताच आणि मरेन तर राष्ट्राकरताच, अशा जिद्दीच्या सेवाभावी राष्ट्रभक्ताचा लाभही त्यातूनच समुद्भवेल व तो राष्ट्रभक्त प्रसंगवशात् युगपुरुषही ठरेल.

वेदकाळापासून ' मातृदेवो भव ।, पितृदेवो भव ।, आचार्य देवो भव ।।' अशा आशिर्वादात्मक मार्गदर्शिका पूर्वसूरीनी माणसामाणसासाठी प्रचलित केल्या होत्याच. त्यात ' जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । त्या सन्त साधु गणावे ।।' म्हणून ' समाजदेवो भव । राष्ट्रदेवो भव ।।' अशी एक नवी आशिर्वादात्मक मार्गदर्शिका रामदासापूर्वीच संत एकनाथादिकानी भरीला घालून ठेविली होती. तिला उजाळाच उजाळा देऊन समर्थानी लोकास उपदेशिले की ' महा – राष्ट्रधर्म वाढवावा ।।'

' अणूरेणूहुनि थोकडा । तुका आकाशाएवढा ।।' असल्याकारणाने त्याचा सच्चिदानद परमेश्वर जर ' स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरला ' आहे, तर तो मनुष्यमात्रात आहेच आहे. माणसाने स्वत:मधील व इतरातील तो परमेश्वर पाहण्याचे थोडेसे धाडस केल्यास, माणसामाणसात परस्परविश्वास, सहकार – समन्वय – संघटन व्हावयास वेळच लागणार नाही. ' सर्वांठायी समभाव' ठेवण्यास आणि प्रस्थापित समानतेचा आस्वाद घेण्यास काहीच अडचण नसते.

१२) त्या समानतेच्या आस्वादानुभवासाठी वैदिक संस्कृतीच्या समाजवादाचे बारावे सूत्र असून त्याचा मंत्र आहे–

' व्रतं कृणुत । वृतं कृणुत ( यजुर्वेद ५ । ११ )'

माणसाने जन्माला आल्यासारखे काही करावयाचेच व कांही करावयाचेच नाही, असा विवेकशुद्ध शिस्तीचा नियम स्वत:पुरता ठरवावा आणि तो लष्करी शिस्तीच्या काटेकोरपणाने कडक पाळावा, याला व्रत म्हणतात. व्रतामुळे माणसातील सत्प्रवृत्ती, सद्‌गुण आणि सत्कर्मक्षमता दृढ, दृढतर व दृढतम होत जातात आणि ध्येयसिद्धीची वाटचाल माणसाकडून करवितात. 'अभ्यासेची प्रगट व्हावे।' असे जेव्हा समर्थ सांगतात, तेव्हा घेतलेले व्रत अंगवळणी पडल्यावरच, ते लोकप्रत्ययाचे होते असे समर्थांनी सुचविले असून, लोकमानसात माणसासंबंधी जे समीकरण दृढ होते, रुढ होते किंवा त्यापुढेही माणसाचे जे मूल्यमापन होते, ते माणसाच्या व्रतसातत्यातील तपश्चर्येमुळेच !

आपला प्रत्येक दिवस किंवा वार सार्थकी लावतो तो वारकरी. आपला दिवस किंवा वार सार्थकी लावताना देखील तो कांही व्रताने, काही तत्वसत्वाच्या धारेने सार्थकी लागतो आहे, असे पाहणारा तो धारकरी. आपण यथेष्ट जेवल्यावर उरलेले अन्न दुसऱ्याच्या सेवेस लावावयाचे पण वाया दवडावयाचेच नाही, यातील 'अर्थदृष्टी' पासून 'वाया जाऊ ना दे क्षण ।।' या सामायिक हिशोबापर्यंत लक्ष ठेवणारा समर्थांचा समाजवादी दृष्टीकोन माणसाला, तलवारीच्या नसले तरी प्रवाहाच्या धारेवर कसून पाहणारा असल्या कारणानेच समर्थसंप्रदायाला 'धारकरी' पंथ हे नांव पडले. तरीही त्याचा विकास वारकरी पंथातूनच समर्थांना करावयाचा होता. म्हणूनच नियमितपणे पंढरीला जाऊन विठ्ठल-चरणी लीन होणाऱ्या संतांच्या मांदियाळीच्या देखत, 'विठ्ठल झालेल्या' रामाला ( कांहीच्या समजुतीने बाळकृष्ण, तर कांहीच्या मते बुद्ध झालेल्या जगच्चैतन्याला ) विचारून गेले की- 'कोठे गेले धनुष्यबाण ?' सन्तांचे बोलणे 'देवालागी' असले तरी ते 'भक्तालागी लागते.' म्हणून अनुकूल कालाची वाट ( भारतीय संस्कृतीवरील आक्रमण परतविण्यासाठी ) पहात बसण्याची मर्यादा संपली असून, अनुकूल काल उत्पन्न करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे, अशी सूचनाच समर्थांनी समाजाला, त्यांनी विठ्ठलाला केलेल्या प्रश्नात होती. 'जो स्वयेचि कष्टत गेला । तोचि भला ।।' हे मग समाजाला पटत गेले आणि समर्थांचा धारकरी पंथ विकासवादाने तरारला.

धारेवर धरल्यासारखे माणसाने आपल्या व्रतानुसार चालावे यात सार्वजनिक हित आहे. हा धडा समर्थांनी सृष्टिनियमापासूनच घेतला होता. तोच त्यांनी समाजाला सांगितला. सृष्टीसंचालनात जो नियमबद्धता दिसते ती कोणाशी वा कोठेही प्रतारणा, पक्षपात अगर अन्याय न करता, सर्वांना सारखीच वागणूक देणारी असते. म्हणून सृष्टी आणि सृष्टीतील सामर्थ्ये, तेजे सर्व व्रतपति आहेत. वेदाने वर्णन केलेल्या या व्रतपतिप्रमाणेच समाजातील विवेकी जाणकारांनी व्रतपति होऊन 'समाजदेव' व्हावे अशी समर्थांची अपेक्षा धारकारी पंथाचे प्रवर्तन करण्यात असावी,

असे त्यानी सांगितलेल्या महंत – कर्तव्य–लक्षणावरून म्हणता येते. वेद सांगतात की स्वत: परमेश्वरच व्रतपतींचा व्रतपति असून त्याने ( यजुर्वेद ५।६ ) पंचमहाभूतासुद्धा सर्वांनाच व्रते पाळण्यास आज्ञापिले आहे. प्रकाश, गति, उष्णता, इत्यादि अनेक गुण असणाऱ्या अग्निला आपल्या गुणांचे प्रसरण करण्याचा व्रती बनविला आहे. अग्नि ही वर्तनधारा शेवटपर्यंत पाळणारच आहे. मानवानेसुद्धा तदनुरूप दृढतापूर्वक सार्वजनिक, सर्वहितकारी, नियमांचे पालन करावे म्हणून मंत्र (यजुर्वेद १।५) दिला आहे की –

> ' हे व्रतपते, अग्निनारायणा तू जसा अंधकार दूर
> करून सत्य उजेडात आणतोस, त्याचप्रमाणे मी सुद्धा
> जनसमाजातील अज्ञानांध:कार दूर करून सत्य
> उजेडात आणण्याचा, अविद्येचा नाश करून
> विद्येची वृद्धि करण्याचा, गलथानपणा उडवून टाकून
> नीटनेटकी चकमक आणण्याचा प्रयत्न करणारा
> पुरुषार्थ करण्याचे व्रत घेतो. या व्रतधारणेतून
> माझा स्वभावच प्रगट व्हावा. ते सामर्थ्य मला दे.'

समर्थांनी ' वन्हि तो चेतवावा रे । चेतविताचि चेततो ।।' असा आदेश दिला आहे, तो वरील अग्निव्रतासाठीच. सूर्याची अगर अग्निची आराधनाव्रते माणसाचे जीवन तेजस्वीच तेजस्वी करतात. ' भग–सविता–सूर्य–विष्णु' असा तेजाचा विकासक्रम असून संपूर्ण जगताला धारण करणारा सूर्य अगर अग्नि सेवाव्रत प्रखरपणे पाळतो व प्रचारतोही. समर्थ रामदासानी पंचवटीतील आपल्या प्रखर तपस्येने सूर्यासारखे तेज व गुण मिळवून ज्ञान, शक्ति, वीर्य या गुणांचे संपादन तत्परतेने केले व उमेदीच्या तरुणाना उदाहरण घालून दिले. कर्माच्या वैयक्तिक आणि सामाजिक बाजू एकमेकाशी संलग्न आहेत हा धर्माचा अर्थ समर्थांनी जन्मभर प्रतिपादिला तो ' आधी केले, मग सांगितले ।।' या व्रताने. पूर्वसूरींनी लावून दिलेली नवविधाभक्ति सामाजिक अधिष्ठानावरच समर्थांनी चालविली. त्यामुळे देवाशी केवळ शरणाईची– शरण्यभावाची– कल्पना तीत न राहता, सख्यत्वाची भावना सहजच उदित झाली आणि 'देवाच्या सख्यत्वासाठी । जिवलगासी पडाव्या तुटी ॥' आणि जरूर तर ' शेवटी । प्राण तोही वेचावा ।।' अशी धारणा धर धरू लागली. परिणामी समाजाच्या तळागाळातल्या माणसाना वर आणण्याचा, त्यांच्या ठिकाणी पूजनीय नसल्या तरी, कौतुकास्पद व्हाव्यात अशा आशा आकांक्षा निर्माण करण्याचा आणि त्या आशाआकांक्षांच्या पूर्ततेचा रस्ता आखून तो चालावयास लावण्याचा दिमाख समर्थांच्या भक्तिपंथात चमकू लागला. सर्व भारतातून आपल्या विद्वत्तेला 'अजिक्यपत्रे' मिळवित आलेल्या सदाशिवशास्त्र्याना ' विद्या विनयेन शोभते ।' हे ह्मशा महाराकडन समर्थांनी शिकविले ते या वचनाने की,

'अहंभाव ज्या मानसीचा विरेना। तया ज्ञान हे अन्न पोटी जिरेना।' समर्थांच्या समाजवादाच्या अभ्यासकाचे हे तेव्हाच लक्षात येते.

व्रतनियमांच्या अनुष्ठानासाठी मनुष्य 'मनसि, वचसि, काये पुण्यपीयूषपूर्णः।' तर असावाच; पण सत्यचिंतन, सत्यवचन आणि सत्य कर्म जाणीवेने करणाराही असावा. जेव्हा समाजातील प्रत्येक घटक आपल्या संपूर्ण जीवनात व्रतपति होऊन प्रत्येक व्यवहारातच लोककल्याणावर लक्ष केंद्रित करील, जेथे जेथे दिसेल तेथे तेथे 'बरा गुण हा अंतरामाजि राहो' अशी दक्षता घेईल आणि 'इष्ट असेल तेच बोलणार व शक्य असेल ते सर्व करणार' अशा निष्ठेने वागेल, तेव्हाच समाजात परस्पर विश्वास, प्रेम, सहानुभूति यांचे प्रवाह सातत्याने वहात राहतील व सुख-शांति-आनंद यांची उद्याने-उपवने फुलतील. माणसे व्रतपति होतील तर ती शीलवंत झाल्याशिवाय राहणारच नाहीत. शीलवंत व्रतपतींच्या

"सत्कर्मयोगे वय घालवावे। सर्वांमुखी मंगल बोलवावे।।"

या पद्धतीने समाजाचा नैतिक पाठकणा बळकटच बळकट रहात असतो.

१३) विविध प्रकारचे आचारविचार आणि चरित्रचारित्र्ये यांच्या संशुद्धीचे संगोपन व्हावे म्हणून वैदिक समाजवादाचे 'तेरावे सूत्र' आहे. त्याचा मंत्र असा आहे की—

"चरित्रांस्ते शुन्धामि। (यजुर्वेद ६।१४)"

चरित्र म्हणजे ज्याच्या द्वारा माणूस विविध प्रकारच्या आपल्या व्यवहारांना साजरे करतो, त्या सर्व हालचालींचे संकलित असे एकजिनसी स्वरूप. अर्थात सारे आचार, व्यवहार, शील, स्वभाव, संकल्प निर्मळच निर्मळ राहिले तर त्यातून माणसाचे चारित्र्य सिद्ध होते ते वंदनीय व अनुकरणीयच ठरेल. व्रतपति अग्निला साक्षी ठेवून त्याच्या आदर्शाप्रमाणे माणूस वागू लागला म्हणजे जसे त्याचे चरित्र चारित्र्यसंपन्न होत राहते, तसेच सूर्यचंद्रादि व्रतपतींच्या आराधनेनेही ते साधत असते. तेच फलित वायूच्या उपासनेनेही साधते. निसर्गातील हे व्रतपति आज हजारोहजार वर्षे आपल्या वेळापत्रकाप्रमाणे आणि आखीव नियमाप्रमाणे अखंड चालत आले आहेत. ते माणसाला हाकारून सांगत असतात की— 'अरे माणसा, जरा आमचेकडे पहा! तुझे चरित्र आम्ही घडवितो.' वैदिक धर्माप्रमाणे, 'बालपणी बालांची कोमल तरुतुल्य बुद्धि वाकेल।' म्हणून माणसाचे उपनयन होते व त्याला 'संस्कारात् द्विज उच्यते।' तेव्हा त्या बटूकडून

'सूर्य व्रतपते व्रतं चरिष्यामि।
चंद्र व्रतपते व्रतं चरिष्यामि।

वार्यो, व्रतपते व्रतं चरिष्यामि ।"

इत्यादि मंत्रोच्चारांचा समन्वयी संस्कार घेवविण्यात येतो.

१४) चंद्रसूर्यांच्या धर्तीवर माणसाचे आयुष्य गतिमान व्हावे म्हणून वैदिक समाजवादाचे चौदावे सूत्र ठोस असून त्याचा मंत्र हा आहे की–

'स्वस्ति पंथानमनुचरेम सूर्यचंद्रमसाविव ।। ऋग्वेद (५–५१–१५)'

आम्हाला सूर्यचंद्राच्या कल्याणकारी मार्गाची चांगली माहिती आहे. त्या माहितीस अनुसरून आम्ही आपल्या जीवनात अनेक गुण आणि नियम यांचा अंगीकार करून समाजाला कल्याणकारी मार्गाने घेऊन जाणार आहो. त्या शिस्तबद्ध संचलनाने समाजाचे संरक्षण, पालन आणि प्रगतोन्नति यांचा आदर्श आम्ही निर्माण करू. असे व्रतबंध समाजातील हरएक माणसे घेत राहतील, तर विज्ञानाचे सर्वांगीण संशोधन त्यांच्यापुढे हात जोडून उभे राहील. समर्थांच्या धारकारी पंथीयानी निसर्गातील शक्ति देवताप्रमाणे काटेकोरपणे व्रतपति व्हावयाचे ठरविलें असते, मनावर घेतले असते आणि लोकशिक्षण जागरण करून समाज चैतन्याने तरारून, थरारून आणि रसरसवून वळकटच वळकट राखला असता; तर समर्थांच्या ध्येयवादाचा पराभव पारमार्थिकांच्याकडूनच झाला, असे प्रा. बापूसाहेब माटे बोलून गेले आहेत, तो कटु प्रसंग प्राध्यापकसाहेबावर आणि समर्थ-सांप्रदायिकावर ओढवलाच नसता ! 'काळ फिरला' असे पारमार्थिकानी प्राध्यापकाना उत्तर ठोकले आहे. पण काळालाच फिरविण्याची धमक व्रतपतींच्या जवळ असली पाहिजे. समर्थ रामदासांचा धारकरी पंथ तर काळ फिरविण्यासाठीच होता आणि सतराव्या शतकात त्याने ती किमया केलीही. प्रयत्नपुरुषार्थाला देव मानणाऱ्या समर्थ रामदासांच्या समाजवादात दैववादाला प्रतिष्ठा नाहीच मुळी. 'भवाचे भये काय भीतोसि लंडी ? । धरी रे मना धैर्य, धाकासि सांडी ।।' ही तर समर्थांची सांगी आहे. धर्म, व्रत, नियम हे रोजच्या नियमित आचरणासाठी असतात व त्यातून समाजाची शिस्त, संघटना आणि स्वास्थ्य यांची जोपासना व्हावी लागते, नव्हे होतेच होते.

समर्थांचा धारकरी उर्फ व्रतपति 'सूर्यस्यावृतमन्वावर्ते (यजुर्वेद २।२६) म्हणणारा हवा. काळाच्या लाटेला न डगमगण्याइतका तो अभयच असणे जरूर आहे. सूर्याचा जो आवर्तनक्रम आहे, ज्याच्या नियमितपणामुळे काळाच्या सूक्ष्मात सूक्ष्म व भव्यात भव्य परिणामाला गति मिळत असते, दिवसरात्रींची चक्रे फिरत असतात, शुक्ल कृष्ण पंधरवडे आणि महिने मोजून ऋतु निर्माण होतात, तशीच त्यातून अयने, आयनातून संवत्सरे, युगे, कल्प, मन्वन्तरे येतात व जातात, त्या सूर्याच्या आवर्तन–नियमितपणासच सृष्टिक्रम असे संबोधण्यात येते. त्याच धर्तीवर समाजाला विविध परिस्थितींच्या पलटीतून आपले जीवन जागृत, समृद्ध, विजयी,

तेजस्वी व शुद्धच शुद्ध राखता यावे म्हणून सेवायोगी धारकऱ्याने सदैव सिद्धता ठेवली पाहिजे. वैदिक समाजवादाच्या चौदाव्या सूत्र मंत्राचा खरा कानमंत्र असा आहे. या कामी व्रतपतीची म्हणजेच धारकऱ्याची थोडीही हयगय, आळस वा चुकारी होता कामा नये.

१५) 'अचूक चुकेना कोठे । त्याची राज्ये (पात्रतासिद्ध स्थाने वा प्रतिष्ठा) समस्तही ।।' असे सादविणारी व साधवणारी कर्तव्यतत्परता उफाळून स्फुरत रहावी म्हणून वैदिक समाजवादाचे पंधरावे सूत्र श्रमवादी असून त्याचा मंत्र हा आहे की —

'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजिविषेच्छतं समाः ।(यजुर्वेद ४० । २)'

प्राप्त कर्तव्याच्या रिकिबीत पाय घालूनच माणसाने सदैव तत्पर असले पाहिजे. आपल्या कार्याची सुरवात अगदी चुकोच्या वा अनपेक्षित अगर अनियोजित टोकाला झाली तरी मन लावून काम करावयास लागल्यावर माणूस रूळोवर वा रूळावर आल्याशिवाय राहणारच नाही.

मनुष्य जन्माला आल्यासारखे काही कर्तव्य, काही कर्तृत्व, काही कीर्तन करीतच माणसाने आपला क्षण नि क्षण कारणी लागावा अशी आकांक्षा धरावी. ' रिकामा जाऊ ना दे क्षण ।' हे त्याने आगत्याने पहावे. आळेबळे वेळ काढण्याची, आळसात लोळण्याची, अजागळ होऊन राहण्याची वासना माणसाला चुकूनसुद्धा होऊ नये. ' आळस कामाचा वैरी ।' तो झटकून, झाडून, झिडकारून टाकलाच पाहिजे. ' आळसे दुश्चितपणाच्या (आणि करंटपणाच्याही) खुणा । प्रगट होती ।। आळशावर गंगा लोटली तरी त्याने स्नान जर केले नाही, तर त्याची शरीर-शुद्धीही होत नाही व पापही धुवून निघत नाही. निरुद्योगी, निकामी, निलाजरा मनुष्य जगात नादान, नादार, नामुष्कीचा ठरतो. मग त्याच्याकडून ' पुढोलासाठी एकादी पाऊलवाट तरी रूळलेच कशी ?' आळस उदास नागवणाच असून त्याने मनुष्यपणाच्या खुणाही नाहीशा होतात. समर्थांनी तसे स्पष्ट बजावलेही आहे. आळसामुळे वा अन्यथा निरुपायाने समजातील माणूस गुडघ्यावर हात ठेवून अगर हाताची उशी करून बसला अगर पहुडला तर त्याचा रिकामा मेंदू सैतानाची दुकाने थाटण्याचाही संभव कमी नसतो. त्या दैवयोगदुर्विलासातून माण-साचे, समाजाचे व राष्ट्राचे जोवन सुरक्षित ठेवण्यासाठीच माणसाने स्वतःस आणि परिवारास कुठल्या तरी कामात सतत गुंतवून वा जुंपूनच ठेवले पाहिजे.

" काय करावे ? कोठे जावे ? काही सुचेना कसे ।।?"

अशी रडकथा गाणारे जीव बिनडोक तरी असतात अगर बहकलेल्या मेंदूचे तरी आढळतात. त्यापायी लहानपणापासूनच मन, मेंदू, मनगट बळकटच बळकट सांभाळण्यासाठी सवय हवीच हवी. समर्थांना मुले आवडत, ते त्यांच्याबरोबर

मूल होऊन खेळत व त्यांना बळकटीचे वळण लावीत. प्रौढात मिसळत तेव्हाही "जयाचा जो व्यापार। तेथे असावे खबरदार ।।" अशी खबरदारी घेत व घेववीत. माणसामाणसाच्या मनोव्यापारातील काम – क्रोध – लोभ–मोहादि षड्रिपुच काय, पण दिवसेंदिवस माणसाने विज्ञानाच्या जोरावर उभी केलेली भोगसाधने, माणसाला सुखलोलुप करून गलितगात्र बनविण्याचा पराक्रम करीत असून माणसातील पुरुषार्थप्रेरणाच लुप्तप्राय करू पाहताहेत. त्यामुळे 'माणूसच माणसाचा वैरी' ठरतो आहे. अशा अवस्थेत 'असुनि जिवंतहि मेले' होऊन राहणे टाळण्यासाठी तरी लोककल्याणी व्रतपतींचा आवाज धारकऱ्यांनी 'जय जय रघुवीर समर्थ' ही गर्जना केवळ अरण्यरुदन ठरण्याचा प्रसंग ओढवणे असंभव नाही! नसते!! तेव्हा 'ठकारे पर्वताऐसा नेटका सडपातळू। चपलांग पाहता मोठे महाविद्युल्लतेपरी। कोटिच्या कोटी उड्डाणे झेपावे उत्तरेकडे ।।" ही हनुमंताची उद्यमशीलता माणसामाणसाने अंगी मुरवून घेणे एवढा एकच उपाय मरतमढ्या जीवनाला सजीवनी देण्यासाठी आहे. तो अचूक वापरलाच पाहिजे. विभिन्न स्वभावांचे अद्‌भूत संमिश्रण असलेल्या समाजपुरुषातील विवेक अखंडपणे जागाच जागा ठेवून समाजाची क्रांतशीलता साक्षात्कारी करणेच जरूर आहे व असते. तिच्यातूनच 'धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।' हे आपले वचन भगवान लोकप्रत्ययास आणून देतो. 'न कर्मणामनारंभाद् नैष्कर्म्यं पुरूषोऽश्नुते । न च संन्यसनादेव सिद्धि समधिगच्छति ।' असा भगवद्‌गीतेचा सिद्धान्त असल्याकारणाने, कर्तव्याची अगर सत्कर्माची टाळाटाळ करून लाचारीचे अथवा मूल्यमापनशून्य जिणे जगणे म्हणजे माणसाने समाजावर नुसता बोजा होऊन राहणेच नसून, 'खायला काळ व भुईला भार' असे लोकधोक्याचे वा 'उकिरड्यात पडलेल्या चिंतामणी' चे स्वरूप आपले आपण आपल्या आयुष्याला देण्यासारखे आहे. तसे करण्याने मनुष्य 'असून अडचण' होतो व समाजजीवनात वाटमारी केल्याच्या पातकांचा धनी बनतो. असल्या चोरलुटीचा डाग माणसाला लागू नये म्हणून

१६) वैदिक समाजवादाचे सोळावे सूत्र माणसाला उपयोगी असून त्याचा मंत्र आहे की–

'मा गृधः कस्यस्विद्धनम् । (यजुर्वेद ४०।१)'

समाजातील कोणत्याही व्यक्तीने कोणाच्या धनाचा, कोणाच्याही सत्वाचा, कोणाच्या स्वत्वाचा, कोणाच्याही अधिकाराचा, कोणाच्याही प्रतिष्ठेचा, कोणाच्याही पात्रतासिद्धीचा, कोणाच्याही 'पदवी'चा, तात्पर्य 'जे जे देणे ईश्वराचे' वा 'फल कर्तृत्वाचे कोणाला वाटत असेल, त्याचा अपहार आपल्या हातून अजाणतासुद्धा होऊ नये, अशी दक्षता डोळ्यात तेल घालून माणसाने घेतली पाहिजे. अर्थात् आपले धन, सत्व, स्वत्व, अधिकार, प्रतिष्ठा, पात्रतासिद्धी, पदवी यापैकी कशाचाही दुरूपयोग

कोणी करीत असेल व समाजावर असुरी, आक्रमक वा आखबंद अरेरावी करीत असेल, तर त्याला ताळयावर आणण्याकरिता वा त्याच्या दुष्कृताचा नायनाट करण्याकरता, त्याचे पारिपत्य करण्याकरता मनुष्याने पुढे सरसावण्यात काहीच चूक नाही. 'खटनटाशी घालावा खटनट।' यात समाजसेवाच आहे. मात्र 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' हे गीतेचे आज्ञापक वचन माणसाने विनचूक पाळावयासच हवे.

अशा योगानेच माणसाचे व समाजाचे जीवन तीर्थस्वरूप होऊ शकेल. जीवनाला तीर्थाचे वा तारणहाराचे महत्त्व येण्यासारखे दुसरे आहेच काय? दुःखविमोचन आणि निर्मूलन वा संकटहरण हेच प्रत्येक प्राणिमात्राला सर्वप्रथम अपेक्षित असते. कुटुंबाला निर्धास्त ठेवणाऱ्या अनुभव-वृद्धाला आणि समाजाला निर्धास्त करणाऱ्या संतसज्जनाला वैदिक धर्माने तीर्थस्वरूप मानले आहे, ते उगीच नाही. अनुभववृद्धांचे व सज्जनांचे छत्र ही एक जीवनातील स्पृहणीय जिंदगीच असते. हरिद्वार, वाराणसी ही जशी परमेश्वरी लीलेने क्षेत्रे ठरली, तशीच 'धर्मो रक्षति रक्षितः' या तत्त्वास धरून आद्य शंकराचार्यांनी राष्ट्रीय एकजिनसीपणाची तीर्थे आपल्या बद्रीनाथ, शृंगेरी, गोवर्धन, द्वारका येथील मठस्थापनांनी निर्माण केली होती. भारतीय अध्यात्मवाद त्यायोगेच अबाधित राहिला. आपला 'महाराष्ट्र धर्म वाढवावा।' व अबाधित रहावा म्हणून समर्थांनी आपल्या धारकरी संप्रदायाचे अकराशे मठ ठोकळमानाने स्थापन केले होते. 'महंते महत करावे। युक्तिबुद्धीने भरावे।' अशा महंतलीला करणाऱ्या समर्थांनी आपल्या स्त्रीपुरुष मठाधिपतींना शिरस्ता घालून दिला होता, तो ईशोपनिषदाला धरूनच! 'यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति। सर्वभूतेषुचात्मानं ततो नो विजगुप्सते।' जो सर्व प्राणीमात्रास आपल्या ठिकाणी पाहतो आणि सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणी सर्वकाळी स्वतःलाच पाहतो, तो कोणाची घृणा करणारच नाही. असे समाजाचे तारणहार सर्वच ठिकाणी, सर्व काळी निर्माण होणे वा मिळणे हा कदाचित् जीवनातील कपिलाषष्ठीचा योग असेलही. पण आपापल्या मर्यादित जीवनक्षेत्रात आपापल्या परीने प्रत्येक माणसाला अनुभववृद्ध म्हणून अगर सज्जन होऊन निर्धास्ती खास निर्माण करता येईल. निर्धास्तीचे असे छोटे छोटे संरक्षक शिलेदार हे त्या त्या परिसरातील तीर्थेच वा तारणहार असून त्यांच्या त्यांच्या 'थेंबे थेंबे' राष्ट्रीय निर्धास्तीचे 'तीर्थक्षेत्र' खासच निर्माण होईल. माणसाने परिस्थितीचा विचार तिला शरण जाण्यासाठी करावयाचा नसून तिला आपल्यापुढे शरण आणण्यासाठी मुख्यतः करावयाचा असतो. मनुष्याची बुद्धी परिस्थितीने बद्ध असते, हे खरे असले तरी त्याच बुद्धिच्या सहाय्याने मनुष्य परिस्थितीवर आपले प्रभुत्वही प्रस्थापित करू शकतो. याचसाठी माणसाची बुद्धी केवळ परिस्थितिनिष्ठ आणि म्हणून नुसती वास्तववादी असून कार्यभाग होत नाही, तर ती आत्मनिष्ठही

असावी लागते व भविष्यभेदीही असावी लागते. अशी वुद्धि असणाऱ्या माणसालाच 'दीर्घसूचनेचा नर' म्हणतात. या दीर्घसूचनेच्या नराकडून 'जितुके काही उत्तम गुण । ते समर्थाचे लक्षण ।' अंगीकारण्यात कसूर होत नाही. आपापल्या परीने आपापल्या कार्यक्षेत्रात प्रत्येक माणसाने 'समर्थ' होण्याचा प्रयत्न करावा; आणि परिस्थितीस शरण आणावे. समर्थ रामदासांची तशी अपेक्षा असे यात नवल काय ? आपल्या स्वार्थ-सुख-स्वास्थ्यासाठी दुसऱ्यास कसलीही तोशीस लागू नये, लागावयाचीच असल्यास ती कमीत कमी लागावी, ही चिंता मनुष्यान वाहिली, तर मनुष्य स्वतःची वुद्धि चालवून, स्वावलंवनाने, स्वाभिमानाने आणि परिश्रमप्रतिष्ठेने स्वतः तर जगेलच पण त्यापेक्षाही एकंदर समाजजीवनही उंचावेल. विश्वसंचालक परमेश्वरच परिश्रमतपस्वी आहे. तो झाकलाच सदैव रहातो. तसे जीवन जगावयास माणसास जमेल तरच त्याला 'अहं ब्रह्मास्मि' म्हणण्याचा अधिकार येईल. 'सर्वांवाटे हवाहवासा । परी होतो गवसेनासा । असे निष्काम-कर्मयोगाचे जीवन हे 'मा गृधः कस्यस्विद् धनम् ।' चे उत्कृष्ट उदाहरण ठरणारे आहे.

१७) वैदिक समाजवादाचे सतरावे सूत्र मग साहजिकच

'ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत ।'

ह्या मंत्र देते. परमेश्वराने ही सृष्टी व सृष्टीतील जीवन कार्यकारणभावात्मक निर्माण केलं आहे. त्या कारणाने जीवाचा व जीवनाचा ओघ खंडित करणाऱ्या, जीवनाचा चुथडा करणाऱ्या अगर ऐनजिनसी जीवनच संपविणाऱ्या परिस्थितीशी अथवा पाशवी शक्तीशी माणसाच्या सत्वशुद्धीने मानवी जीवनाच्या त्या शत्रुशक्तीचा पाडाव झगडूनच केला पाहिजे. त्या झगडयात जरूर तर त्या शत्रुशक्तींचा चक्काचूरही करण्यास मागेपुढे पाहता कामा नये. 'गनीमांच्या देखता फौजा । वीरांच्या फुरफुरती भुजा ।।' अशी वीरश्रीच समाजाची संरक्षक ठरते. ही वीरश्री माणसाजवळ जामीच असेल, तरच त्याला श्रीरामाचा जप साधला असे म्हणता येते. तो तर साधावाच व माणसातही राम यावा व जीवनाची प्रभा झळकत रहावी म्हणून समर्थांनी माणसाला 'श्रीराम – जयराम – जयजयराम' .हा त्रयोदशाक्षरी मंत्र जपावयास जागरूकतेने सांगितले आहे. या मंत्राचा जागर करावयाचा म्हणजे तो आचरणशुद्धच राखावयाचा. अशी परिश्रमतपस्या माणसाने केली नाही, तर परब्रह्माने परिश्रम तपस्येने ही सृष्टी निर्माण केली व चालविली (अथर्व १२।५।१) हे स्पष्ट पाहून सुद्धा माणसाने त्यापासून धडा घेऊन त्याची अनुकरण पूजा केली नाही, असे होणार नाही काय ? माणसाने आपल्या परिश्रमतपस्येने वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय आवश्यकतांची पूर्ति, पूर्णता करून घेणे अवघड नाहीच नाही. समाजास उद्योगी, श्रमी, धनी, पुरुषार्थी,

यशवंत, बळवंत, कीर्तिवंत होऊन राहण्याचाच आदेश वैदिक धर्माने व संस्कृतीने दिला असून परिश्रमतपस्येचा आधारबिंदु सत्यच पाहिजे असा आग्रह धरला आहे. सत्याधिष्ठित परिश्रमतपस्या न्यायाचा समतोल सांभाळूनच समाजाचा अभ्युदय करील व निःश्रेयसही मिळवून देईल.

अशा तऱ्हेने **वैदिक संस्कृतीचा समाजवाद पंडित श्री. वीरसेन वेदश्रमी: यांनी म्हटल्याप्रमाणे उपदेश देत राहिला आहे की–** 'वयं रायस्योषस्य ददितार' स्याम । सा प्रथमा संस्कृतिर्विश्ववारा ।। (यजुर्वेद ७।१०)" समाजातील सर्व-जणांना धन, ऐश्वर्य, अन्न, वस्त्र, सुख, सौजन्य, सौभाग्य, समृद्धी, सत्कीर्ति; प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. पात्रतासिद्धीप्रमाणें 'समर्थचि व्हावे मुख्य पद ।।' केवळ आपल्याचकरिता हे सर्व किंवा या सर्वांपैकी आणि प्रत्येकांपैकी सिंहाचा वाटा आपल्याच वाटणीला यावा असे कोणाच्याही मनात येऊ नये. कोणीही लोभी, स्वार्थी, परापकारी ना व्हावे. 'न क्रोधो न च मात्सर्यं, न लोभो, नाशुभा मतिः । भवन्ति कृतपुण्यानाम्' असा सर्व समाज वा राष्ट्रपुरुष व्हावा. भारतीय वैदिक संस्कृति अशी व्यापकपणे समाजवादी असल्याकारणाने आणि मानवी जीवनातील चारही पुरुषार्थांना धरून असल्याकारणाने जगातील सर्व संस्कृतींची ती अग्रणी आहे. वेदकालापासून चालत आलेल्या त्या समाजवादी संस्कृतीलाच कालानुरूप स्वरूप देऊन, ती सतराव्या शतकातील जनतेच्या भावभावनातून समर्थ रामदासानी मुरविली व बुद्धिवादातून चालती बोलती केली.

वेदातील समाजवादाचा सिद्धांत कितीतरी उच्च कोटीचा आहे. वैदिक समाजवादाची सूक्ष्म दृष्टी सर्वच प्राणी, पक्षी, कीटक, पतंग यांच्यासुद्धा सर्व प्राणिमात्रात व वस्तुमात्रातही आत्म्याचे, परमात्म्याचे दर्शन घेते. ही एकजिनसी अनुभूति वैदिक समाजवादाचा पायाच आहे. आधुनिक समाजवादाप्रमाणे सगळ्यांना सारख्या आर्थिक स्तरावर आणून बसवायचे आणि तसली एकांगी समानता प्रस्थापित करावयाची हे वैदिक समाजवादाला पटतच नाही. कारण अर्थाधिष्ठित जीवनांगे व त्यातील पुरुषार्थ हा जीवनाचा फार तर एक विभाग आहे. सर्वांगीण एकजिनसी जीवनाचा आणि त्यातील समानसिद्धीचा त्यात विचार तरी आहे कोठे ? ऐहिक जीवनातील समान संधि आणि संपत्तीची समान वाटणी कधी काळी साधलीच तर ती अखंडपणे टिकविणे, वाढविणे आणि सर्वांना सारखे सुखी करण्याकरिता तिचा वापर करणे हे प्रत्येकाला प्रत्येक क्षणाला जमणारेच नाही. ते अध्यात्मसंपन्न साधुसज्जनालाच जमले तर जमणार. एरवी, पंडित तो पंडित राहणार व मूर्ख तो मूर्खच राहणार आणि 'एकदेशी पाहणार.' म्हणून वैदिक समाजवाद मनुष्यप्राणी आणि इतर जीव यांच्यात 'भेद ईश्वरे केला ।' तो जमेला धरूनच पारस्परिक प्रेमव्यवहार, सहकार–समन्वय, सहानुभूति–सहाय्य यांच्यावर

भर देतो आणि सर्वामध्येंच परमेश्वरी चैतन्य आहे, त्याची पूजा करावी अशी समानता प्रस्थापित करतो. ' जनहित विवरी ।' आणि ' कल्याण करी ' अशा ' अवघेचि सुखी असावे ।' या वासनेच्या परिपूर्ततेचा व्यवहारी मार्ग प्रत्येक माणसाला, मनात आणील व मनावर घेईल, तर साधणारा आहे, हे नाकबूल करण्यात अर्थ नाही. समर्थ रामदासानी तसेच केले आणि ते ' धर्मस्थापनेचे नर ' झालेच झाले.

सर्वच प्राणिमात्रात परमात्मा वास करतो. म्हणून सगळेच अमृतपुत्र आहेत. सर्वात परस्पर बंधुभाव आहे. हा समभाव व्यवहारशुद्ध ठेवणाराइतका खरा समाजवादी ( सन्त एकनाथासारखा ) दुसरा कोठे मिळणार ? विद्या (विद्–असणे, जाणणे, मिळवणे यावरून) म्हणजे जीवनशिक्षण, आपले अस्तित्व आपल्या व्यक्तित्व – व्यक्तिमत्वासह प्रगट करणे, आपल्या अकलेची व ज्ञानाची विकास–वाढ साधत राहणे आणि चढत्या वाढत्या पदवीने काही कमाई, प्रगति पराक्रम करणे, या तीन कला माणसाला साधल्या तरच त्याने जीवनशिक्षण होते, विद्या होते. या तीनही जीवनकलांचा उपयोग आणि विनियोग आपल्या समाजबांधवांच्या, वा आवाका असेल तर राष्ट्रबांधवांच्या सेवेस मनुष्य समर्पण बुद्धीने लावतो, तेव्हा त्याची विद्या ही अध्यात्मविद्या ठरते. ' अध्यात्म विद्या विद्यानाम् ।' म्हटले जाते ते त्यामुळेच. अध्यात्म विद्येवर आधारलेले व

' बहुतांचे बहुत सोसावे । बहुतांच्या कामास यावे ।' असे
' बहुतांच्या सुखी सुखावे । बहुतांच्या दुःखी दुःखी व्हावे ।'

अशा प्रत्ययाचे जीवन सामान्य माणसालासुद्धा आटोक्यातील साधनानी सहजसाध्य नसले तरी प्रयत्नसाध्य खासच आहे. अशा समाजवादी जीवनाच्या वाटचालीचे मार्ग समर्थांनी आपल्या दासबोधादि ग्रंथातून, स्फुटलेखनातून आपल्या सांप्रदायिक प्रथाप्रणालीतून भरपेठ दाखविले आहेत व आपल्या धारकऱ्याना ते व्यवहारशुद्ध राखण्यास ठामपणे बजावले आहे.

' कठिण समय येता कोण कामास येतो ?' तर लोकाना शुद्ध स्वच्छ मार्गदर्शन करून आणि त्यांच्या खांद्यास खांदा लावून काम करणारा ' अलौकिक होऊ नये । लोकाप्रति ।।' या बिरूदाचा नेता, सन्त, महन्तच. भारतीय इतिहासातीलच काय, पण जागतिक इतिहासातील हा अनुभव आहे. नेता, सज्जन, संत, महंत यांच्या जीवनातील ' गृह्याद् गृह्यतमं' रहस्य तेच असते. वरील निर्दिष्ट महानुभवापैकी प्रत्येकाचे जीवन हा एक रसरशीत पुण्यराशि यज्ञ असतो. मनापासून सर्वथा त्यागी, अपरिग्रही, अनासक्त राहून समाजसेवेसाठी, दुसऱ्याचे हाल कष्ट निवारण करण्यासाठी, लोककल्याणाचे मोठ्यात मोठे ओझे उचलण्यासाठी मनुष्य निःसंकोच पुढे येऊ लागला की त्याचे यज्ञमय जीवन लोकपरिचयाचे

होते. यज्ञमय जीवनाची आंच आणि आवड प्रत्येकास असावी, वाढावी व प्रभावी व्हावी असा समर्थांच्या धारकरी पंथाचा रोखच होता. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी 'अभंगवृत्तातील' साध्या, सुबोध, ठसठशीत व सततप्रवाही रचनेप्रमाणे असावी व त्याचबरोबर अखंड करणी ही धारकरी पंथाची निशाणी लोकमानसात फडकत रहावी. आत्मा व शरीर यांची संतुलित निगा जशी जीवनाला आवश्यक असते, तशीच व्यक्तिजीवनाची व समाजजीवनाची संतुलित निगा आवश्यकच असते. साहजिकच 'आत्मार्थं पृथिवीं त्यजेत् ।' असा जसा वैदिक संस्कृतीचा आदेश आहे, तसाच 'त्यजेदेकं कुलस्यार्थे, ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत । ग्राम जनपदस्यार्थे त्यजेत् ।' असाही त्याच वैदिक संस्कृतिचा आदेश आहे. तोच समाजाचा स्थायीभाव व्हावा हा समर्थसंप्रदायाचा रोकडा ध्येयबिंदु. त्यास अनुसरून जीवनाच्या वर्तुळात व्यक्तिजीवनाचे केंद्रातून व्हावयाचा व्यासनिर्मिती-पूजा म्हणजेच समर्थांचा समाजवाद.

समर्थांच्या अशा समाजवादात पात्रतासिद्धीच्या बाबत स्त्रीपुरुषात वा जातिजमातीतसुद्धा भेदभाव अगर उच्चनीचता नसल्यामुळे स्त्रियाकडे मठाधिपतित्व किंवा महंती येण्यास चुकली नाही. अक्काबाई देशपांडे, वेणाबाई देशपांडे, वाळव्याच्या अम्बिकाबाई ही ठळक उदाहरणे जशी त्याबाबत प्रसिद्ध आहेत. तसेच ह्यशा महाराकडून सदाशिवशास्त्रींचा गर्वपरिहार हाही प्रसिद्ध आहे, समर्थांच्या वैदिक संस्कृतीस अनुसरून असलेल्या समाजवादाची परिणती शेवटी 'चिंता करतो विश्वाची ।' या वचनाचा प्रत्यय देण्यातच झाली पाहिजे. वैदिक समाजवादाच्या अठराव्या सूत्राचा मंत्रच आहे की—

१८) 'सर्वेऽपि सुखिनः संतु, सर्वे संतु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥'

अर्थात् विश्वातील मानवच काय, पण यच्चयावत् प्राणिमात्र सुखी, निरोगी व्हावा, सर्वांना उदात्त, उच्च, उजळे, कल्याणकारक असेल तेवढ्या सर्वांचा आढळ होऊन लाभ मिळावा; आणि कोणाच्याही वाट्यास दुःख येऊ नये. 'सर्वही सुखी व्हावे । ऐशी वासना ।।' सर्वत्र नांदावी. त्यासाठी

'पुमान् पुमांसं परिपातु विश्वतः ।'

माणसाने माणसाशी सहकार—समन्वय साधून लोकात संघशक्ति आणि एकजिनसी-पणा निर्माण करावा. त्यापायी 'जीव जीवात घालावा ।' लागतो, 'जयास नाही सामर्थ्याची पाठी । तयास भलताच कुटी ।।' हे लक्षात ठेवून समाजात, राष्ट्रात, मानवजातीत प्रत्येक सत्वधीराला 'समर्थांची पाठी' आहे असा प्रत्यय आला तर त्याचा स्वतःचा आत्मविश्वास वाढतो व तो आपली जीवनयात्रा शांतपणे चालू ठेवतो.

' करी वृत्ति जो शांत तो संत जाणा ।
दुराशा (निराशा) गुणे तो नव्हे दैन्यवाणा ।।'

असे नेतृत्व त्यासाठी समाजाच्या निरनिराळ्या थरात आणि थराथरातील समूहासमूहात आवश्यक असते. दुःखाने ' उराळे ना ।' व सुखाने ' हुराळे ना ।' असा नेता समूहासमूहाला व थराथराला भेटला तर जीवनाच्या झगड्यात तो स्वत: निभावून तर जातोच पण एकंदर समाजाला व राष्ट्रालाही निभावून नेतो. त्या शांतिसम्राटाला निराशा कधीच ठाऊक नसते. ' निराशा शूराच्या कधि न

हृदया ते वश करी ।।' म्हणून वैदिक समाजवादाचे एकोणिसाव्या सूत्राचा मंत्र असा आहे की–

१९) ' निराशायाः समं पापं मानवस्य न विद्यते ।'

निराशेसारखे माणसाचे दुसरे पातकच नाही. म्हणून समर्थांनी ' अचूक यत्न तो देवो ।' असे स्पष्ट बजावले आहे.

अचूक यत्नाने सर्वांसच आपापली पात्रतासिद्ध स्थाने प्राप्त होत असतात. सर्वांगीण अभ्युदय हा वैदिक संस्कृतीचा उद्‌घोष आहे व त्यासाठीच वैदिक

संस्कृतीच्या पुरुषार्थसाधक समाजवादाच्या विसाव्या सूत्राचा मंत्र आहे की–

२०) ' संगच्छध्वम् संवदध्वम्, संवो मनांसि जानताम् ।
देवां भागं यथापूर्वे संजानानामुपासते ।। (ऋग्वेद)'

सगळ्या लोकांनी समान भावाने चालावे; उदात्त गोष्टी कराव्यात, बोलाव्यात; सगळ्यांची मने एकमेकांशी समजून उमजून समरस व्हावीत; सगळ्यांनी सगळ्यांशी मिळून असावे, चालावे, रहावे. तात्पर्य सगळा समाजच एकजिनसी पौरुषाचा अवतार म्हणून इतिहास करीत रहावा.

वैदिक ऋषी ' बहुजनसुखाय बहुजनहिताय' जगत, झटत व मरतही. ही समाजसन्मुख दृष्टी यज्ञ या नावाने संबोधिली जाई. असा यज्ञ अव्याहत होत

२१) रहावा म्हणून वैदिक समाजवादाच्या एकविसाव्या सूत्राचा मंत्र
तत्सवितुर्वरेण्यं भर्गोदेवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।'

असा आहे. प्रभु सविता देवाच्या श्रेष्ठ तेजाचे आम्ही ध्यान करतो. ते अशाकरता की त्याने आमच्या बुद्धीस उत्तम मार्गाची प्रेरणा द्यावी, असे ते ऋषी आकांक्षीत. वैदिक काली सामुदायिक प्रार्थना, सामुदायिक जप व सामुदायिक यज्ञ करण्याची पद्धत असे. भारतातील सर्वच संत मंडळींनी आपापल्या सांप्रदायिक मठात वैदिकऋषीपासून प्रेरणा घेऊनच सामुदायिक प्रार्थना, भजने, निरूपणे, कीर्तने, प्रवचने, ललिते

सुरू केली होती. समर्थ रामदासही त्यात मागे नव्हते. त्यांच्या भीमरूपी, सवाया, आरत्या, छबिने मठामठात चालत व चालतात, यावरून ते लोकपरिचयाचेच आहे. रामाचा छबिना व सामुदायिक भिक्षा या समर्थप्रचलित सामुदायिक प्रार्थनांचे व लोका अलौकिक न होता लोकसंपर्कसाधक मेळाव्याचे नमुनेच होते. अशा सामुदायिक प्रार्थनात समानता, सद्‌भावना, शिस्त आणि एकजिनसी कल्याणकरी कृतीच्या निश्चयाची अपेक्षा असते. त्यामुळे सामुदायिक शक्तीचा प्रादुर्भाव होतो. 'उदंड समुदाय करावे । एक विचारे भरावे।' आणि ते 'गुप्तरूपे' हे सहज साधते. एवढेच नव्हे, तर सहवास, सहविचार आणि सहकार यांच्या योगे सर्वत्र ईश्वरी कृपा संचारल्याचा अनुभवही येत जातो, मनुष्यमात्रांची एकवटलेली शक्ती हेच केवढे तरी सामर्थ्य आहे. 'गाव करील ते राव काय करील?' या वाक्प्रचारातूनही तेच सामर्थ्य प्रतीत होते. सगळ्यांच्या (गावस्वरूप) इच्छाशक्तीने झालेल्या अथवा होणाऱ्या कार्यांचे मूल्यमापन नाणेबाजाराच्या आवाक्याबाहेरचेच असते. ते सदैवच भावनिक अथवा बौद्धिक कोष्टकात बसण्यापलिकडचे ठरते व केवळ अनुभविक तंत्रगणकानेच आनंद देते.

स्वावलंबनाने, स्वाभिमानाने आणि स्वतंत्र विचारधारेने पण समाजसन्मुख होऊनच सेवासमर्पणबुद्धीच्या माणसाने विवेकी जीवन जगावे. दीन, दुबळे, रंजले-गांजलेले, होरपळलेले, संतप्त, प्राणिमात्राबद्दल माणसाचे हृदय कुसुमासारखे कोमल असावे. पण लबाड, दुष्ट, असुरी, उनाड माणसांना धडा देण्याकरता माणसाने आपले हृदय वज्रासारखे नसले तरी हिऱ्याइतके तरी कठोण केलेच पाहिजे. आणि तसे करण्याची पाळी आली तरी माणसाने पित्याची कर्तव्यकठोरता ही पार्श्वभूमी करून व मातेची वत्सलता जागरूक ठेवून 'फड नासोचि नेदावा' आणि समाजाचा 'प्रवाहो चालला म्हणजे बरे । तुंवता नये ।' हे अव्याहत लक्षात ठेवले पाहिजे. प्रपंच नेटका करावयाचा तो नुसता परमार्थमय होऊन न राहता, तो ऐहिक व अध्यात्मिक दृष्टचा परमार्थ ठरला पाहिजे. 'धन्य त्या गायनी कले' पासून सर्व कला आणि विज्ञानाची अभिनव संशोधने या सर्वांचा उपयोग करताना व करूनही माणसाने मर्यादा-पुरुषोत्तम राहूनच आपली आणि समाजजीवनाची विकासकुशलता आदर्श करावी, तीत रमावे व जगासही रमवावे. तसे ते अध्यात्मिक निरामय जीवन म्हणजेच 'धर्मस्थापनेच्या नराचे' मूर्त जीवन. शारिरिक सुखे आणि बौद्धिक तीक्ष्णतेचा आनंद यांच्यापेक्षाही उच्च जीवानानुभव माणसाच्या प्रेमशक्तीने विश्वातील प्राणिमात्राच्या सौंदर्य – सद्‌गुणात व सद्‌गुण सौंदर्यात समरसतेने गर्क होऊन जाण्यात मिळत असतो. यास विश्वाचा अनासक्त उपयोगच काय, उपभोग म्हणून कोणी संबोधिले तरीही हरकत नाही. त्यात निजानंद, आत्मानंद, स्वानंद अशा नावानी ओळखली जाणारी जी सुखसंवेदना

आहे ती शब्दातीत आहे. त्या आनंदासाठी स्वत:च स्वत:ला संपूर्ण विसरून जगातील चैतन्याच्या, परमात्म्याच्या, परमेश्वराच्या पायाशी माणसाने अक्षरश: विलीनच विलीन व्हावयास हवे. सर्वत्र मांगल्याचा आणि मंगल्याचाच प्रत्यय येणे हा वैदिक संस्कृतीच्या समाजवादाचा डौलदार फुलोरा आहे. ते ' अवघे करणे ईश्वराचे आहे ।' तसेच ' देणे ईश्वराचे' आहे. समर्थ रामदासाना ते राष्ट्राच्या जीवनातील अंगोपांगात पहावयास मनापासून हवे होते.

समर्थ रामदासांच्या समाजवादासंबंधी ' इतुके बोलिलो स्वभावे । त्यात मानेल तितुके घ्यावे । श्रोती ( वाचकी ) उदास न करावे । बहु वोलिलो म्हणोनी ।' ( दा. २-९-४१ ) एवढीच शेवटी, आपणा सर्वांना कृतज्ञतेने अभिवादन करताना, विनम्र विनंती केल्याशिवाय राहवत नाही.

समर्थांनी सर्वसंग्राहक दृष्टिकोण ठेवला होता. हे त्यांचे वैशिष्ठ्य आहे कुटुंबशिकवण, नि:स्पृहलक्षण, उत्तम पुरुष लक्षण, स्वगुणपरीक्षण, नवविधा भक्ति इत्यादि त्यांचे विषय लक्षात येताच समन्वयी समर्थांनी हरिकथा निरूपण आणि राजकारण ही समाजजीवनाची सलग अंगेच आहेत, परम, आर्थिक आणि पारमार्थिक असे दोघेही समाजाचे घटक एकमेकाना पूरक व पोषक ठरले पाहिजेत, ते नीतिमूल्यानी, आणि सक्षम, सघटित, सदातत्पर, सावध असे समाजाचे मार्गदर्शक प्रशस्त, समस्त जाणते विख्यात योगी मिळून सर्वांच्या सहकारसमन्वयाची परिणति समाजाच्या व राष्ट्राच्या एकजिनसीपणात आणि ' अणूपासूनि ब्रह्मांडा एवढे ' होत जाण्यात झाली पाहिजे ही समर्थ रामदासांची महत्वाकांक्षा होती. ती साकार करण्यासाठीच त्यांचा समाजवाद.

**जय जय रघुवीर समर्थ !**

**समर्थ समाजवादाचे संदर्भ**

( प्रस्तुत लेखनातील वैदिक संस्कृतीच्या समाजवादाची एकवीस सूत्रे पं. वेदव्यास श्री. दा. सातवळेकर यांच्या वैदिक वाङमयाच्या वाचनातून आणि आध्यात्मिक समाजवाद, विश्वव्यापक वैदिक संस्कृति, भारताचा प्राचीन इतिहास, हिंदूधर्माची तत्त्वे, हिंदूधर्मदीप, भारतीय संस्कृतीचा पाया या ग्रंथाप्रमाणेच The call of the vedas, Humanised Society Through Trusteeship, Correct conception of Hindu Religion, The Real National Religion या ग्रंथांचे अवलोकनाने मुक्रर झाली आहेत, हे अभ्यासविशारदाना

सांगण्याची गरजच नाही. या सर्व ग्रंथकर्त्यांना व ते ग्रंथ मला वाचावयास देणाऱ्या कृपावंतांना सप्रणाम धन्यवाद )

२ ( हरिसंकल्प मुळीचा । आत्माराम सकळांचा ।
संकेत नामाभिधानांचा । येणे प्रकारे ॥१॥
निश्चळी चंचळ चेतले । म्हणोनी चैतन्य बोलिले ।
गुणसमानत्वे झाले । गुणसाम्य ऐसे ॥२॥
प्राणी मारूनि श्वापद पळे । वरकड त्यास काय कळे ।
नाना भोग तो निवळे । मनुष्य देही ॥३॥
नाना शब्द, नाना स्पर्श । नाना रूप नाना रस ।
नाना गंध ते विशेष । नरदेह जाणे ॥४॥
अमूल्य रत्ने नाना वस्त्रे । नाना याने नाना शस्त्रे ।
नाना विद्या, कला, शास्त्रे । नरदेह जाणे ॥५॥
पृथ्वी सत्तेने व्यापिली । स्थळोस्थळी आटोपिली ।
नाना विद्या, कला केली । नाना धारणा ॥६॥
दृश्य अवघेचि पहावे । स्थानमान सांभाळावे ।
सारासार विचारावे । नरदेहे आलिया ॥७॥
इहलोक आणि परलोक । नाना प्रकारीचा विवेक ।
विवेक आणि अविवेक । मनुष्य जाणे ॥८॥
नाना पिंडी ब्रह्मांडरचना । नाना मुळीची कल्पना ।
नाना प्रकारी धारणा । मनुष्य जाणे ॥९॥
अष्टभोग नवरस । नाना प्रकारीचा विलास ।
वाच्यांश, लक्ष्यांश, सारांश । मनुष्य जाणे ॥१०॥
मनुष्ये सकळास आळिले । त्या मनुष्यास देवे पाळिले ।
ऐसे हे अवघे कळले । नरदेह–योगे ॥११॥
नरदेह परम दुर्लभ । येणे घडे अलभ्य लाभ ।
दुर्लभ ते सुलभ । होत आहे ॥१२॥
वरकड देहे हे काबाड । नरदेह मोठे घबाड ।
परंतु पाहिजे जाड । विवेकरचना ॥१३॥
नर तोचि नारायण । जरी प्रत्यये करी श्रवण ।
मननशीळ अंत:करण । सर्वकाळ ॥१४॥
जेणे स्वयेचि पोहावे । त्यास कासेस न लगे लागावे ।
स्वतंत्रपणे शोधावे । सकळ काही ॥१५॥
सकळ शोधून राहिला । संदेह कैचा तयाला ? ।
पुढे विचार कैचा झाला । त्याचा तोचि जाणे ॥१६॥
(दासबोध दशक २०; समाप्त ५)

# श्री समर्थ रामदास : सार्वकालीन आदर्श पुरुष

– सौ. शालिनी अनंत जावडेकर, जी. ए.

उत्तमगुणे शृंगारला । तो बहुतांमध्यें शोभला ।
प्रगटप्रतापें उगवला । मार्तंड जैसा ।। (दास. १९–४–१५)
उत्तमगुणी शृंगारिला । ज्ञानवैराग्ये शोभला ।
तोचि येक जाणावा भला । भूमंडळी ।। (दास. १२–१०–१७)

असे श्री समर्थानींच आदर्श पुरुषाचें लक्षण सांगितलें आहे. तेच त्यांच्या स्वत:च्या जीवनाला उत्तम प्रकारे लागू पडते. 'आधी केलें मग सांगितलें' हा रामदासी बाणा– त्याची इथेंही प्रचीती येते.

**शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी**

एखाद्या आदर्श व्यक्तीचा जन्म व्हावयाचा असतो तेव्हां जन्मदाते मातापिताही तसेच गुणसंपन्न व तप:पूत असावे लागतात. समर्थांचे पिता श्री सूर्याजीपंत ठोसर व मातु:श्री राणूबाई हे उभयता सूर्योपासक व रामोपासक होते. सूर्याजीपंत नित्य सहस्त्र सूर्यनमस्कार घालीत; गायत्री जप करीत. त्यांच्या घराण्यांत मागील बावीस पिढ्या श्रीरामाची उपासना चालू होती. श्रीरामाचा साक्षात् अनुग्रह त्याना झाला होता. सूर्यनारायणाचे वरप्रसादाने त्याना दोन पुत्र

झाले. पहिला गंगाधर व दुसरा नारायण. रामजन्माचा सोहळा सूर्याजीपंतांचे घरीं चालला असता (इसवी सन १६०८) शके १५३० चैत्र शुद्ध नवमीस दुपारी शुभ समयी रामजन्माचे वेळीच नारायणाचा जन्म झाला. जन्मताच त्याचे कानावर रामजन्माचा गजर पडला.

**बालपण व अनुग्रह**

जन्मत:च नारायणाला दणकट शरीरप्रकृतीचा लाभ झाला होता. नाना तऱ्हेचे खेळ खेळण्यात तो पटाईत झाला. अत्यंत तैलबुद्धी, उत्कृष्ट धारणाशक्ती, तीव्र स्मरणशक्ती, वळणदार अक्षर, पाठांतराची व गायनाची आवड, गोड आवाज या उपजत गुणांमुळे घरातच वडिलाजवळ तो लहान वयात पुष्कळ शिकला. रुपावळी, समासचक्र, रुद्र पवमान, पूजा, वैश्वदेव, ब्रह्मयज्ञ इत्यादीत तो पारंगत झाला. मौजीबंधन झाले. याप्रमाणे मातापित्यानीं प्रेमानें संगोपन करून नारायणास आदर्श पुत्र म्हणून घडवले. नारायणही मातृपितृभक्त होता. पैतृक संपत्ती म्हणून रामभक्तीचा वारसा मिळाला होताच. बालपणीच त्याच्या मनी घरातील नित्य उपासनेमुळे रामभक्तीचे बीज रुजले. पैठणला एकनाथ महाराजांचे घरीही वारंवार जाणे होई. तेथे नाथांचे ' भावार्थ रामायण ' ऐकून हे रामभक्तीचे बीज फोफावले; ते इतके की, नारायणाने लहानपणीच रामनाम मंत्रासाठी प्रथम वडिलाजवळ व त्यांचे पश्चात् ज्येष्ठ बंधूजवळ हट्ट धरला. बालपणीच उपरती झाली. रामभक्तीची, दर्शनाची ओढ लागली. बंधूनी मंत्र दिला नाहीं म्हणून रागाने घरातून निघून जावून मारुतीचे देवळात निजले असता, रामदास एका आत्मचरित्रपर अभगात म्हणतात—

निद्रा केली तेथे श्रीरामे उठवुनी । तोचि मंत्र कानी सांगितला ।।

साक्षात् आराध्य दैवत श्रीराम हेच त्यांचे गुरु झाले. मंत्रजप, नित्य उपासना लहान वयातच सुरू झाली. ते श्रीरामाचे अनन्य उपासक झाले. एकांतात रानावनात जावून जप, ध्यान, चिंतन करावे अशी आवड निर्माण झाली. तीच पुढे जन्मभर कायम राहिली. ' मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी । विविक्तदेशसेवित्वं अरतिर्जनसंसदि ।।' (गीता १३–१०) हे ज्ञानाचे लक्षण हळूहळू त्यांचे अंगी बाणले. घरात लक्ष नव्हते. प्रपंचाची वासना नव्हतीच. उलट ' चिंता करितो विश्वाची ' अशी नारायणाची मन:स्थिती होती. (समर्थ प्रताप २–२२). अशात, एक विलक्षण प्रसंग नारायणावर गुदरला. समर्थांचे शिष्य दिनकर स्वामी ' स्वानुभव–दिनकर ' ग्रंथात (कलाप १६ किरण ४) सांगतात : ' वयाचे अकराव्या वर्षी एक दिवस नारायण घरी एकटाच होता. कोणी एक वानर दूत–वेषाने आला. त्याने नारायणाला फरफटत, ओढत, मारत गावाबाहेर अरण्यांत नेले. तेथे एक शिबिका होती; त्यापुढे उभे केले. आत पाहतो तो आत

एक जोडपे होते. त्यातील पुरुषाने नारायणाचे मस्तक कुर्वाळले व हातात एक निजमुद्रांकित पत्र दिले. ते वाचताच नारायण थरथर कापू लागला. त्याची बोबडी वळली. इतक्यात वावटळ आली. त्यात नारायणास रामपंचायतनाचे दर्शन झाले. श्रीरामानी कृपाहस्त मस्तकी ठेवून त्याला महावाक्याचा उपदेश करून मारुतीचे स्वाधीन केले. नारायण जास्तच घाबरला. तो त्याला घुघुकार मारुती दिसला. इतक्यात विजेसारखेलखलखीत वस्त्र त्याचे अंगाभोवती लपेटले गेले. उजव्या हातात पत्र होतेच. डाव्या हातात अर्धचंद्र बाण दिला व श्रीराम गुप्त झाले. नारायण वाचा कुंठित होवून पडला. त्याचे मौन वर्षाने सुटले ।।' इकडे वडिलानी नारायणाचा शोध सुरू केला या अरण्यात आले. नारायण निपचीत पडलेला दिसला ! त्याला घरी नेले. हातातील पत्र वाचून वडील व बंधू याना समाधी लागली ! त्यातच वडिलानी देह ठेवला; व श्रेष्ठानी आपले कुलकर्णीपण सोडले. यावरून सुलतानी सकट आले असता सद्गुरु रामरायानी त्यास तारून नेले असा भावार्थ निघतो, असे मला वाटते.

त्या काळच्या भयंकर परिस्थितीत सुलतानी जुलुमाचे वर्णन उघड उघड करणे धोक्याचे होते. म्हणून दिनकर स्वामीनी नारायणाच्या जीवावर बेतलेल्या या प्रसंगाला अद्भुत कथेचे रूप दिले असावे. नारायणाच्या हातातील पत्र पाहून वडिलांचा देहांत व्हावा व श्रेष्ठांना कुलकर्णीपण सोडावे लागेल असे त्या पत्रांत काही असले पाहिजे ! त्यांचेवर मुसलमानी अधिकाऱ्यांची वक्रदृष्टी फिरली होती असेच म्हणावे लागते. पण नारायणच त्यांचे हाती लागला. त्याला मारहाण होणार तोच सद्गुरु श्रीरामानी प्रगट होवून विघ्न टाळले व पुढील आयुष्यात मारुतीस त्याचे संरक्षक नेमले.

नंतर वर्षभर नारायण मूक होता याचा अर्थ अंतर्मुख होऊन पुढील आयुष्याची दिशा ठरवित होता. या प्रसगानेच सुलतानी सत्तेशी टक्कर देवून धर्मसंस्थापना करणेची प्रेरणा त्याला झाली असावी व त्यासाठी आजन्म ब्रह्मचर्याचे व्रत स्वीकारण्याचा त्याने निश्चय केला असावा.●

---

● स्वानुभवदिनकरातील वरील वृत्तान्ताला अनुसरून कै. शं. श्री. देव म्हणतात, 'बखरीत म्हटले आहे की, 'शके १५३८ श्रावण शुद्ध अष्टमीस श्री रघुपतीने (नारायणास) अनुग्रह दिला.' बखरीतील महिना व तिथी आपण मान्य करू व शक सोडून देऊ... कारण स्वानुभवदिनकरातील वरील अत्यंत विश्वसनीय मार्गाने आपणास ठाऊक झाले आहे की त्यावेळी नारायणाचे वय अकरा वर्षाचे होते. म्हणजे शक १५४१ येतो.'

कै. देव व त्यांना अनुसरणारे सर्व लेखक अनुग्रहाचा शक बदलतात याचे आश्चर्य वाटते! कारण दिनकरस्वामींनी म्हटले आहे, वय तरी अकरा वर्षाचे! ... श्रीरामे मस्तकी ठेवूनि कृपाहस्त । महावाक्य उपदेशूनि त्वरित । हनुमंतासी

परंतु नाईलाजाने केवळ आईची आज्ञा पालन करण्यासाठी वयाचे बाराव्या वर्षी नारायण बोहल्यावर चढला व द्विजानी 'सावधान' म्हणताच अतरीं आधीच सावध असल्याने प्रपचातून निसटला. 'इद्रियार्थेषु वैराग्यं', 'पुत्र-दारागृहादिषु असक्तिः अनभिष्वंगः' अशा धगधगीत विरागीवृत्तीने आधीच नारायणाला बरले होते. केवढे हे आश्चर्य !

तपःस्वाध्याय

सर्वस्वाचा त्याग करून नारायणाने पंचवटीस राहून गोदावरी – नंदिनी संगमावर बारा वर्षे कडकडीत तपःसाधना केली. सकाळी स्नानसंध्या, गायत्री पुरःचरण, रामनामजप करावा; दुपारी माधुकरी मागून पोट भरावे व नंतरचा सर्व वेळ ज्ञानसाधनेत घालवावा. निरनिराळ्या ग्रंथांचा स्वाध्याय करावा. नाशीक-मधील विद्वान्, पंडीत, कीर्तनकार, प्रवचनकार, योगी, साधू यांचेजवळ बसून आध्यात्मचर्चा, ग्रथवाचन करावे. याप्रमाणे आचार्योपासन, स्वाध्याय, ज्ञानयोग-व्यवस्थिती हे गीता–प्रणीत सद्‌गुण अगी बाणवले. अशा तऱ्हेने बारा वर्षे नारायणाने स्वतःला घडविले व तो 'रामदास' झाला. आदर्श पुरुष स्वतःचे जीवनध्येय निश्चित करून त्यासाठी प्रथम स्वतःला कसे घडवतात हे रामदासांच्या चरित्रावरून शिकण्यासारखे आहे. पंचवटीचे परिसरात नारायण 'रामदास' म्हणून प्रसिद्ध झाला. श्रीरामानीही साक्षात् दर्शन देऊन जगदोद्धार करणेची आज्ञा दिली. 'जनस्थान गोदातटी परमपावन पंचवटी। तेथे पडली दृष्टी रघुत्तमरायाची।' असे स्वतःस झालेल्या साक्षात्कारासंबधी त्यांनी लिहिले आहे.

याप्रमाणे वयाचे चोविसाव्या वर्षी रामदास ज्ञानविज्ञानसपन्न झाले. शारीरिक, मानसिक, बौद्धिक व दैवी सामर्थ्याने संपन्न झाले. त्याना सिद्धी प्राप्त झाल्या. 'राघवाची पदे मानसी धरीन। विश्व उद्धरीन हेळामात्रे।' (समर्थ गाथा पान १४३) असा आत्मविश्वास त्यांना आला. कार्याला सुरवात करण्यापूर्वी कार्याचे आयोजन

---

निरविले ।।' स्वानुभवदिनकर १६$\frac{4}{56}$). रामनामाचा मत्र दिला असे म्हटलेले नाही. मंत्रानुग्रहाबाबत समर्थ स्वतःच सांगतात तोच अस्सल पुरावा होय–

जन्म झाला झाला देव वंशा आले। उपासना चाले राघवाची।
राघवाची भक्ती सुखाची विश्रांती। पितयाची शांती झाली पुढे।
पुढे ज्येष्ठ बंधू न सांगेचि काही। सुखे देवालये निद्रा केली।
निद्रा केली तेथे श्रीरामे उठवूनि।. तोचि मंत्र कानी सांगितला।
सांगितला बोध रामी रामदासा। गुरूच्याहि वंशा निरोपिले ।।

( समर्थ ग्रंथभांडार – भाग दुसरा : पान ४२८ : संपादक – ल. रा. पागांरवकर ) यात समर्थानी वयाचा उल्लेख केलेला नाही. परतु वडील वारले असे स्पष्ट म्हटले आहे. नंतर देवालयात सुखाने निजले असता श्रीरामाने उठवून जागे-

विचारपूर्वक करणे हे आदर्श पुरूषाचे लक्षण आहे. ज्या लोकांचा उद्धार करायचा त्यांची ' चक्षुर्वै सत्यं' स्थिती कशी आहे ते पहाणे रामदासांना आवश्यक वाटले. म्हणून त्यांनी हिंदुस्थानची यात्रा करण्याचे ठरविले.

**हिंदुस्थानची पदयात्रा**

रामदास प्रथम त्र्यंबकेश्वरचे दर्शन घेऊन थेट उत्तरेकडे हिमाचलापर्यंत गेले. मार्गातील गावे पहात लोकस्थिती अवलोकन करीत गेले. व्यासाश्रम, वसिष्ठाश्रम, हनुमंताश्रम पाहिले. हनुमंताश्रमात रामदास थंडीने ग्रस्त झाले असता मारूतीने दर्शन देऊन त्यांना हुर्मुजो रंगाची मेखला पांघरली, हिमालयात संचार चालू असता रामदासांच्या ठायी देशस्थितीची दुर्दशा पाहून तीव्र नैराश्य उत्पन्न झाले. एका कुंडात आपला देह त्यांनी झोकून दिला. त्याना वरच्यावर श्रीरामानी धरले व सांगितले, तुम्हासी जगोद्धार करणं आहे । दोनी तपे तुमची रक्षिली काया हे । धर्मस्थापनेकारणे ।। (समर्थ प्रताप ३-८) ते ऐकून

' राघवाचा वर पावलो सत्वर । जनांचा उद्धार करावया ।।'

( समर्थगाथा पान १४३ )

अशा आनंदाने समर्थ केदार, हरिद्वार, गोकुळ, वृंदावन, अयोध्येस जाऊन काशीस आले. तेथे बरेच वास्तव्य केले. हनुमान घाटावर मारूतीचे मंदिर बांधून उपासना सुरू केली. आतापर्यंत त्यांनी जी देशस्थिती पाहिली त्यामुळे त्यांचे अंतःकरण हेलावले. त्यातूनच ' अस्मानी सुलतानी ', ' परचक्रनिरूपण ' ही काव्ये प्रगटली

तीर्थक्षेत्रे मोडली । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ।।

---

**पणी (स्वप्नात नव्हे) श्रेष्ठांनी नाकारलेला तोच तेरा अक्षरी राममंत्र दिला असे म्हटले आहे. म्हणजे हे दोन प्रसग अगदा भिन्न आहेत. विद्वानांनी अत्यंत विश्वसनीय मानलेल्या वाकेनिशी टिपणाप्रमाणे व बखरीप्रमाणेही समर्थांचे वडील समर्थांच्या वयाच्या सातव्या वर्षी निवर्तले व समर्थांना आठव्या वर्षी अनुग्रह झाला असेच मानणे योग्य आहे. स्वानुभवदिनकरातील प्रसगही एकंदर तत्कालिन परिस्थिती विचारात घेता व पुढे समर्थांनी केलेले कार्य विचारात घेता घडला असला पाहिजे असे मला वाटते. परंतु त्यानुसार समर्थांचे वयाच्या अकराव्या वर्षांपर्यंत सूर्याजीपंत हयात होते असे दिसते व वाकेनिशी प्रकरणानुसार 'ते सातवे वर्षी गेले ' या विधानाशी विसंगती निर्माण होते. तेव्हा या संबंधात अधिक संशोधन होणे जरूर आहे,**

अशा स्थितीत देशाचे भवितव्य सुधारण्यासाठी काय घडामोडी होणे आवश्यक आहे याचे विचार त्यांचे मनात घोळू लागले. त्यासाठी काय काय प्रयत्न करायचे ते त्यांनी ठरविले. हे त्यांचे जीवनस्वप्न 'आनंदवनभूवनी' या काव्यात शब्दरूप पावले. हिंदुस्थान बलिष्ट व्हावा म्हणजे स्वतंत्र व्हावा, पापी औरंग्या बुडावा, म्लेंच्छसंहार व्हावा, मोडलेली क्षेत्रे पुन्हा मांडली जावीत, तेथे 'स्नानसंध्या करावया', 'उदंड पाणी' व्हावे हे या जीवनस्वप्नाचे मुख्य सूत्र होते. हे ध्येय उराशी बाळगूनच समर्थ उत्तर, दक्षिणेकडील सर्व महत्वाची क्षेत्रे फिरून, तेथे आपले शिष्य ठेवून जांब येथे मातृतीर्थाच्या– आईच्या दर्शनास आले. आद्य शंकराचार्यांप्रमाणेच त्यांची ही पदयात्रा झाली, हे लक्षात ठेवले पाहिजे.

चोवीस वर्षे आपल्या प्रिय पुत्राची वाट पहाणारी ती माता राणूबाई रडून रडून डोळे बिघडल्यामुळे अंध झाली होती. नारायण आला या आनंदाने व त्याला पहाण्याच्या तीव्र इच्छेने तिची दृष्टी परत आली. (नारायणाने तिची दृष्टी परत दिली, म्हणतात.) माय लेकरांची भेट झाली. समर्थांनी काही काळ तेथे राहून मातेस रामायण व भागवत सांगितले व तिचा उद्धार केला.

**समाजसेवा व समाजप्रबोधन :**

कृतकृत्य झालेल्या मातेचा आशीर्वाद घेऊन आपल्या संकल्पित कार्यासाठी ते कृष्णातीरी इ. स. १६४४ साली वास्तव्य करून राहिले; व पुढील सर्व आयुष्य त्यांनी समाजाला घडविण्यात क्षणाक्षणाने व कणाकणाने झिजविले. अस्मानी सुलतानी अशा दोन्ही संकटांनी तत्कालीन प्रजा संत्रस्त झाली होतीच; पण अशी वाईट परिस्थिती यायला रामदासांच्या मते तत्कालीन समाजही जबाबदार होता.

'विप्री सांडिला आचार । क्षेत्री सांडिला विचार ।
नीतिमर्यादा उडाली । भक्ती देवाची बुडाली ।
नाही ज्ञानाचा विचार । केला अज्ञाने संचार ।।'

याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, 'रामदासांनी तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत अविद्येची ही लक्षणे असे म्हटले आहे. आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा इतका जीवनव्यापी तपशीलवार अभिप्राय इतर कोणाही भारतीय अध्यात्मवाद्याने समर्थांपूर्वी काढला नव्हता.' (महाराष्ट्र धर्माचे प्रणेते, पान ७८).

समर्थांनी समाजाची नाडी ओळखली. सुमारे तीन शतकाच्या पारतंत्र्यामुळे समाज अगतिक, चैतन्यहीन, दीनदुबळा झाला होता. समर्थांनी आपल्या धीरगंभीर वाणीने महाराष्ट्राला जागे केले, हलवले. लोकांमध्ये अस्मिता, सामर्थ्य व स्वातंत्र्याकांक्षा निर्माण केली. मुसलमानांच्या भीतीने डोहात बुडविलेल्या

मूर्ती त्यांनी बाहेर काढल्या व त्यांची पुनर्स्थापना केली. मसूरला मारुतीची स्थापना करून चाफळला श्रीराममंदिर उभारले, व देवांचे उत्सव थाटात सुरू केले. 'देवविषयक वर्तनाचे स्वातंत्र्य संपादन करण्याचा कित्ता समर्थांनी घालून दिला. इस्लामविरुद्ध ही एक प्रकारची चढाईच त्यांनी केली, आव्हान दिले. परकीयांच्या जुलूमापेक्षा स्वकीयांची देवधर्मविषयक अनास्था अधिक घातक आहे, हे ओळखून त्यांनी लोकात देवधर्माच्या जयजयकाराचे नवीन युग सुरू केले.' अशा शब्दात प्रा. न. र. फाटक यांनी 'रामदास– वाङ्मय आणि कार्य' या ग्रथांत समर्थांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन केलें आहे. (पाने ७ व ८) 'मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा॥' असे समर्थांनी लोकांना आवाहन केले. महाराष्ट्रधर्माला म्हणजेच हिन्दूधर्माला मानणाऱ्यांची संघटना त्यांनी आरंभिली.

राज्यक्रांतीशिवाय समाजक्रांती यशस्वी होत नाही. धर्मसंरक्षणासाठी स्वराज्य हवेच अशी खूणगाठ समर्थांनी आपल्या मनाशी बांधली होती. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचे हे कार्य आरंभिलेले पाहून त्यांना आनद झाला. त्यांच्या या प्रयत्नाला समाजाची साथ मिळावी म्हणून समाजशिक्षणास व संघटनेस समर्थांनी प्रारंभ केला, हेच त्यांचे राजकारण. त्यानी राष्ट्राचा प्रपंच हौशीने केला. लोकाना शिक्षण देण्यासाठी त्यानी विचारपूर्वक नवीन संप्रदाय सुरु केला. कारण राजकारण व समाजकारण हातात हात घालून चालले तरच राष्ट्रीय पुनरुत्थान होऊ शकते, हे जाणून त्यांनी वर्णजातिनिरपेक्ष अखिल महाराष्ट्रीयांना असे आवाहन केले–

देव मस्तकी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा॥
मुलुख बडवावा की बुडवावा। धर्मस्थापनेकारणे॥

स्पृश्य–अस्पृश्य, गरीब–श्रीमंत, मालक–मजूर, सज्ञान–अज्ञान, स्त्री–पुरुष असा कोणताही भेद न ठेवता हिन्दुमात्राला स्वातंत्र्यासाठी संघटीत होण्याचा आदेश दिला व शिवराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी तयार केली. 'हिंदुस्थान बळावल' असे स्वप्न उराशी बाळगून महाराष्ट्रापुरते का होईना, पण संपूर्ण समाजाला एकत्र येण्याची प्रेरणा देणारे व योग्य मार्गदर्शन करून संघटना करणारे भारतवर्षातले पहिले राष्ट्रसंत समर्थच होत. त्याना 'ते ब्राह्मण क्षत्रियांचे प्रतिनिधी होते; त्यांची सामाजिक विचारसरणी प्रतिगामी होती,'* असे म्हटले जाते, ते किती फोल आहे हे यावरुन स्पष्ट होते. जातिभेदाने व उच्चनीचत्वाच्या भावनेने

---

*'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति' पाने ११६,११८; ले. प्रा. गं. बा. सरदार. महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशन, पुणे. आवृत्ती तिसरी : १९७०

विस्कळीत झालेल्या समाजात त्यानी एकत्वाची भावना निर्माण केली व संघटित जनशक्ती राष्ट्रकार्यार्थ उभी केली हे त्यांचे मोठेच प्रशंसनीय कार्य होय. समाज एकत्र आणण्यासाठी– समुदाय करण्यासाठी संस्था हवी, त्यासाठी जागा, काही नियमबद्ध विचारप्रणाली हवी. समर्थांनी देवबंधविमोचक श्रीरामांचा आदर्श पुढे ठेवला. धर्मस्थापना करून, प्रजेला रामराज्याचे सुख देणाऱ्या, तेजस्वी, क्षत्रियोत्तम धनुर्धारी सिंहासनाधिष्ठित श्री सीतारामांना त्यांनी मुख्य आराध्य दैवत मानले. त्याचा परम–सेवक हनुमान व रामवरदायिनी माता तुळजाभवानी यांची उपास्यदैवते म्हणून निवड केली. आपल्या उत्कृष्ट कीर्तनाद्वारे श्रीरामाचे आदर्श जीवन आणि असुरसंहाराचे व धर्मसंस्थापनेचे कार्य त्यांनी लोकापुढे नव्याने मांडले. त्यासाठी रामायणाची दोन कांडे–युद्धकांड व सुंदरकांड लिहिली. मारुतीच्या पराक्रमाचेही रसभरित वर्णन केले. ' सेविला देव देवांचा । तेणे मी धन्य जाहलो ।' असा स्वानुभव सांगितला. सर्व देवांना रावणाच्या बंदिखान्यातून सोडविणाऱ्या रामांना ते समर्थ म्हणत. ' समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ?।।' असा त्यानी सवाल टाकला व आश्वासन दिले की ' अनन्यास रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।' समर्थांनी रामाचा व रामोपासनेचा मोठा आधार लोकांना मिळवून दिला व अभय दिले. नवचैतन्य निर्माण केले. ' जय जय रघुवीर समर्थ ' या घोषणेने त्यानी लोकामध्ये आशादीप प्रगट केला. पण, नुसत्या भक्तीने भागणार नाही, त्याबरोबर शक्तीही पाहिजे म्हणून मारुतीची व देवीची उपासना दिली. अनेक मठमंदिरांची व आखाड्यांची स्थापना केली. शक्तीची उपासना सुरू केली. भक्तीला शक्तीची व प्रयत्नवादाची जोड हे समर्थांचे उठून दिसणारे वैशिष्ट्यच आहे. प्रारब्धवाद कसा खोटा आहे हे दाखवून ' यत्न तो देव जाणावा;' केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे ' असा प्रयत्नवाद त्यांनी लोकांपुढे हिरीरीनें मांडला.

### प्रयत्नवादाचा पुरस्कार

प्रयत्नवाद व प्रारब्धवाद यासंबंधी दासबोधात निरनिराळ्या ठिकाणी समर्थांनी विवेचन केले आहे. शिवाय त्यांची जी तेरा शते आहेत त्यापैकी अकराव्या व बाराव्या शतात प्रारब्ध श्रेष्ठ की प्रयत्न श्रेष्ठ या वादाची शंका–समाधानाच्या स्वरूपात सुंदर चर्चा केली आहे व शेवटी प्रयत्नाचे बाजूने निर्णय दिला आहे. समर्थांच्या उपदेशाचे हे वैशिष्ठ्य सर्वकाळी मार्गदर्शक ठरेल असेच आहे. म्हणून ते पाहूया.

प्रश्न : जगामध्ये काही माणसे यशस्वी व सुखी आणि काही माणसे अयशस्वी व दुःखी असतात, असे का ?

प्रारब्धवादी : सुखदुःखे ही प्रारब्धानुसार (मागील जन्मातील पापपुण्या-

नुसार) प्राप्त होतात.

प्रयत्नवादी : सुखदु:खांचा प्रारब्धाशी संबंध नाही. अचूक व पूर्ण यत्न केल्यास यश व सुख, आणि चुकीचा व अपुरा यत्न केल्यास अपयश व दु:ख मिळते.

'अचूक यत्न करवेना । म्हणोन केले ते सजेना ।।'

परंतु आपल्या दु:खासाठी आपला आळस व चुकीचा प्रयत्न कारणीभूत आहे हे लोक मान्य करायला तयार नसतात. अपयशाची सारी जबाबदारी ते 'प्रारब्धावरी घालती ।' अशा 'करंटयांना' समर्थ सांगतात : 'आलस्य अवघाचि दवडावा । येत्न उदंडची करावा ।।' (दासबोध १२–१०–११). कारण

'व्याप आटोप करिती । धकेचपेटे सोसिती ।
तेणे प्राणी सदेव होती । देखत देखता ।। (दास. १५–७–३)

याप्रमाणे जे वागतात तेच 'भाग्यपुरुष' होतात.

प्रारब्धवादी : जन्मत: कपाळावर ब्रह्मदेवाने प्रारब्धरेखा आखलेली असते. तिच्याप्रमाणेच सर्व होते. प्रयत्नांचा काही उपयोग नाही.

प्रेत्न करिता फळेना । होणार टळेना काही केल्या ।।'
(ओव्या शतक १२ वे)

प्रयत्नवादी : 'रेखा तितुकी पुसोन जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येते ।
डोळे झाकणी करावी ते । कायेनिमित्य ।।' (दास. १५–६–९).

पाटीवर काढलेली रेघ आपण पुसून टाकू शकतो, हा आपला प्रत्यक्ष अनुभव आहे. तशीच प्रारब्धरेखाही प्रयत्नांनी पुसून टाकता येते. 'आहे यत्न । कर्म तोडावया लागी ।।' (शतक १२). 'होत नाही प्रेत्ने ऐसे काय आहे ?' (श. १२).

प्रारब्धवादी : माणसाच्या हातून कोणते व कसे प्रयत्न होतील हे त्याच्या प्रारब्धावर अवलंबून आहे. प्रारब्धकर्माची चांगली वाईट फळे या जन्मात भोगायची असल्यामुळे मनुष्याला त्यानुसारच कर्म (प्रयत्न) करण्याची बुद्धी होते. म्हणून 'बुद्धि: कर्मानुसारिणी.' मनुष्याचे सर्व आयुष्य, त्याचे क्रियमाण कर्मही प्रारब्धाने बद्ध आहे. त्याला काही कर्मस्वातंत्र्य नाही.

प्रयत्नवादी : प्रारब्धात नसेल तर कसा प्रयत्न करायचा ते समजणारच नाही हे म्हणणे बरोबर नाही. यत्न कोणता व कशाप्रकारे करावा हे न समजण्याचे कारण शारीरिक व बौद्धिक आळस हे आहे. अचूक यत्नासाठी आळस टाकून एकांतात विचार व विवेकाची कास धरली पाहिजे. मनुष्याचा आत्मा स्वतंत्र आहे. या आत्म्याच्या प्रेरणेने जर तो सत्कर्म करील तर प्रारब्धकर्मही बदलू शकेल. प्रारब्धामुळे एखाद्या कार्यात सुरवातीस अपयश आले तरी पुन:पुन्हा प्रयत्न करीत राहिल्यास प्रारब्ध संपते व क्रियमाण कर्माद्वारे मनुष्यास यश मिळू शकते. मनुष्य

जर प्रयत्नाने ' याचि देही याचि डोळा ' मुक्त होऊ शकतो, तर तो प्रारब्धकर्माने बद्ध आहे, त्याला स्वातंत्र्य नाही असे कसे म्हणता येईल ? ईश्वरस्मरणपूर्वक अहंकार न बाळगता सत्कर्मे करीत राहिल्याने मनुष्याला जर परमार्थात यश मिळते, तर प्रपंचात का मिळणार नाही ?

प्रारब्धवादी : ' फलश्रुति कैंची पूर्वदत्तावीण ? । वाउगाचि शीण होत असे ।' (शतक १२). प्रयत्नांना पूर्वपुण्याईवाचून फळ मिळत नाहीं, मग उगाच प्रयत्न करण्याचा शीण का करावा ?

प्रयत्नवादी : काहीच केले नाही तर काहीच फळ मिळणार नाही. ' लहान थोर काम काही, केल्या वेगळे होत नाही ।' (दास. १२-९-६). ' सर्व काही प्रेत्न केलियाने होते । आळशी पडतो सावकाश ।'

प्रारब्धवादी : ' सावकाश जरी आळशी पडिला । होणार ते त्याला होत आहे ।

प्रयत्नवादी : होत आहे परी प्रेत्नेवीण नसे । केल्यावीण कैसे भोग होती ।

प्रारब्धवादी : भोग हे होताती पाठी लागताती । यत्नेवीण होती अकस्मात ।

प्रयत्नवादी : अकस्मात तरी प्रेत्नीच भोगील । आळशी पडेल सावकाश ।

प्रारब्धवादी : सावकाश पडे तेथेचि होईल । होणारे होईल पूर्वदत्ते ।

प्रयत्नवादी : पूर्वदत्त केले प्रेतन करोनीया । वाउगेचि वाया बोलतोसी ।
निश्चयेसी आता होणार म्हणसी । काहीच येत्नासी करू नको ।

प्रारब्धवादी– करू नको ऐसे वेर्थचि उत्तर । पूर्वीच होणार होऊनि गेले ।' (शतक १२).

प्रयत्नवादी– काही न करता स्वस्थ बसणे हे माणसास केवळ अशक्य आहे. ' काही तरी केले पाहिजे संसारी । काहीच न करी ऐसा कोण ।' (श. १२). ' होत नाही जरी का यत्न करिसी । खातो जेवितोसि कासयासि ।' (श. १२).

समर्थ म्हणतात– प्रपंच असो की परमार्थ, त्यातील यश हे केवळ प्रयत्नांनीच मिळवता येते; प्रारब्धाने नाही. प्रयत्न फक्त प्रपंचात करावा व परमार्थासाठी प्रारब्धावर अवलंबून राहावे अशी वृत्ती चुकीची आहे.

प्रारब्धाचा आधार घेण्यापेक्षा माणसाने देवाचा आधार घ्यावा असे समर्थ सांगतात. प्रयत्नाला देवभक्तीची जोड द्यावी. प्रयत्न अचूक व खूप करावा... ' परतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे.' भक्तांना देव सहाय करतो; दैव नाही. ' देवचि उपाय भक्तजना ।' (श. १२). भक्तजनांचे रक्षण करणारा देव ज्यांचा कैपक्षी नाही, त्यांच्याकडून यत्न होत नाही. देवभक्तीमुळे पापी मनुष्यही पुण्यकर्म करू लागतो.

प्रयत्नवाद व प्रारब्धवाद हे दोन्ही पक्ष आपल्यापरी कसे सबळ आहेत ते

समर्थांनी उत्तमप्रकारे दाखविले आहे. यात श्रेष्ठ कोण याचा निवाडा करताना समर्थांनी जो युक्तिवाद केला आहे, तो विचारार्ह आहे. समर्थ म्हणतात : प्रयत्न व प्रारब्ध यात आधी काय निर्माण झाले ? व्यक्तीचा विचार केला तर तिचे प्रारब्ध हे आधी म्हणजे पूर्वजन्मामध्ये प्रयत्नपूर्वक कर्म केल्यानेच (पूर्वदत्त) निर्माण झाले आहे. म्हणजे आधी प्रयत्न (कर्म) व मग फळ (प्रारब्ध) असा क्रम आहे. प्रयत्नाने प्रारब्ध निर्माण होते, प्रारब्धाने प्रयत्न नाही. समर्थ सवाल करतात, तुमच्या कपाळावर विधीनें रेषा लिहिली म्हणता, मग

' तेव्हा विधि कोणे स्थळी उभा होता । कशाने लिहिता होय तेथे ।'
(शतक १२)

हे तुम्हाला ठाऊक आहे का ? प्रारब्ध किंवा दैव हे तुम्हीच तुमच्या हाताने लिहिलेले आहे, विधीने नव्हे. म्हणून प्रयत्न श्रेष्ठ आहे.

पुढे समर्थ म्हणतात, आता सबंध सृष्टीचा विचार केला तरी आपल्याला काय दिसते ?

' थोर मूळमाया निराकारी झाली । प्रारब्धची वोळी (रेषा) तेथे नाही ।
जीवसृष्टी झाली उत्पत्तिसंहार । प्रारब्धविचार ऐलीकडे ।
ऐलीकडे कर्म मूळीचा तो प्रेत्न । श्रोती सावधान धिवरावे ।।' (श. १२)

आधी सृष्टयुत्पत्तीचा आदिसंकल्प म्हणजे प्रयत्न झाला व नंतरच सर्व सृष्टी निर्माण झाली. ' आधी जे निर्माण । तेचि थोर ।' (श. १२). म्हणून प्रयत्न श्रेष्ठ आहे. हा जो युक्तिवाद समर्थांनी केला आहे, तो नवीन व चिंतनीय आहे. नेपोलियनप्रमाणेच ' अशक्य ' हा शब्द समर्थांचे कोषात नाही. त्यांचे चरित्र प्रयत्नवादाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

आजच्या विज्ञानयुगातही केवळ वृद्धच नव्हे तर तरुणवर्गही प्रारब्धवादी व म्हणून निराशावादी आहे. त्यांच्यात आशावाद निर्माण करण्यासाठी समर्थांनी दिलेली प्रयत्नवादाची शिकवण व प्रत्यक्ष आचरण आजही अत्यंत उपयुक्त आहे. भविष्यकाळातील प्रारब्धवाद्यानाही प्रयत्नवादी करील, प्रत्यक्ष आळसालाही कामाला लावील अशी ही शिकवण देऊन समर्थांनी जगावर थोर उपकार केले आहेत. अशा या प्रयत्नवादाला समर्थांनी आपल्या चतु:सूत्रीत ' पहिले ते हरिकथानिरूपण... चवथा अत्यंत साक्षेप ' अशा शब्दात महत्वाचे स्थान दिले आहे व त्याला शक्तिवादाची जोड दिली आहे. कारण यत्न सफल होण्यास शक्तीची व युक्तीचीही आवश्यकता आहे.

**शक्तिवादाचा पुरस्कार :**

समर्थ आवर्जून सांगतात :

' शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने यत्न होतसे ।

शक्ती युक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत धावती ।। (समर्थ कविता ४३६)
त्यासाठी शारीरिक व बौद्धिक शक्तींचा समन्वय ज्याच्या ठिकाणी आहे अशा हनुमंताची उपासना त्यांनी ठिकठिकाणी सुरू केली.

'म्लेंछ दुर्जन उदंड । बहुता दिवसांचे माजले बंड ।
याकारणे अखंड । सावधान असावे ।।' (दास. १८.६.१२).

असा त्यांनी सर्वांना इशारा दिला. 'क्षात्रधर्म' प्रकरणात क्षत्रियांना त्यांनी वाणीने सांगितले :-

'मारिता मारिता मरावे । तेणे गतीस पावावे ।'
'देवद्रोही तितुके कुत्ते । मारून घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । येदर्थी संदेह नाही ।।'

अशा तऱ्हेने त्यानी धर्मस्थापनेसाठी लोकाना लढण्यास प्रवृत्त केले.

शिवाजी महाराजांनाही त्यानी परमार्थनिष्ठा सांभाळून स्वराज्यस्थापना व धर्मस्थापना करावी असा आदेश दिला. त्याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, 'शिवाजीला राज्यस्थापनेचे विशाल वैचारिक अधिष्ठान केवळ स्वामी समर्थांनीच दिले. मानवी आदर्शाचे, समाजरचनेचे व राज्याचे इतके गंभीर, अध्यात्मवादी तत्त्वज्ञान महाभारतानंतर दासबोधातच मिळते ... समर्थांना राजगुरू, शिवाजीचे राजकारणाचे गुरू असे म्हणणे सार्थ ठरते.' (महाराष्ट्र धर्माचे प्रणेते, पान ८७). इतके करूनच समर्थ थांबले नाहीत, तर त्यांनी प्रत्यक्ष तुळजाभवानीलाही प्रार्थना केली कीं :

'तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हाचि देखता ।'

तू मागे रामास वर देऊन रावणास मारविलेस म्हणतात; तसेच आता काही 'मूळ सामर्थ्य दाखव.'

**स्त्रियांकडे पाहण्याचा यथार्थ व आदर्श दृष्टीकोण :**

समाज समर्थांसारख्या प्रभावी नेत्याची वाट पहातच होता. अनेक स्त्रीपुरुष समर्थांना शरण आले. समर्थांनी त्यांना अनुग्रह देऊन शिष्य करून घेतले, पारखून कार्याला लावले. विशेष म्हणजे समर्थांनी स्त्रियांनाही संप्रदायात घेतले व त्यांच्या सर्वांगीण उन्नतीला वाव दिला, सहाय्य केले :

'पुरुषांचा जीव स्त्रियांची जीवी । ऐसी नाही उठाठेवी ।।
(दास. १६.८.२५).

अशा परखड शब्दात आत्मतत्वाचे दृष्टीने स्त्रीपुरुष समानच आहेत असे त्यानी आवर्जून सांगितले आहे. स्त्रियापैकी प्रमुख सतीबाई शहापूरकर, वेणूबाई, आक्का, अंबिकाबाई या होत्या. वेणूबाई व अंबिकाबाई यांना त्यांनी मठपती व महंत

केले. पुरूषांचे बरोबरीने स्थान दिले. वेणूबाई तर उत्कृष्ट कीर्तन करीत. शिष्यांना दीक्षा देत व काव्येही रचीत. आक्कांनी सज्जनगड व चाफळ या दोन्ही मठांचा कारभार समर्थांच्या हयातीत व पश्चातही चोख ठेवला होता. 'समर्थप्रताप'कार गिरिधरस्वामी हे वेणूबाईंची शिष्या बाइयाबाई यांचे शिष्य. तीनशे वर्षापूर्वीच्या काळात व मुसलमानी अंमलांतही समर्थांनी स्त्रीमुक्तीचे केलेले हे कार्य क्रांतिकारकच म्हटले पाहिजे. अशा कर्तबगार स्त्रिया निर्माण करीत असताना त्याबद्दल लोकापवादही समर्थांना सहन करावे लागले. पण ते त्यांच्या धगधगीत वैराग्याग्नीत पडण्यापूर्वीच सुकून गेले. इतकेच नव्हे तर स्त्रीनिंदकांची त्यांनीं पुढीलप्रमाणे निर्भत्सना केली.

'बहूता दिसांच्या वयोवृद्ध मूला । जनी बायकोच्या गुणे जन्म तूला ।
तये जननीच्या कुळा निंदितोसी । वृथा पुष्ट तू मानवामाजी होसी'।।१।।
'जनी पाळिती सर्व नारी नराला । तया निंदिती शुद्धि नाही खराला'।।५।।
(समर्थ ग्रंथ भांडार – उतरार्ध पान ४६४)

स्त्री ही पुरूषाची जन्मदात्री, संगोपन संवर्धन करणारी, संस्कारदात्री, संरक्षक असते; असे असता स्त्रीजातीबद्दल अनुदार दृष्टीकोण ठेवणाऱ्यांच्या डोळ्यात समर्थांनी झणझणीत अंजन घातले आहे. पुरूषाला विरक्ती यावी म्हणून स्त्रीदेहाची निंदा करण्याची प्रथा समर्थपूर्व सर्व पुरुषसंतांच्याही वाङमयात होती. रामदासांना ते पसंत नव्हते. त्याची प्रतिक्रिया इथे व्यक्त झाली आहे. समर्थांच्या एवढ्या अफाट वाङमयात 'वाचकांच्या मनात शृंगाराचा एकादाही तरंग उठेल असे एकसुद्धा वाक्य नाही,' असे प्रा. न. र. फाटक यांनी कबूल केले आहे (रामदास : वाङमय आणि कार्य, पान १४ आवृत्ती दुसरी). त्यांच्या जीवनाप्रमाणे वाणी व लेखणीनेही धगधगीत वैराग्य धारण केले होते. समर्थांचा हा आदर्श सर्व साहित्यिकांनी पुढे ठेवला तरच साहित्यक्षेत्रातील अश्लीलता नाहीशी होऊ शकेल. याप्रमाणे समर्थांनी पुरूषवर्गाला वठणीवर आणले आहे; त्याबद्दल स्त्रीवर्ग त्यांचा सदैव ऋणी राहील.

तीनशे वर्षापूर्वी स्त्रिया पळविल्या जात. भ्रष्ट केल्या जात. तेव्हा दुष्ट मुसलमानी सत्ता तरी होती. पण आजच्या स्वातंत्र्याच्या व लोकशाहीच्या काळात तरी स्त्री सुरक्षित आहे काय ? स्त्रियांची निंदानालस्ती, फसवणूक, त्यांच्यावर अत्याचार, त्यांचा व्यापार इत्यादि अनेक निंद्य प्रकार चालूच आहेत. समर्थांनंतरही पंजाबात राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती व आर्यसमाज, गुजरातेत दलपतराय, लक्ष्मीशंकर व उमियाशंकर, आणि महाराष्ट्रात लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, म. गो. रानडे, पंडित रमाबाई, आगरकर, फुले पतिपत्नी, महर्षी कर्वे, गो. कृ.

देवधर यांनी स्त्रियासाठी कार्य केले. शिवाय ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू, विमेन्स इंडियन असोसिएशन, अखिल भारतीय महिला परिषद, लक्ष्मीबाई केळकर व त्यांनी स्थापना केलेली राष्ट्रसेविका समिती या व्यक्तींनी व संस्थांनी स्त्रीमुक्तीचे अनेक उपाय योजिले. महात्मा गांधीनी तर स्त्रियांना उत्तेजन देऊन, गौरव करून, प्रत्यक्ष राजकारणातही भाग घेण्याची संधी दिली. 'चले जाव' चळवळीत गुजराती स्त्रिया बहुसंख्येने तुरुंगात गेल्या. अशा तऱ्हेचे प्रयत्न होऊनही, कायद्याने स्त्रीला समानता मिळूनही, प्रत्यक्षात मात्र स्त्रियांच्या परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली दिसत नाही. कुत्र्याचे शेपूट वाकडेच राहते; त्याप्रमाणे रावणापासून आजतागायत दुष्ट पुरुषांचा स्त्रियांबद्दलचा दृष्टीकोण तसाच आहे, याचा विषाद वाटतो. स्त्रीचे हे नष्टचर्य कधी संपणार? शिक्षणासारख्या सुधारणा केवळ मोजक्याच स्त्रियापर्यंत पोहोचल्या आहेत. सुधारलेल्या जगातही बहुसंख्य स्त्रीवर्ग अजून अज्ञानातच खितपत पडला आहे. 'देवदासी'च्या सोज्वळ नावाखाली वेश्याव्यवसाय हरिजन स्त्रियांवर बलात्कार, बायकोने कष्ट करून संसारासाठी मिळविलेला पैसा दारुसाठी वापरून वर तिला मारहाण करणे, असे अनेक प्रकार अजूनही चालू आहेत. पुष्कळशा स्त्रियांना आपण दास्यात आहोत याची जाणीवच नाही. काहीना जाणीव आहे, परंतु 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या न्यायाने दास्यातच आपले कल्याण आहे असे त्यांना वाटते. ज्या दास्यमुक्तीसाठी झटू इच्छितात, त्यांच्यात संघटनेचा व शक्तीचा अभाव आहे. अशी सारी अवस्था आहे. केवळ अशिक्षितच नव्हे तर सुशिक्षित व नोकरी करणाऱ्या स्त्रियाही समाजात निर्भय, सुरक्षित व स्वतंत्र नाहीत. आजच्या स्त्रीवर्गाची दुःखेही समर्थकालीन स्त्रीवर्गाच्या दुःखाहून कांही कमी नाहीत. तेव्हा त्या काळात समर्थांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी जे प्रत्यक्ष कार्य केले तशा कार्याची व उपदेशाची जगाला आजही व नेहमीच भविष्यकाळातही अत्यंत आवश्यकता आहे, हे कोण नाकारेल?

**प्रपंच परमार्थ संमीलन**

आत्मज्ञान, परमार्थ संपादन करणे हे मानवाचे मुख्य ध्येय होय असे सर्वच संत सांगतात. समर्थांनीही असेच सांगितले आहे की, ज्याला परमार्थ याच देही येणेचि काळे पूर्ण साध्य करायचा आहे त्याने विवेकवैराग्यपूर्वक प्रपंचाचा सर्वस्वी त्याग करावा. 'उठोनि वाटेचि लागावे। दिगंताप्रती।' पण ज्याला हे शक्य नसेल त्याने प्रपंचाची मिठी हळुहळू सोडवीत परमार्थ करावा व जन्माचे सार्थक करावे. समाजात गृहस्थाश्रमी, प्रापंचिक लोकच अधिक असतात व नेहमीच असणार. प्रंपच व परमार्थ यात विरोध आहे, एकावेळी काहीतरी एकच होऊ शकेल अशी सामान्यतः लोकांची समजूत

असते. त्यामुळे प्रापंचिकाना मोक्ष अप्राप्य वाटत राहतो. समर्थांनी या विचाराला जबरदस्त कलाटणी दिली. प्रापंचिकांना त्यांनी संदेश दिला की :

संसारा आलियाचे सार्थक । जेथे नित्यानित्य विवेक ।
येहलोक परलोक । दोन्ही साधिले ।। (दास. १७-१-२१)

प्रपंच व परमार्थ यातील यश परस्परावलंबी आहे हे रामदासांनी ओळखले होते; म्हणून त्यांनी सांगितले –

'प्रपंच सोडून परमार्थ कराल । तेणे तुम्ही कष्टी व्हाल ।
प्रपंची परमार्थ चालवाल । तरीच तुम्ही विवेकी ।।'
: (दास. १२-१-२)

सामान्यत: बहुतांशी लोक प्रपंचासक्त असतात; प्रपंच एके प्रपंच करीत राहतात. काही थोडे प्रपंची लोक प्रपंचाकडे पूर्ण दुर्लक्ष करून, फक्त परमार्थसाधनाच करतात. त्यांना समर्थ सांगतात–

शरीरयात्रापि च ते न प्रसिद्धयेदकर्मण: (गीता ३-८)

या गीतावचनानुसार समर्थ सांगतात–

प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंटयाला । परमार्थ कैचा ।। (दास. १२-१-३)

उलट– परमार्थ टाकून प्रंपच करिसी । तरी तू यमयातना भोगिसी ।
अंती परमकष्टी होसी । येमयातना भोगता ।। ( दास. १२-१-४)

कारण ज्याने जन्माला घातले त्या परमेश्वराची आठवण न ठेवशील, तर साहेब ज्याप्रमाणे गैरहजर सेवकाला शिक्षा करतो त्याप्रमाणे तुला यमयातन' भोगाव्या लागतील. म्हणून

'प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंची जे अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।। (दास. १२-१-९)
म्हणोनि सावधपणे । प्रपंच परमार्थ चालवणे ।
ऐसे न करता भोगणे । नाना दु:खे ।। ( दास. १२-१-१० )

ऐहिक जीवन स्वप्न नसून वास्तविक आहे; ते जलतरंगवत् क्षणभंगूर असले तरी मृगजल नव्हे. म्हणून ते यशस्वी करण्यासाठी आजीवन प्रयत्नवादाचा समर्थांनी आग्रह धरला आहे. प्रपंचाची ही तात्विक बैठकही महत्वाची आहे. म्हणून ते सांगतात–

'प्रपंच मुळीच नासका । विवेक करावा नेटका ।
नेटका करता फिका । होत जातो ।।'

प्रपंच हा मुळातच नाश पावणारा, असार आहे; पण नित्यानित्य विवेकाने तो सारवान् करावा; अचूक प्रयत्न, सावधानता, दीर्घसूचना यानी तो नेटका करता येतो. स्फुट ५२ मध्ये समर्थ म्हणतात– सत्य, सन्मार्ग, न्यायनीतीने वागणे, उदासवृत्ती, परांतर राखणे, अध्यात्म शोधणे, नित्यानित्यविवेक, भूतदया, हरिकथानिरूपण, नवविधा भक्तीच्या मार्गाने जाऊन मुक्त होणे, या मार्गाने संसार धन्य होतो. परमार्थ प्राप्तीचे साधन म्हणून प्रपंच करण हाच खरा विवेक होय. प्रपंच करावयाचा तर तो रडका, दरिद्री नसावा. चांगला, वैभवाचा, सुखाचा असावा.

प्रपंची पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचीकरण ।
महावाक्याचे वितरण । करिता सुटे ।। (दास. १२–३–२९).

त्यासाठी प्रयत्न पाहिजे.

साक्षेप करिता कष्टती । परंतु पुढे सुरवाडती ।
खाती, जेविती सुखी होती । यत्ने करूनी ।। (दास. ११–३–११)

परंतु तेवढ्यानेही भागणार नाही. समर्थ म्हणतात–

प्रपंची ते भाग्य । परमार्थी वैराग्य ।

ही दोन्ही एकाच वेळी हवीत. ' अन्तस्त्यागी बहिस्संगी लोके विचर राघव ' असा वसिष्टगुरूनी श्रीरामांना जो उपदेश केला आहे, त्याप्रमाणे वागणे हे ज्याला साधेल व जो पंचीकरण, महावाक्य इत्यादि तत्त्वज्ञानाचे चिंतन करील तोच भवचक्रातून सुटेल. समर्थांच्या या प्रपंच–परमार्थ संमीलनाच्या तत्त्वज्ञानाला ईशावास्य उपनिषदात आधार सापडतो :

अन्धं तम: प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रता: ।।९।।

जे केवळ अविद्येचीच उपासना करतात, ते घोर अंध:कारात जातात व जे केवळ विद्येची उपासना करतात, ते अधिक घोर अंधारात जातात.

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ।।११।।

अविद्या म्हणजे लौकिक प्रपंच यशस्वी करण्याचे ज्ञान (विज्ञान), त्यानें मृत्यू तरता येईल. म्हणजे इहलोकीचे जीवन यशस्वी होईल; आणि विद्या म्हणजे आत्मविद्या (ज्ञान), ती प्राप्त केल्याने अमृतत्व प्राप्त होईल. म्हणजे जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होईल. मात्र दोन्ही फळे त्यांच्या समन्वयावस्थेतच प्राप्त होऊ शकतील.

या श्लोकाबद्दल ब्रह्मीभूत बाबामहाराज आर्वीकर म्हणतात, ' जसे केवळ विज्ञान हे अंधतम सृष्टीकडेच मानवास नेते, तद्वतच केवळ विद्या (ज्ञान) ही तर

फारच भीतिप्रद आहे. केवळ अध्यात्मज्ञान म्हणजे माणसाचे षंढत्वच जागे करणारे दर्शन आहे... अध्यात्मविद्या जरी सर्व विश्वात श्रेष्ठ असली तरी कल्याणाचा पथ केवळ तेवढ्याने प्राप्त होत नाही. जसे सोने हे सर्व पदार्थात मूल्यवान् खरे; पण केवळ सोन्याने जीवन जगणे शक्य नाही. त्याचे मूल्य रूपांतरितच केले पाहिजे. तद्वतच अध्यात्मज्ञान विज्ञानात रूपांतरित झाले तरच याचा जीवनोत्थानासाठी उपयोग आहे. ज्ञान व विज्ञान यांच्या संयोगानेच सर्वांचे सर्वोच्च कल्याण साधेल. इत:पर केवळ त्यापैकी एक– एकामुळे तुम्ही सर्वस्वच गमावून बसाल.

सृष्टीचा, जीवनाचा व पारमार्थिक उत्थानाचा भव्योदात्त असा धर्मकायदाच या मंत्रातून सांगितला आहे.' (सांगाति : वार्षिक अंक डिसेंबर १९८१ : पान ६३ व ६४, मोक्षधाम आश्रम, माचणूर).

पुढील ओवीत समर्थांनी थोडक्यात हेंच सांगितले आहे–

संसारी असता मुक्त । तोचि जाणावा संयुक्त । (दास. १२–१–८)

अशी जीवन्मुक्तावस्था प्राप्त करून घेणे हेच खरे मानवी जीवनाचे ध्येय आहे. ते प्रपंचात राहूनही कसे साध्य करावे ते समर्थांनी प्रथमच शिकविले. तत्त्वज्ञान आणि व्यवहार याची सांगड समर्थांनी घातली. ज्याला Applied Philosophy म्हणतात, ती सांगण्याचे धैर्य करून समर्थ त्यात यशस्वी झाले आहेत. इतर संतांपेक्षा हे त्यांचे वैशिष्ट्यच आहे. त्यांचा ' दासबोध ' हा व्यावहारिक ज्ञानकोशच आहे. कै. पांगारकर म्हणतात त्याप्रमाणे तो समाजशास्त्राचाही ग्रंथ आहे. त्यात निकोप समाजजीवनाला आवश्यक असे नीतिशास्त्र तपशीलवार सांगितले असून व्यवहारधर्म, तत्त्वज्ञान, प्रयत्नवाद, मानवताधर्म यांचा सुमेळ साधला आहे. ऐहिक व पारमार्थिक दोन्ही निष्ठा सांभाळण्याचे समर्थ–संप्रदायाचे कार्य अभूतपूर्व आहे. त्यांनी ते प्रत्यक्षात करून दाखविले आहे. ' इहिक तरी न नशे । आणि मोक्षू तो उरलाचि असे ' (ज्ञाने. २–२३३) असे ज्ञानेशांनी पूर्वीच सांगितले आहे. या भागवतधर्मप्रणीत निष्कामकर्मयोगी जीवनाला इहवादाची जोड देण्याचे कार्य समर्थांनी हिरीरीने केले म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ' समर्थांनी अद्वैत तत्त्वज्ञानाला प्रवृत्ति–निवृत्तीच्या द्वंद्वातून सोडवले. प्रपंच–परमार्थ यांतील विरोध मोडून काढला. एवढेच नव्हे तर परमार्थाच्या सिंहासनावर उत्तम पुरुषाच्या प्रपंचाला मूर्धाभिषेक केला. हे अस्सल वैचारिक कार्य मध्ययुगात इतर कोणालाही इतके यशस्वीरीत्या करता आले नाही.' (महाराष्ट्र धर्माचे प्रणेते : पान ६८) मात्र समर्थांच्या समकालीन असणाऱ्या तुकाराम महाराजांच्या शिष्या संत बहेणाबाई यांनी ' प्रपंच परमार्थ चालवी समान । तिनेच गगन झेलियेले ।' (संत बहेणाबाईचा गाथा : संपादिका सौ. जावडेकर. पान क्र. २०१)

असे आपल्या जीवनानुभवातून पटलेले तत्त्वज्ञान सांगितले आहे. ' गृहस्थाश्रमी तू सुखे नांद पा रे । स्वरूपस्थितीसी बरे राहि पा रे । असे ज्ञानवैराग्य ते आंदणी रे । ते वर्म बहेणीप्रती फावले रे ।।' (तदेव पान क्र. १५७). असा त्यांनी लोकाना उपदेश केला आहे. हा त्यांचा उपदेश विसरता कामा नये.

मनुष्यमात्राचा जन्म गृहस्थाश्रमात होतो. तेथेच त्याचे पोषण, संवर्धन, संरक्षण होते. तो सर्वांचे मूळ असून ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास हे तीनही आश्रम ग्रहस्थाश्रमावर अवलवून असल्याने गृहस्थाश्रम समाजधारणेला अत्यंत आवश्यक आहे. परंतु समर्थ आवर्जून सांगतात –

' तेथे पाहिजे स्वधर्म आणि भूतदया' (दास. १४–७–४). ' गुंतल्या लोकांस उगवी,' ' हरिकथानिरूपण नेमस्तपण राजकारण' करावे, असा त्यांचा प्रापंचिकाना आदेश आहे. या त्यांच्या कामगिरीबद्दल प्रा. श्री. म. माटे यांनी जे म्हटले आहे त्याचे उत्कटपणे स्मरण होते. प्रा. माटे म्हणतात, ' रामदासाला प्रपंच विज्ञान शिकवायचे होते ते त्याने मोठ्या साक्षेपाने मेहनतीने शिकविले. मानवी मनाचा इतका सूक्ष्म शोध मराठीत इतर कोणत्याही ग्रथकाराने केलेला नाही ...त्याने प्रपंचवाद घसघसून आवर्जून ठासून सांगितला व परमार्थग्रस्तांना प्रपचाची सनद मिळवून दिली व राजकारणाची जननी जी प्रवृत्ती तिचे पुनरुत्थान केले. त्याने प्रपंचावर आलेला हीनत्वाचा आरोप तर उडवून लावलाच, पण ' तामस तामस ' म्हणून हिणविलेल्या तेव्हाच्या प्रत्यक्ष राजकारणात सुद्धा हात घातला व शिवाजीच्या प्रत्यक्ष राजकारणाला लागून मागे चिकटलेले व त्यांच्या यशाला उपयोगी पडणारे राजकारण केले. हे मात्र खचित .... सतकुळात म्हणजे भक्तिपरंपरेत उत्पन्न होऊनच त्याने जुन्या संताविरूद्ध गर्जना केली व प्रापंचिकानी संसार मन लावून आणि यशस्वीपणे करावा असा नवा संदेश दिला' (महाराष्ट्र टाईम्स १ मार्च १९८१). पण संसार मनासारखा व भाग्यशाली झाला तरी तेवढ्याने मानवाची आत्मज्ञानाची भूक भागत नाही. प्रपंचातच ती भागवण्याची कला समर्थांनी शिकवली हे त्यांचे मोठे उपकार आहेत. जगातील सर्व प्रापंचिकाना हे विचारधन सदैव उपयुक्त व अनुकरणीय आहे. त्याचा अभ्यास झाला पाहिजे; त्याप्रमाणे आचरण झाले पाहिजे. व्यक्तीला व समष्टीला भाग्यश्री मोक्षश्री प्राप्त करून देणारा समर्थांचा हा प्रपंच–परमार्थयोग, हे त्यांचे आगळे वैशिष्टच होय. त्यायोगे जगाला त्यांनी त्रिकालाबाधित असे मार्गदर्शन करून ठेवले आहे. हे त्यांचे ऋण फिटणारे नाही.

### समर्थ संप्रदायाची चतुःसूत्री

समर्थांचे शिष्य दोन प्रकारचे असायचे– प्रापंचिक आणि निस्पृही म्हणजे ब्रह्मचारी. प्रापंचिकांना त्यांनी प्रपंच व परमार्थ दोन्ही साधताना देशकाल-

परिस्थितीकडे लक्ष ठेवून प्रचलित राजकारण समजून वागावे व 'प्रपंची जाणे राजकारण। परमार्थी साकल्यविवरण ।।' असाही समाजसेवेचा आदेश दिला आहे. आपल्या निस्पृही शिष्यांना त्यांनी पुढील दंडक घालून दिला होता –

'मुख्य ते हरिकथानिरूपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्वविषयी ।।
चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।
अन्याय लहान अथवा थोर । क्षमा करीत जावे ।।' (दास. ११-५).
'वर्तायाचे लक्षण तेही असावे । (११-६-४).

त्या काळाची गरज जाणून, पारतंत्र्य नष्ट करून स्वातंत्र्य मिळवणे व धर्मसंस्थापना करणे हे ध्येय समर्थानी लोकापुढे ठेवले. लोकशिक्षणासाठी मठस्थापना करून शेकडो महंत तयार केले. मंदिरे स्थापन केली. सहस्त्रो लोकांचा समुदाय जमवून देवाचे उत्सव यथासांग थाटात केले. देवानाही रावणाच्या वंदीतून सोडविणारी श्रीराम ही समर्थांची स्वातंत्र्य देवता. स्वातंत्र्यासाठी लोकांनीही आपल्या कर्तव्याचा वाटा उचलला पाहिजे; संघटित प्रतिकार करून शिवरायांच्या स्वराज्यस्थापनेला मदत केली पाहिजे ; महंतानीही आपल्या देवकारणाला उपयुक्त असे राजकारण गुप्तपणे व जरूर तर उघडपणेही केले पाहिजे, असा आग्रह धरला. त्यावद्दलचा पुढील अभिप्राय चिंतनीय आहे. 'समर्थांचा हा राजकारणाचा उपदेश त्या काळाला अपरिचित, नवीन होता. राजकारण व जनता यांचा प्रत्यक्ष संबंध आणून त्या काळात शक्य झाली तेवढी राजकारणातील लोकशाही समर्थांनी निर्माण केली राजसत्तेत जनतेचाही जिव्हाळयाचा संबंध आहे हे लोकशाहीचे तत्त्व त्यांनी सांगितले. त्यावेळीं ते युरोपातही विशेष पुढे आलेले नव्हते. यावरून समर्थांच्या विचारांची उंची व दूरदृष्टी दिसून येते.'● या चळवळीचा शिवाजी महाराजांस पुष्कळच चांगला उपयोग झाला; व स्वराज्यस्थापनेने हिंदूधर्मही सिंहासनारूढ झाला.

आज आपल्या देशात स्वातंत्र्य व लोकशाही असली तरी हिंदूंचा हिंदुस्थान असूनही हिंदूधर्माला मात्र राजसत्तेत काहीच स्थान राहिलेले नाही. 'हिंदुस्थान' हा शब्दच नाहीसा होण्याची वेळ आली आहे. कारण आपले राज्य निधर्मी, धर्मनिरपेक्ष (Secular) आहे ना ? आज जगामध्ये फक्त नेपाळमध्येच हिंदू राज्य आहे. तेथे हिंदू धर्माला अधिकार, मान व संरक्षण आहे. हिंदुस्थानात मात्र त्याला कोणी वाली नाही, त्राता नाही, अशी वस्तुस्थिती आहे. एकीकडे निधर्मी राज्य,

---

● पहा– रामदास रामदासी भाग ३४ : शके १८६२ चैत्र शु. नवमी– लेखक, अ. वि. टिळक.

दुसरीकडे तरुणांमध्ये पसरणारा जडवाद, हिंदूमध्ये अंतर्गत संघटनेचा अभाव, हिंदु धर्मातून इतर धर्मामध्ये जाण्याची सामुदायिक धर्मान्तराची लाट, अशी सर्व बाजूने हिंदूधर्माची गळचेपी होत आहे. इतर धर्मीयांची संख्या मात्र वाढत आहे. कालान्तराने हिंदूधर्मीय अल्पसंख्य झाले तर नवल नाहीं. इतकी छुपी व उघड आक्रमणे चालली आहेत ! पण ते थोपविण्याची जबाबदारी सरकारची नाही. तरुणवर्गाला धर्माची जरूर नाही, प्रेम नाही, आस्था नाही, भवितव्याची काळजी नाही. शिक्षणक्षेत्रातही धर्माला मज्जाव आणि विभक्त कुटुंबपद्धतीमुळे घराघरातून होणारे संस्कारही नष्ट होत आहेत. अर्थार्जनाची जबाबदारी स्त्रीवर येऊन पडल्यामुळे तिला धर्म सांभाळण्यास, मुलावर संस्कार करण्यास वेळ नाही. लाचलुचपत, काळा बाजार, नीतिमत्तेचा अभाव, भ्रष्टाचार, चोऱ्यामाऱ्या, दरोडे आज सर्रास चालू आहेत. चांगल्या मूल्यांची जपणूक कोठेच दिसत नाही.

ज्या ज्ञानेश्वरादि संतांनी प्रतिकूल परिस्थितीत हिंदूधर्म-संस्कृति टिकवून मराठी भाषा समृद्ध केली, त्यांना टाळकुटे, अध्यात्मवादी म्हणून निर्भत्सना करण्यातच सुबुद्धानाही कृतकृत्यता वाटते. अशा स्थितीत हिंदू धर्माचे संरक्षण, संवर्धन करून हिंदूंची संख्या टिकविणे व वाढविणे ही कामे कोणाची ? धर्मधुरीणांनी ही जबाबदारी उचलली तरच, काही तरणोपाय आहे. हिंदू धर्मातील विद्यमान विविध संप्रदायांचे नेते व समाजातील विचारवंत लोकांनी एकत्र येवून काही संघटीत प्रयत्न करणे आज फार आवश्यक आहे. अशा प्रयत्नाला समर्थांनी सांगितलेली वरील चतु:सूत्री आजच्या काळातही मार्गदर्शक होईल, यात शंका नाही. समर्थांच्या मठमंदिरांची व अनुयायांची संघटना एखाद्या स्वतंत्र राज्यासारखी होती. अशाच पद्धतीने सरकारनिरपेक्ष राहून समाजानेच हे कार्य करावयाचे दिवस आले आहेत. त्यासाठी धर्मवेत्या, आदर्श व पवित्र आचरणाच्या स्वधर्मप्रेमी स्त्रीपुरुष नेत्यांची व कार्यकर्त्यांची अत्यंत आवश्यकता आहे. समर्थांनी आदर्श कार्यकर्त्याचे चित्र दासबोधात रेखाटले आहे. ते आजही आपणास मार्गदर्शक होईल.

**समर्थांचा आदर्श पुरुष- महंत**

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।

कार्यकर्ता हा प्रथम देवाधर्माला मानणारा, ज्ञानी, भक्त असला पाहिजे. निस्पृहता, अलिप्तपणा, निष्कामता, नि:स्वार्थीपणा व सेवाभाव हे महंताचे पंचप्राण असले पाहिजेत. अंतर्यामी जनजागृति, बाहेर कर्मसिद्धता असा प्रवृत्तिनिवृत्तीचा सुरेख संगम त्याचेजवळ हवा. प्रपंच व परमार्थ, अध्यात्म व व्यवहार, उपासना व उपकार यांचा समतोल त्याला राखता आला पाहिजे. पहाताक्षणीच लोकमानसावर प्रभाव

पडेल असे त्याचे व्यक्तिमत्व असावे. आपल्या ओजस्वी निरूपणाने, प्रबोधशक्तीने माणसे आकर्षून घेऊन त्याने त्यांची पारख करावी. कार्याला योग्य अशानाच विश्वासात घेऊन कार्यकर्ते तयार करावे. भिक्षामिसे घरोघरी व गावोगावी फिरून उत्तम कार्यकर्ते जोडावे, 'लौकिकी वर्तता न ये । त्यास महंती कामा न ये ।।' असे समर्थ बजावून सांगतात. सर्व थरांचे लोक संघटनेत सामील करून त्यांची एकजूट अभेद्य राहील असे एकविचारे भरावे, युक्तिबुद्धीने भरावे, जाणते करावे, अनुशासनबद्ध करावे. असे करताना 'भेटो कोणी एक नर । धेड महार, चांभार । त्याचे राखावे अंतर । या नाव भजन ।।' (करुणाष्टके २१५) हे महत्वाचे व समत्वाचे तत्त्व त्यानी सांगितले आहे. वर्णजातिनिरपेक्ष सर्व आबालवृद्ध स्त्री-पुरुषाना आपलेसे करावे; त्यासाठी बरे वाईट सोसावे समुदायाचे ।,' 'राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येते तदनंतरे ।।' 'जीवात जीव घालावा । आत्म्यात आत्मा मिसळावा ।।' हा लोकवशीकरणाचा मंत्र त्यांनी सांगितला आहे. 'दुसऱ्याचे दुःखे दुखावे । परसंतोषे सुखी व्हावे । प्राणिमात्र मेळवोनि घ्यावे । बऱ्या शब्दे ।। (दास. १२-१०-७) दुःख नेदावे कवणाला । उच्चनीच जरी जाला । अंतरात्मा ओळखिला । तोचि सज्जन ।।' ही महत्त्वाची सूत्रे समर्थांनी सांगितली आहेत. 'आपुल्या पुरुषार्थवैभवे । बहुतांस सुखी करावे । परंतु कष्टी करावे । हे राक्षसी क्रिया ।। (दास. १२-१०-२७) 'परपीडेवरी नसावे अंतःकरण ।' ही महत्वाची पथ्ये संघटकांनी पाळली पाहिजेत; आपल्या वागण्याने व प्रबोधशक्तीने बहुतांचे मनोगत हाती घेतले पाहिजे; त्यासाठी

ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।
संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळी ।। (दास. १९.६.१४)

गावात चांगले कार्य करणाऱ्या अन्य सर्व संघटना आपल्याशा कराव्या; आणखीही काही गोष्टी समर्थांनी सुचविल्या आहेत.

दुर्जनासी राखो जाणे । सज्जनासी निववू जाणे ।।(दास १९.६.१०)
दुर्जनासी मिळोन जाती । धन्य ते साधू ।।(दास. १२.१०.१५)

कोणाचे न्यून, पैशून्य प्रगट करू नये; त्यामुळे मनुष्य पश्चाताप होऊन सुधारतो. संघटकाने 'बहुतांचे सोसावे, अन्याय क्षमा करावे' तरच समुदाय वाढतो; 'परांतरासी न लावावा ढका ।' (दास. १२.१०.२०). 'भंगले चित्त जाणावे । रक्षावे बहुतापरी ।' कोणी काही कारणाने रागावला असल्यास त्याचा राग काढून आपलेसे करावे.

लोकसंग्रह करणाऱ्या कार्यकर्त्याला काही वेळा धूर्तपणाचे राजकारणही करावे लागते. दुर्जनांना सज्जनांप्रमाणे महत्व देऊन आळवावे; जामदारखान्याच्या किल्ल्या चोराच्याच हाती द्याव्या; हुंब्यास हुंबा लावावा; टोणप्यास टोणपा;

खटास खट, घटास घट, लौंदास लौंद, उद्धटास उद्धट, काटीने काटी काढावी. पण आपण यातून अलिप्त राहावे. कोण करवते ते कळू देऊ नये. 'इशारतीचे बोलो नये। बोलायाचे लिहो नये। लिहायाचे सांगो नये। जवाबीने।।' याप्रमाणे 'वर्तायाचे लक्षण' अंगी बाणवावे, असे परोपरीनें त्यांनी शिकविले आहे. 'आपण एकाएकी एकला। सृष्टीमध्ये भांडत चालला। बहुतामध्ये एकटचाला। यश कैंचे।।' हे संघटनाकार्यातील मर्म सांगून त्यानी प्रचंड समुदाय केला. समकालीन संतामध्ये रामदासांचे हे वैशिष्टच उठून दिसणारे आहे.

तत्कालीन सत्पुरुषांच्या गाठीभेटी घेऊन समर्थांनी या संतमंडळीतही एकोप स्नेहभाव राखला होता. तुकोबाराय, मोरया गोसावी, वामन स्वामी, रघुनाथ स्वामी इत्यादि सत भोजनास समर्थांकडे येतात असे वर्णन गिरिधरस्वामींनी 'समर्थप्रताप' या ग्रंथात केले आहे. पण त्यातही त्यांचे एक रामदासपंचायतन प्रसिद्ध आहे. जयरामस्वामी वडगावकर, रंगनाथस्वामी निगडोकर, केशवस्वामी भागानगरकर, आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर व स्वत: समर्थ हे ते पंचायतन. यांचे परस्परात अकृत्रिम प्रेम असे, पत्रव्यवहार असे, एकमेकाकडे उत्सवादि निमित्तानें जाऊन राहत. संगत, पंगत व एकांत घडत असे. 'मिळता प्रचीतीचे संत। एकांतापरीस एकांत।' असे त्याबद्दल रामदासांनी लिहिले आहे. अशाप्रकारे समर्थ प्रेमळ व आदर्श मित्रही होते.

### समर्थांचे आदर्श गुण

असे सर्व गुण समर्थांचे अंगी होते. ते स्वत: सिद्ध महंत होते, तसेच संतही होते. पुण्यशाली मातापित्यांचें पोटी जन्म, बालपणीच वैराग्य, ब्रह्मचर्याचे कडकडीत व्रत, आदर्श रामभक्ती, टाकळीस तपश्चर्या व साक्षात्कार, 'बालपणीच सर्वज्ञता वरी तयाते' अशी ज्ञानविज्ञान संपन्नता, प्रत्यक्ष देशभर पायी हिंडून देशस्थिती, लोकस्थिती पहाणे, त्यावर स्वत:चा रामबाण उपाय शोधून प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन समाजसंघटन व प्रबोधन करणे, स्वतंत्र संप्रदाय स्थापून आपल्यासारखेच शेकडो विरागी महंत तयार करून त्यांचेकडून कार्य करवून घेणे, स्त्रियांनाही उन्नतीची समान संधी देणे, परोपकारपटुता, दीर्घसूचना, विविध भाषाज्ञान, उत्कृष्ट कीर्तनकला, गायनपटुत्व, कवित्व, अक्षरसाहित्य, प्रत्यक्ष शिवाजी महाराजानाही मार्गदर्शन इत्यादी गुणसंपन्न असे ते अभिजात समाजशिक्षक व पुढारी होते 'समर्थे समर्थ करावे। तरीच समर्थ म्हणवावे।' या कसोटीला त्यांची काव्यकला, वाणी व कृती पूर्णत: उतरते. ३५० वर्षांपूर्वी तिने महाराष्ट्राला समर्थ बनविले. पुढेही हे कार्य ती करू शकेल यात शंका नाही. संतत्व टिकवून राजकारण करण्याची अवघड कसरत त्यांनी केली. ते केवळ स्वप्नाळू पुस्तकपंडीत व केवळ आदर्शवादी नव्हते, तर कष्टाळू व प्रयत्नवादी होते. परिस्थितीला जाणून

घेऊन तिच्यावर मात करण्याचे, प्रवाहाच्या उलट दिशेने निर्धाराने जाण्याचे धाडस त्यानी यशस्वीपणे करून दाखविले. ते आदर्श कर्मयोगी होते. ते स्वत:बद्दल म्हणतात :

' रामदासी ब्रह्मज्ञान । सारासार विचारणा ।
धर्मस्थापनेसाठी । कर्मकांड उपासना ।।' (मानपंचक)

आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा या वादात न पडता दोन्ही एकसमयावच्छेदेकरून त्यांनी करून दाखविल्या व ते करताना आध्यात्मिक भूमिका कधीं सुटली नाही, हे त्यांचे वैशिष्टच आहे. सामान्यत: आपणास असे दिसते की, आध्यात्मिकांना, धार्मिकांना राजकारण— समाजकारण नको असते आणि समाजकारण, राजकारण करणारांना नीतीमत्तेचे, धर्माचे, अध्यात्माचे सोयरसुतक नसते. आणि म्हणूनच सामाजिक, नैतिक, राजकीय अध:पतन होते. या सर्व गोष्टी एकाच वेळी कशा साधाव्या म्हणजे समाजाची सर्वांगीण उन्नति कशी साधावी याचे उत्कृष्ट उदाहरण समर्थांनी घालून दिले आहे. कर्म, भक्ती व ज्ञान यांचा सुरेख त्रिवेणी संगम त्यांच्या जीवनात दिसतो. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत वर्णिलेलो स्थितप्रज्ञ, कर्मयोगी, आदर्श भक्त, ज्ञानयोगी, गुणातीत, राजयोगी, दैवीसंपत्तीची लक्षणे त्यांचे ठायी एकवटलेली दिसून येतात.

आदर्श व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू त्यांचे ठायी पुढीलप्रमाणे दिसून येतात. दीर्घ आयुष्य व दणकट शरीरसंपत्ति होती. निसर्गप्रेम दांडगे होते. मोठमोठे पहाड ते लीलया चढून जात व डोंगरात घळीमध्ये एकांतात राहणे पसंत करीत. भारताची तिर्थयात्रा करण्याचे सामर्थ्य त्यांच्या शरीरात होते. झाडावर चढणे, पोहणे, घोड्यावर बसणे, तिरकमठा चालवणे इत्यादि कलांमध्ये ते प्रवीण होते. प्रसंगी दोन हात करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. शिष्यांच्या सरक्षणासाठी अकस्मात् प्रगट होऊन स्वत: संकटे दूर करीत. ते मोठे योगी होते. योगाने त्यांना सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे प्रेते उठवणे इत्यादि अनेक चमत्कारही त्यांच्या चरित्रात घडले आहेत. भव्य मूर्ति, प्रेमळ दृष्टी मधुर वाणी, खडा आवाज असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. फिरणे, विवरणे हे त्यांचे जीवनसूत्र होते. ते मातृभक्त होते. ' विवेकाची दृढवुद्धि । तुझेनि गुणे ।।' या शब्दात त्यांनी आपल्या आईचा गौरव केला व तिच्या अंत्यसमयी ते उपस्थित राहिले होते. ते आदर्श बंधू होते. श्रेष्ठांना ते फार मानीत असत. आपल्या शिष्यांचे ते आदर्श गुरु होते. ते प्रेमळ मित्रही होते. तसेच शिवाजी महाराजांना परमार्थात व राजकारणात मार्गदर्शन करून ते राजगुरु व राष्ट्रगुरुही झाले. शिवाजी महाराजांसारख्या चतुरस्त्र मुत्सद्याने त्यांचे झोळीत आपले राज्य अर्पण करावे या एकाच घटनेवरून त्यांची थोरवी कळून येते.

कार्यास सुरवात केल्यावर त्यांचा मानसिक समतोल कधी ढळला नाही. बौद्धिक सामर्थ्य श्रेष्ठ व व्यवहारज्ञान अचाट होते. यात्रा करणे, मंदिरे बांधणे, मूर्ती तयार करणे, असे सर्व करूनही सर्वांपासून अलिप्त खनाळामध्ये आत्मानंदात मग्न होते. ते स्वयंपाकापासून राजकारणापर्यंत सर्व शिकवू शकत होते. सूक्ष्म व्यवहारज्ञानाबरोबरच धूर्तपणाचे राजकारण जाणीत होते; व गुप्तपणे करीतही होते. न्यायबुद्धी, भूतदया होती. विशेष म्हणजे मुसलमानी दरबारात त्यांचे वजन होते. मुसलमानही त्यांच्या दर्शनास येत. त्यांना ते हिंदीमध्ये उपदेश करीत. अशी परधर्मसहिष्णुता होती. देशकालवर्तमान ओळखून समयी धारिष्टच धरणे, महायत्न सावधपणे करणे, अखंड चाळणा हे त्यांचे गुणविशेष. 'निवृत्ति माहेर, प्रवृत्ति सासर' अशी खरी धारणा. तरी धर्मस्थापनेसाठी राजकारणाचा त्यांनी अंगीकार केला, हे विशेष होय.

नैतिक सद्‌गुणांची व आचारधर्माची स्वत: जोपासना करून समाजाला व शिष्यवर्गाला त्याप्रमाणे साधन मार्गात ठेवले. अध्यात्मात प्रचीतीला, नवविधा भक्तीत आत्मनिवेदनाला महत्व दिले. निर्गुणात्मवादी असले तरी बहुजन समाजासाठी सगुण भक्तीचा पुरस्कार केला. 'अनेकी सदा एक देवासी' पहावे असे शिकविले. सद्‌गुरु व पोटार्थी गुरु यांचे परीक्षण करून समाजास जागे केले व सर्व थरातील लोकांना कोणत्याही काळात लागू पडेल असा संदेश दिला. ज्ञानी पुरुषांना त्यांनी सर्वांना सज्ञान करण्याचा संदेश दिला. आबालवृद्ध स्त्रीपुरुषांना त्यांनी दैनंदिन आचारधर्माचा कित्ता घालून दिला. लिहावे कसे, वाचावे कसे इथपासून राजकारणापर्यंत सर्व व्यवहारज्ञान दिले. स्वाभिमानी जीवन जगण्यास शिकवून आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. विरक्तांना धर्मस्थापनेचा, ब्राह्मणांना षट्कर्मे करण्याचा व ब्राह्मण्याचे गुण रक्षून तेजस्वी करण्याचा संदेश दिला. क्षत्रियांना युद्धाचा व संघटित प्रतिकाराचा संदेश दिला. नि:स्पृहांना कट्ट घालून ( संघटीत होवून ) सर्वसामान्य लोकांना समाजसेवेकडे व देशसेवेकडे वळविण्याचा संदेश दिला. इतकेच नव्हे तर ब्रह्मनिष्ठांनाही कर्मयोग आचरून समाजप्रबोधन व नेतृत्व कसे करावे याचा आदर्श घालून दिला. 'क्रियावान् हि एष ब्रह्मविदां वरिष्ठ:।' हे वचन समर्थांच्या जीवनास चांगले शोभून दिसते. याप्रमाणे त्यांनी सर्वकाळी प्रेरणादायक मार्गदर्शन केले व महायत्न करून आपले 'आनंदवनभुवनाचे' स्वप्न साकार झाल्याचे समाधान त्यांनी प्राप्त करून घेतले. 'दास म्हणे आम्ही केले पावलो। हें जन हाती धरी। कल्याणकरी रामराया ।। अशी प्रार्थना करून त्यांनी जीवितकार्य संपवले (इ. सन. १६८१, माघ व.९).

आत्मज्ञानाबरोबरच समर्थांना मानवी स्वभाव व व्यवहार, मानसशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण इत्यादींचे यथार्थ ज्ञान असल्याने त्यांनी केलेले मार्गदर्शन

सर्वंकष व सर्वकालीन झाले आहे. सर्व जगाला सर्व काळी आदर्शभूत असे विशुद्ध चारित्र्य, समर्पित जीवन, क्रांतिकारी कर्तृत्व व राष्ट्रसंजीवक तत्त्वज्ञान असल्याने खरोखर 'विश्वसंत' म्हणून मान द्यावा अशी त्यांची योग्यता आहे. सूर्य उगवताच अंधःकार दूर व्हावा त्याप्रमाणे अज्ञान, अनीति, पारतंत्र्य, अधर्म यांचा अंधःकार दूर करणारा उपदेश व प्रपंच-परमार्थ संमीलनाचा विश्वतारक महामंत्र देऊन त्यांनी हिंदुस्थानाबरोबर सर्व जगाची चिंता वाहिली. म्हणून 'तोचि एक जाणावा भला भूमंडळी' असे त्यांचेबद्दल अभिमानाने म्हणता येते. अशा या भारतमातेच्या आदर्श सुपुत्राचा सदैव जयजयकार असो. त्यांच्या त्रिशतपुण्यतिथी महोत्सवानिमित्त त्यांच्या पुण्यस्मृतीस कृतज्ञतापूर्वक सहस्त्रशः प्रणाम ।

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# श्री समर्थ रामदास स्वामींची तत्त्वसृष्टि.

— डॉ. रं. स. गोडबोले

'अध्यात्मविद्या विद्यानाम्,' सर्व विद्यांमध्ये माझी परमेश्वरी विभूति आहे, असें भगवान श्रीकृष्ण गीतेंत (१०–३२) सांगतात. समर्थ रामदासांनी दासबोधांत हें वचन मुद्दाम उद्धृत केलें आहे. सकळ 'विद्येमधें सार। अध्यात्म विद्येचा विचार। दशमोऽध्यायी सारंगधर। भगवद्गीतेसि बोलिला' ॥ ७–१–२७ ॥

अध्यात्म म्हणजे आत्मस्वरूपाचें ज्ञान. हिलाच आत्मविद्या किंवा ब्रह्मविद्या म्हणतात. 'आत्मविद्येचा परमार्थ' सांगणारा ग्रंथ म्हणजे दासबोध. मानवाचे वैयक्तिक व सामुहिक जीवन उन्नत, प्रेमपूर्ण व सर्वांगाने सुखी करण्याचे महत्वाचे साधन म्हणजे अध्यात्म विद्या होय. संपूर्ण समाजाची धारणा करणारा धर्म या अध्यात्मावरच आधारित असतो. 'धारणात् धर्ममित्याहुः। धर्मो धारयते प्रजाः।' या व्याख्येवरून धर्म हा केवळ वैयक्तिक नाही तर तो सामाजिक, जनहिताचा आहे असें ठरतें. म्हणून अध्यात्माला संत वाङ्मयात श्रेष्ठ स्थान आहे. दासबोधांत समर्थांनी 'बहुधा अध्यात्मनिरूपण 'च केले आहे.

समर्थांच्या 'तत्त्वसृष्टींत' अध्यात्मविद्या, परमार्थ, परब्रह्म, माया, परमात्मा, जीव, जगदोत्पत्ति आणि अद्वैत सिद्धी यांचा प्रामुख्याने विचार आहे. तदनुषंगाने भक्तियोग, ज्ञानयोग, कर्मयोग, ध्यानयोग आणि नीतिविचार ठिकठिकाणी आला आहे. प्रस्तुत लेखांत परब्रह्म, माया, परमात्मा आणि जीव यासंबंधीच विचार घेतला आहे. 'अद्वैत विचार' हें विवेचन करताना अवश्यमेव येतोच.

**परमार्थाचे महत्त्व**

पहिल्या दशकांतील 'परमार्थस्तवन' नामक नवव्या समासांत परमार्थाचें महात्म्य नानापरींनी वर्णन केलें आहे. 'साधकांचा निजस्वार्थ' असलेला हा परमार्थ 'समर्थामधे समर्थ । योग हा ।।१।।'; 'रोकडा ब्रह्मसाक्षात्कार' करून देणारा आहे. (३) 'आकाशमार्गी गुप्त पंथाचे ज्ञान होते.' (५) परमार्थाने 'परब्रह्म तें हि निवळे । अंतर्यामी ।।१४।।'; ब्रह्मामध्ये ब्रह्मांड बुडून जाते; पंचभूतांचे थोतांड लटके पडते; माया नाहीशी होते आणि शुद्ध आत्मा म्हणजे परब्रह्म अंतरी बाणते. सर्व संशय निरस्त होतात इ. परमार्थाची म्हणजे ब्रह्मज्ञानाची– ब्रह्मसाक्षात्काराची– थोरवी अनेक रीतींनी गाईली आहे. 'परमार्थ सकळांस विसावा ।' 'परमार्थ जन्माचे सार्थक । परमार्थ संसारी तारक ।'; 'परमार्थ साधकांसी आधार ।' असे वर्णन करून समर्थ श्रोत्यांना बजावतात,

'परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी ।।२३।।'

समर्थ अंतरीच्या कळकळीने श्रोत्यानां समजावून सांगतात,

'अनंत जन्मीचे पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे ।
मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ।।२४।।'
'भल्यातें परमार्थी भरावें । शरीर सार्थक करावें ।
पूर्वजांस उद्धरावे । हरिभक्ति करूनी ।।२७।।'

समर्थांच्या तत्वज्ञानात 'मुख्य हरिकथा निरूपण' आहे हे उघड आहे.

सातव्या दशकांत पहिल्याच 'मंगळाचरण' समासांत 'अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम्' ।।६।। हा गीतेतील श्लोक उद्धृत करून अद्वैत, परमार्थ व श्रोता याबद्दल ते म्हणतात,

'या कारणे अद्वैत ग्रंथ । अध्यात्मविद्येचा परमार्थ ।
पाहावया तो चि समर्थ । जो सर्वांगे श्रोता' ।।२८।।
'जयाचें चंचळ हृदये । तेणें ग्रंथ सोडूचि नये' ।।२९।।
'जयास जोडला परमार्थ । तेणें पाहावा हा ग्रंथ ।
अर्थ शोधितां परमार्थ । निश्चये बाणें' ।।३०।।

**आत्मज्ञान**

'ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।
पाहावे आपणासि आपण । या नांव ज्ञान' ।।५–६–१।।

श्रीमत् दासबोधाच्या पांचव्या दशकांपासून तो अखेरपर्यंत आत्मज्ञान निरूपण येते. पांचव्या दशकाच्या सहाव्या समासात आत्मज्ञानाची लक्षणे देऊन त्यांचे स्पष्टीकरण आठ दशक अखेरपर्यंत केले आहे. पुढे याच विषयाची पुनरुक्ति येते.

'अष्टांग योगपिंडज्ञान । त्याहून थोर तत्वज्ञान ।
त्याहून थोर आत्मज्ञान । हें पाहिले पाहिजे' ।। १७-३-२४

दासबोधांत आत्मज्ञान विवेचनाला अत्यंत प्राधान्य आहे.

'नाना व्रते नाना दानें । नाना योग तीर्थाटणें ।
सर्वांहून कोटिगुणे । महिमा आत्मज्ञानाचा ।। (१०-१०-६४)'

असा आत्मज्ञानाचा गौरवपूर्ण उल्लेख करतात. आत्मज्ञान म्हणजे काय ? असा प्रश्न उपस्थित करून त्याचे स्वरूप ३९ ते ५४ पर्यंतच्या १६ ओव्यांत स्पष्ट कथन केलें आहे.

'दृश्य पदार्थ आटतां । आपण हि नुरे तत्त्वता ।
ऐक्यरूपे ऐक्यता । मुळीच आहे ।।४८।।'
'सृष्टीची नाही वार्ता । तेथे मुळीच ऐक्यता ।
पिंड ब्रह्मांड पाहो जाता । दिसेल कोठे ।।४९।।

परब्रह्म

ब्रह्म, परब्रह्म आणि आत्मा हे शब्द दासबोधात समान अर्थीच येतात. आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान व परब्रह्मज्ञान समानार्थकच आहेत. विषय मांडणीच्या ओघांत, श्रोत्यांना समजावण्यास ज्या शब्दाची जेथे गरज भासली तेथे तो वापरला.

'बृहत्वात् बृहणीयत्वात् ब्रह्म' अशी ब्रह्माची उत्पत्ति आहे. सर्वापेक्षा जे मोठे आहे आणि जे सर्वाला व्यापून आहे, जे सर्व नष्ट झाले तरी राहतेच, जे सर्वाचे मूळ आहे, त्याला ब्रह्म किंवा परब्रह्म म्हणतात.

ब्रह्ममहिमा समजावताना समर्थ म्हणतात, 'ब्रह्म म्हणून काही जड पदार्थ नव्हे की जो एकाने दुसऱ्याला उचलून द्यावा. प्रत्यक्ष सद्गुरुमुखानेच ब्रह्मानुभव घ्यावयाचा असतो.' (७-३-५२)' ब्रम्ह कसे आहे, हे शब्दांनी सांगता येत नाही. त्याचे कितीहि लक्षण केले तरी त्याहून तें निराळेच उरते.' (७-२-७)

सहाव्या दशकाच्या दुसऱ्या 'ब्रह्मपावन' नामक समासांत गीतेंतील दुसऱ्या अध्यायांतील आत्मवर्णनाप्रमाणें समर्थांनी ब्रह्माचे वर्णन केले आहे. ब्रह्मज्ञानाच्या उपदेशाशिवाय इतर सर्व ज्ञान, धान्याच्या कोंड्याप्रमाणे, भुशाप्रमाणे आहे, असें बजावतात. आणि ते मिळण्यास 'अध्यात्म श्रवणे पावावे । परब्रह्म तें ।।२५।।'

असा ब्रह्मज्ञान प्राप्तीचा उपायहि सुचवितात. तसेच ' आता आपणचि आपला। शोध घ्यावा ।।२८।।' असा ज्ञानमार्गावर भर देतात. पुढच्याच तिसऱ्या समासांत

' आपला आपण शोध घेता । आपली तो माईक वार्ता ।
तत्वांती उरले तत्त्वता । निर्गुण ब्रह्म ।।' ६-३-२३

आणखी पुढे सूचना देतात, ' आपला आपणासि विचार । ठाई पडे ।।'(६-३-२८)

चौथ्या समासाला ' ब्रह्मनिरूपण ' नाम असले तरी प्रत्यक्षांत ब्रह्मस्वरूप वर्णन फारच कमी आहे. परंतु एकाच ओवीत त्यांनी त्याचें सारे सार सांगितले आहे.

' ब्रह्म प्रलयावेगळें । ब्रह्म नावरूपानिराळे ।
ब्रह्म कोणी येका काळें । जैसे तैसे ।।२३।।'

शेवटच्या ओवीत समर्थांनी जी ब्राह्मणाची व्याख्या केली आहे ती हल्लीच्या ब्राह्मण्याविरुद्ध गदारोळ उठणाऱ्या युगांत लक्षांत घेण्यासारखी आहे.

' करिती ब्रह्मनिरुपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।
ते चि जाणावे ब्राह्मण । ब्रह्मविद् ।।' ६-४-२४।।

' मायाब्रह्मनिरूपण ' नामक समासात शाश्वत ब्रह्म आणि अशाश्वत माया यांची तुलना आहे. ती आपण पुढे ' माया ' विचार करताना पाहू.

**परब्रह्म शब्दातीत आहे.**

सहाव्या दशकाचा सहावा समास ' अनुर्वाच्य ' नावाचा आहे. महात्मा कबीरांप्रमाणें समर्थ समासाच्या सुरवातीसच म्हणतात ' मुक्यानें गूळ खादला। गोडी न ये सांगाव्याला ।' असें जे अनिर्वाच्य– ' बोलास आकळेना '– परब्रह्म तें ' बोलिल्याविण हि कळेना ।'. कल्पना करायला गेले तर ' हिंपुटी होये '(७). ' जें वेदांचे गुह्य परम ' हें मग सामान्याला आकळावयाचें कसें ? तर ' धरिता संतसमागम । सर्वहि कळे ' (८) हा त्यावर उपाय सुचवितात. तसेच 'आपशुद्धी' वर (१२) म्हणज आपण कोण याचा विचार करून शोध घेण्यावर जोर देतात. येवढेच नव्हे तर ' तेणे लागे समाधि । अकस्मात ।।' (१२) असें निश्चयात्मक आश्वासन देतात. त्यानंतर ' आपण शिल्लक उरत नाही.' द्रष्टा–दृश्य–दर्शन भाव सपून केवळ परब्रह्म वस्तु शिल्लक उरते. कारण त्रिपुटी मावळते. ' आत्मा सर्वसाक्षी आहे असे सर्व अध्यात्मवादी म्हणतात. पण परब्रह्म या सर्वसाक्षिणी अवस्थेपलिकडचे आहे.' जेव्हा पाहण्याला काही भिन्न असें उरतच नाही, तेव्हां द्रष्टयाचें द्रष्टेपणहि जाते. पाहणारा वेगळा उरतच नाही. पहावयाची परब्रह्मवस्तु स्वयमच होतो. तेव्हांचा अनुभव शब्दांनी सांगण्यापलिकडचा असतो. कारण तेव्हां वाच्य–वाचक–भावहि जातो.

' शब्दांकरिता वस्तु भासे । वस्तु पाहता शब्द नासे ।
शब्द फोल अर्थ असे । धनवटपणें ।।' ६-१०-२० ।। त्याचप्रमाणें
' शब्द हा फलगट । परब्रह्मी ।। २२।।

अशी शब्दाची असमर्थता प्रकट करतात. कारण शब्दापूर्वीच अर्थ विद्यमान असतो. 'परब्रह्म दृष्यावेगळे आहे.' हा वाच्यांश आहे. त्याचा लक्ष्यांश परब्रह्म हेंच एकमेव सत्य आहे. त्याच्यावाचून अन्य 'द्वितीयपदार्थ' काही नाही, हा आहे. अनुभवाच्या अवस्थेंत द्रष्टादृश्याच्या परस्पर सापेक्ष द्वंद्वावर आधारलेले वाच्यांश व लक्ष्यांश दोन्हीही नाहीसे होतात व केवळ ' स्वयमेव अनुभव' तेवढा शिल्लक राहतो.

पण हें म्हणणेंहि खरें नाही. कारण त्या अवस्थेत अनुभाव्य, अनुभव आणि अनुभविता ही त्रिपुटीच नसते. अनुभविताच अनुभवस्वरूप झालेला असतो. त्यामुळे ' परब्रह्मानुभव' ही एक अनिर्वचनीय म्हणजे शब्दांत व्यक्त न करता येण्यासारखी अवस्था आहे. येथे 'अद्वैती द्वैतचि लाजे ।' अशी विलक्षण अवस्था आहे.

' शब्द मौन्याचा विचार । व्हावया मूळ ओंकार ।
तो ओंकार गेलिया उच्चार । कैसा करावा' ।।३२।।

म्हणजे भाषण – बोलणं – शब्द आणि मौन यास कारण ओंकार. तो ओंकारच मूळांत नाहीसा झाला तर भाषण कसले आणि तत्सापेक्ष मौन तरी कसले?

परब्रह्मापेक्षा त्याचा अनुभव वेगळा असता, तर तो सांगता आला असता, पण ' वेगळेपणाची मात । ते लटके वधेची सुता । म्हणोनि अभिन्नता । मुळीच आहे' ।।३५।।. वाच्य - वाचक भावांचे द्वैत स्वीकारून जें ब्रह्मज्ञान सांगितलें असतें ते स्वप्नवत् होऊन शेवटी ' अनुर्वाच्य सुख उरले । शब्दातीत '।।४२।।

' तेथे शब्देविण ऐक्यता । अनुभवता अनुभविता ।
ऐसा निवांत तो मागुता । जागृति आला' ।।४३।।

परंतु ही जागृति मुलखावेगळी आहे. जागृति – स्वप्न–सुषुप्ति या अवस्थापैकी एक नव्हे, तर ' निवांत विश्रांतीचा ठाव । तें तू जाण जागृती' ।।५३।।

मग परब्रह्माचें स्वरूप वर्णन करावे तरी कसें ? या प्रश्नाला उपनिषदाने उत्तर दिले आहे. ' गुरोस्तु मौनं व्याख्यानम् ।' तसेंच समर्थ देतात.

' म्हणोनि तें समाधान । बोलतांचि न ये ऐसेंजाण ।
निशब्दाची ऐसी खूण । बोळखावी' ।।६१।।

या दहाव्या समासांत ' परब्रह्मानुभव' हा अनिर्वचनीय कां, हा अध्यात्मांतील सर्वांत अवघड विषय शक्य तो सोप्यांत सोपा करण्याची पराकाष्टा केलेली

दिसते. येथे संतहृदयाचें कारुण्य ओतप्रोत आहे. बुद्धिवाद, वाक्पटुता, विद्वत्ता, तर्कशास्त्र येथे आढळलें तरी तें सर्व श्रोत्यांबद्दल वाटणाऱ्या जिव्हाळ्यापोटी, कारूण्यापोटी आहे.

**‘ ब्रह्मनिरूपण’**

सातव्या दशकांतील दुसरा समास ‘ ब्रह्मनिरूपण’ आहे. त्याच्या आधी विषयाचें काठिण्य जाणून श्री ज्ञानेश्वर महाराजांप्रमाणें समर्थही श्रोत्यांना वा साधकांना गौरवून म्हणतात, ‘ अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैचा । जयासि बोलता वाचेचा । हव्यास चि पुरे’ ।।४७।।

‘ परीक्षवंता पुढे रत्न । ठेविता होये समाधान ।
तैसे ज्ञानियांपुढे ज्ञान । बोलावे वाटे ’ ।।७–१–४८।।

दुसऱ्या समासांतील आरंभीच्या नऊ ओव्यांत निर्गुण, निराकार, निःसंग, निर्विकार, अपरंपार, व्यापक, अनेकीं एक, शाश्वत, अच्युत, अनंत, सदोदित संत, निर्विकल्प, दृश्यावेगळे, शून्याहून निराळे, सूक्ष्म, नामातीत असें उपनिषदांप्रमाणें परब्रह्माचे वर्णन करून तैत्तिरीय उपनिषदातील ‘ यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ।।२–९।। चरणच उद्धृत केला आहे. परब्रह्माची गहनता, अप्राप्यता सांगताना श्री ज्ञानेश्वर, कबीर, तुलसी, एकनाथांप्रमाणें समर्थ रामदासस्वामी साधु, संत आणि सद्‌गुरु यांच्याच कृपेने तें अप्राप्य प्राप्त होते, अनाकलनीय आकलनीय होते हें आवर्जून सांगायला विसरत नाहीत.

‘ आतां मनासि जें अप्राप्य । तें कैसें होईल प्राप्त ।
ऐसे म्हणाल तरी कृत्य । सद्‌गुरुविण नाही ’ ।।१२।।
‘ सद्‌गुरुकृपा ते चि किली । जेणे बुद्धि प्रकाशली ।
द्वैत कपाटे उघडली । येकसरी ’ ।।१५।।

श्रोत्यांच्या मनांत कदाचित साधु–संत यांच्यात भेदभावाची द्वैत भावना निर्माण होईल म्हणून समर्थ काळजी घेतात.

‘ साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।
अवघे मिळोन येकचि जाले । देहातीत वस्तु ।। ७–२–३१

**परब्रह्म भेदातीत व नामातीत आहे**

देहात्मबुद्धि– ‘ थोरपण ’– परब्रह्म प्राप्तीच्या आड येते. अहंभावाचे संपूर्णतया विसर्जन– ‘ निर्वाण ’– झालें पाहिजे. परब्रह्मामध्ये उच्च, नीच, राजा, रंक, पुरुष वा स्त्री असा भेद नाही, असें सांगून कर्मठ श्रोत्यांना हळूच सुचवितात,

‘ ब्राह्मणाचे ब्रह्म तें सोवळे । शूद्राचे ब्रह्म तें वोवळें ।
ऐसे वेगळे आगळे । तेथें असेचिना ’ ।।२५।।

गरीबी व श्रीमंती हा व्यवहारांतील भेद परमार्थात उपयोगी नाही.

' उंच ब्रह्म ते रायासी । नीच ब्रह्म ते परिवारासी ।
ऐसा भेद तयापासी । मुळीच नाही ।।' ७–२–२६

या त्यांच्या परब्रह्मस्वरूप वर्णनाला आधार म्हणून

' सदेव सोम्यमिदमग्रे आसीत एकामेवाद्वितीयम् ।'

या छांदोग्य उपनिषदांतील (६–२–१) सिद्धांताचे जणू प्रतिबिंब ' सकळांसि मिळोत ब्रह्म येक । तेथे नाहीं हे अनेक ' ।।२७।। या ओवींत उमटलें आहे. आणि ' येक ब्रह्म द्वितीयं नास्ति ।' हें श्रुतिवचन उद्धृतच केले आहे.

ब्रह्म वस्तुतः एकच आहे पण तें नाना मतांच्या लोकांना नाना प्रकारांनी भासते व ज्याला जसा अनुभव येतो, त्याच्यावर तो विश्वास ठेवतो. त्यामुळेच तत्त्वज्ञानांत नाना प्रकारचे भेद झाले आहेत, असेच जणू समर्थांना येथे (४४) सुचवावयाचे आहे. ' नाना मतांचा गल्बला ' यामुळेच निर्माण होतो.

वस्तुतः ब्रह्म ' नामरूपातीत ' आहे (४५) तरीहि लोक त्याला अनेक नांवें व विशेषणें देतात. उदा. ' निर्मळ, निश्चळ, निवांत, निजानंद, अरूप, आलक्ष, अगोचर, अच्युत, अनंत, अपरांपर, अदृश्य, अतर्क्य' इ. (४५–४६). येथे ज्ञानेश्वरीतील नवव्या अध्यायांतील 'अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ' ।।११।। या श्लोकावरील टीकेचें स्मरण होते. ' येतुलेनि अनामा नाम । मज अक्रियासि कर्म । विदेहासि देहधर्म । आरोपिती ।।' ' मज आकारशून्या आकारू । निरुपाधिका उपचारू । मज विधिवर्जिता व्यवहारु । आचारादिक ' ।। १५६–५७ ।।

परब्रह्माचे आणखी प्रकार समर्थ वर्णन करतात. नादरूप, ज्योतिरूप, चैतन्यरूप, सत्तारूप, साक्षीरूप, सस्वरूप (४७), ' शून्य, सनातन, सर्वेश्वर आणि सर्वज्ञ सर्वात्मा जगजीवन ' ।।४८।। ' सहज आणि सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत । शाश्वत आणि शब्दातीत । ऐसी नामें ' ।। ४९ ।। ' विशाळ, विश्वंभर, विस्तीर्ण, विमळ, व्योमाकार, आत्मा, परमात्मा आणि परमेश्वर ' ।। ५० ।।

या परब्रह्माची–अनाम्याची– आणखी नांवे सांगतात. " ज्ञानधन, एकरूप, पुरातन, चिद्रूप, चिन्मात्रा ' इत्यादि. समर्थांचा शब्दसंग्रह वा शब्दसंपत्ति अगणीतच आहे. परब्रह्माचे नानाप्रकारांनी वर्णन करून झाल्यावर समर्थ ' ऐसी नामे असंख्यात । परी तो परेश नामातीत ।' असा सिद्धांत सांगतात. मग येवढी नांवे– विशेषणें– देण्याचें कारणच काय ? या शंकेला स्वतःच उत्तर देतात, ' परब्रह्माच्या स्वरूपाविषयी काही निश्चिती व्हावी म्हणून ही वर्णनें केली जातात.' (५२) आणि बजावतात.

' तो विश्रांतीचा विश्राम । आदिपुरुष आत्माराम ।
तो येकचि परब्रह्म । दुसरे नाही ।।५३।।

या ' आदिपुरुषा ' ची भेट ज्ञानेश्वरीत अनेक वेळा घडते !

**चतुर्दशब्रह्म**

सातव्या दशकांतील तिसऱ्या समासांत चौदा ब्रह्मांचें निरूपण आहे. पहिल्या तेरा ब्रह्मांचे निरसन करून शेवटच्या अनिर्वाच्य ब्रह्माचे समर्थन केले आहे. १) शब्द ब्रह्म २) ॐ इत्येकारं ब्रह्म ३) खं (आकाश) ब्रह्म ४) सर्वब्रह्म (सर्वं खल्विदं ब्रह्म) ५) चैतन्य ब्रह्म ६) सत्ता ब्रह्म ७) साक्षी ब्रह्म ८) सगुण ब्रह्म ९) निर्गुण ब्रह्म १०) वाच्य ब्रह्म ११) अनुभव ब्रह्म १२) आनंद ब्रम्ह १३) तदाकार ब्रम्ह १४) अनिर्वाच्य ब्रम्ह.

समर्थांनी पहिल्या तेरा ब्रम्हांचा निरास अशा पद्धतीने केला आहे. उदा. शब्द ब्रम्ह हे केवळ शाब्दिक आहे. तेथे अनुभव नसल्यामुळे तें मायिक आहे. शिवाय शाश्वत ब्रम्हाचा त्यांत विचार नाही. ॐ इत्येकार ब्रम्ह (' मीतिकारक्षर ब्रम्ह '). जें ब्रम्ह क्षरहि नाही व तत्सापेक्ष अक्षरहि नाहीं, तें अक्षर कसें होईल ? ' खं ' म्हणजे पोकळी– आकाश– शून्य आहे. शून्याचा म्हणजे अभावाचा ज्ञानाने नाश होतो. शिवाय त्यांत शाश्वताचा विचार नाही. मग ' खं ' ब्रम्ह कसें होणार ? ' सर्वब्रह्म नासिवंत ' (२७, आणि ' सर्व ब्रह्मातें नाश आहे ' (२८) मग ' सर्वब्रम्ह ' कसे होणार ?

आनंदाचा अनुभव ही वृत्ति आहे. ब्रह्म वृत्तिरहित आहे. मग ' अनुभव ' ब्रम्ह कसें होणार ? तसेच ' आनंद ब्रह्म ' तरी कसें होणार ? तदाकार झाल्यावर वृत्ति राहत नाही. म्हणून ' तदाकार ' ही ब्रह्म नाही. वाच्य ब्रह्माला नाश आहे. मग तात्पर्य काय ? कोणत्याहि वृत्तिनिष्ठ शब्दाच्या संकेताने ब्रह्माचा बोध होऊं शकत नसल्यामुळे तें अनिर्वचनीय आहे.

' अनुर्वाच्य ते निवृत्ती । तेचि उन्मनीची स्थिती ।
निरोपाधी विश्रांती । योगियांचो ।।' ७–३–४४ ।

**विमल ब्रह्मनिरूपण**

सातव्या दशकाच्या चौथ्या समासांत ' विमल ब्रह्मनिरुपण ' आहे. ' विमलब्रह्म ' आणि ' केवलब्रह्म ' एकच. केवल म्हणजे निरूपाधिक ब्रह्म. मायोपाधिक ब्रह्म शबल आहे. मायाविरहित ब्रह्म केवल, विमल, शुद्ध आहे. श्रीमद् आद्य शंकराचार्यांनी एक शुद्ध–केवल–विमल ब्रह्म आणि दुसरे सोपाधिक-शबल–ब्रह्म मानले आहे. नाथ संप्रदायांत ही दोन ब्रह्मांची विचारसरणी किंवा संकल्पना मान्य नाही. श्री ज्ञानेश्वर महाराजांनीहि ही शबल ब्रह्माची विचारसरणी

स्वीकारलेली नाही. परंतु समर्थ रामदासस्वामींवर या द्विब्रह्म संकल्पनेचा आणि एकंदरीत आचार्यांच्या तत्त्वप्रणालीचा पगडा स्पष्ट दिसतो. तसाच त्यांच्या मायावादाचाहि प्रभाव आहे. तो पुढे पाहू.

‘ ब्रह्म हें आकाशासारखे पोकळ वाटलें तरी त्याच्यापेक्षा निर्मळ, विशाल आणि अमर्याद आहे. तें सर्वांच्या ‘ अतिनिकट ’ असले तरी दिसत नाही.’

‘ ब्रह्म ब्रह्मांडी कालवले । पदार्थांसी व्यापून ठेलें ।
सर्वांमध्ये विस्तारलें । अंशमात्रें ॥१५॥

‘ खरें पाहतां ब्रह्माला कोणताच दृष्टांत देता येत नाहीं ’ ॥२१॥. हाच सिद्धांत अनेक दृष्टात देऊन स्पष्ट केला आहे.

‘ जेथे अज्ञान सरे । ज्ञान हें हि नुरे ।
विज्ञानवृत्ति मुरे । परब्रह्मी ’ ॥५१॥ आणि
ऐसे ब्रह्म शाश्वत । जेथे कल्पनेसी अंत ।
योगी जना येकांत । अनुभवे जाणावा ॥५२॥

या ओव्यांनी ‘ विमल ब्रह्मानिरूपण ’ समासाचा समारोप करतात. या सिद्धांतावर ‘ आपुलेन स्वानुभवे । पाविजे ब्रह्म ॥’ असा शिक्कामोर्तब करतात.

## ब्रह्ममायेचा घोटाळा

सातव्या दशकांतील पाचव्या ‘ द्वैतकल्पनानिर्शन ’ नामक समासांत ब्रह्म-मायेचा घोटाळा कां होतो याचें कारण सांगतात.

‘ सत्य ब्रह्माचा संकल्प । मिथ्या मायेचा विकल्प ।
ऐसिया द्वैताचा जल्प । मनचि करी ’ ॥४॥

आणि श्रोत्याला प्रश्न विचारतात, ‘ येवं द्वैत आणि अद्वैत । होय वृत्तीचा संकेत । वृत्ति जालिया निवृत्त । द्वैत कैंचें ?’ ॥१३॥ आणि स्वतः उत्तर देतात,

‘ वृत्तिरहित जें ज्ञान । तें चि पूर्ण समाधान ।
जेथे तुटे अनुसंधान । माया ब्रह्मोचें ’ ॥१४॥

प्रत्येक विषयाचें विवेचन समर्थ प्रश्नोत्तराच्या रूपांत करतात. श्रोत्यांच्या किंवा साधकांच्या मनांत कोणतीच शंका बाकी राहू नये म्हणून समर्थ स्वतःच सर्वांगानें प्रश्न आणि शंका उपस्थित करून त्याची सविस्तर उत्तरें देतात.

सातव्या समासांत हें ब्रह्मपद किंवा निवृत्तिपद केव्हां लाभेल तें सांगतात. ‘तें नुमजतांच उमजे । उमजोन काही न नुमजे । तें वृत्तीविण पाविजे । निवृत्तिपद ’ ॥७–२–२४॥. निर्गुण, निर्विकल्प, अचिंत्य, अव्यक्त असें परब्रह्म भिन्नत्वाने समजण्याचा विषय होत नाही. ‘ मनामध्यें न समाये परब्रह्म तें’ ॥२५॥

## पुनरावृत्तीचें कारण

दासबोधाच्या पहिल्या सात दशकांत सविस्तर आलेले ब्रह्मनिरूपण त्याच्या

तिमऱ्या आवृत्तीत म्हणजे जुन्या दासवोधाला जोडलेल्या तेरा दशकांत पुन्हा ठिकठिकाणी आलेलें आहे. दशक ६–४; दशक ७–२ आणि दशक ९–२ या तिन्ही समासांची नांवें 'ब्रह्मनिरूपण' अशी असून द. ७–४ व द. २०–१० या दोन्हीं समासांची नांवें 'विमल ब्रह्मनिरूपण' अशीच आहेत. त्यामुळे विवेचनाचा पुनरावृत्ति अपरिहार्य झाली आहे. श्रोत्यांच्या हितासाठी आपल्याला 'बोलिलेचि बोलावे लागले' आहे याची जाणीव स्वतः समर्थांना असल्याचें त्यांनीच स्पष्ट म्हटले आहे. समर्थांच्या मतें 'अध्यात्मज्ञान' अर्थात 'परब्रह्मज्ञान' किंवा 'आत्मज्ञान' हा सर्व तत्त्वज्ञानाचा, विचारांचा पायाच आहे. त्यामुळें 'जाणितेनी', बुद्धिपुरःसर पुनः पुन्हा ह्या अध्यात्मविषयाचे मायाब्रह्माचे– विवेचन त्यांनी केलेलें दिसते.

**स्वानंदधन आत्मा आणि विमलपरब्रह्म एकच**

आठव्या ज्ञानदशकामध्यें परब्रह्मासंबंधी विवेचन सातव्या समासांत आले आहे. तेथे आत्म्याचे, जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा म्हणजे विश्वात्मा आणि निर्मलात्मा असे चार प्रकार मानून ते उपाधीमुळे झाले आहेत, वस्तुतः स्वानंदधन आत्मा एकच आहे असें सांगितले आहे. पिंडामध्ये जो ब्रह्मांश असतो, तो जीवात्मा; ब्रह्मांडांत जो ब्रह्मांश असतो तो शिवात्मा; ब्रह्मांडाबाहेर असणारा ब्रह्मांश म्हणजे परमात्मा आणि उपाधिवेगळा तो परेश निर्मळात्मा होय. (ओव्या ४५ ते ५३).

येथे आत्मा शब्द निरूपाधिक परब्रह्माला लावलेला दिसतो. तसेच पुढील आठव्या समासांत परमात्म्याची लक्षणें नेमकी हीच (परब्रह्माची) सांगितली आहेत.

> 'परमात्मा निर्गुण निराकार । परमात्मा अनंत अपार ।
> परमात्मा नित्य निरंतर । जैसा तैसा ।।'
> 'परमात्मा सर्वास व्यापक । परमात्मा अनेकी येक ।
> परमात्म्याचा विवेक । अतर्क्य आहे' ।।८–८–३ व ४।।

हें तर निर्गुण, निराकार, निरंतर परब्रह्माचेंच वर्णन आहे. म्हणजे आत्मा, परमात्मा व परब्रह्म शब्द समानार्थी झाले. हीच 'ऐक्यावस्था' वा 'एकार्थता' भगवंत शब्दाची झाली आहे. 'येवं कल्पनेरहित । तया नांव भगवंत । देवपणाची मात । तेथें नाही' ।।८–१–५२।। अशी निर्विकल्प भगवंताची व्याख्या करून 'तैसा भगवंती मिळाला । तो न वचे वेगळा केला' ।।८–८–२२।। असा सिद्धांत मांडला आहे. येथे परमात्मा आणि भगवंत यांचें परब्रह्म म्हणूनच वर्णन केलेले दिसतें. कारण पुढील २८–५९–६५ ओव्यांत निर्गुण, निर्विकल्प परब्रह्माचेच स्पष्ट उल्लेख आहेत.

एकंदरीत परब्रह्म=आत्मा=परमात्मा=भगवंत असें समीकरण मांडावे, समर्थांना यांचा एकार्थ मान्य आहे असें गृहित धरावे तर अकराव्या दशकांत

परमात्मा विकारी व चंचल आहे असें वर्णन केलें आहे. त्यामुळे श्रोता, वाचक वा साधक गोंधळांत पडतो. एके ठिकाणी 'तैसा जाणिजे जगदीश। सबाह्य अभ्यंतरी।।' (९-२-१२) असे परब्रह्माला जगदीश नामाभिदान दिलें आहे.

नामातीत-अनिर्वचनीय-निर्गुण वस्तूलाहि ती आकलन होण्यासाठी, निश्चित अर्थ प्राप्त होण्यासाठी नांवें द्यावी लागतात. शून्याची कल्पना येण्यास 'बिंदुलें' काढून दाखवावें लागतें हें खरें. तथापि त्याच अर्थ प्राप्तीसाठी हीं नांवें वा हे संकेत सर्व ठिकाणी सारख्याच अर्थानें वापरणे आवश्यक असते. नाहीतर समजुतीचा घोटाळा होतो. असो.

**परब्रह्म आकलनाची युक्ति**

या निर्गुण-निराकार-अनिर्वाच्य परब्रह्माच्या व्यापक स्वरूपाची थोडीबहुत कल्पना येण्यास, परब्रह्म स्वरूप आकलन होण्यास समर्थ एक युक्ति सुचवितात.

'वृत्ति ऐसी वाढवावी। पसरून नाहीच करावी।
पूर्ण ब्रह्मास पुरवावी। चहूंकडे' ।।९-९-३५।।
'वस्तु वृत्तीस कवळे। तेणे वृत्ति फाटोन वितुळे।
निर्गुण आत्माच निवळे। जैसा तैसा' ।।९-९-३७।।

ही फाटून नाहीशी झालेली बुद्धीची वृत्ति म्हणजे निर्वृत्तिक अवस्था, म्हणजेच निर्गुण परब्रह्म होय.

ब्रह्मांडाचा खरोखरीच विचार केला तर मनुष्याची बुद्धि-विचार शक्ति-निश्चितच फाटेल. पृथ्वीपासून सूर्य नऊ कोटी मैल अंतरावर आहे, हें ऐकूनच आपण अवाक् होतो. पण आपल्यापासून आपल्याला सर्वांत जवळ असलेल्या ताऱ्याचें अंतर पृथ्वी व सूर्य यामधील अंतराच्या अडीच लक्ष पट आहे! आपण रात्री आकाशगंगा नावाचा जो ताऱ्यांचा पट्टा पाहतो त्यातलाच आपला सूर्य हा एक लहानसा तारा आहे. आणि या आकाशगंगेच्या पट्ट्यांत सुमारे एक अब्ज तारे असावेत असा ज्योतिर्विदांचा अंदाज आहे. अवकाशाच्या जेवढ्या क्षेत्रांत हे तारे पसरले आहेत, तेवढ्याची लांबी इतकी मोठी आहे की त्याच्या एका टोका-पासून दुसऱ्या टोकास जावयासाठी प्रकाशाला एक लाख वर्षे लागतात. अँड्रोमिडा नामक तारकापुंजांत शंभर अब्ज तारे असून तो आपल्यापासून वीस लक्ष प्रकाशवर्षे दूर आहे (एका प्रकाशवर्षाचे अंतर म्हणजे दर सेकंदाला एक लक्ष शहाऐंशी हजार मैल वेग.) या ब्रह्मांडाच्या 'विश्वरूपांत' आपली पृथ्वी आणि त्यांतील एका जागेवरचे 'आपण' याचा विचार अखंड चिंतनाने केला तर समर्थ म्हणतात तशी अनुभूति येईल असा विचार मनांत येतो. 'वृत्ति फाटोन वितुळे' याची प्रचिती या अभ्यासाने यावी!

**खरा परीक्षवंत कोण ?**

तेराव्या दशकांतील ' सारासार निरूपण ' नामक समासांत ' परब्रह्मातें ' अशा चौथ्या चरणाने २२ ते २३ ओव्यांत परब्रह्माचे वर्णन आहे. गीतेंतील दुसऱ्या अध्यायांतील आत्मवर्णनाशी त्याचें सादृश्य आहे. त्या विवेचनाचा समर्थ खालील-प्रमाणे मार्मिक समारोप करतात,

' खोटें सांडून खरे घ्यावे । तरीच परीक्षवंत म्हणावे ।
असार सांडून सार घ्यावे । परब्रह्म तें ' ।।२७।।

विसाव्या दशकाचा शेवटचा दहावा समास ' विमलब्रह्म निरूपणाचा ' लिहून समर्थांनी दासबोधाचा व ब्रह्मनिरूपणाचा शेवट केला आहे. जाता जाता, साधकांविषयी वाटणाऱ्या अपार कारुण्याने–जिव्हाळ्याने समर्थ परब्रह्म ओळखण्याची युक्ति सांगतात,

' कल्पनेतीत निरंजना । विवेके वोळखावें ' ।।२४।।

श्री ज्ञानेश्वरांचा जसा ' अत्यादरू विवेकावरी ' आहे, ज्ञानेश्वरींत ' विवेका ' चें दर्शन जसे निरनिराळ्या– विवेक तंतु, विवेक तरू, विवेक जात, विवेकामृतसागरू, विवेकाची गोठी, विवेकदीप, विवेकाचे गांव, विवेकवल्ली नावांनी होते तसेंच दासबोधांत ' विवेक ' अनेकदा भेटतो. नव्हे 'विवेक' हा दासबोधांतील परवलीचा, गुरुकिल्लीचा शब्द आहे.

अध्यात्मज्ञानासारखे कठीण विषय आपण केवळ प्रभूकृपेनेच निरूपण करूं शकलो असे समर्थ विनयाने म्हणतात,

' भक्ताचेनि साभिमाने । कृपा केली दाशरथीने ।
समर्थ कृपेची वचनें । तो हा दासबोध ' ।।२०–१०–३०।।

**माया**

श्रीमद् आद्य शंकराचार्यांप्रमाणे समर्थांनी मायावादाचा आपल्या वाङ्मयांत पूर्णपणें स्वीकार व पुरस्कार केला आहे. गुरुदेव रानडयांनी आपल्या Constructive survey of Upanishadie Philosophy या ग्रथांत मायेचा मूळापासूनच सांगोपांग विचार केला आहे. परब्रह्माला निर्गुण – निराकार – निष्क्रिय – निरावय – निरूपाधिक म्हटल्यावर, दिसते आहे या नामरुपात्मक विश्वाची उत्पत्ति कोणापासून ठरवावयाची अशी अडचण भासल्यावर, अद्वैत सिद्धीसाठी मायावादाचा आश्रय करावा लागला हें उघड आहे. श्री शंकराचार्य जेव्हा ' ब्रह्म सत्य जगत् मिथ्या' म्हणतात तेव्हां सर्वसामान्य लोक त्याचा गैरसमज करुन घेतात. दिसतें हें नामरुपात्मक जग मिथ्या आहे म्हणजे तें खोटे आहे, तें मूळांत नाहीच असें आचार्यांना निश्चितच म्हणावयाचे नाही. ' मिथ्या' याचा अर्थ नश्वर– अशाश्वत– नाशिवंत – असा घ्यावयाचा आहे. नेमका हाच अर्थ समर्थांना अभिप्रेत दिसतो. नाहीतर या मिथ्या–खोटया–जगांत त्यांनी वारंवार गौरविलेल्या सद्गुणांना

प्रयत्नवादाला, पुरूषार्थाला, सामर्थ्ययोगाला, आणि मानवतावादाला अर्थच काय राहणार ? सामान्य लोकांनी किंवा तर्कट बुद्धीवाद्यांनी मायावादाचे विकृत स्वरूप दाखवून त्यावर नैराश्यवादाचा, पौरूषत्वहीनतेचा, निष्क्रियतेचा व पलायनवादाचा अर्थ लादला तर त्याला आचार्य, ज्ञानेश्वर किंवा समर्थ रामदास तरी काय करणार ? असोत.

महामाया

पहिल्या दशकाच्या तिसऱ्या 'शारदास्तवन' समासापासून तो अखेरी विसाव्या दशकापर्यंत या मायेचे दर्शन या ना त्या रूपांत – विषयांत – श्रोत्यांना सतत घडत राहते. श्री शारदेला 'वेदमाता', 'ब्रह्मसुता' 'शब्दमूळ वाग्देवता' म्हणून जसें गौरविले आहे तसेच तिला 'माहमाया' आणि 'महापुरूषाची भार्या' म्हटले आहे. लगेच पुढे 'परब्रह्मसूर्याची प्रभा,' 'लावण्य स्वरूपाची शोभा' अवेक्त पुरूषाची वेक्ती' 'मोक्षश्रिया महामंगळा,' 'जे सत्रावी जीवनकळा' 'लावण्यखाणी' इ. गोड काव्यात्मक नावांनी या 'महामाये' चें वर्णन केले आहे.

या मायेचा प्रताप कसा ? परब्रह्मालाच परमात्मा हें नांव केव्हां प्राप्त होतें ? तर मायेची उपाधि लागल्यावर. अशी ही माया आहे तरी कशी ? तर 'जे अनंत माया वैष्णवी । न कळे नाटक लाघवी । जे थोर थोरासी गोवी । जाणपणें ।।२३।। पण पुढच्या समासांत पहिल्याच ओवींत समर्थ श्रोत्यांना अभय देतात. 'आता सद्गुरु वर्णवेना । जेथे माया स्पर्शो सकेना ।' जशी परब्रह्मापुढे माया टिकूं शकत नाही, तशी गुरुपुत्राला तो स्पर्श करूं शकत नाही. सद्गुरु वर्णनाला ती निरुपयोगी ठरते. कारण 'लज्यासमान' होते. सूर्यप्रकाशापुढे अंधार कसा टिकणार ? ब्रह्मज्ञानाचा प्रकाश पडताच मायेचा अंधार नष्ट होतो. 'अनावर माया हे वोसरे ।' माया सारासार विचारानेच, विवेकाच्या बळावरच नाहीशी होते. मग 'परब्रह्म तें हि निवळे । अंतर्यामी ।।' (१-१०-१४)

महात्मा कबीरांप्रमाणे समर्थ एके ठिकाणी मायेचे वर्णन करतात. "मनुष्यांची बाजीगरी । राक्षसांची वोडवरी । भगवंताची नानापरी । विचित्र-माया' 'कबीर माया मोहनी, माँगो मिलै न हाथी । मनह उतारी झूठ करि, तब लागी डोलै साथि' ।।९।।

(माया की अंग : कबीर ग्रंथावली)

मायोद्भव

सहाव्या दशकांतील 'मायोद्भव' नामक तृतीय समासांत माया आणि ब्रह्म या दोन्ही तत्त्वांचा विचार आला आहे. जें जें नामरूपाला आले तें तें नाशिवंत आहे. आणि जें जें नाशिवंत आहे तें तें मायिक आहे, असे वेदान्ती म्हणतात. समर्थांच्या भाषेत, 'अविनाश तें ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण । सगुण आणि निर्गुण । कालवले ।।' विश्वांत या सगुण निर्गुणाचेच मिश्रण म्हणजे

कालोवा झाला आहे. परंतु ' एकमेवाद्वितीयम् ' अशा परब्रह्मावाचून जर मुळांत काही नव्हतेच तर ही माया म्हणजे द्वितीय पदार्थ प्रथम आलाच कोठून ? या शंकेचे समर्थ निराकरण करतात.

'ऐसी आत्मस्थिती संचली । तेथे माया कैसी जाली ।
जैसी आकाशी वाहिलो । झुळुक वायोची' ॥१२॥

आकाशांत झुळुक येते व जाते परंतु आकाश कायमच असते, त्याप्रमाणे परब्रह्म शाश्वत आहे. परंतु माया माता येते व जाते. म्हणजे ती चंचळ – अशाश्वत आहे.

' साधु निश्चय करिती येक । आत्मा सर्वत्र व्यापक ।
येंर हे अवघेचि माईक । सचराचर' ॥ ॥६–४–१३॥

समर्थ पुष्कळवेळा परब्रह्म व आत्मा शब्द समानार्थी वापरतात.

मायाब्रह्माची तुलना

सहाव्या दशकांतील 'माया ब्रह्मनिरूपण' नामक पांचव्या समासांत शाश्वत ब्रह्म आणि अशाश्वत माया यांची समर्थानी सविस्तर तुलना केली आहे ती अशी. ' ब्रह्म निर्गुण, निराकार, अपरंपार तर माया सगुण, साकार आणि मर्यादित. ब्रह्म निर्मळ, निश्चळ, निरूपाधिक तर माया चंचळ, चपळ व सोपाधिक. माया दिसते तर ब्रह्म दिसेना. माया भासते तर ब्रह्म भासेना. माया नाशिवंत तर ब्रह्म अविनाशी. माया रचे, खचे तर ब्रह्म रचेना व खचेना. अज्ञानास माया रुचतें तर ब्रह्म रुचत नाही. माया उपजे – मरे – धरे – फुटे – तुटे – विटे म्हणजे विकारी– तर ब्रह्म अविनाशी व निर्विकारी. माया सर्व करते तर ब्रह्म कांहीच करीत नाही. माया नाना रुपें धारण करते, तर ब्रह्म अरूपच आहे. माया लहान तर ब्रह्म थोर. माया असार तर ब्रह्म सार.' मग समर्थ या विषयाचा समारोप करतात.

' सकळ माया विस्तारली । ब्रह्मस्थिती अच्छादली ।
परि ते निवडूनि घेतली । साधु जनी ॥' (६–५–११)
' माया सांडुनि अनुभविजे । नीर सांडूनि क्षीर सेविजे ।
माया सांडुनि अनुभविजे । ब्रम्ह तैसें ॥' (६–५–१२)

असा श्रोत्यांना उपायही सुचवितात. 'पुढे ब्रम्ह अप्रत्यक्ष – सम – अलक्ष-तर माया प्रत्यक्ष, विषम व लक्ष आहे. माया पूर्वपक्ष तर ब्रम्ह सिद्धान्त. माया अनित्य तर ब्रम्ह नित्य' इ. तुलना करून समर्थ या विवरणाचें सार सांगतात.

' नाना रूप नाना रंग । तितुका मायेचा प्रसंग ।
माया भंगे ब्रह्म अभंग । जैसे तैसे ' (६–५–२२)

'सान्या चराचरांत ही माया परमेश्वर जोडी सबाह्य अभ्यंतरी भरली आहे,' असें शेवटी समर्थ सांगतात.

**कल्पनावाद**

सहाव्या समासांत कल्पनावाद आहे.

' येके कल्पनेचे पोटीं । होति जाती अनंत सृष्टी ।
तया सृष्टीची गोष्टी । साच केवी ॥' (६-६-३१)

सृष्टि ही ईश्वराची कल्पना आहे. ती खरी कशी असणार ?

' म्हणोनि सृष्टी नासिवंत । जाणती संत महंत ॥' (६-६-५४)

' सर्वं खल्विदं ब्रम्ह ' हें सर्व विश्व ब्रम्हच आहे, हा अन्वय आहे आणि 'ब्रम्ह सत्य जगन्मिथ्या ' म्हणजे ब्रम्हाव्यतिरिक्त सर्व नामरूपात्मक विश्व मिथ्या- विनाशी म्हणून मायिक आहे हा व्यतिरेक आहे. केवळ काल्पनिक सृष्टीमुळे हे अन्वय व्यतिरेक संभवतात. म्हणून सृष्टीप्रमाणे तेहि काल्पनिक आहेत.

**मिथ्यावाद**

' दृश्यनिर्शन नाम ' नावाच्या आठव्या समासांत अनेक दृष्टांत दृश्याचें- नामरूपात्मक विश्वाचे- निरसन करून मायेचे मिथ्यात्व दाखविलें आहे.

' देखिलें तें सत्यचि मानावें । हें ज्ञात्याचे देखणें नव्हे ।
जडमूढ अज्ञान जीवें । हें सत्य मानिजे ॥'

' मृगजळ ', ' स्वप्नांतील द्रव्य ', बहुरूप्याचे कृत्य ' हें खरें नव्हे.

' सृष्टी बहुरंगी असत्य । बहुरूपाचें हे कृत्य ।
तुज वाटे दृश्य सत्य । परी हे जाण अविद्या ' ॥१२॥
' जितुके बुडबुडे उठती । तितुक्यांमध्ये रूप दिसती
क्षणामधे फुटोन जाती । रूपें मिथ्या ' ॥१७॥

माया म्हणजे ' मिथ्या बाजीगरी ' (गारूडी विद्या) आहे. ती दिसायला खरी दिसली तरा ' जाणित्यानें ' ती खरी मानू नये. भगवंतांची नानापरींची विचित्र माया आहे. ' पंचवटिकेसि मृगाचो । पाठी घेतली रामें ॥' कृष्णालाही मायेने फसविण्याचा प्रयत्न केला. ' कृष्णें दैत्य किती वधिले । कपट रूपी ॥' प्रभू श्रीरामचंद्रालाही या मायेने भूल पाडण्याचा यत्न केला. ' कैसे कपट रावणाचे । सिर केले मावेचें ।'

माया खऱ्यासारखीच दिसते परंतु विचारांती नाश पावते. ' मिथ्याचि आभासे । निरंतर पाहतां ' ॥३४॥ म्हणून ' परब्रम्ह तें शाश्वत । माया तेचि अशाश्वत । ऐसा बोलिला निश्चियार्थ । नानाशास्त्री ' ॥४८॥

जगाला ' मिथ्या ' म्हणण्याचें कारण तें आज ना उद्या विनाश पावणारे म्हणजे अशाश्वत आहे, म्हणजेच ' मायिक ' आहे असे वेदान्ताने प्रतिपादले आहे. हाच सिद्धांत दहाव्या ' अनुर्वाच्य' नामक समासांत, परब्रम्हाच्या दृष्टीने मायेला खरे अस्तित्व नाही, असा प्रतिपादन केला आहे. त्याचे सार असें आहे–

' वेगळेपणाची माता । हे लटिके बंधेची सुता ।
म्हणोनिया अभिन्नता । मुळीच आहे ' ।।३५।।

या समासाचा मतितार्थ, ' अनुर्वाच्य सुख उरले । शब्दातीत ' ।।४२।।

### मूळपुरुष आणि मूळमाया

सातव्या दशकांतील पहिल्या ' मंगलाचरण ' समासांत गणपतीला ' मूळपुरुष ' तर शारदेला ' मूळमाया ' म्हटले आहे. आणि ती ' मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ' ।।१०।। अशी विशेषता दाखविली आहे. कारण ब्रम्हापासून मूळमाया व मूळमायेपासून गुणमाया. ह्याच गुणमायेला. मूळपुरुष म्हणतात. अर्थात् मूळमाया ही ब्रम्हाची दुहिता असून मूळपुरुषाची जननी आहे, माउली आहे.

ओव्या ५५ ते ५९ पर्यंत मायेचे नाना प्रकारे वर्णन आहे. ' माया विष्णूचे स्वरूप ' म्हटले आहे. विष्णूचें स्वरूप म्हणजे सगुण ब्रम्हाचे स्वरूप. ब्रम्हाचे सगुण रूप म्हणजे माया. आत्मज्ञानावाचून मायावध किंवा मायेची मगरमिठी सुटणे शक्य नाही, असा सिद्धांत पुन्हा प्रतिपादतात.

माया सृष्टीची रचना । माया आपुली कल्पना ।
माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ' ।।५९।।

सातव्या दशकांतल्या चौथ्या समासांत ही ' मायादेवी ' भ्रामक, नामरूपांचे अवडंबर, आकाशांत ढगांचे डोंगर दिसावेत, त्याप्रमाणे दाखवितें असें वर्णन केले आहे.

### मुक्तबद्ध हा विनोद

सहावा ' बद्धमुक्त निरुपण' समास आहे. मुक्त आणि बद्ध याहि केवळ कल्पनाच होत. ह्यांचा पूर्ण विसर पडून शेवटी त्या विसरलेपणाची जाणीवही तेथे नाहीशी होते. कारण बद्धता व मुक्तता ही देहाकडे– देहात्मभावाकडे आली. आणि देहच जर आपण नाही तर बद्ध–मुक्त या द्वंद्वाशी 'आपला' म्हणजे आत्म्याचा संबंधच काय ?

' तत्वज्ञाता परमशुद्ध । तयासी नाही मुक्तबद्ध ।
मुक्तबद्ध हा विनोद । मायागुणें' ।।५६।।

' असो बद्धता आणि मुक्तता । आली कल्पनेच्या माथा ।
ते कल्पना तरी तत्वता । साच आहे' ॥६०॥

केवळ आत्मज्ञानाने म्हणजे मायातीत परब्रह्मज्ञानानेच ही दुस्तर माया निरस्त होते. जोव बद्ध मुक्ततेच्या अतीत होतो.

### विवर्तवाद आणि अजातवाद

आठव्या दशकांत 'सूक्ष्म आशंका' नामक दुसऱ्या समासांत तत्त्वज्ञानांतील – वेदान्तांतील– एक कूट प्रश्न समर्थ उपस्थित करतात. ' येक ब्रम्ह निराकार । मुक्त अक्रिये निर्विकार । तेथे माया वोडंबर । कोठून जाली' ॥४॥ आणि ' विवर्तरूप भासे ।' असे विवर्तवादाने त्याचे उत्तर देतात आणि ' मायेस निर्मिता सर्वेश्वर । तो एकचि आहे' ॥२३॥ असा सिद्धान्त प्रतिपादन करतात.

'सूक्ष्म आशंका' नामक समासात वर उपस्थित केलेल्या प्रश्नाला श्री गौडपादाचार्यांच्या अजातवादाने उत्तर दिलें आहे. ' अरे जें जालेंचि नाही । त्याचो वार्ता पुससी काई ।' असें तिसऱ्या समासांत पहिल्याच ओवीत म्हणतात. या समासांत रज्जुसर्प, जालतरंग, मृगजळ, शुक्तिरज. पाण्याची गार, सिंधुलहरी, डोळयांतली कृष्णतारा, सोन्याचे अलंकार, तंतुपट, कासवाचा हातापायांचा विस्तार, थिजलेलें तूप, खाडीतील मीठ, बिंबप्रतिबिंब इत्यादि काही विवर्तवादाचे व द्वैतवादाचे अनेक दृष्टांत देऊन 'वर्णवेना सहस्त्रफणी' ला सुद्धा भगवताचो विचित्र करणीं वर्णवेना असें म्हणून 'परमात्मा परमेश्वरू । सर्वकर्ता जो ईश्वरु । तयापासूनि विस्तारू । सकळ जाला' ॥१२॥

' ऐसो अनंत नामे धरी । अनंत शक्ती निर्माण करी ।
तो चि जाणावा चतुरी । मूळपुरुष' ॥१३॥

### मूळ मायेचे स्वरूप

परमात्मा – परमेश्वर – ईश्वर म्हणजेच मूळपुरुष होय. हाच मायोपाधिक झाल्याने म्हणजें निश्चळ ब्रम्हापासून निराळा झाल्यामुळे चंचळ ब्रम्हापर्यंत किंवा शबल ब्रह्मापर्यंत येतो. या मूळपुरूषाला ओळखण्याचो खूण कोणती ? त्या मूळ-पुरूषाची वोळखण । हे मूळमाया चि आपण । सकळ काही कर्तेपण । तेथें चि आले ॥१४॥ या परमेश्वर–मूळपुरूष–मूळमाया–यांनाच 'शिव' म्हटले आहे. जीवाशिवाची व्याख्याच समर्थांनी केली आहे.

' अविद्या गुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव ।
मूळमायागुणें देव । बोलिजे तो ॥१८॥

याच शिवाला 'सर्वांचा ईश ।' 'अनंत नामी जगदीश।' म्हटले आहे. म्हणजे मूळपुरुष

मूळमाया – जगदीश – शिव – परमात्मा – परमेश्वर – सर्वेश्वर – ईश्वर भगवंत– एकच होत.

' मूळमायेचें चळण । तें चि वायोचें लक्षण ।' ।।५६।।

' मूळ मायेचें लक्षण । तें चि पंच भूतिक जाणा ।।५८।।

' अहं ऐसी स्फूर्ति जाली । ते चि माया ।।५९।।

अशी मायेची लक्षणे सांगून तिच्या उत्पत्तीची मीमांसा केली आहे. बहुभवनाची म्हणजे ' मी एक आहे तो बहुविध व्हावे' अशी परब्रह्माच्या ठिकाणी होणारी स्फूर्ति म्हणजे अहं. ही स्फूर्ति आकाशांत निर्माण होणाऱ्या वायूच्या झुळुकीसारखी म्हणजे चंचळ– अशाश्वत– चपळ आहे.

दहाव्या दशकाच्या सहाव्या ' भ्रमनिरूपण' नामक समासांत 'मी तूं पणा' 'उपासना' या बरोबर 'ईश्वरभाव' हाही भ्रम असल्याचें श्रोत्याला बजावले आहे. निर्गुण ब्रह्माशिवाय 'अवघे भ्रमरुप' असा सिद्धांत पक्का केला आहे.

नवव्या समासाच्या सुरवातीस 'आकाशी वायो जाला निर्माण । तैसी ब्रम्हीं मूळमाया जाण ।' असें मायेंचे स्वरूय पुन्हा स्पष्ट करून पुरुष प्रकृतीचे विवेचन करतात.

' वायोस म्हणती प्रकृति । आणि पुरुष म्हणती जगज्योती<br>
पुरुषप्रकृती शिवशक्ती । याचेच नांव ।।८।।

ब्रम्ह–माया, आदि पुरुष–प्रकृति; शिवशक्ती एकच होत.

याच मूळमायेला दहाव्या समासांत जगदेश्वरी, परमेश्वरी, विश्वेश्वरी, त्रैलोक्य जननी इत्यादी नांवानी वर्णिले आहे.

' तो पुरुष ना सुंदरी । बाळतारुण्य ना कुमारी ।<br>
नपुंसकाचा देहधारी । परी नपुसक नव्हे ।।४३।।

म्हणजे नपुंसक शरीराचा धारण करणारा जरी आत्मा आहे तरी तो नपुंसक नव्हे. वस्तुत: आत्मा सर्वांहून निराळा आहे. परब्रम्ह स्वरूप आहे, हें मायेचें कर्तृत्व, मायेचें लाघव, मायेचे पटल केव्हा उमगेल ?

' निश्चल परब्रह्म येक । चंचळ जाणावें माईक ।<br>
ऐसा प्रत्यय निश्चयात्मक । विवेकें पहावा ' ।।४९।।

एकंदरीत पाहतां हा ' जगज्जोतिदशक ' अत्यंत महत्वाचा आहे. समर्थांची ' तत्त्वसृष्टि ' येथे स्पष्ट होते. श्री शंकराचार्य आणि श्रीज्ञानेश्वर दांनी आवर्जून प्रतिपादन केलेले निर्गुण–निराकार– निरवयन–निरुपाधिक परब्रह्म तत्त्व हेंच एकमेव पारमार्थिक सत्य आहे ह्यावर समर्थ रामदासांनी भर दिलाच आहे. परंतु त्याच सोबत दुय्यम किंवा सापेक्ष सत्य म्हणून मायातत्त्वालाही

आपल्या निरुपणांत महत्व दिले आहे. परब्रह्म म्हणजे निश्चल तत्त्व होय. तर माया प्रकृति हें चचलब्रह्म किंवा चंचल तत्त्व होय. 'माया निरूपण' दासबोधाइतके सविस्तर अन्यथा सापडावयाचे नाही.

**मायानदी आणि चंचलनदी**

अकराव्या दशकांत चंचलनदी निरूपण नामक सातवा समास आहे. ज्ञानेश्वरीतील (अ. ७–१४) मायानदीच्या सविस्तर रूपकाची हा समास आठवण करुन देतो,

> ' येथे येकचि लीला तरले । जे सर्वभावे मज भजले ।
> तयां ऐलीच थडी सरलें ॥ मायाजळ ॥ (ज्ञा. ७–९७)
> ' उगमा पैलिकडे गेले । तेथे परतोन पाहिले ।
> तंव तें पाणीच आटले । काही नाही ॥' दासबोध–२१

चौदाव्या दशकाच्या 'माया निरूपण' नामक दहाव्या समासांत आकाशांतील गंधर्व नगरें, बहुरुप्याचें वैभव, दसऱ्याचे सोने, मेलेल्यांचा महोत्सव, स्मशानांतील रुदन, राखेला लक्ष्मी संबोधणें, बालविधवेचे वटसावित्री नांव, दशावतार नाटकांतील कृष्णाचे सोंग घेऊन फाटक्या तुटक्या वस्त्राची इच्छा करणारा इ. अनेक दृष्टांतानी मायेचा खोटेपणा– नसतेपणा– दाखविला आहे. दशक पंधरा, सतरा, अठरा आणि वीसमध्यें मायेचा विषय याच पद्धतिवर चर्चिलेला आहे.

> ' बहुजिनसी मूळमाया । नाहां कारण ब्रह्मांडीची काया ।
> ऐसिया सूक्ष्म अन्वया । पाहिले चि पाहावें ॥' (२०–३–१२)

अशी श्रोत्यांना सूचना केली आहे.

> ' या कारणे सर्वसंकल्प । सोडून द्यावा ॥' (२०–४–२०)

मूळमाया निरसनाचें– मायापाशांतून सुटण्याचे– संकल्प शून्यता, कल्पना-शून्यता हें मुख्य साधन सांगितले आहे.

**परमात्मा**

समर्थांनी केवल–शुद्ध–निर्गुण–परब्रह्माचें वर्णन किती तऱ्हेनें केले आहे, तें आपण पाहिले. निर्गुण–निराकार–निरावयव–परब्रह्माची उपासना करतां येत नाहीं. किंवा भक्ति करता येत नाही. तें निर्गुण परब्रह्म स्वेच्छेनेंच (नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानानुसार) किंवा मायेच्या उपाधीमुळें जेव्हा सगुण–साकार–सावयव– होते म्हणजे शबल ब्रह्म किंवा चंचळ ब्रह्म होते तेव्हाच उपास्य-उपासक– उपासना अशी त्रिपुटी तयार होऊन उपासना शक्य होते, किंवा भगवंत, भक्त, भक्ति, अशी त्रिपुटी तयार होऊन भक्ति घडते. परब्रह्म आणि परमात्मा किंवा परमेश्वर हे शब्द क्वचित ठिकाणी एकार्थक दिसले तरी समर्थ हे या दोहोमध्ये भेद मानतात. परब्रह्म हे केवल व शुद्ध आहे, निश्चल व निर्गुण

आहे, परमात्मा, परमेश्वर, ईश्वर, जगदीश्वर, सर्वेश्वर, भगवंत हे मायोपाधिक असल्यामुळें शबल–सगुण–ब्रम्हाची स्वरूपें आहेत.

ईश्वर स्वरुपाविषयीं मतमतांतरें पुष्कळच आहेत. ईश्वरप्राप्ति–प्रसन्नता–कृपा कशानें होईल हें सांगणारे नाना संप्रदाय, नाना पंथ व नाना मतें प्रचलित आहेत. समर्थांच्या काळांत होतीच.

' बहुदेव बहुभक्त । इच्छा जाले आसक्त ।
बहु ऋषी बहुमत । वेगळाले ।।' (८–१–१०)

ईश्वरवादाचा सविस्तर विचार दासबोधांत आहे. नरजन्माला येऊन ईश्वराला न ओळखणाऱ्यावद्दल,

जेणें संसारी घातलें । आवघे ब्रम्हांड निर्माण केले ।
त्यासी नाही वोळखिले । तो चि पतित ।। (६–१–१४)
म्हणोनि देव वोळखावा । जन्म सार्थकचि करावा ।
न कळें तरी सत्संग धरावा । म्हणिजे कळें ।।१५।।

असे देव ओळखण्याचें महत्व आणि उपाय ' देव शोधन ' नामक समासांत सांगतात आणि पुढे संताची व्याख्या करतात.

' जो जाणेल भगवंत । तया नाव वोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ' ।।१६।।

समर्थ रामदास हे गोस्वामी तुलसीदासांप्रमाणे थोर रामभक्त आणि सगुणोपासनेचे मोठे पुरस्कर्ते होते हें निर्विवाद होय. परंतु फक्कड महात्मा कबीर आणि संत नामदेव यांच्याप्रमाणें ते अंधश्रद्धेवर, विपरीत–अज्ञानमूलक–मूर्तिपूजेवर कठोर घणाघात करायला, दांभिक देवभक्तांची हजेरी घ्यायला कमी करीत नाहीत.

' पाषाणाचा देव केला । येके दिवसी भंगोन गेला ।
तेणें भक्त दुखावला । रडे पडे आक्रंदे' (६–६–३३)
' देव हाटपला घरीं । येक देव नेला चोरी ।
येक देव दुराचारी । फोडिला बळें' ।।३४।।

या टीकेबरोबर समर्थांनी तत्कालीन राजकीय–धार्मिक व सामाजिक परिस्थिती कशी होती, मूर्ति–मंदिरे–देवपूजा कशी धोक्यांत होतीं, त्यांची कशी विटंबना होत होती हे दाखविले.

' येक देव जापाणिला (भ्रष्ट केला) । येक देव उदकी टाकिला ।
येक देव नेऊन घातला । पायातळी ' ।।३५।।

समर्थांचा कटाक्ष कल्पनेचा देव करण्यावर आहे.

' कल्पनेचा केला देव । तेथे जाला दृढभाव ।
देवालागी येता खेव (अपाय) । भक्त दुःखे दुःखावला ।'

समर्थ स्पष्टच म्हणतात, ' धातु पाषाण मृत्तिका ।
चित्रलेप काष्ठा देखा । तेथे देव कैसा मूर्खा । भ्रांति पडली' ।।४४।।

मूर्तिपूजेबद्दल–सगुणोपासनेबद्दल– पुढे म्हणतात,

' परी त्या देवाचिया खुणा । वेगळ्याचि ' ।।४५।।

सगुणोपासनेबद्दल समर्थांनी निःसंदिग्धपणें आपला अभिप्राय खालील प्रसिद्ध ओवीत प्रकट केला आहे.

' सगुणाचेनि आधारे । निर्गुण पाविजे निर्धारे ।
साराचार विचारें । संतसगें ।।५५।।

उत्तर भारतात– हिंदी साहित्यांत– संतांचे ' सगुणिया ' आणि ' निर्गुणिया ' असे स्वतंत्र भेदच करतात. गोस्वामी तुलसीदासांना ' सगुणिया ' ठरविणार तर महात्मा कबीरांना ' निर्गुणिया ' म्हणणार. श्रीज्ञानेश्वर म्हणतात,

' तुज सगुण म्हणो की निर्गुण रे । तू एक गोविंदु रे ।।'

त्याप्रमाणेंच समर्थ रामदासांनी सगुणाचें महात्म्य गौरवून मग निर्गुण परब्रह्माची अमाप स्तुति केली आहे. परमार्थ मार्गात दोन्ही मार्गांची जोड-सांगड सर्वच मराठी सतांनो उत्तम तऱ्हेने घातली आहे.

**खरा देव कोणता ?**

' देव कोणासी म्हणावे । कैसे तयासी जाणावे ।।'

असा प्रश्न उपस्थित करून समर्थांनी आपली ईश्वरविषयक संकल्पना किंवा अभिप्राय खालीलप्रमाणे स्पष्ट शब्दांत व्यक्त केला आहे.

जेणे केले चराचर । केले सृष्टयादि व्यापार ।
सर्वकर्ता निरतर । नाम ज्याचे ।। ८–१–१७ ।।
ब्रह्मा विष्णु आणी हर । हे जयाचे अवतार ।
तोचि देव हा निर्धार । निश्चयेसी ।। ८–१–२१ ।।
सर्वकर्ता तो चि देव । पाहो जातां निरावेव ।
ज्याची कळा लीळा लाघव । नेणति ब्रह्मादिक ।। ८–१–२४ ।।

निर्गुण परब्रह्माच्या ठिकाणीं तो निष्क्रिय असल्याने कर्तृत्व नाही. ' ज्याने हे चराचर निर्माण केले त्या सर्वकर्त्याला देव म्हणतात. तो वस्तुतः निरावयव आहे. देव्हाऱ्यांतील देव उठून ब्रह्मांडाची व जीवाची निर्मिती करीत नाहीत. देवाने ही पृथ्वी निर्माण केली.' असे सांगून ' तिचे पोटी पाषाण होती । तयासचि देव म्हणती । ते विवेकहीन ।।२९।। असें आपलें मत प्रकट करतात.

सृष्टीचे पूर्वी देव होता. त्यानें नंतर सृष्टि निर्मिली म्हणून जग किंवा सृष्टि म्हणजे देव नव्हे.

' तैसे जग निर्मिले जेणें । तो वेगळा पूर्णपणें ।
येक म्हणती मूर्खपणें । जग तोचि जगदीश ' ॥४०॥

जग आणि जगदीश यांच्या संबंधाचा आपला सिद्धान्त समर्थ आणखी स्पष्ट करतात तो असा–

' एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा ।
तो सर्वांमधे परी निराळा । असोन सर्वी ' ॥८–१–४१॥

' म्हणोनि भूतांचा कर्दमु । यासी अलिप्त आत्मारामु ।
अविद्यागुणे मायाभ्रमु । सत्यचि वाटे ॥८–१–४२॥

श्रीमत् शंकराचार्यांप्रमाणे समर्थांचा जगताबद्दल दृष्टिकोन आहे.

' म्हणोनि जग मिथ्या सत्य आत्मा । सर्वांपर जो परमात्मा ।
अंतर्बाह्य अंतरात्मा । व्यापूनि असे ' ॥४४॥

श्री ज्ञानेश्वरांप्रमाणें 'अवघाचि आत्मा' किंवा श्री शंकराचार्यांप्रमाणे 'अवघेंचि ब्रह्म' असा समर्थांचा अद्वैती सिद्धांत आहे. समर्थ म्हणतात, सर्वांमध्यें असून सर्वांपेक्षा निराळा असणारा जो परमात्मा किंवा अंतरात्मा

' तयास म्हणावे देव । येर हे अवघेचि वाव ।
ऐसा आहे अंतर्भाव । वेदांतीचा ॥ ४५ ॥ येथे परमात्मा व अंतरात्मा हे शब्द सगुण किंवा शबल ब्रह्माला उद्देशून वापरले आहेत. त्यालाच 'देव' म्हटले आहे. हा मायोपाधिक असल्यामुळे या सगुण परमात्म्याकडे किंवा देवाकडे जगाचें कर्तृत्व जाते वा आहे. यालाच पुढच्या ओळीत भगवत म्हणून संबोधिले आहे.

' पदार्थ वस्तु नासिवंत । हें तो अनुभवासि येत ।
या कारणे भगवंत । पदार्थ वेगळा ' ॥ ४६ ॥

म्हणजे आत्मा, परमात्मा, अंतरात्मा, जगदीश, देव आणि भगवंत हे सर्व शब्द जगत् निर्माणकर्त्याला समर्थांनी येथे लावले आहेत. पण पुढे

' येवं कल्पनेरहित । तया नांव भगवंत ।
देवपणाची मात । तेथे नाही' ॥५२॥

असेहि म्हणतात. भगवंत हा निर्विकल्प असून त्याला जगन्निर्माणकर्ता सगुण देव म्हणता येणार नाही असेही सांगितले आहे. भगवंत शब्दाप्रमाणें परमात्मा शब्दाची अशीच द्वयार्थी (सगुण आणि निर्गुण) स्थिती झाली आहे.

**नामांच्या परिभाषेत विसंगती कां ?**

पहिल्याच दशकांतील 'शारदास्तवनांत' शारदेला माया संबोधून 'जये करितां परमात्मा । ऐसे बोलिजे ।' मायेमुळे परब्रम्हाला परमात्मा म्हणतात असे

सांगून पुढे अकराव्या दशकांत 'चंचल सृष्टीचा कर्ता चंचल आहे' (१-१९) 'त्यास परमात्मा ऐसे बोलती। सकळ कर्ता ऐसे जाणती। परी तो नासेल प्रचिती। विवेके पहावी' ॥१-२२॥असे परमात्म्याला कर्तृत्व देऊन चंचळ म्हटले आहे.

दासबोधाच्या अखेरी या परिभाषेच्या विसंगतीला स्वत: समर्थांनीच उत्तर देऊन, योग्य तो अन्वयार्थं घेण्यास श्रोत्याना सुचविले आहे.

'आत्मा आणि निरंजन। हे दोहीकडे नामाभिमान।
अर्थान्वय समजोन। बोलणें करावें' ॥ २०-१-११ ॥

निरंजन परब्रह्मालाच कित्येकवेळा आत्मा, परमात्मा म्हटले असले तरी संदर्भानुरूप त्यांचा अर्थ करावा असा सूचनेचा आशय आहे. ईश्वर, देव, भगवंत, जगदीश, आत्मा, परमात्मा ही सर्व नावे कोणाची ? एका परमेश्वराची !

**अनंत नामी जगदीश**

'परमात्मा परमेश्वरू। सर्वकर्ता जो ईश्वरु।
तयापासूनि विस्तारु। सकळ जाला' ॥ (८-३-१२)

पुढच्याच ओव्यांत या यादींत नवीन नांवांची भर पडलेली दिसते.

'ऐसी अनंत नामें धरी। अनंत शक्ती निर्माण करी।
तो चि जाणावा चतुरी। मूळ पुरूष' ॥ १३ ॥
'या मूळ पुरुषाची वोळखण। ते मूळमाया चि आपण।
सकळ काही कर्तेपण। तेथेंचि आले' ॥१४॥

म्हणजें जगत्कर्त्याची परमात्मा–परमेश्वर–भगवंत आदि अनंत नामें त्या एका मूळ पुरुषाचीच आहेत. आणि हा मूळ पुरुष म्हणजेच मूळमाया असून, तीच सर्वकर्ती आहे असें सिद्ध करण्यास मूळ गीतेतील श्लोक उधृत करतात.

'कार्यकारणकर्तृत्वे हेतु: प्रकृतिरुच्यते' ॥ अ. १३-२०

पुढे याच मूळ पुरुषाला आणि मूळ मायेला जगदीश म्हणतात,

'अनंत नामी जगदीश। तयासी च बोलिजे ॥' (८-३-२०)

दहाव्या दशकांतील चौथ्या समासांत या यादीत आणखी भर पडते.

'माया ब्रह्मी जो समीर। त्यांत जाणावा तो ईश्वर।
ईश्वर आणि सर्वेश्वर। तयासीच बोलिजे' ॥२६॥
'तोचि ईश्वर गुणासी आला। त्याचा त्रिविध भेद जाला।
ब्रम्हा विष्णु महेश उपजला। तये ठाईं' ॥१७॥

बाराव्या दशकाच्या सहाव्या समासांत या यादींत आणखी बरीच भर पडते. 'पुढे संकल्प उठला' म्हणजे 'एकोऽहं बहुस्याम' असा बहुभवनाचा

संकल्प उत्पन्न झाल्याबरोबर त्याच मूळ निर्गुण परब्रम्हाला सगुणत्व प्राप्त होऊन षड्गुणेश्वर, अर्धनारीनटेश्वर, सर्वेश्वर, सर्वज्ञ, साक्षी, द्रष्टा, ज्ञानघन, परेश, जगजीवन इत्यादि सगुण नांवें प्राप्त झाली. एकंदरीत पाहतां श्रोत्याला विषय नीट समजावा, आकलन व्हावा म्हणून विषय प्रतिपादनाच्या ओघांत जीं जीं सगुणवाचक नामें आली त्यांचा त्यांचा त्यांनी उपयोग करून घेतला. दासबोधांत त्याच त्याच विषयांची पुनरावृत्ति आढळते, पाल्हाळ वाटतो, फटकळपणा वाटतो याचें कारण, समर्थ रामदासांच्या कारुण्यांत, वात्सल्यांत, अपार प्रेमांत आहे. कसेही करून आपल्या तान्हुल्याच्या पोटांत चार घास जावेत, ही जी मातेची धडपड असते, जो अंतरिक जिव्हाळा असतो तोच समर्थांचा जिव्हाळा नाना प्रकारांनी श्रोत्यांना शहाणे करताना दिसून येतो. ज्ञानेश्वरींत हेंच मातृहृदय – ' माउलीपण' दिसते. नव्हे, सर्व सतांत तेंच मातृत्व असतें !

आकाशांत उत्पन्न होणाऱ्या वाऱ्याप्रमाणें परब्रम्हांत निर्माण होणाऱ्या मायेला जो जाणतो त्यालाच परमात्मा – परमेश्वर – सर्वेश्वर अशी नांवें आहेत. मायोपाधिक ईश्वर जाणीवकलेमुळें सगुण होतो व तोच त्रिगुणात्मक होऊन त्रिगुणात्मक सृष्टी निर्माण करतो.

अकराव्या ' भीमदशकांत' पहिल्या ' सिद्धान्तनिरूपण' नामक समासांत विवेक प्रलयाचे वर्णन आहे. सृष्टीमध्ये चचळ व निश्चळ असे दोन विभाग पडून चचळाचा निर्माणकर्ताही चंचळ आहे असें सांगितले आहे.

' चचळास कर्ता चंचळ । चंचळरूपी' ।।१९।।

**जगज्जोती**

परब्रम्हाच्या ठिकाणीं भासणाऱ्या मायेला जो जाणतो, जो सर्व प्राणिमात्रांच्या हृदयांत असतो, त्यालाच समर्थांनी ' जगज्ज्योती' व ' जाणीवकळा' म्हटलें आहे. (२६) अंतरसाक्षी, अंतरात्मा ही त्या मायोपाधिक परमात्म्याचीच नांवें असल्याचें सांगतात. (२९) पुढच्या ओवीत म्हणतात,

' आत्मा, अंतरात्मा, विश्वात्मा । चैतन्य, सर्वात्मा, सूक्ष्मात्मा ।
जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा । द्रष्टा साक्षी सत्तारूप' ।।३०।।

ही सर्व त्या चंचळ परब्रह्माची, मायोपाधिक परमात्म्याचीच नांवें आहेत. समर्थांचा ' जगज्ज्योती' शब्द फार महत्वाचा आहे. श्री ज्ञानेश्वरांच्या 'चिद्-विलासा'ची त्यांत झलक आहे.

पिंडब्रम्हांडाच्या उपाधि निरस्त झाल्या की जीव व शिव हे एक होतात.

' उपाधि निरासे तत्वता । जीवशिवास ऐक्यता ।
विवंचून पाहो जाता । उपाधि कैची' ।।३८।।

' पाहे निश्चळाचा विवेक । ऐमा लक्षांमधे येक ।।'

एकंदरीत समर्थांचा नित्यानित्य विवेकावर सर्व भर आहे.

अज्ञानजन्य – मूढ – देवतावादावर समर्थांनी चांगलेच कोरडे ओढले आहेत. ' देव जाले उदड । देवांचे मांडले भंड । भूता देवतांचे थोतांड । येक चि जाले' ।। ११–२–२० ।।

' शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गलबला जाला ।
लोक कामनेच्या व्रताला । झोंबोन पडती ' ।।२३।।
' मतामतांचा गलबला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तें चि थोर ।।२५।।

**चत्वार देव निरूपण**

या नंतर देवपूजेचे, प्रतिमांचे, जपध्यानानें पूजा करणाऱ्यांचे प्रकार वर्णन करून **' चत्वार देव निरूपण '** समर्थ करतात. ' येक नाना प्रतिमा । दुसरा अवतार महिमा । तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ' ।।३३।। पण या चौघात श्रेष्ठ देव कोणता ? समर्थ उत्तर देतात,

' जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळ चि होईल ।
जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ' ।।३७।।
' जो निश्चळास भजेल । तो निश्चळ चि ' ।।३९।।

समर्थांचा ' निर्मळ ' म्हणजे शुद्ध आणि ' निश्चळ ' परब्रम्हाचें ध्यान करण्यावर विशेष भर आहे असें दिसतें. एकदरीत लोकांप्रमाणे सगुणोपासना, सत्पुरुषांचे, साधूसतांचे चरित्रवाचन, मूर्तीची– अवतारांची– पूजा केली तरी साधकानें अंत:करणांत शाश्वत, निश्चळ, निर्मळ, निर्गुण, निर्विकारी परब्रम्हाला विसरूं नये. कारण तेंच एकमेव अंतिम शाश्वत सत्य आहे.

समर्थ रामदासांनी श्री रामाच्या, रामभक्त हनुमानाच्या व तुळजापूरच्या भवानीच्या भक्तिचा, सगुणोपासनेचा पुरस्कार केलेला आहे. ते सगुणोपासक होते हें सर्वश्रुत आहे. परंतु त्यांच्या ' बहुधा अध्यातम ' निरूपणांत निर्गुण, निर्मळ, निश्चळ, निराकार परब्रम्हाला जेवढे अनन्यसाधारण स्थान आहे तेवढे सगुणोपासनेला नाही, असें दिसून येते. कारण अध्यातम विवेचनांत, परब्रह्मस्वरूप वर्णनांत तद्व्यतिरिक्त परमात्मा, आतमा, अंतरात्मा, परमेश्वर, सर्वेश्वर, जगदीश, जगदीश्वर, भगवंत आदि सर्व देवांना तें मूळ मायेच्या पंगतीला नेऊन बसवितात. चचळ– विनाशी– अशाश्वत ठरवितात.

सगुणनिर्गुणाला जिरवून जे 'परात्पर सगुण ' आहे तेंच कधी सगुण रूपांत तर कधी निर्गुण रूपांत आविष्कारित होते, असा त्याचा गूढार्थ आहे !

जीव

' अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणे बोलिजे शिव ।
मूळ मायागुणे देव । बोलिजे तो ' ॥८-३-१८॥

जीव वस्तुत: परब्रह्मच आहे. परंतु अविद्येमुळे तो हें स्वत:चे मूळ, यथार्थ स्वरूप विसरतो आणि विस्मरणानें- अज्ञानानें- अविद्येनें- जीवत्वदशेला येतो. मायोपाधिक परब्रह्माला येथे समर्थांनी ' शिव ' म्हटले आहे. आणि मूळमायेला देव म्हटले आहे. कारण परब्रह्माला ' एकोऽहं बहुस्याम् ' अशी अहंकारविशिष्ट बहुभवनाची इच्छा होताच, त्याचे निर्गुणत्व- निरवयत्व -निरूपाधिकत्व- सपते आणि तेच परब्रह्म, परमात्मा-परमेश्वर-सर्वेश्वर- आदि नामरूपाला- सगुणत्वाला- येते. म्हणजेच मूळमायेच्या या संकल्पाच्या-इच्छेच्या- उपाधीमुळे परब्रह्माला ईश्वरत्व-देवत्व- येते.

या जीव व शिव विचाराची फार सुंदर मीमांसा आपणाला श्रीक्षेत्र माचणूरचे ब्र. प. पू. श्री बाबा महाराज आर्वीकर यांच्या ' दिव्यामृतधारा ' या श्री ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायावरील ' प्रगतदर्शनांत ' पहावयास मिळते.

' जीवदशेंत असलेला अहंकार परिवर्तनशील आहे. व शिवदशेंत तो स्थिर व अपरिवर्तनशील असतो. जीवदशा ही शिवदशेची अपूर्णावस्था होय. शिवदशा हीच अपूर्ण रूपाने जीवस्वरूप आहे व जीवदशाच पूर्णरूपाने शिवस्वरूप असते.'

श्री बाबा येथे ' शिव ' म्हणजे परब्रह्मस्वरूप अशा अर्थाने विवेचन करतात, तर समर्थ ' शिव ' म्हणजे परमात्मा अर्थ करतात, हें मात्र ध्यानांत घ्यावें. ' जीवाची पूर्णावस्था म्हणजे शिव व अपूर्ण शिवता म्हणजे जीव, हें जर समजले तर ' मी जीव आहे ' या जाणिवेला असलेली शिवाची जी दशा तीच ' जीवदशा ' व ' मी शिव आहे ' या जाणिवेंत असलेली जी जीवावस्था तीच ' शिवदशा ' होय हे लक्षांत येईल. ' मी जीव आहे ' या अपूर्ण जाणिवेला ' मी शिव आहे ' या जाणिवेंत आणले म्हणजे ' मी ' जो ' जीव ' तो शिवरूपच होईल ! अर्थात् ही जाणीव अहंकाररूपच आहे म्हणून असेहि म्हणता येईल की ' मी जीव आहे ' हा अहंकार ' मी शिव आहे ' या अहंकारांत विलीन केला तर ' जीव ' हा ' शिवरूप ' होईल. या घटनेंत दोन प्रकारचा परिणाम आढळून येतो. जीवास जर शिवरूप अनुभवावयाचे असेल, म्हणजे आपल्या मूळ स्वरूपांत यावयाचे असेल तर त्याला ' जीवाहंकार ', ' शिवरूप ' केला पाहिजे. व असे करणें म्हणजे ' मी जीव आहे ', हा अहंकार सोडणें, ही प्रथम क्रिया. आणि ' मी शिव आहे ' हा अहंकार स्वीकारणे ही दुसरी क्रिया. अशा दोन क्रिया घडतील असे वाटते. जसें प्रथम भांडे मोकळें करावे लागतें व मगच ते भरावे लागते. येथेहि सकृद्दर्शनी पहिले अहंकारत्व त्यागावें व दुसरे घ्यावें, असाच क्रम आहे असें दिसेल, पण या

क्रमाची येथे गरज नाही. कारण हा क्रमश: उपक्रम द्रव्य जर विजातीय असेल तरच आवश्यक असतो.'

' येथें जीव व शिव हे एका शिवाचेच पूर्ण व अपूर्ण प्रसव असतात. त्यामुळें जीवाहंकार त्यागल्यावरच शिवता धारण करण्याची येथे गरज नाही. केवळ शिवता साठवू लागले की ' जीवाहंता ' शिवरूप होईल. जीवदशा न मोडता जीव शिवरूप होऊं शकतो. कारण हे दोन वेगळे नसून बोधाने फक्त भिन्न झाले आहेत. म्हणून शिवरूप लाभासाठी ' अहंकार विसर्जन ' व ' अहंकार स्वीकार ' ही एकाच प्रकारच्या क्रियेची दोन रूपें होत. (दिव्यामृत धारा : प्रथम खंड : पृ. १३८)

**ज्ञान म्हणजे अद्वैत**

समर्थांनी पाचव्या दशकाच्या ' शुद्धज्ञान निरूपण ' नामक सहाव्या समासांत प्रथम ज्ञानाची व्याख्या केली आहे.

' ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।
पाहवें आपणासि आपण । या नाव ज्ञान ' ।।१।।
' शुद्ध स्वरूप जाणिजे । या नाव स्वरूप ज्ञान ' ।।७।।
' ज्ञान म्हणजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत ।
म्हणौनि शुद्धज्ञान ते सतंत । वेगळेंचि असे ' ।।९।।

तुरीया अवस्थेंत जीवाला स्व-रूपाचे ज्ञान होते म्हणजे मी ब्रह्मरूप आहे, असें त्याच्या अनुभवास येते वा आत्मप्रचिती येते. परंतु हेंही ज्ञान सोपाधिकच आहे. म्हणून तेंही शुद्धज्ञान नाही. या अवस्थेहूनही पलीकडची आणखी ' सतंत' म्हणजे उन्मनी म्हणून जी अवस्था आहे, तीत मनाचाही लय होतो. तें खरें ज्ञान होय.

' आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ ।।' (५-६-१५)

महात्मा कबीरांच्या ' आप पहिचाने आपहि आप ।' या प्रसिद्ध उक्तींप्रमाणें येथे समर्थ ' पाहवे आपणासि आपण' यालाच ज्ञान म्हणतात. आपले आपण मूळरूप शोधू लागलो की ' सहज चि उडे अज्ञान । या नांव म्हणजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायक' ।।१९।। पुढे समर्थ बजावतात :

' आपणासि वोळखो जाता । आंगी बाणे सर्वज्ञता' (५-६-२०)

ज्ञानाने अज्ञानाची म्हणजेच अविद्येची उपाधि गेली की जीवाला आपले मूळचे ब्रह्मस्वरूप कळते. ' अहं ब्रह्मास्मि' या वाक्याचे वर्म ' स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म' । असे सद्गुरू शिष्याला सांगतात. (५-६-४४)

देहभाव, देहाभिमान किंवा देहंकार यावर समर्थ कडाडून म्हणतात,

' देह मी वाटे त्या नरा । तो जाणावा आत्महत्यारा ।
देहाभिमाने येरझारा । भोगिल्याच भोगी' ।। (५–६–५५)

कारण देह म्हणजेच मी या भ्रांतिमुळे जीवदशा प्राप्त होते.

**जीव ब्रह्मैक्य म्हणजे मोक्ष.**

सहाव्या दशकांतील ' ब्रह्मपावन' या द्वितीय समासांत समर्थांनी परब्रम्हाची एक खूण सांगितली आहे.

' प्रगट तें जाणावें असार । आणि गुप्त तें जाणावे सार' ।।२१।।

त्या गुप्त ठेव्याची प्राप्ति कशी करावी ती युक्ती सांगतात,

' अध्यात्मश्रवणे पावावें । परब्रह्म तें' ।।२५।।

एकदा ' देव निर्गुण प्रत्यया आला ।' म्हणजे मग त्याचा शोध कसा घ्यावा? तर ' आता आपणचि आपला । शोध घ्यावा ।' (२८) म्हणजे ' तत्वे तत्त्व झाडितां सार । आत्माच उरे ।' (३०). जीव म्हणून आपण कोणी शिल्लक उरतच नाही. परब्रह्मरूप होतो. मग त्या जीवाला जन्ममृत्यु नाही कीं पापपुण्य नाही. ' निर्गुण आत्मा आपण येक ।' या विवेकाप्रत जीव जातो. येथे आत्मा म्हणजे परब्रह्म. निर्गुण परब्रह्म व जीव एकच आहेत – जीव ब्रह्मैक्य असें आत्मज्ञान होणें म्हणजे अद्वैताचे ज्ञान होणे. हेंच मानवी जन्माचे सार्थक आहे. समर्थांचे शब्दांत,

' यासी म्हणिजे आत्मज्ञान । येणे पाविजे समाधान ।
परब्रह्मी अभिन्न । भक्तचि जाला ' ।।४३।।

आठव्या दशकांत ' मोक्ष लक्षण ' नामक सातव्या समासांत समर्थांनी या ब्रह्म–जीव विषयावर स्वच्छ प्रकाश टाकला आहे.

' तैसा जीवात्मा आणी शिवात्मा । परमात्मा आणी निर्मळात्मा ।
अवघा मिळोन आत्मा । येकचि असे ।।' ८–४–४८
' उपाधी योगे वाटे भिन्न । परी ते आकाश अभिन्न ।
तैसा आत्मा स्वानंदघन । येकचि असे ' ।।५३।।

समर्थ ब्रह्म आणि आत्मा समानार्थी वापरतात.

आठव्या समासांत पहिल्या पन्नास ओव्यांत नानाविध मतांचा आणि अनुभवांचा उल्लेख करून शेवटी जीवब्रह्मैक्याचा, अद्वैताचा सिद्धांत मांडतात.

' जीवपणाची फिटली भ्रांती । वस्तु आली आत्मप्रचिती ।
प्राणी पावला उत्तम गती । सद्‌गुरुबोधे ' ।।५२।।

समर्थांच्या तत्त्वज्ञानाचा 'अद्वैतसिद्धान्त' हा पायाभूतच आहे. त्यांचे परब्रह्म, परमात्मा, आत्मा आदि सर्व विवेचन या अद्वैतसिद्धान्ताच्या पुष्टीसाठीच असते.

'समूळ द्वैत निवारे । या नाव ज्ञान ।।' (५-६-३)

अशी त्यांनी 'अद्वैताचा अनुभव म्हणजे ज्ञान' व्याख्याच केली आहे. कल्पांताच्या वेळीं पचमहाभूतें नष्ट होतात आणि प्रकृतिपुरुष हेहि एकाच ब्रह्मात विलीन होतात. (५-६-४७). विश्वाच्या आदिअंती असणारे निर्गुण ब्रह्म हेच एक शाश्वत सत्य आहे. हे तत्त्व 'ब्रह्मपावन' समासांत (६-२) प्रकट करून अद्वैतावर जोर दिला आहे. 'द्वैतकल्पनानिरसन' (७-५) हा समास अद्वैत प्रतिपादनाचा आहे.

'खरा साधक हा द्वैताची उपाधी सोडून अद्वैताची साधना करतो; अद्वैतविवेचनापेक्षा श्रेष्ठ ग्रंथ दुसरा नाही. ज्ञानी पुरुषांना अद्वैत ग्रंथच मान्य असतो.' इत्यादि अद्वैताचे निरूपण सर्व ग्रंथांत अधूनमधून येतेच.

दासबोधातील तत्त्वज्ञान मुख्यत: देवशोधन, चतुर्दश ब्रह्मनाम, ज्ञानदशक. मायोद्भव, गुणरूप, जगज्जोती, आत्मदशक आणि विसावा 'पूर्णदशक' म्हणजे दशक क्रमांक ६-७-८-९-१०-१५-२० मध्यें ग्रंथित झाले आहे. 'परब्रह्माचा सर्वांगीण विचार' हा दासबोधाचा विशेष आहे. तरी निश्चळब्रह्म आणि चचळ-ब्रह्म ही विचारसरणीं वा संकल्पना दासबोधांतील तत्त्वज्ञानाचे वैशिष्टय आहे. मायेचा-मूळमायेचा-विचार परब्रह्माप्रमाणेच सविस्तर मांडला आहे. निर्गुण, पंचमहाभूतें, पुरुष प्रकृति, आत्मानात्मविवेक, जीवशिवसंबंध, चत्वारदेह, विश्वाची उभारणी आणि विश्वाची संहारणी आदि तत्त्वज्ञानांतील सर्व महत्त्वाच्या विचारांचा समर्थांनी दासबोधांत व स्फूट प्रकरणांत यथासांग परामर्ष घेतला आहे. 'आत्मज्ञान' विवेचन दासबोधाचा आत्मा ! त्याच्या अनुषंगाने विवेक, वैराग्य, अद्वैत, उपासना, सद्गुरुकृपा, मोक्षलक्षण आदि अनेक विषयांचा उहापोह दासबोधांत आहे. श्री समर्थांची तत्त्वसृष्टि अतिभव्योदात्त-व्यापक आहे. दासबोधाइतका नीतिशास्त्राचा आणि जीवनमूल्यांचा सर्वांगीण-सविस्तर-विचार इतरत्र क्वचितच आढळेल.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

# मनाचे श्लोक– त्यातील भक्तिरस व अध्यात्म

– प्र. मं. उपाध्ये

महाराष्ट्रीय संतमालिकेत श्री समर्थ रामदास स्वामींचा क्रमांक ज्ञानेश्वर-तुकारामादि साक्षात्कारी संतांच्या बरोबर लागतो, असे साधकजन श्रद्धाळू अंतःकरणाने समजतात व त्यांचा समज तितकाच सार्थ आहे असे समर्थांच्या चरित्रावरून दिसून येईल. समर्थांची ग्रंथसंपदा म्हणजे दासबोध ग्रंथ, करुणाष्टके, मनाचे श्लोक, आरत्या, अभंग होय. या सर्व ग्रथातून समर्थांची भक्तीची निष्ठा व प्रेम ठायी ठायी प्रकट होते. या लेखात फक्त मनाचे श्लोक यावरच विचार करावयाचा असल्याने त्यांचे इतर साहित्य लक्षांत घेतलेले नाही.

समर्थांचे मनाचे श्लोक २०५ असून मनाला आवरून रामरूपाच्या ठिकाणी रत व्हावे व ब्रह्मानंदाचा सोहळा भोगावा अशी त्यांची शिकवणूक त्यात प्रतिबिंबित झाली आहे. मनालाच उपदेश का? किंवा इतर इंद्रियांना ताब्यात ठेवण्याचा उपदेश न करता मनालाच समर्थांनी का बोध केला, अशी पृच्छा होणे योग्य आहे. त्याचे उत्तर सापडले की भक्तिपंथाला सुरुवात झाली असे म्हणता येईल. फार खोलात न जाता मानवी जीवनात सर्व इंद्रियापेक्षा 'मन'

हे अत्यंत प्रभावी असून ते सूक्ष्मपणे वावरत असते व माणसाच्या सुखदुःखाच्या कल्पना, मानापमानाची कल्पना इत्यादि द्वंद्वे मानवी मनावर अवलंबून असतात असे आजचे मानसशास्त्र सांगते. परमार्थात काय किंवा भक्तीत काय मनाचे फारच महत्व आहे. देहबुद्धीवर वावरणारे मन आत्मबुद्धीकडे वळविणे यांतच परमार्थाचे रहस्य दडलेले आहे. मनाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येते. (१) मनुते अनेन । ज्याने विचार केला जातो ते. (२) संकल्पविकल्पात्मकं मनः :– संकल्प व विकल्पयुक्त जे आहे ते मन (३) सुखदुःखादि उपपब्धि साधनं मनः :– सुखदुःखादि मिळण्याचे साधन म्हणजे मन किंवा प्रद्वेषो बहुमानो वा संकल्पादुपजायते– प्रद्वेष किंवा बहुमान सकल्पामुळे उत्पन्न होते व संकल्प तर मनातच असतात. म्हणून मन हे प्रमुख समजून त्यालाच बोध केल्याने परमार्थ साधता येईल असे समर्थांना वाटते. दुसरे असे की मन जिंकल्याशिवाय किंवा तसे मारल्याविना साधकाला साधनच करतां येणार नाही. मनाची तऱ्हाच अशी आहे की, ते चंचल असून स्थिर असत नाही. एकाग्र चित्त करू देत नाही. साधकाला तर मनाची एकाग्रता आवश्यक आहे. म्हणून संसारांतील विविध गोष्टींचे दर्शन घडवून देऊन मनाने सारासार विचार करावा व मनाने रामबुद्धीत रस घ्यावा यासाठीच मनोबोधाची समर्थांनी रचना केली असे मानणे योग्य ठरावे. मनसि च परितुष्टः कोऽअर्थवान् को द्ररिद्रः । या न्यायाने अध्यात्म वाटेवर असणाऱ्या मनाला संतुष्ट करून या जगातील रत्नादि पाषाण खंडाची समृद्धि कितीं अपूर्ण आहे किंवा कृपणपणाची जाणीव मनाला न जाणवण्यासाठी मनोबोध आहे असेही म्हणतां येईल.

हा बोध करण्यासाठी समर्थांनी अत्यंत सोप्या पण अर्थपूर्ण शब्दात श्लोकांची भुजंगप्रयात वृत्तांत रचना केली. मनाचे श्लोक वाचीत असतांना एक गोष्ट जाणवते ती ही की, मनाला भक्तिपंथाकडे वळवावयाचे आहे किंवा भक्तिमार्गाकडे न्यावयाचे आहे व त्यासाठीच मनाला आर्ततेने विनवणी केलेली दिसते. प. पू. गुरुदेवानी या मनाच्या श्लोकाना Pathetic songs अशा शब्दात गौरविलेले आहे. मुख्य भर भक्तीवर असल्याने भक्तीचा परिपोष होईल असेच श्लोक असावे हे ओघानेच आले. म्हणून मनाच्या श्लोकात जी आर्तता आहे, कारुण्य आहे, विनवणी आहे त्यातील मुख्य स्त्रोत भक्ति आहे असे स्पष्ट दिसते.

भक्ती म्हणजे प्रेम. देवांपासून विभक्त न राहणे म्हणजे भक्ति. भक्ति म्हणजे सेवा. भक्ति म्हणजे भंजन– अनित्याच्या कल्पना, भ्रामक कल्पना मोडून शाश्वतावर स्थिरमती करणे म्हणजे भक्ति होय. स्वस्वरूपानुसंधान म्हणजे भक्ति. या सर्व व्याख्या मनाच्या श्लोकाला लागू करता येतील.

रस कसा निर्माण होतो याची फारशी चर्चा न करता असे सांगता येईल की रस म्हणजे आनंद. रसो वै सः असे उपनिषदात आत्म्याचे वर्णन आलेले आहे. हा रस म्हणजे आनंद, आपणच उपभोगावयाचा असल्याने त्याची पूर्वतयारी करावी लागते. ती पूर्वतयारी मनाचे श्लोक करतात असे साधकाला वाटते व ते योग्य आहे. सर्व साधनात 'भक्ति' श्रेष्ठ असे साधुसंत सांगतात. म्हणून मनाला असे सांगितले आहे की, नको दैन्यवाणे जिणे भक्तिउणे । भक्तिविना जीवन म्हणजे दैन्य जीवन होय. असे समर्थ मानतात. भक्ति म्हणजे स्वस्वरूपानुसंधान. ते साधण्यासाठी नामांची आवश्यकता आहे. मनाचे श्लोकात नामाची महती गायली गेली आहे. दासबोधात तर नामाचे बहारदार वर्णन आले आहे. मनाचे श्लोकात असे म्हटले आहे की, मुखी राम त्या काम बाधू शकेना (८७) ; बहु चांगले नाम या राघवाचे । अति साजरे स्वल्प सोपे फुकाचे– (८८) ; जनी भोजनीं नाम वाचे वदावे (८९), अति आदरे सर्वही नामघोषें (९२) तयाचे मुखीं नाम घेता फुकाचे– मना सांग पा रे तुझे काय वेचे (९३) ; म्हणोनी म्हणा तेचि नाम आतां– (९४). जो रामनामास विकल्प करील तो पापरुपी जीव म्हणावा (९८) म्हणोनी अती आदरे नाम घ्यावे– मुखी बोलता दोष जाती स्वभावे– (१०१) ; व ते नाम न घेतल्याने रामदासांना हळहळ वाटून ते चटकन् म्हणतात की, यथा सांग रे कर्म घडेना, घडे कर्म ते पुण्य गांठी पडेना, दया पाहतां सर्व भूती असेना– फुकाचे मुखी नाम ते हीं वसेना. (१००). नामाचे माहात्म्य सांगतांना समर्थांनी पुराणातील आधार दिलेले आहेत. शिव रामनामे कसा विषापासून शांत झाला, अजामेळ पापी, महाभक्त प्रल्हाद नामाने कसे तरले याचे दाखले देऊन मनाला नामाकडे ध्यान देण्यांस सांगितले आहे. यांतच भक्तिरस स्रवत आहे.

क्रिया होईजे धन्य या रामनामे, क्रिया भक्ति उपासना नित्य नेमे (५७), ऋणी देव हा भक्ति भावे जयाचा– जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा (५५). दया सर्वभूतीं जया मानवाला, सदा प्रेमळू भक्तिभावे निमाला (१०६). क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे (१०८). भक्तिपंथेचि जावे (११५). भक्ति तेचि मोठी (१७८). नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी (११६–१२५) या शब्दांत भक्ताला धीर दिला आहे. भक्तांची उपेक्षा देव करीत नाही हा भावार्थ आहे. किंवा नुपेक्षी कदा राम दासाभिमानी (२९–३७). या सारख्या उत्कट शब्दांत भक्ताला ईश्वराचे सान्निध्य आहेच याची जाणीव रहात्री यासाठीच नुपेक्षी कदा राम दासाभिमानी असे भक्तिभावाने सांगितले आहे.

मना सज्जना राघवी वस्ति कीजे (३८–४२) अशी मनाला एक प्रार्थना केली आहे. यांत पण भक्तिभाव उमटला आहे. जनी जाणतां भक्त होऊनि राहे

असा भक्त जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा, या (४७. ५६) शब्दांत सांगून श्लोकांत अशा भक्तांना ईश्वराची साक्ष कशी कशी पटली आहे ते स्पष्टपणे दाखविले आहे.

थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे २०५ मनाच्या श्लोकांत भक्तिरस ओतप्रोत भरलेला आहे असे वरील विवेचनावरून दिसून येईल. पहिल्या श्लोकांतच 'गमू पंथ आनंत या राघवाचा' अशी सुरुवात करून त्या भक्तिपंथाचे वर्णन शेवटपर्यंत ओघवत्या शब्दात केलेले आहे. सोप्या शब्दांत असलेली ही रसवती रचना मनावर परिणाम करते हे विशेषच होय. साधकाने मनाला कसे वळण द्यावे, यात अडचणी कशा असतात व त्यावर मात कशी करावी यावर सखोल विचार करून मनाला भक्तिपंथांत कसे जावे हे साधार सांगितले आहे. यासाठीच भक्तिरसाचा उपयोग केला आहे. भक्ति निर्माण होण्यासाठी नीति व व्यवहारजीवन व परमार्थसाधन यांचा मेळ कसा असावा याचेही दर्शन पहिल्या १०,१२ श्लोकांतच होते; व याची फलश्रुति म्हणजे मनाची शते ऐकतां दोष जाती, मतीमंद ते साधना योग्य होती । चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी - म्हणे दास विश्वासतां मुक्ती भोगी ... (२०५) अशा शब्दांत समर्थांनी कथन केली आहे. साधकाचे अज्ञान, मोह दूर होऊन तो मुक्ती भोगण्यास योग्य होतो असे जे समर्थ आर्जवून सांगतात, यांतच भक्तिप्रेम दडलेले आहे. समर्थासारखे संत लोकांची दुःखे पाहून त्यांच्यावर कृपा करण्यासाठी झटत असतात व भक्तिप्रेम देऊन त्यांची सांसारिक दुःखे कमी करतात व त्यांना सन्मार्गाला लावून जगावर उपकार करतात. हेच संतांचे कार्य अमोल आहे.

मनाचे श्लोक– यांतील अध्यात्म अद्वैताचे आहे असे कुठलाही श्लोक मनन केला असता दिसून येईल. अध्यात्मविद्या म्हणजे आत्मविद्या व हीच सर्वश्रेष्ठ विद्या समजली जाते. हेच ब्रह्मज्ञान किंवा आत्मज्ञान मनाच्या श्लोकांतून निरनिराळ्या शब्दांत सांगितले आहे. श्री समर्थांनी मंगलाचरण श्लोकांत ज्ञानस्वरूप ईश्वरास व चारही वाणीचे मूळ असणाऱ्या शारदेस वंदन केले आहे. समर्थांचा राम दाशरथी नसून तो आत्माराम आहे. तो सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रह्म असाच आहे. मना सज्जना राघवी वस्ति कीजे– अशा शब्दात शेवटची ओळ असणाऱ्या श्लोकात (३८–४२) भगवंताचे जे वर्णन आलेले आहे ते अद्वैत तत्त्वज्ञानाला धरूनच आहे. जया वर्णिती वेदशास्त्रें पुराणें– मना पाविजे सर्वही सुख जेथे– तेच सुखनिधान होय. मना राम कल्पतरू कामधेनू– निधी सार चिंतामणी काय वानू? भजा राम विश्राम योगेश्वराचा (८५). निरनिराळ्या अवतारांचे वर्णन (११६–११७–११८–११९–१२०–१२१–१२२–१२३–१२४) असे हे आत्मारामाचे वर्णन यांत दिसून येते. यद् दृष्टं तद् नष्टं या न्यायाने रामदास म्हणतात की, दिसें लोचनी ते नसें

कल्पकोडी, अकस्मात आकारले काळ मोडी, पुढे सर्व जाईल कांही न राहे– मना संत आनंत शोधूनि पाहे. या विषयावरील सर्व श्लोक अध्यात्मपूर्ण आहेत (१४६–१५०). मनाला अनंत असणाऱ्या सद्वस्तूचा शोध घेण्यास सांगितले आहे. ही सद्वस्तु फुटत नाही, तुटत नाही, निराकार असून ब्रह्मादिकांचा आधार आहे. वेदवाणी तिचे वर्णन करूं शकत नाही. ही सद्वस्तु चर्मचक्षूंनी दिसत नसून ज्ञानचक्षूने दिसते. ही पीत नाही, श्वेत नाही. व्यक्त नाही. अव्यक्त नाही. अशा सद्वस्तूचे वर्णन शंकराचार्यांच्या दशश्लोकात जवळजवळ अशा शब्दांतच केले आहे. उपनिषदांत पण तसेच वर्णन आहे. समर्थ वेदांती असल्याने त्यांचे आत्मारामाचे वर्णन वेदांत तत्त्वज्ञानाला धरून असणार हे बरोबर आहे. वेदांतांतील कर्मसिद्धांत 'मना त्वांची रे पूर्वसंचित केले– तया सारिखे भोगणें प्राप्त झाले (११) जिवा कर्मयोगे जनीं जन्म झाला। (१४) या शब्दांत स्पष्ट केला आहे. ही मर्त्यभूमी असून सर्व जीव चिरंजीव समजतात; पण अकस्मात सांडूनिया जाती असे कटु सत्य समर्थ सांगावयास विसरत नाहीत. जगीं सर्व सुखी असा कोण आहे असे विचारी मनाला ते प्रश्न विचारतात (११). भयाने सर्व ब्रह्मांड व्यापिले आहे (१३६); फक्त भयातीत संत आहेत (१३५). देहेबुद्धीचे कर्म खोटे (१३७). समाधान सज्जनाचेनि योगे, पिंडज्ञाने–तत्त्वज्ञाने नव्हे– योगयोगे नव्हे, भोगत्यागे नव्हे असे ते भक्तीच्या भाषेत सांगतात. अध्यात्मविद्या मिळवण्यासाठी ज्या अडचणी येतात त्यात अहंकार हा कसा अडथळा आणतो व त्यामुळे ब्रह्मज्ञान कसें दुरावते याचे वर्णन यथार्थ केले आहे. रामदास म्हणतात की अहंतागुणे सर्वही दुःख होते, परब्रह्म ते मीपणें आकळेना (१९१). अहंता गुणे नीती सांडी विवेकी. अहंता म्हणजे देहबुद्धी. समर्थ पुढें म्हणतात की देहबुद्धि ते आत्मबुद्धी करावी (१६३). देहबुद्धी हे ज्ञानबोधें त्यजावी– विवेके तयें वस्तुची भेटी घ्यावी. (१७०)

जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना ह्याचे विवरण करताना समर्थ प्रश्न विचारतात की 'विधी निर्मिता लीहितो सर्व भाळीं, परि लीहितो कोण त्याचे कपाळी। हरू जाळितो लोक संहारकाळीं, परी शेवटी शंकरा कोण जाळी'-(१७५). जगी देव धुंडाळिता आढळेना (१७६); भूते पिंड ब्रह्मांड हे ऐक्य आहे–परी सर्वही स्वस्वरूपी न राहे (१८७). देहेभान हे ज्ञानशास्त्रें खुडावे। विदेहीपणें भक्ति मार्गेचि जावे (१८८) या सर्वांत उपनिषद् तत्वज्ञान आलेले आहे. ईश्वर सर्वांना व्यापून त्यांच्या पलीकडे आहे, हेंच ते तत्त्व येथे दिसते. नव्हे जाणता नेणता देवराणा, नये वर्णितां वेदशास्त्रां पुराणां, नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा, श्रुती नेणती नेणती अंत त्याचा. याचाच अर्थ श्रुती जे नेति नेति म्हणतात तोच आहे. सारांशरूपाने मनाच्या श्लोकांतील अध्यात्माचा विचार सांगावयाचा झाल्यास असे दिसते की यांतील आध्यात्मविद्या वेदांतप्रणीत आहे. जगाचे स्वरूप

भ्रमात्मक असून जीवाला मीपणा बाधीत असतो, सुखदुःखे पूर्वसंचिताप्रमाणे येतात. जग हे मृत्युभूमी असूनही जीव सत्य मानतात, अहंता गुणे ब्रह्म राक्षस होतो; सद्वस्तू निराकार– निर्गुण असून ती ओळखणें म्हणजेच मोक्ष होय. समाधान सज्जनाचेनि योगे हेच खरे आहे. भक्ति ज्ञानयुक्त असावी असे समर्थ मानतात. गुरुदेवांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणज rational mysticism- बुद्धीप्रमाण अध्यात्मवाद या मनाच्या श्लोकांतून प्रत्ययास येतो. अर्थात् समर्थांनी त्याला भक्तीची झालर लावून त्याची विशेष शोभा वाढविली आहे. मनाचे श्लोक भक्ति व अध्यात्म यांचा सुंदर सगम आहे असेच म्हणावे लागेल. मनाच्या श्लोकांत भक्ति व भावना यांचे असे सुरेख मिश्रण झालें आहे की ते श्लोक म्हणजे भक्तिसाहित्यातील एक लेणे ठरावे. परमार्थाचा थोडक्यांत सारांश कसा असावा ह्याचे उदाहरण म्हणजे मनाचे श्लोक. मनाने भक्तिमार्गाकडे कसे जावे व कुठली पथ्ये सांभाळावी हे मनाच्या श्लोकांत आल्याने साधकाला साधनावस्थेत निश्चित मार्गदर्शन होईल इतके त्यांचे महत्व आहे. म्हणूनच कित्येक संप्रदायात मनाचे श्लोक नित्य म्हणण्याची पद्धत आहे. प. पू. भाऊसाहेबापासून ते प. पू गुरुदेवापर्यंतच्या परमार्थ संप्रदायात हीच पद्धत अजूनही चालू आहे, हेच मनाच्या श्लोकाचे वैशिष्ठ्य होय. हाच तो परमार्थाचा ठेवा समर्थांनी आपल्याला दिला व कल्याण साधण्याचा उपदेश केला. तो उपदेश आपण अंगी बाणवून साधक बनूया, हीच गुरुदेवांच्या चरणी व समर्थ चरणी प्रार्थना.

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

# अध्यक्षांचा समारोप

**प्रो. अनंत गणेश जावडेकर,**
एम्. ए. पी. एच्. डी. डी. लिट.

समर्थांच्या तीनशेव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने समर्थांच्या उपदेशाचा आणि कार्याचा आढावा घेणारे येथील चर्चासत्र एकंदरीत उद्बोधक झाले. हे आयोजन करणारी येथील विश्वस्तमंडळी, कार्यकारी मंडळी व विशेषकरून अध्यक्ष श्री. बाबासाहेब संगोराम आणि मत्री श्री. ज. वा. परूळेकर यांनीं त्यांच्या उतारवयांत देखील तरुणाला लाजवतील असे जे श्रम घेतले त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत. खरोखरी ते सर्व या विचारपूर्वक केलेल्या आयोजनाबद्दल अत्यंत अभिनंदनास पात्र आहेत. आमची सर्वांची अत्यंत घरगुती पद्धतीच्या भोजन न्याहारी चहापाणी व उतरण्याची सोय व सरबराई केली त्याबद्दल चर्चेमध्ये भाग घेतलेले आम्ही सर्व त्यांचे ऋणी आहोत.

या प्रसंगी मला अध्यक्षपद देऊन गौरवान्वित केले. हा योग माझ्या ध्यानीमनी नसता एकाएकी प्राप्त झाला. माझी ही अध्यक्षपदाची कामगिरी मी यथामती पार पाडली. मंडळीनी त्यांच्या उत्स्फूर्त उद्गारावरून माझ्या भाषणांबद्दल समाधान व्यक्त केले याचा मला आनंद वाटतो.

तीनशेव्या पुण्यवर्षाच्या निमित्तानें अनेक ठिकाणीं उत्सव साजरे झाले. नियतकालिकांनी विशेष अंक काढले. विद्यार्थ्यांच्या स्पर्धा झाल्या. याप्रमाणें समर्थ वाङमयाचा अभ्यास पुष्कळांनीं केला, आणि समर्थांच्या कार्यांच्या निरनिराळ्या पैलूंवर उद्‌बोधक प्रकाश पाडला.

समर्थांपासून प्रेरणा घेऊन जर आपण त्यांच्या स्मृतीला साजेल असे काही भरीव कार्य करून दाखवले तर या सर्व प्रयत्नांतून काही निष्पन्न झाले असे म्हणता येईल. काही प्रमाणांत तरी हे घडेल असा मला विश्वास वाटतो.

माझा स्वत:चा असा ग्रह झाला आहे की, एकूण अभ्यासकांनी रामदासांच्या आध्यात्मिक, तात्त्विक, नैतिक, साहित्यिक अशा कार्याची जेवढी दखल घेतली आहे तेवढी खरोखरी त्यांच्या प्रधान कार्याची समर्पक अशी दखल घेतलेली नाहीं. रामदासांनीं प्रत्यक्षांत जे कार्य केले, ते कार्य आधुनिक कालाच्या संदर्भात करीत राहाणे हीच वस्तुत: त्यांना सर्वांत भव्य आणि दिव्य अशी श्रद्धांजलि होय. आपण लोक बोलघेवडेपणाची कृतज्ञता व्यक्त करण्यांत प्रवीण असतो. प्रत्यक्ष कृतीने त्यांच्या आदर्शाला धरून वागणे आपल्याच्याने होत नाहीं, हीच असंतोषाची बाब आहे.

समर्थ संप्रदाय चालविणारे देखील निरनिराळ्या स्थानी आहेत. त्यांनी समर्थांचे नांव राखले आहे, पण खरोखरी नांव राखण्याजोगी कृतिशीलता दाखविली आहे काय याचा मला प्रश्न पडतो. सांप्रदायिकांनी बहुतकरून शब्दश: नांव राखले आहे, कार्यश: नाही. लो. टिळकांचे अनुकरण करणाऱ्यांनी त्यांचा अडकित्ता सुपारी घेतली, पण कार्याचा कित्ता गिरवला नाही असे म्हणतात. त्याचप्रमाणें सांप्रदायिकांनीं रामदासांची भिक्षेची शिकवण निदान वार्षिक उत्सवाच्या वेळी हिंडून भिक्षा मागून चालविली आहे. या भिक्षेमध्ये आणि समर्थांच्या भिक्षेमध्ये फारच अंतर आहे. समर्थांची भिक्षा हे एक व्रत होते, ती एक जीवनसाधना होती. भिक्षामिषानें त्यांनीं परिस्थितीचे आणि समाजाचे निरीक्षण, परीक्षण केले. भिक्षेच्या निमित्ताने त्यांनी समाजकारण, राजकारण आणि जनजागरण केले. लोकांना मूठ मूठ धर्म करायला लावला, आणि त्यायोगे त्यांनी धर्म जागृतीचा संदेश घरोघरी पोचवला. भिक्षा ही देवकारण आणि देशकारणाची पवित्र गंगोत्री झाली. भिक्षा मिषाने इकडचे सदेश तिकडे पोंचले, तिकडचे इकडे पोचले.

याचा विचार करता सांप्रदायिकांच्या आतांच्या भिक्षेत काय राहिले ? समर्थांच्या शिकवणुकीचा बाह्य आकार, तोही काहीसा विकृत स्वरूपांत राहिला. भिक्षेचा जिवंतपणा, प्रखरता, प्रेरकता राहिली आहे काय ?

तीनशेव्या पुण्यतिथीच्या निमित्ताने समर्थ संप्रदायांतील काही मंडळी एकत्र जमली होती, पुन्हां जमणार आहेत असे कानावर आले. परंतु त्यांचा समर्थांच्या

कार्याकडे पहाण्याचा दृष्टिकोन आधुनिक काळाच्या गरजेप्रमाणे प्रागतिक व विधायक जोपर्यंत होत नाहीं तोपर्यंत समर्थांच्या कार्याला गतिशील चालना मिळेल असे वाटत नाहीं. सर्वसाधारण कार्य जुनाट पद्धतीचे, वैठ्या पारमार्थिकतेचे, नाम जपाचे, नेमाला बसण्याचे, पारायणे करण्याचे, मनाचे श्लोक इत्यादि पाठ करण्याचे, समर्थ समाधीला अभिषेक करण्याचे, समर्थ वाङमयाचा प्रसार करण्याचे, प्रवचने; पुण्यतिथी, महोत्सवादि करण्याचे, अशा प्रकारे होत असते व होत राहील. या सर्वाला काही वैयक्तिक, काही सार्वजनिक महत्त्व आहेच. परंतु समर्थांनी ज्या प्रकारच्या प्रपंच व राजकारण या संबंधीच्या प्रोत्साहक प्रेरणा दिल्या व प्रत्यक्ष समुदाय संघटना केल्या, तशा तऱ्हेचे ऐहिक, व्यवहारिक कार्य यांची नेहमीच समाजाला आवश्यकता राहाणार, त्या प्रकारच्या समर्थांच्या कार्याकडे कानाडोळा झाला व होत आहे हे नाकारून चालणार नाहीं. प्रा. श्री. म. माटे यांनी या गोष्टीकडे मागे लक्ष वेधले होते. समर्थांच्या पारमार्थिक शिष्यांनी समर्थांचा कसा पराभव केला ते त्यांनी मार्मिकपणें विशद करून सांगितले होते. परंतु संप्रदायांत गतानुगतिकत्वच शिल्लक राहिलेले असल्यानें माटे यांनी केलेली कानउघाडणी पालथ्या घागरीवर पाणी याच स्वरूपांत राहिली.

इतिहासांत असाच अनुभव येतो. अलौकिक गुणसंपदा आणि कर्तृत्वशक्ति असलेले युगपुरुष मधूनमधून निर्माण होत असतात. त्यांचे प्रत्यक्ष शिष्य, अनुयायी भारावलेले असतात तोपर्यंत अशा पुरुषांचे कार्य त्यांनी दिग्दर्शित केलेल्या मार्गानें चालू राहाते. पुढे साक्षात् संपर्काच्या अभावी मूळपुरुषांच्या प्रेरणा फिकट होत जातात व कार्य काही राहिलेच तर नाममात्र राहाते, एरवी इतिहासजमा होते.

भारताच्या इतिहासांत सहस्त्रों वर्षांत जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत महाधुरंधर माणसे पुष्कळच निर्माण झाली. परंतु गोळावेरीज करून आपल्या हाती काही फारसे शिल्लक राहिले नाहीं याचाच प्रत्यय येतो, तो खरोखरी दुःखदायक आहे.

शिवाजीमहाराज व समर्थ रामदास या जोडीने आपल्या असामान्य कर्तृत्वाने इतिहासाचा विपरीत आणि प्रचंड असा ओघ पालटवला व महाराष्ट्रामध्ये हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. कित्येक शतके राजकारण आणि धार्मिकतेच्या दृष्टीनें अंधारात गेल्यावर भारताचा सनातन धर्मध्वज पुन्हां दिमाखाने फडकूं लागला, शे सव्वाशे वर्ष हा विजय प्रजेला उपभोगता आला आणि पुन्हां या देशांत परकीयांचे पारतंत्र्य आले. याचा अर्थ काय ? ज्या विजिगिषु वृत्तीने शिवसमर्थांच्या जोडीने कार्य करून दाखवले त्या वृत्तीची, त्या तोलामोलाची माणसे व एकात्मक संघटना सतत चालू राहिली नाहींत. भारतांत चांगले पथप्रदर्शक पुरुष निर्माण होतात. पण त्या पथावर सातत्याने टिकून राहाणारा अनुयायी समाज येथे लाभत नाहीं, हे या देशाचे दुर्दैव होय.

अगदी अलिकडच्या काळांतील म. गांधींचेच उदाहरण घ्या. इतक्या उंचीचा पुरुष कीं, ज्यांची बरोबरी भगवान् बुद्ध आणि येशू ख्रिस्त यांच्याशी केली जाते. आपल्या डोळ्यादेखत ही विभूति या भारतांत वावरून गेली. त्यांच्या शिकवणुकीतील आणि कार्यातील आज काय शिल्लक राहिले आहे ? या भव्य दिव्य विभूतीला आत्मसात करण्यांत आपला समाज फारच उणा पडला ही गोष्ट खरी नाहीं काय ? भारताला अनेक नररत्ने आजपर्यंत लाभली. परंतु भारतीय समाजाने त्या रत्नांचे काहीच मोल राखले नाहीं, ही वस्तुस्थिति आहे.

भारतीय समाजाची इतिहासांतील गेल्या काही सहस्त्र वर्षाची वाटचाल पाहिली तर आपण काय होतो, आणि काय आहोत, आणि कोठे चाललो आहोत याचे जे चित्र डोळ्यापुढे उभे राहते त्यापासून काही बोध घेता आल्यास पहावा.

एक काळ असा होता कीं, आपली भारतीय संस्कृति– जिला नंतर हिंदू म्हणून ओळखली जाते ती अनेक देशांत दूरपर्यंत पसरलेली होती. ' कृण्वन्तो विश्वं आर्यम् ', जगांतील सर्व मानवांना आर्य म्हणजे सज्जन बनविण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन आपले श्रेष्ठ पूर्वज सर्वत्र विखुरले होते. राजकीय वर्चस्वाचे, दुसऱ्यांना दास बनविण्याचे साम्राज्यवादी तत्त्वज्ञान निराळे आणि मानवीय आदर्शाचे सांस्कृतिक प्रदान करणारे तत्त्वज्ञान निराळे. अनेक देशांतून सांस्कृतिक शिक्षण घेण्यासाठी भारतीय विद्यापीठांत विद्यार्थी येत असत.

एतद्देशप्रसूतस्य सकाशात् अग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ।।

पृथ्वीमधील सर्व माणसांनी भारतांत जन्मलेल्या अग्रणी पुरुषांकडून आप आपली जीवनचर्या कशी घालवावी त्याचे शिक्षण घ्यावे अशी अभिमानास्पद स्थिति होती. आज आपण इंग्लंडला अमेरिकेला जाऊन ' शहाणे ' होऊन येतो. किंवा कित्येक-जण जातात ते तेथेच स्थायिक होतात, त्यांना आपल्या दरिद्री आणि अडाणी माणसांनीं भरलेल्या मातृभूमींत परत येणे कमीपणाचे वाटते. ही दोन चित्रे पाहिली म्हणजे मधल्या इतिहासकाळांत आपण पुच्छप्रगतीच्याच मार्गाची वाटचाल करीत होतो असेच म्हणावे लागेल.

हिंदुस्थान एवढा मोठा भव्य देश. एवढी अफाट हिंदूंची लोकसंख्या. एवढी सुबत्ता की तिला स्वर्णभूमि म्हणत असत. परकीयांनीं या देशावर आक्रमणे पुनःपुन्हां केली. काही प्रतिकार झाला. वीर सावरकर म्हणतात त्याप्रमाणें काही सोन्याची पाने हिंदूंच्या विजयाची लिहिली गेली. पण या देशाची पडझड कित्येक शतके सुरूच राहिली. शेकडो वर्षे येथे परकी जुलुमी सत्ता राहिली व त्यांत येथील समाज सर्व दृष्टीने नाडला गेला, ही गोष्ट खरीच आहे. परकीयांनी येथे

जी राजकीय व धार्मिक अधिसत्ता चालविली ती काही त्यांच्या स्वत:च्या बळावर चालविली नाही. हिंदुस्थानांतील पुरातन रहिवाश्यांच्या बळावरच ते येथे स्थिर राहूं शकले. यावरून येथील हिंदूंची नादानताच अधिक दिसते. येथील समाज एकात्मक नव्हता. एकसंध नव्हता. संघटित नव्हता. राष्ट्रियत्वाच्या जागृतीचा अभाव. एकमेकाला सहाय्य करण्याची वृत्ती नव्हती. आपला पूर्वीपासून चालत आलेला इतिहास काय आहे, आपल्या भोंवती काय चालू आहे, आपले भवितव्य काय आहे, या सबधीची काहीही जाण असल्याचे या दीर्घ कालांत दिसत नाही, येथील राजकारणात आपल्यावर काय उत्तरदायित्व येते, आपण आपल्या समाजाच्या धारणेच्या दृष्टीने काय कर्तव्ये पार पाडली पाहिजेत याबाबतींत काही विचार, विवेक कोणी करीत नव्हते. क्षत्रियांनी आपल्या जहागिऱ्या परक्यांची गुलामी पत्करून सांभाळल्या, आणि आपली शक्ती त्यांचे हात स्वकीयांविरूद्ध बळकट कसे होतील हेच पहाण्यासाठी वापरली. आपल्या मिंधेपणाचीच मिजास बाळगावी, आपल्या बंदेपणाचीच शेखी मिरवावी, आपल्या गुलामगिरीचीच प्रौढी आपल्या समाजापुढे मारावी, असला आत्मघाताचा हा सर्वकाळ. ब्राह्मणांनी आपली बुद्धि विकली, निद्यांची सेवाचाकरी केली, परकीयांची स्तोत्रे गायिली आणि आपण आपल्यापुरते सहीसलामत राहिल्याचे सद्‌भाग्य मानले. ज्या कोणी भारतीयांनी विरोध केला त्यांचे महाभयानक शिरकाण झाले. स्त्रियांना पुरूषांना स्वत्वानें आणि अब्रूनें जगणें कठीण झाले. याबद्दल क्वचितच कोणाच्या मनांत जखम राही. अपमानाचा बदला घ्यावा असे क्वचितच कोणास वाटे. माणसे संख्येने अतिशय विपुल असूनही सत्वहीन झाली, समाजाची धारणा करण्याचे शास्त्र आहे. जीवन जगण्याची एक कला आहे. याचे येथील समाजाला विस्मरण झाले.

अशा सर्वतोपरी विरुद्ध वातावरणांत यश मिळविले ते समर्थ रामदास आणि शिवाजी महाराजांनी. त्यांनी अतिशय अभिमानास्पद कामगिरी करून दाखविली. जीवनाची बैठक योग्य पायावर आणून बसविली. कायम आचरावी अशी योग्य शिकवण समाजाला दिली. सुमारे दीडशे वर्षे गाडी रुळावर आली. परन्तु पुन्हां पूर्वीच्याच वळणावर गाडी गेली. मोंगल जाऊन ब्रिटिश सत्तेवर आले. सहाहजार मैलावरून एका टीचभर राष्ट्रानें भारतावर दीडशे वर्षे राज्य केले. येथील बहुसंख्य रहिवाश्यांच्याच सहाय्यानें त्यांना उटावरून शेळया राखणे शक्य झाले.

दीर्घ काळाचा आढावा घेतला तरच हे समजूं शकेल कीं, गेल्या हजार दीडहजार वर्षात भारतीयांच्या अस्मितेच्या दृष्टीनें विचार केला तर आपली अधोगतीच होत राहिली आहे. महाराष्ट्राच्या अवतीभोवतीचा काही प्रदेश काही काळपर्यंत स्वातंत्र्य उपभोगूं शकला तो शिवसमर्थांच्या अलौकिक पराक्रमामुळे

आणि विभूतिमत्त्वामुळे. त्यानतर त्यापेक्षा मोठ्या भूभागाला स्वातंत्र्य १९४७ साली मिळाले हे खरे आहे. परन्तु त्याच दीर्घदृष्टीकोनांतून आढावा घेतला तर सध्याची परिस्थिती मोठी आशास्पद व निश्चिततेची आहे असे म्हणवत नाहीं.

स्वातंत्र्य मिळण्याच्या काळींच भारतभूमि खंडित झाली. तो इतिहास अतिशय ताजा आहे. ज्या सिंधुनदीच्या परिसरांत आपली संस्कृति विकास पावली व जिच्यामुळे आपणाला हिंदू म्हणून ओळखले जात असे ती नदीच आणि तिच्या भोवतीचा प्रदेश मुसलमानांना तोडून द्यावा लागला. वायव्य सीमेवर पाकिस्तान आणि ईशान्य सीमेवर बांगला देश अशी दोन मुस्लीम राष्ट्रे आपल्याच मूळ प्रदेशांतून आपण तोडून दिली. हा परिपाक भारतीयांच्या चुकीच्या धोरणामुळेच निष्पन्न झाला. व त्याची कारणे पूर्वीच्या इतिहासांतच पेरली गेली होती. असे म्हणतात की शहाणे होण्यासाठी इतिहासाचा अभ्यास करावा. जे इतिहासाचे सम्यग् आलोडन करीत नाहीत ते त्याच त्याच चुका करीत राहतात. मूर्ख लोकांच्या इतिहासाचे मात्र असे पुनरावर्तन होत असते. आपण सावध होणार आहोत का मूर्खच राहणार आहोत ?

या उलट अशा अद्वितीय विभूतिही इतिहासांतच निर्माण होतात कीं, ज्या इतिहास घडवतात. इतिहासाला नवी दिशा देतात. समर्थ व शिवाजी अशा विभूतीपैकी होत. इतिहासाने त्यांना निर्माण केले असे म्हणता येत नाहीं, परिस्थितीच्या ओघाचा अनिवार्य परिणाम म्हणून ते उपजले असे म्हणता येत नाही. कारण एक तर याच दोघांना इतिहासानें आणि परिस्थितीनें का घडविले? आणखीही पुष्कळ माणसे होती. त्यांतून ही परिस्थितीची देण म्हणावी तर इतर कोणी का निपजली नाहींत, असा प्रश्न विचारता येतो. दुसरे असे कीं त्यांच्या पूर्वीही हा इतिहास आणि अशी परिस्थिति हिंदुस्थानांत होती, तरी त्यांच्या आधी इतर प्रदेशांत अशा विभूति का निर्माण झाल्या नाहींत? याचे काही जडवादी तत्त्वज्ञानाने उत्तर देता येत नाहीं.

इतिहासाने आणि परिस्थितीने कर्तृत्ववान् विभूती निर्माण होत नाहींत. कर्तृत्ववान माणसे इतिहास आणि परिस्थिती बदलून टाकतात, हेच खरे आहे.

कर्तृत्ववान् माणसे कर्तृत्ववान् का असा प्रश्न विचारण्यासारखा नाहीं. कारण ती माणसे स्वयंभू कर्तृत्ववान् असतात हेच त्याचे उत्तर. ' केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।' अशी प्रयत्नवादी माणसे कर्तृत्ववान् असतात. ती प्रारब्धवादी, दैववादी, नियतिवादी नसतात म्हणूनच काही करून दाखविण्याचे सामर्थ्य अंगी बाणवतात.

भारतीय संस्कृतीच्या सीमा आकुंचित होत गेल्या आहेत असे आपण इतिहासांत पाहिलें; आणि आपल्या डोळ्यादेखत आपल्या देशाची वायव्य आणि

ईशान्य दिशेच्या भूभागाची शकले पडली हेही पाहिले. आता बाकीचा भूप्रदेश तरी वाचेल असे आपले धोरण असावयास नको काय ? यासाठी आपण सर्वांनी शिवरायांच्या आणि स्वामी समर्थांच्या शिकवणुकीचा आश्रय घेऊन त्यांच्या पावलावर पावले टाकावयास नकोत काय ? आपण एकाच राष्ट्रीय भावनेने भारले आहोत काय ? आपल्या जवळ राष्ट्रीय म्हणता येईल असे चारित्र्य आहे काय ? आपण खरोखरी 'सावधान' असण्याचा समर्थांचा उपदेश आचरीत आहोत काय ?

सध्याचे भारताचे चित्र स्वातंत्र्य असूनही समाधान निर्माण करील, भविष्याविषयीं निश्चितता वाटेल अशा तऱ्हेचे आहे काय ? आपण जागरूक आहो असे मुळींच दिसत नाहीं.

येथे इस्लामी आणि ख्रिस्ती यांची वस्ती दर शेकडा सतत वाढत आहे. आसाम आणि ईशान्य प्रदेशांतील सीमेवरील प्रांत यामध्ये या धर्मीयांच्या आक्रमक कारवाया सुरू आहेत. आपल्याच देशाच्या या काही भागावर आपण परकीय आहो अशा तऱ्हेने आपणास वागवले जाते. 'भारतीय कुत्र्यानों येथून निघून जा,' अशी भित्तीपत्रे या भागांत लावली आहेत. काश्मीर नाममात्र भारताचा भाग आहे, हे सर्वजण जाणतात. पश्चिम बंगाल हा साम्यवादी झाला आहे. केरळामध्येही त्यांचे वर्चस्व आहे.

भारतीय समाजावर याप्रमाणे आक्रमणे चालू असता आपण अत्यंत असंघटित असून बेपर्वाईने वागत आहोत. राज्याराज्यामध्ये विद्वेष, भाषेभाषेमध्ये विद्वेष, जाति जातीमध्ये विद्वेष, स्पृश्यास्पृश्यामध्ये विद्वेष, त्यामुळे धर्मांतरासारखे भयानक प्रश्न निर्माण होत आहेत. सर्व क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार. कोणतेही क्षेत्र शुद्ध राहिलेले नाहीं. त्यामध्ये शिक्षणासारखे क्षेत्र तर पायाभूत असूनही अत्यंत समस्याग्रस्त आहे. या देशांतील तरूण दिशाहीन, अनुशासनहीन, अव्यासंगी, आळशी, स्वार्थी व आचारहीन आहेत. त्यांच्यापुढे काही आदर्श नाहींत, कारण समाजधुरीणच याबाबतींत दोषी आहेत.

ख्रिस्ती व मुस्लिम यांच्या प्रेरणा व आस्था या देशाबाहेरच्या आहेत. या देशांतील समाजवाद, साम्यवाद या तत्त्वज्ञानांचा आश्रय घेणारे, त्यांची स्फूर्तिस्थाने या देशाबाहेरची असून त्यांच्याशी निष्ठा बाळगतात. या देशामध्ये इतक्या मतमतांतरामध्ये आपण विभागलो गेलो आहोत कीं आपणामध्येच सुंदोपसुंदी चालू असल्यास, किंवा वाढल्यास आपणांशिवाय इतरास कोणास जबाबदार धरण्याचे कारण नाहीं.

आपण दारिद्र्यांतून वर येण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण बहुसंख्य लोक स्वातंत्र्य मिळून ३५ वर्षे झाली तरी दरिद्रता रेषेखालीच हीन जीवन जगत

आहेत. लोकसंख्या वाढतेच आहे. त्याबरोबर प्रश्न अधिकाधिक जटिल होतच आहेत.

स्त्रियांची सुस्थिति व निर्भय जीवन हा तर जागतिक प्रश्न आहे. त्यांत खरोखरी काही सुधारणा झाली आहे असे म्हणणे भ्रामक आहे. ३।४ देशामध्ये स्त्रिया मुख्य प्रधान झाल्या यावरून कोणी स्त्रियांची सामान्यत: स्थिती सुधारली आहे असे म्हटले तर ते मुळीच बरोबर नाहीं. त्यांच्या समस्या ज्या पूर्वकाळांत चालू होत्या त्याच आधुनिक काळांतही चालूच आहेत. भारतांतील स्त्रियांची स्थिती सामान्यत: होती तशीच आहे. मग ती स्त्री अशिक्षित असो की सुशिक्षित, दरिद्री असो की सधन. पुरुषप्रमुख परंतु पौरुषहीन समाजांत स्त्री ही पुरुषाधीन तर आहेच पण ती पुरुषांची शिकारही घडत असते ही गोष्ट नाकारण्याजोगी नाहीं. या बाबतीत स्त्रियांनीच जागृत होऊन पुरुषाला वठणीवर आणले पाहिजे, नाहींतर त्यांचे भवितव्य ठीक नाहीं हे निश्चित.

ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांनी एकापेक्षा एक भयंकर युद्धे मानवसमाजावर लादली. मुसलमान राष्ट्रामध्ये प्रागतिक सांस्कृतिक उन्नति दिसून येत नाहीं. ते आपापसांत झगडतात व कौटुंबिक जीवनापर्यंत ते झगडे जात असतात. साम्यवादी राष्ट्रांत भयानक मानवसंहार झालेला आहे. याप्रमाणे कोणतेही धार्मिक वा सामाजिक तत्त्वज्ञान जागतिक शांततेची वाटचाल करीत नाहीं, ही वस्तुस्थिती आहे.

भारतीय जीवनमूल्यांचे समाजधारणेचे तत्त्वज्ञान प्रामाणिकपणे अंगीकारल्यास व आधुनिक वैज्ञानिक सत्यांचा स्वीकार केल्यास अद्यापिही आपल्या भारतीय राष्ट्राला अभिमानास्पद स्थान आणून देणे आपणांस शक्य आहे. हिंदू समाजाने अंतर्निरीक्षण करीत राहिले पाहिजे. राष्ट्रजीवनाच्या दृष्टीने जे दोष आपणामध्ये शतकानुशतके घर करून राहिले आहेत ते दूर करण्याचे आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. हे प्रयत्न जरी व्यक्ती व्यक्तींने सुरू केले तरी ते सामूहिक मोठ्या प्रमाणांत व्हावयास हवेत तरच त्यांची फळे दृग्गोचर होतील. राष्ट्रियत्वाची जाणीव, राष्ट्रीय चारित्र्याची जोपासना, विजिगीषु वृत्ती व आपले ऐहिक जीवन सर्व बाजूंनी समृद्ध करण्याची आकांक्षा मनी बाळगल्यानेंच आपल्या समस्या सुटू शकतील.

शिवसमर्थांनी आजच्यापेक्षाही भयानक परिस्थितीत शून्यामधून स्वातंत्र्य साकार केले. त्यामानानें आपण पुष्कळच भाग्यवान् आहोत. आपण स्वातंत्र्यांत तर आहोतच. या आपल्या स्वातंत्र्याला आदर्श आकार देण्याचेच कार्य करावयाचे बाकी आहे, ते आपणास का जमूं नये ? स्वातंत्र्य मिळवणे एक परी सोपे आहे. ते टिकवणे व त्यात रचनात्मक कार्याची सततची भर घालीत राहणे हे अनेक

प्रकारच्या गुणांवर आणि कर्तृत्वावर अवलंबून आहें. आपण या बाबतींत असावध राहिलो तर आपल्याच हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखी स्थिती निर्माण होईल. जी जीवनमूल्ये कोणत्याही समाजाच्या विकसनशील धारणेला आवश्यक असतात त्या मूल्यांना आपल्या जीवनांत उतरविणे हे कार्य आपणास करावयाचे आहे. याला जे जे विरोधी असेल त्या सर्वांवर आपल्या विवेकानें आणि कर्तृत्वाने मात करून विजयी झालेच पाहिजे.

आपल्या दोषांचे आणि आपल्या आदर्शांचे फारच थोडक्यांत असे विवेचन येथे केले आहे. सुज्ञांना अधिक सांगण्याची जरूरी नाहीं. शिवसमर्थांचे केवळ करमणुकीसाठी पोवाडे गाण्यांत अर्थ नाहीं. त्यांचे आदर्श सतत प्रेरणादायी आहेत. ते कार्यवाहींत आणण्यानेच त्यांचे नांव खरोखरी या भूमीत झळकत राहील.

दुसरे शिवाजी आणि दुसरे समर्थ येण्यांची वाट बघण्यांत अर्थं नाहीं. आपणच समर्थ झाले पाहिजे. आपणच शिवाजी झाले पाहिजे. आपणच आपल्या मातृभूमीचे आनंदवनभुवन केले पाहिजे. एवढेच नव्हे, इतर मानवसमाजांनाही आदर्शभूत होऊं शकू असे कार्यकर्तृत्व करून दाखविण्याची जिद्द आपण धरली पाहिजे. हेच समर्थचरित्रापासून आणि त्यांच्या उपदेशापासून शिकावयाचे आहे. त्यासाठी रामदासांचे जे आदर्श समर्थ श्री रामचद्र त्यांनी आम्हास सद्बुद्धी द्यावी अशी प्रार्थना करुन मी हे उपसंहाराचे भाषण पुरे करतो.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

# भाग दुसरा

# चर्चा

निबंध वाचनानंतर, त्यावर अध्यक्षांचे झालेले
भाषण आणि प्रश्नोत्तरे

## १) श्री. मुकुंदस्वामी रामदासी यांच्या निबंधावर डॉ. जावडेकरांचे भाषण

श्री. मुकुंदस्वामी रामदासी यांचा निबंध उत्तम भाषेत आणि चांगल्या शैलीत आहे. ते साम्प्रदायिक असूनही साम्प्रदायिक लोक समर्थांच्या शिकवणुकीला कसे उणे पडले ते त्यांनी मान्य केले. त्यांच्यामध्ये पुनर्जागरण करण्याची आवश्यकता आहे. संप्रदायाला नवचैतन्य आणि नवी दिशा देण्याची आवश्यकता आहे. समर्थ संप्रदाय जो काही मुठभर लोकांच्यामध्ये, जणुं त्यांच्यापुरताच असल्यासारखा संकुचित दिसतो आहे, त्याचा सर्व समाजामध्ये विस्तार करण्याची आवश्यकता आहे. हे दोष काढून टाकण्याची जरूरी आहे.

## २) डॉ. सौ. ललित दाभोळकर यांच्या निबंधावर डॉ. जावडेकरांचे भाषण

डॉ. सौ. ललित दाभोळकर यांनी मुख्यत: रामदासांच्या पारमार्थिक शिकवणीवर भर दिला आहे. तथापि रामदासांची शिकवण केवळ पारमार्थिक होती असा अपसमज कोणी करून घेऊ नये. रामदासांनी धर्मसंस्थापना खऱ्या अर्थाने करण्याचा प्रयत्न केला. धर्माची अंगे दोन. श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं त्याचाच पुरस्कार केला होता. " धर्मोहि द्विविध:, प्रवृत्तिरूप: निवृत्तिरूपश्च ।" संपूर्ण धर्मामध्ये प्रवृत्ति आणि निवृत्ति दोन्ही एकसमयावच्छेदेकरून चालू असतात.

कोणत्याही एका अंगाच्या परिपोषाने धर्माचे समग्र पालन होत नाहीं. ईशावास्योपनिषदामध्ये याच विचाराला प्राधान्य दिले आहे.

सौ. दाभोळकरांनी तत्वज्ञानापेक्षा समर्थांच्या पारमार्थिक साधनेवर अधिक भर दिला आहे. साधकांना त्याची आवश्यकता आहेच. परमार्थ हा अंतर्मुख बनवणारा आहे. काही काळ निवळ शांतपणे काढत जावा असे समर्थांचे सांगणे आहे. त्यांतून स्फूर्ति घेऊन बाहेरील धकाधकीचे जीवन यशस्वीरीत्या घालविता यावयास पाहिजे. " काही गलबला काही निवळ। ऐसा कंठित जावा काळ॥" दा. १९-८-२८ असे समर्थ वचन आहे.

परमार्थ हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. त्याकडे सतत लक्ष देऊन प्रपंच केला पाहिजे. प्रपंचच परमार्थरूप बनविला पाहिजे. 'मुख्य हरिकथा निरूपण,' असे रामदासांनी सांगितले. पण त्यापुढे कोणी भक्त सरकतच नाहीत. चतुःसूत्री उपदेशांतील हा फक्त एक भाग झाला. 'दुसरें ते राजकारण। तिसरे ते सावधपण। सर्वविषयी॥ चौथा अत्यंत साक्षेप। फेडावे नाना आक्षेप।" दा.(११-५-४) या सर्व भागांचा मिळून रामदासांचा धर्मोपदेश होतो. कोणत्याही एकाच अंगाचा अंगीकार केल्याने धर्म अपूर्ण राहातो, हेच रामदासांचे अट्टाहासाने सांगणे आहे. व तेच इतर संतांपेक्षा त्यांचे वैशिष्टच आहे. अपूर्ण जीवन अधार्मिकच होय.

परमार्थ हेच एकमेव मूल्य समजणारे लोक आपणामध्ये फार आहेत. परंतु ईशोपनिषदाचे असे स्पष्ट सांगणे आहे कीं, अविद्येने म्हणजे सर्व प्रकारच्या ऐहिक विज्ञानाने हा मृत्युलोक तरला जातो; आणि विद्येने अमृतत्त्व प्राप्त होते. या दोन्ही गोष्टींची आवश्यकता संपूर्ण जीवनाला आहे. परन्तु असेही लोक विपुल संख्येने असतात कीं जे केवळ ऐहिकाचीच उपासना करतात. असे लोक खरोखरी अंधःकारांत जगत असतात. परन्तु केवळ परमार्थाची उपासना करणारे त्याहीपेक्षा घोर अंधःकारांत वावरतात. हे सत्य मननीय आहे. हीच समर्थांचीही भूमिका आहे. समर्थांचा अभिप्राय सर्व समाजाला उद्बोधन करून त्याचे सर्वांगीण उत्थापन करण्याचा आहे.

## ३) डॉ. एस्. डी. देशमुख यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण

डॉ. एस्. डी. देशमुखांनीं श्री समर्थांच्या काळाला अनुसरून त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य यांचा आढावा चांगल्याप्रकारे घेतला आहे. त्या त्या काळांत शब्दांचे, कल्पनांचे काही संकेत असतात. संदर्भाव्यतिरिक्त त्यांचा वापर केल्यास अर्थाचा विपर्यास होऊ शकतो. हल्लीच्या काळीं आपण ज्या अर्थानें समाजकारण राजकारण हे शब्द वापरतो त्याच अर्थाने रामदासांच्या काळीही त्यांचा

वापर होणे संभाव्य नाही. म्हणून आजच्या संदर्भात रामदासांचे कार्य पाहातांना असे वाटण्याचा संभव आहे कीं, रामदासांनीं खऱ्या अर्थाने समाजकारण वा राजकारण केले नाहीं. अर्थात् हे म्हणणे बरोबर नाहीं. तथापि त्यांच्या कालाच्या अनुरोधाने रामदासांनी समाजकारण राजकारण कसे केले ते देशमुखांनी उलगडून दाखवले आहे.

आधुनिक काळांत परवलीचा शब्द म्हणजे राजकारण. परंतु समर्थांच्या काळीं हेच महत्त्व सर्वव्यापक अशा धर्माला होते. धर्माच्या संकल्पनेतच समाजाचा आणि व्यक्तीचा सर्वांगीण विकास येतो. धर्म हे खरोखरी एकप्रकारे सर्वसंग्राहक मूल्य आहे. त्याच्या आधारावर अर्थकारण, त्याच्या आधारावर कामादिक जीवनमूल्यांचे साधन, त्याच्या आधारावरच ऐहिक व पारमार्थिक विकास, त्याच्या आधारावरच मोक्षमार्ग हाताळावयाचा. या प्रमाणे व्यक्तीला व समाजाला उन्नत करण्यासाठी जे जे आवश्यक ते सर्व समाजकारणांत व राजकारणांत आपसूकच येते. त्या त्या काळाचे आदर्श, त्या त्या काळाची ध्येये, साध्ये विभिन्न असू शकतात. व त्या अनुरूप त्या त्या वेळचे समाजकारण राजकारण असणार हे उघड आहे.

अस्पृश्योद्धार करणे, रोटी बेटी व्यवहाराची बंधने कमी करणे, समता साधणे, जातपात मोडणे अशा तऱ्हेच्या गोष्टी आजच्या समाजकारणांत येतात. या गोष्टी रामदासांनी केल्या नाहींत, म्हणजे त्यांनीं समाजकारण केले नाहीं असे कोणी म्हटले तर ते कसे काय मान्य होणार ?

तद्वतच निवडणुकीस उभे राहाणे, निरनिराळे पक्ष काढणे, त्यांचा प्रचार करणे, व्यक्तींच्या अधिकारांचा आग्रह धरणे, सभा भरविणे, आवाज उठविणे, कायदाभंग करणे, मोर्चे काढणे, अशा सारख्या कित्येक गोष्टी आजच्या राजकारणांत मोडतात. रामदासांच्या वेळी असे काही नव्हते. तेव्हां ते करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं. यावरून समर्थांनी राजकारण केले नाही असा निष्कर्ष काढणे बरोबर होणार नाहीं.

प्रा. न. र. फाटक यांच्या मते 'राजकारण' या शब्दानें केवळ 'चातुर्य'च समर्थांना अभिप्रेत होते. परंतु हे म्हणणे समर्थभक्त श्री. शंकरराव देवांनी समूळ खोडून काढले आहे. समर्थांनी राजकारणाचा उपदेशही केला, आणि त्यांच्या स्थानाला साजेल असे व शिवाजी महाराजांना पोषक होईल असे गुप्त राजकारण आपल्या शिष्यसमुदायामार्फत केले.

'रामदास आणि रामदासी' या मासिकाच्या ३४ व्या अंकांत ( शके १८६२ चैत्र शुद्ध ९) श्री. अनंत विश्वनाथ टिळक यांनी असे म्हटले आहे कीं, "धर्मस्थापना हा समर्थांचा मंत्र व 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा

लोकमान्यांचा मंत्र हे दोन्ही एकच आहेत. या अर्थाने स्वराज्याच्या महामंत्राचे आद्यगुरु श्रीसमर्थ आहेत."

रामदास–पूर्वकाळांत राजकारणाशी सामान्य जनतेचा संबंध साक्षात्पणे येत नसे. राजे रजवाडे, सरदार दरकदार यांचाच तो खास विषय असे. असलेच तर लोकांना दुय्यम प्रतीचे स्थान राजकारणांत असे. ते सहाय्यक असत. आज्ञाधारकत्वाने चालत असत. परंतु समर्थांच्या उपदेशाने जो जागृति झाली त्यामुळे राजकारण हे लोकाभिमुख झाले, आणि लोक हे राजकारणाभिमुख झाले. राज्य कोणाचे असावे व कोणासाठी असावे, त्याचप्रमाणे आपले कोण, परके कोण, सत्ता कोणाची असावी, तो आपणाला अनुकूल आहे किंवा नाहीं, इत्यादि विषयांमध्ये लोकांना प्रवृत्त करण्याचे कार्य समर्थांनी केले. राजसत्तेमध्ये सर्व जनतेचा जिव्हाळ्याचा संबंध असावा या राजकारणातील लोकशाहीच्या तत्त्वाचा प्रसार समर्थांनी केला. हा विचार भारतांत इतरत्र तर नव्हताच पण युरोपमध्येंही हा विचार विशेषरीतीने पुढे आलेला नव्हता. यावरुनही समर्थांच्या विचारांची उची आणि त्यांचे द्रष्टेपण स्पष्ट होते.

समर्थांच्या शिकवणुकीतून समाजाला केलेल्या राजकारणाचे उद्‌बोधन आणि मार्गदर्शन काढून टाकले तर त्यांचे इतर संतांपासूनचे वेगळे महत्त्वाचे वैशिष्ट्य ते काय राहिले ? परन्तु त्यांची ही ऐहिक सावधानपणाची दृष्टीच त्यांना संतमंडळात आगळे स्थान मिळवून देते हे आता सर्वमान्य झाले आहे.

त्यांच्या चतुःसूत्रीच्या वर उद्‌धृत केलेल्या ओवीशिवाय आणखी दोन ठिकाणी तोच विचार येतो.

> हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण ।
> वर्तायाचे लक्षण । तेही असावे ।। दा. ११–६–४
> हरिकथा निरुपण । बरेपणे राजकारण ।
> प्रसंग पाहिल्यावीण । सकळ खोटे ।। दा. १२–२–२९

राजकारणांत नेमस्तपणा म्हणजे शिस्त पाहिजे. नाहीतर फजिती होते.

> मोठे राजकारणे चुकती । राजकारणी वेढा लागती ।
> नाना चुकीची फजिती । चहूंकडे ।। दा. १९–८–११

राजकारणांत चुका झाल्यास लोक अडचणींत सापडतात असा याचा अर्थ. पुढे समर्थ म्हणतात–

> या कारणे चुको नये । म्हणिजे उदंड उपाये ।
> उपायाचा अपाये । चुकतां होये ।। दा. १९–८–१२

राजकारणी माणसानें सहसा चूक करु नये. म्हणजे त्यास पुष्कळ उपाय सुचतात. चूक केली तर उपायाचाच अपाय होतो.

राजकारणांत त्यावेळच्या परकीय सत्तेच्या परिस्थितींत समर्थ गुप्तपणावर भर देतात. उदंड करी गुप्तरूपे ।

राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे ।

समर्थांचे शिष्य दिवाकर गोसावी ह्यांची शिवाजी महाराजांकडे ये जा होती. अफजुलखान विजापूराहून पैजेचा विडा उचलून राजावर चालून येत असल्याचे वर्तमान समर्थांनी पत्रामध्यें आद्याक्षरे गुप्तरूपाने घालून दिले व शिवाजीस सावध ठेवले.

उत्तर भारतात समर्थ हिंडत असतां त्यांनी श्रीगुरुगोविंदसिंह यांच्याशी एकान्तीं मसलत केली होती, असे श्री. काकासाहेब गाडगीळ यानी "शिखांचा इतिहास" यामध्ये लिहिले आहे. शहाजी राजांशीही काही गुप्तगूं झाले असले पाहिजे. आदिलशाहीच्या प्रदेशांतील मारुतींची स्थापना आपला कार्यभाग साधण्यासाठीच असणार. आग्रा येथून शिवाजी महाराज ज्या मार्गाने आले त्यावर जागजागी समर्थांचे मठ होते. त्यांच्या शिष्यांची गुप्त मदत झाली असणारच.

रामदासांना गुप्त पण सक्रिय राजकारण करावयाचे नसते तर त्यांच्या भडक ज्वलज्जहाल शिकवणीचा अर्थच लागणार नाहीं. "वन्ही तो चेतवावा रे चेतवीताचि चेततो ।" "सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।।" "मुलुक बडवावा की बुडवावा । धर्म स्थापनेसाठी ।।" "आधी राघव मस्तकी धरावा । मग सगळा हलकल्लोळ करावा ।।" "धर्मासाठी मरावे । मरोनि अवघ्यास मारावें । मारता मारता घ्यावे । राज्य आपुले ।।"

वरीलप्रमाणे रामदासांची अनेक वचने आहेत. सामान्यत: संतांनी ज्याप्रमाणे परमार्थावर आणि भगवद्भक्तीवर भर दिला तसाच जर समर्थांना अभिप्रेत असता तर वरील स्फूर्तिदायक उद्गारांना काही अर्थच प्राप्त होणार नाही. प्रपंच सुदृढ करण्यासाठी भगवंताचे, परमार्थाचे अधिष्ठान पाहिजे. हा प्रपंच केवळ कुटुंबाचे भरण पोषण करण्यापुरता मर्यादित नसून 'प्रपची जाणे राजकारण' अशा सामाजिक व्यापक स्वरूपाचा होता. इतकेच नव्हे तर समर्थ म्हणतात, राजकारण करून अंतर शृंगारावे–

विवेके, विचारे, राजकारणे । अंतर शृंगारिजे ।।

शिवाजी महाराजांना तर त्यांनी चहूबाजूनीं सहाय्य केलेच, पण महाराजांच्या मृत्युनंतर उद्विग्न मन:स्थितींतही संभाजीराजांना तसेच स्फूर्तिप्रद प्रोत्साहन दिले ते बघण्याजोगे आहे–

आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मिळवावे ।
महाराष्ट्रराज्य करावे । जिकडे तिकडे ।।
लोकी हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ।

चढती-वाढती पदवी । पावाल येणे ।।
त्याहून करावे विशेष । तरीच म्हणावे पुरुष ।
याउपरी आता विशेष । काय लिहावे ।।

शिवाजीपेक्षाही विशेष काही करून दाखवावे, 'बापसे बेटा सवाई' असे म्हणवून घेण्यासारखे अधिक विक्रमी जीवन जगावे, असा राज्यशकट पुढे भरधाव हाकण्याचा उपदेश समर्थांचे राजकारणी व्यक्तिमत्वच स्पष्ट करीत नाहीं काय ?

दासबोधाचे प्रयोजन सांगतांना रामदास म्हणतात- येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।। त्या अनुषंगानें कर्म, उपासना, ज्ञान व गहन वेदान्त ठिकठिकाणी चर्चिला आहेच. परंतु ते असेही म्हणतात-

ऐसे बहुधां निरोपिलें । ग्रंथगर्भी जे बोलिलें ।
तें अवघेंचि अनुवादलें । न वचें किं कदा ।। दा. १-१-१३

सगळेच्या सगळेच विषय आरंभीच सांगणे शक्य नाहीं. त्यांनी राजकारण निरूपण नांवाचे दोन समास लिहिले आहेत व त्याशिवाय उपदेशनिरुपण, सिकवण निरूपण इत्यादिमध्यें व निस्पृहाच्या आदर्श पुरुषाच्या लक्षणांमध्ये राजकारणी प्रापंचिक व्यवहाराला उपयोगी पडेल असे कितीतरी सांगितले आहे. याचाच अर्थ राजकारण सफळ करण्याच्या उद्दिष्टाने केलेला विवेकपूर्ण प्रपंच हा भक्तिमार्गाचेच एक अंग आहे असे समर्थांना अभिप्रेत आहे. त्याची भक्तिमार्गाची कल्पना किती विशाल आणि सर्वसमावेशक होती ते पुढील ओवीवरून दिसून येईल-

भेटो कुणी येक नर । धेड महार चांभार ।
त्याचे राखावे अंतर । या नांव भजन ।।

भगवंताच्या आध्यात्मिक अधिष्ठानावर सबध जगत् हे त्याचेच स्वरूप आहे हे समजून ऐहिक जगतातील सर्वच उदात्त नीतिन्यायाचा प्रापंचिक व्यवहार हे गूढार्थाने भगवद्भजनच होय. अशा भक्तीला केवळ राजकारणाचेच काय पण युद्धप्रसंगांतील हाणामारींचे देखील वावडे नाहीं असा गीतेचाच अभिप्राय नाही काय ? " मामनुस्मर युध्य च ।" हा लोकविलक्षण गीतोपदेशच समर्थांनी दासबोधामध्ये विशद करून सांगितला आहे.

## चर्चा सत्र

## ४) श्री. सुनील चिंचोळकर यांचा निबंध

त्यांनी वाचून न दाखविता व्याख्यानरुपाने मांडला. त्यांचे व्याख्यान झालेवर, अध्यक्ष डॉ. जावडेकर यानी विचारले- " आपण शिवसमर्थांच्या संदर्भातील 'राज्यदान प्रसंग' व 'विजापूरला सरदार निघाला आहे' हे काव्य याबद्दल कांहीच

सांगितले नाही. त्यावर श्री. चिंचोळकर म्हणाले– " शिवसमर्थांबद्दल एका तासाच्या एका व्याख्यानात काय काय सांगणार ? त्यासाठी किमान तीन दिवसांची व्याख्यानमाला हवी. राज्यदानाचा प्रसंग सन १६५५ साली साताऱ्यात घडला असून समर्थांनी शिवाजीच्या अंगणात भिक्षा मागितली तेव्हा समर्थांना शिवाजी राजेनी सर्व राज्य अर्पण केले. समर्थ त्यावेळी म्हणाले– " आपले राज्य मी स्विकारले आहे. आता माझ्या वतीने आपण हे सांभाळा."

" विजापुरचा सरदार निघाला आहे " हे काव्य १४ चरणांचे असून प्रत्येक चरणाचे अद्याक्षर घेतां हे वाक्य तयार होते. काव्य वरवर पाहता वैराग्यपर आहे, पण त्यात अफझुलखान निघाल्याची सूचना आहे. ही गुप्तता समर्थांना राजकारणात बाळगावी लागली. कारण शिवाजीला सहाय्य करणारी राज्यस्तरावरील समांतर संघटना समर्थ स्थापन करोत असून या संघटनेची चळवळ विस्तारीत होते आहे, असा संशय जर औरंगजेब बादशहाला आला असता तर त्याने शिवाजीचा मागोवा घेण्यापूर्वी समर्थांचे सर्व मठच उध्वस्थ केले असते. बादशहा व अदिलशहा यांच्या सैन्यांनी हजारो मंदिरे उध्वस्थ केली पण समर्थांच्या एकाही मठाला धक्का लावला नाही. याचें कारण श्री समर्थांनी राजकारणात पाळलेली गुप्तता व सावधानता हे होय. " विजापुरचा सरदार निघाला आहे " हे काव्य त्याचा उत्तम पुरावा किंवा नमुना म्हणता येईल."

## डॉ. जावडेकरांचे भाषण

श्री. सुनील चिंचोळकर यांनी महाराष्ट्राच्या रंगभूमीवरील शिवसमर्थयोग विशद करून सांगितला. महाराष्ट्राचे खरोखरी भाग्य थोर म्हणून समर्थ रामदास स्वामी आणि त्यांच्यापेक्षा २१ वर्षांनी लहान असलेल्या छत्रपति शिवाजी महाराज यांच्यासारख्या असामान्य विभूतींचा लाभ महाराष्ट्राला ३५० वर्षांपूर्वी झाला. त्यांच्या शुभयुतीने महाराष्ट्रभूमीचे भविष्यच पार पालटले, आणि ते उज्ज्वल झाले. दोघेहि पुरुष स्वतंत्रपणाने थोर होते. शंकरराव देवांनी तर असे स्पष्टपणे म्हटले आहे कीं, त्यांची उभयतांची भेट झालीच नव्हती असे जरी सिद्ध झाले तरी त्यांच्या कोणाच्याच व्यक्तित्वाला कमीपणा येत नाही, असे ते दोघेही स्वयंभू होते. कोणीच कोणाला मोठे केले नाहीं. परंतु आता हे मान्य झाले आहे कीं, शिवाजीच्या ऐन उमेदीच्या तरुण वयात त्यांचा स्वराज्य स्थापनेचा पराक्रम चालू असतानाच त्यांची व समर्थांची भेट झाली. सुदैव असें कीं, त्यांनी एकमेकांचे मोठेपण जाणले, आणि हीच गोष्ट पुढे परस्पर सहकाराला उपयोगी पडली. दोघांची वाटचाल एकाच दिशेकडे होती. दोघांचे ध्येय एकच होते. शिवाजीचे प्रत्यक्ष राजकारण चालू होते, पण

त्याला धार्मिक ध्येयदृष्टीचा आधार होताच. समर्थांचे प्रत्यक्ष धर्मकारण चालू होते, पण ते सफल करण्यासाठी राजकारणालाही त्यांनी प्रोत्साहन दिले. याप्रमाणे त्यांची कार्ये परस्परांना पूरकच झाली. ती त्यांनीं सुरुवातीस स्वतंत्रपणें यदृच्छेने केली असतील; पण मागाहून त्यांची कार्ये जाणून बुजून एकमेकांना मदत करण्यासाठीच झाली.

या दोघा पुरुषांना चंद्रसूर्याची उपमा देण्याचा कोणास मोह होणे साहजिक आहे. पण त्यात काहीसे अनवधानच प्रकट होते. कारण सूर्य स्वयंप्रकाशी आहे आणि चंद्र परप्रकाशी आहे. परंतु हे दोघेही पुरुष स्वयंप्रकाशी आहेत. दुसरे असे की, जेव्हा पूर्ण चंद्र असतो, तेव्हा तो सूर्याच्या विरुद्ध दिशेला असतो. हे दोघे पुरुष तर साहचर्याने चालत होते. परंतु सूर्यचंद्र एकत्र असतात तेव्हा अमावस्या असते. चंद्र सूर्याच्याच बाजूला असल्याने तो दिसतच नाही. आणि रात्र अंधारमय असते. तेव्हा या उपमेतील हे वैगुण्य स्पष्टच आहे. समर्थांच्या रूपाने ब्रह्मतेज प्रकट झाले होते. आणि शिवाजीच्या रूपाने क्षात्रतेज प्रकट झाले होते. दोघेही तेजःपुंजच. एक ब्रह्मसूर्य तर दुसरा राजसूर्य ! अशा उभयविध प्रकाशाने याचि देही याचि डोळा महाराष्ट्राचे भाग्य स्वराज्य स्थापनेने उजळल्याचे पाहावयास त्यावेळच्या लोकांना सांपडले. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यांत समर्थांच्या रामराज्याची कल्पना साकार झाली होती. स्वराज्याला तात्त्विक विचारांची, धार्मिक आदर्शाची, नैतिक, आध्यात्मिक मूल्यांची बैठक समर्थांनी प्राप्त करून दिली. ऐहिक पारमार्थिक अद्वैताचा एवढा व्यापक विचार इतर संतांपेक्षा समर्थांच्या विचारसरणींतच आढळतो. शिवाजीराजा 'कैपक्षी परमार्थी' होता. ऐहिक जीवनात 'भाग्यश्री' आणि पारमार्थिक जीवनांत 'मोक्षश्री' या दोहोंची एकत्र आवश्यकता आहे. हाच संपूर्ण धर्म आहे, आणि तो स्वकर्तृत्वाने प्राप्त करून घ्यावयाचा असतो. उमजणे समजणे आधी। प्रवृत्ति निवृत्तिकडे। भाग्यश्री मोक्षश्री होते। विवरता विवरता पुढे ।।

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः
इदब्राह्ममिदं क्षात्रं, शापादपि शरादापि ।।

हे आपले प्राचीन संपूर्ण जीवनाचे शाश्वत स्वरूप आहे. वेदांमध्ये सांगितलेलें शाश्वत सत्याचे ज्ञान धनुष्य सज्ज ठेवून रक्षण करावे लागते. संस्कृतीच्या संरक्षणाची व्यवस्था संस्कृतीच्या अंगभूतच असली पाहिजे.

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। गीता ४–८

सज्जनांचे संरक्षण आणि दुर्जनांचा विध्वंस ही दोन्ही धर्मस्थापनेची अविभाज्य अंगे आहेत. शिवसमर्थ योगाने महाराष्ट्रांत धर्म दोन्ही अंगानी अवतीर्ण झाला, आणि तेथे नवे युग सुरु झाले.

## ५) डॉ. वसंतराव वैद्य यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण

डॉ. वसंतराव वैद्य यांनी समर्थांच्या दासबोधातील शिकवणुकीचा सर्व पैलूंनी आढावा घेतला आहे. समर्थांची प्रसिद्ध अशी एक चतु:सूत्री वर येऊन गेलीच आहे. हरिकथानिरूपण, राजकारण, सावधपण व साक्षेप (प्रयत्न) ही ती चतु:सूत्री होय व ती समर्थांच्या उपदेशाचे सार आहेच परंतु या शिवायही दोन प्रकारच्या चतु:सूत्री सांगता येतात. " रामदास आणि रामदासी " या मासिकाच्या ३४ व्या भागात श्री. ज. स. करदीकर यांनी मांडली आहे, ती एक चतु:सूत्री पुढीस प्रमाणे आहे.

शक्ति, युक्ति, भक्ति आणि मुक्ति ही ती मार्मिक चतु:सूत्री होय. शक्तीचा उपदेश हा मूलभूत आहे आणि अतिशय व्यापक आहे. शक्ती ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. वैयक्तिक जीवनापेक्षाही सामुदायिक जीवनांत शक्तिची उपासना अधिक महत्त्वाची आहे. राजकारणांत आणि विशेषत: स्वातंत्र्याच्या संपादनांत तर शक्ति हे श्रेष्ठ साधनसर्वस्व आहे, हे लोकांच्या गळी उतरविण्यासाठीच राम, मारुती आणि तुळजाभवानीची उपास्य दैवतें म्हणून समर्थांनी स्थापना केली हे सर्वविश्रुतच आहे. समर्थांचे एक स्फुट प्रकरण आहे. त्यामध्ये ' शक्तिस्तोत्र ' आहे. असे क्वचितच कोठे पहावयास मिळेल. त्याचा येथें अल्पांशानें निर्देश करतो.

शक्तीने पावती सुखे । शक्ति नसता विटंबणा ।
शक्तीने नेटका प्राणी । वैभवे भोगता दिसे ।।२६।।
कोण पुसे अशक्ताला । रोगीसे बराडी दिसे ।।२७।।
शक्ती तो सर्वही सुखे । शक्ति आनंद भोगवी ।।२८।।
सार संसार शक्तीने । शक्तीने शक्ति भोगिजे ।।
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीवीण दरिद्रता ।।२९।।
शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने येत्न होतसे ।।
शक्ती युक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत धावती ।।३०।।
उदंड खस्तीची कामे । मर्द मारुनी जातसे ।
नामर्द काय ते लंडी । सदा दुश्चीत लालची ।।३३।।
असो हे बोलणे झाले । युक्तीवीण कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हे ।।४२।।
मुक्त केल्या देवकोडी । सर्वही शक्तिच्या बळें ।।४३।।
धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।
नाना बुद्धी शक्ताला । म्हणोन शिकवाव्या ।। दा. १९-१०-२२

" नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।" असे श्रुतिवचन आहे. म्हणजे अध्यात्मसिद्धी करायला जे साधन करावे लागते तेही शक्ती असल्याशिवाय शक्य नाहीं. याप्रमाणे व्यवहारांत आणि परमार्थांत प्रथम शक्ति संपन्नता हवी. रामदासांना 'समर्थ' हे जे नामाभिधान प्राप्त झालें तेच त्यांच्या शिकवणीचे मर्मरूप होय. स्वतः रामदासांना समर्थ या शब्दाने राम अभिप्रेत होता. परंतु त्या शब्दाशी ते इतके एकरूप झाले की, समर्थ हेच त्यांचे अभिधान होऊन बसले.

शक्तीशिवाय कोणताच पुरुषार्थ घडत नाहीं. ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।' याच चालीवर समर्थ म्हणतात, ' हरिभजन कराया पाहिजे दृढ काया ।' हे जसे साध्या भक्तिच्या वैयक्तिक बाबीत खरे, त्याहीपेक्षा जास्त सामाजिक ध्येये साधण्याच्या बाबतही खरेच असणार, म्हणूनच ' संघे शक्तिः कलौ युगे ' हे जाणून की काय समर्थांनी समुदाय, संघटना उभी करण्यावर भर दिला आहे.

दुसरे महत्वाचे सूत्र युक्तिचे. युक्ति म्हणजे विवेकबुद्धि, सारासार विचार, दीर्घसूचना, अचूकपणा. शक्तीला युक्तीची जोड दिल्याने प्रयत्न सफल होतात. समर्थांनी विवेकावर अतिशय भर दिला आहे. ऐहिक आणि पारमार्थिक दोन्ही ठिकाणी विवेकाची जरूरी आहे.

मुख्य यत्न विचाराचा । विवेके श्लाघ्य सर्वही ।।
विवेके कार्य साधते ।।
विचारेवीण कोठेचि नाहीं । समाधान ।।
म्हणोनि सांगाती असावे । मानत मानत शिकवावे ।
हळूहळू शेवटां न्यावे । विवेकाने ।। दा. १२–१०–४१
परमार्थी आणि विवेकी । त्याचे करणे माने लोकीं ।।१९–६–१
विवेकामध्ये सापडेना । ऐसे तो काहीच असेना ।। १९–६–२८
तितुक्यांची अंतरे धरावी । विवेके विचारे भरावी ।। १९–१०–१०
या कारणे आचार शुद्ध । त्या उपरी विचार शुद्ध ।
वतिरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ।। १३–१०–१६
आधी राखावा आचार । मग पाहावा विचार । १७–१०–२५
आचारविचारें पैलपार । पाविजेतो ।।
ऐसी हे समर्थ पदवी । विवेके होते ।।
गुंतल्या लोकास उगवी । विवेकबळे ।।
महंते महंत करावे । युक्ती बुद्धीने भरावे ।
जाणते करोन विखरावे । नाना देशीं ।। ११–१०–२५

मनोबोधांतील कित्येक उतारे याचप्रमाणे विवेकावर भर देणारे आहेत.

विचारुन बोले विवंचूनि चाले । १३२

विवेके देहेबुद्धि सोडोनि द्यावी ।
विचारे वरे अंतरा बोधविजे ।। ४१
जनीं जाणता भक्त होऊनि राहे ।
विवेके तजावा अनाचार हेवा । ६९
विवेके क्रिया आपुली पालटावी ।
विवेके मना आवरी स्थानभ्रष्टा ।
विवेके अहभाव याते जिणावे । ११०
विचारे तुझा तूंचि शोधून पाहे । ११४
विवेके अहभाव हा पालटावा ।
विवेके सदा सस्वरूपी भरावे । १४५
विवेके तदाकार होऊनि राहे ।
विवेके तये वस्तुची भेट घ्यावी । १७०
विवेके तरी सस्वरूपी मिळाली ।
विवेके विचारे विवंचून पाहे ।
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी
बुद्धीवीण माणूस काचे ।

हे ओळखून समर्थ प्रार्थना करतात–

बुद्धि दे रघुनायका ।

जितके शक्ति युक्ति यांचे महत्त्व तितकेच किंवा कांकणभर अधिकच ' भक्ति ' सूत्राचे महत्त्व आहे. भक्तीच्या सामर्थ्याशिवाय शक्ति युक्ति लंगड्या पडतात. मानवीसामर्थ्याला दैवी सामर्थ्याची जोड हवी. हे सामर्थ्य भक्तीने प्राप्त होते. भक्तीने अद्भुत कार्य घडूं शकते. प्रसंगावधानाची बुद्धि सुचणे हे ' देणे ईश्वराचे ' होय. प्रसंगे वर्ततां आलें । यथातथ्यचि सूचले ।।

महाभारतकार सांगतात–

न देवा दंडमादाय रक्षन्ती पशुपालवत् ।
यं तु रक्षितुमिच्छन्ति बुद्धया संविभजन्तितम् ।।

ईश्वर मेंढपाळाप्रमाणे हातीं दंडकाठी घेऊन भक्ताचे रक्षण करीत नाहीं. तर तो भक्ताला योग्य बुद्धि देतो. समर्थ म्हणतात–

बुद्धि देतो सेवकाला । बुद्धीने पार पाववी ।।
भक्ताचा साभिमानी तो । बुद्धिदाता परोपरी ।।
उभाचि पाठिसी देवो । जेव्हां तेव्हां क्षणक्षणा ।।
भक्ताला काय उणे रे । देव त्रैलोक्य वर्तवी ।।
दया हे थोर देवाची । भक्ताला वज्रपंजरू ।।

समर्थे अंगिकार केला । नाना संकटी रक्षिला ।।
राघवाची पदें मानसी धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रे ।।
मुखी रामनाम । काळ घालू पायातळी ।।
म्हणोन आम्ही रामदास । रामचरणीं आमुचा विश्वास ।
कोसळोन पडो हे आकाश । परी आणिकाची वास न पाहो ।।

याप्रमाणें ईश्वराशी अनन्य असणारा भक्त खऱ्या अर्थाने निर्भय होतो. त्याचा आत्मविश्वास दुणावतो. त्याला आत्मिक सामर्थ्य प्राप्त होते. याप्रमाणं भक्ती हीच शक्ति-युक्तिचा न आटणारा झरा आहे. गुरुदेव रानडे यांच्या मतें ईश्वरभक्ति ही अनेक गुणांचा स्रोत आहे. श्रद्धेने नैतिक सामर्थ्य प्राप्त होते. सद्भक्ताच्या ठिकाणीं सद्गुण आपोआप स्फुरूं लागतात.

अलिकडिल काळांत ईश्वरावरील निष्ठेने आत्मिक बळ आणि नैतिक श्रेष्ठता कशी प्राप्त होते याची उदाहरणे म्हणजे स्वामी विवेकानन्द, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी. यांची उदाहरणे घेण्याचे कारण ह्या असामान्य व्यक्ति केवळ एकदेशी संकुचित भक्ति करणाऱ्या नव्हेत. सामाजिक राजकीय धकाधकीचे जीवन जगणारी ही माणसे होती. लोकपराङ्मुख राहून यांनी देव आळविला नाही.

चतुःसूत्रीतील अंतिम सूत्र मुक्तीचे. सर्व आटापीट शेवटी मुक्ति संपादन करण्यासाठी करावयाची. मुक्ति हे साध्य, मुक्ति हे ध्येय, मुक्ति हा परम पुरुषार्थ. ती सिद्ध करण्यासाठी शक्ति, युक्ति, भक्ति ही मात्र साधने होत.

मुक्तीकडे पाहाण्याचा समर्थांचा दृष्टिकोन आणि सर्वसामान्य संत भक्त योगी यांचा दृष्टिकोन वेगळा आहे. एक वेगळेपण असे कीं, मुक्ती द्विविध आहे. ऐहिक आणि पारमार्थिक.

सकळ गुणामध्ये सार । तजविजा विवेक विचार ।
जेणे पाविजे पैलपार । अत्र परत्रीचा ।। दा. १८-६-२२

ऐहिक जीवनाचाही पैलपार साधला पाहिजे आणि पारमार्थिक जीवनाचाही पैलपार साधला पाहिजे. याप्रमाणे मुक्ती उभयविध आहे.

म्हणोनि सावधपणे । प्रपंच परमार्थं साधणे ।
ऐसे न करितां भोगणे । नाना दुःखे ।। दा. १२-१-१०
ऐसा तो शाहणा लोकी । तयाची संगति वरी ।
धरितां सौख्य होता हे । प्रवृत्ती निवृत्तीकडे ।।

ऐहिक जीवनही मुक्तपणे भोगता यावयास हवे, हा विचार फार महत्त्वाचा आहे. संत भक्त योगी याबाबतीत उदासीन असल्याचे चित्र सामान्यतः मनावर उमटते.

ते चित्र पालटायला हवे. सामान्य सांसारिक जीवनाची हेळसांड झाल्याने जीवन सन्मानाने जगणे देखील कठीण होऊन बसते. प्रपंच नेटका करणे खरोखरी एवढे अवघड असू नये, पण त्याकडे दुर्लक्ष केल्याने वैय्यक्तिक आणि सामाजिक जीवन केवळ दुःखमय होते, अशा स्थितींत परमार्थाला मोकळेपणा कोठून प्राप्त होणार ? परतु हा मौलिक विचार सुद्धा परमार्थ करणाऱ्याच्या मनांत उद्भवू नये याचे आश्चर्य वाटते. त्यामुळे ' इतो भ्रष्ट स्ततो भ्रष्टः' अशीच केविलवाणी स्थिती पहावयास मिळते. याला हादरा दिला रामदासांनीं, आणि त्यांनी लोकांना या बाबतीत जागे केले, हेच त्यांचे वैशिष्टच.

विधायकपणे रस घेऊन जीवन उपभोगणे हे परमार्थाच्या आड तर येत नाहींच पण मोक्ष मार्गावरील तो एक पायरी आहे. ईश्वरानें सृष्टि निर्माण केली. त्यात मानवालाही निर्माण केले. तो सृष्टींतही शिरला व मानवांतही आहेच आहे. त्या ईश्वरसृष्टीचा केवळ तिटकारा करणे हा त्याचा एक प्रकारे उपमर्दच नाही काय ? ज्ञानेश्वरांनी एके ठिकाणीं सांगितले आहे–

तुवां शरीरपरा नोहावे । कामनाजात सांडावे ।
मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ।। ज्ञानेश्वरी ३–१८८

ईशोपनिषदाचाच यांत अनुवाद केला आहे. ' तेन त्यक्तेन भुन्जीथाः ।' समर्थांनी हा विचार दृढपणें सांगितला.

कमीत कमी प्रपंच तरी सुखाचा सुबत्तेचा करा. वेदान्तात याला उपभोगवाद म्हणत नसून उपयोगवाद म्हणतात. तो योगांत अंतर्भूत होतो.

ऐहिक मुक्तीच्या कल्पनेचा विकास अलिकडिल अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र यामधे बराच झाला आहे. तो आधुनिक परिस्थितींत नीट जाणून घ्यावयास हवा. इंग्रजींत ज्याला वेल्फेअर स्टेट (कल्याणकारी राज्य) म्हणतात त्यांत ऐहिक जीवनामध्ये सर्व लोकांचे कल्याण जितके साधता येईल तितके ते साधणे हे ध्येय आहे. पारमार्थिक लोक एकदेशी विचार करतात व या महत्त्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष करतात. जे समर्थांच्या काळी लागू होते ते आजच्या संदर्भातही अधिक सम्यग्रीतीनें लागू आहे. जीवनामध्ये सर्व लोकांची आर्थिक सुस्थिति व सुबत्ता निर्माण करावयाचे आयोजन करावयास हवे. दारिद्र्य हा काही पारमार्थिक सद्गुण नाही. तो एक दोष आहे. कल्याणकारी राज्यांत व्यक्तीची मुक्तस्थिती प्राप्त करून घेता येते.

अमुक गोष्टीपासून मुक्ति, हा मुक्तिचा एक प्रकार. उदाहरणार्थ दारिद्र्या-पासून मुक्ति, अनारोग्यापासून मुक्ति, अडाणीपणापासून मुक्ति, गरजापासून मुक्ति, थोडक्यांत म्हणजे ज्या ज्या गोष्टीपासून ऐहिक जीवनामध्ये दुःख प्राप्त होण्याची शक्यता आहे त्या सर्वांपासून मुक्ति. जीवनांतील सर्व उणीवा दूर होणे

हे मुक्तीचे एक गमक. ही मुक्तिची कल्पना नकारात्मक आहे. पण ती मौलिक स्वरूपाची आहे. ' प्रपंची पाहिजे सुवर्ण ' हा समर्थांचा विचार, ' अर्थमनर्थं भावय नित्यम् ' या शांकर विचारापेक्षा निराळा आहे. शंकराचार्य प्रसंगोपात्त बोलतात.

अमुक गोष्टीसाठी मुक्ति, हा मुक्तीचा दुसरा प्रकार. व्यक्तीला स्वतःचे जीवन उन्नत करण्यासाठी, विकसित करण्यासाठी, स्वतःच्या इच्छेप्रमाणे घडविण्यासाठीं, सुखासाठी, समृद्धिसाठी, आदर्श ध्येये जीवनांत प्रत्यक्ष उतरविण्यासाठी मुक्तता हवी हा मुक्तीचा किंवा स्वातंत्र्याचा विधायक अर्थ.

मुक्तीचा किंवा स्वातंत्र्याचा तिसरा सर्वांत विधायक आणि मूर्त प्रकार म्हणजे अमुक अमुक गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य. अमुक प्रकारचे अधिकार मला जणुं जन्मतःच प्राप्त होतात. ते अधिकार उपभोगण्याचे, प्रत्यक्षांत उतरविण्याचे स्वातंत्र्य मला किंवा कोणाही व्यक्तिला असलें पाहिजे.

मला जगण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. मला आईवडिलांचे प्रेम मिळायला हवे. तसेच शिक्षण घेण्याला मी मुक्त असलो पाहिजे. मला पाहिजे ते काम मिळण्याचे, मुक्तपणे बोलण्याचे, मत धारण करण्याचे, श्रद्धा जतन करण्याचे, संघटना करण्याचे, माझ्या हिताची माहिती मिळविण्याचे, लेखन करण्याचे, सर्जन करण्याचे, मोकळा वेळ असण्याचे, मोकळ्या वेळेचा माझ्या इच्छेप्रमाणे विनियोग करण्याचे इत्यादि स्वातंत्र्य मला असले पाहिजे.

या मुक्तीच्या तिन्ही प्रकारच्या अर्थातून ऐहिक जीवन हे कसे खऱ्या अर्थाने प्रत्यक्षपणे संपन्न करता येते ते स्पष्ट होते. समर्थ रामदास स्वामींच्या काळांत हा तपशीलांतील अर्थ जरी विशद झाला नव्हता तरी ऐहिक जीवन, प्रपंच किंवा संसार हा आर्थिक, राजकीय, सामाजिक स्वातंत्र्याशिवाय सफल होत नाही याची उत्तम जाणीव समर्थांना होती यांत काही संशय नाहीं. या अर्थाने स्वराज्य हा माझा मूलभूत जन्मसिद्ध अधिकार आहे व तो प्रथम हस्तगत केला पाहिजे हे समर्थ नीट जाणून होते.

' अस्मानी सुलतानी ', ' परचक्र निरूपण ' इत्यादि ठिकाणी समर्थांनी त्यावेळच्या दारूण परिस्थितीची, दैन्याची, भ्रष्टजीवनाची भेदक चित्रे काढली आहेत. करंटपणाची लक्षणे, मूर्खांची लक्षणे, पढतमूर्खांची लक्षणे, दीन हीन प्रपंचाची चित्रणे या सर्वांतून कोणत्या गोष्टींच्या उणीवा आहेत व त्या कशा घालवून द्यायला पाहिजेत ते सुचविले आहे. आनंदवनभुवन प्रकरणांत काय साधायचे आहे त्याचे चित्र आहे. ' उदंड झाले पाणी स्नान संध्या करावया ।' परमार्थाला लागणारे स्वास्थ्य आणि निश्चितता ऐहिक भौतिक परिस्थितींत प्राप्त करून घेतली पाहिजे, याची उत्तम जाण रामदासांना निश्चितच होती.

वरीलप्रमाणे इतर संतांशिवायचे समर्थांचे मुक्तिकडे विविधपणे पहाण्याचे वेगळेपण स्पष्ट केले. हा वेगळेपणाचा एक भाग. समर्थांचे आणखीही एक वेगळेपण मुक्तिच्या जीवनांतील स्थानासंबधीचे आहे. सामान्यत: असे समजले जाते कीं, मुक्ति मिळाली की परमार्थ सिद्ध झाला. मग सर्व खटाटोप संपतो. मग काही मिळवायचे जसे शिल्लक राहात नाहीं, तसे काही करावयाचेही उरत नाहीं. सर्व धडपड मोक्षासाठी. मोक्ष मिळाला की धडपड संपली. ही मोक्षारूढ, योगारूढ होण्याची स्थिति. जिथें आरूढ व्हावयाचे तिथे तो आरूढ झाला. जिथे पोचायला पाहिजे तिथे तो पोचला. ' सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ।' ४–३३ हे ते: गीतावचन. जीवनाची इतिकर्तव्यता झाली, परिसमाप्ति झाली, परिपूर्णता झाली, आता काही राहिले नाही. वेदान्तात याला ' आरोहक्रम ' म्हणतात. म्हणजे जीवनाच्या खालच्या स्थितीतून कर्म, उपासना करता करता ज्ञान–आत्मज्ञान–म्हणजेच मुक्ति प्राप्त करून घेणे, जीवनसोपानाची ही अंतिम पायरी गाठणे हीच ती आरूढावस्था. अशा माणसाबद्दल आपण तो ' पोहोचलेला ' असा शब्दप्रयोग करतो.

या जीवनाच्याकडे पाहाण्याचे चार वाद प्रमुख आहेत. १) **भोगवाद** २) **अपवर्गवाद** ३) **भोगापवर्गवाद** ४) **धर्मवाद**. यात समर्थांना कोणता अभिप्रेत होता ते येथे दाखवायचे आहे.

यापैकी **भोगवाद** हा चार्वाकासारख्या प्राचीन व जडवादाच्या अर्वाचीन समर्थकांना मान्य आहे. हे सर्व ऐहिक भौतिक जीवनच स्वयंपूर्ण आहे असे ते मानतात. आत्मा, ईश्वर, ब्रह्म अशा इंद्रिय– प्रत्यक्षाच्या अतीत वस्तूला ते भ्रमरूप समजतात. या मताचे संपूर्ण खंडन करण्याला येथे अवकाश नाहीं. परंतु या मताचे अनुयायी यद्यपि बहुसंख्येने आहेत, तथापि इंद्रियप्रत्यक्ष हे एकमेव ज्ञानसाधन आणि चैतन्यहीन जडपदार्थ ही एकच प्रकारची अंतिम वस्तू आहे असे न मानणारेच विचारवंत, तत्त्वज्ञानी व धर्मशील लोक आहेत, व त्यांची संख्या देखील विपुल आहे. भारताची परंपरा जडवादी कधी नव्हती व नाही. मात्र हा विचार येथेही घुसला आहे हे जाणून घेतले पाहिजे. समर्थांना अर्थातच भोगवाद मान्य नाही हे निराळे सांगण्याची आवश्यकताच नाहीं.

दुसरा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन अपवर्गवादाचा म्हणजेच **मोक्षवादाचा**. हे जीवन दु:खमय आहे, असार आहे. असा हा एक प्रकारचा निराशावादी वैफल्यवादी विचार आहे. जीवन हे हेय आहे, म्हणजे त्याज्य आहे. वर्ज्य आहे. त्यापासून अपवर्ग मिळवणे, म्हणजे त्याच्या त्यागांतच मोक्ष असणे हा तो नकारात्मक विचार. जैन बौद्ध विचारप्रणाली ही अशी अपवर्गवादाची आहे. जीवन मुळांतच असार, त्याचा मूळ त्याग हाच मोक्ष. हा विचारही भारतीय

वैदिक परम्परेला धरून नाही. समर्थांनाही तो मान्य नाहीं. मोक्ष हा एकमेव पुरुषार्थ. इतर पुरुषार्थ त्या अलिकडिल असल्याने ते मोक्षमार्गाशी सुसंगत तर नाहीतच पण ते बाधारूप होतात. म्हणून ते सर्वस्वी टाळण्यावर म्हणजे त्यांचा अपवर्ग करण्यावरच या विचाराचे सर्वस्व आहे. या मताचा पगडा पुष्कळ धार्मिक व पारमार्थिक लोकांमध्ये आपणास पाहावयास मिळतो. भोगवाद जसा एकदेशी तसाच अपवर्गवाद हाही एकदेशी आहे.

तिसरा वाद **भोगापवर्गवाद.** याचे दोन तऱ्हेने अर्थ लावता येतात. ' भोगापवर्गार्थं दृश्यम् ' असे सांख्ययोग तत्त्वज्ञानाचे सूत्र आहे. हे जे दृश्य जगत् आहे, त्यातील सर्वच भोग्य नाही किंवा सर्वच त्याज्य नाही. ते अंशत: भोग्य आहे, अंशत: त्याज्य आहे. असा विवेक करून जीवनांत वागावे. दुसरा अर्थ असा आहे कीं, जेवढा भोग घेता येईल तेवढा आधी घ्यावा, पण शेवटी त्यातील काहीच ग्राह्य नसल्याने, त्याचा अंतिमत: अपवर्गच योग्य आहे. न्याय वैशेषिकांनाही हा विचार मान्य आहे. काही टाकण्याजोगे म्हणजे ' हेय ', काही घेण्याजोगे म्हणजे ' उपादेय ' असा हा हेयोपादेय विचार आहे.

चौथा वाद **धर्मवाद** म्हणून प्रसिद्ध आहे. हा अद्वैतवेदांताचा आहे. या विचारसरणीप्रमाणे सर्व सृष्टि ईश्वरमय असून त्याचे मुख्य सूत्र सृष्टिच्या धारणेचे आहे. या धारणेलाच धर्म म्हणतात. यांत टाकाऊ काही नाहीं. सृष्ट जगत् हे धर्मक्षेत्र आहे. ते उपभोगासाठी नाही. त्याचा धर्मासाठी उपयोग होऊ शकतो. ' हाट भरला संसाराला । नफा पहावा देवाचा ॥' दा. १२-८-३४. ज्या शिडीने धर्मभावनेने ईश्वराचा साक्षात्कार झाला तिला टाकून द्यावयाचे नाहीं, आरोह झाला, ईश्वर समजला, आत्मसाक्षात्कार झाला, ' ईशावास्यमिदं सर्वम् ' हे ज्ञान झाले, म्हणजे त्या ज्ञानासह खाली उतरावयाचे, ' अवरोह ' करावयाचा. धर्माला सार्वत्रिक आणि सार्वकालिक मूल्य आहे. यालाच सनातनधर्म म्हणतात. ज्ञानाने नवीनपणें मुक्ति उत्पन्न होत नाहीं. आपल्या सनातन मुक्तत्वाच्या आत्म-धर्माची जाणीव होते. अज्ञानापासून मोक्ष. ज्ञानप्राप्ति ही ' प्राप्तस्य प्राप्ति ' आहे. ज्ञानापूर्वीची साधने करण्याचा प्रकार आणि ज्ञान झाल्यावर तीच साधने सिद्धपणे हाताळणे एवढाच महत्त्वाचा फरक होतो.

अद्वैतवेदान्त्याशिवायचे सर्व भक्तिमार्गी, योगमार्गी, कर्ममार्गी मोक्षापाशी जाऊन थांबतात. परंतु अद्वैतवेदान्ती अपरोक्षानुभूतीसह परत फिरतो व आपले व इतरांचे जीवन विधायकपणे धर्माचरण करून उजळून टाकतो. समर्थांची मुक्ति या प्रकारची आहे. आपलं साध्य सिद्ध झाले की इतराकडे पाठ फिरविणारे परमार्थी वेगळे, आणि परमार्थ सिद्ध झाल्यावर लोकसंग्रह करणारे वेगळे. या दुसऱ्या प्रकारच्या संतांमध्ये समर्थ मोडतात.

ज्ञानापूर्वीचा अमुक्त स्थितीतला साधनेचा व्यवहार निराळा, आणि ज्ञानानंतरचा मुक्तस्थितीचा धर्मव्यवहार निराळा. समर्थांच्या चतु:सूत्रीतील भक्तिची शिकवण ही अशा श्रेष्ठ कर्मयोग्याची आहे. त्यात सर्व योग एकवटतात. मुक्ताची शक्ति, मुक्ताची युक्ति, मुक्ताची भक्ति ही इतरांना आदर्श घालून देणारी धर्मस्थिति आहे.

समर्थांनी प्रथम उत्तम परमार्थसाधना केली आणि ती लोकस्थिती जाणून त्यांच्या उन्नयनासाठी राबविली. ज्ञानी मनुष्यच खरोखरी अज्ञानी लोकांचा हितकारी पुढारी होऊ शकतो. हेच समर्थजीवनाचे सार आहे.

यस्मान्नोद्विजते लोक: लोकान्नोद्विजते च य:। १२–१५ या गीतेच्या वर्णनाप्रमाणें ' उपाधींत सांपडो नये । उपाधीस कंटाळो नये ।' दा. १९–१०–२० असा समर्थांचा ज्ञानोत्तर व्यवहार होता. सर्वकाही करून अकर्ता परंतु कर्तृत्वाचा अभिमान नसल्यामुळे काही न करता कर्ता असा हा अलौकिक पुरुष म्हणजे समर्थ. या जगालाच त्यांनीं ' आनंदवनभुवन ' बनवले. जीवन्मुक्ताचा हा लोकाभिमुख प्रपंच त्यांनीं मांडून दाखवला. हा प्रपंच भोगप्रवण नाहीं, त्यागप्रवणही नाहीं तर धर्मप्रवण आहे. धार्मिक जीवनाची परिणती म्हणजे आंतर्बाह्य आनंदाचा साक्षात्कार.

समर्थांची शिकवण आणखी एका चतु:सूत्रींमध्ये सांगता येण्याजोगी आहे. ती म्हणजे प्रचीति, प्रतिभा, प्रयत्न आणि प्रबोध. सामान्यत: समर्थांनी विवेक बुद्धीवर जरी भर दिला असला तरी अनुमानधपक्याची बुद्धि त्यांना नको होती. त्यांना ' रोकडी प्रचीति ' हवी होती. ' प्रचीतीचे बोलणे ' त्यांना मान्य होते. सांगोवांगीचे नव्हे. प्रत्यक्षवादापेक्षा प्रचीतिवाद मौलिक आहे, श्रेष्ठ आहे. प्रत्यक्षवाद इंद्रियांपुरता मर्यादित आहे. व्यवहारांत तो हवाच. परंतु परमार्थात प्रचीतिशिवाय कोरडी वडवड व्यर्थ आहे. इहपरविषयांत अनुभूति घेऊन मग प्रतिभेच्या जोरावर त्या अनुभूतीचा आविष्कार आपल्या साहित्यांत त्यांनी केला आहे. काय करायला हवे, काय योजना आखायला हव्यात या संबंधीचा यशस्वी विचार प्रतिभा असल्याशिवाय उत्पन्न होत नाहीं. प्रतिभा असल्याशिवाय नव्या कल्पना लोकांचे समोर मांडता येत नाहीत. समर्थांचे समग्र वाङमय त्यांची प्रतिभासंपन्नता दाखविते. ते शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत. नव्या नव्या शब्द प्रयोगांची टांकसाळ त्यांच्या रचनेंत पाहावयास सांपडते.

त्यांची वाणी विजिगीषु वृत्तीची द्योतक आहे. त्यांची प्रयत्नवादी विचारसरणी अंत:करणास जाऊन भिडते. साक्षेप म्हणजे प्रयत्न. आपण प्रयत्नान्ती परमेश्वर असे म्हणतो. साधकाच्या दृष्टीने ते योग्यच आहे. तथापि समर्थ ' यत्न तो देव जाणावा ' असे म्हणतात. प्रयत्न हे परमेश्वराचेच स्वरूप, ' केल्याने होत

आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।' परमेश्वराने प्रयत्न करूनच सृष्टि निर्माण केली. प्रयत्नामध्ये नवनिर्माणक्षमता आहे. प्रयत्नामध्येच सिद्धिची बीजे असतात. प्रयत्नाच्या जोरावरच प्रत्येक मनुष्य आपले भविष्य सुधरवूं शकतो. प्रयत्नाच्या अभावी माणसे करंटी होतात, दुर्दैवी होतात. प्रयत्नांनी ते सुदैवी होतात, भाग्यश्री भोगूं शकतात.

हीच रामदासांची प्रबोध शक्ति. लोकांचे उद्‌बोधन करून त्यांना सन्मार्गावर प्रवृत्त करणे म्हणजे प्रबोध. लोकांना जागे करणे, त्यांच्यामध्ये स्वत्वाची जागृति आणणे, त्यांचे उन्नयन होईल असा त्यांना उपदेश करणे म्हणजे प्रबोध. यांत केवळ परोपदेशे पांडित्य नाहीं, तर ' आधी केले, मग सांगितले ।' असा आपल्या आचरणाचा आदर्श त्यांच्यापुढे ठेवणे होय. या प्रयत्नपूर्वक प्रबोधामुळे त्यांना नाना मंडळ्या, समुदाय स्थापून त्यांना युक्तिवृद्धीनें भरून सोडतां आल्या. याप्रमाणें त्यांचा उपदेश आरामखुर्चीतला किंवा पुस्तकी न राहाता तो लोकांकरवी प्रत्यक्षांत उतरविता आला. म्हणून महाराष्ट्र देशाचे चित्र पालटविता आले.

## ६) डॉ. बी. आर. मोडक यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण

डॉ. बी. आर. मोडक यांनीं ' रामदासांचे समर्थ मानसशास्त्र ' मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यासाठी ' मनाच्या श्लोकांचा ' आधार घेतला आहे. त्यांनी निबंधांत केलेले विवरण स्वतंत्रपणे उद्‌बोधक आहे. परंतु त्याला मानसशास्त्र हे अभिधान तेवढेसे समर्पक नाहीं. वर वर पाहाता मनाचे श्लोक हे मनाचे असल्याने त्यांत मानसशास्त्र असले पाहिजे असे वाटणे साहजिक आहे. परंतु ज्याला वास्तव अर्थाने मानसशास्त्र म्हणता येईल असे मनाच्या श्लोकांत नाहीं. मुख्यतः त्यामध्ये मनाला केलेला हितोपदेश आहे. मनाच्या स्वरूपाचे पृथक्करण नाहीं.

या संदर्भात पाश्चात्य मानसशास्त्राचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. ज्याला Psychology असे नांव आहे ते शास्त्र आरंभाला psyche म्हणजे soul किंवा आत्मा याचे शास्त्र म्हटले जात असे. परंतु आत्मा ही काय वस्तु आहे की जिचे शास्त्र रचता येईल ? ह्यूम नांवाचा एक ब्रिटिश तत्त्वज्ञ होऊन गेला. तो म्हणतो, ' मी प्रामाणिकपणें माझ्या आंत या आत्म्याला वारंवार पाहाण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु प्रत्येक वेळीं एखाद्या कल्पनेंवर, आशा, इच्छा, प्रेम, द्वेष, एखाद्या वस्तूची काल्पनिक प्रतिमा, स्मरण इत्यादि प्रकारच्या तुटक तुटक अनुभवावर मी आदळत असे. आत्मा नांवाची वस्तु किंवा द्रव्य जे

सततपणे अस्तित्वांत टिकून आहे असे मला काही आढळले नाही.' ज्या वस्तूचा असा अनुभवच मुळांत नाहीं त्या वस्तूचे शास्त्र ते काय होणार ? शास्त्र अशा रहस्यमय गूढ अशा विषयाचे होऊ शकत नाही.

तेव्हा सायकोलोजी हे खरोखरी आत्म्याचे शास्त्र नसून मनाचे शास्त्र आहे. असा व्याख्येमध्ये बदल केला गेला.

परंतु पुढे पुन्हां अशी शंका घेतली जाऊ लागली की ' मन ' म्हणून तरी काही वस्तु पदार्थ आहे काय. की ज्याचे शास्त्र आपण करूं शकूं. ज्या विषयाचे शास्त्र बनवावयाचे तो विषय सर्वांना सामान्य अशा वस्तूरूपाने अनुभवास यावयास पाहिजे. मन म्हटले की, जो तो आंतमध्ये पाहू लागतो. हे introspection किंवा अंतर्निरीक्षण प्रत्येकाचे स्वतत्र असते. त्याची तुलना देखील इतरांशी करता येत नाहीं. मी माझ्या मनांत पाहातो, दुसऱ्याच्या नाहीं. एखादा विषय खरोखरी शास्त्राला योग्य व्हावयास पाहिजे असेल तर तो सर्व निरीक्षकांच्या सामान्य अशा वस्तुतत्र निरीक्षणाखाली यावयास हवा. मन काही अशा तऱ्हेचा विषय नक्कीच नाहीं. मग मानसशास्त्र म्हणजे मनाचे शास्त्र या म्हणण्याला काही अर्थ राहात नाहीं. मन ही काही निरीक्षणाचा (observation) विषय होईल, मेजावर त्याला ठेवून सर्वासमक्ष त्याच्यावर प्रयोग (experiments) करता येतील अशी वस्तू नाहीं. तेव्हा मन हे काही त्याचे शास्त्र रचता येण्याजोगा विषय नाहीं.

मग सर्वांना निरीक्षणयोग्य अशी काय गोष्ट आहे की ज्याचे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होईल ? तर विचार करता असे सर्वानुमते ठरले कीं, आपण आपले स्वत:चे व इतरांचे वर्तन पाहू शकतो. वर्तन म्हणजे behaviour हे सर्वसामान्य विषय होऊं शकते. कारण वर्तन हे शारीरीक आहे.

तेव्हा गंमत अशी आहे कीं, मानसशास्त्राविषयीच्या संकल्पनेंत जी सुधारणा होत गेली, ती अशाप्रकारे सांगतात– मानसशास्त्रानें प्रथम आपला आत्मा घालविला, नंतर आपले मन घालवून दिले. शेवटीं ते स्थिरावले देहावर. दैहिक वर्तनाचे शास्त्र किंवा Behaviourology असे त्याचे सध्याचे स्वरूप आहे, मानसशास्त्राला त्याचे शास्त्रीयत्व टिकवून ते सर्वमान्य होण्यासाठी बरीच मोडतोड करून वर्तनशास्त्र या स्वरूपांत पुढे यावे लागले. याचा एक परिणाम असा झाला कीं, पूर्वी फक्त मानवापुरते मर्यादित असलेले मानसशास्त्र, त्याच्या कक्षा विस्तारून, सर्वच प्राण्यांचे वर्तन प्रत्यक्षगम्य असल्या कारणाने, कोणत्याही प्राण्याचे तथाकथित मानसशास्त्र किंवा त्याच्या वर्तनाच्या अभ्यासाचे शास्त्र होऊ शकते. म्हणजे ज्याला Animal Psychology म्हणता येईल असे पाशव मानसशास्त्र सुद्धा अभ्यासनीय झाले आहे.

नाहींतरी आपण जेव्हां दुसऱ्याचे मन जाणले असे म्हणतो ते त्याच्या वर्तनाच्या निरीक्षणाचें जोरावरच म्हणतो ना ! कोणाच्याही मनांत प्रवेश करणे हे अशक्य तर आहेच. पण निरर्थक किंवा अर्थशून्य आहे. कारण केवळ भाषा-प्रयोगानें मनाच्या आत जाणें म्हणजे काही खोलींत प्रवेश करण्यासारखे नाहीं. त्या शब्दप्रयोगाला काही तसा अर्थ नाहीं. माणसाच्या हावभावावरून, त्याच्या हालचालीवरून, त्याच्या भाषणावरून, त्याच्या डोळ्यांच्या व चेहऱ्याच्या चलविचलतेवरून त्याच्या मनाचा ठाव आपणास घेता येतो.

आकारै रिङ्गितैर्गत्या चेष्टया भाषणेन च ।
नेत्रवक्त्रविकाराभ्यां गृह्यतेंऽ तर्गतं मन: ।।

शरीराच्या आंत मन म्हणून काही वस्तु आहे काय, यावद्दलच मोठा वाद आहे. अर्वाचीन मानसशास्त्र आणि काही तत्त्वज्ञान विचारप्रवाहाप्रमाणें मन हे यंत्रामध्ये असलेल्या भुतासारखे (Ghost in the machine) पूर्णपणें कपोलकल्पित आहे. ते शरीरापेक्षा भिन्न असून शरीरांत राहाणारी अशी वस्तू नाहीं. भारतीय तत्त्वज्ञानांत सुद्धा मन हे जडवस्तूच समजले आहे. ते काही चेतनतत्त्व नाहीं. आणि हा मनाच्या जडत्वाचा विचार केवळ वेदान्ताचा आहे असेही नाहीं. इतर दर्शनांमध्येही त्याला अनात्मतत्त्वच म्हटले गेले आहे.

शास्त्र संकल्पनेचा दुसराही एक महत्त्वाचा विचार येथे मांडला पाहिजे, जेणेकरून मनाच्या श्लोकांत मानसशास्त्र आहे किंवा नाहीं हे आणखीन स्पष्ट होईल.

शास्त्रे अनेक प्रकारची असतात. त्यांतील एक वर्गीकरण असे आहे कीं, काही शास्त्रे वर्णनात्मक (descriptive), भावात्मक, (positive) आणि वास्तविक किंवा तथ्यात्मक (factual) असतात. तर काही इतर शास्त्रे आदर्शात्मक (normative), मूल्यात्मक (Valuational), गुणांकन करणारी (appreciative) अशी असतात. वर्णनात्मक शास्त्रे ' काय वस्तुस्थिति आहे ' ते सांगतात. उदाहरणार्थ, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, जीवशास्त्र. वहुतेक शास्त्रे याच प्रकारांत मोडतात. या प्रकारच्या शास्त्रांत पुष्कळ निरीक्षण व प्रयोग करण्यास अवकाश असतो. व जितके शास्त्र प्रयोगक्षम तितके ते प्रगति करण्यासही समर्थ असते.

आदर्शात्मक शास्त्रे ' काय असावे, कसे घडावे, कसे व्हावे ' त्याचा शोध घेतात. चांगले काय वाईट काय; कार्य काय, अकार्य काय; सुंदर काय, कुरूप काय; खरे काय, खोटे काय; न्याय्य काय, अन्याय्य काय; या संवंधीचा विवेक तारतम्य करून काही आदर्श मूल्ये घालून देतात. ती प्रत्यक्षांत नसतात; परंतु ती

प्रत्यक्षांत आणावीत असा आदेश, उपदेश करतात. सत्यं, शिवं, सुन्दरम् ही ती मूल्ये अथवा आदर्श. त्यांच्याविषयीं निरीक्षण, प्रयोग हे अभ्यासाचे मार्ग तेवढेसे योग्य नाहींत चिंतन, विचार, मनन या प्रकारे या शास्त्रामध्ये गति होते. सत्याचे चिंतन करणारे ते तर्कशास्त्र. शिव, श्रेयस् यांचे चिंतन करणारे ते नीतिशास्त्र. सौंदर्याचे चिंतन करणारे ते सौंदर्यशास्त्र. ही शास्त्रे प्रयोगक्षम नाहींत. ही बाह्यनिरीक्षणावर अवलंबून नाहींत, कारण असा बाह्य वास्तविक भावात्मक असा यांचा विषय नाहीं. हे विषय प्रामुख्याने अतींद्रिय बुद्धिग्राह्य आहेत. याचा अर्थ असा कीं, तथ्यात्मक शास्त्रे आणि मूल्यात्मक शास्त्रे यांच्यामध्ये मूलत: भेद आहे. मूल्यात्मक शास्त्रे ही तत्त्वज्ञानांत मोडतात. त्यांचे स्वरूप तात्त्विक चिंतनात्मक असे असते.

काहीना मनासंबंधीचा असा विचार कीं ज्यामध्ये मनाचे अस्तित्वच नाकारले जाते तितकासा पसंत पडत नाही.

मनाचे स्वरूप इतर पदार्थाप्रमाणे नाहीं असे म्हणता येईल. इतर शास्त्राप्रमाणे मनाचे बाह्यवस्तुवाचक शास्त्र करता येत नसेलही. म्हणून काय मनच नाहीं असा निष्कर्ष काढावयाचा ? तेव्हां मनाचा अभ्यास स्वतंत्र मार्गानें, निराळ्या प्रक्रियेने करता येणे शक्य आहे. तेव्हां मनाची दोन प्रकारची शास्त्रे उभारण्यांत आली. एक प्रत्यक्ष प्रमाणावर आधारित (empirical psychology) असे मानसशास्त्र किंवा मानववर्तनाचे वर्णनात्मक शास्त्र. दुसरे चिंतनात्मक तात्त्विक मानसशास्त्र (rational psychology) किंवा (philosophical psychology).

मनाच्या श्लोकांत मनाच्या स्वरूपाचे वर्णन करणारे मानसशास्त्र नाहीं. मनास उद्देशून त्याने कसे वागावे, आचरण ठेवावे या संबंधीचा उपदेश किंवा बोध त्यांत केलेला आढळतो. हा उपदेश अर्थातच प्रामुख्याने नैतिक आदर्शाच्या स्वरूपाचा आहे. म्हणजे या श्लोकांत मानसशास्त्रापेक्षा नीतिशास्त्र आहे. वर असे म्हटले आहे कीं, मानसशास्त्र हे वर्तनशास्त्र या स्वरूपांत हल्ली अभ्यासिले जातें. येथें वर्तन म्हणजे behaviour असा अर्थ आहे, (character) शील किंवा (conduct) चारित्र्य या अर्थानें त्याचा वापर नाहीं. शील किंवा चारित्र्य हा नीतिशास्त्राचा किंवा ज्याला आचारशास्त्र असेही नामाभिधान दिले आहे त्याचा विषय आहे. मनाच्या श्लोकांत मनुष्याने कसा आचार ठेवावा यावरच विशेष भर दिलेला आहे. मनाचे स्वरूप असे असे आहे असे सांगणे निराळे, आणि मनाने असे असे वागावे, त्यांत त्याचे हित आहे असे सांगणे निराळे.

या दोन प्रकारच्या शास्त्रांत आणखी एक प्रकारचा भेद आहे तो लक्षांत घेण्याजोगा आहे. वर्णनात्मक शास्त्राचे नियम कोणासही मोडता येणे शक्य नसते. उदाहरणार्थ गुरुत्वाकर्षणाचा नियम अथवा सिद्धांत हा अनुल्लंघ्य आहे. त्याचप्रमाणे

प्रत्यक्षावर आधारित मनाच्या स्वरूपाचे जे वर्णन करता येते ते सार्वत्रिक, सार्वकालिक असे अनुल्लंघनीय असते. मनाचे व्यापार कसे चालतात ते यथातथ्य-रूपाने जाणण्यावर भर असतो. ते व्यापार तसेच चालणार. त्याला अबाधित असे स्वरूप असते. या उलट नीतिशास्त्रात सांगितलेले आदर्शभूत आचरणाचे नियम कोणी उल्लंघन करू नयेत, ते सदैव आचरणीय आहेत हे खरे. परतु या अपेक्षेप्रमाणें मनुष्य वागत नाहीं, म्हणूनच त्याला उपदेश करून त्याचे चारित्र्य, शील घडविण्याचे यांत प्रयत्न केलेले असतात. माणसे स्वभावतःच जर सन्मार्गगामी, सत्प्रवृत्त असतील तर त्यांना उपदेश करण्यासाठी नीतिशास्त्र, धर्मशास्त्र यांची रचनाच करण्याचे कारण उरले नसते. मनुष्य अपेक्षित आदर्शाप्रमाणें आपला आचार ठेवीत नाहीं, म्हणूनच त्याचे उद्‌बोधन करण्यासाठी अशा प्रकारची शास्त्र-रचना करावी लागते. म्हणजे नीतिनियम मोडण्यासाठी मांडले नसतात, पण ते मोडले जातात हा अनुभव आहे. माणसे नीतिनियम मोडतात हे त्यांचे वर्तनाचे प्रत्यक्ष मानसशास्त्र झाले. पण त्याने नीतीनें वागावे हे नीतिशास्त्र झाले.

अशी नीतिपर हितोपदेशात्मक शिकवणूक देण्यासाठीं समर्थांच्या मनाच्या श्लोकांची शते लिहिली गेली आहेत. तो सर्व उपदेश येथे देत नाहीं परंतु या श्लोकांत पुढील ओळी कित्येक श्लोकांच्या चतुर्थपादामध्ये पुनःपुन्हा आल्या आहेत तिकडे लक्ष वेधतो. याचा अर्थ असा कीं त्यावर समर्थांचा विशेष भर आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।। | श्लोक २८ ते ३७ |
| २) | मना सज्जनां राघवी वस्ति कीजे ।। | ३८ ते ४२ |
| ३) | जनीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।। | ४७ ते ५६ |
| ४) | प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।। | ६७ ते ७६ |
| ५) | तुटे वाद संवाद तो हीतकारी ।। | १०८ ते ११२ |
| ६) | नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।। | ११६ ते १२५ |
| ७) | जुने ठेवणे मीपणें आकळेना ।। | १३७ ते १४१ |
| ८) | मना सत आनंत शोधूनि पाहे ।। | १४६ ते १५० |
| ९) | सदा संगती सज्जनाची धरावी ।। | १६३ ते १६७ |
| १०) | परी संग सोडूनि सूखें रहावे ।। | १८७ ते १९० . |

भारतांत तथ्यात्मक निरीक्षणात्मक अशी मानसशास्त्राची स्वतंत्र रचना झालेली नाहीं. मात्र भारतीय साहित्यांत असे विपुल भांडवल पडलेले आहे कीं ते एकत्र करून अशा शास्त्राची रचना करता येईल. विशेषतः साहित्यरस शास्त्रांत आणि कालिदासादि श्रेष्ठ नाटककारांच्या कृतींत वर्णनात्मक मानसशास्त्रासाठी भरपूर मालमसाला मिळेल. हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. डॉ. के. ना. वाटवे यांचा अशा प्रकारचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्याचे नांव "रसविमर्श."

परंतु हा विषय सोडला तरी भारतात ज्याला तात्त्विक मानसशास्त्र म्हणता येईल असे पतंजलिमहामुनींचे योगशास्त्र आहे. मुळामध्ये पाश्चात्य देशांत जे मानसशास्त्र सुरु झाले ते त्याच्या नांवाप्रमाणे आत्म्याचे शास्त्र होय. ही संकल्पना बरोबर होती, पण तिची दिशा तात्त्विक न राहाता इतर विज्ञानांच्या विकासा-प्रमाणे वर्णनात्मक निरीक्षण प्रयोगात्मक होत गेली. भारतीय मानसशास्त्र इतर दर्शनांप्रमाणे आत्मा–अनात्मा यांचा विचार तर करतेच, परन्तु योगशास्त्रांतील मनाचा विचार प्रयोगक्षम स्वरूपाचा आहे. यांतील संकल्पना अशी आहे कीं, फक्त बाह्य वस्तूंच्या जगांतच प्रयोग करता येतात असे मानण्याचे कारण नाहीं. प्रत्येक मनुष्य आपल्या स्वतःच्या अनुभवविश्वांत देखील वैय्यक्तिक स्वरूपांत प्रयोग करूं शकतो. म. गांधींचे 'सत्याचे प्रयोग' हें अशा वैयक्तिक स्वरूपाचे आहेत. प्रत्येकाचे मन ही त्याची प्रयोगशाळा आहे. प्रयोग करण्याचे प्रयोजन मनाच्याच सहाय्याने मनाच्या विकारांवर दोषांवर मात करून ध्येयसिद्धी करणे होय. या प्रमाणे मानसशास्त्राच्या वर्णनात्मक आणि चिंतनात्मक अशा दोन्ही प्रकारच्या ज्ञानाचा उपयोग नीतिशास्त्र, धर्मशास्त्र व अध्यात्म यांच्या विकासासाठी करून घेता येतो. याप्रमाणे निरनिराळ्या प्रकारची शास्त्रे एकमेकामध्ये गुंतलेली असतात.

भगवद्गीतेमध्यें पुढील श्लोक वर्णनात्मक मानसशास्त्राचे सिद्धान्त सांगणारे आहेत–

ध्यायतो विषयानपुंसः सङगस्तेषूपजायते ।
सङगात् संजायते कामः कामात् क्रोधोऽभिजायते ।।२–६२।।
क्रोधाद् भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।२–६३।।
चचल हि मनःकृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।।६–३४।।

हे मनाचे स्वाभाविक स्वरूप जरी असले तरी त्यावर विजय मिळविण्यासाठीं श्रीकृष्ण उपाय सांगतात–

अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते । ६–३५

तात्त्विक मानसशास्त्र झाले. पुढील श्लोकांतही तसेच आहे.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ।।६–५।।

सबंध ६ व्या अध्यायांतच याप्रमाणे प्रायोगिक यौगिक मानसशास्त्र कांही नैतिक आध्यात्मिक आदर्श साध्य करण्यासाठी सांगितले आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील पण विस्तारभयास्तव ही वानगीदाखल उदाहरणे उद्धृत केली आहेत. सोळाव्या अध्यायांतील दैवी व आसुरी संपत्तीचे वर्णन, सतराव्या अठ-

राव्या अध्यायांतील श्रद्धात्रयविभाग ही तात्त्विक मानसशास्त्राची उदाहरणे होती. आत्मस्वरूपाचे वर्णन हे सर्वांत अधिक आध्यात्मिक स्वरुपाचे आहे. 'काय आहे' त्याच्या ज्ञानाचा उपयोग 'काय व्हावे' यासाठी करून घ्यावयासाठी भिन्न प्रकारची मानसशास्त्रे आध्यात्माशी जोडून घेतली आहेत.

अध्यात्ममार्गात साधकानें करावयाची साधना हीच प्रमुख होय. अध्यात्मामध्ये अंतिम सत्तत्त्वाचे, ब्रह्माचे अथवा आत्म्याचे स्वरूप विशद करून सांगितले असते. तसे मनाच्या श्लोकांतही सांगितले आहे. त्या सत्तत्त्वाचा साक्षात्कार करून घेण्यासाठी जी साधना करावयाची असते ती प्रामुख्यानें नैतिक स्वरूपाची असते. तिचा उपदेश या श्लोकांमध्ये केला आहे. मनामध्ये काम क्रोधादि विकार असतात, हे मानसशास्त्र झालें. परंतु ते दोषास्पद असल्यानें ते काढून टाकावयास हवेत ही शिकवण येथे दिली आहे. अहंकार आणि संग किंवा आसक्ति ही सर्वांत अधिक बाधक असल्याने तो घालवून द्यावयास हवी. राम हा भक्ताचा कैवारी आहे. तो प्राप्त करून घ्यावयासाठी इतर दुर्धर उपायांचे पाठीमागे न लागतां त्याच्या नामस्मरणरूपी भक्तीचा आश्रय घ्यावा, आणि सदैव सज्जनसंगतीमध्ये राहावे. सद्‌गुरूच्या योगाने ज्ञान वैराग्य प्राप्त होऊन साधक मुक्ति मिळवूं शकतो. असे फलश्रुति शेवटच्या श्लोकांत सांगितले आहे—

मनाची शतें ऐकतां दोष जाती ।
मतीमंद ते साधना योग्य होती ।।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं ।
म्हणे दास विश्वासता मुक्ति भोगी ।।२०५।।

मनाला केलेल्या उपदेशांत सर्वांत महत्त्वाचा उपदेश विरोधाभासात्मक आहें. तो पुढील दोन ठिकाणीं आला आहे :

१) म्हणोनी मनातीत होऊनि राहे । १२९
२) मना उन्मनीं शब्द कुंठीत राहे । २००

मनाला सांगितले आहे कीं, तूं मनाच्या पलिकडे जाऊन राहा. यालाच उन्मनी अवस्था म्हणतात. या अवस्थेंत मनच उन्मळून पडते, मनाचे उन्मूलन होते. म्हणजे मन मूळापासून उखडले जाते. मनाच्या नंतरची वाणी. मनच नाहीसे झाल्यावर शब्द आपोआपच कुंठित होऊन जातात. थोडक्यांत म्हणजे मनाला आत्महत्या करण्याचा हा सल्ला दिलेला आहे. मन हे जाणीवस्वरूप असते ( Consciousness ). तथापि त्याला सांगितले आहे कीं, मना सर्व जाणीव सोडून राहें । १५८ म्हणजे गोड शब्दांत त्याला 'मर' म्हणून म्हटले आहे. बिरबल बादशहाच्या गोष्टींतल्या पोपटाप्रमाणें, तो हालचाल न करता, पंख पसरुन, चोच वर करून, तोंड वासून, डोळे फिरवून पडला आहे असे बिरबलने बादशहाला सांगावे. पण 'तो मेला आहे' असे मात्र म्हणूं नये. कारण

राजाचा आवडता पोपट, तो मेला आहे हे शब्द राजाला कसे सहन होणार? तो राजाला म्हणतो, 'तुमच्या पोपटाला तो मेला आहे असे तुम्हीच पाहिजे तर म्हणा. मी तुमचा सेवक. त्याला असा निंद्य शब्द कसा वापरू शकणार?' तद्वतच मनाला 'तू मर' असा निंद्य कठोर उपदेश कसा सहन होणार? परंतु तोच उपदेश आडवळणाने गोड भाषेत केला आहे.

पतंजलीने योगानुशासनांत याचप्रमाणें तात्त्विक मानसशास्त्र सूत्ररूपानें मांडले आहे.

योग: चित्तवृत्तिनिरोध: ।

मनाच्या सर्व वृत्तींचा निरोध करणे, म्हणजे वृत्तीच नाहीशा करणें, किंवा त्यांना उठूं न देणें याला योग म्हणतात. संकल्पविकल्पात्मकं मन: । असे त्याचे स्वाभाविकस्वरूप. या संकल्पविकल्प-रूप मनाला त्या विकल्पांपासून मुक्त करणें हे योगाचे साध्य आहे. मनाचे अस्तित्वच मुळीं विषयांचीं कल्पना करण्यांत रगून राहण्यात असते. पण येथें त्याला उपदेश असा कीं,

मना कल्पना ते नको विषयांची । ५
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं । ५४
मना कल्पनालेश तोही नसावा । ५८
मना कल्पना धीट सैराट धांवे । १०४
मना कल्पना सोडि संसारतापा । १०५
मना कल्पना वाउगी ते न कीजे । १२८
मना अल्प संकल्प तोही नसावा । १३०
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा । १३०
मनें कल्पिला वीषयो सोडवावा । १६४
मनें कल्पितां कल्पना ते सरावी । १६४
मना सांडि रे मीपणाचा वियोगू । १८६
तेथें आटलों सर्वसाक्षी-अवस्था । २००

याप्रमाणें ज्या मनाचे जीवन, किंवा त्याचे अस्तित्व त्याच्या विषयाकार-वृत्तीमध्ये विषयाविषयींच्या संकल्पामध्ये असते ते समूळ थांबवण्यामध्येच योग सिद्ध होतो. मनाला त्याच्या असण्याचा अहंकार असतो, मी आहे अशी अस्मिता असते. रागद्वेष असतात, आहे तसे राहावे असा अभिनिवेश असतो. ते सर्व त्याचे अज्ञानामुळे अविद्येमुळे असते. हे सर्व टाकून देण्याचा त्याला आदेश दिला आहे. निरोध हा चांगला भारदस्त शब्द वापरला आहे. पण वस्तुत: हे मनाचे मरण होय. मनाला त्याच्या मरणाला मरण जा असा हा उपदेश आहे.

असे झाल्याने काय होते ? पतंजलीने सांगितले आहे–

तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ।

मनाची विषयाकारवृत्ती संपली म्हणजे द्रष्टा आत्म्याला त्याची स्वरूपस्थिति प्राप्त होते. खरे म्हणजे मनाचे मरण हे त्याचे वरवरचे मरण आहे. त्याचे खरे शाश्वतरूप काही निराळेच आहे, ते त्याला आत्मरूपामध्ये जाण्यामुळे प्राप्त होते. मनाचे मनपणाने असणे हे काही त्याचे शाश्वत खरे रूप नाहीं. मनाचा मनपणा गेला की, तो त्याच्या खऱ्या स्वस्वरूपी स्थिर होतो. त्याचे तथाकथित मरणे हे विशालरूपाने जगण्यासाठी असते. त्याचे नांव बदलते जे मुळांतच खोटे असते. मनाला त्याची स्वरूपस्थिती प्राप्त झाल्याने त्याला आत्मा हे नांव प्राप्त होते. ही स्वरूपस्थिती प्राप्त करून घेण्याचा त्याच्या अंतिम हिताचा, पण ह्या वरून कठोर वाटणारा असा सदुपदेश आहे.

विवेकें सदा सस्वरूपी भरावें । १४५
अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहें । १६१
स्वरूपीं उदेला अहंकार राहो । १७३

ज्या वेळेला वृत्तिशून्य स्वरूपस्थिती नसते त्यावेळी मन हे विषयाकार असते व त्याच्याशी तद्रूप होते. पतंजलिमुनि म्हणतात,

वृत्तिसारूप्यं इतरत्र । योगसूत्र १–१–४

आत्म्याची स्वरूपस्थिति जाऊन मनाच्या वृत्तीने त्या त्या विषयाशी आत्मा समरूप होऊन भटकत राहातो. म्हणून विषयाकार वृत्ती सोडून ब्रह्माकार वृत्ती करण्याचा उपदेश मनाला केला आहे. हेही पुन्हां विसंगतीने भरलेले आहे. कारण ब्रह्म हे मुळांतच निराकार आहे. मग ब्रह्माकारवृत्ती कशी प्राप्त व्हायची ? अर्थात् हे वाच्यार्थानें करणे शक्य नाही. त्याचा अर्थ इतकाच की मन त्या त्या विषयाशी तद्रूप होते हाच त्याचा गुण समजावा व त्याची तद्रूप होण्याची दिशा मात्र बदलावी. त्याला ईश्वराची, रामाची गोडी लावून द्यावी. म्हणजें अभ्यास करता करता ते मन ह्या नव्या तथाकथित विषयाशीं तद्रूप होऊन जाते. सर्व विषयाकार होणाऱ्या वृत्तींचा निरोध किंवा निरास झाल्याने आपोआपच मन जेथून उगम पावले त्या आत्मरूपाशीं किंवा ईश्वररूपाशीं किंवा ब्रह्माशी एकरूप होऊन जाते.

कल्पनाच करावयाची तर सत्याची करावी–

मना सत्यसंकल्प जीवीं धरावा । ५

कोठे ना कोठे प्रीतिच करावयाची तर मग आत्मारामाशींच करावी.

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी । १०
विवेकें तदाकार होऊनि राहें । १४८

यालाच मनाची राघवाच्या ठिकाणी वस्ती होणे असे म्हणतात.

असे हो जया अंतरीं भाव जैसा ।
वसे हो तया अंतरीं देव तैसा ।।३५।।

हे धर्माचे, भक्तीचे मानसशास्त्र आहे. त्याचा उपयोग करून रामदास सांगतात–

अरे जो चंचळास ध्यायील । तो सहजची चळेल ।
जो निश्चळास भजेल । तो निश्चळची ।। दा. ११-२-३९

सामान्यत: माणसे लक्ष्मी मिळविण्याच्या पाठीमागे लागतात, हे ध्यानांत घेऊन रामदास उपदेश करतात–

तया नारायणाला मनीं । अखंड आठवावे ध्यानीं ।
मग ते लक्ष्मी तयापासोनी । जाईल कोठे ।। दा. १५-९-२४

काही भक्त मानसपूजा करतात, पण तीही नीट करीत नाहीत. त्यासंबंधी रामदासांनी विनोदानें लिहीले आहे.

मानसपूजा करता करता देवाला माळ घालतांना ती देवाच्या गळ्यांत जाईना. कारण भक्त अगदोच कल्पनादरिद्री.

कोणी येक ध्यानस्थ बैसला । कोणी येक शिकवी त्याला ।
मुकुट काढुनि माळ घाला । म्हणिजे बरे ।। दा. १४-८-४३
मनाचेथे काय दुष्काळ । जे आखुड कल्पिली माळ ।
सांगते ऐकते केवळ । मूर्ख जाणावे । १४-८-४४
प्रत्यक्ष कष्ट करावे न लगती । दोरे फुलें गुंफावी न लगती ।
कल्पनेची माळ थिटी करिती । काये निमित्य ।। १४-८-४५

याप्रमाणें समर्थांच्या वाङ्मयांतील मनासंबंधीच्या काही विचारांचे दिग्दर्शन केले आहे. आणखीही विपुल सामुग्री मिळण्याजोगी आहे. मुख्यत: आध्यात्मिक मानसशास्त्र आणि बरेचसे सामाजिक मानसशास्त्र विचारांत घेऊन समर्थांचा उपदेश आहे.

## ७) प्रा. एस्. जी. देशपांडे यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण.

प्रा. एस्. जी. देशपांडे यांनी ' दासबोध आणि त्यांतील नेमकी रामदासांची शिकवण ' या विषयावर उद्बोधक निबंध सादर केला. तो अभिनंदनीय उपक्रम आहे. आपण सर्वसाधारणपणे असे समजतो कीं, दासबोधांतील सर्वच्या सर्व

ओव्यांमध्ये रामदासांची शिकवण आहे. ही मात्र स्थूल दृष्टि झाली. देशपांडे यांचे म्हणणे असे– एक तर रामदासांचे लिखाण गुरुशिष्य संवादरूपानें आहे. दुसरे म्हणजे बहुतेक प्रौढ ग्रंथांत पूर्वपक्ष उत्तरपक्ष करण्याची पद्धति आदरलेली दिसते. तशी पद्धति दासबोधांतही स्वीकारलेली आहे. अर्थात् हे उघडच आहे कीं; काही प्रश्नरूपाने, किंवा शंकारूपाने एखादे मत शिष्याने अथवा पूर्वपक्षाने मांडले असेल. तेवढा भाग अर्थातच रामदासांची शिकवण या सदरांत येणार नाहीं. जरी दोन्ही भागांचे प्रत्यक्ष लेखन रामदासांचेच असले तरी त्यांचे सर्वच्या सर्व लेखन हे त्यांचे मत प्रतिपादन करणारे असते असे नव्हे. अशा तऱ्हेचे काही समर्पक उतारे प्रा. देशपांडे यांनीं निदर्शनास आणून हा विवेक करण्याचा चिकित्सक प्रयत्न केलेला आहे. त्यांचे सर्व म्हणणे जसेच्या तसे जरी एकदम सगळ्यांच्या गळी उतरेल असे प्रथमदर्शनीं वाटण्याजोगे नसले तरी केवळ अंधश्रद्धाळू भूमिका घेण्यापेक्षा डोळस भूमिका घेण्याविषयीची त्यांची शिफारस योग्यच आहे, अशी अभ्यासपूर्ण भूमिका घेतल्याने रामदासांची म्हणून आपण मानतो, व जी तितकीशी समंजसपणाची वाटत नाही, अशी त्यांची शिकवण अर्थातच स्वीकारण्याचा कोणी आग्रह राखू नये, हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

पूर्वी ' विविधज्ञानविस्तार ' या नियतकालिकांत विद्यामयूर भय्याशास्त्री देव, जामखेडकर, यांनी ' दासबोधाचा कर्ता कोण ?' हा लेख लिहिला होता. त्यांत त्यांचे असे प्रतिपादन होते कीं, दासबोधाचा कर्ता रामदास नसून रामदासांचा कोणी शिष्यच असला पाहिजे.

अर्थात् रामदासांनींच दासबोध लिहिला याविषयीं तशी कोणास शंका नव्हती व नाहीं. तथापि वरीलप्रमाणे मत लेखांत कोणी मांडल्यावर त्याची दखल घेणे भागच होते. हे काम समर्थभक्त श्री. शंकरराव देवांनीं केले. त्यानीं लेख लिहिला, ' श्रीमत् दासबोधाचे कर्ते दुसरे कोण असणार ?'

सध्या आपल्या हाती असलेला ग्रंथ दासबोध विषयांच्या बांधणीच्या दृष्टीने थोडासा अघळपघळ व कांहीसा विस्कळीत वाटतो. उत्तम प्रकारचा बांधेसूदपणा त्यांत आढळत नाहीं. तो निरनिराळ्या स्थलकाली लिहिलेल्या प्रकरणांचा एक प्रकारचा संग्रह वाटतो. चर्चा करतांना श्री. सुनील चिंचोळकरांनीं निरनिराळी समर्पक उदाहरणे देऊन हा समग्र ग्रंथ रामदासांचाच असल्याचे प्रतिपादन केले. तथापि आग्रही श्रद्धेची भूमिका न ठेवता अभ्यासासाठी चिकित्सक दृष्टि ठेवणे बरोबरच आहे.

प्रा. देशपांडे यांनीं त्यांच्या स्वतःच्या प्रतिपादनाच्या पद्धतीसाठी रामदासांच्या पुढील ओवीचा निर्देश केला.

आधी मिथ्या उभारावे । मग ते ओळखोनि सांडावे ।
मग सत्य तें स्वभावे । अंतरी बाणे ।। दा. ७-३-४

आधी मिथ्या उभारावे म्हणजे जो पूर्वपक्ष असेल तो आधी मांडावा. पण तो खंडनीय असल्याने त्याचे खंडन करावे. म्हणजें शेवटी सत्य असा सिद्धान्तपक्ष अंत:करणावर ठसला जातो. या ओवीचा वेदांतामध्ये विशेष उपयोग आहे. पुढें समर्थांचे तत्त्वज्ञान येणारच आहे. त्यावेळीं याचा विचार करूं.

प्रा. देशपांडे यांनी लो. टिळकांच्या गीतारहस्यातील त्यांनी केलेल्या कांटच्या तत्त्वज्ञानाचा उल्लेख केला. तो मला समर्पक वाटत नाही. परंतु त्या निमित्ताने थोडी निराळी चर्चा करण्याजोगी आहे. तेथे एका नैतिक प्रश्नाचा उहापोह केला आहे. नैतिक नियमाला अपवाद करावेत किंवा नाहोत असा तो प्रश्न आहे. कांट यांनी नीतिनियम हे निरपवाद आदेशाच्या स्वरूपाचे असतात असे प्रतिपादन केले आहे. ज्या नियमाचे सार्वत्रिक पालन करण्याची शक्यता असते त्याच नियमाला नैतिक स्वरूप प्राप्त होते व असा नियम निरपवादपणे पाळण्याचेच आपले कर्तव्य असते. उदा. चोरी करू नये. कारण सर्वचजण चोरी करू लागतील तर कोणाचेजवळ स्वार्जित वा स्वत.चे धन म्हणून काही असणार नाही. मग धनाच्या अभावी चोरी करणेंच शक्य होणार नाही. याचाच अर्थ चोरी करणे हे अनैतिक आहे. कारण त्याचा सार्वत्रिक व्यवहार स्वविसंगत आहे म्हणून अशक्य आहे.

दिलेले वचन पाळावे. जर कोणी वचन पाळले नाही तर कोणी वचनावर विश्वास ठेवणारच नाही व कोणी वचन देणारही नाही.

लो. टिळक म्हणतात की, जेव्हां दोन नीतिनियम एकसमयावच्छेदे पाळणे अशक्य होते त्यावेळी साहजिकच तारतम्य ठेवून त्यातील एका नियमाला अपवाद करणे अपरिहार्य होते. उदाहरणार्थ सत्य बोलण्याने कोणाच्या जीवाला हानी पोचत असेल तर जीव वाचविण्यासाठी असत्य बोलल्याने सत्याच्या नियमाला अपवाद येणारच. पण असा अपवाद अनैतिक म्हणता येणार नाही.

कित्येक वेळां चांगला नियमदेखील सार्वत्रिक करता येत नाही. उदाहरण कांटचेच स्वतःच्या जीवनाचे घेता येईल. ब्रह्मचारी राहाणे नैतिक आहे हे कोणीही मान्य करील. परंतु हा आचार सार्वत्रिक केला तर ब्रह्मचर्य पाळावयास कोणा माणसाचीच उत्पत्ति होणार नाही. तेव्हा सामाजिक कार्यासाठी, सामाजिक कल्याणासाठी अथवा स्वत:च्या आध्यात्मिक उन्नत्तिसाठी कोणास आवश्यक वाटल्यास ब्रह्मचर्य पाळणे नैतिकदृष्टया योग्यच आहे.

स्वत: कांट ब्रह्मचारी होता. हे जर नैतिक तत्त्व त्याच्याच तत्त्वज्ञानाप्रमाणे असेल तर सर्वांनी ब्रह्मचारी राहावे अशी त्याची अपेक्षा होती असे म्हणावे

लागेल. पण तसे कोणी म्हणणार नाही. स्वत: समर्थ ब्रह्मचारी राहिले, म्हणजे सर्वांनी ब्रह्मचारी रहावे अशी त्यांची अपेक्षा होती असे होईल. पण आपण जाणतोच की त्यांनी चांगला प्रपंच, संसार, गृहस्थाश्रम करावयाचीच शिकवण दिली आहे.

## ८) डॉ. सौ. मंगला वैष्णव यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण

डॉ. सौ. मंगला वैष्णव यांनी, 'श्री समर्थ रामदास– आदर्श पुरुष' या विषयावर निबंध सादर केला. त्यांनी रामदासांच्या आदर्श शिकवणीची मांडणी नीटपणे केली आहे. मात्र त्यांनी निर्देश केलेल्या कांहीं विचारांबाबत थोडे सांगितले पाहिजे.

डॉ. वैष्णवांच्या मते रामदासांनी त्यांच्या काळीसुद्धा, दीर्घसूचनेने जणु काय, तीन शतकांपूर्वी **स्वातंत्र्य, समता व बंधुभाव** या मूल्यांचा उपदेश केला आहे. तशी ही मूल्ये अर्वाचीन काळांतील फ्रेंच राज्यक्रांतीनंतरची आहेत. मला या बाबतीत एवढेच सांगावयाचे आहे की, हा अभिप्राय स्थूलमानाने खरा आहे. पण विचारान्ती त्यातील भिन्नता आपण समजावून घेतली पाहिजे. रामदासांचा आशय प्रामुख्याने आध्यात्मिक होता व त्यांचा लोकजागृतीचा हेतू लक्षांत घेता त्यांना राजकीय स्वातंत्र्य हवे होते हेही म्हणणे बरोबरच होईल, आणि सामान्य माणुसकीच्या भूमिकेतून पाहाता थोडीफार समता व परस्परांतील बंधुभावही अपेक्षित होता, यात काही संशय नाही. समर्थ संप्रदायाची वीस लक्षणे दिलेली आहेत. त्यातील एकोणीसावे असे आहे–

एकोणिसावे चिन्ह । सर्वांसी समान ।
राखे समाधान । ज्याचे त्याचे ।।

पंडिता: समदर्शिन: । ही भगवद्गीतेचीच शिकवण आहे. आत्मा स्वतंत्र आहे. 'निर्दोषं हि समं ब्रह्म' असे समत्व मुळामध्येच आहे. आत्मैक्याच्या सिद्धान्तावरून बंधुभाव स्पष्टच दाखविता येतो.

हा आध्यात्मिक दृष्टिकोन फ्रेंच राज्यक्रांतीनंतर उदय पावलेल्या या लोकशाहीच्या तीन मूल्यांमध्ये नाहीं. त्यांचा मुख्य आशय राजकीय आहे. नंतर सामाजिक आणि आर्थिक आशय त्या तत्त्वांमध्ये इतिहासक्रमांत भरला गेला आहे. व्यक्तिस्वातंत्र्य या शब्दाला राजकीय आशय आहे. परंतु हे व्यक्ति-

स्वातंत्र्य म्हणजे आत्मिक स्वातंत्र्य नव्हे. समता ही सामाजिक स्वरूपाची आहे. वर्गविहीनता उच्चनीचतेचा अभाव यामध्ये अभिप्रेत आहे. परन्तु ही आध्यात्मिक समता नव्हे. त्याचप्रमाणें बंधुता ही सामाजिक नैतिक स्वरूपाची आहे. त्याला आध्यात्मिक बैठक नाहीं.

ज्याना अध्यात्माची बैठक आहे त्यांना राजकीय, सामाजिक, आर्थिक आशय अभिप्रेत असतोच असे नाही. आणि ज्यांना राजकीय विचारांचेच सर्वस्वी अधिष्ठान व अर्थवत्त्व वाटते त्यांना अध्यात्मिक आशयाची खोली अथवा उंची समजत नाहीं. इतके म्हणता येईल कीं, अध्यात्मातून व्यवहारांत येणे शक्य आहें, कारण व्यवहार कोणास सुटत नाही, आणि त्या व्यवहाराचा परिचय अध्यात्मापेक्षा निकटचाही असतो. परन्तु या उलट होणे जरा कठीण आहें. व्यावहारिक, प्रापंचिक, राजकारणी, समाजकारणी त्यांच्या विश्वात इतके लिप्त असतात, इतके गुंतलेले, गुरफटलेले असतात कीं, त्यातून त्यांना वर येणें कठीण जाते.

सर्वच संतांनीं अत्युत्तम अध्यात्मिक अधिष्ठानावरून उत्तमोत्तम सद्‌गुण आणि आदर्श उपदेशिले आहेत. परंतु त्यांना वर्णव्यवस्था, सामाजिक वर्गीकरण, आणि काही मर्यादेपर्यन्त बंधुभाव प्रत्यक्ष आचरणांत व्यवहारांत सर्वथा संमत होता. इतर संतांच्या प्रमाणेंच या बाबतीत रामदासांची भूमिकाही उदार होती इतकेच म्हणता येईल. पण लोकशाहीच्या तत्त्वांशी संपूर्णता सुसंगत असे आदर्श, जे फ्रेंच राज्यक्रान्तीनंतर अभिप्रेत होते, तेच समर्थांच्या विचारसरणींत अथवा इतर संतांच्या विचारसरणींत होते असे म्हणणे तितकेसे पटण्याजोगे नाहीं.

सौ. वैष्णवांनीं आपल्या विवेचनांत अशाच आणखी एका विचाराचा ओझ-रता उल्लेख केला आहे. तो विचार म्हणजे **सर्वधर्मसमभाव**. धार्मिक अनुभूतीच्या विशिष्ट उंचीवर पोचल्यावर कोणत्याही धर्माच्या माणसाला एकप्रकारची समता अनुभवास येते. या समतेच्या अनुभवासाठी त्यांनीं आधुनिक काळांत भारतांत वापरल्या जाणाऱ्या या सर्वधर्मसमभावाच्या शब्दाचा प्रयोग केला आहे. समर्थ म्हणतात,

संत दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।
आघवे मिळोनि एकचि झाले । देहातींत वस्तू ।।

भारत स्वतंत्र झाल्यापासून व विशेषत: भारताची घटना घडवितांना व घडविल्यानंतर सर्वधर्मसमभावाच्या तत्त्वप्रणालीचा विशेष जोरानें उद्‌घोष केल्याचा आढळतो. त्या विचारसरणीचा एवढा उदो उदो केला जात आहे कीं, नकळत त्याच्या आहारी आपण जात असतो. याबद्दल थोडे चिंतन करण्याची आणि सावध होण्याची वेळ आली आहे. समर्थांनी दिलेल्या शिकवणुकीमध्ये ‘ तिसरे ते सावधपण सर्व विषयी ’ ही अतिशय महत्त्वाची मौलिक व सार्वकालीन

स्वरूपाची शिकवण आहे. Eternal vigilance is the price of liberty असे विशेषेकरून लोकशाहीच्या स्वातंत्र्याचे सावधानतेचे वाक्य आहे. अखंड सावधानता हे स्वातंत्र्याचे मोल आहे. बेसावधपणा हे पारतंत्र्याला दिलेले निमंत्रणच होय. त्यासाठीं या सर्वधर्मसमभावाचे काय मर्म आहे ते आपण जागरूकपणे पाहिले पाहिजे. एखाद्या वाक्याच्या उद्‌घोषाखाली आपण आपल्याला वाहवू न देणे योग्य होईल.

मला असे आग्रहानें प्रतिपादन करावयाचे आहे कीं, सर्वधर्मसमभावाच्या सीमारेषा जर नीट ध्यानांत घेतल्या गेल्या नाहींत तर आपण फसले जाऊ. आणि ज्यावेळी फसवणूक आपल्या ध्यानीं येईल त्यावेळी फार उशीर झाला असेल. तेव्हां त्यांत अडकण्यापूर्वी न अडकण्याचा विचार हा सावधगिरीचा उपाय आहे.

अमुक मर्यादेपर्यन्त हे तत्त्व खरे आहे. पण त्या मर्यादेनंतर ते तत्त्व अत्यंत फसवे आहे. त्यांत एक प्रकारचे थोतांडच अधिक आहे, हे आपल्या ध्यानांत येईल.

कोणत्या अर्थाने सर्व धर्म समान आहेत ? सर्वार्थाने सर्व धर्म समान आहेत काय ? आणि ही जी काही समानता असेल ती सर्वांना, म्हणजे निरनिराळ्या धर्मांच्या लोकांना खरोखरी मान्य आहे काय ? यासंबंधी थोडा विचार केला पाहिजे. त्यांत तात्त्विक भाग किती आणि व्यावहारिक भाग किती हे पाहाणे जरूर आहे.

हिंदू धर्माची मूळ बैठकच अतिशय उदार अशा स्वरूपाची आहे. या धर्माचा असा केव्हांही आग्रह नाहीं व नव्हता की, हा धर्मच एकमेव असा आहे की ज्याचे पालन केले असता, ज्याचा आश्रय घेतला असता, जीवनाचे अंतिम ध्येय किंवा मोक्ष प्राप्त होईल. ज्यानें त्यानें स्वतंत्रपणे, मुक्तपणें, परंतु प्रामाणिकपणें विचार करून ज्याला त्याला मान्य होणारा धर्म, किंवा श्रद्धा जोपासावी व ज्याचा त्याने आपला उद्धार करून घ्यावा. आपला धर्म आपण समजून घ्यावा आणि त्याप्रमाणे आचरण करावे, असा मात्र आग्रह आहे. ' स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह: ।' भ. गी. ३–३५ व १८–४७ या शिकवणुकीप्रमाणे ज्याच्या त्याच्या अभिजात गुणकर्मरूप स्वभावाप्रमाणे ज्याचे त्याचे कर्तव्य त्याला प्राप्त होते. त्या कर्तव्यालाच स्वधर्म म्हणतात व तो निरलसपणें, अनासक्तपणें, पाळण्यांतच त्याचे श्रेय आहे. जो ज्याचा स्वभाव नाहीं असे अनुकूल नसलेले आचरण हे परधर्म स्वीकारण्यासारखे असल्यानें ते भयावह आहे. त्यामार्गे त्याचे हित होणे दुरापास्त आहे.

एका हिंदू धर्माशिवाय इतर सर्व धर्म कोणी ना कोणी श्रेष्ठ व्यक्तीने अथवा प्रेपिताने स्थापित केले आहेत. त्या त्या धर्मस्थापनेच्या काळीं जी काही सामाजिक परिस्थिती उपलब्ध होती, त्या परिस्थितीमध्ये काही ना काही सुधारणा करण्याच्या उद्दिष्टाने प्रेरित होऊन त्यावेळी आचारात आणण्यासाठी काही नैतिक

प्रकारच्या नियमांची शिकवण समाजाला देण्यात आली होती. त्या शिकवणुकीचा काही भाग आध्यात्मिक, अतींद्रिय, बुद्धचतीत अशाही स्वरूपाचा होता. बहुतेक सर्व धर्मांमध्ये असा आध्यात्मिक श्रद्धेचा भाग मौलिक स्वरूपाचा आणि महत्वाचा आहे.

हिंदू धर्म हा कोणा एकाच्या उपदेशाने स्थापित झालेला नाही. हा धर्म अपौरूषेय मानला जातो व त्याचे स्वरूप सनातन सत्यावर आणि कोणासही स्वानुभूतिने त्याचा पडताळा घेता येईल अशा स्वरूपाचा आहे. कारण हा वेदांवर आधारलेला, म्हणजे ज्ञानावर आधारलेला आहे. आणि सत्य हेच ज्ञानाचे स्वरूप आहे. हे सत्य दोन प्रकाराने अनुभुतीस येते. ऋत आणि सत्य. शाश्वत अपरिवर्तनीय सत्य आणि देशकालाप्रमाणे बदलणारे सत्य. याप्रमाणे त्यात औदार्यालाहि अवकाश आहे. सत्य हे पौरूषेय किंवा व्यक्तिसाक्षेप नसून अपौरूषेय म्हणजे वस्तुतंत्र आहे. त्यात पारमार्थिकाला जसे स्थान आहे तसेच व्यावहारिकालाही आहे. हे ध्यानांत घेता धर्मामध्ये व्यापकता, सखोलता याबरोबरच लवचिकताहीं येते. त्यामुळे तेथे हटवादीपणाला, दुराग्रहाला स्थान नाही. तेथे सामंजस्याला आवाहन आहे. त्यामुळेच या धर्माच्या हजारो वर्षांच्या इतिहासात अत्यंत श्रेष्ठ अशा प्रकारचे ऋषिमुनि, तत्त्वज्ञ, सत, भक्त हे विपुल सख्येने उत्पन्न झाले. आणि त्यांचा सामान्य जनमानसावर साहजिकपणें ठसा उमटलेला दिसतो. धर्म हा अनेक अंगांनी आविष्कृत होत असल्याने संस्कृतीच्या सर्व छटा त्यामध्ये येतात. जीवनाचे असे कोणतेही अंग नाही की, ज धर्माने विचारांत घेतले नाही. यामुळेच धर्म ही वैयक्तिक आणि खाजगी बाब राहिली नसून तो सामाजिक व्यवहारातही तितकाच आढळतो.

हिंदू धर्मामध्ये अनेक संप्रदाय उत्पन्न झाले याचे कारण या धर्मामध्ये मूलभूत अशी उदारता आहे. त्या निरनिराळ्या संप्रदायांत श्रेष्ठ संत भक्त पुरुष निर्माण झाले. कोणी अद्वैती, कोणी विशिष्टाद्वैती, कोणी शुद्धाद्वैती, कोणी द्वैताद्वैती, कोणी सगुणवादी तर कोणी निर्गुणवादी, कोणी वैष्णव तर कोणी शैव. कोणी गणपत्य तर कोणी शाक्त. कोणी रामभक्त तर कोणी कृष्णभक्त, कोणी राधेचे भक्त तर कोणी हनुमन्ताचे, तर कोणी दत्ताचे. सप्रदायांची किती नांवे सांगावी ! अशा संप्रदायांत जे कोणी श्रेष्ठ संत होऊन गेले त्यांच्या बाह्य वैचित्र्यावरून ते वेगळे दिसतात, पण आंतरिक अनुभूतिमध्ये त्यांच्यामध्ये एकत्व असते असा समर्थांचा अभिप्राय.

अशा उदार विचारसरणीमध्ये वाढलेल्या आपल्या संतांना हिंदू धर्माच्या बाहेरच्या अशा ख्रिस्ती इस्लामीसारख्या संप्रदायांबाबतही औदार्याची भूमिका सहजपणे घेता येते, हेच हिंदूधर्माचे वैशिष्टय.

श्री रामकृष्ण परमहंसांनी निरनिराळ्या धर्मामध्ये सांगितलेल्या साधनांना आपल्या जीवनांत आत्मसात् करून त्या त्या धर्माप्रमाणेही प्रामाणिकपणे प्रयत्न केल्यास श्रेष्ठ आध्यात्मिक अनुभूति प्राप्त होऊ शकते हे सप्रयोग सिद्ध करून दाखविले. गुरुदेव रानडे यांनी अशाच श्रेष्ठ अनुभूतिबद्दल असे उद्गार काढले आहेत की, Mystics all over the world speak the same language. आध्यात्मिक साधनेला कोठूनही का सुरुवात होईना त्याची अखेर एकात्मक अनिर्वचनीय आनंदघन अशा अनुभूतीमध्येच होणार. याबद्दल दुमत होण्याचे कारण नाहीं, म. गांधींचा अभिप्रायही असाच होता.

अशा श्रेष्ठ संतांचा सर्वधर्मसमभाव आचार्य कालेलकर आणखी एक पाऊल पुढे टाकून '**सर्वधर्ममभाव**' अशा शब्दाने प्रकट करतात. स्वरुपीं मिळाल्यावर धर्मामध्ये वेगळेपण राहात नाहीं, हेच जर खरे असेल तर, प्रत्येक धर्म हा मला सारखाच आहे असे म्हणण्यापेक्षा प्रत्येक धर्म हा मुळी माझाच धर्म आहे असे म्हणणेच युक्त होईल.

वरीलवरून चाणाक्ष माणसांच्या लक्षांत येईलच कीं, वरील सर्वधर्ममम-भावाचा दृष्टिकोन मुख्यत: अध्यात्मिक अनुभूतीपुरताच मर्यादित आहे. येथे सर्व धर्म हे स्वधर्म आहेत अशी जी भूमिका आहे ती स्वधर्म म्हणजे आत्मधर्म या अर्थानें आहे. समर्थही म्हणतात,

> सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपी राहाणें हा स्वधर्म ।
> हेचि जाणिजें मुख्य वर्म । साधुलक्षणाचे ।। ८–९–५४

स्वरूपी राहाणे म्हणजें आत्मसाक्षात्कार होणे. यालाच कोणी ब्रह्मसाक्षात्कार किंवा ईशसाक्षात्कार असे म्हणतात. प्रत्येक मानवाचा हा श्रेष्ठतम स्वधर्म होय. याच अर्थाने धर्म अनेक न राहातां त्यामध्ये एकत्व येते. याच धर्माचा पुरस्कार सर्वश्रेष्ठ साक्षात्कारी संतानीं केला आहे, मग लौकिक अर्थांने ते कोणत्याही धर्माचे असोत. गुरुदेव रानडे यांनीं याच साक्षात्कार धर्माचा आपल्या अनेक महत्त्वाच्या ग्रंथांमध्ये शास्त्रशुद्ध स्वरूपांत ऊहापोह करून पुरस्कार केला आहे. याच एका अंतिमत: मौलिक भूमिकेतून त्यांनी प्रस्थानत्रयीचा म्हणजें उपनिषदे, भगवद्‌गीता व ब्रह्मसूत्र यांचा अभ्यास केला आहे. आणि याच भूमिकेंतून मराठी, हिंदी, कानडी संतांच्या वाङमयाचा अभ्यास केला आहे.

परन्तु धर्माचे एवढे मर्म सोडले कीं, सर्वधर्मसमभावाला काही अर्थ राहात नाही. गीतेमध्येच स्वधर्म आणि परधर्म यामध्यें भेद केला आहे ते वर सांगितले आहेच. हा धर्माचा विचार जन्मजात सहज गुणकर्मरूप स्वभावानुसार प्राप्त होणाऱ्या स्वकर्तव्याचा होय. आणि आपल्या अभिजात प्रकृतीला न मानवणारा

असा कर्तव्यधर्माचा अंगीकार हा परधर्माचा अंगीकार असून तो निश्चितपणे भयावह आहे असा गीतेचा अभिप्राय आहे.

याचप्रमाणें आणखी एक मार्मिक विचार गीतेमध्ये आहे. प्रत्येक माणसाचे ठिकाणीं दोन स्वभाव आहेत. एक प्रकृतिस्वभाव आणि एक अध्यात्मस्वभाव. व्यवहारात प्रकृतिस्वभावाचेच वर्चस्व चालू असते. त्याअनुसार माणसांचे भिन्न भिन्न स्वभाव त्रिगुणांच्या कमी अधिक प्रभावाप्रमाणें बनलेले असतात. त्यांतून त्यांचे त्यांचे कर्तव्यरूप धर्मही ठरले जातात. यामध्ये व्यवहारतः पुष्कळच वैचित्र्य असते. अध्यात्मस्वभाव हा पारमार्थिक स्वरूपाचा असल्याने तो सर्व माणसांच्या ठिकाणीं एकत्वाने किंवा समत्वाने असतो. अर्थातच तो दुर्मिळ आहे. तो फक्त संतांच्या ठिकाणीच पाहावयास मिळतो. परंतु हाच माणसाचा खरा स्वभाव— आत्मभाव होय. या आध्यात्मिक स्वरूपांत असणें हीच जीवनाची इतिकर्तव्यता अथवा स्वधर्म होय. प्रकृतिधर्मामध्ये जोपर्यंत माणसे रस घेतात तोपर्यंत ते स्वधर्मांत नसून परधर्मांत असतात. आपला 'स्व' काय आहे ? आत्मा आहे का अनात्मा अथवा प्रकृति आहे ? जो प्रकृतिशी एकरूप होऊन आपले जीवन घालवतो तो परधर्मांतच राहात असतो. यासारखी भयावह स्थिती ती दुसरी काय असणार ? त्याने स्वधर्मामध्ये राहावे म्हणजे 'स्वस्थ' जीवन कंठावे यांत त्याचे कल्याण आहे हेच गीतेची आणि समर्थांची शिकवण आहे.

प्रकृतिस्थ धर्मांच्या वैचित्र्यामुळे त्यांच्यामध्यें माणसाला स्वास्थ्य आणि स्थैर्य न लाभणे साहजिकच आहे. म्हणून गीतेनें अखेरचा उपाय सांगितला—

> सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
> अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥१८–६६

याचा मार्मिक अर्थ असा कीं, प्रकृतिवर अधिष्ठित असलेले सर्वप्रकारचे धर्म सोडून दे आणि मज एका परमेश्वराला शरण ये, म्हणजेच हृदयस्थ अशा 'स्व'ला आत्म्याला किंवा परमात्म्याला शरण ये. अर्थातच प्रकृतिधर्माला वश न होता आत्मधर्माचा आश्रय घे. म्हणजे परधर्मांत राहाण्यामुळें होणाऱ्या पापापासून तुझी सुटका होईल व तुझा तत्पापजन्य शोकही संपेल.

प्रकृतिपासून निवृत्ति घेऊन ईश्वराला किंवा प्रकृतिहून पर असलेल्या आध्यात्मिक शक्तीला शरण जाणे हा धर्माचा गाभा आहे. परन्तु हिन्दूधर्माचे किंवा सनातन धर्माचे वैशिष्टय हे की प्रकृतिपासून निवृत्त होणें म्हणजे अनासक्ति ठेवणे, व अशा अनासक्ति मध्येच राहून प्रकृतिप्राप्त प्रवृत्तिधर्माचाही आश्रय घेत राहाणे हे ईश्वरार्पण जीवनाला सुसंगतच आहे. म्हणजेच एकाचवेळी प्राकृतिक स्वधर्माचेही पालन आणि आध्यात्मिक स्वधर्माचेही पालन करावयाचे. यालाच

प्रवृत्तिनिवृत्तिरूप द्विविध संपूर्णधर्म म्हणतात. याच संपूर्ण धर्माची शिकवण गीतेची आहे आणि त्याच शिकवणुकीचा अनुवाद समर्थांनी केला आहे.

व्यावहारिक भूमिकेवरचा सर्वधर्मसमभाव हा अनाकलनीय आहे. कारण सर्वांची व्यावहारिक कर्तव्ये सारखी नाहींत. तथापि आपला धर्म आपण पाळणे व दुसऱ्याचा धर्म त्याला पाळू देणे इतक्या अर्थाने व्यवहारांत समानधर्मता येऊ शकेल.

परन्तु भारतात या तत्त्वाचा पुरस्कार धार्मिक प्रामाणिक भूमिकेवरून केला जात नाहीं. त्याचा व्यवहार एकतर्फी होतो व त्याचा राजकीय गैरलाभ उठविला जातो.

वास्तविक मुळामधे घटनेत वापरलेला शब्द सेक्युलर (Secular) याचा अर्थ ऐहिक इतकाच आहे. राजकीय अनुशासन ऐहिक जीवनापुरतेच मर्यादित असू शकते. परंतु याचा अर्थ निधार्मिक राज्यपद्धति असा होतो. परन्तु भारतीय परंपरा धर्मविहीन समाजाची नाहीं. धर्माची सांस्कृतिक आध्यात्मिक नैतिक मूल्ये येथील समाजाला जीव की प्राण आहेत. अशा परिस्थितींत सेक्युलरचा अर्थ धर्मविहीन राज्यपद्धति असा न करता येथील भूमींत सर्व धर्म समानत्वाने नांदू शकतील असा केला आहे.

भारताच्या इतिहासांत हिंदू सनातन धर्मानें इतर धर्मीयांशीं केवळ सहिष्णुतेचाच नव्हे तर विधायक औदार्याचा व्यवहार केला आहे. येथे ज्यू, ख्रिस्ती, पार्शी, इस्लामी सर्वांना आश्रय दिला व त्यांना आपल्या संस्कृतीमध्ये सामावून घेतलें. परंतु ख्रिस्ती आणि इस्लामी धर्म हे आक्रमक धर्मपरिवर्तनवादी आहेत. त्यांच्या मते त्यांचाच काय तो धर्म मोक्ष देणारा आहे. जे लोक त्यांच्या धर्ममताचा आश्रय घेत नाहींत त्यांची पापापासून सुटका नाही. ती करावयाची असेल तर त्यांच्याच धर्माची दीक्षा घेणें अनिवार्य आहे. याप्रमाणें मुळांतच इतरांविषयी असहिष्णु दृष्टिकोन असल्यानें इतरांवर आक्रमण करून येन केन प्रकारेण इतरांना आपल्या धर्मात ओढणे हेच त्यांचे ब्रीद आहे. अशा परिस्थितींत सर्वधर्मसमभाव या तत्त्वाचा अंगीकार केवळ हिंदूनी करावयाचा आणि इतरांनी मात्र या भुसभुशीत भूमिकेवर आपल्या धर्माला पुढे रेटण्याचा मार्ग क्रमावयाचा हे या राष्ट्राच्या भविष्याच्या दृष्टीनें अतिशय मारक आहे.

ज्या अर्थी हिंदूना सर्व धर्म समान आहेत, आणि ज्या अर्थी इतर धर्मीयाना सर्व धर्म समान नाहींत त्या अर्थी या मूलभूत प्रश्नाबाबत सर्व धर्मांची भूमिका समान नाहीं. आणि तशी ती समान नसल्यामुळे या तत्त्वाचा एकतर्फी व्यवहार या सनातन हिंदूराष्ट्राला विघातक ठरणार आहे. सर्व धर्मांना समान मानणारा धर्मच जर श्रेष्ठ असेल तर आपोआपच भारतीय हिंदूधर्म श्रेष्ठ ठरतो. आणि हे तत्त्वच जर सर्वोत्तम तत्त्व असेल, तर ते पाळणारेच या देशामध्ये कसे राहतील

हेच शासनाने पाहिले पाहिजे. हे तत्त्व न पाळणाऱ्यांची संख्या वाढून या देशांत धर्मपरिवर्तनाच्या जोरावर जर राजकीय परिवर्तन घडवून आणू शकेल तर हे तत्त्व भारतीय राष्ट्राचा आत्मघात करणारे ठरेल. दुर्दैवाची गोष्ट हीच आहे की, समत्वभावनेच्या धार्मिक तत्त्वाचा राजकीय स्वार्थासाठी लाभ घेणारांचेच येथें फावत आहे.

समर्थांनी सांगितलेला सावधानपणाचा इशारा याबाबत आपण बाळगला पाहिजे. एका बाजूला आपण भोंगळपणे सर्वधर्मसमभावाला चिकटून राहू. आणि दुसऱ्या बाजूने याच तत्त्वाच्या धुंदींत आपण असता इतर धर्मीय, म्हणजे ख्रिस्ती व मुसलमान, आपल्या धर्माचे घोडे पुढे दामटवीत राहातील. धर्माचे प्रामाणिक अनुयायी असणे वेगळे आणि धर्माच्या नांवाखाली धर्मवेडेपणावर आधारित राजकीय स्वार्थसाधन करणे वेगळे.

धर्माची व्यावहारिक बाजू जर आपणाला सांभाळता आली नाहीं तर ऐहिक आणि पारमार्थिक या दोन्ही आघाडीवर पराभव मात्र पत्करण्याची पाळी येईल. महाभारतकारांनीं राजनीतीचा असा महत्त्वाचा सल्ला दिला आहे कीं, जे कपटी लोकांशीं कपटपणानें वागत नाहींत त्या मुर्खांचा पराभव होतो.

भजन्ति ते मूढधिय: पराभवं भवन्ति मायाविषु ये न मायिन: ।

सौ. मंगलाबाई वैष्णवांनी समर्थांच्या देहात्मयोगाच्या शिकवणुकीचा उल्लेख केला तो फार समर्पक आहे. थोडे त्या संबंधी विवेचन करूं. देहात्मवादाच्या पार्श्वभूमीवर देहात्मयोगाचे महत्त्व समजूं शकेल. देहात्मवाद सांगणारे चार्वाकांचे जडवादी तत्त्वज्ञान या देशांत फार पूर्वी होऊन गेले. ते तत्त्वज्ञान सांगणारे बृहस्पति हे देवांचे गुरु. ते अतिशय बुद्धिवान् म्हणून एखाद्या शहाण्या माणसाला आपण बृहस्पति म्हणून संबोधितो. शुक्राचार्य हे असुरांचे गुरु. शुक्राचार्यांच्या अनुपस्थितींत बृहस्पतींनीं शुक्राचार्यांचे रूप धारण करून असुरांना देहात्मवादाचे धडे दिले. असुरांना खऱ्या पुरुषार्थापासून भ्रष्ट करून त्यायोगे त्यांचे पारिपत्य करण्यासाठी ही जडवादी विचारसरणी त्यांच्या डोक्यांत भरवून दिली, अशी आख्यायिका आहे. ही राजकारणाची एक प्रणालिका आहे, आणि राजकारणातील कुटील डावापैकी ती एक आहे. आधी बुद्धिभ्रंश होतो आणि मग विनाश आपसूक होतो. ' बुद्धिनाशात् प्रणश्यति ।' ' विनाशकाले विपरीतबुद्धि: ।' शत्रूचा नाश करण्यासाठी त्याच्या बुद्धीमधे विकृति उत्पन्न करणे हा तो कुटील डाव. या कूट राजनीतीचा उपयोग पूर्वी होत होताच, पण त्याहीपेक्षा भयंकर मोठ्या प्रमाणांत अत्यंत निंद्यप्रकारे आजही तथाकथित प्रगत राष्ट्रांत केला जातो. बुद्धिभ्रंशाचे सौम्य स्वरूप म्हणजे indoctrination. एखादी विचारसरणी व्यक्तीच्या किंवा समुदायाच्या डोक्यांत मानसशास्त्राचा उपयोग करून भरवून देण्याला इंडॉक्ट्रिनेशन

म्हणतात. अशा उपायाने एखाद्या व्यक्तीला किंवा समुदायाला ती विचारसरणी ही एकमेव खरी आहे असे वाटते. इतकेच नव्हे, त्या विचारसरणी अथवा मताशिवाय इतर कशाचे आकलन करण्याची धारणाशक्तीच त्या विकृत बुद्धीमध्ये राहात नाहीं. सर्व तारतम्यबुद्धीच अस्तंगत होते. थोडा अधिक कुटील प्रकार म्हणजे brainwashing. म्हणजे एखाद्याच्या मनांत जे काहीं मत, सारासार विचारशक्ति असेल ती मुळासकट धुवून काढावयाची व त्या ठिकाणी आपणांस अनुकूल असेल, अभिप्रेत असेल तिचे आरोपण दुसऱ्याच्या मेंदूत करावयाचे. शत्रुपक्षाच्या पकडलेल्या कैद्यावर याप्रमाणे प्रयोग करतात. यामुळे असा मनुष्य आपल्याच देशाची, धर्माची, विचारसरणीची निंदा करूं लागतो. याहीपेक्षा आणखी कुटील प्रयोग म्हणजे निरनिराळ्या औषधींचा प्रयोग करून मेंदूचे व मज्जासंस्थेचेच विकृतीकरण करणे. जो जो आपली विज्ञानांमध्ये प्रगति होत जात आहे, तो तो त्या ज्ञानाचा उपयोग अशा तऱ्हेनें दुष्ट हेतू पार पाडण्यासाठी केला जात आहे, हे एक मानवजातीने मानवावर आणलेलें भयंकर संकट आहे. माणसाच्या माणुसकीला काळे फासणारे हे उद्योग प्रगत म्हणविणाऱ्या राष्ट्रांमध्यें आज चालूं आहेत.

स्वार्थी भोगवाद हा असा आपण होऊन विनाशाकडे वाटचाल करणारा वाद आहे. हा देहात्मवादावर पोसला जातो. हा लौकर पटण्याजोगा आहे, आणि त्याचे खंडन फार अवघड आहे. कारण त्याची ज्ञानमीमांसा बड्या बड्या बुद्धिवंतांना कुंठीत करणारी आहे. प्रत्यक्ष अनुभवाला येते तेवढेच खरे. बाकी सर्व खोटे असा याचा आधारस्तंभ आहे. बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर, असा याचा खाक्या. अनुमान, तर्क या विचारसरणीला एकदम अमान्य आहे. जे काही आहे ते येथे आहे, मृत्यूनंतर जीवन नाहीं, हा देहच आत्मा आहे. ज्याला चैतन्य किंवा आत्मा म्हणतात तो भूतसंघातानें उत्पन्न होतो. काळा कात, पांढरा चुना, हिरवी नागवेलीची खायची पाने एकत्र झाल्याने जसा लाल रंग नवीनपणे निर्माण होतो. तसाच देहामध्ये जो भौतिक तत्त्वे एकत्र येत असतात त्यांतूनच जाणीव, चेतना किंवा आत्मा निर्माण झाल्यासारखा वाटतो. त्याचे अस्तित्व देहाच्या अस्तित्वापुरतेच मर्यादित असते. परलोक, ईश्वर, धर्म कर्मांचा नियम हे सर्व झूट, कपोलकल्पित असून स्वार्थी लोकांनी आपल्या तुंबड्या भरण्यासाठी आणि लोकांना लुबाडण्यासाठी निर्माण केलेले आहे. देह हाच आत्मा असल्याने देहामुळे मिळणारे सुख मिळवणे हेच एकमेव ध्येय अथवा पुरुषार्थ असू शकतो. धर्म आणि मोक्ष तर नाहीतच आणि अर्थ हा कामोपभोगार्थ साधन म्हणून गणला जातो.

यावज्जीवं सुखं जीवेत् ऋणंकृत्वा घृतंपिवेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ।।

ही चार्वाकाची विचारसरणी सांगणारा श्लोक प्रसिद्ध आहे. ही अतिशय टोकाची भोगवादी विचारसरणी आहे. जीव आहे तोपर्यंत सुखाने जगावे, कर्ज करून देखील तूप प्यावे, अरे एकदा का हा देह भस्मीभूत झाला म्हणजे पुन्हां कोठून येणें होणार ? ही 'चारु' म्हणजे गोड 'वाक्' म्हणजे वाणी बोलणारा तो चार्वाक. कदाचित् हा बृहस्पतीचा शिष्य असावा.

बहुतेक लोक प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या याच विचारसरणीचे असतात. जे फटकळपणे हे आपले मत बोलून दाखवतात आणि आचरतात त्यांना धूर्त चार्वाक म्हणतात. जे थोडे दीर्घ विचाराने तारतम्य करून, एकूण जीवन त्यातल्या त्यात कसे भोगमय, सुखमय करता येईल असे पाहतात त्यांना सुशिक्षित चार्वाक म्हणतात. परंतु या दोही नांवाखाली न येणारे व बोलताना, प्रतिपादन करताना मोठ्यामोठ्या गप्पा मारतात, चांगल्या चांगल्या मूल्यांची नांवे घेतात, जे संभावित दिसतात, विचारवन्त दिसतात, धार्मिक दिसतात, इतकेच काय भक्त, साधू भासतात. त्यांच्या ओठावर काही का असेना, त्यांच्या पोटांत शिरून पाहाता तेही देहात्मवादी, भोगवादी असल्याचेच आढळून येतें. आचरणावरून, परिणामावरून जर त्यांचा अंतर्यामीचा अभिप्राय आपण जाणला तर ते खरोखरी देहाच्या सुखासाठी, देह हेच अंतिम मूल्य आहे, अशा तऱ्हेने जीवन व्यतीत करीत असतात. माणसाचे वर्तनच शेवटी त्याच्या अंतःकरणात काय आहे त्याचे गमक असते. या दृष्टीकोनातून तुम्ही जरा अवती भोंवती पहा. तुम्हाला जिकडे तिकडे भोगवादी लोकांचाच सुळसुळाट आढळून येईल. जे सामान्यतः लोकांमध्ये पसरलेले मत म्हणून आढळून येते ते हे 'लोकायत' म्हणूनही ओळखले जाते. आपण सर्वच बहुसंख्येंने याच मताचे असतो; मग आपण तसे प्रत्यक्षांत मान्य करूं अथवा न करूं.

कोणी असे समजूं नये की, तात्त्विक विचारशील बुद्धीपुढे . हे देहात्मवादी मत टिकू शकणार नाही. निदान जगामध्ये इतके ज्ञानविज्ञान वाढल्यावर तरी कोणी देहात्मवादाचे समर्थन करू शकेल असे वाटत नाही. परन्तु स्थिती याउलट आहे. सर्व साम्यवादी हे जडवादी आहेत. आधुनिक तत्वज्ञानाच्या क्षेत्रांत तार्किक प्रत्यक्षवादी हे याच विचारसरणीचे परन्तु नव्या आविष्कारामध्ये त्यांचे प्रतिपादन व समर्थन असते. तेव्हा चार्वाकाबरोबर चार्वाकवाद संपला असे कोणी मानूं नये. तो नित्यनूतन रूपे धारण करून पुढे येतच असतो.

चार्वाकवादाचे खंडन बाकीच्या सर्वच दर्शनानी केले आहे. देहात्मवाद हा खंडनार्ह आहे. एवढ्यासाठी तरी देहात्मवादाची दखल सर्वच आस्तिक नास्तिकवादी दर्शनांनी घेतलीच आहे. कोणी त्याची उपेक्षा करू धजत नाही. देहात्मवादाचा एवढा तिटकारा वैदिकांना, जैनांना, बौद्धांना आहे की, त्यांनी देहाचीच निंदा सुरू केली. देहाविषयी बीभत्स व घृणास्पद वर्णनें बहुतेक धार्मिकांनी, संतांनी;

भक्तांनी केली आहेत. नरदेहापेक्षाही नारीदेहाची निर्भत्सना अधिक केली आहे. हेतु हा की, पुरुषाला वैराग्य प्राप्त व्हावे. गीतेच्या १३ व्या अध्यायात ज्ञानाची लक्षणे सांगतांना पुढील कांही लक्षणें दिली आहेत

जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ।। गी. १३–८
असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु । १३–९

याप्रमाणे सवंध संसार हा दुःखदोषाने भरलेला आहे आणि गृह, स्त्री पुत्र यांच्या संबंधी आसक्ति ही आध्यात्मिक जीवनाला बाधक आहे हे समजणें म्हणजे ज्ञान होय. असा गीतेचा उपदेश सर्वच आदर्श जीवनाचे प्रतीकरूप आहे. समर्थांनीही इतर संतांप्रमाणे या विचाराचा अनुवाद केला आहे तो थोडक्यात तपासून म्हणून पाहू.

दशक १ समास १० मध्ये ५१ ते ६० ओव्यामध्ये ज्या देहाला मी माझे म्हणतो ते अनेक कीटकांनी आणि प्राण्यांनी आपले भक्ष्य केलेले असते असे वर्णन आहे. सवंध तिसऱ्या दशकभर जन्मापासून मृत्युपर्यंतच्या दुःखाचे वर्णन केले आहे.

पाहातां शरीराचें मूळ । या ऐसे नाहीं अमंगळ । ३–१
रजस्वलेचा जो विटाळ । त्यामध्यें जन्म यासी ।।११।।
वरिवरि दिसे वैभवाचे । अंतरी पोतडे नर्काचे । ३–१
जैसे झांकणे चर्म-कुंडाचे । उघडितांच नये ।।१४।।
लाळ थुंका आणी मळ । पीत श्लेष्मा प्रनळ । ३–१
तयास म्हणती मुखकमळ । चंद्रासारिखें ।।२२।।

योगसूत्रामध्यें 'शौच' म्हणजे शुचिता अथवा शुद्धता हा पांच नियमापैकी एक सांगितला आहे. हठयोगामध्यें शरीरशुद्धि कशी करावी या सवंधी निरनिराळ्या सोप्या आणि कठीण अशा प्रक्रिया सांगितल्या आहेत. या नियमाच्या अंगीकाराने काय परिणाम होतो ते एका सूत्रांत सांगितले आहे–

शौचात्स्वांगजुगुप्सा परैरसंसर्गः ।

शरीराची आंतर्बाह्य शुद्धता राखण्याच्या प्रयत्नांत साधकाला स्वतःच्या शरीराचे मूलभूत मालिन्य अनुभवास येते आणि त्याच्या संबंधी जुगुप्सा म्हणजे तिटकारा निर्माण होतो. आणि साहाजिकच इतरांच्या शरीराचा संसर्ग टाळण्याची बुद्धि होते. समर्थ सांगतात–

कुंड धूतां शुद्ध होते । यास प्रत्यई धुईजेते ।
तरी दुर्गंधी देहाते । शुद्धता नये ।। ३–१–१५

देहाच्या योगाने जगताशी संबंध येतो. तेंच गीतेप्रमाणें 'दुःखालयं अशाश्वतम्' आहे. हा दुःखवाद नैराश्यवाद बौद्ध तत्त्वज्ञानांत पराकोटीला गेला आहे. " सर्व

क्षणिकं क्षणिकं, सर्वं दुःखं दुःखं, सर्वं अनात्मकं अनात्मकमं, दुःखमेव सर्वं विवेकिनः ।" असे योगसूत्र आहे. त्याचा अनुवाद समर्थांनीही केला आहे.

जन्म दुःखाचा अंकुर । जन्म शोकाचा सागर ।
जन्म भयाचा डोंगर । चलेना ऐसा ।। दा. ३–१–१
संसार हाचि दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ । दा. ३–२–१

वेदान्ताच्या भूमिकेवरून देहाचे आणि जगताचे किंवा संसाराचे हे दुःखात्मक विवेचन वास्तवपूर्ण आहे. जे देहालाच आत्मा समजून त्याला सर्वस्व मानतात व त्याच्या योगानें भौतिक जगाला चिकटून भोगप्रवण जीवन व्यतीत करतात त्यांना देहाचे आणि जगताचे अशाश्वत स्वरूप व त्याचा हीन दर्जा स्पष्ट करण्यासाठीं असे वर्णन करणें अपरिहार्य आहे. तसे केलें नाही तर लोकांचा उद्धार कसा होईल ? समर्थ म्हणतात–

जरी प्रपंच शाश्वत जाणतो । तरी आह्मी यासीच धरितो ।
हा अशाश्वत म्हणोनि रडतो । तुह्मा भोंवता ।।

देहच खरा व देहच खोटा ही त्यासंबंधी दोन विरुद्ध टोके झाली. पहिला जडवादी दृष्टिकोण संपूर्ण अज्ञानाने भरलेला आहे, तर दुसरा पक्ष सिद्धान्ताचा अध्यात्मज्ञानाचा आहे. देहाची आसक्ति सुटावी, जगाकडे भोगदृष्टीने पहाण्याचे सुटावे म्हणून देहात्मवादाची निंदाही आवश्यकच आहे. परंतु हा अर्धाच भाग झाला. देहाचेही महत्त्व वेदान्ताला मान्य आहे व तेही साधकाला सांगण्याची तितकीच आवश्यकता आहे. म्हणून समर्थांनी 'देहात्मयोग' सांगितला तो फार मननीय आहे. देह हा साध्य नाही, पण साधन खरेच. देह हे साधन, तर साध्य देहांतील आत्मा. देहाचा आणि आत्म्याचा असा योग देहांतच झाल्या कारणाने देहाचा उपयोग आत्म्याच्या शोधासाठी करता येतो. देहाला आत्म्यामुळे सचेनत्व आले. आणि देहाच्या संयोगाने त्यातील आत्म्याला सुखदुःखाचा भोग होऊ लागला. त्याचप्रमाणे त्याच्या योगाने चांगली वईट कर्मे करता येऊ लागली. चांगल्या मार्गाने जाऊन आत्मोद्धार करून घेणे शक्य होते ते याच देहात्मयोगामुळे. देह हा भोगायतन नसून धर्मायतन आहे; ही वेदांताची भूमिका आहे. आत्म्याला प्रकट व्हायला देह हा निमित्त होतो. नरदेहात आलो ही एक सुदैवानें प्राप्त झालेली सुसंधि आहे.

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पहा हो ।
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पाविजे सिद्धीते ।। १–९–१०

दशक १३ समास ९ हा देहात्मयोग सांगणारा आहे. त्यांतील काही ओव्या पाहा–

आत्मयास शरीरयोगें । उद्वेग चिंता करणें लागे ।
शरीरयोगें आत्मा जगे । हें तों प्रगटचि आहे ।।१।।

देह अन्नचि खायेना । तरी आत्मा कदापी जगेना ।
आत्म्यावीण चेतना । देहास कैंची ॥२॥
हें येकावेगळें येक । करूं जातां निरर्थक ।
उभययोगें कोणी येक । कार्य चाले ॥३॥
देहाला नाहीं चेतना । आत्म्याला पदार्थ उचलेना ।
स्वप्नभोजने भरेना । पोट काही ॥४॥
वाढणे, मोडणे, जाणे, येणें । सुखदु:ख देहाचेनि गुणें ।
नाना प्रकारे भोगणें । आत्मयास घडे ॥९॥
देहीं सुखदु:खभोक्ता । तो येक आत्माचि पाहाता ।
आत्म्याविण देह वृथा । मडें होय ॥२६॥
मनाच्या अनंत वृत्ति । जाणेंणें तेचि आत्मस्थिति ।
त्रैलोकीं जितुक्या व्यक्ती । तदंतरी आत्मा ॥२७॥
शरीरास बरें केलें । तें आत्मयास पावलें ।
शरीरयोगें जालें । समाधान ॥३७॥
देहावेगळे उपाय नाना । करितां आत्मयास पावेना ।
समाधान पावे वासना । देहाचेनि ॥३८॥
देह आत्मयांचें कौतुक । पाहों जातां हें अनेक ।
देहावेगळी आडणुक । आत्मयास होय ॥३९॥
येक असतां उदंड घडें । वेगळें पाहतां कांहींच न घडे ।
विवेकें त्रिलोकीं पवाडे । देहात्मयोगें ॥४०॥

वरील विवेचनावरून समजून येईल कीं देहात्मयोगाचा हा विचार वेदान्ताच्या अंतर्गत सांख्य सिद्धान्तावर आधारित आहे. पुरुष म्हणजे आत्मा, प्रकृति म्हणजे देह. पुरुष हा निर्गुण चेतन पण अकर्ता. प्रकृति सगुण, अचेतन आणि कर्त्री. या दोघांच्या संयोगाने विश्वाची उभारणी होते. त्यांच्या एकेकटयाने काहीं घडूं शकत नाहीं. अंधपंगु न्यायानें ते दोघे जेव्हा एकत्र येतात तेव्हा त्यांच्या या योगानें सर्व काही घडते. नरदेहाच्या रूपाने त्यांचे हें एकत्र येणें आत्म्याला स्वत:ची ओळख पटवून घण्याची दुर्लभ संधि प्राप्त करून देते. प्रकृति पुरुषाचा किंवा देह आणि आत्म्याचा योग हा भोगाला कारणीभूत होतो. देहाच्याद्वारे कर्मे घडतात आणि देहांतील आत्म्याला ते भोग घडतात. हे आत्म्याचे बंधन खरे. पण यांच बंधनकारक योगामध्ये देहाकडून असे सत्कर्म अथवा धर्मकार्य करवून घेता येते की, ह्या आगंतुक प्रकृतिपुरुष संयोगाचे विवेकाने वियोगात म्हणजेच मोक्षात रूपांतर करता येते. देहाच्याच योगानें देहाचा वियोग घडविण्याची किमया करता येते.

येचि जन्मे येंचि काळें । संसारी होईजें निराळे ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारे ॥ ६-९-२९

विवेकज्ञान म्हणजे पुरुषाने प्रकृतिपासून निराळे होणे. ही सांख्यांची शिकवण आहे. सांख्य प्रक्रियेचा, योगपद्धतीचा उपयोग करून अद्वैत वेदान्ताच्या तात्त्विक सिद्धांतातील आत्म्याची स्वरूपस्थिती प्राप्त करून घ्यावयाची.

खरे पाहू जाता देहात्मयोग हा आत्मा-अनात्मा यांचा अगंतुक योग आहे. आत्म्याचा खरा योग कशाशीच नाही. तो असंग आहे. पण हा अनाकलनीय योग घडला आहे. देहाशी योग म्हणजे प्रकृतीतील सर्व तत्त्वांशी हा संयोग आहे. मन, बुद्धि, चित्त, अहंकार, पञ्चज्ञानेंद्रिये, पंचकर्मेन्द्रिये, पंचप्राण, पंचमहाभूते या सर्वांशीच हा योग आहे. ही सर्व अनात्मप्रकृतितत्त्वे असली तरी, आणि ती बंधनांत पाडणारी असली तरी हा आकस्मिक योग हीच सुसंधी मानून काट्याने काटा काढावा तसा देहानेच देहाला विदेहस्थितीत नेण्याचा हा धार्मिक अध्यात्मिक प्रवास अथवा साधना आहे.

नाहीतरी मनाला उपदेश करून उन्मनी अवस्था प्राप्त करून घेण्याची किमया समर्थांना अभिप्रेत होतीच की नाही? आत्मा आणि मन यांचा योग असल्यानेच हे शक्य झाले. त्याच चालीवर देहाला आंजारून गोंजारून त्याच्याकडून धर्मपालन करवून घेऊन हळू हळू देहापासून विलग होण्याचे कार्य साधून घ्यावयाचे आहे. त्यासाठीं देहाचे महत्त्व जाणणे यथायोग्यच आहे. समर्थांनी देहाची दुर्लभता दशक १८ समास ४ मध्ये बहारीने वर्णन केली आहे. देहामुळे सर्व काही उदात्त भव्य साध्य करता येते.

देहाकरितां श्रवण घडे । देहाकरितां मननीं पवाडे ।
देहाकरितां देहीं आतुडे । मुख्य परमात्मा ।।५।।
देहाकरितां कर्ममार्ग । देहाकरितां उपासनामार्ग ।
देहाकरितां ज्ञानमार्ग । भूमंडळी ।।६।।
इहलोक आणि परलोक । देहाकरितां सकळ सार्थक ।
देहेविण निरर्थक । सकळ काही ।।७।।
देहाकरितां नवविधाभक्ति । देहाकरितां चतुर्विधामुक्ती ।
देहाकरितां नाना युक्ती । नानामतें ।।१३।।
नाना सन्मार्ग साधने । देहाकरितां तुटती बंधनें ।
देहाकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ।।१७।।
देह सकळामध्यें उत्तम । देहीं राहिला पुरुषोत्तम ।
सकळां घटीं आत्माराम । विवेकी जाणती ।।१८।।
देह परलोकींचें तारूं । नाना गुणांचा गुणागरू ।
नाना रत्नांचा विचारू । देहाचे नी ।।२२।।
देह ब्रह्माण्डाचें फळ । देह दुर्लभचि केवळ ।

परी या देहास निवळ । उमजवावे ।।२४।।
असो काही येक करणें । कैसें घडे देहाविणें ।
देह सार्थकी लावणें । म्हणिजे वरें ।।३१।।
आत्म्याकरितां देह जाला । देहाकरितां आत्मा तगला ।
उभययोगें उदंड चालिला । कार्यभाग ।।३२।।
देहामध्यें आत्मा असतो । देह पूजिता आत्मा तोषतो ।
देह पीडितां आत्मा क्षोभतो । प्रत्यक्ष आतां ।।३४।।
देहावेगळी पूजा पावेना । देहाविण पूजा फावेना ।
जनीं जनार्दन म्हणोनी जना । संतुष्ट करावें ।।३५।।
उदंड प्रगटला विचार । धर्मस्थापना तदनंतर ।
तेथेंच पूजेस अधिकार । पुण्य शरीरीं ।।३६।।
पृथ्वीमध्ये जितुकी शरीरे । तितुकी भगवंताची घरे ।
नाना सुखें येणें द्वारे । प्राप्त होती ।। २०–४–४
नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।
याकारणें तोषवावी । कोणीतरी काया ।। १५–९–२५

या सर्वांचा मथितार्थ इतकाच की जरी वेदान्ताच्या सिद्धान्ताप्रमाणें आत्मा अथवा परमात्मा अथवा परब्रह्म हेंच एकमेव अद्वितीय सत्य असले तरी, ज्याअर्थी देहाचा प्रत्यक्ष प्रत्यय आहे, त्याअर्थी त्याचेही काही प्रयोजन आहे. ते प्रयोजन हेच कीं परमात्मा हा देहाद्वारे प्रकट झाला आहे, तो पुन्हा देहाद्वारेच प्राप्त करता येईल. देहाच्या उपेक्षेनें देवाला पावता येणार नाहीं. ‘ शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् ।’ हे सुभाषित प्रसिद्धच आहे. शरीराबद्दल अनासक्ति याचा अर्थ शरीराला त्याचे योग्य ते स्थानही न देणें नव्हे. त्याला पीडा देणारे मार्गही दुर्दैवानें अस्तित्वांत आहेत. जैन व बौद्धांनी अशा तऱ्हेचे शरीरविरोधी साधनामार्ग हाताळले आहेत. या प्रकारे शरीराला होणारी पीडा शेवटी जीवात्म्यालाच पोचते. शरीराला घोर तपश्चर्या करून पोळूही नये किंवा त्याचे फार चोचलेही करू नयेत. शरीराला त्यागणें, त्याच्याकडे दुर्लक्ष करणें, त्याला निंद्य मानणें, याला ‘ अयोग ’ म्हणतात, शरीराला भोग देणें, त्याचे चोचले पुरवणें याचा ‘ मिथ्यायोग ’ किंवा ‘ अतियोग ’ होण्याची शक्यता असते. शरीराला स्वास्थ्यांत ठेवणे, निरोगी बनवणें, सशक्त, बलसंपन्न करणें हें त्याला आत्म्याच्या योगांत ठेवणे होय. ही वेदान्ताची शरीराकडे पाहाण्याची विधायक दृष्टि आहे. हाच देहात्मयोगाचा अभिप्राय आहे. यामध्येच देहाचा खऱ्या अर्थाने उप–योग साधतो. समर्थांनी या शिकवणुकीनें खरोखरी आपणास उपकृत केले आहे.

ज्ञानेश्वरांच्यामध्ये अशी विधायक दृष्टि होती. त्यांची एक ओवी पूर्वी सांगितलेली आहे, तीच या संदर्भात सांगून हे देहात्मयोगाचे विवेचन संपवितो.

ज्ञानोबा म्हणतात–

तुवां शरीरपरा नोहावे । कामनाजात सांडावे ।
मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ।। ज्ञानेश्वरी ३–१८८

यांतील पहिल्या पादांत भोगवादाचा निषेध आहे. दुसऱ्या पादांत निष्कामतेची शिकवण आहे. आणि उरलेल्या भागांत ' अवसरोचित ' या शब्दाद्वारें धर्मवादाचा उपदेश केला आहे.

## प्रश्नोत्तरे

प्र. १ ला– समर्थ रामदासांच्या आधीच्या संतांनी निवृत्तिधर्माचा का स्वीकार केला ?

उत्तर– समर्थ रामदासांच्या आधीच्या संतांच्या काळात माणसाचा स्वतःवरील विश्वासच मुळी अस्थिर झाला होता. समाजाची परिस्थिती लक्षात येऊनही स्वतःच्या ठिकाणी आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी त्यांनी निवृत्तिधर्म सांगितला. समाजात पूर्ण क्रांती घडवून आणावयाची असेल तर स्वतःत आधी क्रांती केली पाहिजे हा त्यांचा विश्वास होता.

प्र. २ रा– सूफी तत्त्वज्ञान जर अद्वैती आहे तर त्या काळातील समाजाला त्यांची भीती वाळगण्याचे काय कारण ?

उत्तर– सूफीचे तत्त्वज्ञान नक्कीच अद्वैती आहे पण ' सूफी ' हा संप्रदाय आहे आणि यवनांचा धर्म इस्लामी आहे. वेगळ्या धर्माचे लोक इकडे आले तर येथील समाजाच्या मनात भीती निर्माण होणे साहजिकच. शिवाय इस्लामी धर्माचे अनुयायी आक्रमक होते हेही एक कारण. त्या काळातील यवन ' मनःपूतंसमाचरेत ' या न्यायाने वागत होते, कारण त्यांना राजाश्रय होता.

## ९ पद्मश्री श्री. बाबुराव गोखले यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण

श्री. गोखले यांनी ' समर्थांच्या समाजवादा ' संबंधी वैदिक काळापासून विद्वत्तापूर्ण आढावा घेऊन उद्‌बोधक विचार आपल्या निबंधामध्ये मांडले. समर्थांना सामाजिक–राजकीय दृष्टि होती व त्यांनीं समाजाच्या सर्वांगीण उन्नत्तीसाठी विचार तर मांडलेच पण ते आचरणांतही आणून दाखविले. श्री.

गोखले यांनीं समाजवाद हा शब्द अशा व्यापक अर्थानें वापरला आहे. हल्ली ज्याला समाजशास्त्र व सामाजिक तत्त्वज्ञान म्हणतात त्याचा विचार फार जुन्या काळापासून धर्मशास्त्रांतर्गत येत होता. तेव्हां समर्थांचे समाजासंबंधी जे विचार आहेत ते धर्मसंकल्पनेमध्येच मोडतात.

धर्माच्या कल्पनेचा विचार आपण नंतर पाहू. परंतु समाजवाद हा शब्द सांप्रत ज्या अर्थानें वापरतात त्याचा निर्देश प्रथम करू. हेतु हा कीं, समर्थांच्या विचारांना नवीन अर्थाने समाजवादी म्हणता येणार नाहीं हे स्पष्ट झाले पाहिजे. नाहींतर विचारांची गल्लत होईल. समाजवाद ही एक आधुनिक विचारसरणी कार्ल मार्क्सच्या चिंतनांतून निर्माण झालेली आहे. त्या अर्थाचा समाजवाद समर्थांच्या शिकवणुकींत नाही. समर्थांचे विचार अद्यापिही उद्बोधक आहेत, यांत शंका नाहीं. ते समाजस्वास्थ्याची दखल घेणारे आहेत हे खरेंच, पण त्यांना समाजवादी म्हणता येणार नाही.

फ्रेंच राज्यक्रान्ति झाली व सामाजिक–राजकीय जीवनामध्ये परिवर्तन घडविणारी लोकशाहीची स्वतंत्रता, समता आणि बंधुभाव ही नवीन मूल्ये आली हे पूर्वी आपण पाहिलेच. त्यांत व्यक्तिस्वातंत्र्याला प्राधान्य होते. यांतूनच मुक्त व्यापाराचे (laissez-faire) तत्त्व पुढे आले व यांतूनच पुंजीवाद किंवा भांडवलशाही उदयाला आली. व्यक्तिला मुक्तपणे आपले भांडवल, मालमत्ता वाढविण्याचा अधिकार मिळाला, यामुळे आर्थिक विषमता पैदा झाली. काही मूटभर लोकांच्या जवळ पैसाच पैसा आणि बहुसंख्य लोकांचे हातावर पोट अशी परिस्थिती निर्माण झाली. या परिस्थितींत यांत्रिक युगाने भरच घातली. यंत्रासारखी अर्थोत्पादक साधने भांडवलशाहांच्या हातांत राहिली, आणि त्या यंत्रावर काम करणारे मजूर रोजगारावर आपले पोट भरू लागले. म्हणावयास लोकतंत्रात्मक राज्यपद्धति. लोकांनी लोकांच्यासाठी चालविलेले लोकांचे राज्य ती लोकतांत्रिक पद्धति. पण वास्तविक आर्थिक सत्ता ज्यांच्या हातांत असते तेच अर्थाच्या जोरावर लोकशाहीचा अनर्थ करतात. नांवाला गोंडस वाटते अशी लोकशाही, पण खऱ्या अर्थाने ती भांडवलशाहीं. ज्यांच्या हातांत अर्थसत्ता त्यांच्याच हातांत राज्यसत्ता असे समीकरणच होऊन बसले. आर्थिक विषमता आली की, त्याबरोबरच सामाजिक विषमता व बंधुभावाचा अभाव हा आलाच.

कार्ल मार्क्सने या परिस्थितीचे वैज्ञानिक पद्धतीने विश्लेषण करून त्यांतील दोष उघडकीस आणले आहेत. त्याने असे दाखवून दिले आहे की, ज्यांच्या हातीं उत्पादनाची साधने असतात तेच सामाजिक संबंधांचे नियंत्रण करतात. वास्तविक पाहू जाता श्रमिकांच्या घामांतून संपत्तीचे उत्पादन होत असते. परंतु उत्पादनाच्या साधनांवर भांडवलवाल्यांचे नियंत्रण असल्याने ते श्रमिकांना त्यांचा योग्य तो वाटा

देत नाहीत. उरलेला अधिक वाटा ज्याला अतिरिक्त मूल्य (Surplus value) म्हणतात ते भांडवलवाले आपल्या पोटांत घालतात. याप्रमाणें पैशाकडे पैसा ओढला जातो. श्रीमंत अधिक श्रीमंत होतात. त्यासाठी त्यांना प्रत्यक्ष उत्पादनांत काहीही श्रम करावे लागत नाहींत. त्यांच्या युक्त्या प्रयुक्त्या साधने आपल्या हातीं ठेवून त्यावर संपूर्ण नियंत्रण ठेवण्यामध्ये योजल्या जातात. मार्क्सच्या सिद्धान्ताप्रमाणे या परिस्थितीचा केव्हांना केव्हां तरी अंत येणारच. विषमताजन्य अन्यायाचा परिस्फोट होऊन क्रान्तीच्या मार्गाने का होईना संपत्तीच्या उत्पादक साधनावर आणि उत्पन्न झालेल्या संपत्तीवर संपूर्ण अधिकार कारखान्यांतील श्रमिक मजूर वर्ग व शेतावरील कामकरी वर्ग मिळविणारच. वर्गविग्रह अटळ आहे. ही ऐतिहासिक नियति (historical determinism, necessity) भौतिक परिस्थितीमधूनच निर्माण होते.

भौतिक जड तत्त्व हे मूलभूत सत्य आहे. यांत प्रकृति व मानवाचे मन या दोन्ही गोष्टी येतात. भौतिक परिस्थितीचा मनावर आघात होतो आणि मनाचा भौतिक परिस्थितीवर आघात होतो. याप्रमाणे विरोध विकासवाद त्यानें मांडला. काही मूलस्थिति असते. नंतर त्याच्या विरुद्ध स्थिति निर्माण होते. नंतर दोन्हींचा समन्वय साधणारी स्थिती निर्माण होते (Thesis–anti-thesis–synthesis). हा मूळचा विरोधविकासाचा सिद्धान्त जर्मन तत्त्वज्ञ हेगेल याचा. पण तो आदर्शवादी किंवा चित्तत्व मानणारा केवलवादी (Absolutist) तत्त्वज्ञ होता. मार्क्सच्या मते अतिमसत्ता चित्तत्वाची नसून जडतत्त्वाचीच आहे. मात्र हे जडतत्त्व पूर्वीच्या जडवाद्याप्रमाणे यांत्रिकतेने चालणारे (mechanical) नसून द्वंद्वात्मक विरोधाने गतिमान असणारे तत्त्व आहे (dialectical materialism). तेव्हां भांडवलशाहीच्या स्थितीचा अंत येऊन श्रमिकांची अधिसत्ता स्थापन होणे इतिहासक्रमांत अनिवार्य आहे (dictatorship of the proletariat). या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्षांत क्रान्ति घडवणारा परिणाम विसाव्या शतकांत पहिल्या महायुद्धानंतर झाला. साम्राज्यवादाचा अंत येऊन सामान्य मनुष्याच्या हातीं राजकीय सत्ता येऊ शकते हे इतिहासानें सिद्ध केले. या विचारसरणीचा प्रभाव प्रथम रशियामध्ये युरोपात पडला व नंतर चीनमध्ये व आशियामध्ये पडला. यांतून स्फूर्ति मिळून अनेक गुलाम राष्ट्रे स्वतंत्र झाली. तथापि ती सर्वच मार्क्सच्या साम्यवादी विचारांच्या अंकित झाली नाहींत. भारताचेच उदाहरण आहे. ब्रिटिश साम्राज्यवाद्यांना झुगारून दिले पण येथे लोकशाहीच राहिली.

जागतिक इतिहासाकडे पाहाता असे दिसून येते की, सुरुवातीस धर्मराज्य होते व तो धर्म निस्पृह ब्राह्मणांनी घालून दिला होता. प्रजा आपापल्या कर्तव्य-रूपी धर्माचे पालन करीत असे. निराळ्या अधिशासनाची आवश्यकता नव्हती.

राजा नव्हता, दंडधारी नव्हता, चोर नव्हते. प्रजाच परस्परांचे स्वयंस्फूर्त रक्षण करीत असे.

कालांतराने ही व्यवस्था बिघडत चालली. त्यामुळे लोकांना उपद्रव होऊ लागला. त्यांनी परस्पर विचारविनिमय करून राज्यसंस्था आणि शासकवर्ग निर्माण केला. सुरुवातीस या क्षत्रियांच्या राजसत्तेवर धर्माचे नियमन असे. प्रत्यक्ष दंडसत्ता जरी क्षत्रियांच्या हातीं असे तरी अप्रत्यक्ष परंतु परिणामकारक शासन धर्मधुरीणांच्या निस्पृह सल्ल्यानुसार चाले. राजा हा धर्मदण्डच असे. परंतु पुढे पुढे धर्मसत्ता क्षीण होत गेली व राजसत्ताच प्रवल होत गेली. भारतात व युरोपांत याप्रमाणे घडत गेले. प्रथम प्रथम ख्रिस्ती धर्माधिकाऱ्यांचे राजकीय शासनावरही नियंत्रण चाले. कालांतराने पोपचे व त्याच्या प्रीस्ट लोकांचे नियत्रण राजेलोक मानीतनासे झाले. राजसत्ता व धर्मसत्ता यामध्ये काही काळ संघर्षाचा गेला.

काही काळ असा लोटला. औद्योगिक क्रान्ती झाली. राजेशाही क्षीण होत गेली व ज्यांच्या हाती आर्थिक सत्ता होती अशा वैश्यवृत्तीच्या भांडवलवाल्यांच्या हातीं शासनाच्या नाडचा आल्या. ज्या ज्या देशांत लोकशाही स्थापन झाली त्या त्या देशांत व्यक्ति स्वातंत्र्याच्या आदर्शाखाली काही व्यक्ति आर्थिकदृष्टचा गब्बर झाल्या. आर्थिक सत्तेच्या जोरावर मूठभर लोक प्रजातंत्र आपल्या हितासाठी वापरू लागले. खरी धर्मसत्ता धुळीस मिळाली. क्षत्रियांची राजसत्ता अर्थसत्तेच्या वेसणाने निर्बंधित झाली. ब्राह्मण व क्षत्रिय नामधारी झाले. ते सर्व वैश्यांचे गुलाम बनले. धर्म समूळ नाहीसा झाला नाहीं. अर्थासाठी धर्म राबवला जाईल इतके त्याचे अस्तित्व टिकवून धरले गेले. धर्म हा साध्य राहिला नाहीं, ते एक प्रबल साधन झाले. धर्माचा आत्मा गेला, त्याचे कलेवर राहिले.

मार्क्सच्या म्हणण्याप्रमाणें ही परिस्थिती दीर्घकाल सुसह्य राहणें शक्यच नाहीं. बहुसंख्य असणारे शूद्र–श्रमिक, मजूर, कामगार हे धनाढ्यांच्या विरोधांत उभे राहाणारच. सर्व संपत्ति थोडयांच्या हातांत. ते पिळवणूक करणार, तर पिळवणुकीला बळी पडलेले अखेरच्या संघर्षात उतरणारच. संख्येनें बलाढ्य असल्यानें त्यांचाच विजय निश्चित ठरलेला आहे. शेवटी शूद्र समजल्या जाणाऱ्यांचीच सत्ता अस्तित्वांत येणार. असे हे ब्राह्मणापासून शूद्राकडे क्रमाक्रमाने सत्तांतर होण्याचे चक्र पूर्ण होत राहिले आहे. या संघर्षांत उतरण्यासाठी अशी हांक दिली होती, ‘ साऱ्या जगांतील कामगारांनो, एक व्हा. तुम्ही ज्या साखळदंडामध्ये अडकून पडलेले आहात त्याच्याशिवाय तुम्हाला इतर काहीच गमवावे लागणार नाही.’

संपत्ति व तिची साधने ही सर्व समाजाची आहेत. तिच्यावर कोणा एकाची किंवा काहीजणांची सत्ता चालणे हा धडधडीत अन्याय आहे. भांडवलवादी

समाजाची सर्वच सांस्कृतिक, धार्मिक, नैतिक मूल्ये ही भांडवलशाही समाजाच्या हिताची असल्यानें ती उद्ध्वस्त करूनच नवीन साम्यवादी समाजाची रचना करायला हवी. समाजवाद आणि साम्यवाद या दोन्ही विचारसरणीमध्ये समाज हाच सर्वसत्ताधीश असायला हवा हा विचार समान आहे. परंतु दोघांच्या मध्ये साधनांच्या बाबतींत विचारभिन्नत्व आहे. साम्यवादाला रक्तरंजित क्रांति मान्य आहे. व्यक्तिस्वातंत्र्य मान्य नाही. समाजवादाला प्रजातंत्र, व्यक्तिस्वातंत्र्य व निवडणुकांच्या घटनात्मक मार्गाने समाजवाद स्थापन व्हायला हवा. त्यामुळे सामाजिक क्रांतिच्याबाबतींत सबुरीनें घ्यायला त्याची तयारी आहे. साम्यवादाला धीमा विकास मान्य नाहीं. संपत्तीवर नागासारखा विळखा घालून बसलेले लोक राजीखुषीने आपला स्वार्थ सोडावयास तयार होणार नाहींत. त्यांची संपत्ती हिंसक मार्गानें हिसकावूनच घ्यावी लागेल. दोघांच्याही मते खाजगी संपत्ति विषमतेला कारण होते. खरी लोकशाही आर्थिक समतेशिवाय शक्य नाही. आणि आर्थिक समतेशिवाय सामाजिक समता आणि खराखुरा बंधुभाव निर्माण होणार नाहीं.

शेवटी मूल्यांचा संघर्ष असा आहे कीं, व्यक्तिस्वातंत्र्याचे बलिदान करून समता स्थापावयाची, का समता बंधुता यांचे बलिदान करुन व्यक्तिस्वातंत्र्य राखावयाचे ? सामाजिक जीवन मुक्त हवे की बद्ध हवे ? या प्रश्नावर आजच्या राजकीय जीवनामध्ये दोन तट समोरासमोर उभे असून त्यांच्यामध्ये थंडे युद्ध चालू आहे. एकमेकांवर डावपेंच टाकून प्रतिपक्षावर मात करण्याचे त्यांचे अखंड प्रयत्न चालू आहेत. त्यासाठीं त्यांनी विज्ञान आणि तंत्रज्ञान पणाला लावले आहे.

समाजवाद हा असा आहे. त्याचा गाभा साम्य साधणारी समाजरचना करण्यामध्ये आहे. हा आजच्या मानवाचा नवा धर्म आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाहीं. या समाजवादाशी समर्थांचा सुतराम संबंध नाहीं, हे आणखी विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं.

तथापि ज्याअर्थी समर्थांच्या शिकवणुकीचे सार वर्णन करण्यासाठीं आपण समाजवाद या शब्दाचा प्रयोग करतो, त्याअर्थी आपल्या अंतर्मनांत दोन गोष्टी घर करून बसल्या आहेत याची जाणीव होते. एक तर समाजवाद हा एक चांगला हितप्रद विचार आहे. आणि म्हणूनच समर्थांची शिकवण त्या हितप्रद विचाराच्या जवळपास असायला हवी अशी भावना, ही दुसरी गोष्ट. त्या दृष्टीने समर्थांची शिकवणूक पाहाण्याजोगी आहे.

समर्थांना धर्मसंस्थापना करणे हेच श्रेयस्कर वाटत होते. मुळांतीलच हिंदू धर्माची कल्पना अतिशय विशाल आहे. समाजामध्ये इतिहास कालौघाप्रमाणें

धर्मात न्यून येते. धर्माची ग्लानि होते. विशेषत: परकीय आक्रमणाखाली मानव चिरडला जात असतांना तो सैरावैरा धाऊ लागतो, तो मोकाटपणें वावरू लागतो. येन केन प्रकारेण आपल्या पुरता तग धरून राहाण्याचा कमी अडचणीचा मार्ग तो स्वीकारतो. अशा विस्कळीत परिस्थितीत त्याला पुन्हां स्वस्थ करून समाजामध्ये स्थैर्य निर्माण करणे हेच रामदासांना धर्मसंस्थापनेमध्ये अभिप्रेत होते. धर्मामध्ये हे सामर्थ्य आहे, हे समर्थांना माहीत होते.

धर्म म्हणजे काय ? धर्म म्हणजे ज्याला आपण रिलिजन ( religion) अथवा संप्रदाय म्हणतो तो नव्हे. संप्रदाय हे मनुष्यनिर्मित आहेत. अर्थात संप्रदाय-प्रवर्तक ही असामान्य माणसे होती यांत कांही शंका नाही. त्यांची पुष्कळशी शिकवणूक श्रेष्ठ दर्जाची, काही प्रमाणांत शाश्वत मूल्यांची, म्हणूनच सार्वत्रिक आणि सार्वकालीन अशा स्वरूपाची असते. आणि तेवढ्यापुरती ती शिकवणूक सर्व धर्मांना समानपातळीवर आणणारी अशी असते. परंतु कांही प्रमाणांत मनुष्य-दत्त शिकवण ही स्थलकालपरिस्थितिसापेक्ष असणे अनिवार्य असते.

हिंदूधर्म हा कोणी मानवाने सांगितलेला धर्म नाही. तो वस्तुतंत्र आहे, व्यक्तितंत्र नाही. तो सनातन सत्यावर आधारलेला आहे. सत्याचे दर्शन मानवाला होते, सत्याची निर्मिती मानव करीत नाही. उदाहरणार्थ, गुरुत्वाकर्षणाचा नियम हा न्यूटनला अवगत झाला, पण तो नियम सृष्टिगत आहे. या अर्थाने सत्य ज्ञान हे अपौरुषेय आहे, पुरुषतंत्र नाहीं. गुरुत्वाकर्षण हे सत्य पदार्थांचे धारणा-तत्त्व आहे. तो त्यांचा धर्म आहे. म्हणूनच धर्माची व्याख्या महाभारतकारांनीं अशी केली आहे.

धारणाद् धर्म इत्याहु: धर्मो धारयते प्रजा: ।
य: स्यात् धारणसंयुक्त: स धर्म इति निश्चय: ।।

याचा आशय असा की, ज्याच्यायोगे उत्पन्न सृष्टिची धारणा होते त्याला धर्म म्हणतात असा निश्चय आहे.

धर्मोऽस्य विश्वस्य जगत: प्रतिष्ठा ।

सर्व विश्वाची, जगाची प्रतिष्ठा म्हणजे धर्म होय. थोडक्यांत म्हणजे, ज्याच्यामुळे धारणा होते तो धर्म व ज्याच्यामुळे विनाश होतो तो अधर्म. हा धर्म सर्व पदार्थांना लागू आहे. तो केवळ मानवाच्या धारणेपुरता मर्यादित नाहीं. एक प्रसिद्ध सुभाषित आहे, त्यांत मानवाचे इतर पशूपासून वेगळेपण दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

आहारनिद्राभयमैथुनं च । सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम् ।
धर्मोहि तेषामधिको विशेष: । धर्मेण हीना:पशुभि: समान: ।।

आहार, निद्रा, भय, मैथुन या गोष्टी पशू व मानव यांच्यामध्ये समानपणे आहेत. परंतु मानवांचा असाधारण असा विशेष म्हणजे धर्म होय. धर्मविहीन माणसे ही पशूसारखी आहेत.

परंतु आपण वर पाहिले त्याप्रमाणे धर्मतत्त्व हे संपूर्ण सृष्टीचे तत्त्व आहे. ज्यामुळे विश्वाची धारणा होते. पशूही त्या सृष्टीच्या अंतर्गत आहेत. तेव्हा त्यानाही पशुधर्म आहे, ज्यामुळे त्या त्या प्राण्यांची धारणा होत असते. आहार, निद्रा आदि पशू आणि मानव यांचे साधारण म्हणजे सामान्य धर्म आहेतच, ज्यामुळेही पशू आणि मानव यांची धारणा होते. तेव्हां पुन्हा धर्म हा मानवांचा असाधारण धर्म आहे, या म्हणण्याला अर्थ राहात नाही. फार तर असे म्हणता येईल की मानवाला काही विशिष्ट असा धर्म आहे. तेव्हा वरील सुभाषितामध्ये सुधारणा करण्याच्या हेतूने 'धर्म' या शब्दाऐवजी 'ज्ञान' हा शब्द सुचविला आहे–

ज्ञानं हि तेषां अधिको विशेषः ।

याचा अभिप्राय असा की, माणसांच्या ठिकाणी 'ज्ञान' हा विशिष्ट गुण आहे, जो पशूमध्ये नाही. परंतु हेही म्हणणे बरोबर नाही. पशूंनाही त्यांच्यापुरते ज्ञान असतेच. ज्याला आपण सहजज्ञान ( instinct ) म्हणतो ते पशूंच्या ठिकाणी असते. आहार निद्रा आदि सहजधर्मच आहेत आणि ते सहजज्ञानामध्ये मोडतात. अर्थात् ज्ञानाज्ञानामध्ये प्रकारभेद आहेत. माणसांच्या ठिकाणी स्वतःची जाणीव असते, त्याचे ज्ञान शास्त्ररचना करण्याइतके प्रगल्भ असते. पशूमध्ये असे ज्ञान नाही. तेव्हा वरील सुभाषितांत पुढीलप्रमाणे सुधारणा सुचविता येईल.

शास्त्रस्य ज्ञानं अधिको विशेषः ।
शास्त्रेण हीनाः पशुभिः समानाः ।

पदार्थविज्ञानापासून अध्यात्मविज्ञानापर्यंत विविध शास्त्रे माणसाने रचिली आहेत. त्या शास्त्रांनी घालून दिलेल्या अनुशासनाप्रमाणे मानवाने जाणीवपूर्वक आपला आचार ठेवणे याला मानवविशिष्ट धर्म म्हणता येईल. गीतेचाही हाच अभिप्राय आहे.

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ।। गी. १६–२४

ज्याला धर्मशास्त्र म्हणतात त्यांत अनेक शास्त्रांचा समावेश असतो. मानवी आचार उत्तम होण्यासाठी ज्ञानविज्ञानाची आवश्यकता आहे. रामदासांचा अनेक ज्ञानविज्ञाने जाणून घेण्यावर भर आहे. भोळसटपणावर–आंधळेपणावर त्यांचा विश्वास नाही. धर्माच्या अंतर्गतच नीति, राजकारण, समाजकारण यांचा समावेश

होतो. धर्म हा समग्र जीवनव्यापी आहे. तो सृष्टीचा आधार आहे. मानवाच्या कर्तव्यबुद्धीचा व्याप मानवसंबंधापुरता मर्यादित नाही. मानवाला पशुसृष्टि, जीवसृष्टि, वनस्पतिसृष्टि व जडसृष्टि यांच्याविषयी कर्तव्ये आहेत. ती कर्तव्ये पार पाडण्यांतच मानव समाजाची व सर्व सृष्टीची धारणा आहे. अशा तऱ्हेची विशाल कल्पना हिंदू धर्माव्यतिरिक्त इतरत्र पाहावयास सांपडत नाही. मनुष्याचा देह जसा धर्मायतन आहे तसेच सर्व जगत् हे त्याचे धर्मक्षेत्र आहे. धर्माचे हे अतिविशाल आणि अतिगहन तत्त्व मानव समजत नाहीं व त्याचे आचरण करीत नाही म्हणून जीवनाच्या समस्यांना अंत येत नाही.

मार्क्सच्या तत्त्वज्ञानांत केवळ भौतिकवाद आहे. त्यांत धर्म व अध्यात्म यांना थारा नाही. धर्म ही अफूची गोळी आहे, असे तो समजतो. धर्माचरणाने मानवामध्ये समाधानी वृत्ति बाणली जाते. स्वार्थी भांडवलशहा याचा गैरफायदा घेऊन श्रमिक वर्गाला अल्प मोबदल्यांत समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करतात. दास्यवृत्तीमध्ये त्यांना त्यांचे शोषण कसे केलें जाते ते समजत नाहीं. म्हणून धर्माला अफूसारखे कैफांत आणि खोटया समाधानांत ठेवणारे साधन म्हटले आहे. ते अर्धसत्य आहे. कोणाला धर्माचा खोटा आश्रय घेऊ न देणे योग्यच आहे. म्हणूनच धर्माचे खरेपण समजण्याची आणि खरा धर्म समजण्याची आवश्यकता आहे. धर्मच खोटा किंवा काल्पनिक म्हणणे सर्वथा चूक आहे. आर्थिक समतेच्या भौतिक व्यवस्थेने मनुष्य समाधानी होऊ शकेल असे मानणे म्हणजे मानवस्वरूपाबद्दलचे अज्ञानच प्रकट करणे होय. मार्क्सचा जडवाद यांत्रिक स्वरूपाचा नाहीं. तो गतिमान स्वरूपाचा आहे. पण तेवढ्याने चैतन्यस्वरूप मानवी अनुभवाचा उलगडा होत नाही. मानवाच्या स्वयंस्फूर्त कर्तृत्वाला जडवादांत स्थान नाही. तो परिस्थितीचा दास समजला जातो. आध्यात्मिक धर्मवादाला ही विचारसरणी मान्य नाही. इतिहास मानवाला घडवित नाही, तर मानव इतिहास निर्माण करू शकतो. चेतनाचा जडावर प्रभाव असला पाहिजे. जडाचा चेतनावर प्रभाव हा मानवी चैतन्याचा अपमान आहे. स्वतः मार्क्सच्या विचारांचा परिणाम नवीन इतिहास घडविण्यांत झाला, हा चैतन्यवादाचा विजय आहे. सामान्य माणसे परिस्थितीचे दास असतात. पण असामान्य माणसे इतिहासाचा ओघ बदलवून टाकतात. शिवाजी व समर्थ हे परिस्थितीने निर्माण केले असे म्हणणे वेगळे, व ते शकप्रवर्तक युगप्रवर्तक असे स्वयंप्रज्ञ महापुरुष होते म्हणणे वेगळे. त्यांनी विपरीत परिस्थितीवर स्वकर्तृत्वाने मात केली व देशाचे चित्र पालटले. हा मानवाच्या ठिकाणीं वसत असलेल्या चैतन्यशक्तीचा प्रभाव आहे. समर्थांच्या शब्दांत सांगावयाचे तर हे 'देणे ईश्वराचे' आहे.

मार्क्सच्या विचारसरणींप्रमाणे श्रमिकांची हुकूमशाही ही एक मधली पायरी

आहे. वर्गविग्रहांतून निर्माण झालेली ही पूर्वीच्या सरंजामशाहीच्या विरोधी स्थिती आहे. शेवटची पायरी वर्गविहीन समाजरचना व राज्यसंस्थेचा विलय ( Classless society & withering away of the state ) अशी आहे. कोणत्याही सुसंवद्ध समाजांत भिन्न भिन्न प्रकारची कामें करण्याचे सामर्थ्य असलेले निरनिराळे वर्ग असणारच. त्याची एकसंधता वर्गविहीनतेवर अवलंबून नसून सर्वांनी मिळून स्वीकारलेल्या एकाच आदर्शावर अवलंबून असणार. भौतिक समता अशक्यप्राय आहे, पण आध्यात्मिक समता हे स्वयंसिद्ध तत्त्व आहे. हिंदू धर्माला ही आध्यात्मिक समतेची भूमिका मान्य आहे. आचार्य विनोबा म्हणतात त्याप्रमाणे साम्यवाद नाही पण साम्ययोग ही गीताधर्माची शिकवण आहे.

याचा अर्थ असा नव्हे की, आपण भौतिक उणीवांकडे दुर्लक्ष करावे. भारताच्या इतिहासात मध्ययुगांत काही शतकांचा काल असा गेला की आपल्या समाजाने भौतिक जीवनाकडे दुर्लक्ष केले. परचक्राच्या आघातापुढे शरणागती पत्करावी लागली. प्रवृत्तिकडे, प्रपंचविज्ञानाकडे पाठ फिरविल्यामुळे समाजाची अधोगति झाली. धर्माचे प्रवृत्तिपर महत्त्वाचे अंग विगलित झालें. समर्थांनी ही विकृति आपल्या शिकवणुकीने काढून टाकून पूर्णधर्माची सांगोपांग प्रतिष्ठापना केली.

समाजजीवनाच्या भौतिक परिस्थितींत सुधारणा ही अनुपेक्षणीय बाब आहे. इतःपर कोठलेंही राष्ट्र, मग ते समाजवादी असो वा नसो, समाजाच्या कोणत्याहि घटकाची उपेक्षा करू शकणार नाही. नैसर्गिक आणि मानवप्रयत्नांनी उत्पादित अशा दोन्ही प्रकारच्या संपत्तीचे शक्य तितके समान वाटप करणे ही प्रमुख राजनीति स्विकारलीच पाहिजे. समाजवादाची ही सामाजिक दृष्टि अंगीकारणे समाजस्वास्थ्याचे दृष्टीने महत्त्वाचे आहे. धर्मांने सामाजिक स्वास्थ्य हे सामाजिक धारणेचेच अंग मानले पाहिजे, व तसे ते पूर्वीपासून मानलेले आहे. त्याची कार्यवाही कदाचित झाली नसेल तर ती चूक सुधारलीच पाहिजे संपत्तीचे सामाजिकीकरण करताना तिचे सरकारीकरण होण्याचाच संभव अधिक असतो. त्यामुळे सरकार बलिष्ठ होते व व्यक्तिस्वातंत्र्य लुळे पडत जाते. व्यक्तीची खाजगी संपत्ती पूर्णतः नष्ट केली तर व्यक्तिजीवन संपुष्टात येते. ही स्थिती कदापीही वांछनीय नाही. याकरता समाज व व्यक्ति यांच्यामध्ये समतोल राखण्याचे कार्य सरकारी यंत्रणेपेक्षा धर्मभावना अधिक चांगल्या रितीने करू शकेल. भारतात सर्वोदय आणि अंत्योदय या कल्पना साम्ययोगाच्या अंतर्भूत राहून कार्यवाहीमध्ये आणण्याचे प्रयत्न चालू आहेत. जी निसर्गाची देणगी आहे ते ईश्वराचे देणे आहे असा विचार त्यामध्ये आहे. त्या संपत्तीचे आपण फक्त विश्वस्थ आहोत. वैयक्तिक संपत्तीबद्दल ममत्वभावना कमी करणे हा धार्मिक आध्यात्मिक विचार स्तुत्य आणि

ग्राह्य आहे.

राजकीय तत्वज्ञानांत समर्थांनी राष्ट्रभावना जागृत केली. युरोपमध्ये राष्ट्रीय भावनेचा असाच पुरस्कार केला गेला होता. मार्क्सने राज्यसंस्था नाहीशी होईल असा तात्त्विक विचार जरी मांडला तरी तशी स्थिती प्रत्यक्षात येणे दुरापास्त आहे.

फार पुरातन काळीं धर्माधिष्ठित म्हणजे कर्तव्यभावनेवर अधिष्ठित अशी अराजकाची (राज्यविहीन) स्थिती वर्णिली आहे. अशी स्थिती लहान समाजामध्ये शक्य आहे. शिवाय अशा समाजात कमीत कमी गरजा असायला हव्यात. सर्व जीवनच अतिशय साधेसुधे असायला हवे. अधिकारही कमी, अपेक्षाहि कमी. जीवनांत जटिलता कमी, समस्याही कमी, (कदाचित मुळीच नसतीलही) त्यामुळे कर्तव्येही कमी. राज्यसंस्थेची गरजच राहात नाही.

सध्याचे जीवन या सर्व बाबतीत भिन्न आहे. समाज विशाल, नाना तऱ्हेची नवीन संपत्ती निर्माण झालेली, गरजा वाढलेल्या, जीवनाविषयी अपेक्षा वाढलेल्या, व्यवस्थापनाच्या समस्या वाढलेल्या, परस्पर संबंध जटिल झालेले, सर्वच गोष्टी फार मोठ्या प्रमाणावर कराव्या लागतात. त्यामुळे शासकीय नियंत्रण अनिवार्य आहे. गलथानपणाचा कारभार अक्षम्य आहे. मानव संख्येच्या वाढीमुळे कित्येक समस्या अकल्पनीय रीतीने उद्भवतात. सगळीच माणसे सरळ प्रवृत्तीची नसतात. कुटिल प्रवृत्तींचे दमन व निराकरण करणे आवश्यक ठरते. त्यामुळे शिक्षण संस्था, पोलिस यंत्रणा, न्याय- संस्था, लष्कर इत्यादि सर्व गोष्टींची कायमची व्यवस्था करणे आवश्यकच राहाणार. म्हणजेच राज्यसंस्था व सरकार हे नेंहमीच अस्तित्वांत राहाणार. औद्योगिक नागरी संस्कृतीची इतकी जबरदस्त वाढ झाल्यानंतर मार्क्सने कल्पिलेली राज्यविहीन अवस्था कधीकाळी निर्माण होईल हे अशक्य आहे. याउलट अशा तऱ्हेचे 'अराजक' जर झाले तर ते आदर्श म्हणून नाही, तर भयानक गोंधळाची ती स्थिती असेल.

आपली वाटचाल राष्ट्रवादाकडून आंतरराष्ट्रीयतेकडे चालू आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' हे ध्येय साकार करण्याची समस्या बिकट आहे. पण जोपर्यन्त ते ध्येय प्रत्यक्षात उतरणार नाही तोपर्यंत कोणाही व्यक्तीला व कोणत्याही समाजाला सुरक्षित वाटणार नाहीं. हे ध्येय सिद्ध करणे केवळ राजकारणावर अवलंबून नाहीं. लोकांच्या मनोवृत्ती जितक्या प्रमाणांत शुद्ध, धार्मिक आणि आध्यात्मिक होतील तितक्या प्रमाणांत हे अत्युच्च ध्येय जवळ येईल. वाट सोपी नाहीं, पण वाट काढलीच पाहिजे. अनेक राष्ट्रांतून एक जागतिक राष्ट्र (World State) जोपर्यंत बनत नाहीं तोपर्यंत जगत् हे युद्धभूमि राहाण्याचाच धोका आहे. सध्याचे युद्ध परमाणु अस्त्रांमुळे एवढं

भयंकर असेल कीं, त्यांत भाग घेण्याची कोणालाही इच्छा असो वा नसो, त्याच्या परिणामापासून अलिप्त राहाता येणार नाही.

विज्ञान, तंत्रविज्ञान, जडवाद, ऐहिकतावाद, संप्रदायवाद यावर अधिष्ठित असलेले प्रचलित राजकारण हेच सर्व समस्यांचे मूळ आहे. या राजकारणाला खऱ्या धर्मांचे आणि अध्यात्माचे वावडे आहे. जर समस्या सुटावयास हव्या असतील तर धर्म आणि अध्यात्म यांच्या भूमिकेवरूनच त्या सुटण्याची शक्यता आहे. हा सनातन धर्मसंस्थापनेचा मार्गच समर्थांनी हाताळून 'आनंदवनभुवन' निर्माण केले. जे त्यांनी महाराष्ट्राच्या अल्प भूभागावर शिवाजी महाराजांना सहाय्य करून घडवून आणले, तेच कार्य आपणास जगाच्या विशाल भूमीवर क्रमाक्रमाने सिद्ध करावयास हवे. हा प्रश्न संप्रदायांच्या भूमिकेवरून सुटणारा नाही. वस्तुतंत्र विश्वव्यापक सत्याच्या अधिष्ठानावर आणि आध्यात्मिक मानवताधर्माच्या सनातन आदर्शांप्रत वाटचाल करूनच कालांतराने प्रश्न सुटू शकेल. ही हिंदूधर्माची भूमिका आहे. मग त्यास नांव कोणतेही द्या.

**प्रश्नोत्तर :**

प्रश्न :– सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील त्याचे ।
परंतु तेथे परमेश्वराचे । अधिष्ठान पाहिजे ।।

या ओळीचा अर्थ काय ?

उत्तर :– (श्री. गोखले ) :

समर्थांची ही ओवी अर्थपूर्ण आहे. सामर्थ्य हा शब्द 'समर्थ'पासून झालेला असून शक्ति, वजनदारी, प्रभाव असा त्याचा अर्थ आहे. " जितुके काही उत्तम गुण । तितुके समर्थाचे लक्षण ।।" म्हणून उत्तम गुणांनी संपन्न असा माणूस " बहुतजनास चाळवी । नाना मंडळे हालवी । तेणे हे समर्थ पदवी । प्राप्त होते।।" एवढेच नव्हे, तर " समर्थे समर्थ करावे ।।" अशी ही जबाबदारी उत्तम गुणांनी संपन्न अशा माणसाने समाजातील पुष्कळ त्या माणसांना जाग आणून त्याना कार्यप्रवृत्त करावयाचे असते. असा लोकजागर साधण्याची शक्ति असणाराने आपली ती कला आपल्या संपर्कात येणाऱ्या माणसास शिकवून कर्तृत्वाची, लोकनेतृत्वाची साखळी अखंड राहील हे दक्षतेने पहावयाचे असते.

समर्थ म्हणजे वरीलसारखे प्रभावी कर्तृत्व ज्याचे जवळ असते तो समाजात आपला प्रभाव दोन तऱ्हानी सिद्ध करीत असतो. एक तर समाजात समाजस्वास्थ्याकरता आणि परस्पर जिव्हाळा दृढ करण्याकरता, सामाजिक संपर्काचे जे शिष्टसंमत संकेत ठरलेले असतात किंवा परस्पराशी वागण्याचे अलिखित नियम असतात, त्यात कोणी घसर वा हयगय अथवा चळ केल्यास, त्याला शिस्त पाळाव-

यास लावून समाजस्वास्थ्य अबाधित राखण्याकरता 'समर्थ' माणूस दक्षतेने खटपट करतो. दुसरेपक्षी, केव्हा केव्हा सर्व समाजास एकदिलाने व एकजिनसीपणाने एखाद्या कार्याचा उठाव सामूहिक सहकाराने करावयाचे उत्थापन 'समर्थ' साधत असतो. "समर्थांच्या अशा आंदोलनाला महत्त्व असून, त्यातून समाजाचा प्रभाव प्रगट होत असतो. तसाच ते आंदोलन उभारणाराचाही प्रभाव प्रगट होत असतो." साहित्य सम्राटानी म्हटल्याप्रमाणे "ज्याची कल्पना, त्याचें कार्य; इतरांची सहानुभूति" अशी 'समर्था'च्या हालचालींची प्राथमिक अवस्था असली तरी 'समर्था'ची कल्पना, त्या कल्पनेतील अभीष्ट वा ध्येय, आणि त्या ध्येयासाठी करावयाची साधना समाजातील बहुतेकानी आत्मसात केल्यावर आंदोलनाची अगर चळवळीची मूळ कल्पना वा प्रेरणा एकटचा 'समर्था'ची असते ती आता त्या आंदोलनात वा चळवळीत भाग घेणाऱ्या प्रत्येकाची होते. आणि परिणामतः ती मूळ कल्पना वा प्रेरणा आणि तिच्या पोटी होणाऱ्या वा झालेल्या हालचाली अखिल समाजाच्याच मानल्या जातात. अगदी अलिकडच्या उदाहरणांनी बोलावयाचे तर लोकमान्यांची 'होमरूल' चळवळ अगर महात्माजींची 'चले जाव' चळवळ लक्षात घेतल्यास नीट उलगडा होईल. या चळवळीचे उत्पादक, प्रेरक, उत्थापक लोकमान्य वा महात्माजी असले तरी लोकानी जीव घालून त्या चळवळीं उभारल्या म्हणून त्या चळवळी राष्ट्राच्या ऐतिहासिक घटना ठरल्या.

कोणत्याहि कल्पनेला, प्रेरणेला, उत्थापनाला असा प्रभाव वा सामर्थ्य निर्माण व्हावयास, ती कल्पना, प्रेरणा वा उत्थापन जास्तीत जास्त 'सर्वभूत हितरत' असावे लागते. त्यालाच 'परमेश्वरी अधिष्ठान' म्हणावयास त्या कल्पनेचा, प्रेरणेचा वा उत्थापनाचा केवळ सूत्रधारच नव्हे, तर, त्या उत्थापनाची साधना करणाराही प्रत्येकजण "स्वसुखनिरभिलाषः खिद्यते लोकहेतोः ।।" असा जास्तीत जास्त प्रमाणात लागतो. या सृष्टींचो संचालक शक्ति उर्फ परमेश्वर जसा अणुपरमाणूत भरलेला असूनही तो प्रत्यक्ष दाखवता येत नाही, तशीच उत्थापनाच्या प्रेरकापासून चालकापर्यंत सर्वांची वृत्ति असली तर त्या उत्थापनाचें तेज आगळेवेगळेच ठरते. परमेश्वर जसा "आहे तरी सर्वठायी । पाहो जाता कोठेंच नाही ।" असा आहे. तसेच आंदोलनातील सर्व सहकारी घटकापैकी प्रत्येकाचे दर्शन असेल, तेवढ्या प्रमाणात एकदर आंदोलन, हालचाल, चळवळ शाश्वतपणे आपला प्रभाव इतिहासाच्या कपाळी शिक्कामोर्तबाने नोंदते. आणि? चळवळीचा उत्थापक, चळवळीचें ध्येय, चळवळीच्या साधना व चळवळीस उचलून धरणारा प्रत्येक घटक आपापल्या स्वार्थनिरपेक्षतेप्रमाणे पण कारणी लावलेल्या बौद्धिक, शारिरीक, भावनिक जोमाच्या योगाने आपापले नांव करून ठेवतो.

## १० सौ. शालिनीताई जावडेकर यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण

सौ. शालिनीताई जावडेकर यांनीं " समर्थ रामदास–सार्वकालीन आदर्श पुरुष " हा अभ्यासपूर्ण निबंध सादर केला. डॉ. सौ. मंगला वैष्णव यांच्या-सारखाच हा विषय. तथापि दोन्ही निबंधांची मांडणी निरनिराळ्या तऱ्हेनें झाली आहे. समर्थांची शिकवण तर आदर्श होतीच. परंतु त्यांचे व्यक्तिमत्वही आदर्श होते हे निःसंशय.

शिवाजीच्या समकालीन पोर्तुगीज लेखक कास्मडगार्डा यांनीं शिवाजीचे चरित्र लिहिले आहे. तो रामदास व त्यांचा मठ यासंबंधी जे लिहितो ते वाचनीय आहे–

" या प्रांतांत एक ब्राह्मण असून त्याचे नांव रामजी (रामदास या शब्दाचा संक्षिप्त उच्चार). त्याला जमीनजुमला फार आहे. त्याजविषयी मुसलमान व सर्व जातीचे हिंदू यांना फार आदर आहे. या प्रांतांत नेहमी युद्धे चालतात. परंतु कोणत्याहि धर्माचा वा जातीचा सैनिक असो, तो त्याच्या जहागिरीस धक्का लावीत नाही. या आश्रमांत हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा परामर्श घेतला जातो. कारण तो म्हणतो की, मला देवाने दिलेले द्रव्य सर्वांकरितां दिलेलें आहे. याला पूज्य मानीत नाहीं असा एकहि मानव हिंदुस्थानांत नाहीं. त्यास जगातील अद्वितीय पुरुष समजले जाते. त्याच्या मठातील अन्नग्रहण कोणासहि नाकारणे शक्य नाहीं. कोणी एखादा त्याचे आदरातिथ्य चुकवून जाऊ म्हणेल तर त्याचे हेर त्याला अगत्यपूर्वक ठेवून घेतात. पहिल्या खेपेस शिवाजी ह्याच्या मठावरून जात असता त्यास मठांत पाहुणचार घेण्यास बोलाविलें. पण त्याने ते नाकारले. तेव्हां रामजीने आपल्या मनुष्याबरोबर त्यांजकडे शिधा पाठवून निरोप दिला कीं, " सर्वच लोक गरीब आहेत; तूं आपणांस श्रीमंत न समजतां पाठविलेल्या शिध्याचा स्वीकार कर, हे धन माझे नसून सर्वांचे आहे." (महाराष्ट्र धर्माचे प्रणेते, पब्लिकेशन्स डिव्हिजन, माहिती व नभोवाणी खाते, दिल्ली ८.१९५८, पृष्ठ ८६).

वरील अवतरणांतील अधोरेषा मी घातली आहे. त्या वाक्यावरून समर्थांचे अद्वितीय पुरुषत्व त्यांच्याकाळींच एका विदेशी परधर्मीय चरित्रकाराने कसे दाखवून दिले आहे ते समजून येईल. समर्थांना मुसलमानही आदरणीय व पूज्य मानीत होते ह्याची साक्ष एका तिऱ्हाईताने दिली आहे, ती लक्षणीय आहे. समर्थही आपल्या परी संपन्न होते व 'ईशावास्यमिदं सर्वम्' या भूमिकेवरून ते स्वतःस त्या संपत्तीचे विश्वस्त समजत होते. ही विश्वस्त

कल्पना म. गांधींनी अलिकडील काळात मांडली होती. समर्थ अन्नदान व आदरातिथ्य अगत्यपूर्वक करीत असत. असे करताना त्यांनी श्रीमंत-गरीब असा भेद केला नाही. कांही अपेक्षाहि ठेविली नाही. या त्यांच्या व्यवहाराला दैवी सामर्थ्य आणि दैवी सद्‌गुणसंपदा यांच्याशिवाय यश येणे असंभवनीय दिसते. एरवी अवतीभोवती झगडे युद्धे चालू असता त्यांच्या स्थानाला मात्र अभयत्व कसे प्राप्त झाले त्याचा उलगडा करता येत नाही. अनेक सद्‌गुणांची मूर्ति असल्याशिवाय त्यांच्याबद्दल हिंदुस्थानभर पूज्यबुद्धि बाळगणारे लोक असू शकत नाहीत. यापेक्षा आदर्शपुरुषत्व ते आणखी काय असणार ?

तथापि आदर्श पुरुषाबद्दलच्या कल्पना विविध असू शकतात. उदाहरणार्थ, ज्याला **मर्यादा पुरुषोत्तम** म्हणतात तो राम आणि ज्याला पूर्णावतार किंवा **पूर्ण पुरुष** म्हणतात तो कृष्ण हे दोघेही आदर्श खरे, पण दोघांच्या मध्ये कितीतरी वेगळेपण दिसून येते. दोघेही परमेश्वराचे अवतार, दोघांनाही खरोखरी भगवान् श्रीरामचंद्र व भगवान् श्रीकृष्णचंद्र म्हणून ओळखतात. श्रीराम सूर्यवंशातील अयोध्यापति राजा, तर श्रीकृष्ण सोमवंशांतील द्वारकाधीश राजा. पूर्वीच्या काळच्या समाजधारणेप्रमाणें आदर्श व्हायला कमीत कमी राजा असायलाच पाहिजे. सामान्य माणसाला आदर्श होणे जरी शक्य झाले तरी त्याचे आदर्शपण सामान्य कोटींतील माणसाचे असल्या कारणाने ते कांही डोळयांत भरण्याजोगे होणार नाहीं. राजा कसा एकदम सर्वांना दिसतो, मग तो चांगला असेल अगर वाईट असेल. चांगल्या परंतु सामान्य माणसाची इतिहास काही दखल घेऊ शकत नाहीं. वाईट माणसांची तर नाहींच नाहीं. पण वाईट असला तरी तो राजा असेल तर इतिहासांत त्याला स्थान मिळणारच. इतिहास हा सामान्यत: राजांच्या वंशावळींचा त्यांनी बऱ्या वाईट केलेल्या कामगिरीचा कालक्रमानुसार घेतलेला आढावा असतो. अशा राजांच्या मध्ये जे आदर्शभूत चरित्र असलेले व इतिहास घडविणारे राजे झाले, त्यांची विशिष्ट दखल घेण्यासाठी म्हणून रामायण, महाभारत, रघुवंश, हरिवंश, भागवत हे विशेष प्रसिद्ध असलेले ग्रंथ झाले. इतर पुराणांतही अशी चरित्रे आहेत. पण ज्याचा सांस्कृतिक ठसा जनमानसावर उमटला अशी आदर्श चरित्रे दोनच. एक रामाचे आणि दुसरे कृष्णाचे.

जीवनांत कसे वागावे याचा आदर्श घालून देण्यासाठीच जणूं वाल्मीकींनी रामायण ग्रंथाची रचना केली. राम हा सर्वच मानवी संबंधांचा आदर्श निकष, आदर्श पुत्र, आदर्श बंधु, आदर्श शिष्य, आदर्श मित्र, आदर्श शत्रू, आदर्श पति, आदर्श योद्धा, आदर्श धनी (सेव्य– सेवा करण्यास योग्य), आदर्श राजा. रामाच्या वर्तनांत कर्तव्यबुद्धी सर्वश्रेष्ठ. दोन कर्तव्यांच्या मध्ये संघर्ष उत्पन्न झाला असता

तारतम्याने त्यामध्ये कठिणतर असले तरी कर्तव्याचाच नेहमी स्वीकार करणारा. उदाहरणार्थ, प्रजारंजनासाठी वैयक्तिक सुखाच्या पत्नीप्रेमाच्या बंधनालाही नाइलाजाने दूर सारण्याइतके कठीण काय असणार ? कौटुंबिक व सामाजिक जीवनात अनेक प्रकारची नाती निर्माण होतात. त्या त्या नात्यांचे, संबंधांचे आदर्श श्रीरामचरित्रांत घालून दिलेले दिसतात. शत्रूसुद्धा रामासारखा असावा. 'मरणान्तानि वैराणि': रावणासारख्या शत्रूला ठार केल्या-नंतर त्याचा सन्मानाने अंत्यविधी केला. अंत:करणाची विशालता असल्याशिवाय असे वर्तन घडणे अशक्य.

मला काही काही वेळा वाटत आले आहे रामाला एखादी बहिण असती तर बंधु–भगिनी प्रेमाचा एक आदर्श आणखी निर्माण करता आला असता. वाल्मीकीला हे का सुचले नाही त्याचे जरा नवल वाटते.

श्रीकृष्णाच्या चरित्रांत विविध दर्शन घडते. त्याचे सर्वच अद्भूत ! कारा-गृहात जन्म, मातापित्यांची अदलाबदल, बालपणीच्या गोकुळांतील आणि वृंदावनातील बालगोपगोपिकाबरोबरच्या लीला, कुमारवयात कंसासारख्या सख्ख्या मामाचा बलाढ्य राजा असतानाही वध, त्याच्यावर एका बाजूने प्रेमाचा वर्षाव करणारी मंडळी, तर दुसऱ्या बाजूला त्याचे अनेकांशी शत्रुत्व. सबंध जन्म युद्धें कर-ण्यात आणि करवण्यात गेला. अनेक युक्त्या प्रयुक्त्या योजाव्या लागल्या. अनेक बलाढ्यांचा त्यानें नि:पात केला वा करविला. सोळा सहस्त्र एकशे स्त्रियांना नरका-सुराच्या कैदेतून सोडवून त्यांच्या सन्माननीय सामाजिक प्रतिष्ठापनेसाठी त्यांच्याशी विवाहसंबंध जोडले. कौरव पांडवांच्यासारख्या बांधवांच्या युद्धात नि:शस्त्र राहून पांडवांच्या न्याय्यपक्षाचा पाठपुरावा करून त्यांना विजय प्राप्त करून दिला. मानलेल्या बहिणीला– द्रौपदीला तिच्या पराक्रमी पतींनाही जमले नाही ते संर-क्षण दिले. युद्धप्रसंगी गीतेसारखे गहन तत्त्वज्ञान सांगितले. विदुराघरच्या कण्या खाल्ल्या, सुदाम्याचे पोहे खाल्ले, अर्जुनाचे सारथ्य केले, सभेमध्ये अग्रपूजेचा मानहि मिळवला व राजसूय यज्ञप्रसंगी जेवणावळींत उष्टीही काढली. श्रीकृष्णाचे चरित्र अनेकविध अनेकविरूद्ध प्रसंगांनी खच्चून भरले आहे. शेवटीं तर आपल्या देखत आपल्याच यदुवंशाचा नाश करविला. हे सर्व अद्भूत, अगम्य, चमत्कृतिजन्य, दैवी सामर्थ्याने भरलेले चरित्र आहे. सामान्य माणसास यातील अनुकरणीय थोडे. म्हणून म्हणतात कीं, रामाच्या चरित्रासारखे वागावे आणि कृष्णाने उपदेश केला आहे त्याप्रमाणे वागावे, त्याच्या चरित्रासारखे वागता येणार नाहीं.

राम संप्रदाय आणि कृष्ण संप्रदाय हे दोन्ही वैष्णव संप्रदायच परंतु कै. डॉ. रामकृष्ण भांडारकर म्हणतात त्याप्रमाणे इतिहासदृष्ट्या पाहातां

समाजामध्ये शुद्ध चारित्र्याचा संस्कार घडविणारा रामसंप्रदायच आहे. एवढ्याच साठी समर्थ रामदासांनी रामाच्या आदर्शाला आपल्या जीवनांत व उपदेशांत उचलून धरले. वारकरी संप्रदायाचे दैवत कृष्ण किंवा विठ्ठल. समर्थांचे दैवत राम. ते विठ्ठलाच्या ठिकाणीं रामाला पाहून विचारतात, 'श्रीरामा, मनमोहन मेघश्यामा। येथे कां रे उभा ?' भागवत धर्माच्या इमारतीच्या वर्णनाच्या संत बहेणाबाईंच्या " संतकृपा झाली इमारत फळा आली–" या अभंगात रामदासांना स्थान नाहीं. कृष्णभक्त न्यायाधीश राम केशव रानडे यांनी स्वतःचा स्वतंत्र अभंग रचून त्यांत आपल्या स्वतःच्या ओळीची भर टाकून तींत रामदासांना स्थान दिले आहे. संत तुकारामांच्या ' राम कृष्ण हरी' या मंत्रावरून राम व कृष्ण हे सर्वमान्य असल्याने रामदास हे वारकऱ्याइतकेच भागवत धर्माचे ठरतात, हे दाखवून दिले ते चांगले केले. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी रामदासांना भागवत धर्ममंदिराचा कळस म्हटलें आहे. (पेंडसे गौरव ग्रंथ, पृष्ठ ८१) त्याचा अभिप्राय हा कीं, रामदासांची शिकवण ही सर्व संतांच्या शिकवणुकीचे सारसर्वस्व आहे. यांतच त्यांचे आदर्शत्व येते.

राजकीय इतिहासांत जसे राजाला प्रधानस्थान, तसे सांस्कृतिक इतिहासांत धर्म संस्थापकांना व त्यांच्या आदर्शांना स्थान दिले जाते. राम कृष्ण राजे असले तरी ते परमेश्वराचे अवतार. महावीर, बुद्ध, येशूख्रिस्त, महम्मद इत्यादि त्या त्या संप्रदायप्रवर्तकाला त्यांचे अनुयायी आदर्शभूत मानतात. या नांवाशिवाय आणखीही कित्येक नांवे पुराणकालापासून या आधीची व नंतरची सांगता येतील. त्या त्या धर्मसंप्रदायात मोठे मोठे संत, महंत, भक्त, योगी, आचार्य, सिद्ध होऊन गेले. त्यांना त्यांना मानणारे त्यांचे त्यांचे अनुयायी आहेत. याप्रमाणें त्यांच्या चरित्राचे निरनिराळे आदर्श समाजापुढे राहिलेले आहेत.

समाज जितका संकुल बनतो तितके त्याचे एकाचवेळीही भिन्नभिन्न आदर्श इतिहासकालांत पाहावयास मिळतात. समाजाच्या गरजा व त्यांच्या धारणा यावर हे आदर्श बनत जातात.

आदर्श राजकारणी मुत्सद्दी, आदर्श वैज्ञानिक, आदर्श तंत्रज्ञ, आदर्श कलावंत, आदर्श क्रीडापटु. आदर्श समाजसुधारक असे भिन्न भिन्न आदर्श पुरुष आणि त्यांचेच चाहते व यथानुशक्ति अनुकरण करणारे लोक असतात. याप्रमाणे सांप्रतच्या कालात अनेक आदर्श एकावेळींच समाजापुढे असतात. आणि त्या आदर्शांचे कमी अधिक मिश्रण त्यांच्या अनुयायांच्यामध्ये पाहावयास सापडते. त्यामुळें पूर्वीइतके एकमार्गी आदर्श जरी त्यावेळी ते सर्वोच्च वाटत असले तरी आधुनिक काळांत तसेच्या तसे अनुकरणीय राहतील असे म्हणणें बरोबर होणार नाही. यांतील प्रत्येकाला इतर आदर्शांच्या अभावी सार्वकालीन आदर्शत्व लाभणे अशक्यप्रायच आहे.

मात्र तात्त्विक विश्लेषण करून सार्वकालीन आदर्शत्वाचे सर्वसामान्य निकष ठरविणे शक्य आहे. मनुष्याच्या व्यक्तिमत्वांत अनेक पैलूंचा समावेश होतो. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक, सामाजिक, कलात्मक, धार्मिक, आध्यात्मिक असे ते पैलू होत. या प्रत्येक पैलूचा कमी अधिक प्रमाणांत विकास प्रत्येक व्यक्तीमध्ये होत असतो. मानव जातीच्या प्राथमिक अवस्थेत या सर्व पैलूंचा उत्तम विकास जरी पाहावयास मिळाला नाहीं, तरी मानववंशशास्त्रांत आदिमानवापासून या सर्व पैलूंचा आविष्कार पाहावयास मिळतो. सद्य:कालीन मानवी जीवनांत या प्रत्येक पैलूचा उत्तमोत्तम आविष्कार झालेला निरनिराळ्या व्यक्तीमध्ये पाहावयास मिळतो. तेव्हा असे म्हणावयास हरकत नाहीं कीं, ज्या एका व्यक्तीमध्ये उपरिनिर्दिष्ट पैलूंचा अधिकाधिक विकास झाला असेल त्या प्रमाणात ते व्यक्तिमत्व आदर्श होईल. आपणास सामान्यत: असे आढळून येते की; क्वचितच अशी व्यक्ति असते कीं, अनेक गुणांनीं युक्त असते. बहुतेक व्यक्तीमध्ये काही गुण तर काही दोष किंवा उणीवा असतात. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व काही बाबतीत कदाचित उंच असले तरी काही इतर बाबतीत ते अगदीच खुजे असते. उदाहरणार्थ शारिरीक बलसंपन्न मल्ल म्हणून आदर्श असेल, पण बाकी त्या व्यक्तीत काही इतर गुण अभावानेच असावयाचे. शक्ती आहे तर बुद्धि नाही. बुद्धिमत्ता आहे पण नीतिमत्ता नाही. शीलसंपन्न आहे पण अडाणी आहे. धार्मिक आहे पण ज्ञानविज्ञान नाही. पुस्तकी ज्ञान आहे पण व्यावहारिक ज्ञान नाही. विद्यावान् आहे पण वक्तृत्व नाही. विवेक आहे पण भावनेचे बळ नाही. श्रीमंत आहे पण दातृत्व नाही. दातृत्व आहे पण दरिद्री आहे. मदत करायची बुद्धि आहे पण दुबळेपणा आहे. दात आहेत तर चणे नाहीत. चणे आहेत तर दात नाहीत. हीं म्हण सुप्रसिद्ध आहे. थोडक्यात म्हणजे सकलगुणसंपन्नता हा अतिशय दुर्मिळ आदर्श आहे. संकलगुणसंपन्न असणारे व्यक्तिमत्व हेच सार्वकालीन आदर्श पुरुषत्व होय.

आदर्श पुरुष कसा असावा ह्याचा विचार मुख्यत: नीतिशास्त्रांत केला जातो. परंतु नीति किंवा आचारदृष्टयाच हा विचार असल्यानें तोही एक प्रकारे सीमित असतो. त्यामध्ये मुख्यत: शीलसपन्नतेवर जोर दिलेला असतो. या नीति-शास्त्रात सुद्धा भिन्न विचारप्रवाह आहेत. मानवाकडे पाहण्याचे तीन प्रमुख दृष्टि-कोन आहेत– प्राकृतिक किंवा नैसर्गिक, शुद्ध मानवीय आणि ईश्वराधिष्ठित. त्याप्रमाणें आदर्श पुरुषाचे प्रकारही भिन्न होतात. मानवाकडे तो एक प्रकृतिजन्य परिपाक आहे असे पाहिले तर निसर्गाच्या धकाधकीत टिकण्याचे ज्याला सामर्थ्य आहे असा माणूस आदर्श होय. असा मानव जडवादी, पाशवी सामर्थ्यानें युक्त, स्वार्थपरायण, भोगवादी व हिंस्त्र होतो. 'बळी तो कान पिळी' ( might is right) हाच नीतिनियम बनतो. जगण्यासाठी धडपड (struggle for existence)

ही निसर्गजीवनात अनिवार्य आहे. या धडपडीत जो बलाढ्य ठरेल तोच जगू शकेल. (Survival of the fittest) नीट्च्छे या जर्मन तत्त्वज्ञाने या तत्त्वप्रणाली-प्रमाणे आपल्या आदर्श मानवाचें 'अतिमानव' किंवा 'पुरुषोत्तम' (Superman) असे वर्णन केले आहे. असा अतिमानव सामान्य मानवाच्या ज्या सत् असत् किंवा चांगल्या वाईटाच्या कल्पना असतात त्यांच्या पलिकडे गेलेला असतो ( beyond good and evil). सामान्य नीतिमत्तेचे मानदंड अशा बलदंडाला लागू पडत नाहीत. तो स्वसामर्थ्याच्या जोरावर चांगले काय व वाईट काय, न्याय्य काय आणि अन्याय्य काय, याचा मानदंड घालून देतो. बलदंड अतिमानवाला जे इष्ट त्यालाच न्याय म्हणतात ( Justice is the interest on the stronger ). नीट्च्छेला येशुख्रिस्ताने शिकवलेली नीति मान्य नाही. येशूने पर्वतावर केलेला उपदेश ( Sermon on the mount ) हे ख्रिस्ती नीतिशास्त्राचे हार्द आहे. त्याचा आशय असा–

" पूर्वीच्या नियमकर्त्याने तुला दुष्टांचा सूड उगवायचा उपदेश केला होता. दातासाठी दात, डोळ्यासाठी डोळा असा बदला घ्यावा असे सांगितले होते. तो उपदेश नष्ट करण्यापेक्षा तो सुधारण्यासाठी मी आलो आहे. मी विध्वंस करण्यासाठी आलो नाही. मी उणीवा भरून काढण्यासाठी आलो आहे. माझा तुला उपदेश आहे कीं, तू दुष्टाचा प्रतिकार करू नकोस. द्वेषाला तू प्रेमाने उत्तर दे. एखाद्याने तुला थोबाडांत दिली तर त्याच्यापुढे तुझा दुसरा गाल कर. पण त्याला उलट मारू नकोस. त्याच्यावर प्रेमच कर."

काहीशा अशाच प्रकारची शिकवण महावीराने आणि बुद्धाने येशूच्या आधीं पाच–सहाशे वर्षे केली होती. ती म्हणजे अहिंसेची. ख्रिस्ताने प्रेमधर्मावर अधिक भर दिला. अखिल मानवजातीच्या पापाचा क्रूस त्याने आपल्या खांद्यावर घेऊन त्यांच्या पापाच्या क्षालनासाठी त्या क्रूसावर आपले बलिदान केले. येशूला क्रूसावर चढविणाऱ्या मानवांच्या त्या हिंसक कृत्याबद्दल मनात यत्किंचितही कितू न ठेवता येशूने परमेश्वराची प्रार्थना केली, " ते काय करीत आहेत ते त्यांना समजत नाही. त्यांना क्षमा कर." अशी त्या आदर्श प्रेममूर्ति मानवाची अमर गाथा आहे.

परंतु नीट्च्छेला हा उपदेश मान्य झाला नाही. ख्रिस्ताची शिकवणूक ही 'बायकी नीतिमत्ता' (feminine morality) आहे अशी निर्भर्त्सना त्याने केली आहे. निसर्गाच्या निर्घृण नियमात ती बसत नाही. ही पराभूत मनोवृत्तीच्या माणसाची शरणागतीची नीतिमत्ता आहे. ही विजिगीषु पुरुषार्थ साधणारी नीतिमत्ता नाही. असा हा नीट्च्छे ख्रिस्तांतक म्हणून प्रसिद्ध आहे. याच्या

शिकवणुकीचा परिणाम म्हणून की काय जर्मनीमध्ये हिटलर हा हुकूमशहा उत्पन्न झाला.

मानवीय भूमिकेवरून विचार करणाऱ्यांना असे वाटते की, जरी मानव प्रकृतीमधून उत्पन्न झाला आहे असे मानले तरी प्रकृतीचे विकसित फल या रूपाने मानव प्रकट झाला आहे. मानवाच्या प्राकृतिक उद्भवावरून मानवाचे मूल्य ठरविता येत नाही. मानवी जीवनाकडे मानवीय अशा स्वयंभू व स्वयंपूर्ण भूमिकेवरून पाहून त्याचा आदर्श ठरविला पाहिजे.प्रकृतिवादी दृष्टिकोन निराळा आणि मानवतावादी दृष्टिकोन निराळा. मानवांच्या परस्पर संबंधातून कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अथवा वैश्विक संबंध निर्माण होतात. त्यांच्या-संबंधी केवळ मानवतावादी दृष्टिकोनातून जी कर्तव्ये उत्पन्न होतात त्यांचा विचार या मानव्याधिष्ठित नीतिशास्त्रात केला जातो. सर्वांत आदर्श विचार तो हा की मानवजाति ही एकरूप आहे. जाति, धर्म, लिंग, वर्ण इत्यादिमुळे जे भेद निर्माण होतात त्यामुळे संघर्ष होतो. त्यांच्या पलिकडे जाऊन मानवांनी आपल्या समस्या मानवाच्या एकत्वासाठी सोडवल्या पाहिजेत. असे करणे ही नीति, हा न्याय. मानवाच्या व्यक्तिमत्त्वातील सर्व सुप्त गुणांचा विकास होण्याची सुसंधी ज्यायोगे प्राप्त होईल अशी मानवसमाजाची रचना करणे हाच मानवापुढील आदर्श होय. 'लोकशाही, समाजवाद, साम्यवाद या प्रत्येक सामाजिक–राजकीय विचारप्रणालींमध्ये अखिल मानवजातीचे भवितव्य सुधारण्यासाठी मानवतावादी मूल्यांचे विविध पर्याय सुचविले आहेत. व्यक्तीला व त्याच्या स्वातंत्र्याला अंतिम महत्त्व देणारी लोकशाही व समाजाला अंतिम मूल्य देणारा साम्यवाद या दोन प्रमुख विचारसरणीमध्ये सध्या मानवतेची एकता पूर्णतः दुभंगली आहे व त्यात कदाचित न भूतो न भविष्यति असा प्रत्यक्ष संघर्ष उभा रहाण्याचे भय मानव-जातीपुढे उभे ठाकले आहे.

धर्म आणि आध्यात्मिकता या मूल्यांचे सर्व प्रकारच्या ऐहिक मानवता-वादाला वावडे आहे. मानवतावाद हा धर्माला पर्याय म्हणून मानण्यात येतो, व तोच आधुनिकतेला, विज्ञानवादाला व बुद्धिवादाला सुसंगत आहे असा या विचार-सरणीचा आग्रह आहे. धर्माची आध्यात्मिक विचारसरणी ही जुनाट, भोंगळ व बुद्धिविरोधी आहे असे मानवतावादामध्ये मानले जाते. आदर्श मानव्यामध्ये धर्म व अध्यात्म यांना स्थान नाही.

प्रकृतीच्या आणि मानवाच्या अतीत अशी आध्यात्मिक शक्ति आहे. या अधिष्ठानावर मानवाचे अंतिम ध्येय ठरविणारे सर्व धर्म आहेत. ऐहिक जीवनांतील नैतिक सदाचार हा आध्यात्मिक जीवनाकडे नेणारा एक साधनमात्र आहे. यांत मानव्याचा विचार नैतिक भूमिकेमध्ये येऊन जातोच.

पण केवळ ऐहिक भूमिकेवरून केलेला नैतिक सदाचार आणि पारमार्थिक भूमिकेवरून केलेला सदाचार यांत मोठेच अंतर आहे. मानवतावादाची खरीखुरी परिपूर्ति आध्यात्मिक मानवतावादांत आहे. नैतिक जीवनाचे उत्तम रहस्य आध्यामिकतेंत आहे.

प्रत्येक धर्मामध्ये ईश्वर, जीव व जगत् यासंबंधी विचार केलेला असतो. यांत दुर्दैव असे की प्रत्येक धर्मामध्ये मांडलेले या संबंधीचे विचार भिन्न भिन्न आहेत. व त्यामुळे धर्माधर्मामध्ये हटवादी दुराग्रहीपणामुळे इतिहासकालात भयंकर संघर्ष झाले आहेत. त्यामुळे कोणत्याहि एका धर्माचा आदर्श सर्व मानवजातीला मान्य झाला नाहीं. त्यामुळे संघर्षाचे वातावरण तसेच चालू राहिले आहे, ही प्रत्यक्ष वस्तुस्थिती आहे.

मानवाची आदर्शाकडे वाटचाल चालूच आहे. अधून मधून आदर्शभूत महामानव निर्माण होतात. पण हें महामानवत्व सर्व मानवांना आपल्या बरोबर घेऊन जाण्यास अद्यापि तरी असमर्थ झाले आहे.

हिंदू धर्मापुरते पाहावयाचे झाले तर त्यातील आध्यात्मिक आदर्शाची विचारसरणी व त्यावर आधारित अशी नैतिकतेची जीवनमूल्ये भगवद्गीतेमध्ये पाहावयास मिळतात.

कर्मयोग, भक्तियोग, ज्ञानयोग, राजयोग या नांवाखाली आदर्श जीवनपद्धतीचे वर्णन येते.

स्थितप्रज्ञ, भक्त, ज्ञानी, योगी, दैवी संपत्तीयुक्त पुरुष गुणातीत यांची लक्षणे गीतेमध्यें सांगितली आहेत. ती पुन: पुन्हा पाहावीत. त्या सर्व लक्षणात उत्तमोत्तम सद्गुणांचे वर्णन आहे. ज्या पुरुषाच्या ठिकाणी ते सापडतात तो आदर्श पुरुष होय. याच तऱ्हेचे सद्गुण, जैन बौद्ध संप्रदायांतही सांगितले आहेत. व कमी-अधिक प्रमाणात अशा तऱ्हेचे सद्गुण इतर धर्मांतही सांगितलेले आहेत. तेवढयावरूनच सर्व धर्मांची शिकवण सर्वसाधारणपणे सारखीच आहे असे म्हणतात. असे असूनही जे संघर्ष होतात त्याचे कारण मूळ शिकवणुकीप्रमाणे प्रामाणिकपणें आचरण करणारे असे प्रत्येक धर्माचे अनुयायी बोटावर मोजण्याइतकेही सापडत नाहीत. आचरणात आणण्यासाठी सांगितलेल्या एक एका गुणाचेही साधन म्हणून जर साधक प्रामाणिकपणे पालन करेल तर त्याची आध्यात्मिक प्रगति होईल असे गुरुदेव रानडे यांनी त्यांच्या गीतेवरील ग्रंथात सांगितले आहे.

आध्यात्मिक सद्गुण जरी कितीही उच्च असले तरी त्यांच्याच पालनाने मनुष्य आदर्श पुरुष होणार नाहीं. आध्यात्मिक मूल्ये ही सर्वोत्तम मूल्ये होत. ज्यांच्या जीवनामध्ये ही मूल्ये नाहींत त्यांच्या जीवनांत बाकीचा फाफटपसारा

जरी पुष्कळ असला तरी मातीच्या चित्राप्रमाणे फार तर तें आकर्षक दिसेल, पण त्यांत ग्राह्य असे कांही असणार नाहीं. पण केवळ आध्यात्मिक मूल्यांच्या जोपासनेने आणि इतर शारीरिक, मानसिक, कलात्मक, सामाजिक मूल्यांच्या अभावाने अशा पुरुषाला आदर्शत्व लाभणे दुष्कर होय.

समर्थांचे आदर्श पुरुषत्व यामध्येच साठवले आहे कीं, ते सर्व पातळीवरच्या आणि व्यक्तिमत्त्वाच्या सर्व पैलूंचा विकास करणाऱ्या सद्‌गुणांचा परिपोष करण्याचा स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनांत आग्रह धरीत होते. समर्थांनीं श्रीरामाचा आदर्श लोकांपुढे ठेवला, त्याचे वर्णन वाल्मीकि रामायणांत प्रारंभालाच येते ते मोठे उद्‌बोधक आहे. त्याचा थोडा गोषवारा येथे देतो.

प्रथम वाल्मीकिने सर्वसंचारी मुनिश्रेष्ठ नारदांना "सांप्रतकाली कोण आदर्श पुरुष या भूलोकांत आहे ?" असा प्रश्न केला व नारदानी उत्तरांमध्ये त्याचे वर्णन केले. या प्रश्न आणि उत्तरामध्ये आलेल्या श्रीरामांच्या ठायीं असलेल्या सद्‌गुणांची यादी मोठी मननीय आहे.

गुणवान्, वीर्यवान्, धर्मज्ञ, कृतज्ञ, सत्यवचनी, धर्मासाठी स्वीकारलेल्या व्रताचा आपत्कालीही त्याग न करणारा, सदाचरणी, प्राणिमात्रांच्या हिताविषयीं तत्पर, विद्वान्, समर्थ, प्रियदर्शन (ज्याचे दर्शन आनंददायक आहे), मनोनिग्रही, क्रोधाचे संयमन करणारा, तेजस्वी, परोत्कर्षाविषयी मत्सर न धरणारा, युद्धकाली क्रुद्ध झाला असतां देवांनाही भीति उत्पन्न करणारा, धैर्यवान. जितेंद्रिय, बुद्धिमान्, नीतिज्ञ ( कोठे कसे वागावे हे जाणणारा ), वक्ता, वैभवशाली, शत्रुनाशक, उन्नतस्कंध, महाबाहु किंवा आजानुबाहु, शंखासारखा भरीव कंठ असलेला, मांसल हनुवटी, विशाल वक्षस्थल, मोठे धनुष्य धारण करणारा, खांद्यावरील अस्थि दिसत नाहीत अशा भरलेल्या खांद्याचा, उत्तम मस्तक व ललाट असलेला, प्रमाणांकित देह, विशालनेत्र, स्निग्धवर्ण, अशा शुभलक्षणांनीं युक्त असून प्रतापी आणि लक्ष्मीवान्, प्रजाहितदक्ष, यशस्वी, ज्ञानसंपन्न, पवित्र, विनयी, समबुद्धीने युक्त, धर्मरक्षक, जीवलोकांचा रक्षक; स्वधर्म व स्वजन यांचा रक्षक, वेद वेदांगांचे तत्त्व जाणणारा, धनुर्वेदांत प्रवीण, सर्वस्मृतिशास्त्रे जाणणारा, उत्तम स्मरणशक्ति असणारा, समय-सूचक, सर्व लोकांचे प्रिय करणारा व सर्वांना प्रिय वाटणारा, सौम्य साधुवृत्तीचा, उदार अंतःकरणाचा, सर्व कर्मांमध्ये कुशल, श्रेष्ठ, सर्वांशी समभावाने वागणारा असल्यामुळे सर्वदा लोकांना त्याचे दर्शन प्रिय असते व म्हणूनच नद्या ज्याप्रमाणे समुद्राकडे जातात त्याचप्रमाणे सर्वकाली सज्जन त्याच्या सान्निध्य जात असतात. ईक्ष्वाकु वंशांत जन्मलेला आणि 'राम' या नावाने प्रसिद्ध असलेला असा एक पुरुष लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. तो माता कौसल्येचा आनंद वाढविणारा आणि

पिता दशरथ याला प्रिय असणारा पुत्र अशा सर्वश्रेष्ठ गुणांनी संपन्न आहे.

तो गंभीरपणात समुद्रासारखा, धैर्यात हिमालयासारखा, पराक्रमांत विष्णुसारखा, प्रियदर्शनात चंद्रासारखा, क्रोधांत प्रलयकालाच्या अग्निसारखा, क्षमाशीलतेने पृथ्वीसारखा, धनत्यागांत कुबेरासारखा आणि सत्यामध्ये दुसरा मूर्तिमान धर्म आहे.

याच कारणास्तव समर्थांनी अनुकरण्यास योग्य म्हणून राम हे दैवत स्वीकारले.

आधी समर्थ रामदास यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलचा कॉस्मडगार्डीचा अभिप्राय देऊन नंतर आदर्श पुरुषत्वाबद्दलच्या निरनिराळ्या कल्पनांचा निर्देश केला. त्या सर्व कल्पनांमध्ये अभिप्रेत असलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या गुणांचा प्रामुख्याने एकत्र संचय ज्या व्यक्तिमध्ये होईल, आणि जितक्या प्रमाणात होईल ती व्यक्ति त्या प्रमाणात आदर्श पुरुष म्हणून गणली जाईल. असा विचार करता समर्थ रामदास यांच्या व्यक्तिमत्वात अनेकविध गुणांचा संचय होता हे ध्यानात येईल. ते त्यांचे सर्वच गुण कोणत्याहि कालांत वांछनीय असल्याने, त्यांना सार्वकालीन आदर्श पुरुष म्हणता येईल, हे आतापर्यंत सादर केलेल्या निरनिराळ्या निबंधावरून स्पष्ट होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक आदर्श पैलू त्या सर्व निबंधात पहावयास मिळतात. त्यांचा पुनरुच्चार करण्याची आवश्यकता नाही.

## ११. डॉ. रं. स. गोडबोले यांच्या निबंधावर डॉ. जावडेकर यांचे भाषण

डॉ. रंगनाथ सदाशिव गोडबोले यांनी त्यांच्या "श्री समर्थ रामदास स्वामींची तत्त्वसृष्टी" या निबंधांत समर्थांचे समग्र आध्यात्मिक वेदान्त तत्त्वज्ञान विशदपणें संकलित केले आहे. अद्वैतामध्ये येणारे सर्व विषय त्यांनी तर्कशुद्धपणे मांडले आहेत. मुळांतच विषय गहन, तथापि त्याचा आढावा उत्तमप्रकारे घेतला आहे. शंकराचार्यांच्याच तत्त्वज्ञानाचा रामदासांनी आपल्या विशिष्ट शैलीमध्ये अनुवाद केला आहे हे तत्त्वज्ञान सामान्य जनापर्यंत पोचविण्यासाठीं मुबलक शब्दसंपत्ती खर्ची घातली आहे.

अजातवाद, विवर्तवाद, मायावाद, अध्यासवाद, निर्गुणवाद, सगुणवाद, उभय निर्गुणसगुणवाद, सर्वब्रह्मवाद, ईश्वरवाद, जगन्मिथ्यात्ववाद, प्रकृतिपुरुषवाद, आत्मैकत्ववाद, अद्वैतवाद, जीवशिवैक्यवाद, परमार्थवाद, व्यवहारवाद, धर्मवाद; मोक्षवाद इत्यादि संबंधीचे तर्कशुद्ध विचार वेदान्तांत येतात. त्यांची अत्यंत

मार्मिक मांडणी समर्थांनी आपल्या ग्रंथांतून केली आहे. त्यांतील काही थोडा विचार मी आपणापुढे मांडतो.

शांकर अद्वैत वेदान्तांत तीन सत्तांचा विचार तत्त्वज्ञान सुलभ करून दाखवण्यासाठी केला आहे. पारमार्थिक सत्ता निर्गुण एकमेव अद्वितीय ब्रह्माची. व्यवहारिक सत्ता आपण वावरतो त्या जगाची. प्रातिभासिक सत्ता रज्जुसर्पा-सारख्या भ्रमरूप ज्ञानाची. यातील भ्रमरूप ज्ञानाचा उपयोग, ब्रह्माच्या पारमार्थिक सत्तेच्या स्थापनेसाठी आणि जगाच्या मायिक स्वरूपाचा उलगडा करण्यासाठी केला जातो. हे करताना ज्या पद्धतीचा उपयोग केला जातो त्याला अध्यारोपापवाद असे नांव आहे. मागे पूर्वपक्ष उत्तरपक्ष अशी समर्थ आपल्या उपदेशाचीं कशीं मांडणी करतात त्या संदर्भात ही ओवी येऊन गेली आहे.

आधी मिथ्या उभारावे । मग ते वोळखोन सांडावे ।
मग सत्य ते स्वभावे । अंतरी बाणे ।।

आधी सर्पाचा अनुभव येतो, साप साप म्हणून त्यास खरेच भिऊन माणूस त्यास मारावयास जातो, पण त्या तथाकथित सापाकडून काहीच प्रतिक्रिया होत नाही, हे ओळखून त्याची सर्पबुद्धी नाहीशी होते व ती दोरीच असल्याचे सत्य त्यास उमगते. या अनुभवाचा नंतर उलगडा करतांना रज्जूवर सर्पाचा त्याने उगाचच अध्यारोप केला. जोपर्यंत हा अध्यारोप आहे हे माणूस जाणत नाहीं तोपर्यंत साप हा खराच असतो. पण अध्यारोप हा खोटाच आरोप केला आहे हे जाणतांच त्याचा निरास किंवा अपवाद होतो. व नंतर मूळचे सत्य आपोआप प्रकट होते.

रज्जूच्या ठिकाणी साप का दिसला याचे उत्तर देण्यासाठीं अज्ञान; अविद्या, माया, भ्रम अशा शब्दांचा त्याने प्रयोग केला. मायावाद हा असा जगाच्या अनुभवाच्या कोड्याचे निरसन करण्यासाठी गृहीत धरला आहे.

व्ही. जे. कीर्तिकरांच्या "Studies in Vedanta" या दुर्मिळ झालेल्या पुस्तकात मायावादाच्या प्रकरणांत पुढील समर्पक दृष्टान्त दिला आहे. बीजगणितातील आहे. $क्ष^२ + २क्ष = २४$ हे समीकरण 'क्ष' ची किंमत काढण्यासाठी दिले आहे. तें असे सोडवायचे. दोन्ही बाजूकडे पूर्ण वर्ग करून घेण्यासाठी दोन्हीकडे अधिक एक मिळवून दिला. मग ते समीकरण असे झाले—

$$क्ष^२ + २\,क्ष + १ = २४ + १$$

$$(क्ष + १)^२ = (५)^२$$ दोन्हीकडील पूर्ण वर्ग.

$$क्ष + १ = ५$$

प्रथम वर्ग पूर्ण करण्यासाठी घेतलेला १ हा अंक काढन टाकला असता—

क्ष+१−१=५−१

उत्तर : क्ष=४

या समीकरणात मुळांत नसलेला १ मिळवला व नंतर काढून टाकला यालाच अध्यारोप–अपवाद असे म्हणतात.

याच पद्धतीचा स्वीकार करून

ब्रह्म+माया=जग.

ब्रह्म हे एकमेव सत्य असताना बहुरूप जगाचा अनुभव का येतो हे सांगण्यासाठी काल्पनिक मायेचा उपयोग केला आहे. माया ही माया आहे हे ओळखून तिचा निरास करावा म्हणजे मूळ ब्रह्म राहाते.

हे ब्रह्म निर्गुण आहे. मायिक जग सगुण आहे. ब्रह्माचे निर्गुणत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

पृथ्वीच्या ठिकाणी शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पांच गुण आहेत. पृथ्वी पाण्यापासून झाली. पाण्याचे चार गुण– शब्द, स्पर्श, रूप व रस. पाणी अग्नीपासून झाले. त्या अग्नीचे तीन गुण– शब्द, स्पर्श व रूप. वायूपासून अग्नि झाला. त्या वायूचे गुण दोन– शब्द व स्पर्श. आकाशापासून वायू झाला. त्या आकाशाचा गुण एक–शब्द. आकाश ज्याच्यापासून झाले त्याला आत्मा म्हणतात. त्याला काही गुणच उरला नाही. कारण क्रम असा ५–४–३–२–१–०. शून्य म्हणजे काहीं नाही असा बौद्ध शून्यवाद आहे. पण शून्यातून कांहीं उत्पन्न होणे शक्य नाही. मुळांत कांही असले तर पाहिजेच. ते जे असणे परंतु त्यास ओळखण्याजोगा काही गुण नसणे याला निर्गुण आत्मरूप वा ब्रह्मरूप सत्ता म्हणतात. न्यायवैशेषिक दर्शनात चोवीस गुण सांगितले आहेत. ते जगातील पदार्थविज्ञान, रसायनविज्ञान, मनोविज्ञान यातील द्रव्यांच्या ठिकाणी सापडतात. ते सर्व जगाच्या अनुभवाच्या आत येतात. म्हणून त्यातील कोणताहि गुण आत्म्याच्या ठिकाणीं नाहीं. अशा तऱ्हेचे नकारात्मक ‘ नेति नेति ’ असे त्या सत्तेचे वर्णन केलेले आढळते. त्याचप्रमाणें सांख्यदर्शनात प्रकृति त्रिगुणात्मक असल्याचे सांगितलें आहे. तेहि सत्व, रज, तम गुण आत्म्याचे ठिकाणी नाहीत. जे वर्णनीय आहे, वाच्य आहे ते मायिक जगतात येते. त्याच्या पलिकडचे ते ब्रह्म. ते अनिर्वाच्य, अव्यपदेश्य आहे. ते कोणत्याही शब्द योजनेनें वाच्यार्थानें प्रगट करता येत नाहीं. केवळ लक्ष्यार्थाने, लक्षणिक अर्थानेंच ते जाणून घ्यावयाचे असते.

परमार्थाचे जे वर्णन वेदान्तांत केले जाते ते व्यावहारिक भूमिकेवरूनच केलें जाते. परमार्थाचे पारमार्थिक भूमिकेंतून वर्णन करणें अशक्यप्राय आहे. कारण परमार्थ हा व्यावहारिक सर्व प्रकारच्या अनुभवापेक्षा अगदीच निराळा आहे. शब्द हेच मुळी व्यवहारसृष्टींतील आहेत. परमार्थ शब्दातीत आहे. व्यावहारिक ज्ञान

द्वैतात्मक आहे, परमार्थ अद्वैताचा बोध आहे, व्यवहारात ज्ञाता–ज्ञान ज्ञेय अशी त्रिपुटी अनिवार्य आहे. परमार्थं त्रिपुटीपलिकडचा आहे. व्यावहारिक ज्ञान प्रत्यक्ष, अनुमान, शब्द इत्यादि प्रमाणांद्वारा उत्पन्न होते व स्थापित करता येते. परमार्थ हा प्रमाणांनी सिद्ध करण्याजोगा नाहीं. तो अप्रमेय आहे. अप्रमाण म्हणजे जेथें प्रमाण निरुपयोगी, निरर्थक ठरते असा परमार्थ आहे. एवढचाच कारणास्तव शांकर अद्वैताशिवाय बाकीची वेदान्तदर्शने निर्गुण ब्रह्माला अंतिम सत्यता देत नाहींत. आणि एवढचाच कारणास्तव जगाला ते सत्यत्व देतात. मात्र त्यांना सगुणब्रह्म अथवा परमेश्वराचे सच्चिन्दान्दस्वरूप मान्य आहे. परन्तु जगच जर ज्ञानगम्य आहे तर प्रमाणव्यवहारानें जगाच्या पलिकडे काही अस्तित्व मानण्याचे केवळ कारणच रहात नाहीं, तर तसा आग्रह धरणे हा निरर्थक आहे, असे भौतिक-वाद्यांचे म्हणणें आहे.

या प्रमाणें शांकर वेदान्ताचा परमार्थ हा सहजासहजी समजण्याजोगा नाहीं. अत्यंत पात्र अशा व्यक्तीला प्रतीतिबळावरच तो सिद्ध करता येईल.

ज्ञानेश्वरांचा ‘ अमृतानुभव ’ हा जसा परमार्थांतून म्हणजे पारमार्थिक भूमिकेवरून परमार्थ जाणण्याचा प्रयत्न आहे त्याचप्रमाणें समर्थांचा ‘ आत्माराम’ आहे. यालाही प्रयत्नच म्हणण्याचे कारण व्यवहाराची संपूर्ण फारकत करून परमार्थाचा अंतर्गत अनुभव–ज्याला अपरोक्षानुभूति म्हणतात–त्याला शब्दरूप देणें हे वदतोव्याघाताचे उदाहरण आहे. व्यवहार जमेल तितका फिका करावयाचा व त्या भूमिकेचा कमीत कमी वापर करून पारमार्थिक भूमिकेच्या जवळांत जवळ जाण्याचा हा ‘आत्माराम’ ग्रंथाचा प्रयत्न आहे. यांत समर्थतत्वज्ञानाचा अंतिम गाभा आहे. हे परमार्थानुभूतीचे शिखर आहे. स्वत: रामदास म्हणतात –

आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वत:सिद्ध ।।

असे जरी दोन्ही ग्रंथाबद्दल म्हटले असले तरी ज्याप्रमाणे ‘ज्ञानेश्वरी’ आणि ‘अमृतानुभव’ यामध्ये पारमार्थिक भूमिकेच्या दृष्टीनें ‘ अमृतानुभव’ हाच श्रेष्ठ आहे, त्याचप्रमाणे दासबोधापेक्षा निखळ परमार्थपर विचार ‘ आत्माराम’ याच छोटचाशा ग्रंथात आहे. तो थोडक्यांत पाहू. गणेशाच्या निर्गुणरूपाचे स्मरण करणारीं पहिलीच ओवी पहा –

जयास लटिका आळ आला । जो माया गोरीपासूनि जाला ।
जालाचि नाहीं तया अरूपाला । रूप कैंचे ।। आत्माराम –१–१

जिचे वेगळे अस्तित्व दाखवता येत नाही अशा मायामय गोरीपासून उत्पन्न झाल्याचा ज्याच्यावर मिथ्याच आरोप केला आहे, जो मुळांतच नामरूपरहित आहे, तो उत्पन्न होणे शक्य नाही.

अरे जे जालेचि नाही । त्याची वार्ता पुससी काई । दा. ८–३–१।
हा अजातवाद आहे. जे नित्यसत् आहे ते उत्पन्न होत नाही, आणि जे असत् आहे त्याचीही उत्पत्ति शक्य नाही.

आदिशक्ति मूळमाया ही मूळ जाणीव आहे. जिच्यामुळेच दृश्य कार्यप्रवृत्ति शक्य होते.

पहिल्या समासाचे नांव आहे 'त्यागनिरूपण'. यांतील कल्पना मोठी रम्य आहे. गुरू शिष्याला म्हणतात–

तुझे अढळपद गेले । तुज मायेने वेढां लाविले ।
ते जरी तुझे तुज दिधले । तरी मज काय देसी ? ॥आ–३१–१॥
जितुके काही नासोन जाईल । जे अशाश्वत असेल ।
तुजसमागमें न येईल । तितुकेच द्यावे मज ॥३२॥

मायेने गुंतवल्या कारणानें तुझे अढळपद गेले ते मी तुला परत देतो. तू मला काय गुरुदक्षिणा देशील ?

तुझ्याजवळ जेवढे म्हणून नाशवंत कांही असेल ते मला देऊन टाक. नाशवंताच्या मोबदल्यात शाश्वताचा सौदा !

गुरु म्हणतात, मज तरी ते काय करायचेय म्हणा ! पण तुझ्याकडून अशाश्वताचा त्याग घडवावा व माझ्याबरोबर तुला स्वरूपी न्यावे, ही इच्छा.

शिष्याला हा सौदा एकदम पसंत पडला. तो गुरूला म्हणाला, "दिले," गुरु म्हणतात, "पद लाधले. आता तुझे काही आहे असे कशाचेही ममत्व तू ठेवू नकोस."

शिष्याने 'दिले' म्हणून त्याग केला खरा. पण या त्यागांत काय काय दिले गेले हे त्याला काही समजले नाही. म्हणून दुसऱ्या समासामध्ये 'मायानिरूपण' केले आहे. शिष्य म्हणतो–

नाशिवंत काये म्यां टाकावे । ते मज स्वामीने सांगावे ।
मज दातारे करावे । आपणा ऐसे ॥ आ. २–४ ॥

गुरु सांगतात– जे नाशवंत आहे ती माया आहे. ती सर्व गोष्टी विलयाला नेते. ती माया काय आहे ?

'अहं' ऐसे जे स्फुरण । तेंचि मायेचे लक्षण ।
तये मायेपासून त्रिगुण । गुणापासून भूते ॥२–११॥
येक माया दो ठायीं वाटली । प्रकृति आणि पुरुष जाली ॥१३॥
माया सच्चिदानंद । माया आनंदाचा कंद ।

माया हेचि निजबोध । शब्दरूपे ॥ १५ ॥
आत्मा ब्रह्म आणि स्वरूप । हेहि मायेचेचि रूप ।
रूप आणि अरूप । सकळ माया ॥ १६ ॥
जीव शिव आणि ईश्वर । हाहि मायेचाचि विस्तार ।
विश्वरूप विश्वंभर । अवधि माया ॥ १७ ॥

अद्वैतांत ज्याचा नुकताच प्रवेश झाला आहे अशा सामान्य जिज्ञासूचे मन वरील ओव्या वाचून गांगरून जाईल. प्रकृति पुरुष हे दोन्ही मायेचा परिणाम आहेत इतपत समजते. परन्तु येथे तर आत्मा, ईश्वर, स्वरूप, सच्चिदानंद, ब्रह्म या सर्वांनाच माया म्हणून संबोधले आहे. मग हे सर्व टाकावयाचे तर ठेवायचे काय? येथे सामान्य विद्यार्थ्यांची मति कुंठित झाली तर नवल नाही. परन्तु भल्या भल्या तत्त्वज्ञानी आचार्यांचीही येथे दमछाक होते. हे त्यांचे तत्त्वज्ञान पहाता लक्षांत येते. त्यांच्या बुद्धीची व अनुभूतीची झेप इतक्या उत्तुंग शिखरापर्यंत पोचत नाहीं. तेव्हा थोडा खुलासा केलेला बरा.

ब्रह्म किंवा ईश्वर सच्चिदानंदरूप आहे असे वेदान्ताचे सांगणे आहे. पुष्कळाना हे पारमार्थिक वर्णन आहे असे वाटते ते बरोबर जाहे, पण हा व्यावहारिक भूमिकेतून केलेला परमार्थ आहे, पारमार्थिक भूमिकेतून नाही. हे समजले तरच सच्चिदानन्द मायिक कसे ते समजेल. जगत् हे असत्–जड–दु:ख रूप आहे. म्हणून त्याला ब्रह्मविरोधी मायिक, मिथ्या असे म्हणतात. इतके वेदान्ती विद्यार्थ्याला समजते. पण याचा अर्थ असा झाला कीं सत्–असत्, चित्–जड, आनंद–दु:ख अशा सापेक्ष द्वैताच्या आधारावरच ब्रह्म आणि जगत् यांच्यामधील भेद आपण जाणला. या सापेक्ष द्वैताचा निरास केल्याशिवाय ब्रह्मतत्त्व निरपेक्ष अद्वैत दृष्टिला काय आहे ते समजणार नाही. म्हणजेच ब्रह्म जर असत्–जड–दु:ख नाही तर याच्या जाणीवेवरच उभारलेल्या ब्रह्माच्या सत्–चित्–आनन्द या रूपाला काही अर्थ उरत नाही. ब्रह्माला हे रूप द्वैतात्मक जाणीवेशिवाय देताच येत नाही. वर ११ व्या ओवीचा हाच अभिप्राय. अहंते स्फुरण हीच माया. 'सत्'ला सत् म्हणून ओळखण्याची जाणीवच मायारूप आहे. तीच गोष्ट चित् आणि आनन्द या पदांनी. याचा सारांश हा की, ब्रह्म हे सच्चिदानन्दस्वरूप आहे हे ज्ञान म्हणजे व्यवहारत: झालेले ब्रह्माचे आकलन आहे. परमार्थत: त्याचे आकलन होण्यासाठी या व्यावहारिक परमार्थाचा मायिक म्हणून त्यागच करायला हवा. तरच गुरूने शिष्यापासून अपेक्षित केलेल्या सर्व मायिक नाशवंत गोष्टींचा त्याग संपूर्णपणे घडला असे होईल. त्या भावनाही मायिक असल्याने तिचाही त्याग व्हायला हवा. माया होही मायिक म्हणून तीही संपूर्ण निरास पावायला हवी. असे झाले असताच परमार्थ घडतो

एरवी नाहीं. अरे ! सत्ता तेचि तत्त्वतां । माया जाण ।।२१।। असा विलक्षण परमार्थ आहे.

हा सर्व परमार्थविचार मायेचा आश्रय घेतल्याशिवाय आपण करूंच शकत नाहीं. याचा अर्थ असा कीं, मायेमुळे बंधन घडते हे जितके खरे तितकेच मायेच्या आश्रयानेंच बंधनही सुटते, हेही खरे. इतकी मायेची व्यापकता आहे.

मायेनेचि माया चाले । मायेंनेचि माया बोले ।
मायेनेचि माया हाले । वायोरूपें ।।२०।।
अरे । मनास जे जे अनुभविले । ते ते माईक नाथिले ।
तितुके तुवां टाकिले । पाहिजे स्वानुभवे ।।२७।।
सकळहि माया परी नाथिली । स्वरूपीं तो नाही राहिली ।
येवं आहे नाहीं हे बोली । माया जाण ।।२८।।
मायेकरितां माया दिसे । मायेकरितां माया नासे ।
मायेकरितां लाभ असे । परमार्थस्वरूपाचा ।।३०।।
सकळ मायेचे स्वरूप जाले । त्यांत तुझेहि स्वरूप आले ।
हे इतुकेहि आपुले । नको मानूं सर्वथा ।।३९।।

पुढे तिसऱ्या 'ब्रह्मनिरूपण' समासांत म्हटले आहे कीं,

अहं ब्रह्मास्मि हा गाथा । आला देहबुद्धीचिया माथां ।
देहबुद्धीने परमार्था । कनकोंडे होईजे ।।३–१९।।

'मी ब्रह्म आहे' हा अनुभवहि सूक्ष्म अशा जाणीवमय महाकारण देहावर आधारित अहंकारावरच अवलंबून आहे. हे वृत्तिज्ञान आहे, त्याचीही निवृत्ति झाली पाहिजे येथील 'अहम्' मुळे ब्रह्माला कानकोंडे व्हावे लागते म्हणजे मुकावे लागते. अहंकाराला टाकले पाहिजे हे खरे पण अहंकार टाकणे हीसुद्धा मायेचीच उठाठेव. कोणत्याही संगाशिवाय उरते ते स्वरूप.

वर्म हेचि माया माईक । याचा करावा विवेक ।
विवेक केलियां, अनेक । येकीं मुरे ।।३३।।
येकीं अनेक आटलें । येकपण अनेकासवे गेले ।
उपरी जे निःसंग उरले । तेंचि स्वरूप तुझे ।।३४।।

चौथ्या 'साधननिरूपण' समासांत सद्गुरु म्हणतात की, श्रवण, मनन, संतसंगति व भक्ति सतत करीत रहावे म्हणजें शाब्दिक ज्ञानाचे रूपांतर अनुभवामध्ये होते. शिष्याने नाशवंत सर्व दिले एवढे म्हटल्यानें झाले नाहीं. काय नाशवंत आहे ते ओळखून त्याचा सर्वस्वी त्याग घडला पाहिजे. मी नाशवंत दिले म्हणतांना देणारा तरी कोणी उरतो काय ?

तूं नाशवंतामध्ये आलासी । आपणास कां रे चोरिसी ।
नाशिवंत देतां चकचकीसी । फट रे पढतमुर्खा ॥४-१२॥
प्राप्त झाले अद्वैतज्ञान । अभिन्नपणे जे विज्ञान ।
तेचि जाण आत्मनिवेदन । जेथे मी-तूंपण नाहीं ॥३२॥

शेवटल्या पांचव्या 'स्वानुभवनिरूपण' समासांत शिष्य आपला अनुभव सांगतो.

जी मी मानवी किंकर । येकायेकी जालो विश्वंभर ।
संदेह तुटला थोर । यातायातीचा ॥५-३॥
मीच सकळ विस्तारलो । सर्वांभूतीं ॥४॥

सद्गुरु म्हणतात,

जे जे जाणोनि टाकिले । ते ते नाशिवंत, राहिले ।
तुझे तुज प्राप्त जाले । अक्षईपद ॥२३
ऐसे बोले मोक्षपाणी । ऐकोन शिष्य लोटांगणी ।
निःसंदेह स्वरुपामिळणीं । दोघे येकचि जाले ॥२४॥

असा बहारीचा 'आत्माराम' ग्रंथ आकाराने लहान पण आशयाने मोठा आहे. तो मुळांतूनच साधकांनी पहावा अशी शिफारस करतो.

□ □

## भाग तिसरा

# लेखकांचा परिचय

## श्री. मुकुंदस्वामी गोरे ( रामदासी )

मूळ नांव– मुकुंद भार्गव गोरे. सध्या वय ४४ : शिक्षण इंटर सायन्सपर्यंत. रामदास संप्रदायाची दीक्षा १९५७ च्या दासनवमी उत्सवात. सज्जनगड, चाफळ, उंब्रज येथे वास्तव्य झाल्यानंतर, १९६२ पासून टेंभूस मठपती. सामुदायिक जप, दासबोध पारायणे, अनेक ठिकाणीं करून घेतलीत. शरीर पूर्ण अपंग असताही देशभर प्रवास व धर्मप्रचार– प्रवचनाद्वारे.

## डॉ. (सौ.) ललित चारुदत्त दाभोलकर

एम्. ए. पीएच. डी.

( बेळगांवचे डॉ. आर. आर. खानोलकर यांची कन्या). १९५७ मध्ये बेळगावच्या लिंगराज कॉलेजमधून बी. ए. ( ऑनर्स ). लग्नानंतर २० वर्षांनी १९७७ मध्ये नागपूर विद्यापिठाची एम्. ए. ही परिक्षा प्रथम श्रेणी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. या यशाबद्दल नागपूर विद्यापिठाकडून सुवर्णपदके प्राप्त. १९७७ मध्ये नागपूर विद्यापिठाकडून पीएच. डी. साठी रिसर्च फेलोशिप. १९८१ मध्ये नागपूर विद्यापिठाने त्यांच्या ‘ संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व समर्थ रामदास : काव्य व कार्य तुलनात्मक दर्शन ’ ह्या प्रबंधाला पीएच. डी. पदवी दिली. स्त्री, किर्लोस्कर, हंस, सह्याद्री इ. मासिकांतून त्यांच्या अनेक कथा प्रसिद्ध. समाजप्रबोधन पत्रिका, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, रविवार सकाळ इ. मधून संशोधनात्मक लेखन प्रसिद्ध. धरमपेठ कॉलेज, नागपूर येथे अध्यापनाचे काम. आता कायम वास्तव्य सातारा येथे.

## डॉ. एस्. डी. देशमुख

डी. ए. एस्. एफ्. ( बॉम्बे )

जन्म १९३४. शिक्षण– पुणे येथे. व्यवसाय–खाजगी दवाखाना व हॉस्पिटल; मुरगूड, ता. कागल : जिल्हा कोल्हापूर.

ज्ञानेश्वरी, भागवत, तुकाराम गाथा व वेदान्त दर्शनांचा अभ्यास.

विशेष व्यासंग : दशोपनिषदावर ओवीबद्ध टीका : पांच प्रसिद्ध झाल्या आहेत.

इतर लेखन : सज्जनगड, पुरुषार्थ, जीवनविकास, पंढरीसंदेश या परमार्थपर मासिकातून लेखन.

अनेक ठिकाणीं प्रवचने.

## सुनील चिंचोलकर

सज्जनगड (जिल्हा सातारा). जन्म : ४-४-१९५१. जन्मगांव- मनमाड. शिक्षण- बी. कॉम्.

लहानपणी संघाचा स्वयंसेवक या नात्याने संबंध होता. महाविद्यालयीन शिक्षण घेताना स्वामी विवेकानंद व समर्थ रामदास यांच्या वाङमयाचा अभ्यास केला. बी. कॉम. झाल्यावर चार वर्षे शिक्षण खात्यात नोकरी केली. १९७७ साली लग्न झाल्यावर नोकरी सोडून सहकुटुंब सज्जनगडावर कायमचे वास्तव्य करण्यासाठी आले. सज्जनगडावर सध्या व्यवस्थापक म्हणून आहेत. शिवाय तेथून निघणाऱ्या 'सज्जनगड' मासिकाचे सहसंपादक आहेत. विविध संतांच्या व राष्ट्रपुरुषांच्या जीवनावर व्याख्याने देतात. प्रसाद, पुरुषार्थ, एकता, ज्ञानराज इत्यादि मासिकातून अनेक लेख प्रसिद्ध झालेत.

## श्री. वसंत नारायण वैद्य

पत्ता – मु. पो. चाफळ, ता. पाटण, जि. सातारा. वय ६३ वर्षे.

व्यवसाय – वैद्यकीय. आयुर्विद्या – विशारद ( टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे सन १९४०)

जन्म – १५ जून १९१८. गांव भिलवडी, ता. तासगांव, जि. सांगली.

वडील सेकंड यिअर ट्रेन्ड प्राथमिक शिक्षक. त्यांचे संस्कृत चांगले होते व संत-वाङमयाचा अभ्यास होता. 'मुमुक्षु' या पांगारकरांच्या मासिकाचे ते ग्राहक होते. ते मासिक लहानपणी वाचायला मिळायचे. त्यांनी मनाचे श्लोक व श्रीमद्भगवद्गीता पाठ करुन घेतली. विनायक महाराज मसूरकर यांचा मुक्काम गावी झाला असता, त्यांचे ब्रह्मचारी शिष्य, बांधेसूद शरीर व तेजस्वी मुद्रा आणि प्रभावशाली प्रवचन यांचा प्रभाव बालवयांत पडला. माता राजयक्ष्म्यानें आजारी. व जानेवारी १९२५ मध्ये निधन. वडिलांनाही दम्याचा विकार होता. सांगलीस आल्यानंतर वयाच्या बाराव्या वर्षी वडिलांचे निधन. सांगली हायस्कूलमधून १९३५ साली मुंबई युनिव्हर्सिटीची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण. त्या परीक्षेसाठीं जगन्नाथ शंकर शेटची तयारी. पुण्याच्या आयुर्वेद महाविद्यालयांतून १९४० साली आयुर्विद्या विशारद पदवी घेतली. व्यायामाची व वाचनाची विशेष आवड. १९४१ ते १९४९ पुणें जिल्ह्यांतील जुन्नर तालुक्यांत राजूर या गांवी अेस्. अेम्. पी. १९४९ पासून चाफळ येथें स्वतंत्र वैद्यकीय व्यवसाय. १९४५ पासून ज्ञानदेव, तुकाराम यांचा अभ्यास. १९५० पासून समर्थवाङमयाचा अभ्यास. समर्थ सेवा मंडळाच्या कार्यका-

रिणीचा १९७५ पासून सदस्य. चाफळ वाचनालयाचा संस्थापक अध्यक्ष, सांगलीच्या समर्थ व्यायामशाळेचा आजीव सदस्य, चाफळ येथील श्रीराममंदिराच्या मफतलालकृत जीर्णोद्धारांत सक्रिय सहभाग. श्रीराममंदिरात रोज एक तास प्रवचन सेवा. रोजच्या उपासनेंत सहभाग.

## प्रा. भालचंद्र र. मोडक

एम्. ए. पीएच्. डी.

जन्म– हुबळी येथे, दि. १८–११–१९२८

शिक्षण– बी. ए. (१९५०), एम्. ए. (१९५२) कर्नाटक विश्वविद्यालयातून प्रथम वर्गात उत्तीर्ण. पीएच. डी. ( १९५९ )– पुणे विश्वविद्यालयातून.

उद्योग– १९५३–५५ संस्कृत प्राध्यापक, काडसिद्धेश्वर कॉलेज, हुबळी
१९५५–६२ संस्कृत प्राध्यापक, कर्नाटक कॉलेज, धारवाड
१९६२ पासून कर्नाटक विश्वविद्यालयाच्या संस्कृत विभागात प्राध्यापक.

अन्य – धारवाडच्या तत्त्वान्वेषण मंदिरात १९६४ ते १९७६ पर्यंत कार्यदर्शी, १९७७ पासून उपाध्यक्ष.
Pathway to God च्या संपादक मंडळाचे सदस्य १९६७ पासून

लेखन– १४ पुस्तके व ४० संशोधनपर लेख प्रकाशित.

## प्रा. सु. गु. देशपांडे

एम्. ए.

जन्म : १९४२, यवतमाळ (विदर्भ); शालेय व पदवीपूर्व महाविद्यालयीन शिक्षण यवतमाळ येथे. १९६३ सालीं नागपूर विद्यापिठाची बी. ए. पदवी; अमरावती येथे. स्नातकोत्तर शिक्षण; १९६५ साली नागपूर विद्यापीठाची ' तत्त्वज्ञान ' विषयांत एम्. ए. पदवी.

१९६५ पासून निरनिराळ्या महाविद्यालयांतून अध्यापन; १९७६ पासून बेळगांव येथील राणी पार्वतीदेवी कॉलेजमध्ये अध्यापक.

'वेदान्त केसरी' (रामकृष्ण मठ, मद्रास), 'पाथवे टु गॉड्' (बेळगांव) या नियतकालिकांमधून थोडे लेखन; कांही काळ 'पाथवे टु गॉड्'ला संपादन सहकार्य. संगीतात अभिरुचि.

## डॉ. (सौ.) मंगला माधव वैष्णव

एम्. ए. पीएच्. डी.

( कु. मंगला गोपाळराव टाकळकर )

१९६४ – B. A. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व 'लक्ष्मीबाई चितळे' हे मराठी विषयाचे पारितोषिक.

१९६४ – डॉ. माधव हनुमंतराव वैष्णव M. B. B. S. औरंगाबाद यांच्याशी विवाह.

१९६७ – (विवाहोत्तर) एम्. ए. (मराठी)

१९८१ – "संत कवी शिवदीन केसरी : व्यक्ती आणि वाङ्मय" या विषयावर पीएच्. डी.
महाविद्यालयीन जीवनात वादविवाद आणि निबंध स्पर्धा यात पारितोषिके.

१९७० – पासून स. भु. महाविद्यालय, औरंगाबाद येथे प्राध्यापिका.
वाचन, लेखन, नाटच, व्याख्याने हे छंद.

## पद्मश्री पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, कऱ्हाड

कऱ्हाडचे १९३८ सालापासून समाजभूषण म्हणून लोकपरिचित असलेले पु. पां. तथा बाबुराव गोखले हे सातारा जिल्ह्यातील औंध येथे १५ नोव्हेंबर १८९८ त जन्मले. घरच्या आर्थिक सामान्य अवस्थेमुळे ते सातारा न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेजमध्ये बाहेर नोकरी (हॉटेल बॉय) करूनही बी. ए. झाले. परकीय सरकारची नोकरी करणार नाही असे लोकमान्यांना आश्वासन दिल्यामुळे पोटासाठी शिकवण्या करण्यावर त्यानी भर दिला. त्यांच्या या उपक्रमास कऱ्हाड कन्या शाळेच्या रजतमहोत्सवाचे स्मरणिकेत " कऱ्हाडच्या मुलींचे इंग्रजी शिक्षणाची गंगोत्री " म्हणून गौरविले आहे.

पिकेटिंगपासून 'चलेजाव'च्या चळवळीपर्यंत सर्व आंदोलनात त्यानी भाग घेऊन साडेचार वर्षे कारागृहही भोगले. सातारा जिल्हा लोकसेवा संघातर्फे खेडेगावांची सेवा त्यानी केली व जिल्ह्याची तेराही गावांची पदयात्रा केली. अस्पृश्यता निर्मूलनातसुद्धा सर्व चळवळीत त्यानी हिरीरीने भाग घेतलाच. साताऱ्याच्या समर्थ वृत्तपत्राचे १९४१ मध्ये व पुरुषार्थाचे (१९६७ ते १९७४ सप्टेंबर) संपादकत्व केले. १९५७ च्या ग्रंथालय परिषदेचे ते जळगांव येथे अध्यक्ष होते. समर्थ साहित्याचे ते अभ्यासू असून " समर्थ भक्ताग्रणी " मानले जातात. १९७०

साली भारत सरकारने त्याना पद्मश्री पदवी दिली. स्वातंत्र्य सैनिक म्हणून ते सरकारी पेन्शन घेत नाहीत. जागृत सातारा, श्रीराम समर्थ, सातवळेकर चरित्र असे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ आहेत.

## सौ. शालिनी अनंत जावडेकर

पूर्वाश्रमीच्या लीला गोविंद मोघे :

जन्म १९-१२-१९२३ कुर्ला (मुंबई) ; शिक्षण – जो. ए. (गृहीतागमा) संस्कृत – एस्. एन्. डी. टी. महिला विद्यापीठ पुणे. पदवी परीक्षेत संस्कृतचे प्रथम पारितोषिक. इ. स. १९४३ ते ४६ एस्. एन्. डी. टी. कन्याशाळा, मुंबई व पार्वतीबाई अध्यापन पाठशाळा व महिलाश्रम हायस्कूल, हिंगणे येथे संस्कृत व मराठीचे अध्यापन. १९४६ साली प्रा. डॉ. अनंत गणेश जावडेकर यांचेशी विवाह. १९४७ पासून बडोद्यास वास्तव्य. मराठी वाङमय परिषद व सहविचारिणी सभा, बडोदे यांच्या अनेकदा कार्यकारी सभासद. 'सहविचार' १९६९ या वार्षिकाचे संपादन. गुजराथमधील व बडोद्यातील महिलांच्या संगीत भजन प्रवृत्तीच्या आद्यप्रवर्तिका. 'सिद्धनाथ गणेश महिला मंडळ' (स्थापना सन १९५१), 'महिला गणेश भक्ती मंडळ' (स्थापना १९६१) व 'श्रीबोलाईमाता नवरात्र महोत्सव' (स्थापना १९६३)यांच्या संस्थापनेचे व संचालनाचे कार्य. राष्ट्र सेविका समितीच्या कार्यकर्त्या. बडोदे येथे १९७० साली 'कै. लक्ष्मीबाई केळकर रामायण महोत्सवाच्या संयोजिका. गीता ज्ञानेश्वरी साप्ताहिक अभ्यास मंडळ १९७२ सालापासून स्वतःचे घरी चालवितात. प्रसाद, सांगाती, पंढरी संदेश, सहविचार, पुरुषार्थ, सेविका, मायमराठी इ. नियतकालिकांतून लेखनकार्य. अहमदाबाद मणीनगर महिला मंडळाच्या ४४ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षा. संतांचे जीवन व कार्य याविषयी अनेक गावी व्याख्याने व प्रवचने. कोल्हापूर येथील "श्री ज्ञानेश्वर जन्मसप्तशताब्दी महोत्सवातील" (१९७५ साली) परिसंवादाच्या अध्यक्षा. संत वाङमयाच्या अभ्यासिका, प्रवचनकार व विशेषतः स्त्रीसंतवाङमयाच्या संशोधनाची आवड. तुकाराम महाराजांच्या शिष्या संत बहेणाबाई पाठक यांच्या संपूर्ण वाङमयाची नवी संशोधित पाठशुद्ध आवृत्ती "संत बहेणाबाईंचा गाथा" या नावाने चिकित्सक प्रस्तावनेसह संपादित करणाऱ्या पहिल्या स्त्री संपादिका ( प्रकाशक कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. मूल्य २५ रु. पृष्ठे ५९०, महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाने पुरस्कृत ) बृहन्महाराष्ट्र परिषदेच्या बडोदा शाखेच्या कार्यकर्त्या व महिला शाखेच्या प्रवर्तक व मुख्य चिटणीस.

दर एकादशीस नेमाचे भजन, गीताजयंतीस महिलांचे सामुदायिक गीता-पारायण, श्रीकृष्णाष्टमी व श्री ज्ञानेश्वर जयंती, वेणाबाई, बहेणाबाई आदि

स्त्रीसंतांच्या पुण्यतिथी तसेच वै. शं. वा. तथा सोनोपंत दांडेकर यांची पुण्यतिथी वगैरे कार्यक्रम दरवर्षी साजरे करतात. संगीत भजनाचे शेकडो जाहीर कार्यक्रम केले व चालू आहेत. चार कन्यांपैकी तीन प्राध्यापिका व एक डॉक्टर.

## डॉ. रंगनाथ सदाशिव गोडबोले

एम्. ए. पीएच्. डी.

जन्म : बडणेरा (जि. अमरावती) येथे ता. २४-१२-१९१६ रोजी. शिक्षण– मॅट्रिक १९३४ (नागपूर). १९३७– डिप्लोमा इन वीव्हिंग. १९३८–४० अहमदाबाद येथे कॅलिको गिरणीत वीव्हिंग सुपरवायझर. १९४०–४१– इंडियन एअर फोर्स पायलट ऑफिसर कॅंडिडेट. १९४१–१९७४ टेक्स्टाईल इन्स्पेक्टर म्हणून निवृत्त.

१९५२ मध्ये बनारस हिंदू युनिव्हर्सिटीचे बी. ए. व १९५४ मध्ये एम्. ए. १९५४ मध्येच साहित्यरत्न (हिंदी–प्रयाग); साहित्याचार्य (मराठी–पुणे) आणि १९७१ मध्ये, डॉ. अ. ग. जावडेकर यांचे मार्गदर्शनाखाली " Gnaneshwar and Kabir : A study in Comparative Philosophy " या विषयावर निबंध लिहून बडोदा युनिव्हर्सिटीकडून पीएच्. डी.

सार्वजनिक कार्य : १९४६ साली हिंदू–मुसलमान दंग्याचे वेळीं स्त्री पुरुषांना लाठी काठी व जंबियाचे शिक्षण दिले. श्री. मावळंणकर यांच्या अहमदाबाद येथील नृसिव्ह व्यायाम मंदिराचा सेक्रेटरी व शिक्षक. १९४७ साली स्त्री संरक्षक संघ स्थापना.

बडोदा येथे १) मराठी वाङमय परिषद, २) सहविचारिणी सभा, ३) ड्रामॅटिक अमॅच्युअर्स क्लब, ४) गुजरात मराठी समाज, या चार संस्थांचे अध्यक्ष.

लेखन : प्रसाद, सहविचार, सांगाती मासिकामध्ये लेख.

वास्तव्य : श्री क्षेत्र माचणूर : पोष्ट ब्रह्मपुरी : ता. मंगळवेढे : जि. सोलापूर.

## प्रो. डॉ. प्रभाकर महादेव उपाध्ये

एम. ए. पीएच. डी.

जन्म – तारीख ७-१-१९३०, उरण (जि. रायगड) येथे.

शिक्षण – बी. ए. पहिला वर्ग व भाऊ दाजी आणि आचार्य बक्षिसें. एम. ए. दुसरा वर्ग : झाला वेदान्ती बक्षिस. नंतर पीएच. डी. डिप्लोमा इन्

हायर एज्युकेशन : Certificate Course in Linguistics : Springer Research Scholar (Bombay University)

व्यवसाय : पार्ले येथील कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक. १९५९ पासून मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये अर्धमागधी, संस्कृत वगैरे विषयाकरिता पीएच. डी. करता मार्गदर्शक. संस्कृत, अर्धमागधी, भारतीय संस्कृति विषयाकरता पोस्ट ग्रॅज्युएट शिक्षक.

लेखन : मुंबई युनिव्हर्सिटी, बडोदा युनिव्हर्सिटी, उदेपूर युनिव्हर्सिटी, विक्रमपूर युनिव्हर्सिटीच्या मासिकातून लेख.

१९५३ मध्ये श्री गुरुदेव रानडे यांचा संबंध येऊन, त्यांचेकडून नाम-मंत्र मिळाला. त्यांचे तत्त्वज्ञानावर व्याख्याने देतात व लेख प्रसिद्ध होतात.

वास्तव्य – १० स्नेहवर्धिनी– गोरेगाव (पूर्व) मुंबई ४०००६३

## प्रो. डॉ. अनंत गणेश जावडेकर

१९४० : बी. ए. ऑनर्स (मुंबई), १९४२ एम. ए. (अलाहाबाद), १९५२ पीएच्. डी. १९६५ डी. लिट (मुंबई)

जन्म तारीख : ९–९–१९१९. जन्म स्थळ : इंदापूर, जि. पुणे

बी. ए. पर्यंत स. प. कॉलेजमध्ये गुरुवर्य सोनोपंत दांडेकर यांचे विद्यार्थी. १९४० ते १९४२ गुरुदेव रा. द. रानडे यांचे विद्यार्थी. प्रो. न. ग. दामले, फर्ग्युसन कॉलेज यांचे हाताखाली पीएच्. डी.

१९४२ ते १९४७ स. प. कॉलेजमध्ये लेक्चरर इन् फिलॉसफी.

१९४७ ते १९५८ बडोदा कॉलेज व म. सयाजीराव युनिव्हर्सिटीच्या आर्टस् फॅकल्टीमध्ये सिनियर लेक्चरर इन् फिलॉसफी.

१९५८ ते १९६६ तेथेच रीडर आणि प्रमुख तत्त्वज्ञान विभाग.

१९६६ ते १९७९ तेथेच प्रोफेसर आणि प्रमुख तत्त्वज्ञान विभाग.

१९७५ ते १९७७ आर्टस् फॅकल्टीचे डीन.

इंडियन फिलोसॉफिकल कॉंग्रेसशी १९४८ सालापासून निगडीत.

विभागीय अध्यक्ष कटक अधिवेशन, १९५९.

श्रीमंत प्रतापसेठ वेदान्त व्याख्याते चंदिगड अधिवेशन १९६३.

१९६५ ते १९७० जॉइंट सेक्रेटरी

१९७१ ते १९७६ चेअरमन, एक्झीक्युटिव्ह कमिटी

१९७५ मध्ये इं. फि. कॉंग्रेसची सुवर्णजयंती व त्यानिमित्त तत्त्वज्ञानांची

जागतिक परिषद, दिल्ली.

१९८१ अधिवेशन, भुवनेश्वर येथे जनरल प्रेसिडेंट.

अखिल भारतीय दर्शन परिषद (हिंदी माध्यम) १९६७ पासून उपप्रमुख. उदेपूर व जोधपूर येथील अधिवेशनांचे अध्यक्ष. १९८० जबलपूर अधिवेशनाचे उद्घाटक व स्वामीनारायण वेदांत व्याख्याते.

गुजरात तत्त्वज्ञान परिषदेचे संस्थापक व कार्यकारी समितीचे अध्यक्ष १९७९ पासून.

केंद्र सरकारच्या शिक्षण खात्यातर्फे नेमलेल्या "हिंदी पारिभाषिक संज्ञाकोश समिती" वर सदस्य.

१९८१ मध्ये वरील खात्यातर्फे नेमलेल्या "इंडियन कौन्सिल ऑफ् फिलॉसोफिकल रिसर्च" चे सदस्य.

बोर्ड ऑफ् स्टडीज्, परीक्षक, निवड समिती, सल्लागार समिती, व्याख्यान प्रतिष्ठान, चर्चासत्रे इत्यादि नात्याने भारतातील बहुतेक प्रमुख विद्यापीठांशी संबंधित.

पंधरा विद्यार्थ्यांना मार्गदर्शकत्वाखाली पीएच्. डी. पदवी प्राप्त.

ग्रंथ : १ अॅप्रोच टु रिॲलिटी, ओरीएंल इन्स्टिटयूट बडोदे (१९५७)

२ अॅक्शिओनोएटिक्स; व्हॅल्युएशनल थियरी ऑफ् नॉलेज अलाइड पब्लिकेशर्स, (मुंबई) १९६३.

३ ज्ञानप्रामाण्याचे मूल्यात्मक आलोचन – पुणे विद्यापीठ गुरुदेव रानडे व्याख्यानमाला

लेखनार्थ घेतलेले ग्रंथ –

1 Moral Philosophy in the light of the Bhagavadgita (गुरुदेव रानडे स्मारक व्याख्यानमाला, बेळगांव.)

२ शंकराचार्य – मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणें. ग्रंथ संपादन समितीवर सदस्य – मराठी तत्त्वज्ञान महाकोश.

लेख – सुमारे १२५ इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती.

बडोद्यांतील साहित्यिक, सांस्कृतिक संस्थामध्ये कार्य. अध्यक्ष सहविचारिणी सभा. माजी अध्यक्ष, मराठी वाङ्मय परिषद.

● ● ●

# शुद्धिपत्र

## अर्थबोधाला जेथे अडथळा येईल, अशाच चुका येथे दुरुस्त केल्या आहेत

| पान | ओळ | चूक | दुरुस्त |
|---|---|---|---|
| १ | ६ | दीपविणाऱ्या | दिपविणाऱ्या |
| ,, | ९ | तिघे | तीघे |
| २ | २६ | कारी | करी |
| ३ | ७ | अपकिर्ती | अपकीर्ती |
| ४ | १४ | वडिले | वडिलें |
| ६ | १३ | निर्शन | निरसन |
| ८ | १७ | देहीं | देही देव |
| ९ | २० | मश्वत्यं | मश्वत्थं |
| ११ | १६ | विस्ताराच्या | विस्ताराचा |
| ,, | २३ | तिर्थ रुप | तीर्थरुप |
| १७ | २४ | अतरलासी | अंतरलासी |
| १७ | २८ | शिष्यजनानुकपेचे | शिष्यजनानुकंपेचें |
| २० खालून | ८ | लिफाळयाने | लिप्ताळयाने |
| ४८ | १० | सचार | संचार |
| ४९ | १८ | उकाळे | उकावे |
| ,, | १९ | १६६४ | १६४४ |
| ५१ खालून | ३ | श्रीकृप्ण | श्रीकृष्ण |
| ५३ | २१ | प्रसग | प्रसंग |
| ,, | २४ | वशातील नतर | वंशांतील नंतर |
| ,, खालून | ५ | सभवनीय | संभवनीय |
| ५४ | १३ | मन | मत |
| ,, खालून | ७ | नसतोल | नसतील |
| ५५ | ९ | खडन | खंडन |
| ,, | २१ | यतिहास शोधक | इतिहास शोधक |
| ५६ खालून | ७ | अभगात | अभंगात |
| ,, खालून | २ | १६६० | १६५० |

| पान | ओळ | चूक | दुरुस्त |
|---|---|---|---|
| ६६ | ६ | नमले | नचले |
| ,, | ८ | रचयत् | रचयन् |
| ,, | ९ | पठनेत | पठनेन |
| ६९ | १२ | केलेला नाही | केलेला आहे तसा समर्थांनी केला नाही |
| ७२ | २२ | उच्च यावत् -- | यच्चयावत् -- |
| ,, | ३२ | परांतराचान | परांतराचा |
| ८३ | ६ | यातील | या तीन |
| ,, | ९ | जसे | नये |
| ८५ | १५ | नुपने | नुपजे |
| ९० | २१ | तैरा | तैसा |
| ,, | २८ | पाठांतर शक्ता | पाठांतर शक्ती |
| ९१ | १७ | हृदय संगम | हृदयंगम |
| ,, | २२ | असल्याचे | असल्यानें |
| ९२ | २६ | कांड मय | कांडमय |
| ,, | २७ | लेधिली | लेयिली |
| ९३ | १ | कर्मामागे | कर्ममार्गें |
| ९४ | २९ | उच्चावीण | उच्चारेवीण |
| ९५ | ११ | वैराग्यदर्शक | वैराग्यदशक |
| ९७ | ३१ | वाढवी तोचि | वाढविताचि |
| ९८ | २३ | धारा | थारा |
| १०६ | ३ | नय | नये |
| १०९ | १७ | मनांतील | मनातीत |
| ११७ | १२ | नाना पशुदासी | नाना पशु--दासी |
| १२७ | १८ | मानभावेपणा | मानभावीपणा |
| १२८ | ५ | आश्रप | आश्रय |
| ,, | २२ | पुरुपथ | पुरुषार्थ |
| ,, | २४ | निवृत्तीधर्माचा | निवृत्तिधर्माचा |
| १२९ | १४ | क्रियाशिलतेची | क्रियाशीलतेची |
| ,, | ३२ | महत्वाचे | महत्त्वाचे |
| १३० | ३ | रामनिष्ठा जीवितसाध्य | रामनिष्ठा ही जीवितसाध्य |
| ,, | ५ | अखड येकात | अखंड एकांत |

| पान | ओळ | चूक | दुरुस्त |
|---|---|---|---|
| १३० | २२ | प्रभावी आणि श्रेष्ठतर | प्रभावी आणि श्रेष्ठ असेल तर |
| १३१ | ४ | युक्षुदंडा | ईक्षुदंडा |
| ,, | १७ | सताप | संताप |
| ,, | २३ | सदेह | संदेह |
| १३२ | ५ | ढिल णाचे | ढिलेपणाचे |
| ,, | खालून ५ | सघटना | संघटना |
| १३४ | ९ | दुश्चितपणा | दुश्चित्तपणा |
| ,, | २६ | शांति | शांती |
| १३५ | ६ | सबदार | खबर्दार |
| १३७ | २२ | पारमार्थीक | पारमार्थिक |
| १३८ | २६ | वधुत्व | बंधुत्व |
| १३९ | ५ | सत | संत |
| ,, | १४ | दीपस्तभासारखे | दीपस्तंभासारखे |
| ,, | १९ | नव्हते | नव्हेत |
| १४० | १३ | वेदिक | वैदिक |
| १४१ | ३ | जेथ | जेथे |
| १४३ | १२ | स्वास्थ्यसरक्षणाची | स्वास्थ्य संरक्षणाची |
| १४७ | २३ | अक्कलवतपणे | अक्कलवंतपणे |
| ,, | २८ | राखावे अतर | राखावे अंतर |
| १४८ | २९ | (यजुर्वेद १३।४५) | (यजुर्वेद १३।४) |
| १४९ | १४ | जाणही अखडपणे | जाणही अखंडपणे |
| ,, | २४ | अभयं सत्व संशुद्धि ज्ञाने योग – व्यवस्थिति : | अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञान योग – व्यवस्थिति : |
| १५० | ५ | अनेक जन्मससिद्ध | अनेक जन्मसंसिद्ध |
| ,, | १२ | सहयज्ञ | सहयज्ञा: |
| ,, | २६ | व तेवसी | व तेवती |
| १५१ | २ | अपरिहार्यंचे | अपरिहार्यंच |
| ,, | ४ | सदर्भात | संदर्भात |
| १६२ | ३ | बा लयी नाही | बा नइ नाही |
| ,, | ११ | सुखिन:सतु | सुखिन:संतु |
| ,, | १५ | प्रसग वशात् | प्रसंगवशात् |
| १६४ | ७ | मत्र (यजुर्वेद १२५) | मंत्र (यजुर्वेद १।५) |

| पान | ओळ | चूक | दुरुस्त |
|---|---|---|---|
| १६६ | १५ | पारमार्थिकांच्या कडनच | पारमार्थिकांच्या कडूनच |
| ,, | ३१ | अयने गायनातून | अयने, अयनातून |
| १६७ | ३२ | रुळतेच कशी | रुळेलच कशी ? |
| १७१ | ६ | वयंरायस्योषस्य ददितार | वयंरायस्योषस्य ददितार: |
| १७२ | ३ | व्यवहारा मार्ग | व्यवहारीमार्ग |
| १७९ | १६ | मत्रासाठी | मंत्रासाठी |
| ,, | २० | अंभगात | अभंगात |
| १८३ | २१ | अशा | अशी |
| ,, | ,, | परिस्थिता | परिस्थिती |
| ,, | २६ | लक्ष्मण शास्त्रा जोशा | लक्ष्मण शास्त्री जोशी |
| १८३ | २७ | अविद्यची | अविद्येची |
| १८९ | ७ | वाणीने | प्रभावी वाणीने |
| १९३ | १० | वितरण | विवरण |
| ,, | २६ | मृत्यु | मृत्युं |
| १९४ | ११ | माचणूर | माचणूर, जिल्हा सोलापूर |
| १९५ | ७ | ग्रहस्थाश्रमावर | गृहस्थाश्रमावर |
| १९७ | ३१ | जनजागृति | ज्ञानजागृति |
| १९९ | ८ | एकोप | एकोपा |
| २०० | २० | तिर्थयात्रा | तीर्थयात्रा |
| २०५ | २१ | उप्तत्ति | व्युत्पत्ति |
| २२० | ३० | निरवयन | निरवयव |
| २२८ | २१ | जावावस्था | जीवावस्था |
| २३३ | ७ | उपपब्धि | उपलब्धि |
| ,, | १७ | कोडअर्थवान | कोऽर्थवान् |
| ,, | २० | न जाणवण्यासाठी | जाणवण्यासाठी |
| ,, | २८ | स्त्रोत | स्रोत |
| २३६ | ५ | चर्मचक्षनी | चर्मचक्षूनी |
| २४२ | १३ | वंदेपणा | बंदेपणा |
| २५६ | २६ | इद | इदं |
| ,, | २६ | शरादापि | शरादपि |
| २५७ | १० | मक्ति | मुक्ति |
| २५८ | २५ | वतिरागी | वीतरागी |

| पान | ओळ | चूक | दुरुस्त |
|---|---|---|---|
| २५९ | २५ | रक्षन्ती | रक्षन्ति |
| ,, | २६ | भजन्तितम् | भजन्ति तम् |
| २६३ | शेवटची ओळ | मूळ | समूळ |
| २६८ | ८ | चेष्टचा | चेष्ट या |
| २७१ | २८ | नभवसादयेत् | नमवसादयेत् |
| २७२ | १५ | असे | अशी |
| २७२ | १६ | सांगितले | सांगितली |
| २७९ | १७ | संपूर्णता | संपूर्णतः |
| २८१ | ११ | साक्षेप | सापेक्ष |
| २८१ | २६ | गणपत्य | गाणपत्य |
| २९१ | ४ | अगंतुक | आगंतुक |
| २९१ | ७ | पञ्चाचनेंद्रिये | पंचज्ञानेंद्रियें |
| २९५ | ५ | नियत्रण | नियंत्रण |
| ,, | १९ | अतिम सत्ता | अंतिम सत्ता |
| २९६ | १० | नियत्रण | नियंत्रण |
| ३०० | २३ | वडवित | घडवीत |
| ३१३ | ३१ | सान्निध्यां जात | सान्निध्यांत जात |
| ३१४ | ४ | शालतेने | क्षमाशीलतेने |
| ३२० | २३ | सगाशिवाय | संगाशिवाय |
| ३२५ | १९ | देशसुख | देशमुख |
| ३३० | १८ | नृसिव्ह | नृसिंह |

# अकॅडेमी ऑफ कंपेरेटिव्ह फिलॉसॉफी अँड रिलिजन,
## बे ळ गां व.

| कांही प्रकाशने | | किमत |
|---|---|---|
| १ श्रीगुरुदेव रानडे | प्रा. भा. र. मोडक<br>सौ. वसुधा मोडक | ३–०० |
| २ कर्मयोग | डॉ. ह. रा. दिवेकर | २–०० |
| ३ श्री ज्ञानेश्वर चरित्र | रामचंद्र नारायण सराफ | ८–०० |
| ४ गुरुदेव रानडे व त्यांची पारमार्थिक शिकवण | ग. वि. तुळपुळे | १५–०० |
| ५ ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान | सौ. पद्मा कुलकर्णी | १८–०० |
| ६ ज्ञानेश्वरांचे आत्मदर्शन अर्थात कार्य आणि तत्त्वज्ञान. | रामचंद्र नारायण सराफ | ४०–०० |

मिळण्याचे ठिकाण :

**गुरुदेव मंदिर**

हिंदवाडी, बेळगांव-५९० ०११.